२१

अध्यात्मः- २९ सन १८९८

ले. रामराव कृष्णराव जगार

पु. नांव. स्वानंदसाम्राज्य

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

आ. ३०५
जो. नं. ९३७०

बीमार सितारामकृ[illegible]

जो कहे सो पावे

~~सन १९०८~~

सन १८.८

ॐ तत्सत्.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां,
जानंति ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा,
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥ १ ॥

'कविश्रेष्ठभवभूतेरुक्तिः'

# स्वानंदसाम्राज्य.

ह्या ग्रंथ

श्रीसद्गुरु गंगाधरनाथ महाराजांचे

बुद्धिप्रेरणेनुरूप

## रामराव कृष्ण जटार

यांनीं लिहिला, तो

गुरुचरणीं अर्पण करून प्रसिद्ध केला.

आवृत्ति पहिली.

आश्विन शुद्ध १० (विजयादशमी)

शके १८२०—संवत् १९५५.

हें पुस्तक पुणें येथें
'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापून, सन १८६७ चे २५ वे आ-
क्टाअन्वयें याची नोंदणी करवून, पुस्तकस्वामित्वाचे सर्व हक्क
ग्रंथकारांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

**स्वानंदसाम्राज्याच्या स्वामित्वाचा अधिकार**
'एक लक्ष रूपक—मुद्रा' लावून घेणारास द्यावा;
अशी श्रीसद्गुरूंची आज्ञा आहे.

---

ही किंमत देणारा आणि याचें रहस्य जाणून स्वामित्वाचा अधिकार घेणारा आज जगांत कोणी पुढें येईल काय! पहातों.

ने. नं.: 13968

[illegible]


सं. 3/13 [illegible]

[illegible] धर्माजा [illegible]

दिल्ली [illegible]

श्री० सरकार महाराज माधवरावसाहेब शिंदे आलीजा बहादर दामइकबालहू जी० सी० एस्० आय.

यांचा अति नम्र सेवक.




रामराव कृष्ण जटार.

मुमता जुद्दौला बहादर, मुकाम लष्कर ग्वाल्हेर.

(जन्मकाल संवत् १९२१, भाद्रपद शु० १२ चंद्रवार).

श्रीसच्चिदानंदघनरूप सिद्धयोगींद्र पूज्यपाद श्रीमत्स-
द्गुरु गंगाधरनाथ महाराज, ढोलीबोवा




संस्थान लष्कर ग्वाल्हेर.

जन्मकाल संवत् १९०३–समाधिकाल संवत् १९४९,

आषाढ वद्य ४ बुधवार.

# ब्रह्मांडपद्मयंत्र.




ॐश्रीब्रह्मांडबीजं च शिवशक्तिसमन्वितं॥
अद्वैतदर्शकं पद्ममर्चनान्मोक्षदं शुभं ॥ १ ॥

रा० कृ० जटारशर्मा.

चिचणीकर.

# ॐ तत्सत् ब्रह्मणे नमः

## ( ब्रह्मांड पद्म यंत्रोद्धारः )

॥ बिन्दुषट्कोणवृत्ताढ्यं गर्भाष्टदलसंयुतं ॥
॥ बाह्याष्टदलसंलग्नसुचक्रानुयुतप्रभं ॥
॥ विदिक्षु सुंदराकारैः पुनरष्टदलैर्युतं ॥
॥ **यंत्रं ब्रह्मांड पद्माख्यं शिवशक्त्यैकबोधकं** ॥
॥ अद्वैतदर्शकं नित्यं विज्ञेयं तत्त्ववेदिभिः ॥

## ( विभूतयः )

॥ अहं बुद्धिर्नभस्वांश्च जलं पृथ्वी हुताशनः ॥
॥ आकाशश्च मनश्चाष्टौ ज्ञेया ब्रह्मविभूतयः ॥
॥ नारी मेधा कीर्तयश्च धृतिस्तद्वत् क्षमा तथा ॥
॥ वाक् श्रीःस्मृतिमुखाश्चाष्टौ ज्ञेया मायाविभूतयः ॥

## ( देवताः )

॥ वैष्णवी विष्णुसहिता ब्राह्मी ब्रह्मसमायुता ॥
॥ शैवी शिवसमायुक्ता देवताः षडमू मताः ॥

## ( आसां न्यासक्रमः )

॥ **ॐश्रीं शिवशक्तिरूपोहमेवं बिंदौ न्यसेत् मनुं**
॥ त्रिकोणे प्रथमे ज्ञेया सच्चिदानंदका गुणाः ॥
॥ त्रिकोणे तु द्वितीये च त्रीणि सत्वं रजस्तमः ॥
॥ वैष्णवी विष्णुसहिता योज्या सत्त्वस्य पार्श्वयोः ॥
॥ ब्राह्मी ब्रह्मसमायुक्ता रजसः पार्श्वयोस्तथा ॥
॥ शैवी शिवसमा योज्या तमसः पार्श्वयोस्तथा ॥
॥ गर्भाष्टदलमध्येषु नारीमेधादयस्तथा ॥

॥ प्रदक्षिणप्रक्रमेण योज्या मायाविभूतयः ॥
॥ बाह्याष्टदलमध्येषु अहंबुद्धिमुखास्तथा ॥
॥ प्रदक्षिणक्रमेणैव योज्या ब्रह्मविभूतयः ॥
॥ विदिक्षु वर्तमानेषु पुनरष्टदलेषुच ॥
॥ गुरुगंगाधरनाथमिति वर्णक्रमं न्यसेत् ॥
॥ पूर्वत्रिकोणमारभ्य सर्वासामेव योजनं ॥
॥ प्रदक्षिणप्रक्रमेण विज्ञेयं तत्त्ववेदिभिः ॥
॥ रामकृष्ण जटारेण तत्त्वजिज्ञासुना मुदा ॥
॥ यंत्रं ब्रह्मांडपद्माख्यमुद्धारन्यासपूर्वकं ॥
॥ योगिनो गुरुनाथस्य कृपया च प्रसादतः ॥
॥ लब्ध्वा प्रकाश्यतां नीतं मुमुक्षूणां विमुक्तये ॥

इतीशं

ॐतत्सत्.

# स्वानंदसाम्राज्य ग्रंथाची विषयानुक्रमणिका.

## ' प्रकरण '

### ब्रह्मानंद प्रदेश प्र० १ लें. पृष्ठ.


विषय प्रवेश ब्रह्मस्वरूप वर्णन. .... .... .... .... १
ब्रह्माचा तृतीय पाद.... .... .... .... .... .... ४
ब्रह्माचा द्वितीय पाद.... .... .... .... .... .... ११
ब्रह्माचा प्रथम पाद.... .... .... .... .... .... १४
ब्रह्माचा तुरीय चतुर्थ पाद* .... .... .... .... १५
ब्रह्माचें व मायेचें स्वरूपैक्य.... .... .... .... .... १७
परब्रह्मवाच्य व ॐकारवाचक यांचा अभेद आणि ॐकाराची
स्वरूपसिद्धि .... .... .... .... .... .... २०


### मायानंद प्रदेश प्र० २ रें.


मायेचें स्वरूप. .... .... .... .... .... .... २५
मायेचें निर्गुण नाम.... .... .... .... .... .... ३०
भ्रांतीचें स्वरूप. .... .... .... .... .... .... ३२
मायेचें सगुण नाम.... .... .... .... .... .... ३६
मायेच्या सप्तविभूति.... .... .... .... .... .... ४०
मायेची शक्ति. .... .... .... .... .... .... ४९
मायेचे गुण.... .... .... .... .... .... .... ५७


### ईशानंद प्रदेश प्र० ३ रें.


ईश्वराविषयीं चार आक्षेप.... .... .... .... .... ६९


* तुरीय चतुर्थ पादावर प्रथम वा[illegible] वारंभण करतां येत नाहीं ह्मणून शेवटीं सांगितला.

पृष्ठ.
प्रथमाक्षेपाचें उत्तर.... .... .... .... .... .... ७१
दुसऱ्या आक्षेपाचें उत्तर .... .... .... .... .... ७२
तिसऱ्या आक्षेपाचें उत्तर. .... .... .... .... .... ७३
चवथ्या आक्षेपाचें उत्तर. .... .... .... .... .... ७६
ईश्वराच्या स्वरूपाची सिद्धि.... .... .... .... .... ८५

## ईशानंद प्रदेश प्र० ३ रें.

ईश्वराविषयीं लोकमत. .... .... .... .... .... ९५
ईश्वराचें स्वरूप वर्णन. .... .... .... .... ....१०४
परमात्म्याचें अंतःकरणचतुष्टय .... .... .... ....
,, ,, पंचज्ञानेंद्रियें. .... .... .... .... ....
,, ,, पंचकर्मेंद्रियें. .... .... .... .... ....
,, ,, ईश्वराचे अवयववादी. .... .... .... ....११०
ईश्वराच्या शरीरावर लोकरचना .... .... .... ....१११
ईश्वराच्या प्रधान विभूती. .... .... .... .... ....११२
ईश्वराचें सर्वेश्वरत्वादि अखंड ऐश्वर्य.... .... .... ....११३
ईश्वराची सगुण मूर्ति अथवा आकृति. .... .... ....११६
ईश्वराच्या सगुणरूप सिद्धीची अन्य रीति.... .... ....११८
ईश्वराच्या स्वतंत्र अवतारमूर्ती. .... .... .... ....१२१
प्रकरणाचा सारांश. .... .... .... .... .... ....१२३

## सृष्ट्यानंद प्रदेश प्र० ४ थें.

सृष्टीविषयीं विचार .... .... .... .... .... ....१२७
सृष्टीचें स्वरूप. .... .... .... .... .... ....
,, कारणसृष्टि. .... .... .... .... .... ....१२९
सूक्ष्मसृष्टि. .... .... .... .... .... .... ....१३६
संस्काराचा आघात.... .... .... .... .... ....१४०
एक परमात्मा, सृष्टीचीं बारा तत्त्वें कशीं झालीं .... ....१४१
सूक्ष्म सृष्ट्यात्मक ओंकाराचें स्वरूप.... .... .... ....१४५

पृष्ठ.

स्थूलसृष्टि. .... .... .... .... .... .... ....१४६
पंचीकरण प्रकार. .... .... .... .... .... ....१४८
सृष्टिरचना .... .... .... .... .... .... ....१४८
चतुर्दश भुवनरचना.... .... .... .... .... ....१५२
सृष्टिसंबंधीं ज्योतिष व योगांतील कांहीं विचार. .... ....१६०
सृष्टीची कर्मप्रधानता.... .... .... .... .... ....१७७
क्रियेच्या मंडलाकार प्रवाहाची सिद्धि. .... .... ....१८२
जीवाचा ईश्वराशीं संबंध. .... .... .... .... ....१८४
विधात्याचा प्रादुर्भाव.... .... .... .... .... ....१८८
श्रुतीची अपौरुषेयता, स्वयंसिद्धता, व ज्ञानरूपता. .... ....१९०
प्रणवाची सर्वात्मकता व सर्वरूपता.... .... .... ....१९२
वर्णमाला व संख्या.... .... .... .... .... ..
चतुर्विध जीवांची उत्पत्ति .... .... .... .... ....१९७
श्रीविष्णुरुद्रांचीं कार्यें. .... .... .... .... ....१९८
सृष्टिसंहार अथवा प्रलय.... .... .... .... ....१९९
प्रलयाचा प्रकार. .... .... .... .... .... ....२०१
भौतिक जीवांचा लय. .... .... .... .... ....२०५
महाभूतांचा लय .... .... .... .... .... ....२०६


---

## जीवानंदप्रदेश प्रकरण ५ वें.


विषयप्रवेश .... .... .... .... .... .... ....२१९
जीव शब्दाची व्याख्या. .... .... .... .... ....२२४
जीवाच्या स्वरूपाचा शोध.... .... .... .... ....२२५
जीवशोधनाच्या तीन कक्षा.... .... .... .... ....
पहिली आद्यकक्षा.... .... .... .... .... ....२२७
दुसरी मध्यकक्षा. .... .... .... .... .... ....२३०
तिसरी अंत्यकक्षा. .... .... .... .... .... ....२३४
जीवाचें स्वरूप. .... .... .... .... .... ....२३७
जीवाच्या एकोणीस कला.... .... .... .... ....२३९

पृष्ठ.

ज्ञानेंद्रियपंचक. .... .... .... ... .... .... ,,
कर्मेंद्रियपंचक. .... .... .... ... .... ....२४०
प्राणपंचक. .... .... .... .... .... .... ....२४१
अंत:करणचतुष्टय .... .... .... .... .... .... ,,
जीवाचे देहत्रय. .... .... .... .... .... ....२४२
स्थूल देह. .... .... .... .... .... .... ....२४३
सूक्ष्मदेह. .... .... .... .... ... .... ....२४४
कारणशरीर..... .... .... .... .... .... ....२४५
जीवाच्या एकोणीस त्रिपुटी.... .... ... .... .... ,,
पंचकर्मेंद्रिय त्रिपुटी .... .... .... .... ....२४६
पंचज्ञानेंद्रिय त्रिपुटी .... .... .... .... .... ,,
प्राणपंचक त्रिपुटी. .... .... .... .... ....२४७
अंत:करणचतुष्टय त्रिपुटी .... .... .... ....२४८
जीवाचें अवस्थात्रय.... .... .... .... .... .... ,,
१ जाग्रदवस्था .... .... .... .... .... ....२४९
२ स्वप्नावस्था .... .... .... .... .... ...२५१
३ सुषुप्तिअवस्था..... .... .... ... .... ....२५५
जीवाचे पंचकोश. .... .... .... .... .... ....२५८
१ अन्नमय कोश.... .... .... .... .... ....२५९
२ प्राणमय कोश.... .... .... ... .... .... ,,
३ मनोमय कोश.... .... ... .... .... .... ,,
४ विज्ञानमय कोश. .... .... .... .... ....२६०
५ आनंदमय कोश. .... ... .... .... .... ,,
देहेंद्रियादि स्थूलसूक्ष्मसंघातरूप जीव[redacted] स्वाभाविक धर्म....२६२
अंत:करणाचे धर्म—ह्म० षडूर्मींचे प्रका[redacted] .... .... ....२६६
जीवाचें कर्म .... .... .... .. .... .... ....२७४
सहेतुक कर्म .... .... .... . .... .... ....२८१
कर्मफलभोग .... .... .... . ... .... ....२८७
जीवाचें प्रारब्धकर्म ... .... . .... .... ....२९३

५ अ-३०

पृष्ठ.

प्रारब्धवाद व प्रयत्नवाद .. .... .... .... ....२९७
त्रिविधकर्मांचें अधिष्ठान .... .... ... .... ....३११
जीवाची पुनर्जन्ममरणसिद्धि .... .... .... ....३१४
पु० ज० म० सिद्धीचा दुसरा पक्ष .... .... .... ....३२१
योगशास्त्रानें व ज्योतिषानें पुनर्जन्मसिद्धि .... .... ....३२८
* वैद्यकी व डाक्टरी रीतीनें जीवाच्या उत्पत्तीची माहिती ....३३०
जीवाची महाकारणावस्था--ह्म० मरणक्षणापासून पुन्हां जन्मक्षणापर्यंत--मधल्या अवकाशांत जीवाची स्थिति कशी असते....३३४
जीवाचा जन्मांतरसंस्कार .... .... .... .... ....३३७
जीवाचें संस्कारात्मक महाकारणशरीर .... .. ....३४१
जीवाचा लिंगदेह अथवा कारणशरीर .... .... ....३४३

---

## ‘ जीवाचें जीवनचरित्र ’

जीवाच्या जन्माची आद्यकक्षा .... .... .... ....३४६
जीवाचा गर्भप्रवेश व वृद्धि .... .... .... ....३५०
गर्भाची व गर्भिणीची कष्टमय स्थिति.... .... ....३५२
जीवाच्या जन्माचे ग्रहयोगादिक.... .... .... ....३६०
जीवाचा जन्मकाल व जन्मोत्सव.... .... .... ....३६३
जीवाची शैशवावस्था .... .... .... .... ...३६९
मुलांचा शिक्षणक्रम .... .... .... .... ....३७२
मुंजलग्नाचे प्रकार .... .... .... .... ....३७४
जीवाच्या जन्माची मध्यकक्षा ह्म० तारुण्य .... .... ....३७७
अशिक्षित तरुणांचा व्यवहार .... .... .... ....३७९
सुशिक्षित तरुणांचा व्यवहार .... .... .... ... ३८४
पामर व विषयी जिवांचीं लक्षणें व त्यांचे व्यवहार ....३८९
पंचविषयांचीं विस्तृत स्वरूपें .... .... .... ....३९५
विहितविषयभोग .... .... .... .... .... ....४००
विद्येचा भोग .... .... ... .... .... ....४०२
धनाचा भोग .... .... .... .... .... ....४०५

पृष्ठ.
विषयभोग ( स्त्रीसुख ) .... .... .... .... ...४०८
शृंगारिक विलास.... .... .... .... .... ...४१३
विषयानंदांत स्वरूपानंद ... .... .... .... ....४२४
जीवाची अंत्यकक्षा ह्म० वार्धक्य व मृत्यु .... .... ....४३०
मृत्यूचें स्वरूप व ऐश्वर्य.... .... .... ... .... ,,
जरेचें स्वरूप .... .... .... .... .... ....४३२
मृत्यूविषयीं विचार .... .... .... .... ...४३५
मृत्यूची व अज्ञानाची आनंदरूपता .... .... ....४४०
शोक .... .... ... .... .... .... ....४४५
प्रकरणोपसंहार .... .... .... .... ... ....४५१

धर्माजी
विंचणीकर.

# प्रस्तावना.

## ॐ श्रीतत्सत्.

नमस्तस्मै सदेकस्मै कस्मैचिन्महसे नमः ॥
यदेतद्विश्वरूपेण राजते गुरुराजते ॥ २ ॥

**ॐ नमः श्रीरामगुरवे परमात्मरूपिणे बुद्धिप्रेरकाय सर्वमयाय नमः ॐ**

श्रीमत्सद्गुरु गंगाधरनाथ महाराजांच्या आणि श्रीरामचंद्राच्या कृपामृतसिंचनानें माझ्या बुद्धींत आणि लेखणींत जी प्रेरणा सुरू झाली तिचें फल मला प्राप्त होऊन त्याच्या रसास्वादानें ज्या परमावधीच्या आनंदाचा आणि तृप्तीचा मी अनुभव घेत आहें, तो केवळ स्वसंवेद्य असल्यानें मला कोणत्याही प्रकारें व्यक्त करितां येत नाहीं. तथापि त्याच प्रेरणेच्या योगानें चालू झालेल्या लेखनप्रवाहांतून प्रगट झालेला ' अव्यक्तबोध ' नामक एक लहानसा ग्रंथ गेल्या वर्षी भारतवर्षीय विभूतींच्या सेवेसी प्रविष्ट झाला आहे. त्या सारभूत ग्रंथाचाच हा ' स्वानंद साम्राज्य ' नामक विस्ताररूप ग्रंथ सर्व रसिकांच्या सेवेसी सादर केला आहे. अव्यक्तबोधांत ज्या विषयाचा विचार पुरुष, प्रकृति, नाम, रूप, कारण, श्रुति आणि उपसंहार अशा प्रकरणांत साररूपानें झाला आहे; त्याच मुद्यांचा विचार विस्तारानें या ग्रंथाच्या ब्रह्म, माया, ईश्वर, सृष्टि आणि जीव अशा पांच प्रकरणांत अगदीं स्वतंत्रपणें केला आहे. अव्यक्तबोध प्रसिद्ध झाल्यानंतर बऱ्याच सद्गृहस्थांनीं विषयाच्या दुरुस्तीबद्दल कांहीं सूचना केल्या; किंबहुना आमचे मित्र जगद्धितेच्छुकार गोंधळेकर यांनीं आपल्या पत्रांत अभिप्राय देतांना विषयप्रवेश करण्याचें वळण सुद्धां दाखविलें, परंतु मी ग्रंथकार नसल्यानें विषयाच्या प्रवाहाचा झोंक माझ्या आकलनांत आला नाहीं. तो अंतःप्रेरणेनुरूप जिकडे झपा-

त्यानें जसा वाहत सुटला तसें मला तिकडे वाहत जावें लागलें. मीं तर केवळ अंतर्यामीं दिसलेल्या दिव्य पंक्तीची नक्कल केली आहे. ह्मणूनच हा ग्रंथ अल्प कालांत बाहेर आला.* अव्यक्तबोध लिहिला त्यावेळीं माझे परम मित्र रामभाऊ वेरुळकर वकील माझ्या संन्निध असल्यानें त्यांनीं व्याकरणरीत्या भाषेची व विराम चिन्हें इ. ची तरी दुरुस्ती केली होती. पुढें त्यांचा अकालिक व अपघातानें अकस्मात् मृत्यु झाल्यानें माझ्या लेखशोधनाचें काम लंगडें पडलेंच होतें. त्यांतून माझे समानवयस्क आत्मीय प्राणमित्र अव्यक्तबोधाचें संस्कृत भाषांतरकर्ते व आतेबंधू सखाराम बाळकृष्ण करमळकर वेदांतसागरांतलें अमूल्यरत्न होतें तें नुकतेंच अगदीं अकालिक व अकस्मात् निवर्तल्यानें माझ्या एकंदर उमेदीचें नुकसान झालें आहे. तें भरून येणें शक्य नाहीं. तथापि पुढें ग्रंथाच्या भाषा वगैरेची दुरुस्ती माझे दुसरे प्रिय मित्र रा. रा. बळवंतराव कमलाकर नाजर प्रांत अदालत माळवा उज्जेन यांनीं बरीच केली. पण ते अति कार्यव्यग्र असल्यानें ती व्हावी तशी झाली नाहीं असें त्यांनीं कळविलें. आतां आमचे प्रकाशक मित्र गोंधळेकर यांनीं आपल्या छापखान्याची अशुद्धतेबद्दल अपकीर्ति न होण्याकरितां जी कांहीं काळजी घेऊन दुरुस्ती केली असेल तीच खरी. नाहींपेक्षां ग्रंथरचनेंत माझ्या किती चुका राहिल्या असतील हें मला सांगतां येत नाहीं. याची विद्वान रसिक वाचकांनीं पूर्ण क्षमा करून मजला कळविल्यास या त्यांच्या कृपेचा मी अत्यंत आभारी होईन. ग्रंथरचनेंत प्रारंभीं थोडें काठिन्य आलें आहे. तें विषयाच्या गहनतेमुळें जरी मला दूर करतां आलें नाहीं, तरी पुढें पुढें स्वाभाविकपणेंच सुलभता व रमणीयता आली आहे. करितां वाचकांनीं कंटाळून पराङ्मुख न होतां एकवार शेवटपर्यंत पर्यालोचन केल्यावांचून राहू नये; आणि कदाचित् असा प्रसंग आलाच तर निदान ' जीवानंद प्रदेश ' प्रकरण पांचवें व

---

**टीप.**—ग्रंथलेखनास मित्ती भाद्रपद शुद्ध ४ गुरुवार शके १८१८ संवत् १९५३ या दिवशीं आरंभ होऊन मि० फाल्गुन व० ५ रविवार शके १८१९ संवत् १९५४ रोजीं समाप्त झाला. मध्यंतरीं सरकारी व घरगुती कामामुळें सहा महिने लेखन बंद राहिलें.

त्यांतील जीवाचें जीवनचरित्र तरी वाचल्याविना राहूं नये; अशी माझी त्यांस प्रार्थना आहे. आणि जे प्रेमादरानें वारंवार हें पुस्तक नित्य वाचून मनन करतील त्यांना आनंदांत निमग्न करणार सच्चिदानंदघन श्रीगुरु राम समर्थ आहेत. त्याच दयाघन सर्वेश्वरानें, आमच्या प्रजानंदवर्धन, राज्यकार्यधुरंधर, परम दयाळू श्रीमंत माधवराव महाराज शिंदे सरकार अलिजा बहादर जी. सी. एस. आय. यांजला अखंड ऐश्वर्यानें परिपूर्ण ठेवून चिरायू करावें अशी त्या परमात्म्यास अनन्यभावें प्रार्थना करितों. ज्या प्रभूच्या पूर्ण कृपाछत्राखालीं आह्मा सेवकजनांस 'स्वानंद साम्राज्याचें' सौख्य भोगावयास मिळत आहे; त्याच्या कृपेचें व सत्कीर्तीचें यश वर्णन करण्यास मी असमर्थ असल्यानें मी आपल्या प्रभूचें प्रेमपुरस्सर पादवंदन करून ही प्रस्तावना समाप्त करितों.

रामराव कृष्ण जटार.
मुमता जुद्दौला बहादर.
लष्कर ग्वाल्हेर.
छत्री बाजार.

# सुज्ञास अगत्याची सूचना.

या प्रांतीं अव्यक्तबोध व स्वानंदसाम्राज्य हे ग्रंथ प्रगट झाले, तसे दक्षिणप्रांतीं दोन अपूर्व ग्रंथ याच सुमारास निर्माण झाले आहेत.

विद्वद्वर्य केशव नारायण शास्त्रीबोवा दामले मु० पुणें यांनीं 'प्रणवप्रकाश' नामक ग्रंथ निर्माण केला, त्यांत प्रणवाची सर्वात्मकता व सर्वरूपता शास्त्रीय प्रमाणांनीं व युक्तींनीं फारच उत्तम दाखविली आहे. आणि प्रणवाच्या उपासनेचा जो प्रकार दाखविला आहे त्याप्रमाणें मुमुक्षूंनीं साधन केल्यास तो कृतार्थ होईल.

रा० रा० बाबूराव चिमणाजी गोंधळे वकील वरिष्ठ कोर्ट बडोदें यांनीं 'योगतत्त्वामृत' नामक योगशास्त्राचा ओंवीबद्ध ग्रंथ निर्माण केला. हा फार उत्तम आहे. योगसाधनारूढ होणाऱ्या साधकांस याचा बहुत उपयोग होईल.

हे दोघेही सत्पुरुष आत्मानुभवी आणि विद्वान असल्यानें ग्रंथद्वारा लोकांवर यांचे महदुपकार झाले आहेत. विचारवानांनीं या दोनी ग्रंथांचा अवश्य संग्रह करावा, अशी माझी सर्वांस विनंति आहे.

रा० रा० कृ० जटार

ॐ सच्चिदानंदात्मने नमः

# स्वानंदसाम्राज्य.

## उपोद्घात.

जंतूनां नरजन्म दुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता ।
तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्वमस्मात्परं ॥
आत्मानात्मविवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थिति- ।
र्मुक्तिर्नो शतजन्मकोटिसुकृतैः पुण्यैर्विना लभ्यते ॥ १ ॥

श्रीमच्छंकराचार्य भगवत्पूज्यपादाः
जयंतुतरां

षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् सृष्टिनियामकाच्या या अद्भुत जगद्रचनेकडे आपण क्षणभर जरी विचारपूर्वक अवलोकन केलें तरी बुद्धि अगदीं कुंठित होते. अनंत पदार्थ, अनंत जीव आणि अनंत द्रव्यांनीं ही सृष्टि अगदीं ओतप्रोत भरली आहे. इच्यांतील कोणत्याही एका वर्गाच्या शोधार्थ कोणी कसाही विद्वान् व बुद्धिमान् प्रवृत्त झाला तरी त्यास त्याचा अंत लागणें सर्वथा अशक्य आहे. ही सृष्टि सच्चिदानंघन परमात्म्याचें व चिच्छक्ति आदिमायेचें क्रीडाभुवन आहे. यांत स्वेच्छाविहारार्थ, आदिशक्तीनें काल, कर्म, द्रव्य, यांच्या स्वभावाच्या मिश्रणानें अनंतविध पदार्थ आणि जीव जे जे कांहीं निर्माण केले त्यांत स्वयंव्यापक परमात्मा सर्वात्मरूपानें प्रविष्ट होऊन अखंड विराजमान झाला आहे. या त्याच्या क्रीडाभुवनाचे मुख्य व्यवस्थापक अथवा प्रधान ‘ काल ’ आणि ‘ कर्म ’ हे दोघे होत. ते त्या सर्वेश्वराच्या हेत्वनुरूप अनंतकोटी ब्रह्मांडांची घडामोड करीत असतात. या घडामोडींत त्याचें काय इंगित असेल

याचा अंत श्रुति शेष शारदादिकांसही लागत नाहीं. तेथें आपल्या-सारख्या अल्पज्ञ जीवांची कथा काय ! पण ही सर्व सृष्टि ईश्वराची असून सर्व जीवमात्र हीं ईश्वराचीं बालकें आहेत, त्या सर्वांवर त्याची अगदीं समान प्रीति आहे. अशा त्याच्या प्रिय बालकांस, सृष्टिसौख्याचा वांटा पाळीपाळीनें समान मिळावा, सुखदु:खांची वांटणी बरोबर रहावी, आणि ज्ञानभांडाराचा ठेवा कालेंकरून व क्रमेंकरून सर्वांस सारखा मिळत जावा ह्मणून जगदीशानें आपलें स्वरूप जो अखंड दंडायमान व सृष्टीच्या घडामोडीस पुरून उरणारा असा प्रचंड ' काल ' त्या कालरूप दंडास—उन्नतिकाल व अवनतिकाल अशीं दोन पारडीं बांधून—जीवांस आपापल्या उन्नत्यर्थ उद्योग कर्मादिकांचीं वजनें दिलीं, आणि त्या वजनांनीं आपापलें गुरुत्व कसें वाढवावें एतदर्थ अति मौल्यवान् सारासारविचारशक्ति, विशेषत: मनुष्यजीवास देऊन ज्याची जबाबदारी त्याच्याच हवालीं केली व आपण अगदीं तटस्थ लक्षणानें अलिप्त राहिला. पण अशी व्यवस्था अमुक सृष्टीच्या आरंभीं केली असा निर्णय ठरवितां येत नाहीं. कारण, सृष्टीचें स्वरूप अनादि अनंत असल्यानें जीवही अनादि अनंत आहेत आणि त्यांच्या कर्मफलांची व्यवस्थाही त्यांच्याबरोबरच अनादि अनंत कालापासून चिकटलेली आहे. अशा ह्या अनंत कालचक्राचीं, क्षण, पल, घटि, प्रहर दिनादारभ्य कृत त्रेतादि युगांस घेऊन तों अखेर सृष्टिकल्पांतापर्यंत अनेक कालखंडें झालीं. त्यांत अनंत जीवांनीं आपापल्या बुद्धिबलपराक्रमाच्या जोरावर आपली कर्मवृद्धि करून, सृष्टिसौख्योपभोगार्थ चढाओढीनें झटून, यथेष्ट आणि यथालाभ वैभवाचा सुखानुभव घेतला. आणि आपल्या उन्नतीचीं पारडीं फारच भारी केलीं. कारण, कृतत्रेताद्वापारांपर्यंत मनुष्याचें आयुष्य अति दीर्घ ह्म० प्रारंभीं लक्षावधी वर्षांचें होतें. तें पुढें उतरतें होत होत द्वापारांतांत अति थोडें म्हणजे सवाशें वर्षांपर्यंत येऊन ठेपलें, आणि आतां कलिकालांत तर विचारावयासच नको. अर्थात् जेव्हां मनुष्याचें आयुष्य फार मोठें होतें तेव्हां त्या अनुरोधानें त्याच्या बालतारुण्यादि अवस्था, अवस्थापरत्वें बल, बुद्धि, पराक्रमाची वृद्धि, आणि त्या वृद्धध्यनुरूप सुखसाधना-

द्यैश्वर्यप्राप्त्यर्थ होणारे प्रयत्न किती मोठे असतील हें अनुमान सहज करतां येईल. क्षत्रिय वर्गांनीं व दानवांनीं सत्तेच्या व ऐश्वर्याच्या लोभानें तपाद्यनुष्ठानबलानें व पराक्रमानें आपल्या उन्नतीचें मान–सामान्य कक्षेपासून चढवीत चढवीत मंडलेश्वरापासून तों इंद्रलोकाधिपत्यापर्यंत नेऊन पोंचविलें. परमावधीचीं सुखें भोगलीं. आणि कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून कर्म क्षीण होतांच पुन्हां अवनतीला प्राप्त झाले. उन्नतीच्या अति उच्च शिखरावर पोंचूनही आशेची तृप्ति झाली नाहीं, अंत:करणास उपराम प्राप्त झाला नाहीं, आणि पुनरावर्तनाच्या अवनतीनें पिच्छा सोडला नाहीं. अशा उन्नतीस ‘ उन्नति ’ ह्मणतां येत नाहीं. उन्नति तर तीच आहे कीं, जी एकवार झाली म्हणजे पुन्हां अवनतीची बाधा स्वप्नांतही होऊं नये. अशा प्रकारची उन्नति एका ‘ आत्मोन्नती ’ वांचून सृष्टींत दुसरी नाहींच, हा सिद्धांत आहे. ही आत्मोन्नति केवळ धर्मोन्नतीच्या आधीन असल्यानें भारतीयांनीं त्याच गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें आहे व ऐहिक महदैश्वर्यापेक्षांही ते धर्मास फार अधिक समजतात. असें भारत वर्षाचें आनुवंशिक शील आहे. असें असतां आज मित्तीस याची अगदीं विलक्षण स्थिति झालेली दिसते. हें सुधारणाशतक असल्याचा जिकडे तिकडे जयघोष ऐकूं येतो. पण भारतवर्षाच्या सुधारणेचा मूळ पाया धर्मोन्नति आणि उच्च शिखर आत्मोन्नति ह्या असून, यांच्याकडे समाजाचें अगदीं दुर्लक्ष झालें आहे, ही मोठी खेदाची गोष्ट आहे. आमच्या भारत संततीस सांप्रतकाळीं कालचक्रानुरोधानें बालपणापासून जें परकीय शिक्षण मिळतें व तें ज्या पद्धतीनें मिळून ते मोठे विद्वान व विचारवान होतात, त्या विद्यापद्धतीनें त्यांच्या धर्मोन्नति व आत्मोन्नतीच्या मुख्य अंत:करणभूमिकेंतील विश्वासाची व भक्तिरसाची आर्द्रता बहुधा सर्वस्वीं नष्ट होऊन ती अगदीं कोरडी खणखणीत होते. मग तेथें अनुभवाचें बीज कसें रुजणार? व त्यापासून आनंदवृक्ष कसला प्रफुल्लित होणार? अंत:करण शुष्कतर्कचिकित्सेचें खडक होतें. अशा शुष्कतर्कचिकित्सकांशीं आणि आमच्या प्राचीन पद्धतीच्या भाविक विद्वानांशीं वादाचा प्रसंग आला म्हणजे हे पाखंडी, नास्तिक व श्रद्धाशून्य आहेत. यांशीं भा-

डावें कोणी? असें म्हणून ते त्यांची उपेक्षा करितात. या उपेक्षेनें समाजाचा दिवसेंदिवस नाश होत आहे, याकडे कोणाचें लक्ष जात नाहीं.जगांतील कोणत्याही राष्ट्रीय समाजाची ऐहिक उन्नति जेव्हां जेव्हां झाली आहे, तेव्हां तिचा मूळ पाया धर्मोन्नतीपासूनच उभारिला गेला आहे. असें ऐतिहासिकदृष्ट्या पाहिलें तरी दिसणार आहे. आणि ऐहिकोन्नति पूर्णदशेला प्राप्त होऊं लागली म्हणजे समाजांतील कांहीं व्यक्तींचा वर्ग, ऐहिकभोगाच्या अतृप्तीनें अथवा कंटाळ्यानें किंवा विचारदृष्टीनें भोगाचें नश्वरत्व समजून म्हणा—आत्मोन्नतीच्या दिशेस वळावयाचाच. हा अगदीं सृष्टिनियम आहे. त्या नियमानुरोधानें वर्तमानकाळीं पाश्चात्यांच्या ऐहिकोन्नतीचें शिखर वाढत असून, त्यांच्यांतील कांहीं व्यक्तिसमुदाय आत्मोन्नतीकडे वळला आहे. यांतून केन्ट, मोक्षमूलर, ड्यूसन, स्पेन्सरप्रभृति विद्वान मंडळी अध्यात्म विचाराकडे वळून भारतीयांचीं उन्नत शास्त्रें शोधित आहेत; परंतु भारतीयांप्रमाणें त्यांजला अजून अनुकूल साधनें प्राप्त होत नसल्यानें खऱ्या मुद्यांचे जागीं ते व्यामोहित होतात. असे त्यांनीं व्यामोहित चित्तानें ग्रंथ लिहावे व आमच्या नव्या मंडळींनीं ते लिहितील तेच खरे मानून, त्यांच्यासारखें घोंटाळ्यांत पडावें हें केवढें आश्चर्य आहे ! आमच्या अध्यात्म विद्येंत पाश्चात्यांस जसें आंध्य वाटतें तसें तिच्यांत मुळींच नाहीं.

स्पेन्सरसाहेब तात्त्विक प्रमेयाची छान करीत करीत अति सूक्ष्मबुद्धीनें अगदीं मुद्याचे तळाशीं पोंचतात, परंतु शेवटीं पर्यवसान- 'अज्ञेय' ठरवून कुंठित होतात. बऱ्याच तत्त्ववेत्त्यांचे विचार यांनीं लंगडे पाडले आहेत, पण आपलें ठाममत कशावरही न देतां—' दुसऱ्यास कळलें नाहीं—व मलाही कळत नाहीं '—असें दाखवून अखेर टरमिनस अज्ञेयाचें ठरवितात. यांचें मत शून्यवाद्याहून वरच्या कक्षेचें आहे. शून्यवादी शून्यास अभावरूप मानतो. व स्पेन्सर सर्वांच्या अंतर्यामीं सर्वांचें मूलकारण 'कांहीं तरी' असावें अशी आपली भावना आपल्यास सांगिल्यावांचून राहत नाहीं. परंतु जें आहे 'तें' 'अज्ञेय' आहे असें भावरूप मानतात. सर्व वस्तूंच्या अंतःस्थ 'जें कांहीं' आहे तें ' अभावरूप ' नसून ' भावरूप ' आहे खरें, पण तें 'अ-

ज्ञेय’ आहे असें जें त्यांचें म्हणणें आहे तें मात्र खरें नाहीं. जी ‘भावना’ वस्तूच्या घटकावयवाचा अथवा द्रव्याचा निर्णय करीत करीत अगदीं वस्तूच्या तळाशीं किंवा आंत जाते, ती घटकपरमाणूंस वरूनच आंत जात असेल व परमाणूरहित, असें त्या वस्तूचें अंतःस्थ स्वरूप जें तिला भासत असेल त्याला ती ‘ अज्ञेय ’ म्हणून जर परत येत असली, तर मी विचारितों कीं, वस्तूचें द्रव्यरहित अंतःस्थ ‘ स्वरूप ’ आणि भावनेनें—विचारार्थ ग्रहण केलेलें वस्तुद्रव्य,—तें सोडल्यावर—वस्तुद्रव्य कल्पनारहित—भावनेचें ‘स्वरूप’—यांत अंतर तें काय राहिलें? तेथें द्रव्यरहित ‘वस्तु’ व येथें द्रव्य ‘ कल्पना ’ रहित ‘ भावना ’ असें दोघांचें एकच रूप झालें नाहीं काय ? या ऐक्यरूप स्थितीला ‘ अज्ञेय ’ ह्मणावयाचें कीं द्रव्यरहित वस्तूच्या ‘ स्वरूपाला ’ ‘ अज्ञेय ’ ह्मणावयाचें ? घटकद्रव्यास सोडून जर भावनेला राहतांच येत नसलें व पुढें जातां येत नसलें, तर ‘ अज्ञेय ’ असें तरी कसें ह्मणतां येईल. कदाचित् ते असें म्हणतील कीं, वस्तूच्या द्रव्यरहित स्वरूपाची भावनाच होणें आधीं शक्य नाहीं. ( व असेंच स्पेन्सरसाहेबांचें मत आहे ) मग द्रव्यरहित वस्तूचें स्वरूप ह्मणतां तरी कसें? त्याचें उत्तर असें कीं, वस्तूचें द्रव्यरहित जें स्वरूप आहे, तेंच ‘ स्वरूप ’ वस्तूच्या नामरूपाला आधारभूत आहे. याच स्वरूपाशीं व वस्तुकल्पनारहित भावनेशीं ऐक्य आहे. आणि ऐक्यरूप स्थितीस ‘ अज्ञेय ’ ह्मणण्यांत स्वतःचेंच स्वरूप ‘अज्ञेय ’ झालें. स्वतः ‘ अज्ञेय ’ होणें हेंच मूर्तिमंत अज्ञानाचें स्वरूप आहे. जें परम तत्त्व ओतप्रोत भरलें आहे तेंच द्रव्यरहित वस्तूचें स्वरूप आहे व तेंच वस्तुकल्पनारहित भावनेचें स्वरूप आहे. परंतु मुख्य अनर्थ हाच होतो कीं, भावनेस वस्तुरहित्वानें राहतां येत नाहीं. म्हणून ‘ अज्ञेय ’ असें वाटतें. आणि वस्तुकल्पनारहित भावनेचें स्वरूप भावनेच्याच प्रत्ययास येणें हेंच फार कठिण काम आहे. आणि हें कोडें उलगडेपर्यंत ‘ अज्ञेय ’ पणा कायम राहणारच. खरोखर तें अज्ञेयच असतें तर त्याची ‘ अस्तित्व ’ कल्पना देखील भावनेस करतां आली नसती. विचारार्थ घेतलेल्या वस्तुद्रव्याचे परमाणु भावनेंतून निघून गेल्यावर अथवा भावनेनें त्यांस ( द्रव्यपरमा-

णूंस ) सोडल्यावर ' भावना ' विषयरहित होते. ती विषयरहित झाल्यावर 'आतां पुढें कांहीं कळत नाहीं' अशी भावना झाल्यास हीच भावना अज्ञानविषयिणी होय. अर्थात भावनेचा विषय 'कांहीं कळत नाहीं' हें अज्ञान झालें आणि विषयकल्पनारहित झालेली ' भावना ' ' कांहीं कळत नाहीं ' हें अज्ञान ग्रहण न करितां, तसेंच दुसराही विषय (ह्म० द्रव्यरूप) ग्रहण न करितां व न घाबरतां अंमळ स्थिरावून स्वविषयगोचरिणी झाली न झाली कीं लागलींच आत्मस्वरूपानंदसमुद्रांत बुडून अखंड सुखी होते. प्रारब्धशेषानें कर्मफलभोगार्थ जर तिचें पुन: साक्षींतून उत्थान झालें तर—पुढें तिला—' मी भावनारूप आहें ' इतकें देखील मानणें सहन होत नाहीं. ती स्वयंज्ञातृरूप अर्थात साक्षीरूप होतें. जिकडे पहावें तिकडे ' ज्ञेयच ज्ञेय ' अर्थात स्वानंदाचें साम्राज्य दिसतें. मग ' अज्ञेय ' हा शब्द सुद्धां उच्चारण्याची लज्जा वाटते. पराक् विषयगोचरिणी भावनेस उलथून आंत ढकलणें आणि प्रत्यगात्मगोचरिणी होण्याची युक्ति दाखविणें, हें सद्गुरूचेंच काम आहे. याला अन्य उपायच नाहीं. असो.

मोक्षमूलर साहेबांनीं धर्ममीमांसा पुस्तकांत सर्व धर्मांचें व अध्यात्मविचाराचें मोठ्या बुद्धिमत्तेनें ऐक्य केलें आहे. परंतु त्या पुस्तकांत—' वेदांत आणि त्याचे दोन पंथ ' या आठव्या प्रकरणांत रामानुजाच्या व शंकरस्वामीच्या मतांतील रहस्यांचें ऐक्य दाखवून—'ब्रह्म पूर्ण असून तें विकार पावलें कसें त्याचें कारण रामानुजास दाखवितां येत नाहीं'—तसेंच ' अविद्या ही आली कोठून ? याचें समाधान शंकराचार्यास करितां येत नाहीं. ' असें ध्वनित करून—' याबद्दल विचार करीत जाणें तर मीमांसेच्या नव्या क्षेत्रांत प्रवेश करावा लागेल. त्यांत भारतीय मीमांसकांनीं आजपर्यंत प्रवेश केला नाहीं, आणि ते आमच्याबरोबर येणारही नाहींत ' असें लिहून पुढें—भारतीय मीमांसक आणि मुख्यत: शंकर हे निर्भयपणें संगतवार आणि प्रमाणपूर्वक वेदांत शास्त्रांतले अनेक पक्ष सिद्ध करतात हें पाहून त्यांचें अभिनंदन केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं, असें लिहिलें आहे.*

[ * टीप:—दीक्षितकृत भाषांतर धर्ममीमांसा प्रकरण ८ वें पान २७७ पहा ]

त्याचप्रमाणें डाक्टर डयूसेन यांचीं येथें व्याख्यानें झालीं त्यांत त्यांनीं बऱ्याच गोष्टी मुद्देसूद प्रतिपादन करून, एके ठिकाणीं ह्मणाले, " अज्ञाननिवृत्तीकरितां निदिध्यासनपूर्वक अनुभवच साधन होय. केवळ तर्क अकिंचित्कर आहे " असें शंकराचार्य ह्मणतात. यावरून त्यांना ( ह्म० आचार्यांना ) आपल्या मताची तर्कद्वारा बरोबर उपपत्ति करतां येत नाहीं. तें काम जर्मन क्यांटनें बरोबर केलें आहे. अहंभावापर्यंत सर्वच सूक्ष्म व स्थूल उपाधींस मूल कारण ' अविद्या ' आहे. पण ही अविद्या आली कोठून ? हा प्रश्न बाकीच राहतो. येथें सर्व ग्रीक व हिंदू तत्त्ववेत्ते निरुत्तर होतात. परंतु केन्टनें मात्र यास समर्पक उत्तर दिलें कीं, हा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण, कार्यकारणभाव सम्बन्ध हाच मुळीं अविद्येनंतर उत्पन्न झाला असल्यानें अविद्येपलीकडे शोधूं जाणें हें मूर्खपण होय. " इ० इ०*

वरील विद्वद्द्वयाचें बहुधा अविद्येविषयीं मतसाम्यच आहे. तथापि थोडें अंतर इतकेंच दिसतें कीं, मोक्षमूलर हे अविद्येच्या शोधार्थ नव्या मीमांसेचा मार्ग क्रमण करीत असतील, आणि डयूसेन केन्टच्या तार्किक उत्तरावर समाधान मानून बसले असतील. अविद्येचें अनादित्व शंकराचार्यांच्या मताप्रमाणें पंडितत्रयांसही मान्य आहे. परंतु ही अविद्या सृष्टींत आली कोठून ? एवढेंच त्यांचें समाधान होणें बाकी आहे. त्यांत डयूसेन तर केन्टच्या उत्तरावर मुक्काम करून बसले आहेत व मोक्षमूलर शोधांत आहेत. कदाचित् ते केन्टपेक्षां कांहीं जास्त तार्किक व समर्पक उत्तर धुंडून काढतील. पण सरतेशेवटीं त्यांचें तर्कवादानें शाब्दिक समाधानच होणार आहे. अविद्या आली कोठून हें आधीं पुरतें सिद्ध झालें ह्मणजे मग पुढें ही जावी कशी हा उपाय होणार. अर्थात् एतावत्कालपर्यंत—यथार्थ तत्त्वज्ञान व त्यापासून अनर्थांची निवृत्ति व त्यापासून होणाऱ्या परमानंदाची प्राप्तिरूप मुक्ति ह्म० मोक्ष हें फल कोणत्याही पाश्चात्य पंडितांस अद्याप प्राप्त झालें नाहीं. असें त्यांच्या लेखावरून

( * टीप—प्रो० पालडयूसन यांचीं मुंबईत एशियाटिक सोसाइटीत व्याख्यानें झालीं. केसरी अंक १० वा ता० ७ मार्च सन १८९३ ' अद्वैतमीमांसा ' या सदराखालीं आलेले लेख पहा. )

भारतीय तत्त्वज्ञ विद्वानांस वाटण्याचा संभव आहे. अनुभवाचें स्वरूप जरी स्वसंवेद्य आहे, तरी अनुभव व्यक्त करणें व दुसऱ्याच्या अंतः- करणांत त्या अनुभवाचा ठसा वठविणें हें काम शब्दांनीं जितकें होतें तितकें अन्य मार्गानें होत नाहीं. पण ते शब्द मात्र अनुभवजन्य संस्कारानें भरलेले असले पाहिजेत. तरच ते दुसऱ्या अनुभवी मनुष्याच्या चित्ताशीं मेळ खातील. आणि अननुभव्यास अनुभवजनक होतील. केवळ तर्कवाद स्वतःस व दुसऱ्यास अनुभवजनक होत नाहीं. तर्कवादी शब्दाचें समाधान घेऊन बाहेर ह्म० शब्दाच्या अलीकडे असतो. आणि अनुभवी शब्दास ओलांडून आंत ह्म० स्वस्थानीं जातो. अर्थात् आंतल्याचा व बाहेरच्याचा मेळ कसा बसणार ?

अविद्येच्या शोधार्थ—वास्तविक भेद नाहीं तथापि—दोन क्षेत्रें कल्पिलीं आहेत. तीं ह्म० परमात्म्याचें स्थूल—सूक्ष्म—कारण सृष्ट्यात्मक समष्टिरूप क्षेत्र आणि जीवात्म्याचें स्थूल—सूक्ष्म—कारण देहात्मक व्यष्टिरूप क्षेत्र अशीं दोन आहेत. परमात्म्याच्या अति अवाढव्य व अगम्य क्षेत्रापुढें जीवाचें क्षेत्र अति सूक्ष्म परमाणूएवढेंही भरण्याचा पुरता संभव नाहीं. तथापि गणितांत जसें मोठ्या संख्येचें लघुत्तमरूप करून हिशेब केल्यास बरोबर उत्तर येतें तसें परमात्मक्षेत्राचें अति लघुत्तमरूप जीव क्षेत्र आहे. परमात्मक्षेत्रांत जें जें कांहीं साहित्य अतितर मोठे आहे, त्याचा अति सूक्ष्मतम अंश जविक्षेत्रांत आल्यावांचून राहिलाच नाहीं. तेथें मोठी मूलाविद्या कल्पिली आहे. व येथें तूलाविद्या कल्पिली आहे. अविद्येचें कल्पित स्वरूप दोन्ही ठिकाणीं सारखेंच आहे. परंतु अविद्येच खरें स्वरूप कळणार नाहीं, तोंवर तिला कल्पित ह्मणणें किंवा खरी ह्मणणें हा तरी शब्दव्यापारच होय. दृष्टश्रुतमनोवेद्यतेपर्यंत सृष्टीची अथवा अविद्येची सीमा आहे. ही अविद्येची सीमा वस्तुसापेक्ष आहे. आणि साक्षेप उपाधीनेंच पुढें परमात्याच्या ओतप्रोत व्याप्तीस निरक्षेप अनंतत्व शब्दाची उपाधि लागली आहे. ज्या अविद्येनें समष्टिरूप उपाधींत उपाधिदृष्ट्या व्यापक चेतनांश घेतला आहे, त्याच अविद्येनें व्यष्टिरूप देहोपाधींतही तोच चेतनांश वेष्टिला आहे. तशीच दोन्ही ठिकाणीं स्थूल माया व सूक्ष्म

अविद्यारूप उपाधि तीच आपण झाली आहे. आणि उभयाधिष्ठान चेतनांशाचीं परमात्मा व जीवात्मा अशीं वास्तवदृष्ट्या एक दुसऱ्याचीं पर्यायनामें ठेविलीं आहेत. आणि स्थूल सूक्ष्म उपाधिपरत्वें ईश्वर सर्वज्ञ व जीव किंचिज्ज्ञ ह्मणवूं लागले आहेत. दावानलांत व सूक्ष्म अग्निकणांत काष्ठोपाधीचाच न्यूनाधिकपणा आहे; अग्नितत्त्वांत अगदीं अंतर नाहीं. आतां किंचिज्ज्ञानें ह्म० जीवानें सर्वज्ञाच्या ह्म० ईश्वराच्या क्षेत्रांत प्रवेश करून क्षेत्रोपाधिरूप अविद्येचा अथवा मायेचा शोध लावणें ह्मणजे मुंगीनें भूगोल पोखरणें नव्हे काय ? दिसेल तेथपर्यंत दृष्टीची पोंच, ऐकूं येईल तेथपर्यंत कानांची पोंच, आणि इंद्रियग्राह्य विषयांच्या विवेचनापर्यंत बुद्धीची पोंच, इतक्या क्षुद्र संपत्तीच्या बलावर ईश्वराच्या क्षेत्राचा प्रवास कसा होणार. योगबलानें व तपोबलानें योगी अजरामर व अचाट शक्तिसंपन्न होतो; तो तरी ईश्वराच्या शक्तीचा व क्षेत्राचा अंत लावून मौज पहाण्याच्याच आशेनें होतो. परंतु उष्ट्र पर्वत न्यायानें सरते शेवटीं खजिल होतो. एक ब्रह्मांड पाहील, दोन पाहील, दहा पाहील ! पाहील तरी कोठवर, तेथें तर अनंत कोठी भरलीं आहेत. मार्कंडेय, नारद, काकभृशुंडी, पार्वती, अर्जूनप्रभुती निज प्रिय भक्तांस भगवंतानें उगीच क्षणभर आपल्या दुरत्यय मायेची मौज दाखविली तेवढ्यांत बिचाऱ्यांस त्राहि भगवान् झालें ! ! अशा सर्व शक्तिमान् दिव्य पुरुषांस ईश क्षेत्राचीं चार बोटें जागा देखील धड कळली नाहीं, मग सीमा कोठची आली ! आणि सीमेपर्यंत पोंचल्यावांचून सीमेपलीकडे काय आहे हें व ज्यानें सीमा बांधून घेतली त्याचा उगम कोठून निघाला हें कळावें कसें ! अर्थात ईशक्षेत्रांत मायेचा अथवा अविद्येचा शोध लागणें सर्वथा अशक्य आहे. जें काम जीवाच्या आटोक्यांतच येण्याचा संभव नाहीं, त्याचा प्रयत्न करणें निष्फळ आहे. ईशक्षेत्राची ही वाट झाली. येथें कांहीं तर्कवाद्याच्या उत्तराची सोय आहे काय ? मौनच धरावें लागेलना ? असो.

परंतु जीवात्मा, हा परमात्म्याची अति सूक्ष्म आत्मीय प्रतिमा असल्यानें त्यानें आपल्या स्वरूपशक्तीचे व ऐश्वर्याचे सूक्ष्मांश यांत एकवटून ठेविले व त्यास अपूर्व सारासारविचारशक्ति व जिज्ञासाही दे-

ऊन ठेविली आहे. तशीच सारासारविचारशक्तीनें जी जिज्ञासा उत्पन्न होईल ती पूर्ण करून घेण्याकरितांच क्रियाशक्तिही दिली आहे. ईश्वराच्या क्षेत्राचें वैभव पाहण्याची व भोगण्याची जीवास इच्छा झाल्यास तपानुष्ठानाच्या व योगबलाच्या शक्तीनें प्रवृत्तीचा अगदीं राजमार्ग मोकळा करून दिला आहे. आणि परमात्मस्वरूपाशीं ऐक्य होण्याची जिज्ञासा झाल्यास आत्मविद्येचा निवृत्तिमार्ग मोकळाच आहे. लोकांच्या समजुतींत प्रवृत्ति मार्ग व निवृत्तिमार्ग असे दोन भिन्न वाटतात; परंतु ते दोन भिन्न नाहींत मार्ग एकच आहे. बुद्धीचा प्रवाह पराक् ह्म० बाहेर धांवून विषय ग्रहण करूं लागणें व अतृप्तीनें अधिकाधिक शक्ति वाढवूं लागणें, हेंच लक्षण प्रवृत्तिमार्गाचें आहे. आणि तोच बुद्धीचा प्रवाह प्रत्यक् ह्म० मागें परतून विषयाचा परित्याग करीत करीत आंत येऊं लागणें, हें निवृत्तिमार्गाचें लक्षण आहे. प्रवृत्ति ह्म० पुढें धांवणें व निवृत्ति ह्म० मागें परतणें. पुढें धांवणाऱ्यानें जिज्ञासेनुरूप इष्ट साध्य कसें करून घ्यावें, एतदर्थ श्रुतीची 'धर्मजिज्ञासेंत' प्रवृत्ति झाली. धांवून धांवून जे जे कंटाळतील त्यांना परत येण्याची जिज्ञासा झाल्यास त्यांनीं विषय कसे त्याग करावे व सुखरूपपणें स्वस्थानीं आंत कसें पोंचावें, एतदर्थ श्रुतीची 'ब्रह्मजिज्ञासेंत' प्रवृत्ति झाली. याप्रवृत्तिनिवृत्तींच्या साधनसंपत्तीसच प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग अशीं नांवें आहेत. माया सांत असल्यानें सृष्टीच्या अगदीं बाह्यसीमेपर्यंत प्रवृत्तीचा मार्ग व साधनें खुलीं आहेत. परंतु त्या सीमेपर्यंत पोंचणारा आजवर कोणी झाला नाहीं व जे झाले त्यांच्या आंगीं ती शक्ति आली नाहीं. त्यांपैकींच मार्कंडेयादिकांचीं नांवें वर सांगितलींच आहेत. कदाचित् तर्कवादानें समाधानार्थ असेंही ग्रहण करूं कीं, कोणी सृष्टिक्षेत्राच्या सीमेवर जाऊन उभा राहिला तर, वस्तुसापेक्षतेनें अविद्येची येथवर सीमा झाली; या सीमेपलीकडे आतां जें आहे तें 'अनंत' आहे एवढें कळेल. आणि त्या क्षेत्राच्या रेषेवरून फिरतां आल्यास पुन्हां मूळ ठिकाणीं येतां येईल.* परंतु या फिरण्यानें 'अविद्या आली कोठून' याचा थांग लागला काय ?

* प्र० पहिलें शेवटीं अखंड ॐकाराच्या रेषेवरून फिरून पहा ह्मणजे हें लक्षांत येईल.

आज नौकानयनविद्येनें समुद्राची सर्व सीमा--शोधकांनीं--भूमिसापेक्षेनें पूर्ण पाहिली. असें जरी मानलें तरी 'समुद्र आला कोठून ?' या शंकेचें समाधान होईल काय ? होणें शक्य नाहीं. पण आधीं सृष्टि-सीमेपर्यंत पोंचण्याची कल्पना तरी तर्कवादानें सिद्ध होऊं शकेल काय ? मुळींच नाहीं.

जसा अविद्येला अंत नाहीं, तसा जिज्ञासूच्या जिज्ञासेलाही अंत नाहीं. पण अविद्येचा व जिज्ञासेचा अंतही बरोबरच होतो. असो. अविद्येची व्याप्ति जशी वस्तुसापेक्ष आहे, तशीच ती सांतही आहे. आणि तिच्या उपाधीनेंच निरपेक्ष हें विशेषण अनंताला लागलें आहे. तें अनंत सापेक्ष वस्तुसीमेच्या बाहेरच आहे असें नाहीं; वस्तुमात्राला आधार व त्यांत ओतप्रोत व्यापक तेंच अनंत आहे. ह्मणून जिज्ञासूनें अनंताचा (आत्म्याचा) व सांताचा (अविद्येचा) स्वक्षेत्रांतच शोध केला पाहिजे. बाह्य वस्तूस धरून ईशक्षेत्राच्या सीमेंत अनंत-जन्मांपासून आजवर जें परिभ्रमण चालू आहे तें जिज्ञासा होतांच थांबवून बुद्धीचा प्रवाह अंतमुख केला पाहिजे. बुद्धीचें अंतमुर्ख होणें हें-च तिचें साक्षीच्या सन्मुख होणें होय. बुद्धीला बाह्यविषयप्रवाहाची अत्यंत दृढ संवय झाल्यानें तिला अंतर्मुख करून स्थिर ह्म० एकाग्र करण्यांतच जे कांहीं प्रयत्न लागतात तेच खरे. वस्तुतः स्वरूपदर्शनास वेळ नको. आरसा फार मलीन झाल्यास त्यांत तोंड दिसत नाहीं. आरशावरील मळ स्वच्छ करण्यांतच प्रयत्न लागतात. तोंड दिसण्यास कांहीं वेळ लागत नाहीं. आरसा घासून स्वच्छ करण्यास जसे मसाले लागतात, तसेच बुद्धीचे मळ विक्षेपादि दूर करण्यास कर्म व उपासनेचें साधन लागतें. आणि बुद्धि दांडगी असल्यास ती योगानें वश केली जाते. अशा प्रकारें बुद्धि निर्मळ, शुद्ध व अंतर्मुख करून मुमुक्षु एकांतीं नेत्रमीलन करून स्वस्थ होतांच त्याचा ईश्वराच्या बाह्यक्षेत्राशीं सम्बन्ध सुटला. बुद्धींद्रियांचा बाह्य प्रवाह बंद पडणें म्हणजेच ईशक्षेत्राचा संबंध सुटणें होय. अंतःप्रविष्ट बुद्धीनें देहत्रय व पंचकोशांचा पूर्ण विचार करून विचारार्थ ग्रहण केलेले विषय युक्तीनें सोडीत गेलें म्हणजे बुद्धि विषयरहित होते. विषयरहित होऊन 'आतां पुढें कांहीं कळत नाहीं' अशी तिला अज्ञानविषयिणी हो-

ऊन मागें परतूं न देतां तिला तशीच रिकामी स्थिर केली पाहिजे. ह्मणजे तिच्यांत अहंउर्मीचा उदय होतो. ( हा अहं–बाह्य व्यापारी ह्म० मी अमुक किंवा देही इ० नव्हे बरें ! ! जर हें अमुक तमुक तेथें शिरलें तर झाला घोंटाळा ) ह्या निर्विकार शुद्ध अहं उर्मीच्या स्थिरावस्थेसच सविकल्प समाधि ह्मणतात. आणि हीच अविद्येची सीमा ह्म० अविद्येच्या उपाधीचा अंत जाणावा. ‘ अविद्या आली कोठून ’ या शोधाची हद्द येथवरच आहे. आणि येथून जे माघारे जातात तेच ‘ अविद्या आली कोठून ’ या शंकेस बरोबर नेतात. छे: छे: चुकलों ! ज्यांच्याजवळ ही शंका शिल्लक राहते ते ह्या शुद्ध अहमाकार उर्मीच्या सविकल्प दशेपर्यंतच येऊं पावत नाहींत. कारण शुद्ध अहमाकारापर्यंत मजल श्री दयाघन सद्गुरूच्या वरदहस्तावलंबावांचून येणेंच शक्य नाहीं. व आल्यावर परत जाणें शक्य नाहीं. अहंउर्मीच्या शुद्ध कड्यावरून पलीकडे स्वरूपानंदसिंधूंत गुरुकृपेनें ढकलून दिलें ह्मणजे अविद्यायुक्त जीवभाव ठार मरतो. मग तो पूर्वीं कसा होता, कोठें होता, याचा पत्ता देखील लागत नाहीं. जें स्वप्न दिसत होतें हें पुन्हां कधीं दिसत नाहीं. व अन्य स्वप्न दिसण्यास सुषुप्ति पुन्हां येत नाहीं. व एकवार जी अखंड जागृती येते ती पुन्हां जात नाहीं. असा अंतर्बाह्य चहूंकडे आनंद भरला ह्मणजे उपाधीचें उभय क्षेत्रांतून भान नाहींसें होऊन उभय क्षेत्राधिष्ठानरूप जीवात्म्याचें व परमात्म्याचें ऐक्य होतें. सूर्यास प्रकाशरूपतेमुळें जशीं अंधकाराची प्रतीति होत नाहीं, तसें आत्मनिष्ठास ज्ञानरूपतेमुळें अविद्येची प्रतीति होत नाहीं. मग जिकडे पहावें तिकडे ‘स्वानंदसाम्राज्य ’ कूटस्थ आत्मा आनंदरूप, त्या ठिकाणाहून उत्थान पावणारीं वृत्ति आनंदरूप, आणि ती ज्या विषयांत प्रविष्ट होणार ते आनंदरूप. आनंदरूपांत तीन नांवें तरी कां ? तर आनंदेच्छु, मुमुक्षूस बोध होण्याकरितां. अशा ओतप्रोत आनंदांत अखंड निमग्न राहून, निरंकुश तृप्त झालेले भारतीय ब्रह्मनिष्ठ पुरुष–अविद्येच्या शोधार्थ नव्या मीमांसेच्या प्रदेशांत, पाश्चात्य पंडितांमागें स्वप्नांत तरी येतील काय ? किंबहुना यांचें कोळसा उगाळणें अजून संपत नाहीं असें मात्र ह्मणतील.

Acc 3-5

पाश्चात्य विद्वानांनीं आमच्या धर्माच्या व अध्यात्मशास्त्राच्या ग्रंथांचें पर्यालोचन करून जी मीमांसा केली आहे तिचा एकंदरीनें झोंक पाहिला तर, मनुष्यजन्मांत जसे व्यावहारिक पुरुषार्थ साधावयाचे असतात, त्याचप्रमाणें विचारवान तत्त्ववेत्त्यांनीं अध्यात्मविद्येच्या संपादनाचाही प्रयत्न करणें उत्तम आहे. कारण भारतीयांस जसजशा कल्पना येत गेल्या तसतसे ते सिद्धांत बांधीत गेले. कर्माची, धर्माची, जन्ममरणाची, जीवाच्या परलोकीं जाण्याची कल्पना त्यांनीं संगतवारीनें उत्तम बसविली आहे व इतर सर्व मतांहून आपल्या मताचा पाया बळकट केला आहे; असें सांगण्याचा दिसतो.त्यांनीं ह्या अदृष्ट मुद्यांचें खंडन केलें नाहीं तरी, पाहिजे होतें तसें मंडनही केलें नाहीं. ही गोष्ट त्यांच्या विधर्मी मतानें वावगी नाहीं, परंतु या विचारापासून भारतीय धर्माचें व श्रुतिसिद्धांताचें अनादित्व नष्ट होतें. अनेक जन्मसंसिद्धीनें ज्ञान प्राप्त होऊन मोक्ष होतो, अनेक जन्मांच्या प्रारब्धाचे प्रतिबंध दूर होण्याकरितां कर्म व उपासना करावी लागते, इत्यादि गोष्टींशीं, जीवांच्या अनंत जन्ममरणपरंपेरच्या सांखळीचा जो पूर्वापार संबंध आहे तो शिथिल पडतो आणि सर्व सिद्धांताला काल्पनिक रचनेचें स्वरूप येतें हें सर्वांहून जास्त नुकसान आहे. आमच्या भारतीयांत कर्मधर्मशून्याचा व नास्तिकाचा लोप आहे असें माझें ह्मणणें मुळींच नाहीं. परंतु या शतकांत जो नवीन सुशिक्षित बहुजनसमाज अशाच प्रकारच्या शिक्षणपद्धतीनें तयार झाला असल्यामुळें, त्यांत पुष्कळ लोकांच्या बुद्धींतून, जीवाच्या जन्मांतराची, लोकांतरीं गमनाची, अदृष्ट सुखाची आणि संचित क्रियामाण प्रारब्धानुरूप फलप्राप्तीची कल्पना अज्जी नष्ट झाली आहे. पुष्कळांच्या बुद्धींत शिथिल झाली आहे; आणि ज्यांच्या बुद्धींत कांहीं थोडीशी डळमळत आहे ते वर दाखविलेल्या आंग्ल दृष्टीनें आपलीं शास्त्ररहस्यें पहात आहेत, या योगानें आमचीं शास्त्रेंही त्यांस कशींशींच वाटूं लागतात. आमच्यांतील नव्या विद्वद्धूरीणांपैकीं कोणी स्वतंत्रपणें या विषयांत पुढाकार घेत नाहीं. कदाचित् चालू सुधारणेस व उन्नतीस हा विषय त्यांस प्रतिबंधक वाटत असेल तर कोण जाणे? बरें, जे सुधारक म्हणून पुढें सरसावले आहेत, ते तर सध्यां

वातावरणांतच तरंगत असलेले दिसतात. त्यांचे पाय कोठेंच स्थिरावलेले अजून दिसत नाहींत. असो. जन्मांतराची कल्पना गेली ह्म० त्याच्याबरोबर कर्म—बुडालेंच. या जन्मीं मिळत असलेल्या फळांशीं मागल्या कर्माचा संबंध नाहीं. व सध्यां कर्म होत आहे याचें फल पुढें मिळणें नाहीं. लोकांतरीं गमन नाहीं, तेव्हां पुण्यपापांशीं तरी संबंध काय? पुण्य पाप नाहीं तर धर्म अधर्म कसला? धर्म अधर्म नाहीं तर वर्णाश्रमाचेंही काम काय? वर्णाश्रम नाहीं तर, कर्मधर्माची व आचारविचाराची जरूर काय? जर कर्माचार नाहींत तर, कर्मप्रतिपादक कर्मकांडाचें थोतांड कशास पाहिजे. व असल्या नसत्या प्रतिबंधांत आपण गुंतलें कशास पाहिजे. आहे तेवढा जन्म, होतें तेवढें कर्म, व मिळेल तेवढेंच फल. समाजांत एकानें दुसऱ्यास मदत करावी, स्वतःची सुखवृद्धि करावी, दुसऱ्यास पीडा करूं नये, आणि एकजुटीनें वागावें ह्मणजे सर्व आटोपलें. अशाच प्रकारच्या कल्पनातरंगांत बराच समाज हेलकावे खाऊन राहिला आहे. या सर्व क्षुद्र कल्पना शांत करून वरील अत्यंत वादग्रस्त मुद्यांचें समर्थन करणें, आणि धर्मोन्नतीच्या व आत्मोन्नतीच्या शिखरांवरून समाज घसरत येत आहे त्याला पुन्हां पूर्व स्थलीं जरी न पोंचवितां आलें तरी—पुढें न घसरूं देतां थांबवून धरणें याचा प्रयत्न कोणीच करीत नाहीं व हें करणें तर आज अत्यंत आवश्यकतेचें काम आहे, असें कोणीही विचारवान् मनुष्य ह्मटल्यावांचून राहणार नाहीं असें मला वाटतें. परंतु हें दुर्घट काम करण्यास कोणी तरी विद्वद्वर्यसमाजधूरीणानेंच पुढें झालें पाहिजे. तें काम माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे. तथापि अशा उचित समयावर सद्गुरु रामचंद्रानें जर मला समाजाच्या अल्प सेवेकरितां पुढें ढकललें तर सुज्ञ विचारवान् माझ्यासारख्या अज्ञाच्या प्राकृत लेखसेवेचा प्रेमानें स्वीकार करतील अशी मला आशा आहे. श्रीभागीरथी गंगेचा प्रवाह ब्रह्मांडकटाहाचा भेद करून भगवान् शंकराच्या व हिमाचलाच्या मस्तकावर विश्रांति घेत, भारतभूमिकेंत संचार करून शेवटीं ज्याप्रमाणें समुद्रांत जाऊन मिसळला; त्याप्रमाणें ह्या स्वानंदसाम्राज्यग्रंथाच्या प्रेरणेचा गंगाप्रवाह—सच्चिदानंदव्यापक परमात्मस्वरूपांतून उसळून

श्रीसद्गुरूच्या व श्रीरामचंद्राच्या पूर्ण कृपाद्वारा कूटस्थ आत्मप्रदेशीं प्राप्त होऊन माझ्या अंतःकरणभूमिकेंतून संचार करून समाजरत्नाकरास येऊन भेटत आहे. ह्या प्रवाहाचा लोळ अतिवेगानें वहात निघाल्यामुळें, त्याच्या निर्मलोदकांत माझ्या अंतःकरणाचा मलिन मृदंश मिसळून तें गढूळही झालें असेल, त्याला सज्जनविभूतींनीं आपल्या सारग्राही बुद्धिवस्त्रानें गाळून घेण्याची व माझे दोष मला कळविण्याची मी प्रार्थना करितों. विद्वानांनीं ग्रंथ रचण्याची जी रीति व जो अनुक्रम सांगितला आहे,त्या अनुक्रमानें व रीतीनें हा ग्रंथ झाला नाहीं हें मी कबूल करितों. कारण, याचा लेखक विद्वान् नसून प्रेरकाचा लेखनाज्ञाधारक आहे. उपाधिदृष्ट्या प्रेरकाचें मूळ ठिकाण व्यापक ब्रह्म हें आहे. आणि त्याला ' ठिकाण ' पणाची व ब्रह्म अशा नामाची उपाधि त्याच्याच इच्छारूप चिच्छक्तीनें लाविली आहे. ती चिच्छक्तिमायाच पुढें व्यक्ताव्यक्तसृष्टिरूप झाली. आणि सृष्ट्यधिष्ठानरूप परमात्म्यास सृष्टिनियामक ईश्वर केलें आणि आपल्या सूक्ष्म ह्म० लहान उपाधींत आलेल्या सूक्ष्म चेतनांशास—नियम्य अर्थात् चतुर्विध जीव केलें. त्यांत मनुष्यजीवास सारासारविचारसंपन्न करून सर्व प्रकारची मौज पहाण्यास समर्थ केलें. म्हणून सर्व सृष्टींत मनुष्यप्राणी श्रेष्ठ आहे. हिऱ्याची किंमत करणाऱ्याची किंमत—हिऱ्याच्या किंमतीहून अधिक असते. तशी सृष्टीच्या किंमतीहून तिची किंमत जाणणाऱ्या मनुष्याची किंमत अधिक असून, तो स्वतःच्या स्वरूपविस्मृतीनें आपली किंमत आपणच कौडीमोल व मातीमोल अर्थात् हाडांची व मांसाची करून घेतो व तें गमावण्याची वेळ आली म्हणजे रडतो. येणेंप्रमाणें प्रेरकानें आपल्या मूळ ठिकाणाहून निघून पांच मुक्कामांच्या प्रवासाची हकीकत हृदयाकाशांत प्रगट केली तशी लिहून काढली आहे. हेच त्याचे पांच मुक्काम—या स्वानंदसाम्राज्य ग्रंथाचे पांच प्रदेश आहेत.

प्रथम ब्रह्मानंद प्रदेशांत—व्यापक परब्रह्माचे मायाकृतोपाधीनें—चार पाद ह्म० विभाग कसे झाले, त्या भागांच्या अधिष्ठानावर—तुरीयब्रह्म—ईश्वर—हिरण्यगर्भ—आणि विराट् अशीं नांवें, जाग्रत्,स्वप्न, सुषुप्ति, तुर्या आणि उन्मनी ह्या अवस्था, व अवस्थापरत्वें सृष्टीशीं सम-

ष्टिरूपानें ऐक्यता आहे. मायेनें इतका सर्व प्रपंच करूनही, तें व्यापक ब्रह्म निर्मल अलेपकच राहिलें. मायाकृतोपाधीचा त्याला संपर्क झाला नाहीं. असें सिद्ध करून त्याचे खास वाचक व स्वरूपबोधक निर्गुण नाम ॐकाराची व त्याची अत्यंत ऐक्यता व ॐकाराच्या आकृतीची अखंड स्वयंभुता दाखविली आहे आणि शेवटीं परमात्म्याची, मायेची, सृष्टीची आणि ॐकाराची अगदीं एकरूपता व सर्वांचा ओतप्रोतभाव कसा झाला हें स्पष्ट केलें आहे. हा प्रेरकाच्या उत्थानरूप प्रवासाचा मूळ अथवा प्रथम मुक्काम आहे.

दुसरा—मायानंद प्रदेश यांत—मायेचें सदसदाहून विलक्षण असें अनिर्वचनीय रूप असून तिनें अलेपक परमात्म्याच्या अधिष्ठानावर आपल्या अचिंत्य शक्तीनें सृष्टीची घडामोड कशी चालविली आहे, नामरूपात्मक सृष्टिसौंदर्यानें आपणच कशी अभिव्यक्त होत आहे, व तिनेंच परमात्म्याच्या अष्टप्रकृतिरूप ॐकार ह्या वाचकापासून आपलें निर्गुणनाम, माया व सगुणनाम श्रीं बीज हे सप्त विभूत्यात्मक कसे निर्माण केले हें दाखविलें आहे. व ॐकाराच्या व श्रीं बीजाच्या अवयवांची व विभूतींची ऐक्यता ‘ उपासकांच्या इष्ट सिद्धीकरितां ’ ‘ प्रगट केली आहे. ’ यावरून ॐकाराप्रमाणेंच श्री हें अक्षरही स्वयंभु आहे असें वाचकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. पुढें मायेच्या शक्तीचे व गुणांचे प्रभाव, व वस्तुसापेक्षेनें त्यांची व्याप्ति दाखवून मायेची व परमात्म्याची एकरूपता दाखविली आहे. हा प्रेरकाच्या गतिरूप प्रवासाचा दुसरा मुक्काम आहे.

तिसरा—ईशानंद प्रदेश—यांत स्वतंत्रपणें ईश्वराविषयीं विचार केला आहे. त्यांत १ ब्रह्म निर्गुण निर्विकार असतां मायेच्या उपाधींत कसें आलें व आल्यावर निर्विकार कसें राहिलें, जगत्कारण शबल ब्रह्म मानावयाचें किंवा माया मानावयाची? शबल ब्रह्म, किंवा माया व ब्रह्म यांस सोडून सृष्टीसच स्वतंत्र मानावयाचें, इत्यादि शंकांचीं उत्तरें देऊन ईश्वराची स्वरूपसिद्धि केली आहे. कारण ईश्वराविषयीं लोकमतांत दिवसानुदिवस विपरीत कल्पना व असंभावना वाढत चालली आहे, ती दूर करण्याचा शक्त्यनुरूप प्रयत्न केला आहे. ईश्वराचें स्वरूपवर्णन, त्याची समष्टिरूप देहेंद्रियाद्य-

-वयवरचना, व अंगाअंगावर चतुर्दश लोकरचना ही दाखविली आहे. तसेंच ईश्वराच्या प्रधान विभूति, अवतारमूर्ति, व त्याचें सर्वेश्वरादि अखंड ऐश्वर्य याचें वर्णन करून, शेवटीं जगन्नियामक ईश्वराची आकृति मनुष्याच्या आकृतीसारखी आहे, असें–प्रणव प्रमाणांनीं व दुसऱ्या मार्मिक युक्तीनें सिद्ध केलें आहे. हा प्रेरकाच्या आकृतिरूपानें प्रवासाचा तिसरा मुक्काम आहे.

चवथा–सृष्टयानंद प्रदेश–या प्रकरणांत सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयांचा अगदीं स्वतंत्र विचार केला आहे. पदार्थमात्राला व्यक्त व अव्यक्त अशीं दोन स्वरूपें असतात. अव्यक्त स्वरूपानें वस्तू आपल्या उपादान कारणांत लीन असते. आणि कल्पनायुक्त प्रेरणेचा आघात उपादान कारणावर बसला ह्मणजे तेंच ‘ कारण ’ कार्यरूप होतें ह्म० नामरूपात्मकतेला प्राप्त होतें. कार्यकारणरूपतेंत वस्तूच्या तीन अवस्था ह्म० उत्पत्तिस्थितिलय ह्या होतात. या व्यष्टिरूप वस्तूच्या नियमाप्रमाणें समष्टिरूप सृष्टीची घडामोड अनादि व अखंड चालू आहे. यांत अधिष्ठानरूप मायासंवलित परमात्मा हा जीवांच्या पूर्व संस्कारांच्या प्रेरणानुरूप आघातानें जगन्मूलकारण, अशा बारा तत्त्वांच्या रूपाला प्राप्त होऊन–तोच सर्व तत्त्वांचें मिश्रण होतांच अनंत नामरूपात्मक अतर्क्य सृष्टिरूप झाला. सृष्टीच्या स्थूल, सूक्ष्म, कारण, अशा तीन अवस्था आहेत. त्यांत स्थूल सृष्टींतच यावज्जीवाचे अनेक जन्ममरण व विषयभोगादि व्यापार चालू असतात. सृष्टीच्या लयानंतर ती पुन्हां उत्पन्न होईपर्यंत तिजबरोबर चराचर जीवही आपल्या कर्मसंस्काररूपानें लीन राहतात. सर्वांच्या कर्मभोगाची वेळ येतांच सृष्टीचा उदय होतो. ही सर्व सृष्टि जीवकृतकर्मप्रधान आहे. त्या कर्मांच्या जाळ्यांत जीव आणि ईश नियम्यनियामक, उपास्योपासक व कर्मकर्ता व फलदाता अशा संबंधांत अखंड गुंतले आहेत, असें प्रतिपादन केलें आहे. नंतर चतुर्दश भुवनांच्या रचनेची व्यवस्था—व त्यांत संचार होण्याचा मार्ग योगाच्या युक्तीनें दाखवून, मानवी सुधारणा, वैदिकी धर्म, जातिवर्णाश्रमभेद आणि श्रुतीची अपौरुषेयता यांची अनादिता ज्योतिषाच्या युक्तीनें दाखविली आहे. पुढें सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयकार्यार्थ ब्रह्मा-विष्णु

रुद्रांचा प्रादुर्भाव कसा झाला याचें वर्णन करून शेवटीं भौतिक सृष्टीचा व महाभूत सृष्टीचा लय कसा होतो हें दाखविलें आहे.* असो. ही व्यापकाच्या अनंत रूपत्वानें प्रवासाच्या चवथ्या मुक्कामाची हकीकत आहे.

पांचवा–' जीवानंद प्रदेश '–हेंच खरें जीवात्म्याचें क्षेत्र आहे. या स्वक्षेत्राचाच पूर्ण विचार ज्याचा त्यानें केला म्हणजे परमात्मक्षेत्रांत देखील अज्ञेय असें कांहींच राहत नाहीं. यांत प्रथम–'मीपणाच्या' म्ह० जीवाच्या शोधार्थ–व्यवहारी मी–देहधारी मी–आणि जीव मी–अशा तीन कक्षा केल्या आहेत. पुढें एका परमहंसाच्या व जिज्ञासु राजाच्या संवादाचें संविधान जुळविलें आहे. त्यांत यतीच्या उपदेशद्वारा–जीवाचें स्वरूप–त्याच्या एकोणीस कला व विषयेंद्रियत्रिपुटी देहत्रय, अवस्थात्रय व पंचकोशांचें वर्णन करून स्थूल सूक्ष्म संघातरूप जीवाचे स्वाभाविक धर्म व अंतःकरणाच्या षडूर्मींचे व्यापार दाखविले आहेत. नंतर–जीवाचें सहेतुक व अहेतुक कर्म–कर्मानुरोधानें मिळणारें फल–त्रिविध प्रारब्धकर्म–कर्माचें अधिष्ठान आणि प्रारब्ध व प्रयत्नवाद–तसेंच जीवाची पुनर्जन्ममरणसिद्धि, ह्या वादग्रस्त मुद्यांचें बनलें तितकें स्पष्ट निराकरण केलें आहे. पुनर्जन्माच्या पुष्टीकरणार्थ–योगशास्त्रांतले,–ज्योतिषांतले, वैद्यकांतले व डाक्टरी मतांतले जितके उपयुक्त मुद्दे सुचले तितके दिले आहेत ' यापुढें–जीवाची महाकारणावस्था म्ह० जीवाची मरणकालीं काय स्थिति होते, मरणोत्तर क्षणानंतर जीव संस्कारात्मक देहानें व कर्मसंस्कारांच्या वेगानें कोठें कसा जातो व पुनः परत जन्मास कसा येतो, इ० सर्व गोष्टींचें फार सूक्ष्म रीतीनें वर्णन केलें आहे. येथून पुढें शेवटपर्यंत जीवाचें जन्मापासून मरणपर्यंत जीवनचरित्र वर्णन केलें आहे. त्यांत जीव जन्मास आल्यापासून तारुण्यांत येईपर्यंत बालदशेंत त्याची कशी स्थिति राहते व पालकांनीं त्याचें संगोपन व शिक्षण

* सृष्टीच्या लयाचा प्रकार वर्णन करितांना महाभूततत्त्वें आपापल्या ' कारणांत ' कशीं लीन होतात, हें दाखविलें आहे. त्या ठिकाणीं वाचकांनीं सूक्ष्म बुद्धीनें शब्दार्थ विषयाला न सोडतां विचार करित गेल्यास, स्पेन्सरच्या अज्ञेयाची व मोक्षमूलरच्या आविद्येची जी सीमा मागें दाखविली आहे त्याची पूर्ण समजूत होईल.

करें केलें पाहिजे, जीव तारुण्यांत आल्यावर सुशिक्षित व अशिक्षित जीवांचे व्यवहार कसे चालू होतात, ते विषयभोग कोणत्या प्रकारांनीं व कसे भोगतात, पंच विषयांचीं विस्तृत स्वरूपें कशीं आहेत व त्यांत सर्व जीव कसे बुडाले आहेत, ऐश्वर्यवान जीव शृंगाराचे विहार कसे करितात, पण खरा विषयानंद अज्ञान्यास मिळत नाहीं, ज्ञानवान् विषयानंदांत ब्रह्मानंद भोगूनही कसा अलिप्त राहतो ! इ० विवेचन झालें. पुढें वार्धक्यांत जीव जरादि रोगविकाराधीन होऊन मृत्युपंथास लागतांना त्याची कशी स्थिति होत जाते व मृत्यु वास्तविक आनंदरूप असतां तो भयंकररूप कसा दिसतो, व मरणानंतर आपलें काय होणार हें कळत नसल्यानें ( पण हें न कळणेंच बरें, जीवास त्रिकालज्ञान झालें तर काय घोंटाळा होईल ! ) त्याचे आशातरंग कसे उसळतात, प्रपंचाचा व स्वजनाचा परस्पर कसा मोह पडतो, आणि सरते शेवटीं जीव भयाभीत होऊन शोकाक्रोश करीत मृत्यूस अर्पण होतो व मरणाच्या अवस्था परत्वें स्वजनांत शोकाब्धीच्या उसळ्या येऊन त्यांत अनुक्रमें सर्व गटंगळ्या खातात. सर्व गोष्टींचे हुबेहुब चित्र वाचकांच्या डोळ्यांसमोर उभें राहून स्वतःच्या जीवनचरित्राशीं बहुधा पुष्कळ अंशीं अक्षरशः मेळ बसल्यावांचून राहणार नाहीं. असो. ही ज्ञानविशिष्ट जीवांच्या हृन्मंदिरनिवासाची—व्यापक प्रेरकाच्या पांचव्या मुक्कामाची हकीकत आहे.

हेंच स्वानंदसाम्राज्याचें पंच प्रदेशात्मक ' पूर्व खंड ' आहे. प्रत्येक जिज्ञासूनें यांत वाचनरूपी प्रवास करून ज्या ज्या स्थलीं प्रेरकाचा आनंद उसळला आहे तेथें चांगली विश्रांति घेत गेल्यास प्रेरकाची ओंळख पटून भेट झाल्यावांचून राहणार नाहीं. आतां येथून पुढें प्रेरक आपल्या प्रेरणामार्गानें पुन्हां परत आपल्या मूळ ठिकाणीं जाणार आहे. ज्या मुमुक्षूंची त्याची भेट या प्रदेशांत होणार नाहीं, त्यांनीं त्याच्या पाठोपाठ परतून त्याला मूळ ठिकाणीं गांठण्याचा मार्ग—साधनानंदोत्तरखंडाच्या ज्या ज्या प्रदेशांतून जाईल—त्या त्या प्रदेशीं मुक्काम करीत व साधनांनीं शोधीत गेल्यावर मग तो भेटणार नाहीं असें संभवतच नाहीं. असें स्वानंदसाम्राज्याचें उत्तरखंड लिहिण्यास आरंभ केला आहे. परंतु प्रारब्धप्रतिबंधा-

च्या विघ्नांनींही येऊन गांठलें आहे. यांतून लेख पार पडून अशाश्वत आयुष्यानें पुरवठा केल्यास कांहीं कालांनीं तोही ग्रंथ सेवेसी सादर करीन. सारांश, ईशप्रेरित या 'स्वानंदसाम्राज्य' ग्रंथाला निदान एकवार जरी चांगला विचारपूर्वक जे वाचतील—मग ते पाहिजे त्या मताचे कोणीही असोत—त्यांना कांहीं तरी विशेष ज्ञानाच्या लाभाचा अंतःकरणावर परिणाम झाल्यावांचून कधीं राहणार नाहीं. आणि जे मुमुक्षू असून आत्मानंदलाभार्थ उत्सुक असतील त्यांनीं भक्तिपूर्वक आदरानें नित्यनियमानें याचें पठन केल्यास सच्चिदानंदघन व्यापक सर्वात्मा त्यांच्या विचारमंदिरांत प्रगट होऊन ते अखंड तृप्त होत्साते स्वानंदसाम्राज्यपदीं विराजमान होतील. असा श्रीसद्गुरु रामचंद्राच्या कृपाबलावर मला पूर्ण भरवंसा आहे. मजप्रमाणेंच माझ्या प्रत्येक वाचकांनीं पूर्णानंदांत निमग्न व्हावें अशी मी त्या सर्वेश्वर जगन्नायकास अनन्यभावें प्रार्थना करून अति विस्तृत झालेला उपोद्घात पूर्ण करतों.

रा० कृ० जटार.

---

( श्रीरामं ज्ञानगुरुं वंदे )

ॐतत्सत् ब्रह्मणेनमः

# स्वानंद साम्राज्य.

## प्रकरण पहिलें.

## ' ब्रह्मानंद प्रदेश. '

ब्रह्मानंदनिधिर्महाबलवता हंकारघोराहिना ।
संवेष्ट्यात्मनि रक्ष्यते गुणमयैः चंडैस्त्रिभिर्मस्तकैः ॥
विज्ञानाख्यमहासिना श्रुतिमता विछिद्य शीर्षत्रयं ।
निर्मूल्याऽहिमिमं निधिं सुखकरं धीरोनुभोक्तुं क्षमः ॥

" श्रीमच्छंकराचार्यभगवत्पूज्यपादाः "

" अव्यक्त परमात्मा जसा व्यापक, निर्गुण आणि अलिप्त आहे, तसा अव्यक्त बिंदूही व्यापकस्वरूपच आहे. अव्यक्त त्रिगुणात्मिका माया-संवलित परमात्मा सगुणरूपी ह्मणविला तसा रेषासंवलित बिंदूही व्यक्त दिसूं लागला. माया त्रिगुण विकृतीनें प्रगट होतांच तिच्या गुणांत परमात्म्याचेही तीन गुण व्यक्त दिसूं लागले, तसा बिंदूही गतिरूप उपाधीनें त्रिगुण रेषारूप झाला. पुढें परमात्म्याच्या आणि मायेच्या गुणांचें अत्यंत ऐक्य होऊन ते जडचैतन्यात्मक सृष्टिरूप झाले, तसा बिंदूही गतीच्या उपाधीनें रेषा झाला होता तो अक्षररूप झाला. या सर्व घडामोडीचें मूलबीज कारण वासना–[ वासना-कल्पना-संकल्प हे सर्व एकाच अर्थाचे शब्द आहेत ] या वासनेचें स्वरूप जरी अत्यंत खोटें आहे तरी अविचारकालांत यास खोटें ह्मणतां येत नाहीं. सत्यच मानलें पाहिजे. अविचार ह्मणजेच अज्ञान. तें अज्ञान निवृत्त व्हावें ह्मणून श्रुतीनें तटस्थलक्षण धारण

करून व सत्य आणि मिथ्या असे दोन भेद कल्पून बोध केला. त्या श्रुतिदर्शित मार्गानेंच आपणही विचार केला पाहिजे." इ० सर्व मुद्दे 'अव्यक्तबोध' ग्रंथांत सिद्ध झाले आहेत. ते सूज्ञ वांचकांनीं एकवार पुनः चांगले लक्षांत आणून या ग्रंथांत प्रवृत्त होण्याची सूचना करितो. कारण तसे केल्यावांचून हें पहिलें ब्रह्म प्रकरण समजणेस जड जाईल. असो.

सत्य हा शब्द उच्चार करितांच त्याचा विरोधी मिथ्या हा शब्द मनांत येतो, आणि सत्य–मिथ्या असे दोन भेद झाले कीं, सत्य मि-मिथ्याहून वेगळा असा तिसरा कोणी तरी असलाच पाहिजे, असें मानावें लागतें. त्या तिसऱ्यासच निःपक्षपात ह्म० तटस्थ असें ह्मणतात. एकाच्या अपेक्षेनें दुसरा आणि दोहोंच्या अपेक्षेनें तिसरा, असा भेद प्रतीत होऊं लागला. हा भेद तीन ठिकाणीं जोंवर कायम आहे तोंवर तिघांस आपापला अभिमान दृढ आहे. आणि तीन प्र-कारचे दृढाभिमानांनींच तीन भेद अगदीं कायमचे करून टाकिले आहेत; म्हणजे खोटा आपलें खोटेंपण, खरा आपलें खरेंपण आणि तटस्थ आपलें अलिप्तपण हें कधीं सोडीत नाहीं, यामुळें हा त्रिविध भेद जात नाहीं. हा त्रिविध भेद प्रतीत होत आहे तोंपावेतों अवि-चार–अथवा–अज्ञानकालाची यत्ता आहे. ज्ञानकालांत म्हणजे ज्ञान-दशेंत या त्रिविध भेदाचा अत्यंत लय होतो. ही दशा जोंपावेतों अनुभूत होत नाहीं तोंपावेतों जीवभाव जात नाहीं. जीवाचें स्वरूप वासनात्मक म्हणजे कल्पनावेष्टित आहे. * त्यांतून तो मोकळा झा-ल्यावांचून ज्ञानदशेचा कधींच उदय व्हावयाचा नाहीं. तिचा उदय होणें ह्मणजेच स्वरूपसाक्षात्कार अथवा ब्रह्मानुभव होय. या अनुभ-वावांचून त्रिविध भेदाचा अत्यंत लय खरा कधींच होणार नाहीं. तो लय होऊन ब्रह्मानुभवापर्यंत अज्ञानदशाच आहे. या दशेंत जगास व सृष्टिबीजवासनेस मिथ्या ह्मणणें ह्मणजे केवळ शब्दव्यापार करणें होय. या निष्फल व्यापारानें जी अनादि अनंतकालापासून सृष्टि अ-खंडची कायम होऊन बसली आहे ती मिथ्या होऊं शकते का? कधींच नाहीं. अनंत जीवांच्या अनंत वासनांनीं सृष्टीला अशी जबर

* टीपः—अव्यक्तबोध 'कारण' प्रकरण पान ७१ वें पहा.

बळकटी आली कीं ती स्वतःच अनंत होऊन तिचे उत्पादक आणि विध्वंसक जीवांस तिनें क्षुद्रता आणली, अज्ञानांत निमग्न केलें आणि आपलें वर्चस्व त्यांवर जमविलें. अशा स्थितींत जीवानें तिला मिथ्या-मिथ्या असें ह्मणणें ह्मणजे फुंकून पर्वत उडविण्यासारखें वेडगळपण नव्हे का ? यास्तव विचारवानांनीं तशी केवळ वाग्जल्पना न करितां जशी सृष्टि, जीवांच्यीं कर्में युक्तीनें बळकाऊन आपण प्रमुख बनली आहे, तसेच युक्तीनें जीवांनींही सृष्टींत सत्य काय, मिथ्या काय याच्या पूर्ण विचारांनींच हिला खोटें केलें पाहिजे. अन्य उपायच नाहीं. व्यवहारांतच पहाना? जोंवर वादी-प्रतिवादी आहेत तोंवर न्यायकोर्ट कधींच बंद होऊं शकत नाहीं. तें कायम राहणारच. सत्य-मिथ्या असे दोन पक्ष असल्यावर तिसरा तटस्थही असणारच. त्याप्रमाणें जग व जीव आहे तोंपावेतों ईश्वरही कायम आहेच. येथें असें मात्र कोणी समजूं नये कीं, जीव आणि जगत् नाहींशीं झाल्यानें ईश्वरही नाहींसा होतो; तर, जसें खोट्यानें खोटेंपण टाकिलें ह्मणजे तो खऱ्यांत येऊन मिळतो व दोघेही खरे झाले ह्मणजे ते तिसऱ्या तटस्थांत मिळतात, ह्मणजे तिघेही एकरूप होऊन भेद नाहींसा होतो, तसा जीवाचा जीवभाव जातांच जगद्भावही नाहींसा होऊन सारेच ईश्वररूप होतात. मग जीव, जगत्, ईश्वर, हे भिन्न शब्दमात्र नाहींसे होऊन एक ओतप्रोतभाव झाला ह्मणजे भेदकल्पनाच नाहींशी होते. अशी जी दशा तीच ज्ञानदशा आणि अज्ञानांत जाणावा. तोंवर जें दिसतें तें सर्व सत्य आहे, असेंच ग्रहण करून विचार केला पाहिजे. जसें गणितांत दोन राशी व्यक्त असल्या ह्मणजे तिसरी इष्टरास कल्पून हिशेब केला असतां उत्तर अगदीं बरोबर येतेंच. आतां विचार पहा, आरंभीं जी इष्टरास मानली, ती केवळ कल्पित होती ना ? बरें, शेवटीं उत्तर बिनचुक आलें ह्म० जशी बीजफलाची सांगड असते तशी त्या कल्पित राशीची आणि उत्तराची बळकट सांखळी पडते. आपण व्यवहारांत सत्य-मिथ्या असे दोन भेद मानून व्यवहार करीतच आहोंत. आतां ज्यास आपण सत्य ह्मणतों तें जरी खरें सत्य नव्हे, तरी व्यवहारांत ठरलेल्या खऱ्याखोट्यासच खरें-खोटें अशा दोन राशी ग्रहण करून तटस्थ लक्षण अशी तिसरी

इष्टरास मानून विचाररूप हिशेबास आरंभ केला कीं शेवटीं उत्तर काय येईल याचा विचार मी वाचकांवरच सोंपवितों. असो.

हा सर्व अज्ञानकृत भेदभाव नाहींसा होण्याकरितां आपलें अखंड अद्भुत ऐश्वर्य समजण्याकरितां आणि जीवांचें निजानंद स्वरूप त्यांचें त्यांस प्राप्त होण्याकरितां, साक्षात् **परमात्म्यांनी** स्वतः आपले स्वरूपांत-आपलीच इच्छा जी **माया** तिच्यांत आणि आपणच झालेल्या अखिल **सृष्टींत** वास्तविक यत्किंचितही भेद नसतां केवळ जीवांस बोध होण्याकरितांच आपल्या वेदवाणीनें आपले स्वरूपाचे, मायेचे व सृष्टीचे जे विभाग कल्पून पुनः सर्वांचे ऐक्यस्वरूपाचा उपदेश केला आहे. त्याच मार्गानें आपणही विचार केला पाहिजे. [ विभागास पाद, चरण, अंश असेंही ह्मणतात व हे सर्व एकाच अर्थाचे बोधक पर्यायशब्द आहेत. ] श्रुतीनें ब्रह्माचे कल्पित चार पाद मानिले आहेत. ते चतुर्थ, तृतीय, द्वितिय आणि प्रथम असे आहेत. त्यांत तृतीयपादापासून प्रथमपादापर्यंत विवेचन करून शेवटी त्रिपादांतीत असा तूरीय ब्रह्म सज्ञक चतुर्थपाद दाखविला आहे. कारण चतुर्थपादावर प्रथम वाचारंभणच होऊं शकत नाहीं ह्मणून त्याचें वर्णन शेवटी केलें आहे.

---

# ब्रह्माचा तृतीय पाद.

अशी कल्पना करा कीं, एका सार्वभौम राजानें एका अति हुषार मनुष्याकडे अगदीं भिन्न स्वरूपाच्या तीन मोठ्या अधिकाराचीं कामें सोंपविलीं आणि त्यास पूर्ण सत्ताही दिली. त्याप्रमाणें तो कार्यदक्ष मनुष्य नियमित वेळीं त्या त्या अधिकारासनावर बसून तीं तीं कामें चोख रीतीनें बजावून पुनः स्वगृहकार्यार्थ घरीं मोकळाच असतो. आतां येथें असा विचार पहा कीं, एका मनुष्याकडे एकच अधिकार असला तर तो मनुष्य नेहमीं त्या अधिकाराच्या नांवांनीं नांवाजला जातो. आणि जर ज्याच्याकडे अगदीं पृथक् पृथक् स्वरूपाचे तीन अधिकार असले तर तो कोणत्याही एका नांवानें न-

नावाजतां, हे कोणी मोठे अधिकारी आहेत असें सामान्य नांव त्यास प्राप्त होतें व खास त्यालाही आपलें एक नांव सांगतां येत नाहीं. अर्थात् ज्या अधिकारावर तो ज्या वेळीं बसला असेल त्या वेळीं त्याचें तें नांव असून कामें आटोपून तो घरीं असल्यावर मग त्याचें खासगी नांव जें असेल त्याचाच त्याला अभिमान राहील. यावरून असें सिद्ध होतें कीं, एकाच मनुष्याचीं चार प्रकारच्या उपाधिभेदानें चार नांवें, चार अधिकार, चार स्वरूपें दिसूं लागलीं. पण वास्तविक मनुष्यरूपानें ती एकच व्यक्ति आहे. त्यांत कोणत्याही प्रकारें बदल झाला नाहीं. ही गोष्ट बरोबर ध्यानांत आलीना? आणखी सूक्ष्म विचार करून पहा कीं राजसत्तेखालीं प्रधानादिकांचे मोठे अधिकारापासून तों लहान अधिकाऱ्यापर्यंत प्रत्येकास जो अधिकार व जी सत्ता असते ती त्या व्यक्तीच्या आश्रित नसून स्थानाश्रित असते. कारणपरत्वें व्यक्ती बदलते, पण स्थानाचा अधिकार जात नाहीं. हे स्थानाधिकार मुख्य राज्याधिकाराचे अवयव आहेत व त्यांचे ठिकाणीं जी न्यूनाधिक सत्ता वांटली गेली आहे ती मुख्य राजसत्तेचेच अंश आहेत; ह्मणूनच जो अधिकारी जी आज्ञा करितो ती इतरांस राजाज्ञाच आहे असें मानावें लागतें. राजाची एक विभूति अतिविस्तृत राज्यकारभार आटोपण्यास असमर्थ असते यामुळें सुयंत्रित राज्यव्यवस्था चालण्याकरितां स्वतः राजा, आपल्या स्वरूपभूत असे अनेक अधिकारी नेमितो व त्यांस आपल्या सत्तेचे अंश वांटून देतो. म्ह० स्वतः राजाच व्यक्तीच्या भेदानें अनेक व्यक्तिरूप झाला व त्याची एकच सत्ता त्यांनें वांटल्यामुळें भिन्न भिन्न अंशानें कमजास्त दिसूं लागली. हे केवळ दिसणारे भेदभाव काढून टाकिल्यास एकच राजविभूति भिन्नरूपानें दिसूनही पुनः एकच आहे, आणि त्याची एकच पूर्ण सत्ता न्यूनाधिक भावानें विभक्त दिसूनही पुनः एकरूप आहेच. तात्पर्य, उपाधीच्या योगानें जो भिन्नभाव दिसतो तो मूलस्वरूपांत भेद करूं शकत नाहीं. फक्त दिसतो मात्र. असा वास्तविक नसणारा व केवळ दिसणारा जो भेद त्यास **कल्पित भेद** असें म्हणतात. कल्पित वस्तु कधींच खरी नसते असा नियम आहे. तेव्हां कल्पित भेदही खरा असूं शकत

नाहीं. तो अभेदरूपच असतो व त्याचा भेद दाखविण्यास केवळ उपाधि कारणीभूत होते. ह्या उपाधीच्या असण्यावर व नसण्यावरच तो भेदाभेद अवलंबून असतो. जसें आकाश सर्वत्र व्यापक असून त्याचे व्यापकपणास कोणत्याही प्रकारचे उपाधीचा अडथळा येतच नाहीं हें अ० बोधांत व्यापकतेच्या लक्षणांत सिद्ध करून चुकलोंच आहें, तें वाचकांनीं ध्यानांत आणावे.* आतां असें पहा कीं, उपाधीचा प्रादुर्भाव कसा जबरदस्त आहे तो; कारण उपाधीच ती! आपण कोणास विचारलें कीं, कां हो, आजकाल आपण असे व्यग्र कां दिसतां? तर, काय करावें? आजकाल माझ्या मागें अमुक उपाधि लागली असल्यानें कांहीं सुचेनासें झालें आहे, असें उत्तर मिळतें. मनुष्य कसाहि समर्थ व स्वतंत्र असला तरी उपाधीच्या योगानें तो परतंत्र होतोच. निदान परतंत्र झाल्यासारखा दिसल्यावांचून तरी राहूंच शकत नाहीं. जर तसा तो राहिला तर मग उपाधीचें सामर्थ्य तें काय? परंतु त्यांत फरक इतकाच कीं जो पराधीन होतो तो स्वाधीन होणें महादुर्धर होतें! आणि जो पराधीन झाल्यासारखा दिसतो तो स्वतः स्वाधीन असतो; व दुसऱ्यानें जरा विचारदृष्टीनें पाहिलें कीं त्यालाही तो स्वाधीन म्ह० स्वतंत्रच दिसतो. जसें आकाश स्वयंरूपानें सर्वत्र ओतप्रोत भरलेंच आहे आणि त्यांतच सर्व व्यापार होतात. आपण जें घर बांधतों त्यांत खोल्या, दालनें, चौक, माजघर इ० सुखसंचारार्थ व्यवस्था करितों यांत थोडा विचार करून पहा, ह्म० आपण गृह बांधण्याकरितां जसा भूमीचा आश्रय घेतों तसाच त्या गृहांत संचार करण्याकरितां आकाशाचे अवकाशाचाही आश्रय घ्यावा लागतो. भूमि व आकाश या दोघांच्या आश्रयावांचून गृहसंचार करणें ह्म० पर्वतावर हिंडणें होय.

आतां, आपण बांधलेल्या गृहांत आकाश तर आलेंच; त्यांतल्या त्यांत बारिकी पहा; घरांत पदार्थ ठेवण्याकरितां भांडीं, पेट्या, कपाटें इ० सामान असतें त्यांत आकाश नसलें तर वस्तु राहूं शकणार नाहींत; नुसत्या लांकडाच्या ठोकळ्यांत कांहीं वस्तु राहाते का? नाहीं. आपण बसण्याकरितां जो दिवाणखाना शृंगारितों, त्यांत

* टीपः—अ० बो० पुरुष प्रकरण पान ११ वें पहा.

हंड्या, झुंबरें, मोठमोठे आरसे लावितों; त्या आरशांत सर्व दिवाणखान्याचें प्रतिबिंब दिसतें, त्यांत जशा सर्व जिनसा दिसतात त्याचप्रमाणें दिवाणखान्यांतील अवकाशाचे ( आकाशाचें ) ही प्रतिबिंब दिसतेंना. आतां विचार करा, आकाशाचें जसें आहे तसें एकच रूप आहे परंतु बाहेर असलेलें माहाकाश, घरांत असलेलें गृहाकाश, भांड्यांत असलेलें घटाकाश, आरशांत आलेलें प्रतिबिंबाकाश, असे गृह घट, आरसा या तीन उपाधींच्या योगानें आकाशाचे चार विभाग दिसूं लागले. हे विभाग खरे झाले असें ह्मणावें तर उपाधीचे पदार्थ नष्ट झालेले दिसतात तसें आकाश नष्ट झालेलें दिसत नाहीं; बरें विभाग खोटे झाले असें ह्मणावें तर तसेंही ह्मणतां येत नाहीं, कारण ते प्रत्यक्ष अनुभवास येतात पाणी आणण्याची क्रिया जी घटानें होते असें आपण ह्मणतों ती घटानें होत नाहीं. कारण घट आंतून मातीनें भरींव असला तर पाहणारा त्यास घट ह्मणेल, पण पाणी आणण्याची क्रिया मात्र त्यापासून घडणार नाहीं; कां तर त्यांत आकाश नाहीं ह्मणून. अर्थात पाणी आणण्याची क्रिया घटाच्या आंत असलेल्या आकाशाच्याच योगानें घडते. असें मानल्यावांचून गति नाहीं. ह्मणून याविभागास खरेंही ह्मणतां येत नाहीं, व खोटेंही ह्मणतां येत नाहीं. तर म खऱ्याखोट्याहून निराळें असेंच ह्मटलें पाहिजे. खऱ्याखोट्याहून निराळा तिसरा तटस्थलक्षण असतो. आणि तटस्थ खऱ्याखोट्याहून अलिप्त असतो. हें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें आकाश स्वाधीन ह्मणावें तर उपाधीच्या वश होऊन ह्म० घटाबरोबर गमनागमन करितें. जल आणणें, वस्तु आंत ठेवून घेणें इ० क्रिया करितें. बरें, क्रिया करितें ह्मणून पराधीन ह्मणावें तर भूमींतून माती काढून नली ह्म० जसा भूमींत खळगा दिसतो तसें घटाबरोबर आकाश इकडून तिकडे गेल्यानें आकाशांत कोठें खळगा पडलेला दिसत नाहीं. वस्तु राहाण्याकरितां अवकाश मात्र आकाश देतें, पण घटांत कांहीं सुगंधिक पदार्थ भरला व पुनः रिकामा करून घट फोडला तर त्या घटाचे तुकड्यास मात्र सुगंध येईल; पण ज्या जागीं घट फोडल्यानें घटाकाश महाकाशांत मिळाल्यासारखें वाटलें; त्या जागीं नाक पुढें केलें तरी निव्वळ आकाशास कांहीं वास यावयाचा नाहीं. म्हणून घटाचे संयोगानें आका-

शास सुवासाचा संयोग होऊं शकला नाहीं; अर्थात आकाश सर्वांत व्यापल्यासारखें दिसतें म्हणून पराधीनासारखें आहे. आणि व्यापूनही पुनः असंग, अलिप्त, अक्रिय, असल्यानें स्वतंत्र आहे. तात्पर्य उपाधीकृतभेदेंकरून स्वरूपांत भेद येत नाहीं. तें जसें असतें तसेंच राहातें. म्हणून—

परमात्म्याच्या व्यापकस्वरूपाचे मायेच्या उपाधीच्या योगानें चार भेद होऊनही पुनः तो स्वस्वरूपानें जसा आहे तसा आहेच. त्या भेदांस खरे भेद न ह्मणतां कल्पित भेद असेंच म्हटलें आहे. ह्या भेदांमुळें व्यापक परमात्मा असतांही त्याचीं चार रूपें, चार नांवें, चार अवस्था, चार अधिकार आणि या सर्व चार व्यवस्था संभाळण्याचा अभिमान इ० कसा आला तो दाखवितों. सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाची घडामोड अनादिअनंतकालची सारखी चालली आहे. यांत आद्यसृष्टि कोणती व कधीं झाली याचा पत्ता साक्षात् **वेदास**ही लागला नाहीं; तेथें इतरांनीं आपली बुद्धिकल्पना चालविणें म्ह० डोक्यानें पर्वत फोडून नाहींसा करण्यासारखें शहाणपण होय. या करितां श्रुतीनें अखंडमंडलाकार सृष्टिमालिकेंतील कोणती तरी एखादी सृष्टि, विचारार्थ हातीं घेऊन तिचे उत्पत्तिस्थितिलयाचा अनुक्रम दाखविला आहे. यावरूनच अनादिअनंत सृष्टिचक्राचें अनुमान केलें पाहिजे. याशिवाय कोणासही कधींच अन्यमार्ग सांपडला नाहीं. व सांपडणारही नाहीं.

इंद्रियांनीं व मनाच्या कल्पनांनीं जें कांहीं जेथवर ग्रहण करितां येईल तेथवर सृष्टीचीच सीमा आहे. सृष्टीचें प्रत्यक्ष[1] आणि काल्पनिक[2] जें स्वरूप तीच **माया** आणि हीच माया परमात्म्याला उपाधिरूप होऊन हिनेंच त्याच्या व्यापक स्वरूपांत चार भेद केले.

अखिल **सृष्टि** ही उत्पत्तीच्या पूर्वीं वासनात्मक बीजरूपानें होती म्ह० **माया** त्रिगुणात्मिका[3] नसून एकच गुणवति म्ह० तमोगुण प्रधान होती. या तमप्रधानमायेनें आपले शक्त्यनुरूप परमात्म्याचे स्वयंसिद्ध व्यापकपणांत आपला प्रसार करतां आला तितका

१ स्थूल. २ सूक्ष्म. ३ गुणक्षोभवति नसून सौम्यावस्थेनें होती. ४ प्रज्ञानघन.

केला. त्या प्रसृत भागांत जितका कांहीं परमात्म्याचा व्यापकप्रदेश आला, म्ह० आल्यासारखा वाटला, तितक्याचें नांव ईश्वर हें होय. तमोगुण म्ह० ज्यांत कांहीं चलनवलन नसून केवळ स्तब्धपण असतें तो. इश्वराची अशा प्रकारची निश्चळ स्थिति असल्यानें त्या स्थितीस सुषुप्ति अवस्था असें म्हणतात. या सुषुप्ति अवस्थेंत जीवांस कांहींच भान नसतें; तथापि बीजरूप वासना असतेच. अशा अनंतकोटि ब्रह्मांडांतील अखिल जीवमात्रांची जी सुषुप्ति अवस्था व त्या सर्वांच्या ज्या वासना या सर्वांचें एकवटून झालेलें जें एक वासनाबीज व एक सुषुप्ति अवस्था तीच परमात्म्याची वासना व सुषुप्ति अवस्था होय. जगांतील अखिल जीवांच्या अनंत वासना, परमात्म्याची एक वासना व सर्वांची अनंत सुषुप्ति त्या परमात्म्याची एक सुषुप्ति अवस्था कशी होऊं शकेल ? अशी शंका आल्यास त्याचें समाधान असें कीं, वटवृक्षाचें बीज अत्यंत लहान ह्मणजे बारीक असतें तें भूमींत पेरल्यास एक वृक्ष तयार होतो. पुढें त्यास लक्षावधि फलें येतात; त्या फलांत असंख्य बीजें असतात तीं सर्व पेरलीं, तर असंख्यच वृक्ष होतील. असाच बीजें पेरण्याचा क्रम चालला तर हा भूगोल अल्प कालांतच वटवृक्षमय होऊन जाईलना ? आतां विचार करून पहा कीं, सर्व जग वटमय करून सोडण्यास एकच बीज समर्थ झालें. व हे असंख्य वृक्ष उत्पत्तीच्या उलट क्रमानें पाहिल्यास सर्व त्या एका आद्यबीजांत अव्यक्त रूपानें होते, असेंच कबूल करावें लागेल. बरें आतां हा वटमय भूगोल झालेला अगदीं साफ करण्याच्या हेतूनें सर्व वृक्ष व त्यांचीं बीजें जाळून फस्त केलीं तरी चुकून एखादेंच बीज शेष राहिल्यास तें बीज पुन: या संपूर्ण भूमंडलास वटवृक्षमय करील. प्रलयकालांत पंचभौतिकसृष्टि जीव इ० उत्पत्तीचे उलटक्रमानें लय पावतात ह्मणजे नाहींसे होत नाहींत, तर एकांत एक लीन होतात. यामुळें नाश न होतां वटबीजन्यायानें सर्व एकवटून एक वासनाबीज होतें. त्या बीजांत अखिल जग *समष्टिरूप अव्य-

* पदार्थांचे जितके अंश असतील त्या प्रत्येक अंशास **व्यष्टि** असें ह्मणतात, व त्या सर्व अंशांनी युक्त असा जो एक पदार्थ त्यास **समष्टि** असें

(पुढें चालू.)

क्तरूपानें असतें. हें जें सर्वांचें केवल अस्तित्वरूप, हेंच वासना-बीज मायेचें स्वरूप आहे. † आतां बीजाचें मूलस्वरूप बिंदुरूप आहे, हें मी 'अव्यक्तबोधांत' सिद्ध करून चुकलों आहें; तें वाचकांनीं लक्षांत आणावें. व्यक्तबिंदु रेषासंवलित असतो. रेषेवांचून तो व्यक्त होऊं शकत नाहीं. हेंही त्यांत पूर्वीं सिद्ध झालेंच आहे. आतां वासना बीजरूपानें जें मायेचें अस्तित्व तीच माया रेषारूप वर्तुल झाली. या तिच्या वर्तुलाकारानेंच व्यापक परमात्म्याचा भाग जितका त्या वर्तुलांत आला ह्म० आल्यासारखा वाटला तितक्या भागास व्यक्तबिंदुत्व येऊन त्यास **मायावी** ह्म० **ईश्वर** असें नांव प्राप्त झाले. बिंदु निश्चलरूपच असतो. त्यांत तमोगुणप्रधान मायेची उपाधि असल्यानें तिच्यांत ईश्वराचा आनंद गुण असतो, ह्मणून ती सुषुप्ति अवस्था ईश्वराची आहे. सुषुप्तींत तमोगुणरूप अज्ञान असल्यानें कांहींच कळत नाहीं व आनंद असल्यानें जागें झाल्यावर सुख वाटतें, हा आपल्यास नित्यानुभव आहेच. हीच जी जीवांची व्यष्टिसुषुप्ति, या सर्वांचा जो एकीकरण भाव तीच ईश्वराची महाप्रलयकालरूप **सुषुप्ति** होय. या सुषुप्तिकालांत पुनः सृष्टि उत्पत्तीची जी **वासना** लीन आहे ती **माया**, आणि मायेचा व सुषुप्तीचा अभिमानी जो **अहंकार** तो **ईश्वर** बिंदुरूप आहे. व **अव्यक्त ॐ** हीं **बिंदुरूपच** आहे; हा परमात्म्याचा व ॐचा **तृतीय पाद** झाला. आतां द्वितीय पाद सांगतो.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

ह्मणतात. जसें वन, नगर, राशी, सभा इ० हे समष्टिरूप आहेत. आणि त्यांचे अवयव वृक्ष, घर, दाणा, सभासद इ० हे व्यष्टिरूप आहेत. व्यष्टींचें एकीकरण रूप समष्टि आणि समष्टीचें भिन्नावयव रूप व्यष्टि.

† अ० बो० रूप प्रकरण पान ४५ पासून ५१ पर्यंत पहा ह्म० सर्व लक्षांत येईल.

[stamp]

# ब्रह्माचा द्वितीय पाद.

सृष्टि वासना बीजरूप माया, तमोगुण प्रधान सुषुप्ति अवस्थेचा अभिमानी, आनंद गुण प्रधान ईश्वर बिंदुरूप होता, हा तृतीय पाद वर सांगितला. आतां पहा, बीज भूमींत पेरलें व लागलेंच दोन चार घटकांनीं जर तें उकरून पाहिलें तर जसें होतें तसेंच निघेल. आणि एक दोन दिवसांनीं उकरल्यास तें बीज आर्द्र झालेलें, उकलेलें, व कांहींसा मोड येत असलेलें अशा स्थितींत सांपडेल; व पुढें कांहीं कालानें त्या बीजाचा कोंब भूमीचे बाहेर येईल. जसें बीज भूमींत पेरल्यापासून त्याचा कोंब वर येईपर्यंत भूगर्भांत अदृश्य रीतीनें जी पुढें होणाऱ्या वृक्षाची घटना चालली असते त्या अदृश्य क्रियेंत कसा क्षणोक्षणीं बदल होत असेल याचें अनुमान करितां येईलना ? कांहीं काल बीज जसेंच्या तसेंच असण्याचा, कांहीं काल तें आर्द्र होण्याचा, व कांहीं काल तें मोड येण्याचा इ० कालाचे कसे अदृश्य विभाग होत गेले हेंही कळूं शकेलना ! आतां अल्प वृक्षाचे अल्प बीजास जसा अल्प काल लागला त्याचप्रमाणें अनंत वृक्षाचे *उत्पत्तीला, व त्याच्या अनंत वासना बीजाची अदृश्य घटना परमात्मभूमींत चालू राहण्यालाही अनंतच काल पाहिजेना ! व त्या कालाचे विभागही अनंतच होतीलना ? ही गोष्ट नीट लक्षांत धरा. व पुढील मेळ पहा.

जो ईश्वर सुषुप्तीचा अभिमानी आपले स्वरूपीं सृष्टिबीजरूप मायेस लीन करून निद्रिस्त होता त्या निद्रेंत अती गाढ तमोगुणाची सुषुप्ति अवस्था होती. तोंवर महा घोर प्रलयकाल होता; त्या कालांत तें सृष्टिवासनात्मक बीज जसेंच्या तसेंच राहिलें. असा अनंत काल लोटल्यावर पुढें अनंत जीवांच्या वासनेचें जें एक सृष्टिबीज परमात्मभूमींत रुजत पडलें होतें त्याची आत्मभूगर्भांत वृद्धीची क्रिया सुरू झाली व इकडे जीवांची भोगदशाही समीप येत चाल-

* अ० बो० कारण प्रकरण पान ७८ वें पहा व अ० बोधच्या प्रारंभींच अनंत वृक्षाच चित्र दिलें आहे तें पहावें.

ली. ह्मणून त्या बीजरूप वासनेनें चळवळ करितांच गाढ निद्रिस्त ईश्वरास उगीच किंचित् स्फूर्ति झाली ह्म० चलनवलन होऊन **'मी आहें'** अशी ऊर्मि येऊन तिनें स्वतःला पाहिलें. तों **"एकोहं"** मी एकटा आहें असें तीस वाटलें. सुज्ञ वाचकहो, फार बारीक विचार करा. एक हा शब्द उच्चारला नव्हता तोंवर भेदकल्पनाच नव्हती; परंतु एक असें ह्मणतांच दुसरा अनुच्चरित गुप्त रितीनें प्रतीत झाला. तसें ईश्वरास एकोऽहं ही स्फूर्ति होतांच ईश्वराचे **अहं** रूपांत **अस्मिता** ( अस्तित्व ) जी स्फुरण पावली, हीच दुसरी झाली, ह्म० माया सुषुप्ति अवस्थेंत तमोगुण प्रधान होती, ती स्फुरणरूपानें चांचल्य पावतांच तिच्यांत रजोगुणाची प्रधानता व तमोगुणाचीं न्यूनता झाली, त्या योगानें तिच्या गुणरूप उपाधींत ईश्वराचे आनंदगुणाची न्यून्यता व चैतन्यगुणाची प्रधानता व्यक्त होऊं लागली. मायेचा रजोगुण प्रधान व ईश्वराचा चैतन्य गुण प्रधान असे दोन्ही क्रियारूप गुण एकत्र होतांच ईश्वरास मी एकटा आहें असें जें स्फुरलें होतें तेंच स्फुरण **'काय करावें'** असा विचाररूप झालें. ज्याप्रमाणें **"मी आहें"** यांत **'मी'** हें अहंपण ईश्वराचें व **'आहें'** ही अस्मिता मायेची आहे. त्याचप्रमाणें **मी** हें ईश्वराचें होऊन **काय करावें** ही संशयी ऊर्मि मायेची झाली. या मायेच्या संशयी ऊर्मीसच मन अशी संज्ञा झाली. पुढें **अमुक करावें** अशी ईश्वराची निश्चयी ऊर्मि होतांच तिच्यांत मायेचा सत्वगुण प्रधान व तम आणि रज हे दोन गुण गौण झाले व ईश्वराचा आनंद व चिद्गुण गौण होऊन सत् हा गुण प्रधान झाला. या **सत्व** आणि **सत्** गुण प्रधान ऊर्मीला **बुद्धि** अशी संज्ञा झाली. हें मायेचें व्यक्त **त्रिविध गुण** स्वरूप **मन—बुद्धि** रूपानें द्विविध झालें. आणि यांचा व्यापार सर्व कल्पनारूप असल्यानें त्या व्यापारास **स्वप्न** असें नांव पडलें. या स्वप्नावस्थेचा अभिमान ईश्वरासच आल्यामुळें त्यास **हिरण्यगर्भ** असें नांव आलें. याच मानसिक सृष्टीला **हिरण्यगर्भलोक** अथवा **ब्रह्मलोक** असें ह्मणतात. या ब्रह्मलोकाचें **वर्णन**, त्या लोकास जाणारे, आणि तेथें जाण्याचा मार्ग, हें **जीवाचें** कर्तव्य या प्रकरणीं दाखवीन. असो.

सुषुप्ति अवस्थेंत **परमात्मा,** निश्चल बिंदुरूप होता; त्यासमयीं त्याचा आनंदगुण व मायेचा तमोगुण असे प्रधान होते; तोंवर या सर्वांचे अभिमान्यास **ईश्वर** असें नांव होतें, हें प्रथम सिद्ध झालेंच. पुढें तोच बिंदुरूप ईश्वर चंचल होतांच त्याचे चैतन्य आणि सत्ता हे दोन गुण मायेच्या रजोगुण व सत्वगुण ह्या उपाधींत व्यक्त होऊं लागले ह्म० बिंदु संवलित रेषारूप माया अव्यक्त त्रिगुणा होती ह्म० तिचें व बिंदूचें अभिन्न असें एकच रूप होतें. पुढें बिंदुरूप ईश्वर, चांचल्योपाधीनें स्वस्थान न सोडतां गतिरूप झाला. हेंच गतिरूप, व्यक्त त्रिगुणी मायेचें रेषारूप झालें. यांत मायेच्या स्वरूपांत संकल्प आणि निश्चय असे द्विविध भेद झाल्यानें ह्म० वास्तविक एकच ऊर्मि असून तिच्यांत दोन प्रकारचीं कार्यें दिसूं लागलीं. ह्मणून कार्यानुरूप त्या एकाच ऊर्मीस मन आणि बुद्धि अशी संज्ञा प्राप्त झाली अर्थात् एकच मायारूप रेषा भिन्नाभिन्न स्वरूप दिसूं लागली. या मनबुद्धिरूप कल्पनेच्या सृष्टीला स्वप्नावस्था, व त्या अवस्थेच्या अभिमानी ईश्वरास हिरण्यगर्भ अशी संज्ञा आहे. हें वर सांगितलेंच आहे. हा **हिरण्यगर्भरूप** परमात्म्याचा **द्वितीय पाद** झाला. व **माया** व्यक्त त्रिगुणात्मिका **अर्धचंद्राकार रेषारूप** झाली. ही मात्रा मनबुद्धिरूप भिन्नाभिन्न स्वरूप ॐकाराचा **द्वितीय पाद झाला** ह्म० बिंदुरूप परमात्मा ईश्वर अव्यक्त ॐरूप होता तोच मात्रारूप सूत्रात्मा हिरण्यगर्भ झाला; अर्थात् दोघांचेही द्वितीय पाद एकच रूप झाले.

सुज्ञ वाचकहो पहिल्या **अव्यक्त बोध** ग्रंथांत ॐकाराचें स्वरूप वर्णन करतांना अर्धचंद्राकार मात्रेचे मी दोन तुकडे करितों त्याचें कारण पुढें स्पष्ट करीन असें जें ह्मटलें आहे,*त्या कारणाच्या स्पष्टतेचें हें स्थळ आहे. आपण नीट लक्षपूर्वक ही गोष्ट ध्यानांत धरून ठेविली पाहिजे, कीं कसे दोन तुकडे भिन्नाभिन्नरूप झाले ते. असो.

---

* अ० बो० नाम प्रकरण पान ३७ वेंच्या शेवटीं पहा.

# ब्रह्माचा प्रथम पाद.

याप्रमाणें हिरण्यगर्भ परमात्म्यानें व मन-बुद्धिरूप मायेनें स्वाप्निक सूक्ष्म सृष्टि निर्माण केली. येथपर्यंत सृष्टी-वासनाबीजाची, परमात्म-भूमि-गर्भांत अनंत-वृक्षाचा कोंब बाहेर पडण्याच्या पूर्वींची ही सर्व घटना झाली. यांत अनंत काळ लोटला पण या कालांतील सृष्टि केवळ काल्पनिक ह्म० स्वाप्निक असल्यानें आखिल जीवही स्वप्नदशेंतच अव्यक्तरूप राहिले; त्यामुळें त्या दशेंत जीवांचा कर्मक्षय व कर्मभोग बरोबर होईना; व सर्व व्यापार तुंबून राहिले. पुढें जीवांच्या कर्मभोगदशेच्या उदयाची वेळ येतांच, **मी एकटा आहें, काय करावें.** अशी जी हिरण्यगर्भ परमात्म्यास ऊर्मि आली होती तीच **बहुस्याम् ह्म० मीं पुष्कळ व्हावें** ह्या परिणामाला प्राप्त झाली. हिरण्यगर्भ परमात्मा स्वप्नावस्थेंत होता तो आतां जागृत झाला व माया आपले सोज्वल तम-रज आणि सत्व या तीन्ही गुणांनीं विलसूं लागतांच परमात्म्याचे आनंद-चित् आणि सत् हे गुणही मायेचे उपाधिरूप गुणांत झळकूं लागले. असा हा षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् जागृतावस्थेंत येऊन त्यानें या अवस्थेचा अभिमानी **विराट्** असें नांव धारण केलें. मग उशीर काय, जी सृष्टि काल्पनिक अव्यक्तरूप होती, ती एकदम व्यक्तरूप झाली. ह्म० सृष्टिवासनात्मक **माया** पूर्वीं मनबुद्धिरूप द्विविध होती तीच माया **आकाश,–वायु,–अग्नि,–जल,**–आणि **पृथ्वी** अशी पंचरूपात्मक झाली. या पंचमहाभूतांपासूनच चतुर्दश भुवनात्मक आखिल जड-चैतन्य **सृष्टि** निर्माण झाली; व ती विराटाचे अंगापासून कशी निर्माण झाली ह्म० विराटाचें स्वरूपच सृष्टि-मय आहे, हें विस्तारेंकरून पुढील प्रकरणांत वर्णन करीन. अशा ह्या स्थूलदेहधारी **विराट्** ईश्वराचें **अंतःकरण**-चतुष्टय मन-बुद्धि-चित्त-अहंकार यांपासून, प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान पंच **प्राणां**पासून, श्रोत्र, त्वक्, चक्षु, रसना आणि घ्राण, **पंचज्ञानेंद्रियां**पासून आणि वाक्, पाणि, पाद, गुह्य, उपस्थ, या पांच कर्मेंद्रियांपासून सर्व देवतांची उत्पत्ति त्या त्या इंद्रियांनीं ते ते **विषय** ह्म० शब्द, स्पर्श, रूप, रस,

आणि गंध हे ग्रहण करण्यास झाली. विषय, हे **भोग्य**, इंद्रियें हीं **साधनें** आणि **भोक्ता** हा आत्मा, अशी **त्रिपुटी** निर्माण झाली. अशाच सर्व विषयेंद्रियांच्या त्रिपुट्या होतात त्यांचें वर्णन पुढें करीन. फक्त नाहीं. विराटाच्या स्थूलदेहाचें दिग्दर्शन येथें केलें आहे. आतां पहा बिंदुरूप ईश्वर जो होता तोच रेषारूप माया स्वभाभिमानी हिरण्यगर्भरूप झाला, व तोच रेषारूप हिरण्यगर्भ पृथिव्यप तेज वाय्वाकाश पंचभौतिक जागृत सृष्ट्यभिमानी विराट स्वयं सृष्टिरूप झाला ह्म० अक्षररूप झाला. हा सृष्टिरूप परमात्म्याचा आणि अक्षररूप ॐकाराचा प्रथम पाद झाला. दोघांचेंही एकच स्वरूप असल्यानें **बिंदुरेषा अक्षररूप ॐ** आणि **ईश्वर, हिरण्यगर्भ-विराट्-रूप परमात्मा** एकच त्रिपाद अभिन्नरूप अर्थात अष्टप्रकृतिरूप झाले. असे हे परमात्म्याचे व ॐ चे तीन पाद झाले. * आतां उर्वरित चतुर्थपाद सांगतों.

---

# ब्रह्माचा तुरीय चतुर्थ पाद.

या तीन पादांची सर्व घडामोड मायेच्या उपाधीनें ज्या आत्मदेशावर झाली व जें **आत्मतत्त्व** मायेला आणि मायाकृत व्यापाराला आधारभूत झालें ह्म० जसें भूमीच्या आश्रयावांचून घर बांधणें इ० कार्य होणें शक्य नाहीं, तसें मायेचें चलनवलन सुद्धां ज्या आत्माश्रयावांचून होत नाहीं. किंबहुना ज्याच्या सत्तेवांचून मायेंत अस्तित्वच येऊं शकत नाहीं, जें मायेच्या सर्व घडामोडीस पुरून उरणारें, जें मायोपाधींत आल्यासारखें वाटून पुनः अलिप्त राहणारें, जें केवळ आनंद रूपच कीं ज्या आनंदाचे ओतप्रोतपणांत न्यूनतेच्या लवलेशाचेंहि कधीं स्फुरण नाहीं, ज्याच्या अगाध गांभीर्यास पार नाहीं, ज्याचे अनंतत्वास सीमा नाहीं, जें केवळ स्वसंवेद्यरूपच, जेथें स्वतःच्याच **अस्मितारूप** मायेचेंही स्फुरण नाहीं, जें निर्गुण, निर्विकार, निःसंग निरवधि, व नित्य, असें जें कांहीं आहे त्यास **तुरीय** ( ह्म० शेष )

* अष्टप्रकृतिरूप ॐकाराची आकृति शेवटीं दिली आहे.

ब्रह्म अशी संज्ञा आली. हाच परमात्म्याचा चतुर्थपाद होय आणि विंदु, रेषा, अक्षर असें त्रिपाद ॐकाराचें शब्द व अक्षर असें द्विविध रूप होतें तें अनुच्चरित आणि अलिखित असें जें ॐकाराचें स्वरूप ह्म० केवळ सत्तारूप अस्तित्व, यास अमातृस्वरूप ॐ असें ह्मणतात, हा ॐचा चतुर्थ तुरीय पाद झाला. असें परमात्म्याचें व ॐचें ऐक्य झालें. येथपर्यंत वर विशेषणें दाखविलीं यांनींच उमजविण्याची गती चालते. पुढें कल्पनाच कुंठित होते. कारण येथून पुढें स्वसंवेद्यताच आहे. ह्या स्वसंवेद्यदशेंत चारी पादांचा अनुभव आहे. आणि अनुभव होणें ही तरी उपाधीचीच स्फूर्ति आहे. जसें जहाजांत बसून समुद्रपर्यटनास निघालें व भूमीपासून बरेच अंतरावर गेल्यावर भूमीसंसर्ग व जीवोपसर्ग हे सर्व सुटून केवळ जलमय प्रदेशांत आपलें अस्तित्व असतें तरी तीरावरची रचना नेत्रानें दिसत असते; व आपल्यास इच्छेनुरूप पुन्हां परत तीरावर येतां येतें. त्याप्रमाणें तुरीय ब्रह्मानुभावांत सदैव राहूनही त्रिपादानुभव होतो. आणि निवळ तुरीयानुभवही पृथक् होतो. म्हणून तुरीय ब्रह्मास चतुर्थपाद ह्मणवून घेण्याचीच केवळ उपाधि लागली. ज्या उपाधीनें तीन पाद केले तीच उपाधि 'निरुपाधिकरूप' होऊन फक्त चतुर्थपाद कल्पनेस शेष उरली. या निरुपाधिकपणाचाही जेथें अस्त झाला अशी जी स्थिति तिच्या ठिकाणीं वाचारंभणच संभवत नाहीं. कारण, तेथें स्फुरणाचाही अत्यंत अस्त झाला आहे. तिला स्थिति किंवा दशा, अथवा तत्त्व किंवा स्वरूप काय ह्मणावें हें मला सुचत नाहीं. असें जें काय अनुभवास येतें, त्याचा उन्मन या शब्दानें कसा तरी निर्देश करणें श्रुतीस भाग पडलें. कदाचित् कोणी यावर पंचमपाद अशी कल्पना आणतील तर ती भयंकर चूक घडेल. कारण जेथें स्फुरणास सुद्धां फांटा बसला तेथें कल्पना कशी स्पर्श करूं शकते ? याप्रमाणें हे परमात्म्याचे ह्म० ब्रह्माचे आणि ॐकाराचे चार पाद केवळ मायेनें केले आहेत. त्या सर्वांची अत्यंत अभिन्न रूपता दाखवूं. करितां वर दिलेला आकाशाचा दृष्टांत एकवार पुनः ध्यानांत आणला पाहिजे. ह्म० सर्वांचें एकरूपत्व स्पष्ट कळेल.

---

# परब्रह्माचें व मायेचें स्वरूपैक्य.

महाकाश ओतप्रोत व्यापकस्वरूप असतां त्यांत घर बांधल्यामुळें तीच घराची उपाधि आकाशाला होऊन त्या तेवढ्याच घरांतील अवकाशास गृहाकाश ह्मणवून घ्यावें लागलें; तसेंच घटोपाधीनें घटाकाश आणि दर्पणोपाधीनें प्रतिबिंबाकाश अशीं नांवें एकाच आकाशास आलीं व उपाधीच्या संयोगानें त्यास कार्यकर्तृत्वही आलें. घट फुटल्यानें घटाकाश महाकाशांत मिळालें. इ० आलें–गेलें हे सर्व उपसर्ग उपाधीच्याच योगानें आकाशावर आल्यासारिखे दिसले मात्र, पण वस्तुत: ते खरे नव्हत. आकाश सर्वांहून अगदीं अलिप्त आहे तसेंच राहिलें, कोणीकडे ही सर्व घटना झाली हें त्यास कळलें सुद्धां नाहीं. त्याप्रमाणें अनंतसृष्टिवासनात्मक मायेनें स्वत: आपलें रूप 'बीजरूप' कायमचें करून घेऊन अनंतसृष्टीची घडामोड चालू केली; ही सर्व यथास्थित चालण्याकरितां आनंदघन परमात्म्याचा आश्रय घेतला; आणि आपली सर्व कृति त्याच्यावर ढकलण्याचा पूर्ण प्रयत्नही केला ह्म० आपण आपले रज-सत्व-गुण झांकून तमोगुणप्रधान जडरूप धारण करून बसली. अशा प्रकारच्या स्थितीनें परमात्म्यांत पसरतां आलें तितकी पसरली. जसा तैलबिंदु अगाध समुद्रजलांत पडतांच आपले शक्त्यनुरूप पसरतो पण त्याचे प्रसारानें समुद्राचे अगाध दृष्टीनें पाहिल्यास त्याचा कांहीं लेश दूषित झाला असें सुद्धां ह्मणतां येणार नाहीं. आणि तैलबिंदूचे दृष्टीनें पाहूं गेल्यास त्याचा प्रसार जितक्या कांहीं जलभागावर झाला तितकें जल तर दूषित झालें असें ह्मणावें तरी लागेल. ( पण हें ह्मणणें तैलदृष्टि आहे तोंवरच ) तसें परमात्म्याचा जो कांहीं अंश तमोगुणप्रधान मायेनें व्यापला आणि आपण अस्तित्वांत आल्या स्थितीस सुषुप्त्यवस्था ह्मणवून त्यांत आलेल्या परमात्मभागास ( घरांत आलेल्या–गृहाकाशाप्रमाणें ) सुषुप्त्यभिमानी ईश्वर असें नांव आणिलें व आपले तमोगुणानें त्याचा आनंदगुण प्रगट केला. विरुद्ध गुणांवांचून परस्परांची व्यक्तता होत नसते असा नियम आहे; वाईट असल्यावांचून चांगला,

कडू असल्यावांचून गोड, जडावांचून चैतन्य असें द्वंद्वरूपानें प्रतीतीस येत नाहीं. दोघेही समान गुणी असल्यास एकास एक भेटतांच दोन्ही अभिन्नरूप होतात; जसें जलांत जल किंवा तेलांत तेल टाकल्यास दोहोंचा एक जीव होतो. तेंच तेल व जल एकमेकांत टाकल्यास एक जीव न होतां भिन्नरूपानें रहातात; ह्मणून दोन पदार्थांचा बोध होतो. तसें मायेच्या विरुद्धगुणानेंच ब्रह्माचे गुणाची व्यक्तता होते, अशी जरी ब्रह्माचे गुणाची व्यक्तता झाली तरी ब्रह्मावर व्यक्त होणें न होणें हा उपसर्ग येत नाहीं, व्यक्ताव्यक्तता ही सर्व उपाधिकृत आहे. उपाधि ज्या योग्यतेची असेल, व ती ज्या पदार्थाला लागली असेल, त्या पदार्थाचे गुण आपले स्वाभाविक योग्यतेप्रमाणें आपले अंगीं आणून त्या पदार्थाचें व आपलें ऐक्य आहे असें दाखविते; व तें तसें दिसतेंही. पण विचारदृष्ट्या त्याचा भेदच दृष्टीस पडतो. उदाहरण, आरसा अति निर्मल स्वच्छ असतो, तो जर अंधारांत टेविला असला तर किंचित् सुद्धां चमकत नाहीं; असला नसला सारखाच. पण तोच सूर्यासमोर धरून त्याचें प्रतिबिंब अंधारांत पाडलें तर अंधाराचा नाश होऊन तेथें बसलेल्यास हा आरसा चमकत आहे असें दृष्टीस पडेल. आतां पहा, सूर्यप्रकाश साऱ्याच पदार्थांवर सारखाच पडतो. त्याचे ठिकाणीं न्यूनाधिकतेचा लेश सुद्धां नाहीं. पण जे पदार्थ निर्मल स्वच्छ असतात ते आपले अंगचे स्वच्छ गुणानें सूर्याचें बिंब आपले अंगीं घेऊन आपलें बलानुरूप प्रकाशमान सूर्यच बनूं इच्छितात; पण स्वयंप्रकाशमान नसल्यानें सूर्यासमोर आहेत तोंवरच कायती त्यांची प्रतिष्ठा. कोणी उचलून एकीकडे केलें कीं पूर्ववत् स्वच्छचे स्वच्छच राहतात. तरी स्वतःचे निर्मलपणामुळें प्रकाश ग्रहण करून सूर्य पहाणारास न वाटो, पण दिवाभीतांस तर ते आह्मीच सूर्य आहों असें वाटविल्यावांचून मात्र सोडीत नाहींत. असे निर्मल पदार्थांनीं प्रकाश ग्रहण करून स्वतः चमकून दाखविण्याची व मलीन पदार्थांनीं आह्मी मलीन असल्यानें चमकूं शकत नाहीं, पण प्रकाशामुळें आमचें अस्तित्व दिसूं शकतें, असें दोघांनीं आपले गुणावगुणांचें द्योतन केलें ह्मणून सूर्याचे स्वयंप्रकाशपणांत या पदार्थांनीं न्यूनाधिकता येऊं शकली काय? तुह्मी निर्मल स्वच्छ आहां तर चमका;

मलीन आहां तर नका चमकूं. या गोष्टीचा उपसर्ग सूर्यास लागू शकला का ? कोण चमकतो, कोण नाहीं, हें त्याचे गांवीं सुद्धां नाहीं तो स्वयंप्रकाशमान सदैव आहे तसा आहे.

त्याप्रमाणें माया अतिनिर्मल स्वच्छ गुणवती असल्यानें तिनें ब्रह्माचा आश्रय घेऊन तमोगुणप्रधानतेनें ब्रह्मावर आनंदगुणता व सुषुप्त्यभिमानी ईश्वर नांव आरोपित केलें. रजोगुणप्रधानतेनें चैतन्यगुणता व स्वप्नाभिमानी हिरण्यगर्भ असें नांव आणिलें. पुढें सत्वगुणप्रधानतेनें ब्रह्मावर सत्-गुणता व जाग्रताभिमानी विराट् अशी नामसंज्ञा केली. हीं सर्व नांवें तीन अवस्था व त्या अवस्थेंत अनंत कोटि ब्रह्मांडांची उलथापालथ केवळ स्वपराक्रमानें ब्रह्माच्या आधारावर व आश्रयानें केली. पण ब्रह्म तिच्या आटोक्यांत व लिप्ताळ्यांत कांहीं केल्या येईना. आणि प्रकाशाच्या आश्रयावांचून अधिक कांहींच त्याच्याकडून साह्य मिळेना. हें तरी साह्य मिळतें ह्मणून माया मानते. पण तुला मी साह्य प्रकाशाश्रयानेंच करितों, ह्या इतक्या ह्मणण्याचा सुद्धां ब्रह्म संपर्क होऊं देईना. तेव्हां ती (माया) ह्या महा अचाट आणि प्रचंड परिश्रमानें शेवटीं थकली, श्रांत झाली, आणि विचार करूं लागल्यावर, माझ्याच गुणविकृतीनें हे मला परिश्रम झाले; ज्याच्या आश्रयानें मी ही सर्व घडामोड करितें तो माझ्या गुणविकृतींत येत नाहीं, अलिप्त राहतो; ह्मणून त्याचे गुण आनंदरूप आहेत. मी आपले गुण त्याच्या गुणांत मिसळल्यानें त्याच्या गुणांचा आनंद तर मिळतो, पण माझे दु:खरूपी विरुद्ध गुण त्यांत मिश्रित आहेत तोंवर तो निर्मलानंद मिळत नाहीं. करितां मीच माझ्या गुणविकृतीचा अभिमान टाकतें; कारण तो माझा अभिमान धरीत नाहीं ह्मणूनच **निजानंदरूप** आहे; बरें, त्याला तरी आपले आनंदगुणाचा अभिमान आहे का ? तर नाहीं. मग मी माझे गुणाचा अभिमान सोडून त्याचे गुणाचा अभिमान धारण केल्यास सुखरूप नाहीं का होणार? असा विचार करून आपला त्रिगुणाभिमान अगदीं सोडतांच माया केवळ **अस्मितारूप** राहिली; आणि आधाराश्रय **आनंदरूपाचा** आपले स्वरूपीं अभिमान घेतांच ह्म० **आनंदरूपाला** आपली **अस्मिता** जोडतांच काय झालें ? तर ' **आनंदरूपोऽहं** ' असा आनंद

स्फुरणेची जी स्थिति हीच **तुरीयावस्था**, व यांत स्फुरण होणारें हेंच **तुरीय ब्रह्म** व यासच चतुर्थ पाद अशी संज्ञा आहे. असो, पण मायेला जेव्हां निजानंदरूपता प्राप्त झाली तेव्हां गुणाभिमान तर राहिला दूरच, पण तिची **अस्मिता** देखील तिला सहन होईना, तीही तेथल्या तेथें जिरतांच पुढें काय झालें, याचें वाचारंभण करितां येत नाहीं. माझे प्रिय सुज्ञ वांचकांत जे कोणी अनुभवस्थितींत असतील तेच जाणतील. आणि जे विचारशील असतील त्यांस बोधाकरितां त्या स्थलाचा **उन्मन** अशा शब्दानीं श्रुतीनें कसा तरी निर्देश केला आहे. असा हा परमात्मब्रह्माच्या मायाकृत चार पादांचा भेदाभेद झाला. याप्रमाणें ॐकाराच्या चार पादांचा विचार करून वाच्य-वांचकांची अभिन्नता दाखवून पुढें चलूं.

---

## 'परब्रह्म वाच्य व ॐकार वाचक यांचा अभेद' आणि ॐकाराची उत्पत्तिसिद्धि.

जशी मायाकृतोपाधीनें अव्यक्त निर्मल परमात्म्यावर **ईश्वर**, **हिरण्यगर्भ**, **विराट** आणि तुरीय **ब्रह्म** अशा चार पादांची कल्पना आली, तशी रेषाकृतोपाधीनें **बिंदु-रेषा-अक्षररूप समात्र** ह्म० अ-उ-म-आणि त्रिभेदरहित **अमात्र** असे ॐकाराचेही चारच **पाद** झाले. वाच्य परमात्म्याचे चार पाद व वाचक ॐकाराचेही चारच पाद समान गुणवान् झाले. ह्म० ज्या मायेनें सत्व—रज—तम—तीन गुणांच्या उपाधीनें वाच्य परमात्म्याचे चार पाद केले, त्याच मायेनें बिंदु-रेषा अक्षरोपाधीनें वाचक ॐचे चार पाद केले. वाच्यवाचकता व नाम-रूप हें सर्व मायाकृत आहे ह्म० हेंच मायेचें स्वरूप आहे. बिंदु व्यक्त झाला ह्म० बिंदु-व-रेषा यांचें अभिन्नस्वरूप आहे, पहा ( ० ) बिंदूची बाह्य वर्तुलसीमा तटाप्रमाणें रेषारूप आहे. व तटरूप रेषांतर्गत भाग बिंदु आहे. यांत रेषा व बिंदु असे दोन भाग फक्त कल्पनेवांचून वेगळे दाखवितां येतील का ? तर नाहीं. अर्थात् अभिन्नरूप आहेत ( यावरूनच अति सूक्ष्म बिंदूचें उदाहरण घ्यावें )

बिंदु कागदाचे स्वच्छ भागावर वसतांच जेवढा 'बिंदु' असेल त्याप्रमाणें त्याच्या खालीं कागदाचा पांढरा भाग दबलाना ? बाकी कागद पांढरा आहे तो आहेच. आतां बिंदूखालचा भाग दबला, बाकीचा भाग मोकळा. हें 'बिंदु' दृष्टीनेंच आहे. कागदाचे दृष्टीनें दबला व मोकळा असें ह्मणतां येत नाहीं. कारण बिंदूची क्रिया कागदावर येणें बसणेंची होत आहे व त्यामुळें कागदावर, दबला व मोकळा असा आरोप येत आहे. जसा बिंदु कागदावर आला, तसा कागद बिंदूखालीं दबण्याकरितां गेला नाहीं; तो स्वस्थितींत आहे तसा आहे. फक्त बिंदूस अस्तित्वांत येण्याकरितां ह्म० व्यक्त होण्याकरितां कागदानें आधाराश्रय दिला. त्यामुळें त्यास, बिंदुखालीं दबला, असा आरोप घेणें भाग आलें. पण हा आरोप आणला असें बिंदुदृष्टीसच वाटत आहे. आधारदृष्टीनें पाहिल्यास कांहीं संपर्क तरी आहे का ? मुळींच नाहीं.

रेषा आपले आधारावर वर्तुल झाल्यावांचून बिंदु हें नांव आणि वर्तुल हें रूप अशीं दोन्ही व्यक्त होत नाहींत. अर्थात् रेषेचें व्यक्त होणें म्हणजेच बिंदूचें व्यक्त होणें झालें. बिंदूच रेषा व रेषाच बिंदु, कशी परस्पर सांगड पडली ? आणि आधाराश्रय कागद अलिप्तचा अलिप्त, अगदीं कसा मोकळा आहे ध्यानांत आलेंना ? असो, ज्या अव्यक्त परमात्म्यावर रेषारूप मायेनें बिंदुत्व आणलें ती का सामान्य असणार ? शक्तिरूपच ती. तिनें आपले आधारात्म्यावर यथेष्ट संचार केला ह्म० वर्तुलचक्र अशा गतीनें स्वशक्त्यनुरूप फिरली. परंतु आधाराची सीमा कोणीकडूनच सांपडेना, जितकें हिनें पसरावें त्याच्या पुढें तो अनंत आहेच. तेव्हां कुंठित होऊन व्यापिलेल्या भागांतच घडामोड सुरू केली. रेषारूप मायेनें आधाराची सीमा शोधण्याकरितां चहूंकडे जो संचार करून पुनः निघाल्या ठिकाणीं आली. त्या बाह्यसीमेच्या आंत जें आधार भूमीक्षेत्र आलें, त्या क्षेत्राची आकृतीच ॐकाराचें स्वरूप झालें.* जसें भूमीवर पीठ सांडलें असतें त्यावर एखादा किडा फिरला ह्म० क्वचित् अक्षराकृ-

* ॐकाराची उत्पत्तिसिद्धि कशी झाली ती पहा.

तीही निघते. त्यास घुणाक्षर असें ह्मणतात. अथवा धुराचा लोट शांत आकाशांत चढत असतां आपोआप जशा कांहीं आकृति बनतात, तशाच मेघांचे ढगांच्याही चित्रविचित्र मनुष्य–पशु–पक्ष्यांसारख्या आकृति होतात. किंवा चांदीचे स्वच्छ घंगाळांत पाणी भरून रंगाचा कंकर त्यांत टाकतांच आधीं वरपासून तळापर्यंत कंकराचे गतीनें रंगाची सुधी रेषा बनते. मग तो हळू हळू वितळूं लागला ह्म० प्रेक्षणीय मजा दिसते; ती करून पाहिल्यास कळेल. तऱ्हेतऱ्हेचे रंगाचे दोरे व कांहीं ढग असे निघून वर चढतात, तो रंग पाण्यांत कसा व्यापत जातो हें मायेच्या व्याप्तीचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. तो अल्प कंकर जर सरोवरांत टाकला तर शक्त्यनुरूप पसरतो, शेवटीं शक्ति क्षीण झाली ह्म० कोणीकडे नाहींसा होतो त्याचा पत्ता सुद्धां लागत नाहीं. असो, याप्रमाणें परमात्म्यांत मायेची व्याप्ति ॐकाररूप झाली ह्मणून जसा परमात्मा स्वयंसिद्ध आहे, तसा ॐही स्वयंसिद्ध परमात्मरूपच आहे. मायेच्या ढगाचें उत्थान प्रथम वर्तुल झालें. तें वर्तुल जोंवर स्थिर होतें, स्थिर ह्म० जड होतें तो जडांशच मायेचा तमोगुण व सुषुप्ति, व त्यांत व्यापलेलें जल अथवा आकाश तोच आनंदगुणी **बिंदुरूप ईश्वर ' म '** कार संज्ञक झाला. मकारही बिंदुरूपच ह्म० अनुस्वाररूप आहे ह्म० सर्व अक्षरांच्या डोक्यावर बसतो. सुषुप्त्यवस्थेचें स्थान हृदय असल्यानें व ईश्वर सुषुप्त्यभिमानी असल्यानें त्यास शिव अशीही संज्ञा आहे. आणि योगी ज्या हृत्कमलांत त्याचें ध्यान धरून लयचिंतन करतात त्या स्थानास **गोल्हाट** असें ह्मणतात; पुढें मायेचा लोट गतीनें वक्र अर्धचंद्रकार रेषा झाला. गति ह्म० चांचल्य, हें चांचल्य ह्मणजेच मायेचा रजोगुण, रजोगुण हीच स्वप्नावस्था, या रजोगुणव्याप्तींत आलेला परमात्मभाग चैतन्यगुणी **हिरण्यगर्भ** 'उ' कार संज्ञक आहे. स्वप्नावस्थेचें स्थान **कंठदेश** असल्यानें त्या स्थानास **श्रीहाट** अशी संज्ञा असून तेथें योगी स्वप्नाभिमानी हिरण्यगर्भाचें **विष्णु** अशा रूपानें ध्यान करतात. मायेला जेव्हां गति उत्पन्न झाली; मग काय पुसतां, गतीचा धर्मच धावन करण्याचा आहे. मायेनें पूर्वीं आटविल्या प्रदेशापेक्षां नंतर बरेंच दूर धांवली पण उपयोग कांहीं झाला नाहीं, ह्म० परमात्मसी-

मा सांपडली नाहीं, तेव्हां परतली. या परतण्यांत व फिरण्यांत जास्त भाग आपल्यांत घेतला इतक्यानें तृप्त होतांच सत्वगुणप्रधान जाग्रदवस्था झाली. त्या अवस्थेचा अभिमानी **विराट्**, **अकार** संज्ञक झाला. जाग्रदवस्थेचें **नेत्रस्थान** असल्यानें त्यास **त्रिकूट** अशी संज्ञा देऊन योगी अकाररूप विराटास **ब्रह्मदेव** अशी संज्ञा देऊन भृकुटिस्थानीं त्याचें चिंतन करतात. (या प्रणवउपासनेचा प्रकार साधनप्रकरणांत विस्तारपूर्वक सांगेन ) याप्रमाणें रेषारूप मायेनें **अ–उ–म**–शब्द व अक्षर असा उच्चरित व लिखितरूप ॐकाराचे तीन पादांची कल्पना, परमात्म्यावर संचाररूपानें कशी केली व तिची गति खंडित न होतां निघाल्या ठिकाणीं पुनः पोहोंचेपर्यंत रेषेचे आंत आलेलें क्षेत्र ॐकाररूप कसें झालें, याची आकृति खालीं दिली आहे ती पाहिल्यावर समजेल.


असा जो त्रिपाद ॐ यास समात्र ॐ असें ह्मणतात. याच तीन मात्रा तीन अवस्था व मायेचे सत्व–रज–तम व परमात्म्याचे सत्–चित्–आनंद असे सहा गुणवान जड चैतन्यात्मक सृष्टिरूप झाल्या. त्रिगुणरहित माया केवळ अस्मितारूप जशी इकडे झाली तशी तिकडे बिंदुरेषा अक्षररूप विकृति टाकून अनुच्चारित व अलिखित असा केवळ कल्पनारूप ॐ झाली. यासच **अमातृ** ॐ ह्मणतात; हा ॐकाराचा चतुर्थ पाद तुरीय झाला. हीच तुरीयावस्था. या अवस्थेंत मायेची केवळ **अस्मिता** हीच अमातृ ॐ रूप आहे. येथें तुरीय **ब्रह्म**, तुरीय ॐ रूपच आहे. पुढें मायेची अस्मिता जिरतांच ब्रह्म अथवा ॐ याचें भानच गेलें. असें जें अनुभवगम्य स्थल त्याचा दर्शक **उन्मन** हा सांकेतिक शब्द आहे. प्रिय सुज्ञ वाचकहो, वाच्यवाचकांचा कसा अभेद अभिन्नरूप आहे ध्यानांत आलेंना ? ह्म० वाच्य–वाचक हे केवळ शब्द मात्र भिन्न आहेत, वस्तुःस्थिति एकरूपच आहे.

याप्रमाणें परमात्म्याच्या व ॐकाराच्या स्वरूपाच्या चार पादांचें वर्णन माझे अल्प बुद्धीस करितां आलें तसें केलें; न्यूनता असेल ती सुज्ञांनीं पूर्ण करून घ्यावी. हीं जी ॐकाराची आकृति काढली

आहे तिच्यावरील बिंदूच्या शिरोभागापासून उजवीकडे अथवा डावीकडे रेषेवरून लेखणी न उचलतां फिरविल्यास ती प्रदक्षिणा करून मूळ ठिकाणीं येईल.

नंबर १.

ॐकार



९३७८ २५८५९

'ॐश्रीशक्त्यात्मने नमः'

# प्रकरण दुसरें.

# 'मायानंद प्रदेश.'

## मायेचें स्वरूप.

अव्यक्तनाम्नी परमेशशक्ति, रनाद्यविद्या त्रिगुणात्मिकापरा ॥
कार्यानुमेया सुधियैव 'माया', यायाजगत्सर्वमिदं प्रसूयते ॥ १ ॥
सन्नाप्यसन्नाप्युभयात्मिका नो ! भिन्नाप्यभिन्नाप्युभयात्मिका नो ! ॥
संगाप्यसंगाह्युभायात्मिका नो ! महद्भुता 'ऽनिर्वचनीयरूपा' ! ! ॥ २ ॥

"श्रीशंकराचार्यभगवत्पूज्यपादाः"

गेल्या प्रकरणीं ब्रह्माचें व ॐकाराचें स्वरूप वर्णन झालें. आतां ज्या मायेनें आपण उपाधिरूप होऊन व्यापक परमात्म्यावर चार पादांची कल्पना करून ब्रह्म आणि ॐ अशीं नांवें आणिलीं त्या मायेचें स्वरूप यथामति वर्णन करितों.

माया हें नांव तरी जिचें तिनेंच ठेवून घेतलें आहे. कारण जेथें वाचारंभणास सोय नव्हती तेथें हिनें आपल्या शक्त्यनुरूप नामकल्पना ह्म० परमात्मा, ब्रह्म इ० उत्पन्न करून ह्या अनिर्वचनीय वस्तूस उपाधींत आणून सोडिलें; तिचें नांव दुसरा कोण ठेवणार ? ह्मणून तिनेंच आपलें नांव **माया** असें ठेवून घेतलें. ह्म० ती स्वतः वाच्य होऊन माया हें आपलें वाचक नाम करून घेतलें. वाच्यवाचकाचा सदैव अभेद असतो आणि नामानुरूप गुण असले तरच नांव शोभतें इत्यादि अव्यक्तबोध प्रकरणीं सांगून चुकलों आहें. मायेनें जें आपलें नांव माया ठेवून घेतलें त्यांत तिचें स्वरूप व गुण, पूर्ण द्योतीत होत आहेत. मोठें खुबीदार नांव ठेवून घेतलें आहे. ह्म० ब्रह्माहून माझें स्वरूप, माझे गुण आणि माझी

कृति, अगदीं विरुद्ध आहे, असा आपले नांवानेंच ती बोध करीत आहे. ह्म० माझ्या, माया या नांवाच्या सरल प्रवाहांत वाहत जाल तोंवर तुह्मांस माझें यथार्थ स्वरूप कधींच समजणार नाहीं, आणि नामप्रवाहांतून जरा उगीच विचारदृष्टीनें तेथल्या तेथेंच उलटला कीं माझें खरें स्वरूप कळलेंच. तें कोणतें तर 'या' ( जी ) 'मा' ( मिथ्या ) ह्म० जी मिथ्या ती माया. जिनें जगन्नाटकारंभींच आपलें यथार्थ स्वरूप न झांकतां जी अगदीं उघड बोध करीत आहे कीं ' मी खोटी, मी खोटी ' माझे कृतीस भुलूं नका नका, तरी आह्मीं तिचा बोध न घेतां उलट त्या जगन्मातेसच दूषणें देतों. हा किती वेडपणा आहे वरें ? हें अव्यक्तबोधांत नटी व जीवनरावाच्या संवादांत वाचकांस कळलेंच असेल. असो. आतां असा विचार करा कीं या मायेस खरी ह्म० **सत्** ह्मणावी तर सत् वस्तूचा कधीं त्रिकालांत अभाव होत नसतो. एका कालांत आहे व दुसरे कालांत नाहीं अशी वस्तु सत् असूं शकत नाहीं. माया ( अज्ञान ) भ्रमकालांत असते व भ्रमनिवृत्तीनें तीचा नाश ह्म० बाध होतो. जसें आपण दुरून एकाद्या अनोळखी मनुष्यास पाहून त्यास ओळखीचा समजून हांक मारतों, पण तो जवळ आल्यावर आपली चूक झाली असें वाटतें व त्यास ह्मणतों कीं माफ करा, आपल्यास पाहून मला अमक्याचा भ्रम झाला. यांत काय झालें, कीं पूर्वीं जें खरें वाटलें होतें तें यथार्थ बोध होतांच खोटें ठरलें. अर्थात् जें एक वेळ खरें, दुसरे वेळ खोटें, तें सत् होऊं शकणार नाहीं. मिथ्याच ह्मटलें पाहिजे. माया भ्रमकालांत खरी वाटते व भ्रमनिवृत्तीनंतर खोटी ठरते; तर हिला खोटीच ह्मटलें पाहिजे. ह्म० हिचें स्वरूप मिथ्या आहे. ह्म० **असत्** झालीना ? बरें. आतां तिला असत् ह्मणावें तर, ज्याप्रमाणें सत् वस्तूचा कधींच अभाव नसतो त्याप्रमाणें असत् वस्तूस कधीं भाव ह्म० अस्तित्व नसतें. कारण सत् वस्तूच्या अगदीं विरुद्ध असत् वस्तु आहे. जसें सत् भावरूप आहे तसें असत् अभावरूप आहे. जें अभावरूपच आहे तें त्रिकालांत कधींही अस्तित्वांत येत नाहीं. असा नियम आहे व अनुभवही आहे. घोड्याचें शिंग, वंध्येचा मुलगा, कधीं कोणास आढळला का ? ज्याला शृंग तो घोडा

नाहीं व जिला मुलगा झाला ती वांझ नाहीं. अर्थात् अभावरूप ह्म० असत् वस्तूचा कधीं अनुभव नसतो हें खास ठरलें. पण मायेचा अनुभव होतो ह्म० सुखदुःख वाटतें; जगानुभव होतो; जगांतील वस्तु जरीं नाशिवंत आहेत तरी त्यांचा कांहीं काल उपभोग मिळतोच; सांनिध्य राहतें; इ० गोष्टींचा अनुभव होणें ह्मणजेच मायेचा अनुभव आहे. अल्पकाल कां होईना ! पण ज्या वस्तूचा अनुभव होतो ती वस्तु अभावरूप नसते. वंध्यापुत्र, अश्वशृंग, अभावरूप आहेत ह्मणून त्यांचा अनुभव होत नाहीं. माया अभावरूप असती तर तिचा अनुभव न होता. अनुभव होतो त्याअर्थीं मायेस अभावरूप ह्म० असत्‌ही ह्मणतां येत नाहीं. सारांश, मायेचा अनुभव होतो ह्मणून तिला असत् ह्मणतां येत नाहीं, व नाश होतो ह्मणून सत्‌ही ह्मणतां येत नाहीं. अशा ह्या विलक्षण मायेस ह्मणावें तरी काय ! दोन्हीकडून अडचणच; कांहींच ह्मणतां येईना. ह्मणून श्रुतीनें मायेला सत्-असताहून विलक्षण अशी मिथ्या ह्मणजे **अनिर्वचनीयरूप** ठरविली आहे.

या अनिर्वचनीय मायेची प्रतीति भ्रमकाल ह्म० अज्ञानकालापर्यंत असते. भ्रम निवृत्त झाला कीं मायेची निवृत्ति झाली. भ्रम अथवा अज्ञान हेंच मायेचें अनिर्वचनीय स्वरूप आहे. भ्रमास सत् ह्मणावें, तर वस्तूचा यथार्थ बोध झाला कीं भ्रम जातो. ह्मणून त्यास असत् ह्मणावें तर भ्रमाची प्रतीति होते. ह्म० सत्-असताहून विलक्षणरूप **भ्रम** आहे ह्मणून भ्रम--अज्ञान हीच माया आहे. वस्तूचा जोंपर्यंत यथार्थ बोध होत नाहीं तोंपर्यंत ही काय वस्तु आहे हें कळत नाहीं. हें न कळल्यानें समजणारास त्या वस्तूचें अज्ञान राहतें; पण वस्तूच्या स्वरूपांत कांहीं फरक पडत नाहीं. जसें, न सांगतां साखरेची गोळी करून कोणाचे हातावर, पहा तर काय आहे हें ! ह्मणून दिली, व तो हें काय जाणें काय असेल, अशा भ्रांतीनें खात नाहीं; या त्याच्या न खाण्यानें त्यास गोडी कळली नाहीं ह्मणून त्या गोळीच्या गोडींत कांहीं फरक आला कीं काय ! ती स्वयं गोड आहे तशी आहेच. तसें ब्रह्माविषयींचें जें अज्ञान तीच माया, आणि जोंपर्यंत त्या अज्ञानाचें अस्तित्व तोंपर्यंत मायेचें

अस्तित्व; अज्ञाननिवृत्ति हाच मायेचा अंत. असा जरी व्यवहार आहे तरी ब्रह्माचे स्वस्वरूपांत अंतर थोडेंच आहे ? जेथें हा भ्रम असेल तेथें अज्ञान.

ब्रह्म स्वयंबोधरूप असल्यानें तेथें अज्ञान मुळींच संभवत नाहीं. मग माया ब्रह्माचे ठिकाणीं आहे हें तरी कसें ह्मणावें ? न ह्मणावें तर ब्रह्म व्यापकस्वरूप असतां प्रतीति होत नाहीं, अर्थात् ब्रह्माश्रित ह्मणावी लागते. पण असेंही ह्मणण्यांत चूक होते; कारण ब्रह्मप्रतीति होत नाहीं कोणाला? पहाणाराला. पहाणारानें न पाहिलें ह्मणून तें का लुप्त होतें ! तें आहे तसेंच आहे. सूर्य आपण न पाहिला ह्मणून लुप्त होतो का ? नाहीं. अर्थात् पहाणाराचे आश्रितच अज्ञान ह्मणणें भाग येतें. अज्ञान ह्मणजेच भ्रम; आणि अज्ञान, भ्रम, हींच **माया**. आतां माया कोणाचे आश्रित व कोठें आहे हें समजणें मी वाचकांवरच सोंपवितों. भ्रम कां होतो, कशानें होतो, त्यास काय कारण होतें, इ० पुढें जीवकर्तव्यप्रकरणांत सांगेन.

जशी माया सदसद्रूप आहे, तसेंच तिचें स्वरूपही व्यक्ताव्यक्त आहे. भ्रमकालांत मायेची प्रतीति होणें हें मायेचें व्यक्तस्वरूप आहे. भ्रम निवृत्त झाला ह्म० माया अव्यक्तरूप होते. भ्रमकालांत ह्म० अज्ञानकालांत जें जें कांहीं ईश्वर–जीव–जगत्–इ० प्रतीत होतें तें सर्व मायेचेंच व्यक्तरूप होय. कारण 'ब्रह्म तर मुळींच निःसंग-निर्विकार आहे' त्यावर नामरूपात्मक सृष्टिविकाराचा स्पर्शच होत नाहीं. केवळ स्वयं व्यापक गुणामुळें मायाकृतोपाधींत आल्यासारखें वाटतें. व मायेला आपल्यांत ब्रह्म आल्यासारखें वाटतें. इतकाच आश्रय व आधार शेवटीं पुष्कळ वाटून तिनें इतक्यांतच आपली अवाढव्य रचना अशी दुस्तर व दुर्धर केली कीं, जिच्यामुळें जीवांची त्रेधा होत आहे. आणि खरोखरच जर ब्रह्म हिच्या आवरणांत आलें असतें तर जीवांस मोक्षाशेचा संभवच नव्हता. कारण अज्ञाननिवृत्ति ह्मणजे मोक्षप्राप्ति. 'अज्ञान' हीच माया. 'मायेची अपेक्षिक व्यापकता व ब्रह्माची निरपेक्षिक व्यापकता आहे.' हें अ० बो० सिद्ध केलें आहे.* अपेक्षिक व्यापकतेचे सीमेपुढें निरपेक्षिक व्या-

* अ० बो० पहिलें पुरुष प्रकरण पान ११ वें पहा.

पकतेचा भाग अनंत आहे. हा भाग तरी अपेक्षिक व्यापकतेनें केला आहे. वस्तुतः निरपेक्षिक व्यापकता अपेक्षिक व्यापकतेंत नाहीं असें नाहीं. ती तर ओतप्रोत आहे तशी आहेच. असें पहा कीं, हा भूगोल मृन्मय आहे. मनुष्य वस्तीसही पृथ्वीचा आधार आहे. व समुद्रासही पृथ्वीचा आधार आहे. यांत पृथ्वीची निरपेक्षिक व्यापकता आहे. कारण समुद्रास व लोकवस्तीस दोघांसही भूमीचा आश्रय आहे. समुद्राची अपेक्षिक व्यापकता आहे. ह्म० जितका भूपृष्ठभाग समुद्रांत असला तितक्यांतच समुद्र आहे, पुढें नाहीं. आतां भूमीवर राहणारा प्राणी कांहीं कारणामुळें समुद्रांत गेला किंवा पडला तर जोंवर त्याची इच्छा आहे किंवा शक्ति आहे तोंवर तो समुद्रांत वांचेल, व परत भूमीवर येण्याचा मार्ग सांपडल्यास माघारा भूमीवर येईल. न सांपडला तर मेलाना ? बरें कदाचित् समुद्रानें उसळून सर्व भूगोल व्यापला तर मग समुद्रांतून परत भूमीवर येणारे व भूमीवर आनंदांत बसणारे साऱ्यांचीच पूर्णाहुति झालीना ? पण असें न होण्याची ईश्वरानें मर्यादा बांधली आहे, ह्मणूनच भूमीवरील जीव सुखी आहेत. व बुडणारेही मार्ग सांपडल्यास भूमीवर येऊन सुखी होतात. आतां अशा मोठ्या भूगोलाची कल्पना करा, कीं ज्यास व्यापावयास समुद्र उसळला पण भूमीवर सडा शिंपतांच ठिकच्या ठिकाणीं वाळतो त्याप्रमाणें समुद्राचा शिंपडा होऊन समुद्र कोरडा झाला. असा तो भूगोल केवढा असला पाहिजे ? व त्यावर हल्लींचे समुद्राचा परिणाम कितीसा होईल ? व त्यावर रहाणारे जीवांस शिंपड्याप्रमाणें समुद्राचा किती उपद्रव वाटेल ? ह्म० कांहींच नाहीं. अंगावर शिंतोडे पडल्याचा भास मात्र होईल. असो.

हा सर्व दृष्टांत बरोबर ध्यानांत आलाना ? आतां मूळ मुद्याशीं मेळ घालतों. मायारूपी समुद्र अतर्क्य मोठ्या आत्मभूगोलावर केवळ अल्प सरोवराप्रमाणें आहे. पण हा जीव त्या एकंदरीच्या मानाला अति सूक्ष्म परमाणूहूनही लहान असल्यानें त्यास हा भवसागररूप होऊन ह्म० भासून बुडवून राहिला आहे. त्यांतून निघून आत्मभूमिकेवर आल्यास सुखी होईल; कारण तथें समुद्ररूपी मायेच्या अपेक्षिक व्यापकतेला तो आत्मभूप्रदेश व्यापतां बनत नाहीं,

व्यापावयास गेली तर स्वतःच शुष्क ह्म० नाहींशी होते. ह्मणून सच्चिदानंदात्मभूप्रदेशीं रहाणारे सुखी असतात. व हा जीव मूळचा त्याच ठिकाणचा राहणारा असून स्वतःचें अज्ञानानेंच मायारूपी भवसमुद्रांत आलेला श्रुतिगुरुमार्गानें पुनः परत निजभूमिकेवर जाऊन सुखी होऊं शकतो. आणि देहप्रारब्धानुरूप आलेले मायातरंग त्यास तुषारवत् भासतात. असा तो निजानंदज्ञानमय प्रदेश असल्यानें त्यावर मायेची शक्ति चालूं शकत नाहीं. व तेथल्यास माया भासत सुद्धां नाहीं व कांहीं भासलेंच तर सर्व ब्रह्ममय भासतें. हें जें ब्रह्ममय भासणें हेंच मायेचें अव्यक्त स्वरूप होय. ह्म० माया हें भानच न होतां जें आहे तें सर्व ब्रह्मच. येथें द्वैत कल्पनेचा सदैव लोपच झाला. आणि ब्रह्मानुभवाभाव ह्म० केवळ 'जगद्भासरूपज्ञान' हेंच अज्ञान भ्रांतिरूप मायेचें व्यक्त स्वरूप. ज्ञानदशेंत माया भासत नाहीं. ह्मणून 'अव्यक्तरूप' व अज्ञानकालांत माया प्रत्यक्ष भासते ह्मणून 'व्यक्तरूप.' अशी ही व्यक्ताव्यक्तरूप माया आहे. ह्मणूनच हिला सदसताहून **अनिर्वचनीयरूप** ह्मटली आहे. याप्रमाणें हा मायेच्या स्वरूपाचा विचार झाला.

---

## मायेचें निर्गुण नाम.

आतां मायेच्या नामाचा विचार करूं. कारण जिचें स्वरूप असें विलक्षण अद्भुत आहे, तिचें नामही तसेंच असलें पाहिजे. जसें **परब्रह्म** परमात्म्याचें निर्गुणनाम ॐ हें आहे व सगुण नामें **ईश्वर-हिरण्यगर्भ-विराट्** हीं आहेत, त्याप्रमाणेंच मायेचें निर्गुणनाम **माया** हें आहे व सगुणनाम, व्यापक अर्थाचें बोधक असें **श्री** आहे. आतां प्रथम निर्गुणनामाचा विचार करून मग सगुणाचा करूं. **माया** या शब्दाचा विग्रह केल्यास ह्म० समासानुरूप अर्थ पाहूं गेल्यास **या—मा—सा—माया.** या—ह्म० जी—मा—ह्म० खोटी ती माया, किंवा '**मा**' ह्म० खोटी '**या**' ह्म० जी ती माया, असा दोन्ही तऱ्हांनीं अर्थ केला तरी 'जी' खोटी किंवा खोटी—'जी' ती, असाच अर्थ

निघतो. यांत ' जी ' हें दर्शक सर्वनाम असून खोटी हें विशेषण आहे. व पुढें ' ती ' हेंही दर्शक सर्वनामच येतें, पण ' ती ' या शब्दानें ध्यावयाची कोण ? जसें चापपाणी राम. चाप ह्म० धनुष्य पाणौ हस्ताचे ठायीं ज्याच्या, तो राम, यांत चापपाणी या विशेषणापुढें राम हा शब्द असल्यानें दाशरथी रामाचा बोध झाला. नुसत्या चापपाणी शब्दानें सामान्य धनुर्धराचा बोध होईल. रामाचा होणार नाहीं; अर्थात विशेषणानें विशेष्य कोण आहे तो दाखविला पाहिजे ' चापपाणी जो तो ' चापपाणी अशा ह्मणण्यानें खास व्यक्तिबोध होत नाहीं. तसें माया या शब्दांत खास उद्दिष्ट व्यक्तीचा प्रत्यक्ष बोध होत नाहीं. जी खोटी ती ' अमुक ' असा वेगळा शब्द पाहिजे होता. माया हाच शब्द पुन: आल्यानें घोंटाळाच होतो ह्म० ' जी–खोटी–ती खोटी जी ' असा चमत्कारिकच प्रकार दृष्टीस पडतो; तात्पर्य काय, माया या शब्दाचे विग्रहानें 'जी–खोटी' ' ती ' ह्म० उद्दिष्ट व्यक्ति इतर व्यक्तींप्रमाणें पृथक् दिसत नाहीं, पृथक् अस्तित्वांत असती तर कांहीं तरी वेगळें नांव ठेवितां येतें. बरें, अस्तित्वांत नाहीं ह्मणावें तर प्रतीत होते. ह्मणून, अस्तित्वांत असणारी व नसणारी, प्रतीत होणारी व न होणारी, खरी दिसणारी व खोटी वाटणारी, अशी जी **विभूति** व जिचे गुण **अनिर्वचनीय** त्या गुणांचें द्योतक नांव केवळ मिथ्यार्थबोधक सांकेतिक **माया** हें आहे. उद्दिष्ट व्यक्ति केवळ लक्षार्थानें ध्यानांत आणिली पाहिजे. कारण अज्ञानकालांत ती प्रत्यक्षानुभवांत येत नाहीं. व ज्ञानदशेंत आलीच तर तिचें तें मिथ्यारूपत्व रहात नाहीं; अर्थात् अज्ञानदशेंत व ज्ञानदशेंत केव्हांही जी स्वस्वरूपानें अनुभवांत येत नाहीं, तेव्हां ती अमूर्तच असली पाहिजे. हिचें जें अमूर्तत्व तेंच निर्गुणत्व समजलें पाहिजे. व तें केवळ कल्पनेनेंच ग्रहण होणारें आहे. प्रत्यक्षानुभव होणार नाहीं, ह्मणूनच तिला **माया** अशी नामसंज्ञा आली.

येथें मार्मिक वाचक ह्मणतील कीं, लेखक बरीच थाप देऊन पुढें चालले. भ्रांति–अज्ञान–जग इ० हीं सर्व मायेचींच रूपें आहेत. असें वर सांगितलेलें विसरलां काय ? जगाचा, अज्ञानाचा, व भ्रमाचा आह्मास अनुभव होत नाहीं कीं काय ? हा अनुभव होणें ह्मणजेच

मायेचा अनुभव आहे. असें असतां मायेच्या स्वरूपाचा अनुभव नाहीं असें ह्मणणें असंबद्ध प्रलाप नाहीं का ? त्यांस माझें सविनय उत्तर आहे कीं जर आपण मार्मिक आहां तर माझे उत्तराचा फार मार्मिक रीतीनें विचार कराल तरच लक्षांत येईल.

## भ्रांतीचें स्वरूप.

जग, भ्रांति, व अज्ञान, यांचा अनुभव होतो हें आपलें ह्मणणें मी ग्रहण करितों. पण आपल्यास ज्या क्षणांत भ्रांति अथवा अज्ञान वाटतें, त्याच क्षणांत ही मला भ्रांति होत आहे असें वाटतें, कीं उत्तरक्षणांत मला अशी भ्रांति झाली होती असें वाटतें ? जर भ्रांति होत आहे असा अनुभव सांगत असलां तर ज्या क्षणांत भ्रांति चालू आहे त्याच क्षणांत ही भ्रांति आहे असें वाटल्यास भ्रांति होणेंच शक्य नाहीं. स्मृतीला, विस्मृतीच पडली पाहिजे, तरच भ्रांति सिद्ध होईल. मला अमक्याला पाहून अमक्याची भ्रांति होत आहे, असें ह्मटलें तर चूक होईल. कारण येथें अमक्यासारखा अमुक आहे असा ह्या ह्मणण्याचा अर्थ होतो, ही भ्रांति नव्हे. हें **सादृश्यज्ञान** आहे. बरें, जर भ्रांति झाली होती, असा अनुभव सांगाल तर, हा अनुभव भ्रांतिनिवृत्तिकालाचा आहे. ह्मणून हा **स्मृतिरूप** झाला. **प्रत्यक्ष** अनुभवरूप राहिला नाहीं. जसें तोंडांत खडीसाखर पडतांच ती घुळेपर्यंत गोडीचा अनुभव चालू आहे व ती संपल्यावर गोडीची स्मृति आहे. तसें 'ही पहा भ्रांति चालू आहे ! व ही आतां जात आहे' असा प्रत्यक्ष अनुभव होतो काय ? तर नाहींच ह्मणावें लागेल. त्यावांचून भ्रांतीचें स्वरूपच सिद्ध होणार नाहीं. आतां ह्या क्षणिक भ्रांतीच्या त्रैराशिकानें, अनंत सृष्टिरूप भ्रांतीला किती काल लागेल ? तिच्या निवृत्तींत किती काल लागला पाहिजे ? व निवृत्त होण्यापूर्वी त्या भ्रांतीचे अस्तित्वांत जो काल लोटेल तो किती असला पाहिजे ? याचें हिशेबानें उत्तर तर काढून पहा ! 'अनंत काल' हेंच उत्तर येईल. या उत्तरावरून पुनः उलट हिशेब करा कीं, ज्या प्रचंड

भ्रांतीला इतका काल लागतो त्या कालमानानें हें जरी आपलें पूर्ण आयुष्य शंभर वर्षांचें धरलें तरी त्या कालमानाच्या एका क्षणाचा लक्षांश तरी पडेल कीं नाहीं ही भ्रांतीच आहे. अशी जरी खरी स्थिति आहे तरी, आह्मीं आमचें आयुष्य किती जरी अल्प असलें तरी तें कळत नाहीं ह्मणून निराशेनें निदान शंभर वर्षें तरी वांचूं असें समजून निष्काळजीनें जगद्व्यापारांत गुंग आहोंत, व अगदीं चूर आहोंत. त्यांतूनही कांहीं सुज्ञ विचारशील पुरुष या जगद्वैचित्र्याचे विचारांत व सत्यशोधांत आहेत ह्मणून त्यांसच जग, अज्ञान व भ्रांति हें कांहीं तरी आहे, इतकें तरी वाटत आहे. आणि या जिज्ञासेनें त्यांस सत्यात्मरूपाचा थांग लागेपर्यंत सारा भ्रांतिकालच आहे. व त्या भ्रांतिकालांत जो जो अनुभव होत आहे तो सर्व भ्रांतिरूपच आहे. त्याला प्रत्यक्ष अनुभव ह्मणतां येत नाहीं. असें मी ह्मणण्याचें धाडस करितों. उदाहरणार्थ, आपण व्यवहारांत जी गोष्ट आपले डोळ्यांनीं पहातों ती प्रत्यक्ष असें ह्मणतोंना? आतां ज्या डोळ्यांनीं तुह्मीं जग पहातां, ज्या शरीरानें विषयानुभव घेतां ही सर्व पांचभौतिकाची रचना आहे, व जगही सर्व पांचभौतिकाचेंच बनलेलें आहे. देहेंद्रियें व जग हें एकाच जातीचें झाल्यानें किंबहुना जगाचेच हे अंश असल्यानें आपसाचे स्वरूपांत भिन्नता येत नाहीं. अर्थात् एकजीव झाले. अशा स्थितींत जगानुभव आह्मीं करतों हें ह्मणणें आपले डोळ्यानें आपला डोळा दिसतो असें ह्मणण्यासारखें झालेंना? यासच ह्मणतांना जगानुभव? हाचना आपला जगद्रष्टेपणा? हा नव्हे हो! वस्तूचा द्रष्टा वस्तूहून पृथक् असतो. वस्तूला वस्तु पहात नाहीं. जगाचा द्रष्टा जगाहून पृथक् असतो. जग ह्म० असत् त्याचा द्रष्टा ह्म० सत्-रूप आत्मा आहे. त्याची जोंपर्यंत अनुभूति नाहीं तोंपर्यंत जगद्रष्टेपणा येऊंच शकत नाहीं या अनुभूतीवांचून आह्मीं जगद्रष्टे ह्मणण्याची किंमत तीच आहे कीं जी जगाची आहे. जसा एखाद्या सूपकारानें (आचाऱ्यानें) श्रीमानाच्या मेजवानीचा सुंदर स्वयंपाक करून, वाढतांना मी यांचा अन्नदाता आहें असा अहंकार बाळगणें हें वेडपण नव्हे का? तसेंच ह्या क्षुद्र जीवानें जगद्रष्टेपणाचा अहंकार बाळगणें केवळ अज्ञान हो-

य. खऱ्यास खोटें व खोट्यास खरें मानणें हीच भ्रांति व हेंच अज्ञान; ह्याच दोघांचें स्वरूप जग हें आहे. भ्रांति गेल्यावर जसें भ्रांतीचें यथार्थ स्वरूप कळतें, तसें तें भ्रांतिकाळांत कळत नाहीं. ह्मणून भ्रांतीला प्रत्यक्ष ज्ञान ह्मणतां येणार नाहीं. निद्रेंत स्वप्नानुभव सर्वांला होतो, पण हें स्वप्न आहे असा बोध जागें झाल्यावर होतो. स्वप्न पहात असतां स्वप्नाचा बोध होईल तर ती स्वप्नावस्थाच ह्मणविणार नाहीं. क्वचित् प्रसंगीं स्वप्नांत असेंही वाटतें कीं मी हें स्वप्न पहात आहें; पण ह्या वाटण्याची तरी योग्यता स्वप्नाप्रमाणेंच. त्याला जास्त किंमत जागृतीची देतां येत नाहीं. अर्थात् ज्याप्रमाणें खरा जागा झाल्यावांचून स्वप्नाचें यथार्थ ज्ञान झालें असें ह्मणतां येत नाहीं. ह्म० पाहिलेलें स्वप्न होतें असें प्रत्यक्ष अनुभवज्ञान सांगतां येत नाहीं; त्याप्रमाणें अज्ञानरूप निद्रेंत जगद्व्यापाररूप स्वप्न चालू आहे, त्यांतल्या त्यांतच हें जग आहे व मी पहात आहें असें वाटणें हेंही त्या स्वप्नाचेच योग्यतेचें आहे. अज्ञाननिद्रा जाऊन सच्चिदानंदात्मानुभवजागृति जेव्हां कधीं **श्रुतिगुरुकृपेनें** येईल तेव्हां जगद्रष्टेपण समजेल; व जगाचा, अज्ञानाचा व भ्रांतीचा अनुभव आम्हीं केला असें म्हणणें शोभेल. हा जो सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव हाच मायेचा प्रत्यक्ष अनुभव आहे. पण मजा काय होते कीं स्वात्मरूपाहून या सर्वांचा भिन्नानुभव यथार्थ होतांच हें सर्व प्रचंड खटलें एकदम स्वात्मरूपींच लीन होऊन आत्मरूपच होऊन बसतें, मग **परमात्मा, माया, जग,** असे भेदच प्रतीत होत नाहींत. ' **सर्वं खल्विदं ब्रह्म** ' असेंच म्हणावें लागतें. तात्पर्य काय कीं, अज्ञानकालांत मायेचा प्रत्यक्षानुभव होत नाहीं व ज्ञानकालांतही मायेचा, **मा–या** ह्म० जी मिथ्या– या शब्दार्थाप्रमाणें अनुभव होत नाहीं. अर्थात् दोन्ही कालांत अनुभवास न येणारी ती अमूर्तच असली पाहिजे. त्या अमूर्त म्ह० निर्गुण विभूतीचें लक्ष्यार्थानें ग्रहण होण्याकरितांच मायेनें आपलें निर्गुणनाम **माया** असें हें ठेवून घेतलें आहे.

आतां थोडा आणखी सूक्ष्म विचार करून मग सगुण नाम जें श्री त्याचा विचार करूं. ' **ओमित्येकाक्षरं ब्रह्म** ' असें परमात्म्याचें निर्गुणस्वरूपबोधक ॐ हें एकाक्षरी नाम आहे. तसें द्वैत-

रूप बोधक द्व्यक्षरी 'माया' हें नाम मायेनें ठेवून घेतलें. जणूं काय विचारशीलांस आत्ममंदिरीं प्रवेशार्थ अति स्वल्प दोनच पायऱ्या करून ठेविल्या आहेत असें वाटतें. पहा या—मा—ह्म० जी खोटी ती (माया) ती या दर्शक सर्वनामानें उद्दिष्ट व्यक्ति लक्ष्यार्थानें घ्यावी लागते. ह्म० ती गुप्त राहते. प्रत्यक्ष होत नाहीं. आतां ज़ी खोटी ती यांत 'खोटी' हें विशेषण 'जी—ती—' या दोन दर्शक सर्वनामांत संपुटित आहे ह्म० 'जी—' मुळें 'ती' आली आहे. जर हीं दोन्ही दर्शक सर्वनामें उडविलीं तर फक्त खोटी एवढेंच विशेषण ह्म० **मा** हें राहिलेंना? आतां विशेष्य जर कांहीं वेगळें असेल तर—**मा**—हें त्याचें विशेषण होईल आणि जेथें विशेष्याला कांहीं वेगळें रूपच नसतें तेथें विशेषणच विशेष्यरूप होऊन बसतें. व उद्दिष्ट व्यक्तीचें तें ठराविक **नाम** होऊन जातें. जसें भाललोचन ह्म० शंकरच; कारण, अन्य कोणाचेही भाळीं नेत्र नाहींच ह्मणून भाललोचन हें विशेषण विशेष्य नाम होऊन बसलें, तसें सत् ह्म० परमात्माच तद्व्यतिरिक्त सत् कांहीं नाहींच ह्म० त्याहून वेगळें जें असेल तें असत्. जसा सत् स्वरूपच परमात्मा झाला तसें असत् ह्म० खोटी,—खोटी ह्म० मा—मा—ह्म० च माया, या नामांत हीं—'या'—अक्षराची जरूर नाहीं एकट्या—मा—अक्षरानेंच तिचें नांव सिद्ध होतें (इंदिरा लोकमाता मा—अमरकोश—) जसें परमात्म्याचें एकाक्षरी नाम ॐ तसें मायेचेंही एकाक्षरी नाम **मा** हें आहे. ॐ हें नाम जसें अद्वैतार्थबोधक आहे तसें **मा** हें नांवही अद्वैतार्थबोधक आहे. जरा विचारानें मात्र पाहिलें पाहिजे. ह्म० जें दृष्टीनें पहातां येतें, कल्पनेनें ग्रहण करतां येतें, तें सर्व **मा** ह्म० मिथ्या आहे. अर्थात् याहून वेगळें सत्य आहे, असाच बोध होतो. जो दुसऱ्यास फसवूं इच्छितो तो खरें दाखवीत नसतो, अशी रीति आहे. तशी जर मायेची इच्छा जीवाला फसविण्याची असती तर माया 'मी मिथ्या' आहें असा बोध न करती. हा तिचा बोध अद्वैतदर्शक असल्यानें जसें परमात्म्याचें निर्गुण एकाक्षरी नाम ॐ आहे. तसेंच या जगन्मातेचें निर्गुण एकाक्षरी नाम **मा** आहे. हिचे पोटीं जगाची उत्पत्ति त्याचप्रमाणें आप-

ली मातेच्या पोटीं उत्पत्ति, म्हणूनच दोन्ही ठिकाणीं मा हें अक्षर कसें दिव्य शोभत आहे. हा विचार सुज्ञ वाचकांनीं पूर्ण मनांत आणावा. आतां मीं सगुण नामाचे वर्णनाकडे वळतों.

---

## मायेचें सगुण नाम.

जगन्माता आदिशक्तीचें सगुण नाम श्री हें कर्णाला मधुर लागणारें, नेत्रांला मनोहर दिसणारें व शोभा सौंदर्यादिकांच्या उत्पत्तीचें आद्यस्थान कसें अद्भुत प्रकट झालें आहे. या नामाची व्यापकता अगदीं मायेच्या व्यापकतेबरोबर आहे. अनंतकोटी ब्रह्मांडांची सृष्टिरचना हेंच मायेचें स्वरूप आहे व या सृष्टिसीमेपर्यंतच मायेची व्यापकता आहे. या सृष्टिरचनेंत यच्च यावत् जितके कांहीं मायानिर्मित पदार्थमात्र आहेत त्यांचे ठिकाणीं जे कांहीं गुण, जें सौंदर्य, जी शोभा, जी कीर्ति, जी जी ह्मणून अपूर्वता व जो अद्भुतपणा आहे त्या सर्व गुणांचा श्री ह्या नामांत समावेश होतो. असें हें व्यापक नाम आहे.

पूर्व प्रकरणांत निर्गुण परमात्मा मायाकृतोपाधीनें सगुणरूप होऊन सुषुप्ति व स्वप्नावस्था टाकून जाग्रदाभिमानी विराटरूप झाला. त्याचेच अंगभूत माया, सुषुप्ति व स्वप्नावस्थेंत अहंकार व मनबुद्धिरूप होती ती जाग्रदावस्थेंत पंचभूतात्मक महासृष्टिरूप झाली. ती सर्व सृष्टि विराटरूप परमात्म्याची अंगरचना झाल्यानें सृष्टिरूपच विराटात्मा झाला व सृष्टीचीं प्रधान मूलतत्त्वें त्या परमात्म्याच्या अष्ट विभूति अथवा प्रकृति झाल्या. विभूति व प्रकृति अशा गंभीर शब्दांपेक्षां परमात्म्याच्या ह्या प्रत्यक्ष अष्ट मूर्ति आहेत असेंच ह्मणणें मला गोड लागतें; आणि परमात्म्याचें वाचकनाम अव्यक्तस्थितींत ॐ हें बिंदुरूप होतें तें सगुणस्थितींत बिंदु–रेपा–अक्षर मिळून पूर्ण ॐ रूप होतांच परमात्म्याचे अष्ट प्रकृतीप्रमाणें ॐकाराचेही तसेच अष्ट विभाग होऊन अष्ट प्रकृतीला निरनिराळे व्यापून बसले. त्या ॐकाराची व अष्ट विकृतीची ऐक्यरूपाकृति गेल्या प्रकरणीं दा-

खविलीच आहे. आणि श्रीकृष्ण परमात्म्यानीं आपले मुखानें " भूमिरापो ऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा " असें निजभक्त अर्जुनास गीतेंत सांगितलें आहे. आतां ज्याप्रमाणें परमात्मा अष्ट प्रकृति ॐरूप झाला त्याप्रमाणें त्याचीच इच्छारूप आदिशक्ति माया सप्त प्रकृति श्रीरूप झाली ह्म० जसें ॐ चे अष्टावयवावर अष्ट प्रकृति बसल्या तसें माया आपले श्रीरूपाचे सात अवयवांवर सात प्रकृति बसवून प्रधान प्रकृति स्वतःच श्रीरूप झाली. ह्म० सात प्रकृतीचा प्रधानप्रकृति श्रींतच समावेश अथवा अंतर्भाव होतो. आतां मायेच्या सप्त प्रकृति कोणत्या व त्या श्रीच्या अवयवांत कशा बसल्या त्यांची आकृति मी सुज्ञ वाचकांस दाखवितों ह्म० सर्व गोष्ट अगदीं बरोबर पूर्ण ध्यानांत येईल.


*

---

* यद्यपि गेल्या प्रकरणांत ह्म० अव्यक्तबोधांत. अष्टप्रकृतिरूप ॐकाराची आकृति दाखविली आहे. आणि पुढेंही सृष्टिप्रकरणांत येणार आहे. तथापि येथेंही ती आकृति देतों ह्मणजे त्याचे व श्रींबीजाचे अवयव त्यांत दिलेल्या अंकावरून वाचकांस जुळवून पाहतां येतील.

## अष्टप्रकृतिरूप ॐकार.


## नंबर २



# मायेची सप्तप्रकृतिरूप श्रीबीजाची आकृति.

**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृति-**
**र्मेधाधृतिः क्षमा**

**'या विभूती मी आहें' असें भ० गीतेंत भगवंताचें वाक्य आहे.**



( श्रीच्या अवयवांत जे अंक आहेत ते श्रीच्या विभूतीचें दर्शक होत. आणि श्रीच्या बाहेरील अंक—श्रींत आलेल्या ॐकाराच्या अवयवांचे दर्शक आहेत. यावरून दोन्हींच्या अवयवांचें ऐक्य जुळवून पहावें. )

---

* येथें ॐ आणि श्री या उभय बीजांच्या स्वरूपाचें ऐक्य दाखविलें आहे, त्या ऐक्यरूप द्वंद्व विभूतींपासून जें ब्रह्मांडयंत्राचें पद्म प्रादुर्भूत झालें आहे त्याचें चित्र व त्यांतील रहस्य पुढें उपासना प्रकरणांत येणार आहे.

ॐकाराचे आठ तुकड्यांपासून वर्णमाला, संख्या, चतुर्विध जीवांच्या आकृति इ० कसें निर्माण झालें हें सविस्तर दाखविलेंच आहे. त्याच ॐकाराचे सात तुकड्यांपासून श्रीं हें मंत्रबीजाक्षर निर्माण झालें आहे; नीट लक्षांत आणा.

मायेनें परमात्म्याच्या आधारावर जशी चराचरसृष्टि निर्माण केली तसें आपलें नाम 'श्री' हेंही त्याच्याच ॐ ह्या नामाच्या आधारावर ह्म० ॐचेच अवयव घेऊन ॐप्रमाणेंच अद्भुत रचनेचें निर्माण केलें आहे. जसें ॐ हें अक्षर स्वयंसिद्ध असल्यानें (ओम्) असें लिहिल्यास अशुद्ध होतें तसेंच श्री हें अक्षर स्वयंसिद्ध असल्यानें (श्री) हें असें लिहिल्यास श्रींचे जागीं हें असें लिहिणें अशुद्ध होईल. व मुळींच शोभणार नाहीं. असो. ॐकाराचे आठ तुकड्यांपासून वर्ण—अंक, आकृति इ० निर्माण होतांना बिंदूचा प्रथम तुकडा कशांतही न लागतां अगदीं पृथक् उरतो (शिवाय कांहीं अक्षरांत सात तुकड्यांपैकींही एक दोन तुकडे शिल्लक रहातात.) त्याप्रमाणें मायेनें आपलें नाम श्री निर्माण करतांना प्रथम 'बिंदु' अगदीं वेगळा ठेवून श्रीं हें अखिल मंत्रांचे मूलबीज नामाची रचना केली. सृष्टि व्यक्त होण्यापूर्वीं मायेंत बीजरूपानें होती व माया सृष्टिबीजरूपानें परमात्म्यांत अव्यक्त होती. त्यावेळीं मायासंवलित परमात्मा व्यक्तबिंदुरूप होता. ह्म० बिंदुला व्यक्तत्व रेषारूप मायेनेंच आणलें अर्थात् मायाच बिंदुरूप होऊन परमात्म्यावर बिंदुरूपत्वाचा आरोप आला इ० गोष्टी मागें सिद्ध होऊन चुकल्याच आहेत. आतां मायाकृत सृष्टि पदार्थमात्रांत जे शोभा सौंदर्यादि गुण आहेत त्या सर्वांचा श्रींचे व्यापक स्वरूपांत समावेश होतो हें वर सांगितलेंच आहे. यावरून मायारूप सृष्टीचें व श्रींचें एकच स्वरूप आहे. भिन्न ह्मणतां येत नाहीं. कारण सौंदर्य हें पदार्थाश्रितच असतें. पदार्थाला सोडून सौंदर्य पृथक् प्रतीतच होणें अशक्य आहे. अर्थात् पदार्थ व पदार्थाश्रित सौंदर्यादिगुण यांचा परस्पर अत्यंत अभेद असल्यानें एकच रूप झालें. आतां पहा, सृष्टि मायेंत लीन होतांच ह्म० बीजरूप होतांच तिचें सौंदर्यही मायेंत बीजरूपानें आलें. आणि माया बिंदुरूप परमात्म्यांत लीन

होतांच सौंदर्याचें बीजही त्यांत (परमात्म्यांत) मायेबरोबर आलें. मायारूप रेषा संवलित परमात्मा बिंदुरूप झाला, तेव्हां मायेचें सौंदर्य बीजरूपानें मायेबरोबर होतें तेंही परमात्मबिंदूंत आलेंच. परमात्म्यांत माया बीजरूपानें आली तसें तिचें सौंदर्यही बीजरूपानें आलें. बीज आरंभीं बिंदुरूप असतें हें अ० बो० त सिद्ध झालेंच आहे.*माया व तिचें सौंदर्य बीजरूप ह्म० बिंदुरूप झालें आणि परमात्माही बिंदुरूपच आहे. ह्मणून मायेनें सौंदर्यादिगुणांचें समावेश करणारें व्यापक नाम श्री हें असें ठेवून मुख्य प्रधान विभूति श्रीरूपानें बिंदुस्थानीं विराजमान झाली आणि बाकीच्या आपल्या ( श्रीच्या ) अवयवांवर आपल्या सहा प्रकृति स्थापन केल्या. ह्मणून अखिल सृष्टीचें बीज ही जगन्माता आदिशक्ति 'श्रीं' हें बीजरूप झाली. कार्य कारणरूप असतें, हा सिद्धांत ठरलाच आहे. श्रीं हें बीजरूप अक्षर ॐकाराचेच अवयवांपासून झालें असल्यानें श्रीं हें कार्य ॐ० कारणरूपच झालें. अर्थात् श्रीं व ॐ० यांचा अभेद होऊन अत्यंत ऐक्यरूप झालें. आतां जसें या उभयाक्षरांचें ऐक्य दाखविलें तसें ॐचे व श्रींचे अवयवांत उभयतांचे प्रकृतीचें अथवा विभूतीचें ऐक्य कसें आहे तें दाखवितों. सुज्ञ वाचकांनीं लक्ष असूं द्यावें.

## मायेच्या सप्त विभूति.

ॐकाराचा प्रथमावयव जो बिंदु हा तर अगदीं पृथकच आहे, तो कशांतही लिप्त होत नाहीं. राहिलेले सात अवयवांतून श्रीं हें बीज निर्माण झालें आहे. मायेच्या सप्त विभूति श्रीं अक्षराच्या अवयवांत आल्या आहेत तेच अवयव ॐकाररूप असतां त्यांत परमात्म्याच्या विभूति होत्या. तो ॐरूप परमात्मा श्रीं बीज मायारूप होतांच परमात्म्याच्या विभूतीही मायेच्याच विभूतिरूप झाल्या कशा त्या पहा ( श्रीही विभूति दुसरी आहे हिचें ऐक्य आकाशाशीं आहे. तें सगळ्याचे शेवटीं दाखवीन. )

१ प्रथम विभूति मायेची कीर्ति ही ज्या अवयवांत आली आहे त्यांत परमात्म्याची विभूति 'वायु' असून तो ॐकाराचा पंचम अवयव होता तो श्रीचा प्रथमावयव झाला. वायूचा स्वभाव ज-

* अ० बो० रूप प्रकरण पान ५१ वें पहा.

सा सर्व दिग्गामी असून शरीराला स्पर्शमात्रेंकरून आनंद देण्याचा आहे तसाच कीर्तीचाही स्वभाव सर्व दिग्गामी असून श्रवणाला स्पर्शमात्रेंकरून आनंद देण्याचा आहे. व्यक्तीची, पदार्थाची अथवा कोणत्याही गोष्टीची सत्कीर्ति झाली कीं ती लागलीच कर्णोपकर्णीं सर्व जगांत पसरते व तिचे श्रवणानें सर्वांचे हृदयास मोठा आनंद होतो. जसें वायूचे अंगीं चिरायुत्व आहे तसेंच कीर्तीचे अंगीं चिरायुत्व आहे. ह्मणून समर्थ पुरुषांचा सदैव उपदेश आहे कीं, 'देह त्यागिता कीर्ति मागें उरावी' अशी अपूर्व कीर्ति संपादन झाली तरच मनुष्यजन्माचें सार्थक आहे. अवतारचरित्रें व पुण्यशील सत्पुरुषांचे इतिहास, त्या विभूतींना होऊन लक्षावधि वर्षें जरी झालीं तरी त्यांच्या सत्कीर्तीची साक्ष देत असून सुज्ञ मनुष्यास अनुकरणीय कित्ता होऊन बसलीं आहेत, कीं ज्यांस आह्मी आमचे शहाणपणातिरेकानें कल्पित कादंबऱ्या व पोट भरण्याचे रोजगार आहेत, असें आज ह्मणूं लागलों आहों. त्या सत्पुरुषांची कीर्ति आजपावेतों यशोरूपानें आहे व ती अशीच पुढेंही चालणार. तेव्हां तिचे बरोबर आमच्या शहाणपणाची कीर्ति अयशोरूपानें सहचारिणी नको का ? भिन्न स्वभावावांचून व्यक्तता होत नसते हें मागें सिद्ध झालेंच आहे. तिचें खरें स्वरूप कायम रहाण्याकरितां आमचें खोटेंपण तिजबरोबर पाहिजेच. आमच्या मालिन्य आणल्यानें ती अधिक सोज्ज्वल होऊन आमचींच मुखें मलीन होतात. मध्याह्नीं सूर्यावर धूळ टाकूं लागल्यास ती आपल्या मुखांत पडते. मी प्रकृत विषय सोडून उगीच बहकलों याची मला सुज्ञ वाचक माफी देतील. व यांतील तात्पर्य वाटल्यास घेतील. सुज्ञांस सांगण्याची जरूर नाहीं.

३ तृतीय विभूति मायेची **वाक्** ह्म० वाणी ही असून परमात्मरूप ॐकाराच्या सहावे 'अनल' ह्म० अग्नीच्या अवयवावर आली आहे. ज्याप्रमाणें अग्नींत प्रकाशक आणि दाहक शक्ति आहे त्याप्रमाणें किंबहुना त्याहून अधिक प्रकाशाची व दाह करण्याची शक्ति वाणींत आहे. अज्ञान निबिडांधकारांत सर्व जीव बुडून राहिले आहेत. त्यांतून भाग्यवान् मुमुक्षूच्या हृदयाकाशांत ज्ञानमा-

तेंडाचा प्रकाश श्रीसद्गुरूच्या कृपामृत वाणीनेंच होतो. याचा अनुभव सर्व सत्पुरुषांस आहेच. पदार्थाश्रित जें अज्ञान असतें तें शब्दानेंच दूर होतें. काहो ? हें अमुक काय आहे, कसें आहे ? इ० आपले अज्ञानानें दुसरे ज्ञात्यास आपण प्रश्न विचारल्यावर त्याचे उत्तरानेंच त्या गोष्टींचा बोध होतो. अज्ञान ह्म० च अंधकार व ज्ञान ह्म० च प्रकाश. अग्नीनें अंधकार जातो. वाणीनें अज्ञान जातें. अर्थात् प्रकाशक शक्ति दोघांत समान आहे. अग्नीनें अज्ञानांधकार जात नाहीं ह्मणून वाणींत विलक्षण प्रकाशक शक्ति आहे. तशी वाणींत दाहकशक्तीही विलक्षण आहे. अग्नीनें दग्ध झालेलें आंग कांहीं काळानें पूर्ववत् चांगलें होतें. पण दुर्भाषणानें दग्ध झालेलें हृदय मात्र आजन्मपर्यंत चांगलें होत नाहीं. सज्जनांची वाणी जशी अमृतमयी आहे तशी दुर्जनांची वाणी अग्निमयी आहे. त्या वाणीनें जसें अंतःकरण शीतल व्हावयाचें, तसें ह्या वाणीनें अंतःकरण दग्धच व्हावयाचें. अमृतवाणीच्या योगानें हृत्ताप नाहींसे करून घेणारे सज्जन मुमुक्षूंनीं दुर्जनाचे दुर्भाषणांचा कडक ताप सहनच केला आहे. ग्रीष्मांत शीतल जलापासून जें सुख होतें ते हिंवाळ्यांत होत नाहीं. निव्वळ साधुसमागमानें आनंदवृद्धि तर होते पण सहनशक्ति वाढत नाहीं. प्रसंगवशात् दुर्जनांचा अथवा दुःखाचा तडाखा बसला कीं तो आनंद नष्ट होऊन त्यापेक्षां खेदच अधिक होतो. तो कां ? तर, दुःख सहन करण्याची शक्ति नाहीं ह्मणून. यासाठीं मुमुक्षूंना मोक्षमार्गावर दृढ करणारे दुर्जन साह्यकारी आहेत. त्यांचा उपद्रव व्हावयाचाच. तो सहन केल्यावांचून आपले आंगीं गांभीर्यगुणाची उत्पत्ति होत नाहीं. याचकरितां परमेश्वर आपले निजभक्त साधुपुरुषांचें गांभीर्य कोणत्याही क्षणांत नष्ट न व्हावें ह्मणूनच त्यांचे सभोंवतीं सदैव दुर्जनांचा संग अगदीं पक्का बांधून देतो. ह्मणूनच ते गांभीर्याचे केवळ समुद्र होतात. आपले जवळ थोडें जल असून जास्त अग्नि विझवूं गेल्यास तो शांत न होतां गांठीचें जल मात्र तृषा शांत करण्यापुरतें असतें—तेंही नष्ट होतें. तेंच जल जर अधिक सांठवीत गेलें तर अग्नि शांत करूनही शिल्लक उरतें. अशाच वृद्धीचे क्रमानें अंतःकरण गांभीर्यसरोवर

झालें कीं मग त्यांत दुर्जनाचे दुर्भाषणांगार किती जरी पडले तरी ते विझून कोळसे होतात. याकरितां सज्जनांनीं त्यांचा अव्हेर करूं नये. कारण आपले अंत:करणाचें गांभीर्य ताडून पहाण्याची ते कसोटी आहेत. त्यांच्यावांचून आपलें पूर्ण कार्य होणार नाहीं. असो. शिवाय वाणीची देवता अग्नि आहे. देवादिकांची जिव्हाही अग्नीच आहे. त्यांस यज्ञहविर्भाग अग्निद्वाराच मिळतो. याप्रमाणें अग्नीचें व वाणीचें ऐक्य आहे.

४ चतुर्थ विभूति मायेची **स्मृति** आहे. ती ॐकाररूप परमात्म्याच्या द्वितीय अवयव **मनरूप** अर्धमात्रेंत आली आहे. स्मृतीचा क्षणिक स्वभाव आहे इ० ती चंचळ असते. कोणत्याही गोष्टीची स्मृति झाली कीं ती क्षणभर राहून पुन: दुसरे विषय मनांत येतात. कारणपरत्वें पूर्व विषयांची पुन: स्मृति होते अथवा एरवींही होते. तात्पर्य ज्याप्रमाणें स्मृतीला चांचल्य आहे त्याचप्रमाणें मनाचें स्वरूपही चंचल आहे. व्यवहारांत आपण नेहमीं अमुक गोष्टीची आठवण राहूंद्या बरें ! माझ्या मनांत अगदीं स्मरण राहिलें नाहीं. इ० प्रकाराचा अनुभव नित्य करीतच आहोंत असें हें स्मृति व मन या विभूतींचें ऐक्य आहे.

५ पंचम विभूति मायेची **मेधा** असून ॐकाररूप परमात्म्याच्या तृतीय अवयव **बुद्धिरूपांत** आली आहे. यांत ऐक्य दाखविण्याची जरूरच नाहीं; कारण बुद्धीचेंच नांव पर्यायशब्दानें मेधा असें आहे. बुद्धि विभूतीनें इतर विभूतींप्रमाणें रूपांतरें न करितां स्वयंसिद्ध रूपानें परमात्म्याचे अवयवांतून निघून मायेच्या अवयवांत येऊन बसली. हिनें जर रूपांतर केलें असतें तर फारच घोंटाळा झाला असता. कारण व्यावहारिक व पारमार्थिक यच्चयावत् ज्ञानाची प्रचंड इमारत केवळ एका बुद्धिस्तंभाचेच आधारावर वसली आहे. बुद्धींत यत्किंचित् विपर्यास पडला कीं दोन्ही दिशांला एकदम अनर्थ उभा राहतो. व कशी भानगड उभी राहते याचा सर्व प्रापंचिकांस व पारमार्थिकांस नेहमीं अनुभव आहे. प्रपंचांत बुद्धीला सदैव खबरदार व गंभीर ठेवावी लागते. कोणतीही गोष्ट अथवा विषय यद्यपि प्रत्यक्ष पाहिला किंवा ऐकिला तरी त्या विषयाचा यथार्थ विचार केल्यावांचून त्याला एकदम बुद्धींत

येऊं देऊं नये. अविचारानें आलेला विषय बुद्धीचे विपर्यासास कारण होतो व त्याचा परिणाम पुढें अनर्थरूप होतो. कारण जी गोष्ट आपण एकदम पाहतों तिचें तें स्वरूप विचारांतीं तसें राहत नाहीं. दिसण्यांत कांहीं वेगळें स्वरूप दिसतें, पण त्याचें यथार्थ स्वरूप कांहीं वेगळेंच असतें तें नीट समजलें ह्मणजे मागून बुद्धिमानास पश्चात्ताप होतो. करितां बुद्धींत नेहमीं खबरदारी ठेविली पाहिजे, नाहींपेक्षां पदोपदीं चूक घडते. परमार्थसाधनांत तर मोक्ष मंदिराची निःश्रेणीच बुद्धि आहे. ही जर निर्मल, सोज्ज्वळ व शांत नसली तर त्या सर्व परमार्थाची चहूंकडे धूळच उडणार. प्रपंचांत घटकाभर दूषित बुद्धीचा निर्वाह चालेल, पण परमार्थांत वरील गुणवतीच बुद्धि पाहिजे. त्यावांचून तो अधिकारीच नाहीं. त्यावांचून परमार्थाचा डौल घालणें ह्मणजे केवळ परमार्थास लांच्छन लावणें होय. याकरितां बुद्धिमानांनीं आधीं बुद्धिशोधन केलें पाहिजे. बुद्धीचेच साह्यानें आत्मानात्मविचार कळतो. बुद्धीचेच प्रसादानें आत्मसाक्षात्कार होतो. प्रपंच व परमार्थ हे दोन्ही केवळ बुद्धीचे गांभीर्यावरच अवलंबून आहेत. बुद्धीचीच सर्वत्र प्रधानता आहे. अंतःकरणचतुष्टयांत मन–बुद्धि–चित्त–अहंकार असे चार आहेत. परंतु मनवान्–किंवा चित्तवान्–असें ह्मणत नाहीं. कारण त्यांची योग्यताच कमी. बुद्धीची योग्यता अति श्रेष्ठ असल्यानें तिचे योग्यतेप्रमाणें जे तिला ठेवतात तेच बुद्धिमान् ह्मणवितात, आणि जे तिचा दुरुपयोग करतात ते बुद्धिमान् ह्म० गाडीवान् सारवान् इ० यांचे बंधूच समजले पाहिजेत. असो, तात्पर्य काय, मायेनें परमात्म्याच्या सर्व विभूतींचीं रूपांतरें करून टाकिलीं. पण बुद्धिविभूतीचें रूपांतर जीवांचे कल्याणार्थ बुद्ध्या केलें नाहीं. तें जसेंच्या तसेंच मोकळें राहूं दिलें. हा या जगन्मातेचा आह्मां दीन मानवांवर केवढा अवर्णनीय महदुपकार आहे कीं ‘ज्या बुद्धिमुखानें त्या जगन्मातेच्या अर्धचंद्रामृत स्तनपान करीत, तिचे जगदंकावर आनंदानें लोळत राहून, तिच्या निर्मळ वृत्तिमुखाला आपलें निजात्मचुंबन देत, व्यापक परमात्मपित्याचें सच्चिदानंदरूप अवलोकन करीत, स्वरूपानंद समुद्रांत अखंड निमग्न आहोंत; जेथें त्रितापांची बाधा स्वप्नांतही नाहीं; जेथें जी-

वन्मुक्ताफळें अनिच्छित हातीं लागतात; सद्गुरूचीं बोधरत्नें जिकडे तिकडे चमकत असतात; ज्यांत स्वबाहूबलानें यथेच्छ विहार करतां येतो, अशा अपूर्व प्रसादाला कारण कोण ? तर बुद्धि.' प्रिय सुज्ञ वाचकहो बुद्धि हें प्रत्यक्ष मायेचें स्वरूप आहे. असें हें अपूर्व, अमूल्य आणि अप्राप्य रत्न जगदीशानें आपणास फुकट दिलें आहे. त्याचा वर लिहिलेला उपयोग कराल तरच खरी किंमत आपल्यास कळली असें समजा. नाहींपेक्षां जगद्व्यवहार सर्वच करीत आहेत.

६ सहावी विभूति मायेची '**धृति**' असून ॐकाराचे सप्तम अवयवावर **आप** या विभूतीचे ठिकाणीं ती आली आहे. 'धृति' ह्म० धारणा. चांगले गुणाचें परिशोधन करून आपले ठिकाणीं त्यांस सतत धारण करून ठेविणें यास धृति असें ह्मणतात. तात्पर्य जशी धृतींत अनेक गुणांचें एकीकरण करण्याची शक्ति आहे, तशी आप ह्म० जल यांतही शुष्क पदार्थ ह्म० मृत्तिका पिष्ठ इ० पदार्थांस पिंडरूप ह्म० गोळा करण्याची व यावत् जीवमात्राचे प्राण धारण करण्याची शक्ति आहे. सुंदर गुणांत जशी आनंद देण्याची शक्ति आहे त्याचप्रमाणें जलांतही अत्यंत आनंद देण्याचीच शक्ति तर काय, किंबहुना जल हें सर्व सृष्टीचें केवल जीवन असून अखिल पदार्थमात्रांत जे चांगले गुण एकत्र झालेले दिसतात ते सर्व जलाच्या योगानेंच आहेत. ह्मणून धृतीचें व आप यांचें ऐक्य आहे.

७ सप्तम विभूति मायेची '**क्षमा**' ही असून परमात्मरूप ॐकाराच्या अष्टमावयव '**भूमि**' या विभूतीचे जागीं आली आहे. 'क्षमा' हे पृथ्वीचें पर्याय नाम असून क्षमेचें व पृथ्वीचें अत्यंत गुणैक्य आहे. पृथ्वीला अखिल प्राणिमात्र आपले उपयोगाकरितां हवातसा उपद्रव देतात, अति अमर्यादा करितात ह्म० मलमूत्रादि विसर्जन करितात यापेक्षां अधिक काय असावें. इ० सर्व उपद्रवांस ती सहन करून जीवमात्रांवर शांतीच ह्म० क्षमाच ठेविते. तिचेच कृपाप्रसादानें जीवमात्रांचा निर्वाह होऊन सर्व ऐश्वर्यादि संपत्ति तिच्यांतूनच उत्पन्न होऊन प्राप्त होतात. सृष्टींतील प्रत्येक पदार्थमात्राचे उत्पत्ति, स्थिति, लय, पृथ्वीचे आश्रित आहेत. मातेचे उद-

रांत नवमासच निर्वाह आहे. पुढें जन्मापासून मरणपर्यंत सर्व निर्वाह भूमाताच करिते. क्षमेची परमावधि व मायेची प्रत्यक्ष मूर्ति पृथ्वी ही आहे. जिची खरी योग्यता न समजतां अज्ञानी जीव तिला केवळ माती असें समजतात, पण ती तर सर्वांचें जीवनामृतच असते व तिचें मातीपण मात्र जीवाच्या बुद्धींत पडतें. त्यामुळें जीवाचें शहाणपण मातीमोल झालें आहे. असो. क्षमा कशी असावी तर पृथ्वीप्रमाणें. जशी पृथ्वींत सहनशीलता आहे तशी आमचे क्षमेंत सहनशीलता आली पाहिजे. व्यवहारांत कोणीही जरी अपराध केले तर त्यांचे क्षमेंतच विशेष भूषण येतें. व संसारांत त्याची फार प्रौढी मानली जाऊन गृहांतील कुटुंबी व जगांतील सर्व मनुष्यें त्यावर प्रेम करून त्यास सुख देतात व त्यापासून प्रत्येकास सुख होतें. अपराधाची शिक्षा जरी करणें पडली तरी ती दयार्द्र अंतःकरणानें केल्यास अपराध्यास ती शिक्षा सुद्धां कमी जांचते, व शिक्षकाविषयीं त्याची प्रेमबुद्धि राहते. परमार्थांत तर क्षमा ह्म० केवळ आनंदाचा रत्नखचित मुकुटच आहे किंबहुना रत्नांचें भांडार आहे. तो स्वाधीन झाल्यावर दुर्जन–त्रितापादि दारिद्र्याची बाधा कधींच होत नाहीं. शांतिकवच धारण केलें असल्यावर दुर्जनदुरितादिकांच्या कोणत्याही शस्त्रप्रहारानें यत्किंचित् व्रण सुद्धां होत नाहीं. मग घाव कसा पडूं शकेल ? अशी ह्या क्षमेची थोरवी आहे. कोणत्याही कार्यांत, मग तें प्रापंचिक असो अथवा पारमार्थिक असो शरीराला व अंतःकरणाला परिश्रम झाल्यास विश्रांतीच घ्यावी लागते. त्यावांचून सुख होत नाहीं. व खऱ्या विश्रांतीचें मूलस्थान शांतीच असल्यानें सर्व कर्म परिसमाप्तींत व विचाराचेही परिसमाप्तींत साक्षात् परमात्मरूप वेदवाणीनें सर्वांस "शांतिः" असा त्रिवार उपदेश करून आपण स्वतः परमात्मारूपीं लीन झाली, व सर्वांनीं त्यांत लीन होऊन आनंद घेण्याची युक्ति दाखविली. विचारशीलांस पहातां बनल्यास पहावी. असो. याप्रमाणें मायेच्या क्षमा विभूतीचें परमात्म्याच्या पृथ्वी विभूतीशीं अत्यंत ऐक्य आहे. आतां वर सांगितल्याप्रमाणें श्री ह्या प्रधान विभूतीचें वर्णन करतों.

२. द्वितीय विभूति मायेची वर सांगणें राहिली होती ती श्री

ही असून परमात्मरूप ॐकाराच्या चतुर्थ अवयव, खं ह्म० अकाश या विभूतीचे जागीं आली आहे. मायेनें साहा अवयवांपासून श्री हें अक्षर निर्माण केलें व चतुर्थ अवयव आकाशाच्या श्रीचे शिरोभागीं बिंदुस्थानीं ठेवून आपली प्रधान विभूति जी श्री तिला आकाशरूप बिंदूत वसविली, आणि सप्तावयवयुक्त पूर्ण श्रीं बीजरूपानें आपण प्रत्यक्ष मूर्तिमंत निजभक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां जगांत प्रगट झाली आहे. हिच्या उपासनेनें चतुर्विध पुरुषार्थ ह्म० धर्म–अर्थ–काम–आणि मोक्ष सहज प्राप्त होतात. शोभा, सौंदर्यादिक सर्व श्रेष्ठ गुणांचें आद्य उत्पत्तिस्थान–श्रीं हें होय. चराचर सृष्टीचें बीज श्रीं हें असून मायेचे व्यापकतेबरोबर श्रीची व्यापकता आहे, असें मागें सिद्ध करून दाखविलेंच आहे. आकाशाचा गुण शब्द आहे व तो सर्वत्र व्यापक आहे. तोच शब्द मूर्तिमंत श्रीं हा आहे. जशी आकाशाची व्याप्ति अखिल चराचर सृष्ट–पदार्थमात्रांत आहे तशी पदार्थाश्रित सौंदर्यादि यावत् जे गुण ह्मणून आहेत त्या सर्वांचा श्रीचे व्याप्तींत समावेश होतो. हें महाकाश जें अनंतकोटी ब्रह्मांडांस व्यापून उरलें आहे, त्या आकाशालाही पुरून उरणारी मायारूपी श्रीं ही आहे. कारण ज्याप्रमाणें पुत्र उत्पन्न होण्यापूर्वी मातापितरें असतात, त्यांपासून पुढें संतति होते. त्यांत कांहीं मुलें कार्यदक्ष होतात व एखादा आळशी जडबुद्धीचा निघतो; त्यावर पित्याचे प्रेमापेक्षां मातेची प्रीति अधिक राहून त्याला इतरांपेक्षां लाभ अधिक होतो. त्याप्रमाणें प्रकृति–पुरुष–मातापितरांपासून पंच महाभूतें ह्म० 'पृथ्वी–आप–तेज–वायु–आकाश–' ही सृष्टिरूप संतति झाली. यांत चार तत्त्वें कार्यदक्ष होऊन आकाश मात्र शून्यरूप जड असें राहिलें. चार मुलांनीं हा सृष्टिरूप केवढा प्रचंड उपद्रव उभा केला कीं आह्मां क्षुद्र जीवांना त्राहि त्राहि होऊन राहिलें आहे. हे जगन्माते, हीं तुझीं मुलें कसलीं प्रत्यक्ष महाभूतें आहेत व आह्माला अनंत जन्मांपासून छळून छळून आमचे प्राण घेत आहेत. अशी त्या 'बुद्धिरूपी' आदिमातेस करुणा भाकली तरच तिचा आत्मानात्मविचाररूपी प्रसाद होऊन हा जीव संसारत्रासापासून मोकळा होतो. याचकरितां भगवंतांनीं बुद्धीला शरण जाण्याची "**बुद्धौ शरणमन्विच्छ कृप-**

**णाः फलहेतवः"** अशी आज्ञा करून ठेविली आहे. असो. जसें एखादें मूल अगदीं उघडें नागवें होऊन आईजवळ आलें ह्मणजे त्यास माता वस्त्रालंकारादि भूषणें घालून सुशोभित करते; अथवा एखादी भव्य इमारत अगदीं शून्य असतां भयंकर दिसते, पण तीच हंड्या झुंबरें इ० सामानानें व लोकवस्तीनें कशी सुशोभित दिसूं लागते. तसें हें जड निरुपद्रवी आकाशमूल उघडें नागवें जगन्मातेजवळ जातांच तिनें **( सत्यज्ञानानंद गगनाचें प्रावरण—अभंग )** 'सत्यज्ञानानंदरूपी' विस्तीर्ण वस्त्र त्यास परिधान करवून चंद्रसूर्याचीं देदीप्यमान कुंडलें, तारांगण मौक्तिकांचा हार, व अनंतकोटी ब्रह्मांडरूपी नानाविध चित्रविचित्र आभूपणें घालून सुशोभित केलें व चतुर्विध जीव चित्रें खेळावयास दिलीं, यामुळेंच हें महदाकाश कसें नेत्रांस रमणीय व चित्ताला आल्हादकारक झालें. ही अपूर्व शोभा कसली ? तर श्रीरूप मायेची. आकाशरूपी भव्य इमारत सुनीळ रंगानें रंगवून, सूर्यचंद्रादि अखंड दीप लावून, तारांगणांचीं हंड्या झुंबरें टांगून, चित्रविचित्र वर्ण मेघांचे पडदे सोडून, अनेक रंगांचा पृथ्वीरूप गालीचा अंथरून, यावत् वृक्षवल्लींचें उपवन तयार करून, समुद्रसरितादिकांचीं जागोजागीं सरोवरें भरून, अखिल जीवमात्रांचीं सजीव चित्रें मांडून, त्यांच्या कर्मरूप खानपानाचीं साहित्यें ठेवून; चतुर्दश खणांचा दिव्य वाडा स्वतः मायेनें आपल्या संतोषार्थ व विहारार्थ सुशोभित करून, सच्चिदानंदघन परमात्मपतीसहवर्तमान अनादि अनंत कालापासून हा महाप्रपंच करीत बसली आहे. या सर्व अवाढव्य खटल्याचा समावेश कशांत झाला ? तर महाकाशांत, व याच्या योगानेंच महाकाशांत शोभा आली; नाहींपेक्षां तें शून्यरूपच राहतें. आणि मायेला तरी हा आपला अनंत कोटि ब्रह्मांडांचा प्रपंच मांडण्यास आकाशावांचून दुसरें विस्तीर्ण ठिकाणच नाहीं. ती आपल्या सर्व सृष्टिरूपासह व रूपाश्रित सौंदर्यादि गुणांसह सर्वव्यापक असें श्रीरूप धारण करून परमात्म्याचे आकाशविभूतींत विराजमान झाली. व तें निजस्थान बिंदुरूप करून पूर्णसप्तावयवसंयुक्त अशा **श्रीं** बीजरूपानें प्रगट झाली. आपण विस्तीर्ण अशा मैदानांत उभें राहून वरतीं आकाशाकडे व खालीं भूमी-

कडे अवलोकन केलें ह्मणजे चहूंकडून आकाश अर्धवर्तुलाकाररूपानें भूमीला चिकटलें आहे असें दिसतें. असेंच आकाशाचें अर्धवर्तुल पृथ्वीचे खालचे भागास आहे. दोन्ही मिळून पूर्णवृत्त होतें. ज्यास खगोल अशी संज्ञा असून त्यांत सूर्यचंद्रादि तारांगणें आपले क्रांतिवृत्तांत अखंड परिभ्रमण करीत आहेत, असें हें आकाश पूर्णवृत्ताकार दिसतें. व बिंदूचीही आकृति वर्तुलाकारच असल्यानें सर्व सृष्टि आकाशबिंदूंत शोभायमान दिसत असलेली आपण नित्य पहातच आहोंत. हेंच जगन्माता **आदिशक्ति** मायेचें **श्रीं** बीजरूप आहे. प्रिय सुज्ञ वाचकहो, ॐकाररूप परमात्म्याचें व **श्रीं** बीजरूप मायेचें स्वरूप आणि विभूति इ० कांचें माझे अल्पमतीस वर्णन करतां आलें तें मीं केलें आहे. न्यून असेल तें पूर्ण करून घ्या. आतां मी मायेची शक्ति वर्णन करितों.

## मायेची शक्ति.

**मायेनें** अखिल चराचरात्मक सृष्टि निर्माण केली, त्यांत अतिस्थूलापासून तों रज:कणापर्यंत यावत् पदार्थमात्रांत जसे अनेक प्रकारचे **गुण** अभिन्नरूपानें भरले आहेत, त्याचप्रमाणें पदार्थाश्रित **शक्तीही** अभिन्न स्वभावानें भरली आहे. जसें पदार्थापासून त्यांचे गुणांस पृथक् करितां येत नाहीं, तसें पदार्थांत असलेली शक्तीही पृथक् होऊं शकत नाहीं. पदार्थ दृश्य असतो तो इंद्रियांनीं ग्रहण होतो व अदृश्य असतो त्याचें ग्रहण कल्पनेनें होऊं शकतें. पण **शक्तीचें** स्वरूप सदैव अदृश्यच आहे. तिचें ज्ञान कार्यावरून होतें. कार्यरूपानें ती व्यक्त होण्यापूर्वीं आपल्या कारणरूप पदार्थांत अव्यक्त असते. पदार्थाश्रित जे गुण व शक्ति असते त्यांची वृद्धि आणि क्षय होण्याची क्रिया नेहमीं सुरू असते व त्यांच्यांत क्षणोक्षणीं बदल पडत असतो. एका पदार्थांत जी स्वाभाविक शक्ति असते त्या शक्तीची बाधक शक्ति दुसऱ्या पदार्थांत असते, असा शक्तीचा साधकबाधकपणाही पदार्थांत असतो. पदार्थाश्रित शक्तीचें उत्क्रमणही होत

असतें, ह्म० एका पदार्थाची शक्ति दुसऱ्या पदार्थांत जाऊं शकते. एका पदार्थांतून दुसऱ्या पदार्थांत शक्ति जरी गेली, तरी पूर्वी पदार्थांत शक्तीचा कांहीं तरी अंश शेष राहतोच. ज्यांत कोणतेंह प्रकारची कशीहि शक्ति नाहीं असा पदार्थच सृष्टींत आढळणार नाहीं. न्यूनाधिक भावानें पदार्थमात्रांत ह्म० सर्व सृष्टींत शक्तीचा ओतप्रोत भाव आहे.

अशी जी ही प्रचंड व्यापक **शक्ति** हेंच मायेचें **शक्तिस्वरूप** आहे. जशी शक्ति पदार्थाश्रित असते त्याचप्रमाणें ही **माया महाशक्ति** परमात्माश्रित असते. त्याच्या आश्रयावांचून हिला राहतां येत नाहीं. **परमात्मा** अखंड स्थिररूप आहे व **माया** अखंड चंचल आहे. तिनें चंचलरूप टाकिलें तर तिचें मायापण नष्ट होतें ह्मणून ती सदैव स्वतःच्या सभोंवतीं परिभ्रमण करीत असते. कारण ब्रह्मासभोंवतीं फिरूं ह्मणेल तर तेथें हिचा काय पत्ता लागतो, उलट नाहींशी होण्याची मात्र भीति आहे. ह्मणून आपलेपण कायम राखण्याकरितां ठिकच्या ठिकाणींच फिरते. कोणताही पदार्थ आपल्या सभोंवतीं फिरला कीं त्याची गति वृत्ताकार होते. मग तो पदार्थ चतुष्कोण–त्रिकोणं, लांबट इ० कसाही असो. जानव्यांत अडकलेली किल्ली बोटावर फिरविण्याचा लहानपणाचा अनुभव सर्वांस ठाऊकच आहे. ती फिरवितांना कसें वृत्त बनलेलें दिसतें. याचप्रमाणें हवा तो पदार्थ फिरवा, तो त्याच्याच सभोंवतीं फिरला कीं वृत्ताकार झालाच. त्याचें फिरणें थांबल्यावांचून त्या पदार्थाच्या आकृतीचा यथार्थबोध कधींच होत नाहीं. या नियमाप्रमाणें मूलाधार परमात्म्यांत मायेचें जें परिभ्रमण झालें तें **अखंड ॐकाररूप** झालें; त्याची आकृति ब्रह्मप्रकारणाचे शेवटीं दाखविलीच आहे, ती वाचकांचे लक्षांत असलीच पाहिजे. ही मूलमायेची आकृति आहे. याच आकृतीनें माया स्वतःचच सभोंवतीं फिरून अखंड प्रदक्षिणा देत असल्यानें तीच आकृति प्रचंड वेगांत भरल्यामुळें जें वृत्त झालें तेंच '**अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरम्**' हें अखंड वृत्त आहे. ह्या वृत्तांत अनंतकोटि ब्रह्मांडें व ब्रह्मांडांतील यावत् वस्तुमात्र सांपडून परिभ्रमण करीत आहेत. या सृष्टीस परिभ्रमणाची गति देणारी जी अचिंत्य

महाशक्ति आहे, व हिच्या शक्तीचा जो मंडलाकार वेगाचा महाप्रवाह चालला आहे, तोच पदार्थांच्या योग्यतेनुरूप त्यांच्यांत ह्म० पदार्थांत न्यूनाधिकभावानें ओतप्रोत भरला आहे. व ती **महाशक्ति** चंचलगतिरूप स्वभाववती आहे. याचेंच हें, ह्म० एका पदार्थांतून दुसऱ्या पदार्थांत शक्ति जाणें, शक्तीचा वृद्धिक्षय होणें, आणि पदार्थांत एकमेकांची साधकबाधक शक्ति असणें, हें प्रत्यक्ष प्रमाण होय. ही गोष्ट आतां उदाहरणांनीं सिद्ध करून दाखवितों.

पदार्थ व पदार्थाश्रित शक्ति हे दोघेही भिन्नाभिन्न स्वरूप आहेत. पदार्थ दिसतो, शक्ति दिसत नाहीं. तिचें पदार्थांत अस्तित्व कार्यावरून अनुभवास येतें. त्यावरून अमुक पदार्थांत अमुक प्रकारची शक्ति आहे असा बोध होतो. येथें पदार्थाचें व शक्तीचें भिन्न रूप आहे. आणि पदार्थाला सोडून निव्वळ शक्तीला पृथक् रहातां येत नाहीं. ह्मणून पदार्थ व शक्ति अभिन्नरूप आहे; असें पदार्थ व शक्तीचें ऐक्य आहे. ही गोष्ट नीट लक्षांत आणलीना ? शक्तीचेंच सामर्थ्य, बल, पराक्रम, प्रताप इ० पर्याय शब्द आहेत, या सर्वांचा अर्थ ह्म० शक्ति हा आहे.

अग्नीमध्यें स्वाभाविक शक्ति दाह करण्याची आणि प्रकाश करण्याची अशी दोन प्रकारची आहे. यांत प्रकाश हें अग्नीचें रूप असून दाह करणें ही त्याची शक्ति आहे. अग्नीचें प्रकाशरूप नेत्रांनीं दिसतें, पण दाहकशक्ति नेत्रांनीं दिसत नाहीं. अग्नीला हस्तस्पर्श झाल्यानें चटका बसण्याची जी क्रिया घडली त्यावरून अग्नींत दाहक शक्ति आहे याचा बोध झाला. **क्रिया ह्म० कार्य,** कार्यावरून शक्तीचा बोध होतो. तो हा असा, काष्ठाची शक्ति अग्नीला साधक आहे आणि जलाची शक्ति अग्नीला बाधक आहे. काष्ठाच्या साह्यानें अग्नि प्रज्वलित होतो. जलाच्या संयोगानें अग्नि विझतो. अशा अग्नि व जलांत एकमेकांच्या विरुद्ध शक्ति स्वाभाविक आहेत. पण ज्याचें बल ज्या वेळीं अधिक होईल तो दुसऱ्यास बाधक होईल. जल थोडें असून अग्नि अधिक असल्यास, जरी जलाची स्वाभाविक शक्ति शीतल करण्याची आहे, तरी अग्नीच्या अधिक शक्तीनें हिचा नाश होतो. तेंच जल अग्नीपेक्षां अधिक झालें कीं, अग्नीच्या शक्ती-

चा नाश होतो. याच उदाहरणावरून आणखी भिन्न पदार्थांत शक्तीची साधकबाधकता जुळणें शक्य आहे.

लोखंड, तांबें, पितळ इ० पदार्थांत जी शक्ति आहे, ती अग्नीच्या शक्तीला साधक अथवा बाधक, काष्ठजलाप्रमाणें नसून त्याच्यांत अग्नीच्या शक्तीला आपल्यांत ग्रहण करण्याची शक्ति आहे. लोखंडाचा दांडा अग्नींत टाकला तर त्यानें अग्नीची वृद्धि होत नाहीं. पण त्याच्यांत अग्नीचा सामान्य प्रकाश व विशेष दाहक अशी शक्ति येते. अंधारांत तापलेल्या लोखंडी गोळ्याचा अगदीं दिव्यासारखा प्रकाश पडणार नाहीं, सामान्यच राहील, पण चटका मात्र फार कडक बसेल. तोच तप्त गोळा दुसऱ्या भांड्यांत ठेविल्यास तेंहि तापतें. त्या तापलेल्या भांड्यास थोड्या पाण्यांत ठेविलें कीं तें पाणी ऊन होईल व त्या पाण्यावरून जें वारें येईल तें वाफ होऊन अंगाला उष्ण लागून अंगही उष्ण होईल. यांत बारीक विचार करून पहा, अग्नीची शक्ति एकांतून दुसऱ्यांत अनुक्रमें कशी संचार करून गुप्त झाली. यावरून एका पदार्थांतली शक्ति दुसऱ्या पदार्थांत कशी जाते हें सहज कळून येण्यासारखें आहे.

अनुकूल स्वभावाच्या पदार्थांचें साहाय्य झालें ह्मणजे शक्तीची वृद्धि होते. आणि अनुकूल न मिळालें अथवा प्रतिकूल साहित्य मिळालें ह्म० शक्तीचा क्षय होतो. अग्नीला काष्ठ—घृत—तैल इ० पदार्थांचें अनुकूल साहित्य मिळालें कीं शक्ति वाढली, आणि हेंच जर न मिळालें अथवा थोडें थोडें जलसिंचन केलें तर अग्नीची शक्ति क्षीण होईल. जठराग्नींत अनुकूल खानपानाची योजना केल्यास बलवृद्धि होते. प्रतिकूल पदार्थ खाल्ले कीं शक्ति क्षीण झालीच. बालपणापासून तारुण्यापर्यंत शक्तीची साहजिक वृद्धि होते, पुढें उतार वयांत शक्तीचा ऱ्हास होत असतो; पण मध्येंच कांहीं प्रतिकूल क्रिया घडली कीं शक्तीचा नाश झालाच. अशीं अनेक उदाहरणें ताडून पहावीं.

कांहीं पदार्थांत शक्तीचा वृद्धिक्षय आपले आपण साहजिक होत असतो. वनस्पत्योषधि जुन्या झाल्या ह्म० निःशक्त होऊन निरुपयोगी होतात. आणि मात्रा रसायनें इ० जितक्या जुन्या होतात

तितकी त्यांच्यांत गुणांची शक्ति वाढते. सृष्टींत असंख्य पदार्थ व त्यांच्यांत अनंत गुणदोष भरले आहेत, त्यांचा विचार करीत बसल्यास ग्रंथांचे ग्रंथ निर्माण होतील व झालेहि आहेत. तात्पर्य काय, अखिलचराचरात्मक सृष्टि एका प्रचंड शक्तीच्या महाप्रवाहांत गडबडत फिरत आहे. त्याचा वेग प्रत्येक पदार्थमात्रांत भरून जो एकांतून दुसऱ्यांत परिभ्रमण करीत आहे तोच पदार्थाश्रित शक्तीच्या वृद्धिक्षय इ० रूपानें दिसत आहे. असा जरी हा शक्तीचा वृद्धिक्षय होतो तरी पदार्थांत कोणतीच शक्ति नाहीं, असें मात्र कदापि होणार नाहीं. कारण ' पदार्थ ', शक्तिप्रवाहाच्या बाहेर जाईल तर निःशक्त होईल, आणि असें होण्याचा मुळींच संभव नाहीं, ह्मणून पदार्थाश्रित शक्तीचा वृद्धिक्षय झालेला आपण जरी पहातों तरी, पदार्थांत कांहीं तरी शक्ति शेष राहतेच अथवा दुसरी येते. चंदनाचे काष्ठांत शीतलता व सुगंधिकशक्ति आहे. तेंच काष्ठ अति जुनें झालें तर वरील दोन गुण नाहींसे होतील, पण तें लांकडी कामांत उपयोगीं पडणार नाहीं असें नाहीं. काष्ठौषधीच्या आंगची रोगहारक शक्ति गेली तरी अग्निवर्धक शक्ति गेली नाहीं. घृतांत पौष्टिक शक्ति असून तें केवळ अमृत आहे असेंही ह्मटल्यास चिंता नाहीं; पण तेंच जर अति जुनें झालें तर अगदीं विष होतें. असें होण्यानें त्याची पौष्टिकशक्ति जाऊन खाण्याचे उपयोगीं राहिलें नाहीं; पण तलवारीचे घावासारख्या व्रणास औषधीच्या अति उपयोगीं पडेल व नेत्रांजनांतही त्याचा उपयोग होतो. येथें पहा एक शक्ति जाऊन दुसरीच शक्ति आली. असो. आतां उगीच जास्त उदाहरणें देऊन वाचकांस कंटाळवीत बसत नाहीं. लहानसा काडीचा तुकडा दोन्ही बोटांत उभा धरून दाबूं लागल्यास तो न तुटतां बोटांत बोचूं लागतो; तुटूं इच्छित नाहीं. यावरून स्वसंरक्षणाची शक्ति पदार्थमात्रांत आहे व निरुपयोगी अशी एक काडीसुद्धां सृष्टींत आढळणार नाहीं व शक्तीवांचून उपयोग होत नाहीं. सारांश सृष्टपदार्थमात्रांत शक्तीचा प्रवाह अखंड मंडलाकार सारखा वहात आहे. त्यामुळें शक्तींत पदार्थ व पदार्थांत शक्ति असा ओतप्रोत भाव आहे. आतां पदार्थाश्रित असलेल्या शक्तीच्या पृथक स्वरूपाचा एक लहानसा दृष्टांत देऊन ही व्याख्या आटोपतों.

विचार करून पाहिल्यास असें कळून येईल कीं, **शक्ति** पदार्थाश्रित असून ती त्या पदार्थाच्या स्वरूपाहून वेगळी कशी आहे ती.—कोरफडीचा गीर व मीठ एकत्र कालवून हातास चोपडला असतां प्रज्वलित अग्नींतही हात घातला तरी पोळत नाहीं. तापलेल्या लोखंडी सांखळीवर तेल टाकून ज्वाला निघत असतां हातांनीं ती सांखळी चाळणें, प्रज्वलित लोखंडी फणीनें तेल लावून केंस विंचरणें इ० चमत्कारिक खेळ सर्वांचे पाहण्यांत बहुधा आहेतच. असे शक्तिस्तंभनाचे मणिमंत्रौषधी अनेक आहेत; त्यांचा विस्तार येथें अप्रासंगिक होईल. असो. तात्पर्य काय, अग्नि प्रज्वलित असतां औषधि लावून त्यांत हात घातल्यानें तो जळत नाहीं. यांत अग्नीचे प्रज्वलित रूप कायम आहे तसें आहेच, त्याचे स्वरूपाचा लोप न होतां त्याचे अंगीं जी दाहक शक्ति आहे, तिचाच फक्त बाध ह्म० रोध औषधीच्या शक्तीनें केला आहे. अग्नीच्या स्वरूपाहून त्याची शक्ति भिन्न नसती, तर अग्नि विझल्यावांचून दाहकशक्ति कुंठित झाली नसती. अग्नीचें स्वरूप कायम असतां ज्याअर्थीं शक्ति कुंठित होते त्याअर्थीं ती स्वरूपाहून भिन्नच असली पाहिजे. बरें वेगळी आहे म्हणून अग्नींतून अगदीं पृथक् स्वरूपानें दाखवितां यईल का? तर नाहीं. ह्मणून अभिन्नरूप आहे. यावरून वस्त्वाश्रित 'वस्तुशक्ति' वस्तूंत अव्यक्त आणि **भिन्नाभिन्नस्वरूप** आहे असें सिद्ध झालें.

येथें कोणी अशी शंका घेतील कीं, अग्नींत लोखंडाची पळी चटका लागे पुरती ऊन केली म्हणजे फक्त पळींत दाहक शक्तीच पृथक् येते, अग्नीचें स्वरूप कोठें येतें. मग स्वरूपाहून शक्ति भिन्न होऊं शकत नाहीं हें म्हणणें कसें संभवतें?

त्याचें उत्तर असें कीं, पळी तापल्यानें तिच्यांत जी दाहक शक्ति आली त्या शक्तीबरोबरच अग्नीचें रूपही आलेंच. पण तें अव्यक्त रूपानें सामान्य आलें आहे. शक्तीच फक्त जाऊं शकते. रूप जाऊं शकत नाहीं. असाच नियम असता तर लोखंडी गोळा अग्नीचें सर्पण तर नाहींच, मग तो तापून लाल झाल्यावर त्याचा प्रकाश कां पडतो? शक्तीबरोबर रूप जाऊं नये असें आपलें म्हणणें होतें ना! तें अन्यथा आहे. पळींत दाहकशक्तीबरोबरच प्रकाश-

क रूपही गेलें, पण त्या पळींत प्रकाश ग्रहण करण्याची शक्ति पूर्ण नसल्यानें अग्नीचें स्वरूप अव्यक्त राहतें. जितक्या वेळपावेतों पळी तापत ठेविली तितक्या वेळ लांकूड ठेविल्यास त्यांत प्रकाशक रूप व दाहकशक्ति दोन्ही व्यक्त होतील. ( अनुकूल साधन अथवा उपाधीवांचून व्यक्तता होत नसते हें अ० बोधांत सांगितलेंच आहे. ) यावरून वस्त्वाश्रितच शक्ति असते, पृथक् होत नाहीं, असेंच कबूल केलें पाहिजे. वस्तु व्यक्त असते व शक्ति त्यांत अव्यक्त असते, ती कार्यावरून अनुभवास येते. हें वाचकांच्या नीट लक्षांत आलेंच पाहिजे.

मुखानें उच्चारित शब्दांत आणि हस्तलिखित अक्षरांत अर्थबोधक शक्ति समान असल्यानें शब्द व अक्षर यांचें ऐक्य आहे. ही गोष्ट अव्यक्तबोधांत ओंकाराचे प्रकरणांत सिद्ध झाली आहे. शब्दांत जी अर्थबोधक शक्ति आहे त्यांत दोन भेद आहेत. शब्दांतून जो अर्थ निघतो त्या अर्थाशीं व शब्दाशीं अत्यंत अभिन्न संबंध आहे. या संबंधास शास्त्रांत 'वृत्ति' असें म्हणतात. शब्द कानीं पडतांच जो एकदम अर्थबोध होतो, अशी जी शब्दाची अर्थबोधक शक्ति त्या शक्तीला शब्दाची **शक्यवृत्ति** असें ह्मणतात, आणि जो शब्द कानीं पडल्यावर एकदम यथार्थ अर्थबोध न होतां विचार करून, लक्षणें बरोबर पटवून, मग अर्थ लक्षांत आणून जो यथार्थबोध होणें, त्यास शब्दाची **लक्षणावृत्ति** असें ह्मणतात. अशी शब्दांत अर्थबोधक शक्ति दोन प्रकारची आहे. जशी पदार्थाश्रित शक्ति असून ती एकांतून दुसऱ्यांत जाते, त्याप्रमाणें शब्दाश्रित अर्थबोधक शक्ति असून ती उच्चार करणाऱ्याचे अंत:करणांतून, जिव्हाद्वारा निघून ऐकणाराचे श्रवणद्वारा अंत:करणांत प्रवेश करते. म्हणून दोन्ही ठिकाणीं अर्थबोध समान होतो. यावरून शब्दांत शक्ति तर आहेच पण 'गति' ही आणखी सिद्ध आहे. असो, याचाही विचार पुढें सविस्तर करीन.

सुज्ञ वाचक हो, सर्वांचें तात्पर्य काय कीं, ज्याप्रमाणें एखाद्या मोठ्या भांड्यांत पाणी भरून त्यांत मूठभर तांदूळ टाकून हातानें त्या पाण्यास एकाच क्रमानें खूब ढवळलें ह्मणजे त्या भांड्यांत पा-

ण्याचें वृत्ताकार परिभ्रमण वेगानें चालून त्यांत पडलेले तांदूळ कसे गडबडत व धांवत, मंडळाकारच फिरतील. पाण्याचा वेग जोंवर सारखा जोरांत राहील तोंपर्यंत ते तांदूळही आपल्या गतींत समान अंतरानें फिरतील; वेग कमी होतांच त्यांची गतीही आकुंचित होत जाईल व वेग गेला ह्मणजे ते सर्व तांदूळ एकत्र गोळा होऊन बसतील. त्याप्रमाणें अगाध निःसीम मोठ्या परमात्मरूपी भांड्यांत माया रूपी जल भरलें आहे. त्याला अनंत जीवांच्या अनंत वासना आणि कर्मरूप हस्तांनीं ढवळून अचिंत्य व अमोघ वेगाची अखंड गति उत्पन्न झाली आहे. ज्यांस तुह्मी तारागणें ह्मणतां तीं कांहीं केवळ वर्फाचे प्रकाशमान होणारे निर्जीव गोल नसून अनंतकोटि ब्रह्मांडें आहेत. जसा तुमचा हा भूगोल आहे त्यापेक्षां ( अगणनीयपट ) मोठमोठे ते भूगोल असून तेथील अचिंत्य रचनेची कल्पना सुद्धां मनुष्यबुद्धीला होणें अशक्य आहे. अशीं हीं अनंत ब्रह्मांडें त्या मायाप्रवाहांत तांदुळांप्रमाणें गडबडत आपआपले क्रांतिवृत्तांत कायमचे समानांतरानें व वेगानें धांवत आहेत. तो मायाप्रवाहाचा वेग अखंड सारखा असल्यानें ब्रह्मांडें आपलीं क्रांतिवृत्तें सोडूं पावत नाहींत. आणि गति उत्पन्न झाली त्या अर्थीं केंव्हां ना केंव्हां तरी तीं शांत होणारच. पण या प्रचंड गतीला अनंत जीवांच्या कर्मवासनारूप हस्तांनीं एकसारखा अप्रतिहत वेग भरला जात असल्यानें हें मायाजलाचें ( जल नाहीं—जालाचें ) *आवर्त थांबूंच पावत नाहीं, ह्मणून सृष्टीला अनादि अनंत स्वरूप कायमचें आलें आहे. व जसें तें जल भांड्याच्या प्रतिबंधांत असल्यानें आंतील पदार्थांस गडबडवून सोडतें, पण त्याची भांड्यावर मात्र कांहीं शक्ति चालत नाहीं, किंबहुना आंतील पदार्थांवर शक्ति चालविण्याकरितां भांड्याचाच आश्रय घ्यावा लागतो, त्यावांचून स्वतः सांडून वाळण्याचा प्रसंग येतो, तसें, मायेला अनंत सृष्टीस परिभ्रमण करविण्याकरितां परमात्म्याचाच आश्रय घ्यावा लागतो. परमात्म्यावर मायेची कांहीं शक्ति चालत नाहीं. जास्त गडबड केल्यास तिलाच नाहींशी होण्याचा प्रसंग येतो. अशी

---

* पाण्याचा भंवरा.

ही माया महाशक्ति परमात्मवस्त्वाश्रित आहे. व भिन्नाभिन्न-स्वरूप आहे. ह्मणजे **अनिर्वचनीयरूप** आहे. याप्रमाणें हें मायेच्या शक्तीचें वर्णन झालें, आतां आपण मायेच्या गुणांचा विचार करूं.

---

## मायेचे गुण.

**गुण** आणि **शक्ति** यांत ह्मणण्यासारखा विशेष फरक नसून दोघांचें एकच स्वरूप आहे. किंबहुना 'गुण, शक्ति, स्वभाव, धर्म,' हे शब्द एकाच अर्थाचे पर्यायवाचक आहेत. तथापि गुणांत व शक्तींत फार सूक्ष्म अंतर आहे असें माझ्या बुद्धीला वाटतें. गुणाच्या आधिक्याचा परिणाम शक्ति होतो ह्म० पदार्थांत अथवा व्यक्तींत जो गुण असेल तो अधिक वृद्धिंगत झाला ह्मणजे तोच 'गुण,' 'शक्ति' रूपानें दिसूं लागतो. याचा विचार वरील अग्नीच्या उदाहरणांतच आपण करूं.

अग्नीचे अंगीं दाहक **गुण** आहे अथवा दाहक **शक्ति** आहे असें ह्मणण्याचा प्रचार आहे व तो यथार्थही आहे. त्यांत सूक्ष्म फरक इतकाच कीं, अग्नीपासून अंतरावर हात असूं दिल्यास थोडी उगीच आंच लागते. ( इतक्या सह्यउष्णतेपासून शीतकालांत सुख वाटतें ) अशा स्थितींत अग्नीचे आंगची उष्णता अग्नीचा **गुण** आहे. आणि तोच अंतरावर असलेला हात अग्नीच्या अति निकट आणला कीं, पोळूं लागतो. तो कां ? तर उष्णतेच्या **गुणाचें** आधिक्य झालें ह्मणून. येथें, 'पदार्थ,' निकट आल्यानें उष्णतेचा परिणाम **दाहक शक्तिरूप** झाला. दोन्ही ठिकाणीं एकच उष्णता आहे. पण जिच्या 'न्यूनाधिक' भावानें 'गुण व शक्ति' असा भेद दिसतो त्याचेंच दुसरें उदाहरण पहा.

वायूच्या अंगीं स्पर्शगुण आहे. वायूच्या सामान्य मंद स्पर्शानें शरीराला **स्पर्श** कळतो व त्यापासून सुखही वाटतें. येथें स्पर्श हा वायूचा **गुण** आहे. आणि त्याच वायूच्या स्पर्शाचें आधिक्य झालें

ह्मणजे स्पर्शांत वेग उत्पन्न होऊन तो पदार्थांस उडवून नेतो. मोठ-मोठे वृक्ष मोडतो. शरीराला त्रासदायक होतो. येथें वायूचा स्पर्श **शक्तिरूप** झाला. असो. यावरून आणखी उदाहरणें वाचकांनीं जुळवून घ्यावींत. यद्यपि **गुण** व **शक्ति** हीं एकरूपच आहेत, तथापि जें सूक्ष्मांतर आहे, तें दाखविलें आहे. ' गुण ' जोंवर ' पदार्थाश्रित ' ह्म० पदार्थांतल्या पदार्थांतच आहे, तोंवर तो **गुणरूप** आहे. आणि ' गुण ' पदार्थाश्रित राहून त्या गुणाची दुसऱ्या पदार्थांवर कोणत्याही प्रकारची क्रिया घडूं लागली ह्म० तोच ' गुण ' **शक्तिरूप** झाला. तात्पर्य व्यक्ति अथवा पदार्थांत जो ' विशेषणांश ' आहे, त्यासच ' गुण; शक्ति; स्वभाव; धर्म; ' असें ह्मणतात. हे गुण ज्या पदार्थाच्या अथवा व्यक्तीच्या आश्रित असतात ती व्यक्ति 'विशिष्ट' ह्मटली जाते. विशेषणांश आणि विशेष्यांश अशा दोन अभिन्न अंशांनीं युक्त व्यक्तीचें अथवा पदार्थाचें ' स्वरूप ' असतें. ज्यांत हे दोन अंश नाहींत असा पदार्थच नाहीं; ह्म० पदार्थाचें स्वरूपच या दोन अंशांवांचून सिद्ध होत नाहीं. असो. या विवेचनावरून **शक्ति** आणि **गुण** यांचा भेदाभेद वाचकांचे लक्षांत नीट आला असेल. आतां मायेच्या ' गुणा ' कडे वळूं.

येथें वाचकांस एक गोष्ट सुचवून ठेवितों ती त्यांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. ती अशी कीं, पूर्वीं मायेची शक्ति वर्णन केली व आतां गुणवर्णन करीत आहें. हे **गुण** व **शक्ति** जशी इतर वस्तु आश्रित गुण व शक्ति ' विशेषणांश ' होऊन वस्तु ' विशिष्टांश ' राहते आणि दोन्ही अंशांनीं युक्त वस्तूंचें स्वरूप असतें, तसें मायेचे स्वरूपांत ' गुण–शक्ति ' विशेषणांश ', आणि ' माया विशिष्टांश ' असें दोन अंशांनीं युक्त मायेचें स्वरूप सिद्ध होत नाहीं. कारण माया स्वतंत्र वस्तुरूप ' विशिष्टांश ' नसून गुण आणि शक्ति रूपानें ' विशेषणांश ' आहे. व या विशेषणांशानें युक्त **परमात्मा** विशिष्ट आहे. ह्म० ' परमात्मा ' वस्तुरूप आहे व वस्त्वाश्रित जी **शक्ति** अथवा जे **गुण** असतात, तीच गुणशक्तिरूप **माया** आहे. परमात्मवस्तु वेगळी व तिचे गुण शक्ति हे वेगळे. अथवा माया वस्तु वेगळी व तिचे **गुण** शक्ति हे वेगळे, असा मात्र भेद अगदीं

मनांत आणूं नये. परमात्म्याचींच ' शक्ति–गुण–स्वभाव–धर्म ' इ० जीं कांहीं विशेषणें ह्मणून आहेत तीं सर्व **मायारूप** आहेत. मायेला पृथक् स्वरूपच नाहीं. जसा विशेषणाचा व विशिष्टांशाचा अत्यंत अभेद असतो; ह्म० दोन्हीं अंश एकच स्वरूप असतात, फक्त बोलण्यांत मात्र दोन ह्मटले जातात, व त्यामुळें दोन असावेत असें वाटतें, परंतु ते एकच आहेत. त्याप्रमाणें परमात्म्याच्या व मायेच्या विशेषणविशिष्टांशांत अत्यंत अभिन्नता आहे. ह्म० एकच स्वरूप आहेत. केवळ बोलण्यांत मात्र ' परमात्मा व माया ' असे दोन बोलले जातात. पण दोन दिसत नाहींत. माया गुणशक्तिरूप ह्म० ' जगद्रूपानें ' दिसते तोंवर **परमात्मवस्तु** दिसत नाहीं. आणि परमात्मवस्तु अनुभवांत आली ह्म० गुणशक्तिरूप **माया** दिसेनाशी होते; ह्म० जगत् दिसेनासें होतें असा अर्थ नाहीं. केवळ माया, जगत् व परमात्मा, हा भेद नाहींसा होतो. व जें आहे तें **परमात्माच** आहे, तद्व्यतिरिक्त कोठें कांहींच नाहीं, असें ह्मणावें लागतें. असो.

मायेचे गुण तीन आहेत ह्म० ' माया त्रिगुणात्मिका ' आहे. **तम-रज**–आणि **सत्व,** अशा तीन गुणांनीं माया व्यक्त होते. मायेचें व्यक्त स्वरूप **जग** आहे. असें मीं अ० बोधांत सिद्ध केलेंच आहे; ह्म० तीन गुणांचें मिश्रतत्व हेंच जग आहे, व हेंच मायेचें स्वरूप आहे. पदार्थाश्रित शक्तीच्या उपलब्धीनें जशी मायेच्या महा शक्तीची कल्पना सिद्ध झाली तसेंच पदार्थाश्रित गुणांवरूनच मायेच्या गुणांचें स्वरूप सिद्ध होणार आहे. तें असें, सृष्टींतील यावत् जड पदार्थमात्र ह्म० चलनवलनशून्य, आणि जीवनरहित, यांत मायेचा **तमोगुण** व्यक्त होत आहे. ज्यांला परप्रेरणेवांचून जागचें हालतां येत नाहीं, व ज्यांच्यांत जीव नाहीं, केवळ जसे जेथें आहेत तसे आहेत. असे ' पदार्थ ' तमोगुणी म्हटले जातात. ज्या पदार्थांत चलनवलन आणि जीवन आहे, ते पदार्थ रजोगुणी आहेत, ह्म० मूळचा जडांश कायम राहून सजीवपणा आल्यानें ते पदार्थ चलनवलन करूं लागतात. अशा पदार्थांत मायेचे दोन गुण व्यक्त होतात. आणि ज्या पदार्थांत तम-रज हे गुण आहेत, हें जाणण्याची,

या दोन गुणविशिष्ट पदार्थांचा उपयोग करण्याची आणि त्या उपयोगापासून होणारें सुखदुःख अनुभविण्याची जी ज्ञानशक्ति आहे, तो पदार्थ सत्वगुणी आहे. असा मायेचा सत्वगुण व्यक्त होणारा व ज्ञानशक्तियुक्त पदार्थ कोणता ? तर **बुद्धि** हा आहे. तमोगुणी जड पदार्थ ' मृत्-काष्ठ, पाषाण ' इ०. रजोगुणी सजीव पदार्थ वृक्ष, वल्ली, पर्वत इ० ' आहेत. हें अ० बो० त व्यक्त करून दाखविलेंच आहे, त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. वाचकांनीं पाहून घ्यावें

आतां येथें असा विचार पहा कीं, हे तीन ' गुण ' पदार्थांत न्यूनाधिक भावानें केवळ बोध होण्याकरितां दाखविले आहेत. वास्तविकरीत्या यांचें आपसांत मिश्रण आहे. एकाच्या साहाय्यावांचून दुसरा व दोघांच्या साहाय्यावांचून तिसरा, असें गुणास विभक्त राहतां येत नाहीं. सदैव मिसळलेले असतात. परमात्म्याचे **सच्चिदानंद** गुण, जसे ' अखंड एकरस व्यापक ' आहेत न्यूनाधिक भाव मुळींच होत नाहीं; तसे मात्र मायेचे हे **तम, रज, सत्व** गुण अखंड एकरस रहात नाहींत. पदार्थांत गुणाचा न्यूनाधिक भाव आणि वृद्धिक्षय नेहमीं सुरूच असतो. व यामुळेंच ' गुणांचे ' न्यूनाधिक भावाचा परिणाम ' शक्तिरूप ' होतो. शक्तिरूप झाला कीं कार्यक्षम होतो. कार्यक्षम झाला कीं त्याच्यापासून झालेलीं कार्यें व्यक्त होऊं लागतात. व त्या कार्यांवरून अमुक पदार्थांत अमुक गुण आहे, अथवा शक्ति आहे असा बोध होतो. व त्या ' गुणांत ' शक्तिरूपता येते. ह्म० तमोगुणास **तामसी शक्ति,**—रजोगुणास **राजसी शक्ति** आणि सत्वगुणास **सात्वकी शक्ति** अशीं रूपें येऊन त्यापासून तीन वर्गांची सृष्टि ( ह्मणजे जे तीन वर्ग वर सांगितलेत ) निर्माण होऊन सृष्ट पदार्थांत ' गुण ' अथवा ' शक्ति ' पदार्थांचे योग्यतेनुरूप न्यूनाधिक भावानें व्यक्त होते. पण प्रत्येक पदार्थांत तिन्ही गुणांचा अंश मिश्रित असावयाचाच, तो मात्र जात नाहीं. ह्मणून ज्या पदार्थांत जो गुण अधिक असेल तो गुण **प्रधान** ह्मटला जातो. केवळ ' जड पदार्थ ' तमोगुणप्रधान आहेत व त्यांत ' रज-सत्व ' अतिगौण आहेत. ' सजीव पदार्थ ' रजोगुणप्रधान असून त्यांत तमोगुण गौण आहे. व सत्वगुण अति थोडा आहे.

' बुद्धितत्त्वयुक्त प्राणी ' ह्म० ज्यांत बुद्धि आहे ह्मणूनच ते प्राणी, पेक्षां दगडच आहेत. अर्थात ' बुद्धितत्त्वांत ' सत्वगुण प्रधान असून रजोगुण गौण आणि तमोगुण थोडा आहे. याप्रमाणें मायेच्या प्रधान गुणाची जी क्रिया झाली त्यापासून तीन वर्गांचे 'प्रधान गुणी' पदार्थ निर्माण होऊन त्या त्या पदार्थांत ते ते गुण व ती ती शक्ति व्यक्त होऊं लागली. आणि त्या पदार्थांपासून गुणशक्तिरूपान्वयें तसतशीच क्रिया घडूं लागली. क्रिया घडणें ह्म० एका पदार्थाच्या शक्तीचा दुसऱ्या पदार्थावर कांहीं तरी परिणाम होणें हें होय. दुसऱ्या पदार्थावर परिणाम घडविणें, हें शक्तींत ' गति ' उत्पन्न झाल्यावांचून होणारच नाहीं. गति उत्पन्न झाली कीं मालाकार परिभ्रमण सुरु झालें. मालाकार ह्म० वर्तुलाकार परिभ्रमणाचें उदाहरण व कारण शक्तिप्रकरणांत सांगितलेंच आहे. वर्तुलाकार परिभ्रमण कशावरून समजावें? अशी शंका आल्यास त्याचें उत्तर असें आहे कीं, पृथ्वी आपल्या ' आंसा ' भोंवतीं वर्तुलाकार फिरते त्याचें प्रमाण, सूर्य २४ तासांनीं ठिकचा ठिकाणीं आलेला दिसतो असें विद्वानांनीं सिद्ध करून दाखविलेंच आहे, हेंच उदाहरण आपण घेऊं.

**बुद्धितत्त्वांत** मायेच्या तिन्ही गुणांची उपलब्धि सिद्ध झालीच आहे. सुज्ञ वाचकहो, येथें जरा नीट सूक्ष्म लक्ष असूं द्या. बुद्धींत ' तमोगुण ' प्रधान झाला ह्म० निद्रा, आळस, कैफ, ह्मणजे नशा, मोह इ० उत्पन्न होतात. यांत ' सत्वरज ' गौण फार आहेत. कांहीं बरें वाईट कर्म करण्याची प्रवृत्ति झाली ह्म० बुद्धींत रजोगुण प्रधान होऊन सत्वगुण गौण व तमोगुण मंद होतो. बुद्धींत सत्वगुण प्रधान झाला ह्म० आनंद उत्पन्न होतो. येथें रजोगुण गौण व तमोगुण अतिमंद पडतो. असा गुणांचा न्यूनाधिकपणा कार्यावरून समजतो; पण हा समजतो कोणाला? **बुद्धिशोधक** असेल त्याला. आणि ' बुद्धितत्त्व ' मायेच्या सत्वगुण प्रधानतेपासून झालें असल्यानें त्याच्यांत ' ज्ञानशक्ति ' स्वतंत्र आहे. म्हणूनच तिला सर्व गुणांच्या न्यूनाधिकभावाचें व स्वस्वरूपाचें ज्ञान होतें. मला आळस आला आहे, काम करण्याची इच्छा आहे, आणि आनंद होत आहे इ० गोष्टींचें ज्ञान बुद्धीलाच होतें. जर आळसांत अथवा कामांतच बुद्धि बुडून गेली

असती तर, आळस येत आहे हें कोण सांगता ? ह्मणूनच ' बुद्धीला ' गुणानुरूप क्रिया करीत असतांही आपली ज्ञानशक्ति कायम राखितां येते. असो. येथें विचार करा. आनंद कांहीं वेळ राहून पुढें काम करण्याची इच्छा होते. त्यापासून परिश्रम झाले ह्म० आळस येतो. तेव्हां निद्रा अथवा विश्रांति घेतली ह्म० आनंदानें पुन्हां जीव ताजा होऊन पुन्हां काम करण्याचा हुरूप येतो. सुज्ञ वाचकहो, का ? गुणांचें क्रियारूपानें वर्तुलाकार परिभ्रमण झालें कीं नाहीं तुह्मीच सांगा ? ' परिभ्रमण ' गति असल्यावांचून होत नाहीं. याच उदाहरणावरून प्रत्येक पदार्थाश्रित गुणांचें व शक्तीचें परिभ्रमण सुरू झालें कीं शक्तीचें महाप्रवाहरूप मंडळ चाललें. समुद्राचें पाणी मेघांत, मेघांचें पृथ्वीवर, पृथ्वीचें ओढ्यांत, ओढ्याचें नद्यांत, नद्यांचें समुद्रांत, समुद्राचें पुन्हां मेघांत, कां झालेंना मंडलाकार परिभ्रमण.

याचप्रमाणें मायेची गुण-शक्ति ' पदार्थांत ' पदार्थांची गुण-शक्ति मायेंत, ह्म० परस्पर अभिन्न रूपानें शक्तीचा व गुणांचा महाप्रवाह ' परमात्माश्रित ' परिभ्रमण करीत आहे. आणि पदार्थांच्या योग्यतेनुरूप त्यांच्या द्वारा व्यक्त होत आहे. जसा नदीचा प्रवाह अमोघ चालला असतो, त्यांत लहान, मध्यम आणि मोठीं अशीं भांडीं वाहतीं सोडल्यास त्या भांड्यांत जितकी जागा असेल तितकेंच पाणी त्यांत येऊन बाकीचें जल प्रवाहरूपानें भांड्याभोंवतालीं आंत बाहेर व्यापून भांड्यास ओढीत नेत वाहत चाललेंच आहे, तशी गुणशक्तिरूप मायेच्या महाप्रवाहांत अखिल चराचरात्मक सृष्टि लुडकत चालली आहे. शक्तीचा प्रवाह सारख्या वेगांत असल्यानें सृष्ट पदार्थ कसे ठिकच्या ठिकाणीं अगदीं जखडून टाकलेले, ठराविक गतींनीं अखंड कालपरिभ्रमण करीत आहेत. लहान पदार्थांतील गुणशक्तींचा न्यूनाधिक भाव लवकर दिसतो. मोठ्यांचा कांहीं कालांनीं दिसतो. जे अतीच मोठे पदार्थ असतात, त्यांच्या गुणशक्तिज्ञानापर्यंत बुद्धीची उडी पोंचत नाहीं. त्याकरितां बुद्धिमान पुरुष प्रयत्न करून शोध काढतात. असें जरी झालें तरी, या अल्पमानवी बुद्धीला थांग किती लागणार ? जसें, तुषारांच्या घनीभावानें जल

झालेलें दिसतें. इतक्याच सिद्धांतदृष्टीनें पहाल तर, अगाध समुद्राचें मूलतत्त्व तुह्मांस कळलें असें होईल. पण तुषारांचें पाणी होतें आणि पाण्याचे तुषार होतात, या समजुतीस धरून जर तुह्मी मोठमोठीं *यंत्रें लक्षावधी लावून समुद्राचे तुषार करून उडवूं इच्छाल, तर तुमच्या प्रयत्नांनीं समुद्राच्या दृष्टीनें पाहिल्यास त्याचा एक तुषारही तुमच्याच्यानें उडविला गेला असें वाटणार नाहीं. तसें अखिल चराचरात्मक सृष्टिरूप **माया**, ही परमात्मसमुद्राचा एक तुषार आहे, असें यथार्थ ज्ञान अनुभवास येण्याचा प्रयत्न कराल तर सर्व परमात्म–समुद्र तुह्मांस कळणार आहे. आणि सृष्टपदार्थशोधकांनीं पदार्थशोधाची किती जरी वाफ दवडली तरी परमात्मसमुद्राच्या एक तुषाराचा सुद्धां पत्ता न कोणास आजपावेतों लागला, न कोणास यापुढें लागणार. सृष्टीचे मात्र अपूर्व शोध लागत जातील. व त्यांपासून अद्भुत चमत्कार दृष्टीस पडून त्याच्या उपयोगापासून मनोरंजन होईल. आपल्या पुरुषार्थाची आपल्यास व लोकांस धन्यताहि वाटेल. इतक्यानेंच मनुष्यजन्माचें सार्थक व कृतकृत्यता असें वाटत असेल तर मग पुढें जाण्याची खटपट पाहिजे कशाला ?

तात्पर्य, परमात्म्याचे आधारानें **माया** गुणशक्तिरूपानें अखंड सृष्टिरचनेच्या पुनः पुनः उत्पत्ति, स्थिति, लयरूप वर्तुलाकार प्रवाहानें चालली आहे. व सर्व व्यवस्था अप्रतिहत सुव्यवस्थेनें चाललेली आपल्या नित्यानुभवांत येत आहेच. असें जें परमात्म्याचें अगाध सामर्थ्य व गुण, हेंच मायेचें स्वरूप आहे. आणि परमात्माच मायास्वरूपानें सृष्टिरूप होऊन, आपणच सृष्टीचा स्वामी, नियंता आणि भोक्ता झाला आहे. ह्मणूनच ॥ **यद्भयात् वाति वातोऽयं सूर्यस्तपति यद्भयात् ॥ यद्भयात् वर्षते मेघः भूर्न मज्जति यद्भयात्** हें अखंड राष्ट्र सुरळित चाललें आहे.

सुज्ञ वाचकहो, मायेच्या गुणशक्तिरूपांत काय अंतर आहे, त्याच्या क्रियेपासून सृष्टिरूप कार्यें कशीं होतात, व त्यांत गुणशक्तीचा न्यूनाधिक भाव कसा होतो इ० विचार मांडून दाखविले ते नीट ध्या-

---

* स्टीमइंजिनें.

नांत आलेच असतील. आतां गुणांच्या आधिक्याचा परिणाम जो शक्तिरूप होतो व त्या शक्तीपासून पदार्थरूप सृष्टि निर्माण होते हें वर सांगितलें आहे. पण त्या शक्तींचीं प्रधानकार्यें ह्म० सृष्टि व्यक्त होण्यापूर्वीं काय होतात तीं सांगतों. मायेच्या तमोगुणप्रधान 'तामसी शक्तींत' पदार्थाला आवरण करणें म्हणजे झांकण्याची शक्ति असल्यानें तिला **आवरणशक्ति** असें म्हणतात. मायेच्या रजोगुणप्रधान 'राजसी शक्तींत' पदार्थाला विक्षेप करणें म्हणजे उत्थान देणें, गति उत्पन्न करणें, अथवा प्रवृत्त करण्याची शक्ति असल्यानें तिजला **विक्षेपशक्ति** असें म्हणतात. आणि मायेच्या सत्वगुणप्रधान 'सात्विकी शक्तींत' पदार्थाच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान उत्पन्न करण्याची शक्ति असल्यानें तिजला 'ज्ञानशक्ति' असें म्हणतात. अशी माया त्रिविध शक्तिरूप होऊन तीन प्रकारचीं कार्यें करिते. ज्या शक्तींत जो 'प्रधानगुण' असतो त्या प्रधान गुणाच्या अंतर्गत दोन गुण थोड्या अंशानें दिसावयाचेच, कारण त्यांची परस्पर सांगड पडली आहे. ज्या गुणाचें ज्यावेळीं प्रावल्य होतें तो गुण त्या वेळीं वर येऊन दोन गुणांस दाबूं लागतो, व ते खालीं दबलेले गुण, वरच्या गुणांस खालीं पाडून आपण वर येण्याचा प्रयत्न करीत असतात; अशी परस्पर झटापट चालू असते. ज्याचा जय होतो तोच प्रधान ह्मणवितो. याचें लहानसें उदाहरण आपल्या नित्य व्यवहारांतलेंच पहा. स्नानसंध्यादि सत्कर्मांत प्रवृत्ति सत्वगुणाच्या प्रधानतेनें होते. पण त्याच क्रिया करीत असतां रजोगुणानें मनांत दुष्ट वासना व भलतेच विचार येऊन ती सत्क्रिया बंद पडूं लागते, तेव्हां त्या दुर्बुद्धीस सत्वगुणानें दावण्याचा पुन्हां आपण प्रयत्न करित असतों. अशा या सत्वगुणाच्या व रजोगुणाच्या झटापटींत तमोगुण, निद्रा आलस्यरूपानें येऊन मध्येंच गचांडी धरतो. मग हातची माळ गोमुखींत पडून डुकल्या येऊं लागतात. आणि आपलाच आपल्यास राग येतो. असें हे गुणांचें संक्रमण अंतःकरणांत नित्य क्षणोक्षणीं होत असतें. आणि दक्षिणायनउत्तरायणाप्रमाणें गुणांचीं स्थूल मानानें अयनेंही पालटत असतात. हे महिने मोठ्या आनंदांत गेले,

हे महिने मोठ्या कष्टाचे गेले, हे इतके महिने सद्धर्मकृत्यांत तीर्थयात्रेंत गेले, असें आपण नेहमीं व्यवहारांत ह्मणतों व तसा अनुभवही होतो, हींच गुणांचीं स्थूल अयनें होत. बुद्धिमानानें व विचारवानानें आपल्या अंत:करणांतील गुणप्रवाहास क्षणोक्षणीं अवलोकन करून सात्त्विक मनोधर्माची व सत्क्रियेची वृद्धि केल्यास शांति व सुख सहज प्राप्त होईल.

वाचकहो आतां जरा मागें दृष्टि पोंचवा. ब्रह्मप्रकरणांत परमात्म्याचे चार पाद ह्मणजे तमोगुण सुषुप्त्यभिमानी **ईश्वर**, रजोगुण स्वप्नाभिमानी **हिरण्यगर्भ**, सत्वगुण जाग्रदभिमानी **विराट** आणि त्रिगुण त्रयावस्थारूप त्रिपादातीत असें चतुर्थपादरूप **तुरीयब्रह्म** सांगितलें आहे. व हे सर्व भेद मायोपाधीनें झाले आहेत, वास्तविकरीत्या **ब्रह्म** निर्गुण, अलिप्त व व्यापक आहे तसेंच आहे. मायेनें सृष्टिव्यापाराकरितां परमात्म्यांत आपले शक्त्यनुरूप ही सर्व प्रचंड खटपट केली आहे. इ० सविस्तर सांगितलेलें नीट ध्यानांत आणिलें पाहिजे म्हणजे पुढील गोष्ट चांगली समजुतींत भरेल.

सर्व **सृष्टि** मायेंत बीजरूपानें अव्यक्त होती व **माया** परमात्म्यांत बीजरूपानें होती. बीज बिंदुरूप असतें. या सिद्धांताप्रमाणें मायासंवलित परमात्मा व्यक्त **बिंदु** ह्मणजे सगुणरूपी होता. तेव्हां मायेची तमोगुणप्रधान अवस्था जी होती, तीच परमात्म्याची सुषुप्त्यवस्था झाली, व तिचा अभिमानी परमात्मा **ईश्वर**संज्ञक झाला. यांत सूक्ष्म विचार करा. जसें सुषुप्तींत स्वरूपाचें आवरण झालें म्हणजे कांहींच चलनवलन न राहतां केवळ गंभीर व शांत अशी केवळ ‘ अस्मितेची ’ स्थिति असते, तसें मायेनें तमोगुणप्रधान आवरणशक्तिरूपानें परमात्म्याचा भाग जितका कांहीं झांकतां आला तितका झांकला; तो झांकलेला भाग परमात्म्याची **कारणावस्था** झाली. त्याला **कारणशरीर** असेंहि ह्मणतात. जशी मृत्तिका ‘ कारण ’ स्वरूप असते. व तिजपासून पुढें कालानुरूप व इच्छेनुरूप घटरूप ‘ कार्यें ’ होतात. कार्यें होण्यापूर्वीं मृत्तिकेची कारणस्थिति आहे, तशी तमोगुण-

प्रधान ' कारणस्वरूप ' परमात्म्यापासून आतां पुढें सृष्टिरूप कार्य व्यक्त होणार, म्हणून व्यक्त होण्याच्या पूर्वींची परमात्म्याची स्थिति कारणरूप असल्यानें तें परमात्म्याचें ' कारण शरीर ' आहे असें जाणावें.

पुढें कालानुरूप तमोगुणप्रधान माया होती ती रजोगुणप्रधान झाली ह्म० तीच विक्षेपशक्तिरूप होतांच तिच्या उपाधियोगानें जितका परमात्म्याचा भाग पूर्वीं आवरणांत झांकला होता, तितक्याच भागास चांचल्यरूप गति अथवा उत्थान झाल्यानें ती परमात्म्याची **सूक्ष्मावस्था** किंवा **सूक्ष्मदेह** ह्मटला जातो; व हीच स्वप्नावस्थाही आहे ( ही स्थिति बीजाची भूमिगर्भांत कोंब उगवण्याचा पूर्वींची अंतर्घटना झाली; मागील दृष्टांत पहा. )

**माया**-तम-रजप्रधान होती ती सत्वगुणप्रधान ' ज्ञानशक्तिरूप ' होतांच चराचरात्मक **सृष्टि** पूर्ण व्यक्त दशेला येऊन पोंचली, व ती परमात्म्याची **स्थूलावस्था** झाली. हिलाच **स्थूलदेह** असें ह्मणतात. हीच ' जाग्रदवस्था ' हि आहे. ( बीजभूमिगर्भांत घटना करीत होतें तें बाहेर वृक्षदशेस आलें दृष्टांत पहा.)

याप्रमाणें **माया** त्रिविधगुणशक्तिरूपानें परमात्मस्वरूपास व्यापून, तमोगुणाच्या आवरणशक्तीनें, सुषुप्त्यवस्था अथवा कारणदेहाभिमानी **ईश्वर**, रजोगुणाच्या विक्षेपशक्तीनें स्वप्नावस्था अथवा सूक्ष्मदेहाभिमानी **हिरण्यगर्भ** आणि सत्वगुणाच्या ज्ञानशक्तीनें—जाग्रदवस्था अथवा स्थूलदेहाभिमानी **विराट**, अशीं 'अवस्था, शरीरें, आणि नांवें' आरोपित करून अनादि अनंत कालची **सृष्टि**, **माया**, **व परमात्मा**, असे भेद 'अविचार' कालपर्यंत, अविचाऱ्यांस दाखवीत आहे. विचारदृष्टच्या कोठें कांहींच भेद नाहीं. केवल **परमात्मा** आहे. परमात्मा हें विशेषण तरी **जीवात्म्या**च्या अपेक्षेनें आहे. जीवभावच गेला तर मग परमात्मभाव कोठें आहे. तस्मात् कांहींच बोलतां येत नाहीं. केवल **सर्वाधार—सर्वस्वरूप** जें कांहीं आहे **तें मी आहें** असेंच वाटतें. याचा ज्ञानवानांसच अनुभव आहे. विचारवानांनीं मनन करून पहावें व बुद्धिमानांनीं असें जाणण्याचा प्रयत्न करावा. आणि सर्वांनीं मुमुक्षु

होऊन **सद्‌गुरूस** शरण जावें, म्हणजे सर्व भेदभाव नाहींसा होऊन **सच्चिदानंदघन परमात्मरूप** होण्याची किल्ली सांपडेल. दुसरा मार्गच नाहीं. हें मायाविवेचनाचें प्रकरण सद्‌गुरूच्या प्रेरणेनें यथामति लिहितां आलें तसें मीं लिहिलें आहे. न्यून असेल तें आपण पूर्ण करून घ्यावें.

---

ॐ श्रीं विराटात्मने नमः

## प्रकरण तिसरें.

# ईशानंद प्रदेश.

स एव विश्वस्य भवान्विधत्ते, गुणप्रवाहेण विभक्तवीर्यः ॥
सर्गाद्यनीहो वितथाभिसंधि, 'रात्मेश्वरो' ऽतर्क्यसहस्रशक्तिः ॥ १ ॥*

अयं हि विश्वोद्भवसंयमाना, मेकः स्वमायागुणबिंबितो यः ॥
विरंचिविष्णवीश्वरनामभेदान्, धत्ते स्वतंत्रः परिपूर्ण ' आत्मा ' ॥ २ ॥†

गेल्या प्रकारणांत मायेचीं सुंदर अशीं सगुण-निर्गुण नांवें, तिच्या श्रींबीजरूप नांवाची व परमात्म्याच्या ॐरूप नांवाची ऐक्यावयवरचना, परस्परांच्या विभूतींची एकरूपता, मायेच्या गुणांचा व शक्तीचा भेदाभेद व त्यांच्या न्यूनाधिकतेनें त्यांचा–प्रधान–गौण-भाव, मायेच्या अचिंत्य शक्तीचा व गुणांचा मंडलाकार धाराप्रवाह, तिच्या; आवरण–विक्षेप–ज्ञान शक्तिरूप–भेदांनीं परमात्मा निर्गुण व निर्विकार असतां त्याच्याठिकाणीं दिसत असलेल्या सुषुप्ति–स्वप्न–जागृतिअवस्था व त्यांच्या अभिमान्यांचीं ईश्वर–हिरण्यगर्भ व विराट् अशीं नांवें आणि मानसिक ध्यानानें व प्रत्यक्ष सृष्टिरूपानें दिसणारीं सगुणनिर्गुणरूपें इ० भेदकल्पना व अतर्क्य सृष्टिरचना हीं निर्माण कधीं झालीं, हीं केव्हांपर्यंत राहणार व कधीं संपणार, याचा पत्ता नाहीं. या विचारांत आश्चर्यानें बुद्धि कुंठित होण्याशिवाय अन्य कांहींच कळत नाहीं. असा हा विचित्र खटाटोप मायेनें परमात्म्यावर आणला आहे, असें वर्णन केलें.

* १ ' भागवते ३ स्कं० देवहूत्युक्तिः ' † २ ' अ० रामा० अहिल्योक्तिः '

# ईश्वराविषयीं चार आक्षेप.

यावर असे आक्षेप येतात कीं, माया सदसताहून विलक्षण अनिर्वचनीयरूप आहे ह्म० मिथ्या आहे. माया स्वतंत्र वस्तु नाहीं ह्म० वस्त्वाश्रित वस्तूचे गुण व शक्ति हे जसे अभिन्नरूपानें पृथक् असतात तशी माया वस्तु स्वतंत्र नसून परमात्मवस्त्वाश्रित जे गुण व शक्ति आहेत तेंच मायेचें स्वरूप आहे. मायेला पृथग्रूपता नाहीं असें सांगितलें आणि परमात्मा निर्गुण—निर्विकार—व्यापक-अगोचर असा आकाशाप्रमाणें अलिप्त राहणारा आहे असेंही सांगितलें आहे. त्याअर्थीं माया स्वतंत्र वस्तु नसतां आणि परमात्मा सर्वांहून अलिप्त असतां हा परस्परसंयोग आधाराश्रयाचा झाला कसा व त्यापासून अतर्क्य सृष्टि झाली कशी ? परमात्मा मायेच्या आवरणांत जर येऊंच शकत नाहीं व तिचा अभिमानही बाळगीत नाहीं, तर तो सृष्टीचा नियंता व भोक्ता कसा होऊं शकतो ? मायेचा संपर्कही जर परमात्म्यास होत नाहीं, तर सुषुप्ति—स्वप्न—जाग्रदवस्था आणि अवस्थांचे अभिमानी ईश्वर—हिरण्यगर्भ - विराट् हीं नांवें परमात्म्यावर आलीं कशीं ? जसें सूर्यावर धूळ कितीही जरी फेंकली तरी तिचा एक रज:कण देखील सूर्यापर्यंत पोंचणें कालत्रयांत संभवत नाहीं, तसें अलेपक परमात्म्यास मायेच्या विकाराचा संपर्क होत नसल्यानें तो सृष्टीचा कर्त्ता—भोक्ता आणि नियंता होऊं शकत नाहीं, आणि मायेला स्वतंत्ररूप व स्वसत्ता नसल्यानें तिला जगताची कर्त्री भोक्त्री व नियंत्री ह्मणतां येत नाहीं. स्वतंत्र सत्तेवांचून आणि स्वाभिमानावांचून कोणत्याही गोष्टीची मालकी येणें संभवत नाहीं. त्याअर्थीं या प्रचंड सृष्टिरचनेचा कोणी अधिकारी आहे कीं सृष्टीच स्वत:ची स्वत:च मालक असून जें जसें व्हावयाचें असेल तसें होत आहे. ज्यांच्या इच्छेस जसें वाटेल तसें त्यांनीं करावें, शेवटीं मरावें. ह्म० आपल्यामागें सृष्टीचें काय होतें कोण जाणे ! अशी अव्यवस्थित व अनियंत्रित सृष्टिरचना कांहीं तरी व कशी तरी आहे असें ह्मणावें लागतें. कारण परमात्मा अलिप्त आहे तर मायेला

आधाराश्रय कोणाचा व तिचा अभिमान बाळगणारा तरी कोण कीं जो सृष्टीचा स्वामी ह्मणवेल. जर असा कोणी नसेल तर मायाच स्वतंत्र वस्तु आणि जगत्स्वामिनी कां मानूं नये ? असें झालें ह्मणजे एक **परमात्मा** स्वतंत्र वस्तु व दुसरी **माया** स्वतंत्र वस्तु असें द्वैत कबूल करा अथवा मायाभिमानी विकारी ह्म० शबल परमात्मा आहे असें ह्मणा. व निर्मल, अलेपक व अविकारी हीं विशेषणें परमात्म्याचीं काढा किंवा परमात्मा व माया या दोघांसही सोडून सृष्टीलाच स्वतंत्रता आहे असें माना. हें मानणें फार सयुक्तिक होईल. कारण सृष्टिव्यवहार सर्व प्रत्यक्ष अनुभूत आहेत. आणि सर्व व्यवहार यथास्थित चाललेच आहेत. परमात्मा व माया हीं उगीच कल्पित मानून करावयाचें काय ? त्यांच्या न मानिल्यानें आमचें अडतें काय ? नाहींपेक्षां जगन्नियंता कोण आहे तो सांगा. अलिप्त परमात्मा व परतंत्र माया हे दोघेही जगत्स्वामी नसल्यानें माया कोणाच्या आधीन राहून हीं जगत्प्रपंचरचना कशी झाली व हिचा अभिमानी कोण ? इ० प्रबल शंका येतात. त्यांचें उत्तर असें.

शंकाकारांनीं आक्षेप आणिल्यांत मुख्य मुद्दे चार आहेतः—१ परमात्मा निर्मल, व्यापक आणि अलिप्त आहे, तो मायावरणांत येऊं शकत नसल्यानें जगन्नियामक होऊं शकत नाहीं. २ मायेला स्वतंत्र जगन्नियामकत्व असलें पाहिजे. कारण परमात्माश्रित माया राहूं शकत नाहीं. ३ मायाभिमानी शबल परमात्मा जगन्नियंता होऊं शकतो, त्यास निर्मल व अलिप्त हीं विशेषणें संभवत नाहींत. ४ सृष्टीच स्वतंत्र आहे. यथायोग्य व्यवहार कालानुरूप चालूच आहेत. ईश्वर—माया हीं खटलीं पाहिजेतच कशाला ? अशा प्रकारचीं सांख्यवादी, वैष्णव, नैय्यायिक, पदार्थवादी आणि चालू शकांतील सृष्टिनियमवादी यांचीं मतें आहेत. यांचीं क्रमशः उत्तरें लिहितों.

# प्रथमाक्षेपाचें उत्तर.

प्रथम आक्षेप, परमात्मा—निर्मल, अलिप्त व व्यापक असल्यानें मायेच्या आवरणांत येऊं शकत नाहीं. व जगन्नियंता होऊं शकत नाहीं, असा आहे तो आह्मास कबूल आहे. खरोखरच अखंडानंत चिद्घन व्यापक परमात्मा मायेच्या आवरणांत आला नसून जगन्नियामकत्वही त्याच्याकडे नाहीं. व जगदभिमानही त्यास नाहीं. कारण ज्याच्या अचिंत्य, अगाध आणि अनंत अशा स्वरूपगांभीर्यांत जगत् हा पदार्थच काय आहे, जसें मध्यसमुद्रांत जहाजांत बसून एक मिठाचा बारीक खडा त्याच्या अगाध जलांत टाकला असतां तो पुनः परत सांपडण्यास कांहीं उपाय आहे काय? कालत्रयांत नाहीं. तुमचे चुटकींत जोंपावेतों तो खडा होता तोंवरच त्याचें पृथक् अस्तित्व होतें. आणि हातांतून समुद्रांत पडल्यानंतरही हा खडा समुद्रांत असेल हें तुह्मासच वाटत आहे. समुद्रदृष्टीनें हा खडा माझेच जलापासून झाला आहे अथवा मीच झालों आहें व हा खडा माझा आहे असें ह्मणणें संभवेल अथवा शोभेल तरी काय? समुद्रजलाचें मीठ करणें त्याला पृथग्रूपानें पहाणें आणि पुन्हां समुद्रांत टाकणें ही सर्व क्रिया तुह्मींच केली व तुह्मींच पाहिली; तुमच्याच ह्मणण्यानें समुद्र आणि मीठ अशीं भिन्न नांवें आलीं; वास्तविक भिन्नता कालत्रयांतही नाहीं.

त्याप्रमाणें जोंपावेतों तुमची जगदृष्टि आहे तोंवरच जगाचें अस्तित्व आहे. स्वरूपसाक्षात्कारानें एकदां तें परमात्म्यांत बुडालें ह्मणजे पुन्हां कालत्रयांतही भिन्नानुभवानें त्याच्या प्रतीत होण्याचा संभवच नाहीं. असें हें अल्पक्षार कणाप्रमाणें जगत् याचा अगाधात्मसिंधूनें पृथक् अभिमान बाळगावयाचा तो काय. तो त्याचा रजःकण आहेच आहे. व्यक्ताव्यक्त जगत् ह्मणजे माया, जगताहून पृथक्स्वरूपच मायेला नाहीं. समुद्रजलाची क्षारकणरूपानें जी पृथक् प्रतीति तीच मायेची परमात्म्याहून पृथक् प्रतीति आहे. जी वस्तु ज्यांतून निर्माण होते ती त्याला आवरण करूं शकत नाहीं. जो क्षारकण समुद्रापासून उत्पन्न झाला तो त्यांत टाकल्यावर त्या क्षारकणानें समुद्र

व्यापला अथवा झांकला असें ह्मणणें शोभेल अथवा संभवेल काय ? कधींच नाहीं. अर्थात् परमात्मा मायेच्या आवरणांत आला, अथवा मायेचा किंवा जगताचा अभिमान परमात्म्याच्या ठिकाणीं आहे असें कधींच ह्मणतां येणार नाहीं. तो निर्मल, अलिप्त आणि व्यापक आहे तसाच आहे. हीं विशेषणें देखील आमचे बुद्धींत मल, विक्षेप, परिच्छिन्नतेच्या अपेक्षेनें आहेत ह्मणून आह्मींच दिलीं आहेत. भिन्न गुणावांचून व्यक्तता होत नसते हा आपला धडा आहेच. असो.

## दुसऱ्या आक्षेपाचें उत्तर.

दुसरा आक्षेप असा आहे कीं, परमात्मा मायेहून अलिप्त आहे. तिचा अभिमानी नाहीं. ह्मणून जगत्कर्त्री व नियंत्री मायेला स्वतंत्र माना. ( येथें शंकाकाराचें असें इंगित आहे कीं मायेला स्वतंत्र मानिली ह्मणजे एक तर परमात्म्याचें अस्तित्वच मानण्याची जरूर नाहीं अथवा मानलेंच तर एक परमात्मा अखंड अस्तित्वरूप आणि दुसरी मायाही अखंड अस्तित्वरूप जगन्नियंत्री होऊन कायमचें द्वैत उभें राहील आणि अद्वैतसिद्धांत ढांसळेल. ) या ठिकाणीं आक्षेपकारांस मी असा प्रश्न करितों कीं, सृष्टि ही काल्पनिक आणि प्रत्यक्ष अशी द्विविध आहे ह्म० मनोमय वासनात्मक सूक्ष्म सृष्टि आणि इंद्रियगोचर होणारी प्रत्यक्ष स्थूल सृष्टि. स्थूलसृष्टीस वासनात्मक सूक्ष्मसृष्टि कारण असून त्यांचा परस्पर कार्यकारणभाव संबंध आहे. वासना-कल्पना आणि इच्छा हे एकच अर्थाचे शब्द आहेत. इच्छा अथवा कल्पना इच्याच अनुरोधानें जी स्थूलकार्यांत प्रवृत्ति ही प्रवृत्तीच गतिरूप शक्ति आहे. आणि या शक्तीपासूनच स्थूलकार्य होतें. अर्थात् स्थूलकार्याला शक्ति कारण आहे. शक्ति आणि प्रवृत्तिरूप गति यांचें एकच स्वरूप आहे. प्रवृत्तीला इच्छा अथवा वासना कारण झाली. स्थूल सूक्ष्म सृष्टि वासना बीजात्मक आहे ह्म० वासनेपासूनच सर्व सृष्टि निर्माण होते. ही वासना, संकल्प अथवा इच्छा हेंच मूल मायेचें स्वरूप अद्वैतसिद्धांतांत

निश्चित आहे. आणि अ० बो० त सिद्धही केलेंच आहे. आतां असें विचारतों कीं, स्थूलसूक्ष्मसृष्टिबीजरूप जी वासना हिलाच तुह्मी माया ह्मणतां कीं ज्या आधारस्थानीं ही वासना स्फुरण पावते त्या आधारभूमिकेस माया ह्मणतां, अथवा कांहीं तिसऱ्या प्रकारचें मायेचें स्वरूप प्रतिपादन करून दाखवूं शकतां? नीट विचारानें उत्तर द्या.

सृष्टिबीजरूप 'वासना' हिलाच माया ह्मणाल तर आमचा सिद्धांत गळीं आला. अथवा यांतच कांहीं अंतर्भाव असा काढाल कीं, या प्रपंच सृष्टिरचनेला कोणी तरी महाशक्ति कारण असावी, तर शक्ति ह्म०च गतिरूप प्रवृत्ति आहे आणि प्रवृत्ति इच्छेवांचून होत नाहीं, इच्छा कारणावांचून होत नाहीं. अर्थात् तुमचे शक्तीचा इच्छेंत अंतर्भाव होतो. पृथक् राहूं शकत नाहीं. बरें. ज्या आधारस्थानीं 'इच्छा' स्फुरण होतें त्या आधाराला जर माया ह्मणून तेथें उत्पन्न होणारी जी इच्छा ती मायेची इच्छा असें ह्मणाल तर ज्या आधाराला आह्मी परमात्मा ह्मणणार त्यालाच तुह्मी माया असें ह्मणणार. यांत केवळ शब्दभेदच झाला. वस्तुभेद अथवा प्रक्रिया बदलली नाहीं. असेंच मानावयाचें असेल तर हा केवळ आग्रह आहे. यापुढें उपाय नाहीं. ज्याला आह्मी उदक ह्मणणार त्याला तुह्मीं दुसरें जरी नांव ठेवून प्राशन केलें तरी प्राशनक्रिया आणि तृप्ति यांत मात्र तुमच्यांत व आमच्यांत भेद राहणार नाहीं. शब्दभेदानें वस्तुभेद होत नाहीं. असो. आतां जर तुह्मी वेगळ्या तिसऱ्या तऱ्हेनें मायेचें स्वरूप प्रतिपादूं शकणार नाहीं, तर आमचाच सिद्धांत तुमच्या गळीं बसेल म्हणजे माया स्वतंत्र वस्तु होऊन जगन्नियंत्री होऊं शकत नाहीं असेंच तुह्मास कबूल करावें लागेल.

---

## तिसऱ्या आक्षेपाचें उत्तर.

तिसरा आक्षेप मायाभिमानी *शबल परमात्मा जगन्नियंता आणि

* दोन भिन्न पदार्थांचें मिश्रण.

जगत्स्वामी होऊं शकतो, त्याला निर्मल, अलेपक हीं विशेषणें लागूं शकत नाहींत आणि लागण्याचें कारणही नाहीं, असा आहे. या पक्षांत शबल परमात्मा ह्म० शबल ब्रह्म अथवा **मायी महेश्वर** जगत्कारण आणि जगन्नियंता आहे असें मानावें लागतें. आणि सगुणोपासकांचेंही असेंच मत आहे. त्यांणीं सलोकता, समीपता, सरूपता, ( सार्ष्टिता ) आणि सायुज्यता अशा चतुर्विध मुक्ति ह्या कैवल्यरूप मानिल्या आहेत. ह्यांत उपास्य वस्तूंत उपासकानें लीन होणें ही सायुज्यमुक्ति मुख्य कैवल्यरूप आहे. हें मत साधनदशेकरितां पुष्कळअंशीं आह्मास मान्य आहे. परंतु यांत गौणत्व इतकेंच आहे कीं, परमात्मा आणि माया हे परस्पर स्त्रीपुरुषांप्रमाणें अविभक्त भिन्न विभूति मानिल्या असल्यानें कायमचें द्वैत उभें राहून अविद्यायुक्त जीवानें ह्म० उपासकानें मायायुक्त परमात्म्यांत मिळून सायुज्यता होणें ह्म० कैवल्य भोगावयाचें. हें, अविद्याकृत लोहशृंखला तोडून मायाकृत रत्नजडित सुवर्णशृंखला घालून घेऊन त्यास आभूषण अशी संज्ञा देऊन त्याचा भार वाहण्यांत आनंद मानण्यासारखें होय ? दीर्घ कालोपभोगानें कसल्याही मोठ्या ऐश्वर्याचा कंटाळा येत असतो. सरूपता मुक्ति प्राप्त झालेले जयविजयादिक जन्ममरणांच्या आणि सुखदु:खांच्या तडाक्यांत सांपडल्याचें आपण ऐकलेंच आहे. किंबहुना वैकुंठाधिपतीसही कारणांतरांनीं अवतारशरीरें धारण करून सुखदु:खानुभव घ्यावा लागतो हें प्रसिद्धच आहे. येथें आह्मीं उपासक असें ह्मणतों कीं, ते साक्षात् ईश्वरच, त्यांना सुखदु:खें कसलीं, तीं लोकांस दाखविण्याची त्यांची लीला आहे. हें ह्मणणें आह्मासही अत्यंत कबूल आहे. पण हें ह्मणणें ह्म० जागचें हलवेना, इतक्या रत्नांच्या दागिन्यांचें ओझें अंगावर लादल्यानें अंगाला कळा लागल्या तरी त्या सोसण्यांतच मोठा आनंद आहे, असें सांगून दरिद्र्याच्या अंत:करणास मोठा लोभ उत्पन्न करून आपलें ओझें त्याच्या बोकांडीं बसविणें होय ! वरें उपासकांतही वैष्णव, शैव शाक्तादि अनेक भेद असल्यानें प्रत्येकांचा जगत्कारण ईश्वर वेगळा आहे. ही गोष्ट अशी आहे कीं, कांहीं परिमित श्वेत वस्तु आणि तितकीच कृष्ण वस्तु अशा २ पदार्थांचें मिश्रण बनावें व त्यांतून मोठा प्रधानभाग वेगळा राहून वा-

कीच्या भागांतून एक अल्प वस्तु निर्माण होऊन ती पृथक् व्हावी आणि कालांतरानें व कारणांतरानें ती वस्तु मूळ प्रधान भागांत येऊन मिळावी ह्म० कैवल्य. परंतु मूळांतच जो प्रधान भाग श्वेत, कृष्ण अशा दोन मिश्रणांचा झाला आहे, त्याच मिश्रणाची ही अल्प वस्तु झाली आहे. ही त्यांत मिळाल्यानें हिचें लहानपण जाऊन मोठेपण आलें खरें, पण मिश्रणाचा भेद आणि कृष्णसंग हा मात्र गेला नाहीं. त्यामुळें अखंडचें द्वैत कायम राहिलें तें राहिलेंच. कारण त्या मिश्रणांत जितका श्वेत पदार्थ होता तितका सर्वच कृष्णवर्णानें व्यापला. बाकी श्वेत राहिलाच नाहीं. असा हा विशिष्टाद्वैत उपासकांचा मायाशबल परमात्मा आहे. ह्मणून तो निर्मल अलिप्त होऊं शकत नाहीं. याकरितां **मायावी परमात्मा** जगत्कारण आहे असें मानण्याचें आमच्या आक्षेपकारांचें ह्मणणें बरोबर नाहीं.

निर्मल परमात्मा अलिप्त आणि व्यापक आहे. तो जगत्कर्ता व भोक्ता होऊं शकत नाहीं. आणि भिन्न उपासक, जो आपापला पृथक् उपास्य परमेश्वर, ह्म० शक्ति, विष्णु, शिव इ० जगत्कर्ता मानितात आणि ज्यास मायावी असें ह्मणतात, तोही खरा जगत्कर्ता व जगद्भोक्ता नाहीं. किंबहुना जो खरा जगत्कर्ता व भोक्ता आहे व ज्याचें मी पुढें प्रतिपादन करणार आहें, त्या जगन्नियंत्याच्या शिव–विष्णु इ० ह्या प्रधान विभूतिमात्र आहेत. तो ह्यांच्या वरचे पायरीवर आहे, तथापि वर सांगितलेलें उपासकांचें मत, उपासनाकालांत फार उत्तम असून उपासना हें चित्ताचें चांचल्य दूर करणारें आणि ज्ञानप्राप्तींत दुसऱ्या पायरीचें साधन असल्यानें हें मत सर्वथा ग्राह्य आहे. ग्राह्य होण्याचें कारण काय ? तर उपासकांचा उपासनेच्या आरंभीं जो द्वैताभिमानाचा आग्रह असतो तो उपासनेच्या परिपक्व दशेंत आपल्या आपण विगलित होऊन अद्वैत पदप्राप्तीची वासना जागृत होऊन अद्वयात्मानंद प्राप्तीनें उपासक कृतार्थ होतो. याकरितां ह्या तिसऱ्या आक्षेपाचें खंडन न करितां त्यांतील न्यूनाधिकतेचें तारतम्य मात्र दाखविलें आहे. यावरून वाचकांनीं याचें इंगित लक्षांत असूं द्यावें ह्म० पुढील प्रतिपादनांत व या मतांत जो सूक्ष्म फरक आहे तो नीट उमजेल.

# चौथ्या अक्षेपाचें उत्तर.

आक्षेपकाराचा चौथा आक्षेप **सृष्टीस** स्वतंत्रता असली पाहिजे. सृष्टिनियमाप्रमाणें सर्व व्यवस्था होत आहेच ह्म० सूर्य चंद्रादि ग्रहांचे उदयास्त ठरल्यावेळीं होत आहेत. शीतोष्ण वर्षाकालांत आपापल्या ऋतुनियमांनीं थंडी, उष्मा आणि पर्जन्य पडून धान्यादिकांची उत्पत्ति यथास्थित होऊन अखिल जीवमात्रांचीं पोषणें बरोबर रीतीनें होत आहेत. प्रत्येक जीव, कीटकापासून तों अतिश्रेष्ठ मानवी प्राण्यापर्यंत बाल्य तारुण्य वृद्धावस्थेच्या अनुरोधानें स्वबुद्धिबलानुरूप सुखप्राप्त्यर्थ झटत आहे. कलाकौशल्यादि नानाविध उपायांनीं आपली उन्नति करून सुखसाधनाची वृद्धि करीत आहे. त्यापासून जीं जीं बरींवाईट फळें प्राप्त होतात त्यांचा संबंध उद्योग अथवा प्रयत्नांच्या न्यूनाधिकतेकडे लावून त्यापासून समाधान मानून घेत आहे. जीं जगांत सुखें ह्मणून आहेत तीं कांहीं तर आपल्या आपण स्वाभाविकच येतात व बाकी प्रयत्नांनीं प्राप्त होतात. तशींच जीं दुःखें तींही प्रयत्नानेंच सर्व निवारण होतात. सृष्टींत असलेल्या सर्व गोष्टींस सर्व प्रकारचीं साधनें व क्रिया आहेत. ज्या गोष्टी सृष्टीच्या स्वाभाविक नियमांनीं व्हावयाच्या असतात, त्या तशा आपल्या आपण घडतात व ज्या जीवप्रयत्नांनीं साध्य व्हावयाच्या असतात, त्यांच्याकरितां प्रत्येक जीव आपल्या इच्छेनुरूप झटून प्राप्त करून घेत आहे. सृष्टपदार्थांच्या कांहीं नियमित संयोगानें जीवांच्या उत्पत्ति होतात. व जीवांच्या शारीरिक अंतर्बाह्यरचनेंत कांहीं कारणांनीं बिघाड झाला किंवा योग्य उपाय न झाला तर जीव मरतात. पुन्हां पदार्थसंयोगानें उत्पन्न होतात. अशी अनंतविध अतर्क्य सृष्टिरचना आपले नियमाच्या प्रगतीनें उत्क्रमण करीत चालली आहे व अशीच सर्वदा चालणार; यांत ईश्वर अथवा माया यांच्या मानण्यापासून आमचा काय लाभ आहे ? व आह्मीं यांस मानावें तरी कां ? कोणत्या प्रमाणांनीं हे किंवा यांची क्रिया आह्मास प्रत्यक्ष दिसतात. अशा स्थितींत ईश्वर, माया, हीं उगीच थोतांडें

आह्मीं काय ह्मणून मानावयाचीं, अशीं अनेक प्रकारचीं चित्रविचित्र भाषणें व प्रतिपादनें पदार्थवादी-सृष्टिनियमवादी इ० नास्तिकांचीं आहेत. त्यांचा पूर्णपणें उहापोह करण्याची विशेष आवश्यकता नाहीं. आजकाल ह्या मतांचा बहुधा सर्वत्र प्रसार झालाच आहे.

'पदार्थवादी' आणि 'सृष्टिनियमवादी' यांच्या मतांचें सारांशरूपानें प्रतिपादन करून दाखविलें आहे. हीं यांचीं मतें अगदीं निराधार व पोकळ आहेत, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हे वादी आपल्या सर्व मतांची इमारत सृष्टिनियमावर उभारतात, त्या ठराविक नियमानेंच सृष्टिव्यवहार अगदीं बरोबर चालेल तर त्यांचे मतांस मान देऊं. परंतु सृष्टिनियमांतच धरबंद नाहीं. सूर्यचंद्रादि ग्रहांचे उदयास्त अगदीं बरोबर होत असून त्या अनुराधानें ऋतुमान पालटत असतें, मग एक वर्षीं उन्हाळा आणि थंडी कडक, एक वर्षीं कमी, एक वर्षीं अतिवृष्टि तर दुसरे वर्षीं अनावृष्टि, असा हा विरुद्ध पालट एकदम कां व्हावा. सूर्यादि आपले क्रांतीवरून दूर जवळ होत नाहींत अथवा त्यांच्या किरणांची उष्णता व शोषक शक्तिही कमी होत नाहीं. ग्रीष्मकालांत भूमिस्थ जलाचें बाष्पीकरणक्रियेनें सूर्यकिरणांत आकर्षण होऊन, वर्षाकालांत तीच वाफ गोंठून जलबिंदुरूपानें वृष्टि होते असा ठराविक नियम आहे. मग या वर्षीं* जो हा अनावृष्टीनें सर्व भारत वर्षांत दुष्काळ उसळून त्याच्यायोगानें लक्षावधी प्राण्यांचा संहार आणि दुर्दशा कां व्हावी बरें ! काय यंदां सूर्यास तृषा तर लागली नाहींना? कीं सर्व जीवन त्यानेंच प्राशन करून आपलीं किरणें कोरडींच पसरलीं आणि सृष्टिनियमाचा भंग केला; त्याअर्थीं असाच नियम आहे असें ह्मणतां येत नाहीं. पण नवीन पदार्थविज्ञानी ज्यांनीं-'डायनामेंट' ह्म० एक प्रकारची नवी दारू निघाली आहे, तिचे बार उडवून कांहीं प्रदेशांत पाऊस पडल्याचें मागें वर्तमानपत्रांत वाचलें होतें. त्याचा उपयोग अशा प्रसंगीं कोणीं करून दाखविला असता तर जगन्नियामकाची एक विभूतीच मानला गेला असता. असो.

---

* सन १८९७, संवत् १९५४.

भूमींत बीज पडून जलसेचनांनीं कोंब वृक्ष फल इ. येणें हा नियम आहे. मग शेताचे पेरणींत कांहीं बीजें न उगवणें, कित्येक वृक्ष निर्जीव राहणें, कित्येकांस बरोबर फळें न येणें, कांहींला रोग लागणें, किडा उत्पन्न होणें व कांहीं बरोबर रीतींनीं सुरक्षित उत्तम राहणें हा भेद कां व्हावा? पेरणीची, पोषणाची आणि लागवडीची क्रिया तर सृष्टिनियमानुसारच होत आहेना? उत्पन्न झालेल्या तृणधान्यादि पोषक पदार्थांचे खानपानापासून रासायनिक क्रियेच्या संयोगानें जीवमात्रांचें शरीर आणि रुधिरमांसादिक धातूंची उत्पत्ति, वृद्धि आणि स्थिति होणें हा सृष्टिनियम आहे. मग अनेकविध सारख्या जीवजातीच्या एकसारख्याच खानपानापासून रासायनिक पचनादि क्रिया सारख्याच चालू असतां एंकाच गर्भाशयांत क्वचित्कालींच जननक्रिया सफल होऊन जीवांची उत्पत्ति व्हावी, व त्यांतही प्रत्येकांच्या स्वरूपांत, अवयवरचनेंत, शब्दांत, स्वभावांत अगदींच भिन्नभिन्नता आणि वैचित्र्यदर्शन व्हावें यास कोणता बरें नियम लागू करितां येईल. प्रत्येक जीवाच्या बुद्धींत व ज्ञानांतही अंतर फार दिसतें. कोणा जीवास खानपानाचें संपादन आणि जीवरक्षण इतक्यापुरतेंच ज्ञान असतें. कोणांत मनुष्यशिक्षणानें अधिक ज्ञान ग्रहण करण्याची शक्ति असते. कोणांत कमी असते. ज्ञानभांडार असा जो मनुष्य प्राणी यानें ठराविक प्रयत्नानें ठराविक फल मिळणारच अशा नियमांनीं सारखे अप्रातिहत आणि अन्यून प्रयत्न करूनही एकास फलप्राप्तीनें आनंद होणें व दुसऱ्यानें भग्नमनोरथानें दुःखी होणें यांत कोणता नियम लागूं करावा बरें? शरीराच्या अंतर्बाह्यघटनेंत आणि व्यवहारांत अति कडक नियमानें वागणारें वैद्यादि डाक्टर मंडळी अति खबरदारीनें स्वशरीररक्षण आणि स्वजनावलोकन राखीत असतां सरतेशेवटीं निरुपाय होऊन मृत्यूस शरण कां व्हावें याचें बरोबर कोणी कारण सांगेल काय? ठराविक रोगविकारांवर ठराविकच औषधी शोधून निघाल्या आहेत, मग एकच रोगावर एकास औषधी लागू व्हावी आणि दुसऱ्याला लागू न होतां त्यांनीं दुःखीच रहावें यास काय कारण असावें? अशीं एकास एक नियमाविरुद्ध अनेक उदाहरणें आढळतात. ह्या अशा प्रकारास नियम ह्मणतां येत नाहीं. नियम ह्म०

तोच कीं ज्या नियमाचा कधीं त्रिकालांतही भंग होऊं नये. ठराविक नियमांनीं ठराविक गोष्ट झालीच पाहिजे. एक वेळ व्हावी, दुसरे वेळीं होऊं नये, मग त्या न होण्यास कांहीं तरी निमित्तें धुंडत बसून दोष टाळावा अशा 'लागो भागो दिवाळी' सारख्या पोकळ नियमांनीं सृष्टीचे नियम कायम होत असतात काय ? अशा अनियंत्रित व अव्यवस्थितपणांत सृष्टीला स्वातंत्र्य द्यावयाचें ना ? पदार्थवाद्यास आणि सृष्टिनियमवाद्यास काय तथ्यांश सांपडला असेल तो न कळे. आणि सृष्टि स्वतःची स्वतांच झाली, ईश्वर अथवा माया कोणीच निर्माण करणाऱ्याची जरूर नाहीं, असें ह्मणण्याचें आश्चर्य वाटतें. असो. सृष्टिनियमांचा घोंटाळा वाचकांचे लक्षांत आलाच असेल. आतां सृष्टि आपल्या आपण कशी निर्माण होते आणि उत्पादकाची जरूर कशी लागत नाहीं, याचा विचार करूं.

नियमवादी, पदार्थवादी अथवा कोणताही मतवादी असो, त्यास हें कबूल करावेंच लागेल कीं, सृष्टींत जड आणि चैतन्य असे दोन प्रकार दिसतात. यावत् जड पदार्थ पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश अशा पांचभौतिक पदार्थांच्या मिश्रणापासून निर्माण झाले आहेत. कारण पदार्थमात्रांत या पांची तत्त्वांची उपलब्धि होते, असा अनुभव आहे. त्यावरून सृष्टि पांचभौतिक जडचैतन्यात्मक आहे हें सिद्ध आहे. वाद इतकाच आहे कीं, कोणाचें ह्मणणें जड व चैतन्य असे दोन पदार्थ स्वतंत्र असून त्यांचे मिश्रणापासून सृष्टि झाली आहे आणि कोणी पंचतत्त्वांच्या कांहीं परिमित मिश्रणानें चैतन्य गुण उत्पन्न होतो असें मानतात. जसा तांबूलांत चार पदार्थांच्या मिश्रणानें लाल रंग उत्पन्न होतो, तसेंच चैतन्यही उत्पन्न होतें असें ह्मणतात. परंतु अशा ह्मणण्यानें सृष्टि आपल्याआपण निर्माण झाली असें सिद्ध होऊं शकत नाहीं. जगांत कर्त्यावांचून झालेली क्रिया कधींही व कोठेंही दृष्टश्रुत नाहीं. कांहीं क्रियांचा कर्ता प्रत्यक्ष दिसतो आणि कांहींचा अदृश्य असतो ह्म० जीवकृतीनें झालेलीं जितकीं कांहीं कार्यें आहेत त्या कार्यांस ही कृति अमुक जीवाची आहे असें आपण व्यवहारांत ह्मणतों. ज्या कृतींचा कर्ता दृष्टिगोचर होत नाहीं, त्या कृति आपल्या आपण होतात असें ह्म-

णावें लागतें. जसें वायु वाहतो त्यायोगानें वृक्ष हालतात. नदीच्या प्रवाहानें पदार्थ वाहतात. अशा सृष्टीच्या अनंतविध घडणाऱ्या क्रियांचा कर्ता दिसत नाहीं. त्यामुळें अकर्तृक क्रिया घडण्याचा भ्रम होतो. परंतु येथें जरा सूक्ष्म विचार केला पाहिजे. तो असा कीं, एका पदार्थाचा दुसऱ्या पदार्थावर आघात झाल्यावांचून क्रियाच घडत नाहीं. क्रियेचें स्वरूपच एकाच्या आघाताचा दुसऱ्यावर कांहीं तरी परिणाम घडणें हें होय. एकाचा आघात दुसऱ्यावर, त्याचा तिसऱ्यावर, त्याचा चवथ्यावर, अशी आघातपरंपरा सुरू झाली ह्म० जितक्या पदार्थांचा आपसांत निकट संबंध असेल तेथवर त्या आघाताचा धक्का बसून कांहीं तरी क्रिया शेवटींच्या आघातानें झालेली दृष्टीस पडते. येथें पाहणारा क्रिया घडण्याचें ठिकाणावर असल्यानें घडलेली क्रिया तर पाहतो, पण ही क्रिया घडण्यास मूळ आघात कोठून उत्पन्न झाला हें त्यास दिसूं न शकल्यानें घडलेली क्रिया आपल्याआपण सहज घडली असें तो ह्मणतो. याचें उदाहरण असें पहा कीं, मातीच्या विटा जमिनीवर एकापुढें एक अशा दोन दोन बोटांच्या अंतरानें मंडलाकार उभ्या मांडून बोटानें एक विटेस थोडा धक्का द्या ह्म० ती आघातपरंपरा चालून सर्व विटा एकमेकींवर पडतील. यावरून मोठें उदाहरण घेऊन कल्पना करा कीं, पहाणाऱ्याच्या दृष्टीनें जेथून आघात झालेला दिसला तेथूनच यानें पाहिला, पण जो आघात यानें पाहिला त्या आघातास कोणत्या आघातानें गति उत्पन्न केली तें मूळ स्थान या पहाणाऱ्याचे नजरेस कोठें येत आहे ? ह्मणून हा वादी सृष्टिव्यापार सहज आपलेआपण घडतात असें ह्मणतो.

आकाशांत वायूच्या घर्षणानें अग्नि उत्पन्न होतो, तो विद्युद्रूपानें दिसतो. अग्नीस वायूच्या साहाय्यावांचून राहतां येत नाहीं. उष्णतेपासून जल उत्पन्न होतें. उकाडा जास्त झाल्यानें पाऊस पडतो हा अनुभव आहेच. उष्णतेच्या साहाय्यावांचून जलाचें स्वरूप कायम न राहातां बर्फरूप होऊन कार्यक्षम राहत नाहीं ह्मणून जलास उष्णता पाहिजे. जलापासून मृत्तिका होते. जलांत जो जडांश आहे तो कालेंकरून मृत्तिकारूप होतो. ज्या भांड्यांत नेहमीं पाणी

तापतें त्याच्या आंत तळाशीं चुन्याप्रमाणें पांढरा मृदंश उत्पन्न होतो. भूमिगर्भांत जलाशय पूर्ण भरला आहे. जलाचे साहाय्यानें भूमी कार्यक्षम आहे. असें पांच तत्वांचें जें एकमेकांस साहाय्य आहे हें साहाय्य परस्परमिश्रणावांचून होत नाहीं. परस्परमिश्रण होणें ह्म० हीच एकावर दुसऱ्याची आघातरूप क्रिया घडणें होय. असें हें आघाताचें क्रियारूप मंडलाकार परिभ्रमण झालें. आतां पूर्व दृष्टांतांत विटांच्या मंडलाकार रचनेंत एकजागीं आघात करणारा व तोही आघात देण्याची इच्छा धारण करणारा असा त्या जड विटांहून वेगळा चेतनरूप होता. त्याप्रमाणें हीं पंचतत्वें जडरूप आहेत हें सर्वांस मान्य आहेच. त्याअर्थी यांची स्वतः प्रवृत्ति होऊं शकत नाहीं. कोणी तरी महाशक्तीच्या तडाख्याचा आघात करून या पंचतत्वांत गति उत्पन्न करणारा जड पंचतत्वांहून वेगळा, महासशक्त, चैतन्यरूप, व आघात देण्याची इच्छा धारण करणारा असलाच पाहिजे. घटीयंत्रास आठवे दिवशीं किल्ली दिल्यानें आठ दिवसपर्यंत तें अप्रतिहत चालतें. पुढें बंद पडतें. याच क्लृप्तीनें पाश्चात्य कल्पक एकवार किल्लीनें हव्या तितक्या मुदतीपर्यंत चालणारें घड्याळ करूं शकतील. या ताज्या उदाहरणावरून आमचे बुद्धिमान वाचकांस या सृष्टिरूप प्रचंड घटीयंत्रास एकवारच किल्ली भरली गेली असो अथवा नित्य भरली जात असो, किल्ली भरणारा व यंत्रोत्पादक कोणी तरी यंत्राहून वेगळा असला पाहिजे. तोही चैतन्यरूप ज्ञानवान् असला पाहिजे असें कळूं शकणार नाहीं काय ? कळलेंच पाहिजे.

सृष्टीचें द्विविध स्वरूप आहे, ह्म० सृष्टींत निर्माण झालेल्या यावत् पदार्थमात्रांचीं सामान्य आणि विशेष अशीं दोन रूपें आहेत. सामान्यरूप अदृश्य ह्म० अव्यक्त असतें. आणि विशेषरूप दृश्य ह्म० व्यक्त असतें. वायूचें सामान्यरूप स्तिमित ह्म० स्तब्ध असून गति उत्पन्न झालेलें विशेषस्वरूप आहे. अग्नीचें घर्षणानें उत्पन्न झालेलें विशेष स्वरूप असून घर्षणयोग्य पदार्थांत जें अग्नीचें गुप्त स्वरूप तें सामान्यरूप आहे. याच उदाहरणावरून आणखीही जुळवून घ्यावें. तात्पर्य जी वस्तू उत्पन्न झालेली दृष्टी पडते ती पूर्वीं कोणत्या तरी पदार्थांत सामान्य-

रूपानें असतेच. आणि त्या पदार्थावर दुसऱ्याची आघातरूप क्रिया घडली ह्म० त्या वस्तूचें विशेष स्वरूप प्रगट दिसूं लागतें. असा जरी दोन प्रकारचा भेद झाला तरी वस्तूच्या मूलतत्त्वांत मात्र अंतर पडत नाहीं. उदाहरण, तांब्याचा कुंभ तांबटानें तयार केला, यांत कुंभाचें सामान्य स्वरूप कुंभ निर्माण होण्यापूर्वीं तांब्यांत अदृश्य होतें. त्या ताम्रधातूवर तांबटाची आघातरूप क्रिया घडल्यानें कुंभाचें विशेष स्वरूप दृश्य झालें. असें जरी कुंभाचें दृश्यादृश्य द्विविध स्वरूप झालें तरी दोन्ही स्वरूपांत कुंभाचें जें मूलतत्त्व धातू यांत मात्र यत्किंचितही भेद झाला नाहीं. आतां असा विचार करा, ताम्रधातू, घट आणि तांबट असे त्रिविध भेद झाले. यांत ताम्र आणि त्यापासून झालेला घट हे दोन्ही जडरूप असून तांबट चैतन्यरूप सजीव आहे. या सजीवाच्या क्रियेनेंच कुंभाचें व्यक्ताव्यक्त स्वरूप असा भेद झाला आहे. तथापि ताम्रपणांत अंतर पडलें नाहीं. अर्थात् वस्तूचें विशेष स्वरूप कृतिजन्य आहे. कृतिजन्यता कर्त्यावांचून येण्याचा संभवच नाहीं. सृष्ट झालेल्या अनंतविध पदार्थरूपानें प्रतीति होणें हें सृष्टीचें विशेषरूप असून सामान्यरूप आपल्या मूलकारण पंचतत्त्वांत अदृश्य आहे. वरील नियमाप्रमाणें सृष्टीचें विशेष स्वरूप कृतिजन्य झालें. कृति कर्त्यावांचून होऊं शकत नाहीं. त्याअर्थीं सृष्टीला सामान्यरूपापासून विशेषरूप देणें, विशेषरूपास मोडून सामान्यरूपांत पुन्हां मिळविणें इ० क्रियांचा कर्त्ता सृष्टीहून वेगळा चैतन्यरूप असलाच पाहिजे.

पांच तत्त्वांच्या कांहीं परिमित संयोगानें चैतन्यगुण उत्पन्न होतो, असें जें आक्षेपकारांचें ह्मणणें आहे, त्यांस मी असें विचारतों कीं, चैतन्यगुण उत्पन्न होण्यापूर्वीं जीं तत्त्वें आहेत तीं तर जड ठरलींना ? त्यांचा परिमित संयोग झाल्यानंतर चैतन्य उत्पन्न व्हावयाचें आहे, जर जडतत्त्वेंच परस्पर 'संयोगरूप क्रिया' करण्यास समर्थ आहेत, तर मग चैतन्य वेगळें उत्पन्न होतें असें मानण्याचें कारण तरी काय ? तत्त्वेंच चैतन्यरूप आहेत असें ह्मणण्यास बाध कोणता. तांबूलांतील चार पदार्थांच्या संयोगानें लाल रंग उत्पन्न होतो खरा, पण तांबूल स्वयं तयार होत नाहीं. दुसऱ्यानें करावा लागतो. तसा तत्त्वांचा

संयोग करणारा वेगळा माना अथवा तत्त्वें चैतन्यरूप तरी माना. जड-तत्त्वें संयोगरूप क्रिया करणारीं मानणें ह्म० पंगूनें पर्वत उल्लंघन करणें अथवा माझी माता वंध्या ह्मणण्यासारखें असंबद्ध नव्हे काय ? जड ह्म० अचेतन त्यालाच चेतन कसें ह्मणतां येईल ? येथें कदाचित् वादयांनीं पंच तत्त्वें चेतनरूप व कार्यक्षम अशीं मानलीं तर 'जड व चेतन' अशीं उभयांश युक्त मानावयाचीं अथवा निव्वळ चेतनरूपच मानावयाचीं हा प्रश्न आहे. केवळ 'जडरूप' मानलीं तर संयोग कार्यक्षम होऊं शकत नाहीं हें वर ठरलेंच आहे. आतां निव्वळ 'चेतन' रूप मानलीं तर मृष्टींत कोठें जडांशाचें कारणच राहिलें नाहीं. प्रत्येक पदार्थ जागचा उठून हवी ती क्रिया करूं लागेल, पण तसें होत नसल्यानें केवळ चेतनरूप मानतां येत नाहीं. बरें. जड चेतन अशा उभयांशांनीं युक्त पंचतत्त्वें मानलीं तर पांच तत्त्वांचीं पांच प्रकारचीं स्वरूपें उपलब्ध होतात. अशीं पांच प्रकारचीं भिन्न चेतनें ह्म० हें वायु 'चेतन,' हें अग्नि 'चेतन' इ० पृथक् उपलब्ध झालीं पाहिजेत, तीं होत नाहींत. त्याअर्थीं पंचतत्त्वांचे जडांशांत पांच भेद असून पांचीं तत्त्वांत चेतनांश एकच रूपानें असला पाहिजे. जडांश कार्यक्षम नसतां जड पदार्थांत क्रिया घडण्याची उपलब्धि तर होते, अर्थात चेतनांशाकडून क्रियेची प्रेरणा होऊन अथवा गति उत्पन्न होण्याचा आघात बसून **जडांशांत** कार्याची उपलब्धि होते, आणि प्रेरक चेतनांश अदृश्य राहतो, असेंच कबूल करावें लागेल आणि हाच सिद्धांत आहे. पंचतत्त्वांत भिन्न स्वरूपाचा जो जडांश त्या जडांशाची स्थूल व सूक्ष्म सृष्टि झाली आहे. आणि तत्त्वांच्या भिन्नरूप जडांशांत जो एकस्वरूप चेतनांश आहे तोच तत्त्वाला कार्यांत प्रवृत्त करणारा, गति उत्पन्न करून परस्परतत्त्वांचें एकीकरण करणारा, व मूलस्थानीं आघात देणारा आहे. ह्मणून 'जगत्कर्ता' तोच एक **चेतनांश** आहे, आणि तोच 'जगन्नियंता' **ईश्वर** ह्मणविला जातो. मृष्टीच स्वतः झाली, इला कोणी उत्पन्न कर्ता नाहीं व सृष्टिनियमानें सर्व व्यवहार चालतात इ० आक्षेपकारांचें मत अगदीं असिद्ध आहे.

राहिली गोष्ट ही कीं, जगत्कर्ता ईश्वर अथवा माया यांस मान-

ण्या न मानण्यापासून आमची काय लाभहानि आहे व त्यावांचून अडतेंही काय ? तर या गोष्टीचा विचार पुढें सविस्तर येणार आहे. सध्यां इतकेंच उत्तर बस आहे कीं, मातापितरांनीं स्वसंतोषार्थ जननक्रिया केली; त्यापासून अकस्मात् अप्रयत्नानें आमचीही उत्पत्ति झाली; पुढें त्यांनीं आपल्याच पुत्रवात्सल्यानें आमचें लालनपालन केलें; यांत आह्मीं त्यांस मान द्यावा, पूज्य मानावें आणि त्यांची आज्ञा पाळावी ती काय ह्मणून ? काय आह्मीं आमचे उत्पत्तीविषयीं त्यांस शिफारस केली होती अथवा अर्ज धाडला होता ? आह्मी आमच स्वपराक्रमानें सुखसंपादन करून व्यवहार चालवितच आहोंत. वडिलांस पूज्य मानण्या न मानण्यापासून आमचें काय अडतें, अशा ह्मणण्याप्रमाणेंच वादीचें हें ह्मणणें आहे.

सुज्ञ वाचकहो, आक्षेपकारांनीं जे आक्षेप आणिले त्यांचें उत्तर जसें कांहीं सुचलें तसें दिलें आहे; न्यून असेल तें आपण पूर्ण करून घ्यावें. निर्गुण व अलिप्त परमात्मा, जगत्कर्ता भोक्ता होत नाहीं, ही गोष्ट आह्मीं कबूल केलीच आहे. माया स्वतंत्र जगन्नियंत्री होऊं शकत नाहीं याचेंही उत्तर दिलेंच आहे. उपासकांचे मतांत ते मायी महेश्वर ह्म० शबल परमात्मा, जगत्कर्ता मानून त्यासच शिव विष्णु इ० मानतात. यांत त्यांनीं द्वैताग्रह सोडला नाहीं. असें जरी आहे तरी हें मत अद्वैतमताशीं पुष्कळांशीं जुळत असल्यानें संग्राह्य आहे. कांहीं अंतर आहे तें वर दाखविलेंच आहे. आणि विशेष स्पष्टीकरणही पुढें होत आहे. पदार्थवाद्यांचे आणि सृष्टिनियमवाद्यांचें मत तर अगदां असिद्ध असून सर्वथा त्याज्य आहे. त्यांत कांहींच धडबंद नाहीं, हें वरील प्रतिपादनानें नीट लक्षांत आलेंच असेल. आतां निर्गुण, निर्विकार आणि अलिप्त परमात्म्याचा आणि मायेचा असंभाव्य योग झाला कसा ? आणि योग झाला तर परमात्मा निर्मल राहिला कसा ? जर परमात्मा अलिप्तच राहिला तर माया कोणाचे आश्रित राहिली, व जगत्कर्ता आणि भोक्ता कोण आहे तो दाखवा ! असा हा प्रश्नाचा मूळ मुद्दा आहे. त्याचें उत्तर देतां, सुज्ञांनीं लक्ष असूं द्यावें.

---

# ईश्वराच्या स्वरूपाची सिद्धि.

परमात्मा निर्मल, अलेपक, व्यापक आणि चैतन्यरूप आहे तसाच आहे. त्याला मायेचा संयोग झाला नाहीं. आणि तो मायेच्या आवरणांतही आला नाहीं. त्याच्या व्यापक आणि प्रकाशक स्वभावामुळें मायाकृत उपाधींत तो आल्यासारखा भासतो. वास्तविकरीत्या व्यापकस्वभावाला उपाधींत येणें न येणें दोन्ही संभवतच नाहींत. कारण 'येणें' ह्मणजे नसल्या ठिकाणीं जाणें हें होय. 'न येणें' ह्मणजे येण्यास स्वतःच्या इच्छेचा अथवा दुसरा कांहीं तरी प्रतिबंध होणें हें होय. असा 'येणें न येणें' या शब्दांचा अर्थ आहे. आणि परमात्मा तर व्यापक स्वभाववान् आहे. तेव्हां त्याच्या ठिकाणीं, उपाधींत येणें न येणें दोन्ही गोष्टी संभवत नाहींत. आतां दिसणें आणि भासणें या शब्दांचा अर्थ जरी सारखा दिसतो, तरी त्यांच्यांत मोठें अंतर आहे. 'दिसणें' ह्म० ज्या वस्तूचें जें यथार्थ स्वरूप असेल त्या यथार्थ स्वरूपानें वस्तूची प्रतीति होणें, आणि 'भासणें' ह्म० वस्तूच्या यथार्थ स्वरूपाचा बोध न होतां त्या वस्तूची दुसऱ्या प्रकारानें प्रतीति होणें. जसें दुरून येत असलेल्या मनुष्यास पाहून हा अमुक आहे असें प्रथम वाटतें, आणि तोच जवळ आल्यावर, अरे! हा तो नव्हे, हा अमुक आहे, असें यथार्थबोध झाल्यावर वाटतें. या ठिकाणीं अमक्यासारखा अमुक 'भासला' असें म्हणतात. क्वचित् दिसला; असेंही ह्मणतात, पण ती चूक आहे. अशा ह्या शब्दभेदानें 'दिसणें' हें यथार्थज्ञान असून 'भासणें' हें भ्रमज्ञान झालें. अर्थात् यथार्थज्ञानांत आणि भ्रमज्ञानांत अगदीं विरुद्धपणा झाला. कारण यथार्थज्ञानाचा विषय यथार्थ असतो व भ्रमज्ञानाचा विषय अयथार्थ ह्म० मिथ्या असतो. घट निर्माण झाल्यानंतर घटांत आकाश कोणी घालतो अथवा उत्पन्न करितो असें नाहीं. घटाचें वर्तुलाकार निर्माण होणेंच आकाशाला आंत घेण्यास कारण आहे. घटाची आकृति वर्तुलाकार निर्माण होण्यापूर्वी आकाश व्यापकस्वभावानें होतेंच; तेंच घटांत आल्यासारखें भासूं लागलें. हें भासणें घटांत आकाशाच्या येण्या न येण्यास का-

रण होऊं शकत नाहीं. नव्हतें आकाश तें आणिलें अथवा घातलें, असा व्यापार आकाशावर चालत नाहीं. कारण तें सहजव्यापक आहे. सहजव्यापक वस्तूचें येणें न येणें हें भासणें केवळ मिथ्या आहे. तसें परमात्मा सहजव्यापकस्वरूप असल्यानें मायाकृत उपाधींत त्याचें येणें जें भासतें तें मिथ्या आहे. तो नाहीं कोठें ? कीं जेथें त्यानें जावें अथवा दुसऱ्यानें त्यास आणावें. म्हणून परमात्मा मायेच्या आवरणांत आला अथवा मायेनें आणिला असें म्हणतां येत नाहीं.

ज्याअर्थी मायेच्या आवरणांत परमात्मा आला नाहीं व मायेस आणतां बनला नाहीं, त्याअर्थी मायेचा आणि परमात्म्याचा संयोग झाला असेंही ह्मणतां येत नाहीं. 'संयोग' ह्म० दोन पदार्थांचें एकत्र संमेलन होणें हें आहे. ह्म० ज्या वस्तूंत जी दुसरी वस्तू नाहीं ती दुसरी वस्तू त्या वस्तूंत मिसळल्यानें संयोग होत असतो. परमात्म्याच्या व्यापकतेमुळें कोठेंच ठाव रिकामा नाहीं कीं, ज्या स्थलीं माया आपली उपाधि पृथक् तयार करून मग परमात्म्याशीं संयोग करील. जी उपाधि निर्माण होणार व नष्ट होणार ती परमात्म्याच्या स्वयंव्यापकपणांतच होणार. तो त्या उपाधीशीं संयोगही करीत नाहीं आणि वियोगही करीत नाहीं. आकाश घटाशीं संयोगही करीत नाहीं आणि वियोगही करीत नाहीं. जसें घटाच्या उपाधीनें आकाशाशीं संयोग झाला असें म्हणणें केवळ आग्रहाचें व अज्ञानाचें आहे, तसेंच मायेच्या उपाधीशीं आणि परमात्म्याशीं संयोग झाला असें समजणें हें होय. संयोगावांचून विकार लागूं शकत नाहीं. मायेचा संयोग न झाल्यानें परमात्मा निर्मल, अलिप्त आणि व्यापकस्वरूप आहे. उपाधिकृत कोणताही दोष परमात्म्यावर येऊं शकत नाहीं हें सिद्ध झालें.

वरील उदाहरणावरून परमात्मा अलिप्त आणि व्यापकस्वरूप असून मायेच्या उपाधीपासून रहित आहे, हें पूर्ण ध्यानांत आलेंच पाहिजे. आतां मायेला आधाराश्रय कोणाचा याचें उत्तर देतों.

जी वस्तू निर्माण झालेली अथवा सदैव असलेली दिसणार ती कोठें तरी व कसल्या तरी आधारावर राहिल्यावांचून तिचें अस्तित्व

दिसावें कसें ? हा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो. आतां जें कांहीं स्थल अथवा अवकाश म्हणून होतें अथवा आहे तें सर्वच व्यापकानें अडविलें. यत्किंचित्‌ही रिकामें राहूं दिलें नाहीं. त्याअर्थीं जें कांहीं दिसणार अथवा भासणार त्याला आधार व्यापकावांचून दुसऱ्या कोणाचा मिळणार ? वस्तु स्वतःची स्वतःवर राहूं शकत नाहीं, हा नियम आहे. मायाकृत जगदुपाधीस व्यापक परमात्म्याचाच आधार असला पाहिजे; कारण सूक्ष्म स्थूल यावत् जगद्रचना ह्मणून जें कांहीं आहे तें सर्वच मायेचें स्वरूप आहे. तद्व्यतिरिक्त परमात्मस्वरूपाहून अन्य कांहींच नाहीं कीं, ज्याचे आश्रयावर मायेनें वास करावा; म्हणून परमात्म्याच्याच आश्रयानें माया असली पाहिजे असें म्हणावें लागतें, आणि परमात्म्याचें जें व्यापक विशेषण आहे तें तरी मायोपाधीच्याच अपेक्षेनें आहे. मायोपाधि व्याप्य ह्म० व्यापावयाजोगी आहे, तेव्हां परमात्मा व्यापक म्हणवितो. व्याप्य कांहींच नसेल तर व्यापकस्वभाववान् वस्तू तर असते, पण त्याचें व्यापक हें विशेषण ह्म० शब्दमात्र नसतो. याचें सविस्तर वर्णन अव्यक्तबोधांत परमात्म्याच्या व मायेच्या सापेक्ष निरपेक्ष व्यापकतेच्या प्रतिपादनांत झालेंच आहे, म्हणून पुनरुक्ति करीत नाहीं.

वर्षाऋतूंत निबिड अभ्रपटलांनीं मध्याह्नीं सूर्य आच्छादित होऊन अंधार पडतो. असा जरी आपल्यास प्रत्यक्ष अनुभव आहे तरी विचार करून पाहिल्यास, खरोखर सूर्य आच्छादित झाला आहे असें कधीं ह्मणतां येणार नाहीं. सूर्यापर्यंत पोंचणारी जी आपली दृष्टि तिच्यावर मेघांचें आच्छादन आलें असल्यानें सूर्य आच्छादित आहे, असें आपण अज्ञानानें ह्मणतों. या ह्मणण्यानें सूर्यावर आच्छादनाचा आरोप होत नाहीं. तो जसा स्वयंप्रकाशमान् आहे तसाच आहे. आपल्यास जगद्व्यापाराकरितां सूर्यप्रकाशाची अपेक्षा आहे. पण सूर्य कोणत्याही अपेक्षेनें प्रकाश करतो असें नाहीं. परंतु जगत् अंधकाररूप आणि प्रकाश्य असल्यानें प्रकाशकपणाचा सूर्यावर आरोप आला आहे. आरोपानें आधारवस्तु बिघडत नाहीं किंवा तिच्या स्वरूपांत अंतरही येत नाहीं. सभ्य गृहस्थावर एकादा भलताच आरोप आणल्यानें त्याचें सभ्यपण जात नाहीं, आरोप करणारांचें अ-

ज्ञान मात्र प्रगट होतें. आणि तें त्यास यथार्थ समजल्यावर आरोप करणारासच आपला मूर्खपणा पदरीं घेणें भाग पडतें. त्याप्रमाणें परमात्मा सहज ओतप्रोत व्यापकस्वभाववान् असल्यानें मायाकृत उपाधीच्या अपेक्षेनें त्याची व्यापकता आहे असें ह्मणतां येत नाहीं. व त्यानें मायेला आधाराश्रय दिला आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. मायोपाधीस अन्यत्र आधाराश्रय नसल्यानें आणि स्वात्माश्रय होण्याचा मुळींच संभव नसल्यानें तिनेंच व्यापकाचा आश्रय घेतला आहे. त्यानें आश्रय दिला आहे असें ह्मणणें हें त्यावर आरोप करणें होय. आरोपानें अधिष्ठान बिघडत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. ज्याप्रमाणें आपल्या दृष्टीच्या आच्छादनानें सूर्यावर आच्छादनाचा आरोप आहे, त्याप्रमाणेंच आपल्या बुद्धींत मायोपाधीचें आच्छादन असल्यानें जगदाधार व्यापक इ० विशेषणांचा परमात्म्यावर आरोप आहे. आणि जावत्कालपर्यंत तें आच्छादन जाणार नाहीं, तावत्कालपर्यंत परमात्म्यावर केलेले आरोप खरे भासणारच. खरें नसतां खऱ्यासारखें भासणें यासच 'भ्रम' असें ह्मणतात. आणि हा भ्रम आहे असें न समजणें हेंच 'अज्ञान' होय, व अज्ञान हेंच मायेचें मूलस्वरूप आहे. अज्ञान-निवृत्ति ह्म० भ्रमनिवृत्ति आधारवस्तूच्या ज्ञानावांचून होत नाहीं. वस्तुज्ञान झालें ह्म० आपली चूक आपल्या गळीं येते, आणि 'माझ्या ठिकाणीं असा भ्रम झाला' हें कबूल करणें भाग पडतें. भ्रम हा अनिर्वचनीयरूप आहे. अनिर्वचनीयपणाचें प्रतिपादन मागें झालेंच आहे व पुढेंही सविस्तर येणार आहे. तात्पर्य, परमात्मदृष्टीनें परमात्म्याच्या ठिकाणीं मायासंगाचा आरोप कसाही होत नाहीं. आणि जोंवर मायादृष्टि ह्म० अज्ञानदृष्टि आहे, तोंवर मायोपाधीला परमात्मसंग आहे, हें ह्मणणें भागच आहे. असा हा परमात्म-माया उभयदृष्टीनें असंभाव्य संयोग झाला आहे. तथापि परमात्मा निर्मल व अलिप्त आहे तसाच आहे. त्याचे स्वरूपांत यत्किंचित्‌ही बदल होऊं शकत नाहीं; घटाच्या उपाधीनें घटांत आलेल्या व्यापक महदाकाशावर जसा जलानयनादि क्षुद्र क्रियेचा आरोप आहे; वास्तविक पाहतां घटाचा व आकाशाचा संबंधही नाहीं, आणि घटाबरोबर आकाश क्रियाही करीत नाहीं. तसा मायोपाधिक दृष्टीनें परमात्म्यावर

जगदाधारत्व आणि जगत्कर्तृत्वाचा आरोप आहे. नाहींपेक्षां तो असंगच आहे. यावरून वरील मुख्य प्रश्नाच्या मुद्याचा निकाल वाचकांचे लक्षांत आलाच असेल कीं, परमात्मा वास्तवरीत्या अलिप्त राहून मायादृष्टीनें परमात्म्याचा व मायेचा संयोग होऊन जगदाधारत्व व जगत्कर्तृत्वादि आरोप त्यावर आले आहेत.

यावर पुन्हां असा आक्षेप येतो कीं, लेखकांनीं पुष्कळ हेरफेर खाऊन शेवटीं परमात्म्याच्या ठिकाणीं जगदाधारत्व आणि जगत्कर्तृत्व तर आणलेंच, मग उपासकांचेंच मत मानण्यास काय हरकत होती. त्यांचेही मतांत जगदाधार व जगत्कर्ता ईश्वर होताच. तुमच्या रीतीनें विशेष कायतें हेंच निघालें कीं, तो अलिप्त व असंग आहे. कर्तृत्वादिक त्याच्याकडे नाहींत, पण हें ह्मणणें भोजन करून उपोषित आहोंत, करूनही अकर्ते आहोंत, असें असंबद्ध आहे, विशेष तें काय?

या आक्षेपाचें उत्तर असें कीं, विवरांत अथवा तळघरांत, जेथें प्रकाश कधींच जात नसून निबिड अंधकार असतो त्या ठिकाणीं आरशाचा कवडासा नेला असतां सूर्यकिरणाच्या परावर्तनानें अंधकाराचा नाश होऊन प्रकाश पडतो आणि तेथें असलेल्या दिवाभीत उलूकादिक प्राण्यांस प्रत्यक्ष बिंबाचा भास होतो. येथें विचार करून पहा कीं, सूर्यानें आपलीं किरणें तेथें पाठविलीं नाहींत अथवा त्या प्राण्यांस दिसण्याकारितां स्वतः गेलाही नाहीं. आणि तेथें असलेल्या जीवांस तर प्रकाशाचा व सूर्याचा अनुभव झाला. या अनुभवासही खोटें ह्मणतां येईल काय? अथवा सूर्यानें स्वतः गमनाची किंवा किरणें धाडण्याची क्रिया केली असें तरी ह्मणतां येईल काय? दोन्ही ह्मणतां येत नाहीं. आकाशांत लक्षावधि योजनांतरावर सूर्य कोठें आणि विवरस्थ जीव कोठें! पण दर्पणोपाधीनें हा असंभाव्य संयोग जुळविलाना? या संयोगानें सूर्यास दर्पणोपाधीचा संग अथवा गमनागमनक्रियेचा कर्तृत्वभाव आला काय? मुळींच नाहीं. आतां विवरस्थ जीवांला प्रत्यक्ष सूर्यदर्शन जोंवर होणार नाहीं तोंवर त्यांस दर्पणोपाधिस्थ प्रतिबिंबच प्रत्यक्ष सूर्य भासणार आहे. किंबहुना प्रकाशाच्या संयोगानें खास दर्पणोपाधीचें सुद्धां पृथक् ज्ञान होणार नाहीं. उपाधीचें जरी पृथक् ज्ञान झालें तरी बस्स आहे.

कारण त्या ज्ञानानें यांत प्रकाशक प्रतिबिंब कोणाचें, ही जिज्ञासा सहज व्हावयाचीच, ती झाली कीं दर्पणाच्या समोर ह्म० आपल्या पाठीमागें आपलें तोंड फिरवून पाहतांच सूर्यदर्शन झालेंच. मग ही भ्रमाची त्रिस्थळी राहील काय ?

वरील उदाहरणांप्रमाणें मायेच्या उपाधीनें सहजव्यापक आणि प्रकाशरूप परमात्म्यावर जगत्कर्तृत्वादिकांचा आरोप भासत आहे. तो तरी कां भासतो ? तर मायेच्या उपाधीचेंच यथार्थज्ञान नाहीं ह्मणून. हें यथार्थज्ञान प्रकाशकाच्या स्वरूपबोधावांचून होणार नाहीं. पण हें दोघांचेंही ज्ञान एकाच क्षणीं होणार आहे. तें होईपर्यंत दोन्ही वस्तूंच्या मध्यें अज्ञानाचें पटल आहे, तें हें ज्ञान होऊं देत नाहीं. कारण हें पटल आहे तोंपर्यंत यथार्थज्ञान, उपाधीचें अथवा प्रकाशकांचें कोणाचेंच होत नाहीं. दोघांच्या भेदास आणि दोघांच्या ऐक्यास एकच अज्ञान कारण आहे. हें आहे तोंवर भेद दिसणार व हें गेलें ह्मणजे अभेद होणार. जर कोणी ह्मणेल कीं, असें हें अज्ञान आहे तरी कोठें ? तर दोन पदार्थ आहेत असा भेद जो पहातो तेथें. आणि अभेदद्रष्ट्याचे ठिकाणीं अज्ञान समूळ नाहीं. ह्मणून तो सर्व एकरूपच पहातो. या उत्तराच्या सारांशांत आक्षेपकारानें व सुज्ञ वाचकांनीं आपलीं उत्तरें नीट समजून घ्यावीं, ह्म० उपासकांचें मन मानावयाचें अथवा जगत्कर्तृत्वादि विकार परमात्म्याचे ठिकाणीं कसे मानावयाचे इ० गोष्टींचा निकाल पूर्ण लक्षांत येईल.

यावर पुन्हां असा आक्षेप येतो कीं, परमात्मा अलिप्त असतो. मायाकृत उपाधीस त्याचा आश्रय मिळाल्यानें जगत्कर्तृत्वादिकाचा त्यावर आरोप आला आहे, इत्यादि गोष्टी ज्या सांगितल्या त्या ठीक आहेत आणि मायेचा व परमात्म्याचा असंभाव्य संयोग होऊनही परमात्मा वेगळा आहे. हें सूर्य आणि दर्पण या दृष्टांतांनीं प्रतिपादन केलें तेंही मान्य आहे. पण यांत परमात्मा आणि माया असे दोन पदार्थ झाले, त्यास हे दोन्ही पदार्थ भिन्नभिन्न आहेत किंवा परमात्म्यापासूनच माया निर्माण झाली आहे किंवा एकच परमात्मा द्विविधरूप ( परमात्मा आणि माया ) दिसतो. यांत प्रथम पक्ष मानाल तर कायमचें द्वैत कबूल करावें लागेल. दुसरा मानाल

तर जन्यजनकभाव मानला पाहिजे व तिसरा मानला तर सूर्यच अंधकाररूप दिसतो असें म्हटलें पाहिजे. याची वाट काय? या शंकांचा आतां विचार करूं.

आक्षेपकारानें जे तीन आक्षेप आणिले आहेत त्यांपैकीं कोणताच दोष परमात्म्याच्या ठिकाणीं लागत नाहीं. कारण परमात्मा आणि माया असे दोन पदार्थ असल्यास द्वैतकल्पनादोष येईल; पण हे दोन भिन्न नाहींतच. एकच आहेत. तसेच परमात्म्यापासून मायेची उत्पत्तिही झाली नाहीं. यामुळें जन्यजनकभाव दोषही येऊं शकत नाहीं आणि परमात्मा मायारूप ह्म० जगद्रूपही दिसत नाहीं. यामुळें सूर्य अंधाररूप दिसतो असा विरोधाभासही त्यावर येत नाहीं. हे सर्व दोष पहाणाराच्या ठिकाणीं आहेत. परमात्मा निर्दोष आहे. नशा केलेल्या मनुष्यास कैफाचे धुंदींत रात्रीं जसे एका दीपकाचे अनेक दीपक दिसूं लागतात. अथवा डोळ्याचे कोंपऱ्यांत दोन बोटें थोडीं रोवून अर्धे उघडे डोळे करून चंद्राकडे अवलोकन केल्यानें जसे दोन चंद्र दिसतात, किंवा डोळ्यांस कांविळेचा रोग झाला असतां जसें सर्व जग पिंवळें दिसूं लागतें, तसेंच जीवाच्या बुद्धींत अज्ञानभ्रमाच्या विकारानेंच जीवास परमात्मा आणि माया असें द्वैतभान होतें. वस्तुत: द्वैताचा लेशही नाहीं. जसा जन्मांध मनुष्य जन्मापासून सूर्य प्रकाशरूप आहे, असें कानांनीं ऐकत असूनही डोळ्यांनीं अंधाराचाच सदैव अनुभव घेत असतो, किंबहुना हा अंधार आहे असें देखील त्यास यथार्थज्ञान नसतें, तसा परमात्मस्वरूपाच्या अनुभवावांचून द्वैतवाद्यांसही द्वैताचा यथार्थानुभवच नाहीं असें ह्मणण्यांत कांहीं बाध नाहीं. भ्रमकालांत एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीसारखी दिसते आणि भ्रमनिवृत्तीनंतर खऱ्या व्यक्तीचा बोध होतो असा अनुभव आहेच. त्याचप्रमाणें येथें भ्रम पहाणारास झाला आहे व त्यामुळेंच वस्तूचें यथार्थस्वरूप अन्यथा दिसत आहे. यांत वस्तूशीं आणि दिसण्याशीं, जन्यजनकभाव, पितापुत्राप्रमाणें नाहीं. ती केवळ भ्रमकालपर्यंत अन्यथा प्रतीति मात्र आहे. त्यास यथार्थज्ञान ह्मणतां येत नाहीं. तसेंच जीवाच्या बुद्धींत भ्रम उत्पन्न झाल्यामुळें परमात्म्याचें यथार्थस्वरूप

झांकले जाऊन जी कांहीं अयथार्थता प्रतीत होत आहे त्याचींच द्योतक, द्वैत आहे, परमात्म्याचा व मायेचा जन्यजनकभाव आहे इ० भाषणें हीं होत. असो, यावरून परमात्म्याचे ठिकाणीं कोणताही दोषारोप संभवत नाहीं, हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल.

आतां मुख्य मुद्दा सांगतों, तो असा कीं, आत्मानुभवावांचून आत्म्याचें अथवा मायारूप जगत्प्रपंचाचें कशाचेंही यथार्थ ज्ञान होणें संभवत नाहीं. खरी वस्तू जोंवर कळली नाहीं तोंवर अमुक खोटें आहे असें ह्मणणें केवळ शब्दव्यापार करणें होय. या पलीकडे कोणत्याही मतवाद्यांची पोंच नाहीं. आपल्या बुद्धिबलानुरूप एकमेकांवर कोटी करणें हेंच कायतें सर्व मतांचें सार आहे. सत्याचा थांग लागेपर्यंत सर्व मतें, सर्व शास्त्रें, व सर्व अनुष्ठानें, भ्रमरूपच आहेत. असें जरी वास्तविक वस्तुदृष्ट्या आहे, तरी सत्य सांपडल्यावांचून यास मिथ्या ह्मणणें हा केवळ प्रमाद आहे. सत्यता अंगीं आल्यावांचून दुसऱ्यास मिथ्या ह्मणण्याचा अधिकारच येत नाहीं. याकरितां भ्रमनिवृत्त्यर्थ श्रुतिशास्त्रोक्त विचाराचाच अवलंब केला पाहिजे. भ्रम कसा होतो व त्याला होण्यास कारणें काय होतात इ० सर्व विवेचन कर्तव्यप्रकरणांत येणार आहे. त्याचा विस्तार करण्याचें हें स्थल नव्हे. असो. भ्रमकालांत पाहणारास वस्तूचें स्वरूप यथार्थ जरी न कळलें तरी वस्तूच्या स्वरूपांत बदल होत नाहीं. पहाणाराच्या दृष्टींत फेर पडला असतो त्यामुळें तो अन्यथा रीतीनें पहातो. याला वस्तूनें काय करावें. आतां भ्रमकालांत तरी परमात्मा, माया अथवा जग हे जे भिन्न वाटतात त्याचें भिन्नरूपही कसें अभिन्नस्वरूप आहे तें सांगतों. अति स्वच्छ पदार्थ कांहीं कारणांनीं घनीभूत झाला ह्म० त्यांत शाम रंगाची आभा उत्पन्न झाल्याचा भास होत असतो. उदाहरण, मेघ केवळ तुषाररूप असल्यानें अति स्वच्छ शुभ्र दिसतात, पण वर्षाकालांत तेच एकाद्या दिशेस समोर घनदाट जमले ह्म० कशी रमणीय शामछटा नेत्रानंददायक दिसूं लागते. याचा प्रत्येकास अनुभव आहे. नदीचा प्रवाह, सरावरें इ० जलाच्या घनीभावानें शामवर्ण दिसतात. तसेंच अति स्वच्छ पारदर्शक बिलोरी कांचांचें तावदान इतकें

निर्मल आहे कीं पदार्थाच्या व दृष्टीच्या मध्यें तें आहे कीं नाहीं अशी सुद्धां भ्रांति पडते. पण तेंच भिंग दृष्टीसमोर उभें धरून त्याच्या बाजूंचे कोरांकडून पाहिल्यास त्या कोरांचे बाजूंस कांचेंत कशी सुंदर शाम रंगाची छटा दिसते ती पहा. ह्म० निर्मल पदार्थांचे घनीभावानें शाम आभास कसा दिसतो तो समजेल. पण ह्या दिसण्यानें त्यांत शाम रंगाची सिद्धि होत नाहीं. तो केवळ दिसण्यापुरता शाम आभास मात्र आहे.

याचप्रमाणें निर्मल परमात्मा निर्गुण आहे तो कांहीं कारणानें घनीरूप होऊन माया अथवा जगत्प्रपंचरूपी सगुण भासूं लागला आहे. जसें जल निर्गुणरूप असून थिजल्यानें गारारूपानें कांहीं तरी आकृतिमान असें सगुण दिसूं लागतें व हातीं घेऊन पाहतां पाहतां विरघळून पुनः पूर्ववत् जलरूप होतें. या थिजण्याच्या आणि वितळण्याच्या योगानें जलाचे मूलस्वरूपांत जसा बदल होत नाहीं, तसाच निर्गुणात्मा जगद्रूपीं सगुणतेला पावला तरी जगास विचारार्थ हातीं धरून गुरुकृपादत्त दृष्टीनें नीट पाहूं लागल्यास हें जग पाहतां पाहतां विरघळून जें एकदम परमात्मरूप होतें तें पुनः कदापि जगरूपानें भासत नाहीं. पण विचारार्थ जग हातीं कसें घ्यावें ही किल्ली सद्गुरूस शरण गेल्यावांचून आणि त्यांनीं कृपा करून दिल्यावांचून कालत्रयांत कोणास कधींच सांपडणार नाहीं. ग्रंथावलोकनानें आणि वाक्पांडित्यानें किती जरी दुसऱ्याचें समाधान केलें अथवा स्वतःच्या समाधानाचा डौल घातला, तरी तो केवळ बाह्य डौलच, अंतरीं समाधानाचा लेश देखील नसतो. करितां सुज्ञांनीं गुरुचरणच धरिले पाहिजेत. अन्य उपाय नाहीं. आतां येथें असा सहज प्रश्न येतो कीं जलाहून भिन्न स्वरूप गारा होण्याचें कारण काय? प्रश्न करणारानें, गारेंत, जलाहून भिन्नता काय आली ह्याचा विचार न करून प्रश्न केला आहे. तथापि त्याचें उत्तर असें कीं दुधास अगर जलास थिजविण्याकरितां कांहीं तरी दावण लागत असतें, कीं ज्याच्या संपर्कानें ते पदार्थ थिजून स्वस्थिति न सोडतां फक्त भिन्नाकृति मात्र दिसूं लागतात. तसें निर्गुण परमात्म्यावर सगुणरूपतेचा आरोप येण्यास जीवाचें अज्ञानरूपी दावण

कारण झालें; त्यामुळें परमात्मा आपली निर्गुण स्वस्थिति न सोडतां जीवास सगुणरूपी भासत असूनही निर्गुणच आहे.

यावर वादी संतापून प्रश्न करतो कीं, अहो, ही जगद्वैचित्र्यरचना धडधडीत आपल्या डोळ्यानें प्रत्यक्ष पाहत असतां आमचे डोळ्यांत धूळ भरून तुह्मी यास चापून निर्गुण ह्मणतां या तुमच्या धाडसाचें मोठें आश्चर्य आहे. जग अनुभवास येत असून तुमच्या ह्मणण्यानें आह्मीं त्यास नाहीं ह्मणावें काय? हें होणार नाहीं. यावर उत्तर असें कीं, मित्रा रागावून काय होणार, आह्मीं धूळ भरण्याचें कारण नाहीं. ती तुझ्या डोळ्यांत तूंच भरून घेऊन विपरीतानुभव करीत आहेस. यास आह्मीं काय करावें? तूंच जरा विचार करून सांग कीं, या जगास जग असें ह्मणतो तरी कोण? तुझ्यावांचून ह्म० जीवावांचून अनंत सृष्टपदार्थांपैकीं कोणताही पदार्थ मी जग आहें व परमात्म्याहून भिन्न आहें असें ह्मणतो काय? अथवा परमात्मा तरी जग माझ्याहून भिन्न आहे असें तरी ह्मणतो काय? ह्यास 'जग जग' असें म्हणून नामरूपात्मक भिन्न कल्पना तुह्मीच जीव करतांना? परमात्मा, माया व जग असे सर्व भेद जीवकृतच आहेत. मूलपदार्थ आमच्या आपसांत भिन्नता आहे असें कोणी सांगतो काय? नाहीं. मग आपणच भेदकल्पना उत्पन्न करावी आणि दुसऱ्याच्या डोक्यावर लादावी हें धाडस तुझें कीं माझें, याचा नीट विचार कर. अभिन्न असून भिन्न वाटणें, यथार्थ असून अयथार्थ दिसणें, असा विपरीत अनुभव होत असतां त्याचा बोध न होणें यासच भ्रम असें ह्मणतात. तो भ्रम जोंपर्यंत या जीवाचे बुद्धींत शिरला आहे, तोंपर्यंत हा जीव असेंच कांहीं तरी बरळणार आणि स्वतः व्यामोहित होऊन दुसऱ्यास दोष देणार. हेंच अज्ञानाचें लक्षण आहे. सारांश, परमात्म्यावर माया, जगत् इ० नामरूपात्मक कल्पनेचा सर्व आरोप जीवांनीं अधिष्ठानाचे अज्ञानामुळें केला आहे, व तो त्यास भ्रमकालांत तसा भासतही आहे. पण ज्याप्रमाणें वरील उदाहरणांत केवळ शाम रंगाची छटा भासल्यानें जशी शाम रंगाची सिद्धि होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणेंच परमात्म्याच्या ठिकाणीं जगदाभास झाला तरी परमात्म्याच्या स्वरूपाहून जगास पृथक् सत्तेची सिद्धि होऊं शकत नाहीं. ज्याअर्थीं मायेस अ-

१२२०८५
२८८१५

थवा जगास परमात्म्याहून पृथक् सत्ताच येऊं शकत नाहीं, त्याअर्थी द्वैतकल्पनाच संभवत नाहीं. वाद्यांनीं आणलेले दोषारोप सर्व व्यर्थ आहेत. परमात्मा निर्मल, अलिप्त, व्यापक, सर्वाधार, सर्वस्वरूप, अखंड आणि अद्वितीय आहे. हाच पूर्ण सिद्धांत पक्का ध्यानांत धरावा. आतां जगत्कर्ता धर्ता ईश्वर कसा आहे त्याच्या स्वरूपाच्या प्रतिपादनाकडे वळूं.

## ईश्वराविषयीं लोकमत.

वरील विवेचनावरून इतर मतवाद्यांचे आक्षेप आणि दोषारोप आल्याचें निवारण यथामति केलें तें समजलेंच आहे. आतां ईश्वराचें स्वरूप प्रतिपादन करण्यापूर्वीं बहुतेक सर्वसामान्य जनसमुदायांत ईश्वराविषयीं जी एक प्रकारची गैरसमजूत झाली आहे तिचा थोडा उल्लेख करून नंतर विवक्षित गोष्ट लिहिण्याची सुज्ञांजवळून परवानगी घेतों.

जनसमुदायांत जितक्या व्यक्ती तितक्या समजुती आपापल्या अगदीं भिन्न असतात. त्यांत ज्यांच्या समजुती थोड्याबहुत सारख्या जुळूं लागल्या ह्म० तो एक वर्ग वेगळाच दिसूं लागतो. असे मनुष्यजातींत अनेक वर्ग आहेत. त्या सर्वांचा विचार करणें अशक्य आहे. तथापि साधारण समजूतदारांविषयींच थोडा विचार करून पाहूं.

ज्या व्यक्तींचे व्यवहार केवळ पशूपेक्षां कांहीं अधिक असून ज्यांस जन्मादारभ्य मरणपर्यंत चरितार्थांत निमग्न राहून कोणत्याहि प्रकारच्या विचारकर्तव्याची ऊर्मीच येत नाहीं, अशा मूढाविषयीं विचार करण्याची कांहीं जरूर नाहीं. व त्याचा उपयोगही नाहीं. समजूतदार व विचारवानांविषयींच थोडा विचार केला पाहिजे. कित्येक चैनी मंडळीची अशी समजूत आहे कीं ईश्वर ईश्वर कसचा!! कश्शास कांहीं पत्ता नाहीं. ईश्वरास भेटलेला कोणी आला आहे काय? ईश्वर असेल तर आह्मास कोणीं दाखवावा, ह्म० आह्मी

खरें मानूं. या सर्व पुजवण्यांच्या युक्त्या आहेत. असें ह्मणणाऱ्या वर्गासही येथें शेवटीं उत्तर देईन. आतां आमच्या आस्तिक विचारवानांतही बराच घोटाळा आहे. जे सद्‌गुरुकृपापात्र होऊन त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें दृढ विश्वास धरून ईश्वरार्चनांत निमग्न होतात त्यांस ईश्वराचे अस्तित्वाचा साक्षात्कार लवकर पटून जसजशी उपासना दृढतर होत जाते तसतसा त्यांस आनंदानुभव विशेष होत जातो. ईश्वराविषयीं प्रेमाधिक्य होतें आणि अविश्वास दूर होतो. अशा वर्गांतील मंडळी अति श्रेष्ठ आहे. कित्येक जन कुलपरंपरागत आणि लोकप्रतिष्ठेकरितां ईश्वरानुष्ठानादिक कर्मं करीत असतात, पण मनांत साशंकच असतात. अहो शास्त्रांनीं जे मार्ग लावून ठेविले आहेत आणि आपले वडील जसें करीत आले आहेत तसें बनेल तितकें वागत असावें, खरें खोटें ईश्वराचें नांव आहे. कोणीं पाहिलें कीं मेल्यावर स्वर्गास जातों कीं नरकास जातों. आहों तोंपावेतों लोकलज्जेस भिऊन जास्त लोक चांगलें ह्मणतील असें वागावें ह्म० झालें. अशा प्रकारचे ज्यांचे उद्गार निघतात ते विचारे मध्यम स्थितींत असतात. सत्कर्म व सदाचरण घडत असल्याच्या योगानें कर्मानुसार कधींतरी सत्पुरुषांच्या सहवासानें आणि कृपेनें त्यांचे सर्व संशय दूर होतात व मोक्षमार्गास लागतात. पण कोरडे शब्दब्रह्मवादी वेदांती मात्र महा कठिण असतात. व्युत्पत्तीचे बलानें वेदांतशास्त्रावलोकन मात्र करितात. आणि वाक्पांडित्यानें इतर मतांचीं खंडनें करण्यांत निष्णात होतात. आत्मानुभवाच्या नांवानें आंवळ्या येवढें पूज्य. केवळ शब्दज्ञानांत पारंगत होऊन विधिनिषेधातीत यथेष्टाचरणी होऊन स्वतः बुडून दुसऱ्यासही बुडवितात. अद्वैतप्रतिपादक ग्रंथांचें अध्ययन करूनही कर्माच्या दुष्परिपाकानें बुद्धीचा अगदीं विपरीत ग्रह होतो. आणि सर्व कर्मांचा निषेध करून सर्व मिथ्या आहे असें निःशंकपणें उघड प्रतिपादन करतात. ईश्वर, जीव, जगत् इ० ह्या सर्व कल्पना असून स्वर्गनरकादि कोठें कांहीं नाहीं. जीवाच्या वासना विषयभोगार्थ प्रबल न व्हाव्या आणि अंतर्मुख होऊन आत्मज्ञान व्हावें, ह्मणून ह्या वरील कल्पनेचे बाऊ करून दाखविले आहेत. वास्तविक पाहतां एक आत्मा सत्य

आहे, बाकी सर्व काल्पनिक आहे. प्रत्यक्ष इंद्रियगोचर होणारे भौतिक विषय ज्या अर्थी परमात्म्यावर आरोपित आहेत त्या अर्थी स्वर्गनरकादिक भोग आणि ईश्वर इ० सर्व अदृष्ट प्रपंच, जो केवळ कल्पनेनेंच कल्पिला आहे तो सत्य कोठून असणार. ती केवळ वंध्यापुत्राची काहाणी आहे. आत्मज्ञान झालें ह्म० कशाची गरज नाहीं. "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" असा अद्वैतसिद्धांतच आहे. तें ब्रह्म ह्म० च आमचा आत्मा. तो आमचा आह्मास कळला ह्म० कृतकृत्य झालें. अशा प्रकाराच्या वेदांत्यांच्या जोरदार भाषणांनीं विचारे मुमुक्षूही यांचे नादीं लागून त्यांची "इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः" अशी दशा होऊन त्यांस अधःपात होतो.

कां सुज्ञ वाचकानों पाहिलींत ना आह्मा वेदांत्यांचीं हीं भपकेदार प्रतिपादनें अंतरीं कशीं शून्यरूप आहेत तीं ? याचें इंगित एकदम आपल्या लक्षांत येणार नाहीं. आतां तें मी नीट उमजून सांगतों, लक्ष असूं द्यास. ईश्वर, जीव, जगत् इ० सर्व भेदकल्पना अज्ञानकल्पित आहेत हें खरें, तरी पण त्या भेदकल्पनाच मात्र आत्मसाक्षात्कारानें जातात आणि सर्व आत्मस्वरूपमय आहे असा यथार्थ अनुभव होऊन जो दृढ निश्चय जडतो त्यामुळें पुन्हां कालत्रयांत भेदकल्पनेचा उदय होत नाहीं. आणि ईश्वर, जीव, जगत् इ० सर्व भिन्न नांवें जाऊन केवळ आत्मरूपानें प्रतीति होते. आत्मज्ञान झाल्यानें सर्व नष्ट होतें, असा अर्थ नाहीं किंवा कांहीं दिसेनासें होऊन ज्ञानी अंधही होत नाहीं; तर जे जगदाकार दिसत होतें तें आत्माकार दिसूं लागलें, एवढाच काय तो फरक झाला. आतां असा विचार पहा कीं, सर्वच आत्माकार भासूं लागलें व अन्य कांहींच उरलें नाहीं, तर मग हे कोरडे शब्दज्ञानी "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" असें म्हणण्याकरितां कोणत्या जगास बगलेंत मारून बसले आहेत न कळे. असो. जगत् मिथ्या जरी भासलें तरी तें कोणाला ? ज्याला आत्मसाक्षात्कार झाला असेल त्यालाच. बाकीच्या जीवांस जग मिथ्या म्हणण्याचा अधिकारच नाहीं व त्यांस तशी प्रतीतिही नाहीं. आतां आत्मज्ञान्यास निजस्वरूपाहून जीव, ईश्वर, जगदादिकांची भिन्न प्रतीतिच होत नसल्यानें त्याला त्यांच्या-

शीं गरज राहिली नाहीं. म्हणून तें ( ईश्वर जगदादि ) नाहींसें होऊं शकत नाहीं. जसें एकाद्या श्रीमान् राजाश्रित व्यक्तीस कारणपरत्वें वैराग्य होऊन तो पुत्रदारादि संपत्तीचा आणि सर्व प्रकारें आपल्या पालनकर्त्या राजाचाही तिरस्कार करतो व स्वकृतार्थतेकारितां अरण्यसेवनांत कालातिक्रम करूं लागतो. अशा सत्पुरुषास कशाचीच अपेक्षा न राहतां तो निसंःग होतो. त्याला राजाची अथवा रंकाची कांहींच जरूर लागत नाहीं. ते आपल्या ठिकाणीं सुखी किंवा दुःखी अथवा कसेही असोत. त्याच्या दृष्टीनें तर तें त्यांचें असणें नसणें सारखेंच आहे. असें जरी झालें तरी पण राजा व रंकाचें अस्तित्व नष्ट होऊं शकत नाहीं. राजाश्रित जी व्यक्ति ती जरी वैराग्यशील बनली व त्यावर राजाची सत्ता राहिली नाहीं, ह्मणून इतर प्रजेवरील राजाची सत्ता जाते का ? नाहीं ! त्या प्रजाजनांस अन्नदाता तर हाच वाटणार ! हा परस्परांचा पोष्यपोषकभावसंबंध जात नाहीं. तसेंच एक विभूति ज्ञानसंपन्न झाल्यानें त्याचा ईश्वर जीव जगताशीं भेदभावानें संबंध राहत नाहीं. व त्यावरील ईश्वरी सत्तेचा अधिकार त्याच्याच पुरता त्यास मिळून तो *स्वतंत्र होतो. ह्मणून जगतांतील असंख्य बद्ध मुमुक्षु भक्तजनादिकांचा पालनपोषण कर्ता ईश्वर नाहींसा होतो काय ? अथवा त्यांचा सेव्यसेवकभाव किंवा पूज्यपूजकभावसंबंध जातो का ? अव्यक्तबोधांत सांगितलेली न्यायकोर्टाची रचना केवळ भांडणाऱ्या वादीप्रतिवाद्यांच्या शासनार्थ निर्माण झाली आहे. आणि न्यायमूर्ति निःपक्षपातानें निवाडा करणारा तटस्थलक्षण आहे. आतां जो मनुष्य खऱ्या खोट्या व्यवहारापासून सदैव अलिप्त राहतो, त्यास आजन्म न्यायकोर्ट पाहण्याची गरज पडत नाहीं. व तो खऱ्या खोट्याहून विलक्षण अशा तटस्थलक्षणीं न्यायमूर्तिप्रमाणेंच आहे. फरक इतकाच कीं त्याला न्याय करण्याची उपाधि नाहीं. ही उपाधि नसल्यानें तो न्यायमूर्तीपेक्षां अधिक सुखी आहे असेंच ह्मटलें पाहिजे. पण जे नेहमीं तंटा बखेडा करणार आहेत, त्यांकारितां तर न्यायमूर्तीस आ-

* ज्ञानी विधिनिषेधातीत होतो. " निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः "

सनारूढ राहून शासन करावेंच लागतें. ज्या दिवशीं वादीप्रतिवाद्यांचा अगदीं लय होईल, त्यावेळींच न्यायमूर्तीही रजा घेऊन घरीं जातील. आत्मज्ञानीं तटस्थलक्षण तिऱ्हाईताप्रमाणें न्यायमूर्ति ईश्वरतुल्यच असल्यानें त्यास ईश्वराशीं स्वतःचें कांहीं प्रयोजन राहत नाहीं. व त्यावर त्याची ह्म० ईश्वराची सत्ता राहण्याचें कांहीं प्रयोजन उरत नाहीं. पण ही सृष्टि असंख्य जीवांनीं व त्यांच्या शुभाशुभ कर्मतंत्व्यांनीं ओतप्रोत भरलेली आहे. तिच्या पालनार्थ व शासनार्थ न्यायमूर्ति ईश्वरास वैकुंठ, ब्रह्मलोकादि स्वर्गासनीं सदैव जाग्रदवस्थेंतच बसलें पाहिजे. जोंवर जगत् जीव इत्यादि प्रपंच आहे तोंवर **जगदीश्वर भगवान्**ही आपली स्वतंत्र सत्ता व स्वतंत्र स्वरूप धारण करून बसला आहे. त्याचें अस्तित्व अखंडित कायम आहे. त्याविषयीं अनादरबुद्धि धारण करणारे महा अधम आणि शासनार्ह आहेत. व जे आत्मज्ञानाची घमेंड बाळगून ईश्वराचा तिरस्कार करतात ते महामूर्ख होत असें मी स्पष्ट ह्मणतों. आणि वर निर्दिष्ट केलेली आमची चैनी मंडळी जी ईश्वराचा अगदीं पत्ताच लागूं देत नाहीं, त्यांच्या तशा समजुतीनें ईश्वराची सत्ता नष्ट होण्याचा मुळींच संभव नाहीं. एकाद्या लहान खेड्यांत राहणाऱ्या क्षुद्र मनुष्यास आजन्म राजदर्शन होत नाहीं, व अशा अल्प जीवांची तपासणीही राजास करावी लागत नाहीं, किंबहुना त्याचें तिकडे लक्ष जाण्याचें सुद्धां प्रयोजन पडत नाहीं. आतां ते राजसत्तेखालीं असले तरी त्या क्षुद्रांस निग्रहानुग्रह करण्यास पोलीसचा एक शिपायीच बस असतो. त्याची मोठ्या कामदारापर्यंत सुद्धां मजल येत नाहीं. मग त्याची वार्ता राजापर्यंत कशास जाते. त्याचप्रमाणें आमची चैनी मंडळी देखील सृष्टीच्या काय जाणे कोणत्या कोंपऱ्यांत मजेच्या मिटक्या मारीत पडली आहे, व तेथपर्यंत अनंत कोटि ब्रह्मांडनायकाचें वारें देखील पोंचतें किंवा नाहीं याचीही शंकाच आहे. त्यांची जीं कांहीं बरीं वाईट कृत्यें घडतात तदनुरूप त्यांजवर निग्रहानुग्रह तेथल्या तेथेंच तींच त्यांचीं कर्मे करितात; व ती मंडळीही ती गोष्ट आपल्या मुखानेंच कबूल करते. ह्म० "काल रात्रीं अमुक ठिकाणीं मैफलीस गेलों होतों तेथें जरा * *

आग्रह विशेष झाल्यानें परत येतांना फारच धुंदींत होतों. वाटेंत अकस्मात् एक 'दिव्य वस्तु' पाहिली व धुंदीमुळें मागें पुढें न पाहतां कांहीं प्रयत्न करूं लागलों; पण तो निष्फल होऊन उलट बरोबर असलेल्या तिच्या मनुष्यानें यथास्थित पूजा केली. मोठ्या मुष्किलीनें जशी तशी सुटका झाली व घरीं आल्यावर त्याच विचारांत गुंग राहून दार लावण्यास विसरल्यामुळें घरांत चोर शिरले व त्यांनीं सर्वस्वीं नागविलें. काय करावें, काल मोठाच मूर्खपणा झाला. अशा प्रकारें मोठ्या थाटानें आपल्या मित्राजवळ गुह्य सांगूं लागतो. पण चमत्कार कीं त्याचा मित्र देखील स्वत: आपली दुसऱ्याच प्रकारची हकीकत सांगून सर्वच कपाळ ठोकूं लागतात. ” असो. कां सुज्ञानों येथें ईश्वराची कांहीं गरज आहे का ? व त्यानें तरी अशांस आपलें अस्तित्व दाखवावें कशाला ? ईश्वराचें एक कर्मरूपी शिपुर्डे त्यांचे तैनातीस असल्यानें तें त्यांची वेळोवेळीं खबर घेत मागें उभेंच असतें. त्याच्या लाथा खाण्यापासून त्यांस फुरसत मिळेल तरच त्यांचें ईश्वराकडे लक्ष जाईल. त्या चैनी प्राण्यांचें ईश्वराकडे लक्ष न लागल्यानें व त्यांनीं ईश्वर कोणी नाहीं ह्मटल्यानें तो नाहींसा होत नाहीं. असो.

तात्पर्य जगन्नियंता जगदीश्वर स्वत:सिद्ध आहे असें सर्वांनीं कबूल केलेंच पाहिजे. कारण त्याच्या सत्तेनेंच ही अवाढव्य सृष्टिरचना सुयंत्रित चालली आहे. नाहींपेक्षां क्षणोक्षणीं अनर्थ उभे राहून जीवमात्रांस कधींच स्वस्थता व सुख मिळालें नसतें. व्यवहारांत आपण अनेक प्रकारच्या राजसंस्था, समाजसंस्था आणि तऱ्हेतऱ्हेच्या कार्यसंस्था पाहतों. त्यांची नियामक व्यक्ति जोंवर खबरदार असते तोंवरच ती संस्था सुरळीत चालते आणि कार्यक्षम राहते. उलटपक्षीं तिचा लवकरच लय होतो. आतां ह्या सृष्टीच्या प्रचंड संस्थेकडे जरा विचारपूर्वक अवलोकन केल्यास बुद्धि गर्भगलित होते. एकेक विभूति सृष्टि उलथी पालथी करण्यास समर्थ आहे. वायु कोपायमान झाल्यास पृथ्वीची धूळधाण करील; अग्नि कोपल्यास तो क्षणार्धांत सर्व जगाची राखरांगोळी करील. जल क्षुब्ध झाल्यास सर्व पृथ्वी जलमय होईल. तिचा कोठें पत्तासुद्धां

लागणार नाहीं. पृथ्वी कोपायमान झाल्यास मोठमोठीं नगरें जागचे जागींच बसून जातील. फार कशाला! वावटळ, अग्निप्रलय, गारांची पर्जन्यवृष्टि आणि भूकंपापासून कसे अनर्थ घडतात हें सर्वांस ठाऊकच आहे. तेव्हां ह्या अशा अनेक महाबलाढ्य आणि विक्राल मंडळींवर दाब ठेवून नियमित रीतीनें त्यांजकडून सेवकाप्रमाणें कार्य करवून घेणारी महाअद्भुत, महाबलाढ्य, महासमर्थ, महातेजस्वी, महाज्ञानी, व महादिव्य **जगदीश्वर भगवानाची** विभूति कशी असेल त्याच्या कोट्यांशाचें अनुमान तरी या क्षुद्र मानवास करितां येईल का? छे: कधींच नाहीं. परंतु हा जीव ईशदत्त बुद्धीनें अनन्य भावेंकरून त्याचे स्वरूपाचा विचार करूं लागल्यास तो आनंदघन हृन्मंदिरीं प्रकाशमान होतो. व हा जीव त्याच्या स्वरूपानंदसागरांत बुडून इतका तदाकार होऊन जातो कीं, त्यास 'जीवत्व' पुनः कधींच भासत नाहीं. अशा परमात्म्याकडे बुद्धिमान जीवांनीं आठ प्रहरांतून क्षणभरही लक्ष न लावणें आणि उलट त्याच्याविषयीं कुत्सित कल्पना करणें यापरता दुसरा अधमपणा, कृतघ्नपणा, आणि नीचपणा तो कोणता असला पाहिजे. ज्या ईश्वराच्या अगाध वैभवास आणि सामर्थ्यास पार नाहीं, ज्याच्या प्रखर तेजाच्या भीतीनें त्रैलोक्य चळचळा कंपत असतें, त्याच्या नियमाज्ञा उल्लंघन करण्याचें सामर्थ्य कोणांतच नाहीं.

॥ यद्भयात् वाति वातोऽयं सूर्यस्तपति यद्भयात् ॥
॥ यद्भयात् वर्षते मेघो भूर्न मज्जति यद्भयात् ॥

हीं पंच महाभूतें देखील त्या भगवानाचीं आज्ञाधारक आहेत. आतां ज्याच्या इच्छामात्रेंकरून ही महामाया आदिशक्ति सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय करीत असते, त्या परमात्म्याच्या प्रेरणेनें त्याचें स्वरूप यथामती वर्णन करितों.

सुज्ञ वाचकहो! आतां आपल्यास बरेंच मागें ब्र० ब्रह्मप्रकरणांत लक्ष पोंचविलें पाहिजे. प्रकृत विषयास अनुकूल असे त्या प्रकरणांतील कांहीं मुद्दे येथें लिहितों; कारण त्यांवांचून माझें निरूपण नीट लक्षांत येणार नाहीं. ( वेदांतविषयप्रतिपादनार्थ पुनरुक्ति दोष नाहीं; कारण तसें केल्यावांचून बुद्धि विषयाचें आकलन करूं शकत

नाहीं. ) "अव्यक्त त्रिगुणात्मिका माया निर्गुण परमात्म्यास उपाधिरूप होऊन त्यावर सगुणरूपता आली येथें सर्व सृष्टि बीजरूप वासनात्मक होती. पुढें माया तमोगुणप्रधान सुषुप्त्यवस्थारूप होतांच सुषुप्त्यभिमानी परमात्मा ईश्वरसंज्ञक झाला. त्या तमोगुणप्रधानावस्थेस कारणावस्था अथवा कारणसृष्टि असें नांव आलें. कालेंकरून तीच माया रजोगुणप्रधान स्वप्नावस्थारूप होतांच स्वप्नाभिमान्यास हिरण्यगर्भ असें नांव येऊन 'सृष्टि' सूक्ष्म ह्मणवूं लागली. आणि माया सत्वगुणप्रधान जाग्रदवस्था होतांच जाग्रदभिमानी परमात्मा विराट असें नाम धारणकर्ता झाला. आणि सृष्टि पांच भौतिक स्थूल सृष्टि अशी ह्मणवूं लागली. मायेच्या तमोरजःसत्वगुणप्रधानतेच्या उपाधीचे अनुरोधानें परमात्म्याचेंही सत् चित् व आनंद गुण व्यक्त होऊं लागले. आणि सृष्टि ही चतुर्दश भुवनात्मक भोगरचनेनें व चतुर्विध भोक्त्या जीवांनीं सुव्यवस्थित झाली. असे हे परमात्म्याचे तीन पाद होऊन त्रिपादातीत असा तुरीय ब्रह्म चतुर्थ पाद झाला. आणि परमात्म्याचें निर्गुण नाम ॐ हेंही बिंदु, रेषा व अक्षर असे त्रिपाद होऊन त्रिपादातीत अनुच्चारित अमातृक ॐ चतुर्थपाद तुरीयरूप झाला." असें सविस्तर वर्णन त्या प्रकरणीं झाल्याचा विचार नीट मनांत आणिला म्हणजे पुढें ईश्वराचें स्वरूप नीट लक्षांत येईल.

मायेच्या त्रिगुणोपाधीनें परमात्म्यावर तीन अवस्थांचीं तीन नांवें ह्म० ईश्वर, हिरण्यगर्भ आणि विराट अशीं आलीं आहेत. हीं तीन नांवें जरी भिन्न दिसलीं तरी नांवाप्रमाणें परमात्म्याच्या तीन भिन्न मूर्ति मात्र झाल्या नाहींत. अवस्थापरत्वें एकच परमात्मा तीन नांवें धारण करितो. एकच व्यक्ति निद्रिस्त होते, स्वप्न पाहते आणि जागृतींत व्यवहार करते. यांत केवळ कालाचा व अवस्थेचा भेद होऊन तिन्ही अवस्थांत जाणारी व येणारी आणि तिन्ही अवस्थांचा अनुभव करणारी व्यक्ति एकच असते. तिच्यांत ज्याप्रमाणें कोणताही भेद होत नाहीं त्याचप्रमाणें कारणोपाधि सुषुप्त्यभिमानी ईश्वर, स्वप्नाभिमानी सूत्रात्मा हिरण्यगर्भ आणि जाग्रदभिमानी अथवा स्थूलाभिमानी **विराट** अशा अवस्थेच्या भेदाचा साक्षी आणि

भोक्ता एकच परमात्मा आहे. त्याच्या तिनी नांवांतून कोणतें जरी नांव उपासकानें घेतलें तरी तें परमात्म्याचेंच आहे. नामभेदानें व्यक्तिभेद होत नाहीं. याचें उदाहरण, ब्रह्मप्रकरणांत दिलेंच आहे; तें असें, "अति हुषार आणि कार्यदक्ष मनुष्याकडे राजानें स्वतंत्र व मोठे असे चार अधिकार दिल्यानें कामाच्या भेदामुळें एकाच व्यक्तीस चारी नांवांनीं जरी हाका मारल्या तरी त्या एकाच व्यक्तीचें ग्रहण होतें. आणि व्यक्तीचें खासगी नांव वेगळें असतें. अशी जरी कामाची व नामाची भिन्नता असली तरी व्यक्तीच्या स्वरूपांत भेद होत नाहीं." तशीच परमात्म्यावर जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुर्या अशा अवस्थाभेदानें विराट, हिरण्यगर्भ, ईश्वर आणि तुरीय ब्रह्म हीं नांवें आलीं; व परमात्म्याचें निर्गुण खासगी नांव ॐ असें जरी असलें किंवा आहे, तरी परमात्मविभूति अखंड व अद्वय अशी एकच आहे. त्यांत विलकूल अंतर नाहीं.

आतां एकंदर जगद्व्यवहार ह्म० पुण्य, पाप, सुख, दुःख, भोगादि व्यावहारिक व प्रापंचिक कर्मे, आणि पारमार्थिक कर्मोपासनादिक क्रिया ह्मणून जें कांहीं कर्तव्य आणि भोक्तव्य जीवमात्रांस आहे, त्या सर्व क्रिया जागृतींत होत असतात. स्वप्नांतही मानसिक भोगादिकर्म होतें, पण तें केवळ आभासमात्र असल्यानें यथार्थ फलद्रूप होत नाहीं. ह्मणून जगत्प्रपंचरचनेची प्रौढी जागृतींतच आहे, जागृत प्रपंचरचनेचा अभिमानी, आणि जीवांवर त्यांच्या कर्मानुरूप निग्रहानुग्रह करणारा परमात्मा **विराट** नामक आहे. त्यास व्यवहारांत आपण **ईश्वर** अशी संज्ञा देतों; पण ईश्वर हें नांव सुषुप्त्यभिमानी परमात्म्याचें आहे. त्याचा सर्वांस बोध नाहीं. असें जरी आहे तरी हें ह्मणणें अशुद्ध आहे असें मुळींच नाहीं, सर्व नांवें त्याचींच आहेत. कोणतें जरी घेतलें तरी एकच आहे. सर्वसामान्य आबालवृद्धांस **ईश्वर** हेंच नांव प्रचारांत गोड असल्यानें मीही त्या विराटात्म्यास ईश्वर याच नांवानें संबोधून त्याचें स्वरूप वर्णन करितों.

# ईश्वराचें स्वरूप वर्णन.

व्यक्ति, व्यक्तीचें स्वरूप व व्यक्तीचें नांव असे तीन भेद दिसण्यांत पृथक् दिसतात; पण तिन्ही परस्पर अभिन्नरूप असतात. एकास सोडून दुसऱ्याची किंवा तिसऱ्याची उपलब्धि होत नाहीं. जसें सुवर्ण ही धातू, सुवर्ण हें नांव आणि सुवर्णाचें पीतरूप असे त्रिविध भेद एका सुवर्णाचे कांबीवर भासतात, पण हें सुवर्ण, हें नांव, व हें पीतरूप असें बोट ठेवून पृथक् पृथक् दाखवितां येणार नाहीं. अर्थात् अभिन्नरूप असल्यानें एक नांव घेतल्याबरोबर तिन्ही येतात. तसें ईश्वराचें नांव, ईश्वराचें रूप व ईश्वराचें व्यक्तयधिष्ठान शरीर असे तीन भेद जरी प्रतीत झाले तरी अभिन्न रूपानें एकच आहेत. पृथकता दाखवितां येणार नाहीं. नखशिखांत अवयवरचनेच्या संलग्न समुदायास शरीर अथवा देह अशी संज्ञा आहे. त्या देहावर नामरूपाचें अभिन्न वेष्टन आहे. शरीरांत अमुक ठिकाणीं रूप अथवा नांव आहे असें कदापि दाखवितां येणार नाहीं. शरीर, नाम व रूप अशा तिघांच्या ऐक्यास व्यक्ति अशी संज्ञा आहे. व्यक्ति मनांत आली कीं शरीर, नाम व रूप अशा तिहींची कल्पना एकदम येते. आणि या त्रिवर्गांपैकीं कोणतेंही एक मनांत आलें कीं पूर्ण व्यक्तीची कल्पना एकदम होते, असा नियम आहे.

मायेच्या सत्वगुणप्रधान आणि जाग्रदवस्थेचा अभिमानी अशा भगवान् विराटरूप ईश्वराचें, जडचैतन्यात्मक पांचभौतिक अखिल चराचर सृष्टि, हेंच स्थूल शरीर आहे. या स्थूल शरीराच्या नखशिखांत मर्यादेपर्यंत ॐ या नांवाच्या आणि व्यक्त सृष्टिरूपाच्या अभिन्न वेष्टनानें युक्त अशी ईश्वर व्यक्ति आहे; आणि नाम रूप व्यक्ति असा तिघांचाही अभेद असल्यानें अमुक ठिकाणीं ईश्वर आहे अथवा अमुक प्रकारचें त्याचें स्वरूप आहे किंवा अमुकच त्याचें नांव आहे असा भिन्न निर्देश करितां येत नाहीं. जें कांहीं आहे तें सर्व ईश्वरमय आहे असेंच ह्मणावें लागतें; पण ज्याप्रमाणें अज्ञान बालकास केवळ शरीर याच एका शब्दावरून शरीरांतील सर्व अव-

यवांचें ज्ञान होत नाहीं, त्यास त्याचा बोध होण्याकरितां त्याची मातोश्री किंवा कुटुंबीयांपैकीं इतर कोणी स्वजन, हा हात आहे, हा पाय आहे, हें तोंड आहे, इत्यादि इतर सर्व अवयवांचें वेगळें वेगळें परिज्ञान करवून मग हे सर्व अवयव मिळून शरीर होतें, असा बालकास बोध करून देतो आणि बालकाच्या प्रश्नानुसार त्यास पदार्थज्ञान करवित असतो. त्याचप्रमाणें श्रुतिमातेनें अज्ञान जीवरूपी बालकांस ईश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान होण्याकरितां जडचैतन्यात्मक सृष्टि ईश्वराच्या कोणकोणत्या अवयवापासून निर्माण झाली व कशी विराजमान आहे इ० वर्णन केलें आहे व तीच ईश्वराच्या स्वरूपाचा यथार्थ बोध सदैव करीत आहे.

परमात्म्यास मायेच्या तम, रज व सत्व गुणोपाधींच्या योगानें सुषुप्ति, स्वप्न आणि जागृति अशा तीन अवस्था प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा अनुभव देहेंद्रियांवांचून होणें अशक्य आहे आणि शरीरांत इंद्रियांच्या न्यूनाधिक भोगाच्या योगानेंच जाग्रदादि अवस्था झाल्या आहेत. असा यांचा अन्योन्यसंबंध आहे. अवस्थापरत्वें भोग्यविषय, भोगसाधन अशीं इंद्रियें आणि भोगभोक्ता—असा त्रिविध भेद झाला. या त्रिविध भेदास त्रिपुटि अशी संज्ञा आहे. "निर्मळ पदार्थाच्या घनीभावानें शाम रंगाची आभा भासल्यानें पृथक् शाम रंगाची जशी सिद्धि होत नाहीं, तशीच अज्ञानामुळें परमात्म्यावर मायारूप जगदाभासानें प्रपंचास परमात्म्याहून पृथक् सत्ता येत नाहीं. अज्ञानकालपर्यंत भेदप्रतीति जरी झाली तरी अधिष्ठानवस्तूंत भेद होत नाहीं" इ० नुकतेंच वर सिद्ध करून दाखविलें आहे. आणि पांच भौतिक जडचैतन्यात्मक सृष्टि ही जाग्रदाभिमानी विराटाचें शरीर असल्यानें अंतःकरण, इंद्रियें आणि भोग्यविषय हे सर्व सृष्टींतच आले, अर्थात् विराटरूप झालें. तेव्हां भोग्य विषय, भोगसाधन अंतःकरण इंद्रियादी आणि भोक्ता अशी जी त्रिपुटी ती परमात्मरूप झाली असेंच ह्मटलें पाहिजे. हा त्रिविध भेद जरी अज्ञानकल्पित आहे तरी या त्रिविध भेदाचेंच यथार्थ ज्ञान झाल्यानें अज्ञानकृतभेदनिवृत्ति होणार आहे. यावरून भोग्यविषय, भोगसाधन इंद्रियें व भोगभोक्ता अशीं त्रिविध रूपें परमात्म्याचींच

आहेत हें सिद्ध होतें. यांत भोक्ता ' परमात्मरूप ', भोगविषय ' जगद्रूप ' आणि भोक्त्याशीं व भोगाशीं संबंध जुळविण्याचें साधन ' इंद्रियें ' मायारूप अशी त्रिपुटीची रचना ध्यानांत असू द्यावी. ही रचना भिन्नाभिन्नरूप आहे. परमात्म्याच्या देहेंद्रियादि अंतःकरणापासून सर्व सृष्टि निर्माण झाली असें कार्यकारणभावरूप ह्मणण्यापेक्षां परमात्म्याचीं देहेंद्रियादि अंतःकरणें हींच सर्व सृष्टिरूप झालीं असें तादात्म्यभावरूप म्हणणें फार समर्पक आहे. त्याचा आतां विचार करूं.

भगवान् ईश्वर परमात्म्याच्या अंतःकरणचतुष्टय, पंच ज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियादिकांपासून चतुर्दश त्रिपुट्या झाल्या आणि अवयवांत सृष्टिरचना झाली ती अशीः—

( १ मायेपासून भोग साधनें, २ भोक्त्यापासून अधिष्ठात्री देवता, ३ जगद्रूप भोग्यविषय अशी ही त्रिपुटी जाणावी ).

---

## परमात्म्याचें अंतःकरणचतुष्टय.

| | | |
|---|---|---|
| १ मनापासून— | देवता चंद्र होऊन— | विषय संकल्प विकल्प झाला. |
| २ बुद्धि ,, | ,, बृहस्पति ,, | ,, निश्चय ,, |
| ३ चित्त ,, | ,, वासुदेव ,, | ,, चिंतन ,, |
| ४ अहंकार ,, | ,, रुद्र ,, | ,, अहंभाव ;, |

---

## परमात्म्याचीं पंच ज्ञानेंद्रियें.

| | | |
|---|---|---|
| १ श्रोत्रेंद्रियापासून | देवता दशदिशा व आकाश होऊन | विषय— शब्द झाला. |
| २ त्वचा ,, | ,, वायु ,, | ,, स्पर्श ,, |
| ३ चक्षु ,, | ,, सूर्य ,, | ,, रूप ,, |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ रसना | ,, | ,, वरुण | ,, | ,, रस | ,, |
| ५ घ्राण | ,, | ,, अश्विनीकुमार | ,, | ,, गंध | ,, |

# परमात्म्याचीं पंच कर्मेंद्रियें.

| | | | |
|---|---|---|---|
| १ वाक् इंद्रियापासून | देवता अग्नि | विषय भाषण (वेदरूप) | क्रिया. |
| २ हस्त ,, | ,, इंद्र | ,, देणें घेणें | ,, |
| ३ पाद ,, | ,, विष्णु | ,, गमन. | ,, |
| ४ उपस्थ ,, | ,, प्रजापति | ,, रतिभोग | ,, |
| ५ गुद ,, | ,, यम | ,, मलत्याग | ,, |

**अशा ह्या चतुर्दश त्रिपुटी झाल्या.**

आतां यांत सूक्ष्म विचार असा पहा कीं, आकाशस्थ सूर्यबिंब एकच असून भूपृष्ठभागावर असंख्य जलाशयांत व असंख्य दर्पणांत त्याचींही असंख्यच प्रतिबिंबें होऊन प्रकाशांचें कार्य करूं लागतात. तथापि सूर्य जसा तटस्थच असतो त्याप्रमाणें मायाकृत विषयेंद्रियोपाधींचे भिन्न भावानें भोक्ता परमात्माही भिन्नभिन्न विभूतिरूप होऊन इंद्रियद्वारा विषयभोगार्थ इंद्रियाधिष्ठात्री देवता झाला. मी बोलतों, मी चालतों, मी पहातों असा जो 'मीपणाचा' अहंकार हीच कार्याभिमानी 'देवता', ज्या साधनानें कार्य घडणार तें 'इंद्रिय' आणि कार्यरूप 'विषय' अशी प्रत्येक त्रिपुटि आपआपली पृथक् कार्यक्षम झाली. एका त्रिपुटीचें काम दुसरी कधींच करीत नाहीं. अशा जगन्नियंत्या परमात्म्यानें सृष्टिकार्याची निरनिराळी वांटणी करून दिली आहे.

येथें अशी शंका येते कीं, भोग्य विषय आणि इंद्रियेंहि भिन्नभिन्न असतात, पण सर्वांचा भोक्ता तर एकच असतो. मी पाहणारा व दुसरा ऐकणारा असा भेद कधींही अनुभवास येत नाहीं. त्याचें उत्तर असें कीं, हा तुह्मीं जीवांचा अनुभव सांगितलातना? ठीकच आहे. या जीवास अनंत जन्मांपासून भिकारपणाची संवय लाग-

त्यानें केरपोतेऱ्यापासून तों लोडाशीं बसण्यापर्यंतचीं सर्व कामें मींच करावीं व सर्व मलाच पाहिजे अशी भिकार संवय लागून मी मी करूं लागल्यानें मीपणासच विसरून जन्ममरणांत भटकत फिरत आहे. असें दारिद्र्य अनंतकोटि ब्रह्मांडनायकाकडे नाहीं. तो स्वतःचीं सर्व कार्यें अनंत सूर्यबिंबांप्रमाणें आपल्या विभूतीकडून करवीत असून आपण निरहंकाररूप प्रकाशक तटस्थ असल्यानेंच ही सर्व घडामोड करूनहि अकर्ता आणि अभोक्ता असा अलिप्त राहिला. जीवाचे शुभाशुभकर्मानुरूप त्यांजवर निग्रहानुग्रह करण्यास त्यानें ईश्वरत्वाची अनिच्छित उपाधि स्वीकारल्यानें तो अलिप्त राहून सृष्टिकार्य परस्पर ह्या चतुर्दश त्रिपुटीच्या विभूतिद्वारा करवितो. तरी सरते शेवटीं अधिष्ठानत्वाचा आणि नियंतृत्वाचा आरोप त्यावर बसून तो सर्वेश्वर ह्मणवितो. पण त्यानें स्वतः कर्तव्यबुद्धीनें ईश्वरत्व पत्करलें असतें तर त्याला कर्तृत्वभोक्तृत्वाच्या पायरीनें हळूहळू जीवदशेपर्यंत यावें लागतें. इतका अज्ञानी तो ईश्वर नव्हे. सुज्ञहो यांतील रहस्य बनल्यास आपणच आपले मनांत समजा. मी उघड करीत नाहीं. असो. आतां ईश्वराच्या आणखी अवयवरचनेचा विचार करूं.

---

# ईश्वराचे अवयवादि.

मागें ब्रह्मप्रकरणांत ' एकोऽहं बहुस्यां ' ह्म० मी एक आहें तो अनेक व्हावें. अशी मायोपाधीनें परमात्म्याच्या ठिकाणीं जीवांचे कर्मभोगवासनेमुळें इच्छा झाली असें सांगितलेंच आहे. मायेच्या त्रिगुणरूप अहंकारोपाधीनें वर निर्दिष्ट केलेली त्रिपुटि झाली. ह्म० परमात्मा सात्विकी अहंकारानें इंद्रियाधिष्ठात्री देवता झाला. राजसी अहंकारानें भोगसाधन इंद्रियें झाला आणि तामसी अहंकारानें भोग्य विषय सृष्टिरूप झाला आहे. असा हा इंद्रियें आणि अवयवसंलग्न परमात्म्याचा स्थूल देह झाला. ह्यांत परमात्म्याच्या श्वासोच्छ्वासापासन प्राणापानादि पंचविध वायु आणि साक्षात् प्रणवरूप श्रुति निर्माण झाली. वाणीपासून तीच श्रुति छंदोबद्ध अशी व्यक्त झाली. श्रुति हें

साक्षात् ईश्वराचें भाषण असून तिच्यापासून खास परमात्म्याच्या स्वरूपाचा बोध होतो. तिला आह्मीं नराधमांनीं मनुष्यकृत आहे ह्मणावें ! सृष्टींत कोणत्या जीवाची वाणी अशी समर्थ आहे कीं जी स्वतः अशीं अक्षरें वदं शकेल. असो. ईश्वराच्या दंष्ट्रप्रदेशीं कृतांताचा वास आहे. नक्षत्रें त्याची प्रकाशमान दंतपंक्ति होय. गंगायमुनादि नद्या त्याच्या नाड्या होत. नाड्यांतून रुधराभिसरण क्रिया नेहमीं जशी चालू असते, तसे नद्यांचे प्रवाहही अखंड चालू असतात. ज्यामध्यें अनंत रत्नांचें भांडार भरलें आहे, असा जो समुद्र तो त्याच्या कुक्षी होत (तद्वत् पुण्यशील भाग्यवान मातेच्या कुक्षींतून नररत्नांचा उद्भव होतो.) ज्याचे शरीरावरील लंव व रोमांच हीं वृक्षौषधी होत; ( वृक्षाप्रमाणें सजीवनिर्जीवपणा रोमांतही आहे.) त्या भगवंतांचे रेत ही पर्जन्यवृष्टि होय. ज्याप्रमाणें रेतापासून प्राणिमात्रांची उत्पत्ति जनन-क्षेत्रीं होते, त्याप्रमाणें पर्जन्यवृष्टीनें असंख्य जीवांची व पोषक पदार्थांची उत्पत्ति होते. किंवहुना रेतोत्पत्तीस मूळ जीवन पर्जन्यवृष्टीच आहे. पर्जन्याच्या न्यूनतेमुळें असंख्य जीवांची हानि कशी होते हें सर्वानुभूत आहेच. त्या भगवंताचा भ्रूभंग कालरूपी आहे. तो जरा वक्र झाल्यानें ब्रह्मांडें उलथीं पालथीं होतात. कोप आल्यास भ्रुकुटि आपोआप वक्र होतात. हें कोपदर्शक चिन्हच आहे ? पण तें समर्थाच्या कोपाचें; इतराचा तर तिळपापड होतो ! अंगविक्षेपही होऊं लागतात. असो. त्या परमात्म्याचें हास्य हीच महामाया होय. हास्य हें आनंददर्शक आणि मोहोत्पादक चिन्ह होय. युवतीनें किंचित् सुहास्यवदनानें अवलोकन केल्यास जीवांची काय दशा होते, याविषयीं सर्वत्रांस अनुभव आहेच. आतां ज्याचें हास्य खास महामायाच, तेथील मोहाचा कांहीं अंत आहे का ? सर्व जगत् त्या मोहगर्तेंत बुडालें आहे, याहून अधिक तें काय असावें. त्या भगवंताच्या निमिषोन्मेषण ह्म० डोळ्याच्या पापण्या उघडणें झांकणें यापासून दिवस आणि रात्र होते. सूर्य ज्याचा नेत्र आहे तो सूर्य पापणींत झांकला गेल्यावर रात्र झालीच पाहिजे. आपल्या नेत्रमीलनानें आपल्यास अंधार दिसतो. मग ईश्वरानें डोळा झांकल्यावर जगांस दिवस कोठून दिसणार ! ते अंधा-

रानें व्याप्त झालेंच पाहिजे. त्याच्या केंसापासून मेघमाला आणि विद्युल्लता उत्पन्न झाली. ( केंसांत विद्युदाकर्षणशक्ति आहे असें नवीन विद्वानांनीं अलीकडे शोधून काढलें आहे. ) त्याच्या नखापासून लोहादिक धातु उत्पन्न झाल्या. लोहकृत शस्त्रांप्रमाणें हननकार्य नखानेंही होतें. हिंस्र प्राण्यांचीं नखें केवळ शस्त्रेंच होत. ईश्वराच्या बाहूपासून अष्ट लोकपाल झाले, पालनशासनादि पराक्रमाचीं कार्यें बाहुबलानेंच होत असतात. प्राणिपीडा, दारिद्र्य, हिंसा आणि नरक इ० ही त्याची विष्ठा होय. खरोखर या सर्वांचा तिरस्कार विष्ठेप्रमाणेंच येतो. त्या भगवंताच्या अस्थीपासून पर्वत झाले आहेत. कठिणपणा आणि वृद्धि होण्याचे गुण अस्थि व पर्वत यांत समान आहेत. परमेश्वराच्या मेदापासून पृथ्वीचा मृदंश झाला आहे; त्यामुळेंच पृथ्वीस मेदिनी असें नांव पडलें आहे; आणि वृद्धीचा गुण दोन्ही ठिकाणीं समान आहे. तसेंच सप्तविध धातूंपासून गायत्र्यादि सप्तछंद व हव्यकव्यादि द्रव्यें झालीं आहेत. परमेश्वराच्या पृष्ठभागापासून पराभव, अधर्म, पाप आणि अज्ञान झालें आहे. परमेश्वरापासून जे पराङ्मुख असतील त्यांच्याजवळ ह्या चार गोष्टींचा संग्रह असावयाचाच. हा आहे तोंवर ईश्वरसन्मुखता कशास होते? असो; परमात्म्याचे पुरोभागापासून ( ह्म० पुढील भागीं ) धर्म, पुण्य, विजय, आणि यश यांची उत्पत्ति झाली. जे ईश्वराच्या सन्मुख असतात ते वरील गुणांनीं युक्त असतात. आणि प्रत्येक बुद्धिमान् मनुष्यानें हे गुण संपादन करणें त्याचें मुख्य कर्तव्यकर्म आहे. असा हा भगवान् अनंतरूपी आहे, त्याच्या स्वरूपाचा पार कोणास लागणार आहे. त्या जगदीशाचा सोज्ज्वल महिमा ज्ञानशक्तिरूप आहे. ज्या भाग्यवान विभूतींस परमात्मज्ञान झालें त्यांसच ईश्वराचें खरें स्वरूप कळलें आहे. तें कळण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें त्या भगवंताच्या गुणानुवादाचें सदैव चिंतन करून परमात्मस्वरूपभूत अशा सद्गुरूस अनन्यभावें शरणच गेलें पाहिजे. तो दयाघन कृपाळू होऊन परमात्मस्वरूप दाखवील. आतां आपण ईश्वराच्या शरीरावरील लोकरचनेचा विचार करूं.

---

# ईश्वराच्या शरीरावर लोकरचना.

जगदीश्वर भगवान् विराट रूपी परमात्म्याच्या पावलांच्या तळव्याच्या ठिकाणीं पाताल लोक आहे. खोटेचे जागीं ह्म० टांचेचे ठिकाणीं रसातल होय. पायांच्या घोंट्यांच्या जागीं महातल, पोटऱ्यांशीं तलातल, गुडघ्याच्या जागीं सुतल लोक, मांड्यांशीं वितल लोक आणि भगवंताच्या कंबरेच्या खालीं अतल लोक होय. ईश्वराच्या कटिप्रदेशीं भूर्लोक, नाभीशीं भुवर्लोक, हृदयाशीं स्वर्गलोक, वक्षःस्थलीं महर्लोक, कंठाच्या ठिकाणीं जनलोक, ओष्ठाच्या जागीं तपोलोक आणि मस्तकाच्या ठिकाणीं सत्यलोक, अशी त्या भगवंताच्या अवयवांवर चतुर्दश भुवनात्मक सृष्टि विराजमान आहे. त्यांत ईश्वराच्या चरणांशीं भूर्लोक, नाभीशीं भुवर्लोक, आणि मस्तकीं स्वर्गलोक अशी त्रैलोक्यरचनाही ह्मणविली जाते. यांतच चतुर्दश भुवनांचा अंतर्भाव होतो. असें हें सामान्य रीतीचें वर्णन श्रुतीनें केलें आहे. अशीं अनंत ब्रह्मांडें परमात्म्याच्या एकेक रोमरंध्रांत कोणीकडे लोळत पडलीं असतील त्याचा पत्ता देखील नाहीं. आपण जसें मृत्तिकेचें सावयव चित्र तयार करतों व त्याला वस्त्रें आणि दागिनेही आंगचेच मृत्तिकेचे असतात. अशा चित्राच्या सौंदर्यावलोकनांत अंतःकरण निमग्न झालें ह्म० चित्राचें अधिष्ठान जी मृत्तिका तिचें भान जरी विसरलें तरी त्या चित्राच्या अवयवांस, दागिन्यांस अथवा वस्त्रास जेथें बोट लावाल तेथें मृत्तिकेवांचून अन्य कांहींच सांपडणार नाहीं. तसें परमात्मा अनंत रूपानें विराजमान आहे. कोठेंही व कशासही हात लावावा, परमात्मस्वरूपाहून अन्य कांहींच आढळणार नाहीं. मृत्तिकेचें चित्र ह्मणून जें आपण हातीं घेतों त्याचा नीट विचार करून पाहिल्यास तें चित्र जलांत कालविलेल्या मृत्तिकेच्या असंख्य गोल परमाणूंची राशी आहे. केवळ जलसंयोगानें मृत्कण जसे सावयव आकृतिमान झाले, तसेच परमात्म्याच्या स्वरूपानंदासिंधूंत असंख्य अनंत कोटि ब्रह्मांडें मृत्कणांप्रमाणें कालविली जाऊन जगदात्मा विराटरूप ईश्वराची साव-

यव सुंदर व रमणीय अशी मूर्त्ति प्रादुर्भूत झाली—असें ह्मणतां येत नाहीं ! तर ती अखंडित कायमचीच आहे—असेंच समजलें पाहिजे. जे भाग्यवान् व पुण्यशील उपासक या विराटस्वरूपाचें ध्यान करतात ते अतिशीघ्रतेनें परमात्मस्वरूपीं प्राप्त होऊन जन्ममरणादि क्लेशांपासून सहज अलिप्त होतात. असो. सर्व देवता ईश्वर विभूतीच आहेत. त्यांत प्रधान विभूती कोणत्या याचा आतां आपण विचार करूं.

---

# ईश्वराच्या मुख्य किंवा प्रधान विभूति.

**भगवान् ईश्वराच्या** शरीरावयवादिकांपासून ब्रह्मांडाची सृष्टिरचना कशी झाली आणि इंद्रियाधिष्ठात्री देवता, इंद्रियें व भोग्य विषय अशी त्रिपुटिमय सर्व सृष्टि आहे—हें लक्षांत आलेंच पाहिजे. आतां पहा कीं जो पदार्थ दृश्य झाला तो कधीं तरी उत्पन्न झालेला असतो व त्याचा केव्हां तरी नाश व्हावयाचाच असा पक्का नियम आहे. जशी घटाची आकृति दृश्य होतांच तिच्यावर उत्पत्ति, स्थिति आणि लय असे विकार लागू होतात. या तिन्ही विकारांस अधिष्ठान मृत्तिकाच असून तिच्या स्वरूपांत मात्र कोणत्याहि विकारानें बदल होत नाहीं. घट त्रिकालांत मृत्तिकारूपच आहे. तसे सृष्टीचे उत्पत्ति स्थिति लय परमात्मरूप अधिष्ठानावर जरी झाले तरी सृष्टि त्रिकालांत परमात्मरूपच आहे. उत्पत्ति, स्थिति व लय याच विकारांनीं सृष्टीस परमात्म्याहून केवल भिन्न नामाकृति मात्र आली आहे. वास्तविक स्वरूप एकच आहे. असो. या त्रिविध विकारांनीं सृष्टीचीं त्रिविध कार्यें झालीं. या त्रिविध उत्पत्ति, स्थिति आणि लय अशा कार्यार्थ परमात्म्याच्या प्रधान तीन विभूति झाल्या. मायेच्या उपाधीनें परमात्म्यावर सगुण ईश्वरत्व आलें. त्या योगानें सत्व, रज व तम आणि सत्, चित् व आनंद अशा षड्गुणांनीं संपन्न मायापति भगवान् जगदात्मा झाला. शक्ति असल्यावांचून कोणतेंही कार्य होत नाहीं. ह्मणून परमात्म्याच्या सच्चिदानंद गुणाच्या प्रधान-

तेपासून पुरुष विभूति आणि जगन्मातेच्या तम, रज व सत्व गुणांच्या प्रधानतेनें शक्तिरूप प्रकृतीच्या विभूति अशा त्रिविध द्वंद्वविभूति सृष्टीचीं त्रिविध कार्यें अप्रतिहत आणि सुव्यवस्थित रीतीनें करण्यास समर्थ झाल्या. विराटरूप ईश्वर परमात्म्याच्या आनंदगुणप्रधानतेनें आणि महामायेच्या सत्वगुणोपाधिप्रधानतेनें जगत्पालक अशी भगवान् **महाविष्णू**ची आणि जगन्माता वैष्णवी शक्ति **महालक्ष्मी**ची ऐक्यरूप द्वंद्वविभूति प्रगट झाली. ईश्वराच्या चैतन्यगुणप्रधानतेपासून आणि मायेच्या रजोगुणप्रधानतेपासून भगवान् प्रजापति जगदुत्पादक **ब्रह्मदेव** आणि ब्राह्मी शक्ति **महासावित्री** अशी ऐक्यरूप द्वंद्वविभूति उत्पन्न झाली. त्या जगदात्म्याच्या सद्गुणप्रधानतेनें आणि आदिशक्तीच्या तमोगुणप्रधान उपाधीपासून भगवान् महादेव **शंकर शिव** आणि शैवीशक्ति भगवती **महाकाली** अशी ऐक्यरूप द्वंद्वविभूति जगत्संहारार्थ प्रगट झाली. अशा समर्थ **त्रिमूर्ति** जगदीश्वर विराटरूपाच्या चरणकमलीं महाविष्णु, जननेंद्रियस्थानीं प्रजापति आणि ललाटस्थानीं भगवान् महारुद्र असे विराजमान होऊन परमात्मस्वरूपानंद भोग करीत सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय हीं कार्यें अप्रतिहत करीत आहेत.

---

# ईश्वराचें सर्वेश्वरत्वादि अखंड ऐश्वर्य.

जगन्निवास **भगवान् ईश्वर, विराटात्मा** सर्वाधार, सर्वस्वरूप, सर्वांतरात्मा, सर्वज्ञ, सर्वेश्वर आणि सर्वमय असा सर्वगुणैश्वर्यसंपन्न आहे. हें सर्व प्रकरणाच्या विवेचनावरून सिद्ध झालेंच आहे. त्याचेंच पुन्हां वरील विशेषणानुरूप संक्षिप्त वर्णन करितों. सुवर्णाच्या अलंकारांचीं अनेकविध स्वरूपें आपण पाहतों. त्यांची उत्पत्ति, स्थिति व त्यांचा लय यांस आधारभूत असें सुवर्णच असतें. त्या सुवर्णावर अलंकारांच्या नामरूपांचीच कायती उत्पत्ति, स्थिति किंवा लय होत असतो. पण उत्पत्तीला आधार सुवर्णच, स्थितीला आधार सुवर्ण, आणि पुन्हां लयाला आधारही सुवर्णच. अलंकाराचा सु-

र्वण आधार जसा कोणतेही स्थितींत जात नाहीं तसाच जगत्प्रपंच-रचनेच्या नामरूपाच्या उत्पत्तिस्थितिलयांस केवल परमात्म्याचा आधार असून त्रिकालांत जगदधिष्ठान परमात्मस्वरूपच असल्यानें परमात्मा ईश्वर **सर्वाधार** असा ह्मणविला जातो. अलंकाराच्या भिन्न स्वरूप प्रतीतींतही अलंकार जसा सुवर्णस्वरूपच आहे तशी मायारूप प्रपंचाची भिन्न प्रतीति होत असून ती अधिष्ठानरूप आहे, ह्मणून परमात्माच **सर्वस्वरूप** आहे. जसें अलंकाराच्या आंत बाहेर सर्व सुवर्णच असतें तसें जगत्प्रपंचाच्या आंत बाहेरही परमात्मा ओतप्रोत आहे आणि ह्मणूनच तो **सर्वांतरात्मा** असा शोभतो. आतां आपण एकाद्या ठिकाणीं उभे राहतों व आपली दृष्टि पोहोंचेपर्यंत पहातों तथपर्यंत जें काय असेल तें सरासरींच आपणांस दिसतें, तसेंच ऐकूंही येतें. आणि बुद्धीची धारणाशक्ति असेल तदनुरूप कोणत्याही विषयाचें ज्ञान होतें. याप्रमाणें आपल्या ज्ञानमंदिराची इमारत केवळ एक वीतभर उंच असतांही आपण आपल्या शहाणपणाच्या घमेंडीमुळें दोन बोट उंचीच्या शिखरावर चढतों व त्यामुळें आपणास स्वर्ग दोन बोटें च उंच बाकी आहे असें दिसूं लागतें. वा: काय ज्ञानसंपन्नता ही ! असो. ईश्वर सर्वांतरात्मा ब्रह्मदेवापासून तों मुंगीपर्यंत चैतन्यरूप आणि ब्रह्मांडापासून तों रज:कणापर्यंत जड पदार्थरूप अशा सृष्टीचा आत्मा ह्म० स्वरूपच असल्यानें अनंत सृष्टींत जेथें जें कांहीं होणार किंवा होतें तेथें हा सर्वत्र आहेच. तो नाहीं असें स्थलच नाहीं. त्यास न कळतां एका काडीची हालचाल सुद्धां होऊं शकत नाहीं. ह्मणून फक्त परमेश्वरासच **सर्वज्ञ** असें विशेषण शोभतें. कोणत्याही पदार्थावर शक्ति ह्म० बलावांचून स्वामित्व येत नसतें. शरीरांत शक्ति न राहिली ह्म० स्वत:चें शरीरसुद्धां दुसऱ्याच्या स्वाधीन होतें. अशाच बलाच्या अधिकाधिक चढत्या पायरीनें अल्प जीवापासून तों ब्रह्मादिकांपर्यंत सत्ता स्वाधीन झाली आहे. तरी दुसऱ्या ब्रह्मांडांत त्यांची सत्ता नाहीं. तेथील अधिकारी निराळेच असतात. असो. अशा प्रकारें शक्तीचा न्यूनाधिक भाव व असंख्य ब्रह्मांडांची तोडफोड करणारी महाप्रचंड शक्ति जी **आदिमाया** तीच परमात्म्याची खास इच्छा ह्म० त्याच्या इच्छेवांचून वायु वृक्षाचें पानसुद्धां हालवूं शकत

नाहीं; मग दुसऱ्यांची हकीकतच काय. म्हणून तो **परमात्मा** एकच **सर्वेश्वर** आहे. आतां परमात्म्याच्या स्वरूपाच्या आणि सत्तेच्या व्यतिरिक्त सृष्टींत कोठें कधींच आणि कोणालाच कांहीं आढळलें नाहीं व आढळणारही नाहीं. त्याअर्थी **परमात्मा सर्वमय** आहे. त्यास द्ण्यायोग्य याशिवाय दुसरें विशेषणच सृष्टींत नाहीं. हे सर्वांतरात्मन् जगन्निवासा! विराट ईश्वरा! या स्थळीं माझे भाग्यवान् वाचक, श्रोते व मी अशी ही त्रिपुटी हें सर्व तूंच आहेस असें माझ्या लेखणींतून तूंच काढवीत आहेस.तुझ्या सत्तेवांचून ज्याअर्थी झाडाचें पानही हालत नाहीं, त्याअर्थी मजसमान अल्पबुद्धि जीवानें तुझ्या स्वरूपाचें वर्णन करणें हें देखील तुझ्या इच्छेवांचून संभवत नाहीं. हे ब्रह्मांडनायका, या पूर्ण अनुभवानें श्रीगुरु गंगाधरनाथ महाराजांनीं मला तुझें पूर्ण कृपापात्र केलें आहे आणि असें ह्मणविणारा तरी तूंच आहेस. यावेळीं माझी कांहीं अन्य इच्छा नसून ज्याप्रमाणें मी तुझ्या स्वरूपानंदांत निमग्न आहें त्याप्रमाणेंच माझ्या वाचकांस व श्रोत्यांस आनंदसागरांत निमग्न कर इतकीच माझी तुला अनन्यभावें प्रार्थना आहे. मित्रांनो, या स्थळीं माझी लेखणी कुंठित झाली. दीड तासपर्यंत मी ' माझेपण ' विसरलों व जो सुखानुभव घेतला तो स्वसंवेद्य असल्यानें कसा लिहावा हेंच मला कळत नाहीं. हें स्थल आनंदसिंधूचा केवळ डोह आहे. येथें ज्ञात्यांस व भाविक मुमुक्षूंस व रसिकांस थोडी तरी बुडी लागल्यावांचून पुढें जातां येणार नाहीं. मित्रांनो, श्रीकृपाघन सद्गुरूचें गुह्यहृदय मीं आपल्यापुढें अति उघड मांडून ठेविलें आहे. याहून अधिक लिहिण्यास मी अगदीं असमर्थ आहें.* मित्रांनों, तुम्ही 'आपलेंपण' विसरलेले आपली स्थिति कधीं पहाल, अशी मला पूर्ण उत्सुकता आहे. ज्यांना म्हणून ' आपलेपण ' विसरतां येत असेल ते या माझ्या इशाऱ्याबरोबर लागलेच आपलेपणास विसरतील आणि अशांसच माझ्या लिहिण्याची ओळख पटणार आहे, मुमुक्षूंस चुटपूट लागणार आहे. विद्वानांस आश्चर्य वाटणार आ-

---

* या वेळीं माझी स्थिति मलाच आठवत नाहीं परंतु माझे आत्मीय मित्र अशी एक विभूति ( ग० क० ) हाजर होते व त्यांचा स्थाणूप्रमाणें झालेली स्थिति मला मागून दिसली.

हे, आणि सामान्यांस थट्टा वाटणार आहे? वाटो! याला माझा कांहीं उपाय नाहीं. जो माझा उपाय आहे तो मी श्रीसद्गुरूच्या प्रेरणेनें करीतच आहें. आपण ज्या कक्षेंत असाल तसें आपल्यास वाटू द्या. तथापि कक्षा ओलांडून वर जाणें हें आपल्या स्वाधीन असल्यानें तसें करण्याची मी सविनय आणि अतिनम्रतेनें आपणांस प्रार्थना करतों.

---

## ईश्वराची सगुण मूर्ति अथवा आकृति.

सुज्ञ वाचकहो, येथपर्यंतच्या वर्णनावरून ईश्वराची व्यक्ति सावयव आणि इंद्रियादि अंत:करणसंयुक्त शरीरवान् असली पाहिजे असें सिद्ध झालें. आतां अशी जिज्ञासा होईल कीं, जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज असे चतुर्विध आकृतिमान शरीरधारी जीव दिसतात. त्यांत उद्भिज्ज जाती खेरीजकरून तीन जाती देहेंद्रियज्ञानविशिष्ट अशा आहेत. यांपैकीं कोणत्या आकृतीप्रमाणें ईश्वराची आकृति अथवा मूर्ति असली पाहिजे बरें ? याचें उत्तर असें कीं, कोणतीही आकृति ईश्वराची नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. कारण तो सर्वाधार, सर्वस्वरूप आणि सर्वमय असल्यानें जें कांहीं आकृतिमान ह्मणून आहे तें सर्व ईश्वराकृतीच आहे. तथापि ज्ञानवान् मनुष्यप्राण्यांस ईश्वर सर्वस्वरूप आणि सर्वमय आहे असें यथार्थ ज्ञान हाण्याकरितां ज्या आकृतीचें ईश्वरस्वरूप आहे आणि ज्या स्वरूपाचें ध्यान, धारणा व उपासना केल्यापासून ईश्वर सर्वमय आहे, असा साक्षात् अनुभवानंद प्राप्त होतो किंवा होईल, अशा ईश्वराकृतीचें प्रतिपादन करितों.

आपण एकाद्या उपवनांत नानाविध प्रकारच्या चमत्कारिक वृक्षवल्ली इ० अवलोकन करतों; व त्याच्या पर्णपुष्पादि शोभेनें आपणांस क्षणभर आनंदही होतो. त्यांत कांहीं वृक्ष जुने व आपल्या जन्माच्या पूर्वींचे असतात. त्यांच्या उत्पत्तिलयांवांचून फक्त स्थिति मात्र आपणास दिसते. आणि ते वृक्ष उगवण्याच्या पूर्वीं त्यांचें जें बीज पेरलें गेलें तें जरी आपण पाहिलें नाहीं तरी त्या वृक्षाचें फल

हातीं आल्यास किंवा येतांच हेंच फल ह्या वृक्षाचें बीज असावें असें निःशंकपणें आपणांस वाटतें, आणि बहुकाल पूर्वी परलेल्या बीजाची आपल्यास पक्की ओळख पटते. त्यांत फरक काय तो भूत आणि वर्तमान अशा कालांचाच मात्र दिसतो. 'बीज व फल हें एकरूप असतें. त्यांत कदापि अंतर पडतच नाहीं, हा सिद्धांत आहे. या उदाहरणावरून असें पहा कीं, मनुष्येतर जीववर्गास शरीरेंद्रियादि अवयव मनुष्याप्रमाणेंच आहेत. शरीररचना भिन्न भिन्न असते त्याची आपणांस गरज नाहीं. पण इंद्रियोपभोग सर्वांचे समान आहेत. व तृप्तीचा आनंदहि सर्वांचा समान आहे. परंतु ज्ञानकोटींत मनुष्याच्या जोडीचा प्राणी सृष्टींत नाहींच. इतर जीवांचें ज्ञान, आहार, निद्रा व मैथुन आणि प्राणाच्या भीतीनें स्वशरीर रक्षण करणें, इतक्या पुरतेंच आकुंचित असतें. पूर्वी अमुक केलें व आतां अमुक करावयाचें इ० कर्तव्यबुद्धीचा ज्ञानविकास इतर कोणत्याच जीवांस नाहीं. ह्मणून ते पशुवर्गांत मानले आहेत. आणि नरदेहधाऱ्यांतही ज्यांस कर्तव्यज्ञान नाहीं त्यांचीही त्या वर्गांतच गणना होत असते. असो. ईश्वरकृपादत्त बुद्धीनें हा मनुष्य सृष्टिप्रपंचज्ञानांत निपुण होतो. बुद्धिबलपराक्रमानें स्वजातीयांवर व इतर जीवांवर सत्ता चालवून सर्वांस आज्ञांकित करून घेतो. इच्छित सौख्यें भोगून आनंदानें तृप्त होतो ! प्रपंचांत इष्टानिष्ट प्राप्तीनें आणि सुखदुःखानुभवानें अनित्यत्व दोषदर्शनेंकरून सारासारविचार कर्तव्याकडे वळला कीं, ईश*कृपेनें सद्गुरुचरणाश्रित होऊन त्यांहीं दर्शित सृष्टिरूप अनंत +वृक्षाच्या उपवनांत विहार करीत, श्रुतिशाखांवर चढून, कर्मरूप निबिड पर्णसमूहास एकीकडे सारून, अनंत वासनात्मक सुवासिक पुष्पगुच्छ मकरंदसेवनास लुब्ध न होतां व असंभावनादि दोष दंशांस ह्म० मधुमक्षिकांस न भितां, गुरुवाक्यविश्वासहस्तानें, त्रिपुटीरूप अंगुलींत, स्वरूपामृत फल दृढ धारण करून

---

* हें स्थल अति सूक्ष्म बुद्धीनें विचारणीय आहे, हें वाचकांनीं जास्त वेळ वाचून चांगलें लक्षांत आणावें.

\+ अव्यक्तबोध पुस्तकाच्या आरंभीं अनंत वृक्षाचें चित्र दिलेलें आहे त्यांत खालीं आत्मभूमी आणि वरतीं उन्मन परमात्मभूमी अशी आहे.

वृत्तिमुखानें सेवन करून, निरवधि सुखरसप्राशनेंकरून आणि पंचकोशात्मक फळाच्या सालीस दूर करून पाहतांच " नाहं जीवश्चिदात्मा " या ऊर्मिरूप *कवटींत 'सोहं' बीज सांपडलें ! तेव्हां कृपाघन सद्गुरूनें असा बोध केला कीं, वत्सा हें तेंच बीज आहे कीं, जें वृक्षाच्या मूळाशीं अखंडकालचें आहे. येथें 'अहं' बीजावर जीवाच्या पंचकोशांची व्यष्टिरूप कवटी आहे. आणि तेथें "सः" या बीजावर विराटाच्या सृष्टिरूप पंचकोशांची कवटी आहे. असा हा कवटीपर्यंतच काय तो स्थूलसूक्ष्माचा भेद आहे. " सोऽहं " बीज दोनी कवटींत एकरूपच असल्यानें हें जीवरूप 'फल' आणि ईश्वररूप 'फलबीज' यांत यत्किंचितूही भेद नाहीं. हा सृष्टिरूपी अनंत वृक्ष जीव व ईश अशा फलबीजांतर्वर्ति असल्यानें तोही बीजफलांतच आहे. त्यांत भिन्नभाव कोठेंच व कशांतही नाहीं. बीजाची जी आकृति असते तीच फलाचीही आकृति होते. अन्यथा कधीं होत नाहीं. " मित्रहो आत्मसाक्षात्कार आणि ईश्वरज्ञान ज्या मनुष्याकृति फलांत आहे त्या फलाचें बीज जो ईश्वर हा मनुष्याकृतीच असला पाहिजे हें सिद्ध होतें. मनुष्याकृतीवांचून देहेंद्रियादि ज्ञानसंपन्नता दुसऱ्या शरीराकृतींत यथार्थ नसते हें आपण पूर्ण ध्यानांत आणलें पाहिजे. आतां दुसऱ्या रीतीनें ईश्वराची आकृति सिद्ध करून दाखवितों.

## ईश्वराच्या सगुणरूप सिद्धीची अन्य रीति.

जीवमात्राचा जन्म झाल्यानंतर त्याची जी सावयव शरीराकृति आपणास दिसते ती त्याचा जन्म होण्यापूर्वीं मातेचे गर्भाशयांत पूर्ण तयार झालेली असते. गर्भस्थ आकृति जरी आपणास कोणत्याही साधनानें दिसूं शकत नाहीं, तरी जन्म होण्याच्या अगदीं पूर्वीं कांहीं वेगळी आकृति होती व जन्म घेतल्यानंतर दुसरी झाली असें कदापि ह्मणतां येणार नाहीं. किंबहुना मातापितरांच्या रज व रेत-

* कवटी ह्म० फळांतील बीजावरील टरफल अथवा कवच.

बिंदूंत तयार होणारी आकृति अति सूक्ष्मरूपानें ह्मणजे केवळ अव्यक्त रूपानें सिद्ध असते. आणि तीच मातृभुक्तान्नरसानें गर्भाशयांत वृद्धिंगत व परिपक्व होऊन जन्मास येतांच बाहेर व्यक्त दिसूं लागते. मोठ्या वृक्षाचें अस्तित्व सूक्ष्मरूपानें बीजांत असतें तेंच भूमिजलसंयोगानें व्यक्त दिसूं लागतें. बीजांत आकृति नसतां आकृति उत्पन्न होते असें कदापि ह्मणतां येणार नाहीं. बीजांतील आकृति दृग्गोचर होत नाहीं हें खरें आहे; तथापि तिचें अस्तित्व विचारानें ग्रहण होऊं शकतें.*

आतां आपणास बरेंच मागें ह्म० ब्रह्मप्रकरणांत गेलें पाहिजे. परमात्म्याचें आणि ॐकाराचें ऐक्य दाखविलेल्या स्थळीं ॐरूप परमात्मा बिंदुरूप होता. त्यावेळीं मायेची तमोगुणप्रधान आणि परमात्म्याची सत्‌गुणप्रधान अशी सुषुप्ति अवस्था असून सृष्टि 'कारणरूप' सृष्टि झाली. पुढें ॐरूप परमात्मा रेषारूप होतांच मायेची रजोगुणप्रधान व परमात्म्याची चैतन्यगुणप्रधान स्वप्नावस्था झाली व सृष्टि सूक्ष्मसृष्टि ह्मणवूं लागली. नंतर ॐरूप परमात्मा अक्षररूप होतांच मायेची सत्वगुणप्रधान व परमात्म्याची आनंदगुणप्रधान अशी जाग्रदवस्था होऊन सृष्टि पांचभौतिक स्थूलसृष्टिरूपानें व्यक्त होऊं लागली. ही पांचभौतिक स्थूलसृष्टि पूर्ण ॐकाररूप विराटात्म्याचा स्थूल देह आहे. हा स्थूल देह, व्यक्त होण्यापूर्वी चंद्राकार मात्रारूप ॐकाराच्या स्वप्नावस्थारूप मायागर्भाशयांत सावयव परिपक्व झाला होता. हा सावयव गर्भ ॐकाराच्या बिंदुस्वरूपीं कारण शरीर ह्म० केवळ रेतबिंदूप्रमाणें मायागर्भांत स्थित होता. हा मायागर्भाशयस्थ 'सृष्टिबिंदु' अव्यक्त जीवांच्या कर्मरसानें पोषित होऊन रेषारूप सावयव पूर्ण झाला आणि जीवाचा कर्मभोगकाल येतांच रेषारूप सावयव सृष्टिबिंदु मायागर्भांतून बाहेर पडून अक्षररूप स्थूलसृष्टि झाला; ह्म० विराटात्मस्वरूपानें पूर्ण उदयास आला. आतां बिंदु स्वस्थान न सोडतां गतिरूप उपाधीनें

* सध्यां सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिल्यास रेतबिंदूंत अंडीं दिसण्यापर्यंत मजल येऊन पोहोंचली आहे. पुढें जास्त कल्पनेनें त्यांत आकृतीही दिसूं लागेल. यावरून शोधकाची धन्यता आहे यांत शंका नाहीं. असो!

रेषा झाला व सरळ वक्र उपाधीनें अक्षर झाला आहे. हें अखंड ॐकाराचें स्वरूप व धुराच्या ढगांचा व रंगांचे कण पाण्यांत टाकल्याचा दृष्टांत नीट लक्षांत आणा ह्म० मी काय सांगतों तें पूर्णपणें ध्यानांत येईल. व येथेंही मी त्याची आकृति काढून दाखवितों ती पहा.

## नंबर ४




हा परमात्मबिंदु मायागर्भांत आहे. येथें सृष्टीचें रेतबिंदूप्रमाणें अस्तित्व आहे. पुढें हाच बिंदू स्वस्थान न सोडतां गतीनें रेषारूप झाला व येथें सृष्टि मायागर्भांत पूर्ण अवयवसंपन्न देहरूप झाली. ह्म० विराटाचा देह पूर्ण तयार झाला.

पुढें तोच रेषारूप बिंदु वक्रगतीनें अक्षररूप पांचभौतिक स्थूल सृष्टिरूप झाला. आतां येथें असें पहा कीं, गर्भाशयस्थ विराटात्म्याची अवयवसंपन्न झालेली ही आकृति मस्तक, कंठ, हस्त, उदर आणि पाद अशी मनुष्याकृति झाली आहे व जी चतुर्दश भुवनात्मक सृष्टिरचना ज्या ज्या अवयवांवर व इंद्रियादिकांवर देवता इ० वर्णन करून दाखविली आहे ती स्थूलरूपानें दृश्य होण्यापूर्वीच सूक्ष्मरूपानें विराटात्म्याचे शरीरावयव तयार होतांनाच अव्यक्त रूपानें त्यावर बसली आहे किंवा त्या परमात्म्या विराटाचे अवयव अव्यक्त सृष्टिरूप होते? कसेंही ह्मणा दोन्हींकडून अभिन्नभावच आहे. आणि परमात्मा ॐकाररूप आहे व ॐकाराचे अष्टावयव परमात्म्याच्या अष्ट विभूति आहेत, इ० सर्व वर्णन होऊन चुकलेंच आहे. या सर्वांवर एकवार आपण नीट व सूक्ष्म रीतीनें लक्ष दिलें ह्म० मीं परमात्मा विराटात्म्याची जी मनुष्याकृति सिद्ध करून दाखविली ती आपल्या हृदयांत दिसूं लागेल. व दृढ उपासनेनें प्रत्यक्ष दृग्गोचर होऊन दर्शनानंदानें तृप्त व्हाल.

# ईश्वराच्या स्वतंत्र अवतारमूर्ति.

सच्चिदानंदघन परमात्मा **विराट ईश्वराची** सगुण सुंदर मूर्ति देहेंद्रियादि अवयवसंयुक्त अशी नराकृतिमान असली पाहिजे हें सिद्ध झालें. आणि त्याच्या देहेंद्रियापासून इंद्रियाधिष्ठात्री देवता, इंद्रियें आणि सृष्टिरूप भोग्यविषय निर्माण होऊन सर्वांकडून सृष्टिसंघातकार्य व्यवस्थित चालविण्याकरितां शिव, विरिंची व विष्णु अशा प्रधान विभूति स्थापून सर्वांवर आपण जगन्नियामकत्वरूपानें विराजमान आहे. त्याच्या आज्ञेनुसार सृष्टि उत्पत्ति, स्थिति व लयादि कर्में सर्व देवता विभूति आपापल्या अधिकारानुरूप आणि नियमानुरूप चालवीत आहेत. पण सृष्टींत आकस्मिक कारणपरत्वें ह्मणजे दैत्यादि तमोगुणप्रधान जीव असे बलवान् उत्पन्न होतात कीं त्यांच्या स्वसंपादित बलाढ्य शक्तीनें सर्व जीव त्रस्त होतात. त्याच्या निग्रहार्थ सत्वगुणप्रधान देवता असमर्थ होऊन क्लेश पावूं लागतात, कांहीं उपाय चालत नाहीं. अशी जीवमात्रांची दुःखद स्थिति पाहून त्या पीडित जीवांच्या शुभकर्मफलानुरूप क्लेशनिवृत्त्यर्थ आणि दुष्ट जीवांच्या अशुभकर्मफलानुरूप शासनार्थ त्या भगवान् निरहंकाररूप विराटात्म्यास ( जशी सृष्ट्यारंभीं जीवाच्या कर्मभोगार्थ "एकोऽहं बहुस्यां" अशी ऊर्मी उत्पन्न होऊन परमात्मा सृष्टिमय होतो. त्याप्रमाणेंच ) जी इच्छा उत्पन्न होते त्या इच्छामात्रें-करून ज्या कालीं जशा प्रकारचें कार्य असेल त्या कार्यार्थ जीं स्वतंत्र स्वरूपें धारण करितो तीं स्वरूपें सच्चिदानंद भगवान् **श्री रघुकुलपति रामचंद्र** आणि यदुकुलपति **श्रीकृष्ण चंद्र** इ० अवतार मूर्ति होत. ह्या विराटात्म्याच्या स्वतंत्र विभूति ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, शिव, विरिंची व विष्णु आणि इंद्र, चंद्र व सूर्यादि ह्या विभूति सृष्ट्यारंभापासून सृष्टिसमाप्तीपर्यंत सृष्टीचें कार्य सुव्यवस्थित रीतीनें चालविण्याकरितां निरनिराळे अधिकार व कार्यें वांटून दिलीं असल्यानें सर्वांच्या सत्ता परिमित आणि पृथक् होऊन त्या पलीकडे कोणाची शक्ति चालत नाहीं. अशा नियमित अधिकारावर सर्वांस

कल्पांतापर्यंत कार्यें करीत रहावें लागतें. आणि ह्या स्वतंत्र अवतार-विभूति आकस्मिक कार्यार्थ नियमित वेळेपुरत्या एकदम प्रादुर्भूत होऊन ह्म० व्यक्त होऊन कार्य करून एकदम अव्यक्त होतात. ह्मणून सृष्टिचालक ज्या विभूति आहेत त्या सर्व ईश्वराच्या मायेनें निर्मित आहेत. आणि रामकृष्णादि अवतार मूर्ति ईश्वराच्या इच्छा-निर्मित आहेत. त्यांस कालकर्मगुणांदिकांचा प्रतिबंध नाहीं.

कालकर्मगुणांचा प्रतिबंध असा कीं, सृष्टिचालक देवता विभूतीचा अधिकार सामान्य जीवांस कर्मानुष्ठानतपोबलानें आणि योगबलानें प्राप्त करून घेतां येतो. आणि तो अधिकार कालानुरूप कल्पांतरीं सृष्टीच्या घडामोडीनंतर त्या त्या जीवांस मिळतो. पुढील कल्पांत अगस्ति ऋषि ब्रह्मदेव आणि बली इंद्र होणार आहे इ० सर्व व्यवस्था आजला तयार आहे. ह्याचें सविस्तर वर्णन ग्रंथांतरांत आहेच. हे सर्व अधिकार कर्मकरून प्राप्त होतात. पण ईश्वरी अवतार विभूति आणि सत्ता कोणत्याही कर्मानें प्राप्त होत नाहीं. ह्मणूनच ह्या मूर्ति इच्छानिर्मित आहेत. बाकी सर्व विभूति कर्म-निर्मित ह्म० मायानिर्मित आहेत. आकस्मिक सृष्टिकार्यार्थ भगवान् विराटात्मा जव्हां आपले इच्छेनुरूप अवतारमूर्ति धारण करून सृष्टींत विराजमान जोंवर असतो तोंवर त्याचे कार्यसाधनार्थ सृष्टिचालक इतर विभूति आवश्यकता असेल तदनुकुल रूपें धारण करून त्या परमात्मविभूतीच्या सेवेंत तत्पर असतात आणि कार्यसमाप्तीनंतर तो अव्यक्त होतांच ही मंडळीहि आपल्या पूर्व स्वरूपीं जाते. मित्रहो ! हा सृष्टिप्रपंचाचा खेळ अनंतकोटीब्रह्मांडनायकानें स्वच्छाविहारार्थ निर्माण करून आपणच भोग्य विपय, आपणच भोग-साधन इंद्रियें आणि आपणच भोक्ता असा सर्वस्वरूप, सर्वमय आणि सर्वेश्वररूपानें नटून अखंड जगन्नाटकांत रममाण होत आहे. यांत परमात्म्याचा काय हेतु असावा. याचा आजवर कोणास पत्ता लागला नाहीं व यापुढेंही तो कधीं लागणार नाहीं. तथापि श्रुतिसार विचारानें अवलोकन केल्यास केवळ विचारशील जीवांनीं जगदात्म्याच्या अगाध स्वरूपानंदसिंधूंत निमग्न आणि तन्मय होऊन अज्ञानकृत भ्रांतीनें आलेल्या जीवभावाची शृंखला तोडून कृतकृत्य व्हावें

असेंच शेवटीं पर्यवसान होतें. हें पर्यवसान नीट मनांत आणून त्या सुखसिंधूंत निमग्न होण्याकरितां ईश्वरोपासना आणि सद्गुरुचरणावलंब यांशिवाय अन्य उपायच नाहीं. मित्रहो तुह्मी, जर सद्गुरुचरणावलंबी व्हाल अथवा असाल तरच तुह्मांस माझ्या लेखापासून आनंद मिळेल. पेक्षां कांहीं तरी लिहिलें आहे असें ह्मणाल, पण तशी अनादरबुद्धि न करण्याची आपणास माझी सविनय प्रार्थना आहे. असो. आतां मी एकवार या ईश्वरप्रकरणाचें सिंहावलोकन करून सारांश आपल्या पुढें मांडतो व हें प्रकरण समाप्त करितों.

---

## प्रकरणाचा सारांश.

गेल्या मायाप्रकरणांत निर्मल, अलेपक आणि व्यापक परमात्म्यावर मायाकृतउपाधींनीं जाग्रदादि अवस्था, अवस्थाभिमानी हिरण्यगर्भादि नांवें आणि जडचैतन्यात्मक अखिल सृष्टि आरोपित झाली असून अनादि अनंतत्व जरी सृष्टीस आलें तरी परमात्मा अलिप्तच आहे, असें सिद्ध झाल्यावर वाद्यांनीं परमात्ममाया संयोग होऊं शकत नसल्यानें कायमचेंच द्वैत आहे किंवा माया स्वतंत्र आहे अथवा परमात्मा मायाशबल आहे. ( हें उपासकांचें मत आहे ), तसें नसल्यास सृष्टीच स्वतंत्र आहे, असे चार आक्षेप आणि त्यांचें खंडन, मायेला परमात्म्याहून पृथक् सत्ता येऊं शकत नसल्यानें द्वैत संभवत नाहीं. माया शक्तिरूप असल्यानें तिला शक्त पुरुषाच्या आश्रयावांचून राहतां येत नसल्यानें माया स्वतंत्र होत नाहीं. परमात्मा मायाशबल नाहीं. मायाशबल **ईश्वर** आहे. तो मायादृष्टीनें परमात्म्याचा अंश आहे. आणि पांचभौतिक सृष्टि जडरूप असल्यानें तिला स्वातंत्र्य येतच नाहीं. पांचभौतिक जडांशांत प्रेरक चैतन्यांश व्यापक असल्यानें त्याच्या आघातानें जडांशांत गति उत्पन्न होते. तोच सृष्टिव्यापक ‘ चेतनांश ’ जगन्नियंता ईश्वर आहे. अशा प्रकारें खंडन झाल्यावर वाद्यानें पुनः तीन दोषारोप आणिले; ते असे कीं, परमात्मा

व माया हे दोन निराळे आहेत अथवा परमात्म्यापासून मायेची उत्पत्ति आहे किंवा परमात्मा मायारूपानें दिसतो. त्याच्या उत्तरांत अज्ञानकालपर्यंत जडाचें, चैतन्याचें अथवा कशाचेंही यथार्थ ज्ञानच होत नाहीं. त्यामुळें हा चेतनांश आणि हा जडांश अशा यथार्थ द्वैताची सिद्धि होत नाहीं. आणि भ्रमामुळें दिसलेल्या अन्यथा विषयाचें अधिष्ठान सत्य असतें ह्मणून आपल्या ठिकाणीं, भ्रम होऊन परमात्म्यावर जगदारोपाची अन्यथा प्रतीति होते. यामुळें परमात्म्यापासून मायाप्रपंचाची उत्पत्ति संभवत नाहीं, व निर्मल पदार्थाच्या घनीभावानें शाम रंगाची आभा भासल्यानें शाम रंग पृथक् सिद्ध होत नाहीं. त्याप्रमाणें परमात्मा जगद्रूप भासल्यानें जगास पृथक् सत्ता येत नाहीं. नेत्ररोगानें अन्यथा प्रतीति जशी पदार्थाची होते तशी अज्ञानभ्रमामुळें परमात्म्याची प्रपंचरूपानें प्रतीति होत आहे. अशा प्रकारें खंडन झालें. त्यावर वाद्यानें जग सगुणरूप दिसत असतां निर्गुण परमात्मरूप कसें संभवतें हा आक्षेप आणिला. त्याच्या खंडनार्थ जलाच्या झालेल्या गारेंत जलाहून कांहींच पृथकता येत नाहीं, केवल प्रतीति जी होते ती आभासरूप आहे; अशीच परमात्म्याहून जगाची भिन्न प्रतीति नसतां जी भासते हेंच मूळ अज्ञान आहे. त्या अज्ञाननिवृत्त्यर्थ ईश्वरोपासना आणि गुरुचरणावलंबन हेच उपाय आहेत असें उत्तर दिलें गेलें. नंतर ईश्वराच्या स्वरूपवर्णनांत ईश्वराची देहेंद्रियादि सावयव शरीररचना, आणि त्यापासून इंद्रियाधिष्ठात्री देवता, प्रपंचरूप भोग्य विषय इ० त्रिपुट्या आणि शरीरावयवांवर चतुर्दशभुवनांची लोकरचना इ० सांगून विराटात्म्याचें जगन्नियामकत्व, त्याच्या सृष्टिचालक विभूति, प्रधानविभूति आणि रामकृष्णादिक स्वतंत्र मूर्ति आहेत. याचें प्रतिपादन करून ईश्वराची मूर्ति मनुष्याकृतीची आहे असें दोन प्रकारांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. यावरून आतां आपल्या लक्षांत येईल कीं, ज्याप्रमाणें समुद्रांत थोडा जलप्रदेश शाम, रक्त व श्वेत अशा तीन प्रकारच्या मिश्ररंगानें गढूळ झाला आहे, त्याच जलांतून पाटानें तीन मोठे मोठे असे तलाव भरून काढले, त्यांतूनही नळानें अनेक स्वल्प जलाशय सांठविले व त्यापासून सहस्रावधी लोक आपलीं लहानमोठीं भांडीं

भरून शेवटीं थेंब व तुषारापर्यंत जलविभाग झाले, त्यांत जलांश सर्वत्र सारखा राहून केवल उपाधीच्या विभागानें न्यूनाधिक भाव आला आहे. त्याचप्रमाणें त्रिगुणात्मिका मायेनें वेष्टित अथवा व्याप्त असा जितका परमात्मभाग असेल तो पूर्ण भाग विराट ईश्वर असून त्याच्यापासून तीन प्रधान विभूति इ० होऊन तुषाररूप असंख्य जीव असल्यानें आत्मा सर्वत्र सामान आहे. ह्मणूनच श्रुतीनें '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' आणि '**हरिरेव जगत् जगदेव हरिः**' असें सांगून मौन धारण केलें. हा विराटात्मा मायी महेश्वर जगन्नियामक आहे. आणि तुरीय ब्रह्म निर्मल सिंधुजलाप्रमाणें अनंत अगाध आणि अलिप्त असें आहे. आत्मज्ञानी यांत मिसळून एकरसानुभव करितो. आणि सगुणाग्रही उपासक मायी महेश्वराहून पुढें निर्मल आनंदसिंधूस पहात नाहीं व समजतही नाहीं. यामुळें निरवधि सुखास्वाद त्यास मिळत नाहीं. हा इतकाच उपासकाचे मतांत भेद आहे. तथापि उपासनाच अति श्रेष्ठ असून निर्मलानंदप्राप्तीची पायरी असल्यानें मुमुक्षूंनीं ईश्वरोपासना आणि सद्गुरुचरणशरणभावच स्वीकारून कृतकृत्य व्हावें अशी सर्वांस शेवटीं सविनय प्रार्थना करून हें ईश्वरप्रकरण समाप्त करितों, यांत जें न्यून असेल तें आपण पूर्ण करून घ्यावें.

ॐ तत्सत् इति.

‘ ॐ श्रीसृष्टिरूपात्मने नमः ’

# प्रकरण ४ थें.

# सृष्ट्यानंद प्रदेश.

## सृष्टीचें स्वरूप.

ओतः प्रोतश्च तंतुष्विह विततपटश्चित्रवर्णेषु चित्र-
स्तस्मिन् जिज्ञास्यमाने ननु भवति पटः सूत्रमात्रावशेषः ॥
तद्वद्विश्वं विचित्रं नगनगरनरग्रामपश्वादिरूपं,
प्रोतं वैराजरूपे सवियाति तदपि ब्रह्मणि प्रोतमोतम् ॥ १ ॥

“ श्रीमच्छंकराचार्यभगवत्पूज्यपादाः ”

गेल्या प्रकरणांत जगन्नियामक ईश्वराविषयीं आलेल्या आक्षेपांचें निरसन करून ईश्वराच्या स्वरूपाची सिद्धि, त्याचें अगाध सामर्थ्य, त्याच्या विराटस्वरूपीं अनंतकोटि ब्रह्मांडांची सहज रचना इ० सविस्तर वर्णन झालें आहे. आतां ज्या विराट ईश्वराच्या स्वरूपरचनेंत अनंत सृष्टि विराजमान दिसत आहे; आणि तिच्या अवलोकनांत, विचारांत आणि शोधांत अनेक युगेंचीं युगें शोधकांचीं आयुष्यें खर्च झालीं व होत आहेत; तथापि तिच्या उत्पत्तिलयांचा यथार्थ थांग लागत नाहीं. साक्षात् श्रुतिही तिच्या शोधांत कुंठित झाली व सरते शेवटीं तिनें सामान्यतः मुख्य ठळक गोष्टीचा विचार करून वृथा परिश्रमाची दिशा सोडली आणि सत्यशोधाकडे प्रवृत्त झाली. कारण, सृष्टि हें मायेचें क्रीडाभुवन आहे. तिच्यांतील अनंत पदार्थांच्या सौंदर्यावलोकनांत आणि सारग्रहणांत जें सुख आणि मौज आहे तें तिच्या शोधाचा पाठलाग करण्यांत नाहीं. तिचा थांग लावणें कधींच शक्य नाहीं. सामान्य मनुष्याच्या प्रयत्नांनीं तयार झालेलें ‘ पदार्थसंग्रहालय ’ पाहण्याचा बहुतकरून पु-

ष्कळांस अनुभव आहेच. त्यांत शिरतांच तेथील असंख्य पदार्थां-च्या देखाव्यानें दृष्टि व अंत:करण अगदीं थक्क होऊन जातें. हें पाहूं कीं तें पाहूं असें होऊन पुष्कळ दिवस जरी व्यतीत केले तरी पुरती माहिती होणें शक्य नाहीं. त्या संग्रहालयांत तरी चमत्कारिक पदार्थांचाच सामान्य भरणा असतो. सृष्टीच्या मानानें त्याची रज:-कणाबरोबर सुद्धां तुलना होणार नाहीं. मग ईश्वरी संग्रहालयाचा थांग काढण्यास कोण समर्थ आहे. तथापि श्रुतीनें जो सामान्य विचार केला आहे त्याचाच मी आपले अल्प बुद्धीनें बनेल तसा वि-चार करून सुज्ञ वाचकांपुढें ठळक ठळक मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करीत आहें.

---

# सृष्टीविषयीं विचार.

**सृष्टि** ही कधीं उत्पन्न झाली, कोणत्या क्रमानें व कशी झाली, हिची आद्यस्थिति कशी होती व पुढें तिची वृद्धि कशी झाली, इ० गोष्टींचा थांग लागणें अथवा त्याचा प्रयत्न करणें ह्म० केवळ पृथ्वी-चे परमाणू मोजण्याच्या प्रयत्नाप्रमाणें आहे. सृष्टीच्या उत्पत्तिस्थि-तिलयांविषयीं श्रुतीनें जो विचार केला आहे तो अगदीं आद्य सृष्टी-चाच आहे असें ह्मणतां येत नाहीं व श्रुतींतही तसेंच आहे. कार-ण **सृष्टि** ह्या शब्दांत दृष्ट, श्रुत आणि मनोवेद्य इतक्या सर्वांचा समा-वेश होतो. या पलीकडे कांहींच उरत नाहीं. सृष्टीविषयीं विचार यांत ' **विचार** ' हा देखील सृष्टींतलाच एक अंश आहे. विचार करणारा उत्पन्न झाल्यावांचून विचाराची उत्पत्ति होत नाहीं. विचार उत्पन्न होऊन परिपक्व दशेस आल्यावरच ' विचार ' कसे उत्पन्न होतात याचा निर्णय जो तो करणार; पण तो निर्णय बिनचूक झाला असला तरी राहील अप्रत्यक्षच; कारण **विचारणीय** पदार्था-वरून अथवा विषयावरूनच विचाराच्या ... त्याचा शोध करणार. अर्थात हा शोध आपल्या पुत्राच्या जन्मादिकांपासून आपल्या स्वत:-च्या उत्पत्तीच्या निर्णयाप्रमाणें झाला. हा निर्णय जरी अप्रत्यक्ष

आहे तरी अगदीं ठाम व बिनचूक आहे. यांतील चूक धुंडणारास काय निष्पन्न होईल ? हें उघड दिसतच आहे. अनादिकालापासून असंख्य सृष्टींच्या उत्पत्तिस्थितिलयांची घडामोड चालू आहे. यांत आद्यसृष्टि कोणती याचा जरी निर्णय होत नाहीं, तरी या सृष्टिमालिकेंतील कोणत्या तरी एका सृष्टीची उत्पत्त्यादि घडामोड सांगितली ह्मणजे त्यावरून सर्व सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम समजून घ्यावयाचा इतकेंच कायतें. यापेक्षां त्यांत अधिक सार असेल असें मला तरी निदान वाटत नाहीं.

मायेचें अव्यक्त स्वरूप काल्पनिक **सूक्ष्मसृष्टि** आहे; आणि मायेचें व्यक्त स्वरूप पांचभौतिक **स्थूलसृष्टि** आहे. असें मागें पुष्कळ ठिकाणीं सिद्ध झालेलें लक्षांत असेलच. माया स्वत: सत्यमिथ्यांहून वेगळी अशी **अनिर्वचनीयरूप** आहे. भ्रमकालांत प्रतीत होणारा पदार्थही अनिर्वचनीयच असतो. रज्जूवर सर्पाची भ्रांति होते त्या भ्रांतीला कारण जो सर्प तो अनिर्वचनीय आहे. त्याला सत्य ह्मणावा तर सांपडत नाहीं, मिथ्या ह्मणावा तर दिसतो, भीति वाटते; ह्मणून जशी भ्रांतिकालांत सर्पास रज्जुहून अभिन्न अनिर्वचनीय सत्ता आहे तशीच अज्ञानकालांत सृष्टीची अनिर्वचनीय सत्ता परमात्म्याहून अभिन्न आहे. ज्याप्रमाणें अनिर्वचनीय सर्पसत्ता नाहींशी करून सत्य अधिष्ठान रज्जूचा थांग लावावयाचा, त्याप्रमाणें परमात्म्याहून अभिन्न सृष्टीची अनिर्वचनीय सत्ता नाहींशी करून अधिष्ठानरूप सत्य परमात्म्याचा थांग लावावयाचा हाच मुख्य हेतु व हाच पुरुषार्थ असल्यानें **श्रुतिमातेनें** सृष्टिशोधांत वृथा परिश्रम न करतां कोणत्या तरी एका सृष्टीची घडामोड परमात्माधिष्ठानावर दाखवून परमात्मतत्त्व उघड करून ठेविलें. आणि विचारशील मुमुक्षूंस अति सुलभ विचाररूपी राजमार्ग मोकळा करून दिला, त्या मार्गानें गेल्यास पुरुषार्थसिद्धि बिनचूक ठेविली आहे. अत्यंत क्षुधा लागली असतां कोणी स्वयंपाकाची शिधासामुग्री सज्ज करून दिल्यास त्याची पाकनिष्पत्ति शीघ्र बनेल तितकी करून तृप्ति करून घेणेंच बुद्धिमानाचें काम आहे. व तितक्या पुरती अवश्य असेल ती चौकशी करणेंही उचित आहे. पेक्षां सामुग्री देणारा सत्पात्र आ-

हे असें समजल्यावरही, " कांहो हें धान्य कोणत्या शेतांत पिकलें ? कधीं पेरलें ? त्याला काय साहित्य लागतें ? हीं लांकडें कोणत्या वृक्षांचीं आहेत ? ते वृक्ष कधीं उगवले ? त्यांला बीजें कोठून आणलीं ? अमुक देशांत हे पदार्थ असे होतात, येथें वेगळ्या तऱ्हेचे दिसतात हा असा परस्पर विरोध कां ? " इ० निष्प्रयोजन चिकित्सा आरंभिल्यास देणारा, मी सत्पात्र आहें. ही सामुग्री निर्दोष आहे. तुला माझे ठिकाणीं विश्वास असून क्षुधा लागली असल्यास आधीं पाकनिष्पत्ति करून तृप्त हो, मग पुढें चिकित्सेची गरज उरली तर पहातां येईल, असेंच उत्तर देईल. आणि हा क्षुधातुर असल्यास त्याचें ह्मणणें स्वीकारील आणि तृप्त झाल्यावर आनंदानें निद्रा ताणील. पुढें नस्ती उठाठेव तो करतो कशाला. याचप्रमाणें बुद्धिमान मुमुक्षू श्रुत्यर्थसार ग्रहण करून परमानंद प्राप्तीनें निरंकुश तृप्त होऊन स्वरूपयोगनिद्रा जे ताणतात त्यांस पुन्हां जगद्रूप जागृतीचें भानसुद्धां होत नाहीं. या निद्रेंत निमग्न होण्याचा प्रयत्न करण्याविषयीं मी आपल्या प्रिय सुज्ञ वाचकांस विनंति करून मुख्य विषयाकडे वळतों.

# सृष्टीचें स्वरूप.

## ' कारणसृष्टि '

सृष्टीचें स्वरूप अथवा सृष्टीच्या अवस्था त्रिविध आहेत. ह्म० ( १ ) **कारण सृष्टि** ( २ ) **सूक्ष्म सृष्टि** आणि ( ३ ) **स्थूल सृष्टि** असे तीन भेद त्यांत आहेत. ( १ ) कारणसृष्टींत अथवा कारणावस्थेंत सृष्टीचें स्वरूप केवळ अमूर्त ह्म० अस्तित्व रूपानें आहे; ( २ ) सूक्ष्मसृष्टींत अथवा सूक्ष्मावस्थेंत सृष्टीचें स्वरूप साकार आणि कल्पनामय असें सूक्ष्मरूप आहे. आणि ( ३ ) स्थूलसृष्टींत अथवा स्थूलावस्थेंत सृष्टीचें स्वरूप पांचभौतिक, व्य-

क्त, साकार व अनंतविध स्थूलपदार्थरूप आहे. महाप्रलयकालीं सर्व सृष्टीचा उत्पत्तीच्या उलट क्रमानें आपल्या मूलकारणांत लय होऊन, जावत् कालपर्यंत परमात्माधिष्ठानस्वरूपीं तिची जी केवळ बीजरूपानें अस्तित्वाची स्थिति राहते, त्यांत जीवमात्राचीं कर्मे, वासना आणि पांचभौतिक असे जड पदार्थ पंच भूतांसह केवळ **संस्काररूपानें** असतात. ह्मणजे सर्व सृष्टीचा समेट संस्काररूपानें एका **वासनेंत** येऊन ती सृष्टि बीजात्मक वासना परमात्माधिष्ठानस्वरूपीं लीन राहते. व पुन्हां सृष्टीच्या उत्पत्तीचा काल येईपर्यंत जो मध्यें अनंत काल लोटावयाचा असेल तो लोटून उत्पत्तिसमय येतांच शांत अशा परमात्मस्वरूपीं लीन असलेल्या 'सृष्टिवासना' उत्थान घेतांच त्या वासनेंत असलेले सर्व पूर्वसंस्कार उदय पावतात आणि तदनुरूप सृष्ट्यारंभ होतो. मूल अधिष्ठानरूप परमात्मा आहे. आणि त्यांत सृष्टिसंस्कारयुक्त लीन जी वासना तीच मूलप्रकृति, जगत्कारण आदिमाया, अथवा **चिच्छक्ति** आहे. या उभयतांचा आधाराश्रयसंयोग होतांच '**ईक्षणपूर्वक**' ह्म० विचारपूर्वक सृष्ट्युत्पत्त्यारंभीं प्रथम कार्य **आकाश** हें उत्पन्न झालें. 'ईक्षणपूर्वक' ह्मणण्याचें कारण कीं, मायासंवलित परमात्मा सगुणरूप होऊन त्याच्या स्वरूपीं प्रथम अहंकाराचें स्फुरण झालें आणि लागलेंच त्या अहं उर्मींत स्वतःचें विचारपूर्वक अवलोकन झालें. त्यांत विचाराचीं जीं साधनें ह्म० मन—बुद्धि हीं प्रगट झालीं. एक 'ईक्षण' या शब्दांत 'अहंकार—मन—आणि बुद्धि' अशा तिघांचा समावेश होतो. या तिघांचें जें एक स्वरूप त्यास '**महत्तत्त्व**' असें ह्मणतात व तें महत्तत्त्व ज्या ऊर्मींत लीन राहतें ती मूलप्रकृति '**कारण**' संज्ञक आहे. त्या मूलप्रकृतीचा आधाराश्रय संबंध जितक्या कांहीं आत्मप्रदेशीं आहे तो प्रदेश, मायाआवृत ह्म० आच्छादित अथवा व्याप्त आहे व तितक्याच परमात्मभागास '**महाकारण**' अशी संज्ञा आहे. ('भाग' हा केवळ समजुतीकरितां कल्पिला आहे. वस्तुतः परमात्मस्वरूपीं अंशअंशीभाव नाहीं.) या महाकारणीं माया अव्यक्त त्रिगुणा आहे. पुढें ती कारणावस्थेंत व्यक्त त्रिगुणा झाली. आणि तिचीं तमोगुणरूप '**अहंकार**'

रजोगुणरूप-' मन, ' आणि सत्वगुणरूप-' बुद्धि ' अशीं गुणरूप कार्यें व्यक्त झालीं. ही इतकी घटना ' ईक्षण शब्दांत ' आली. यावरून विचारपूर्वक **अवलोकन करणाराचें** स्वरूप सिद्ध झालें. आणि परमात्मा **जगद्रष्टाच** आहे. त्याचा द्रष्टेपणा हाच जगत्स्रष्टेपणा आहे. कुंभार जशीं मडकीं घडतो तसें परमात्मा जग हातानें घडित नाहीं. त्याच्या इच्छापूर्वक अवलोकनांतच ही अद्भुत शक्ति आहे. आपण सृष्टीकडे विचारपूर्वक अवलोकन करून नेत्र मिटले तर आपल्या मनांत दृष्ट पदार्थांचे सर्व संस्कार जसेच्या तसेच उमे राहतात आणि लागलेच नेत्र उघडतांच बाहेर प्रत्यक्ष सर्व सिद्धच आहेत. निद्रेंत कसलेंच भान उरत नाहीं. येथें अति सूक्ष्म विचार करा कीं, सृष्टीशीं जो कांहीं आपला संबंध आहे तो केवळ ' विचारपूर्वक ' अवलोकनानें आहे. ज्या वेळीं विचारांचा अत्यंत लय होईल त्यावेळीं सृष्टीशीं आपला कोणताच संबंध राहणार नाहीं. ही गोष्ट, सृष्टीच्या मानास रजःकणही नाहीं अशा क्षुल्लक जीवाची आहे यावरून कल्पना करा कीं,ज्या अगाध विचारसमुद्राचे अति सूक्ष्म स्रोत अथवा झरे जीवाच्या हृदयांत सर्वत्र पसरून ज्याच्या योगानें जीवमात्रांस **विचार स्फुरण** होतात, त्या मूळ ठिकाणीं विचाराचा लय आणि उदय झाला कीं, सर्व सृष्टि एकदम नाहींशी व उत्पन्न झालीच पाहिजे. हा सर्व त्या ' अनिर्वचनीय ' अचाट शक्तीचा खेळ आहे. यास प्रत्यक्ष चालू उदाहरण घ्या. विद्युद्दीपाचें मुख्य यंत्र सुरू झालें कीं एका ठिकाणची किल्ली उघडतांच सहस्रावधि दीप एकाच क्षणीं व एकदम पटतात आणि पुनः तीच किल्ली उलटी फिरविली कीं एकदम अंधार होतो. विद्युत्पातानें व भूकंपानें महापर्वत आणि नगरें क्षणार्धांत होतीं कीं नव्हतीं अशीं निर्मूल होतात. हा त्या प्रचंड शक्तीच्या एका सूक्ष्मांशाचा खेळ आहे. तेव्हां अशी शक्ति ज्याच्या आश्रित आहे व ज्याच्या इच्छामात्रें ती उत्थान व लय पावते, त्यानें विचारपूर्वक अवलोकन केल्यावर मग सृष्ट्युत्पत्तीची कथाच काय आहे.

येथें अशी शंका येईल कीं, 'अवलोकनपूर्वकच' जर सृष्टि उत्पन्न होऊं शकत असली तर मग ' विचारपूर्वक ' कशास पाहिजे. परमात्म्यास विचार कसला ? त्याचें उत्तर असें कीं,-

तो विचार ह्म० विचार करीत बसणें नव्हें, तर त्या एका ईक्षणाच्या उर्मींतच स्वतःचें ' अवलोकन ' आणि ' विचार ' उदय पावले. कारण, ' स्वातिरिक्त ' जर कांहींच नाहीं तर दुसरें कशाचें अवलोकन करावें. व कसचा विचार करावा, म्हणून ' स्वतःत स्वतःचेंच ईक्षण केलें. ' आणि पूर्व प्रलयकालीं ज्या अनंत जीवांच्या वासना आणि कर्में एकत्र होऊन संस्काररूपानें स्वस्वरूपीं लीन होतीं तीं यथावत् ज्याचीं त्यास सुव्यवस्थेनें प्राप्त व्हावीं हाही त्या ईक्षणाचा मुख्य हेतु आहे. परमात्म्याच्या सकृद्विचारस्फुरणानें अशी अतर्क्य सृष्टि उदय पावली कीं, तींतील एका परमाणूचाही यथार्थ थांग लागणें अगदीं अशक्य आहे. तथापि ईश्वरदत्त विचारशक्तीच्या बलावर बुद्धिमान् जीव स्वशक्त्यनुरूप जे जे सिद्धांत धुंडून काढतो व क्वचित् फुशारकीही मिरवितो; पण जे सिद्धांत मीं धुंडून काढले असें जें त्यास वाटतें ते सिद्धांत पूर्वींच स्वतःसिद्ध असतात. हिऱ्याच्या खाणींतून हिरा धुंडून काढणारा मीं हिरा शोधून काढला असें ह्मणतो, पण हिरा पूर्वींच खाणींत स्वयंसिद्ध तयार होता, तो हा कांहीं तरी उद्देशानें भूमी खणीत असतां लाभकालानुरूप त्यास प्राप्त झाला. त्यावर हा मीं हिरा शोधून काढला असा गर्व वृथा वाहतो. हल्लींच्या चालू असलेल्या सुधारणेंत पृथक्करणक्रिया नवीन निघाली. तिच्या योगानें हिऱ्याचें पृथक्करण करून अमुक द्रव्याच्या इतक्या परिमित मिश्रणानें हिरा झाला आहे. असाही शोध निघाला व तो यथार्थही असेल असें जरी कबूल केलें, तरी त्या अमुक परिमित द्रव्यानें हिरा तयार करूं ह्मटल्यास मात्र तो होत नाहीं. हा नियम सृष्टींतील प्रत्येक पदार्थास लागू आहे. यावरून आतां सूक्ष्म विचार करा कीं जीं द्रव्यें आपणास बुद्धिपरिश्रमानें कळूनही जो पदार्थ तयार करतां येत नाहीं तो पदार्थ भूगर्भांत आपल्या आपण त्या द्रव्याचा संयोग होऊन तयार व्हावा अशी योजना ज्या जगत्स्रष्ट्यानें एकवारच सुयंत्रित व सुव्यवस्थित लावून दिली कीं, जी अखंड व अनंत कालपर्यंत अबाधित चालली आहे, याचें मूल काय ? तर ' ईक्षणपूर्वक ' ह्म० विचारपूर्वक सृष्टि निर्माण झाली हाच सिद्धांत होय. प्रिय सुज्ञ वाचकांनो त्या जगदा-

त्म्याच्या एका विचारस्फुरणांत इतकें अगाध गंभीर सागरत्व आहे कीं ज्याच्या तुषाराचाही केवल लक्षांश ज्या विचारशील मनुष्यास प्राप्त होतो. त्याच्या बळावर तो स्वतः परमात्मसिंधूंत जो निमग्न होतो तो पुन्हां कधींही तुपार होत नाहीं व याच हेतूनें त्या अगाध विचारसिंधूनें आपले विचारस्रोत जीवमात्रांच्या हृदयांत सतत वाहते सोडले आहेत. त्या प्रवाहाबरोबर पुढें वाहत चालल्यास सृष्टिरचनेच्या विचारांत व शोधांत निमग्न व्हाल, आणि त्या प्रवाहास हृदयांतच रोधून वाहेर वाहूं न देतां तो कोणीकडून वहात येत आहे याचें मूलशोधन करूं लागाल तर अति शीघ्र तुमचें त्या सिंधूशीं तादात्म्य होईल. मग सृष्टीच्या विचारस्फुरणाबरोबर सृष्टीची प्रतीति आणि विचारलयाबरोबर सृष्टीचा लय कसा होतो हें आपल्या सहज अनुभवास येईल. या अल्पशक्तीच्या उपाधीवरून त्या महाशक्तीकडे पाहिल्यास केवळ सकृद्विचारस्फुरणमात्रेंकरून अतर्क्य सृष्टि निर्माण होणें हें परमात्मस्वरूपीं कांहींच नाहीं असें वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. सार्वभौमानें सहज बोटानें एकाद्या दिशेकडे हननाचा इषारा केल्यास त्या बाजूस सैन्यें तुटून पडून सामान्य राज्याचा फडशा उडवितील. आतां बोटाचा इषारा तो काय आणि त्यावरून राष्ट्राचा केवढा चुराडा. आपण दिवसभर बोटें नाचविलीं तरी माशी सुद्धां मरत नाहीं. कारण हा अमोघ शक्तीचा खेळ आहे. ही सृष्टि आपल्यास प्रचंड वाटते, पण ती परमात्मस्वरूपीं सर्षपाप्रमाणेंही नाहीं. तिच्या घडामोडीस परमात्म्याचें सकृत् ‘ ईक्षणच ’ बस आहे. ह्मणूनच ईक्षणपूर्वक सृष्टि झाली असा श्रुतिसिद्धांत आहे.

आतां थोडा आणखी सूक्ष्म विचार करूं. ‘ ईक्षणपूर्वक ’ सृष्टि झाली असें वर सिद्ध झालें. त्यांत सृष्टि विचारपूर्वक झाली असें ह्मणण्यांत विचार करणाराचें स्वरूप सृष्टीपूर्वीं सिद्ध होतें असें झालें. यांत विचारणीय ‘पदार्थ’ ‘ विचार करणारा ’ आणि ‘विचार’ अशी त्रिपुटि झाली. आतां विचारणीय पदार्थावांचून खास विचाराची स्वरूपसिद्धि करितां येत नाहीं. आणि विचारणीय पदार्थ व विचार या दोहोंवांचून विचारकर्त्याची स्वरूपसिद्धि होत नाहीं. अर्थात तिन्ही गो-

ष्टींचें स्वरूप युगपत् ह्म० एकदम सिद्ध असलें पाहिजे. या तिघांपैकीं एकास सोडून दुसरा राहूं शकत नाहीं. असें दृढ ऐक्य दिसतें ह्मणून सृष्टीस अनादित्व आलें आहे. अमुक आद्यसृष्टि असें ह्मणतांच येत नाहीं. सृष्टीची उत्पत्ति किंवा लय झाला तरी तिच्या पुनरुत्पत्तीस पूर्व सृष्टीचें बीज आहेच; महाप्रलयकालीं तें पुन्हां संस्काररूपानें शेष रहातें आणि त्यामुळें ही घडामोड चालते. ह्मणून सृष्टि अनादि ह्मणविते व तिच्या उत्पत्तीचा थांग लागत नाहीं. असें जरी आहे तरी सृष्टि अनंत नाहीं. सांत आहे. विचारानें तिचा अंत होतो. जी वस्तू ज्यांतून निघते तिचा त्यांतच लय होतो. मृत्तिकेपासून घट उत्पन्न होतो तो मृत्तिकेंतच लय पावतो. विचारपूर्वक सृष्टीची जी उत्पत्ति आहे तिचा लयही विचारांतच आहे. वर जी त्रिपुटी ऐक्यरूप दाखविली व जिच्यामुळें सृष्टीस अनादित्व आलें त्यांतच सांतत्व कसें आलें तें बारिक रीतीनें उलट विचार करून पहा. 'विचारणीय' पदार्थावरून 'विचाराची' स्वरूपसिद्धि आणि त्या दोघांपासून 'विचारकर्त्याची' स्वरूपसिद्धि होते असें सकृद्दर्शनीं दिसतें. पण विचारणीय पदार्थापासून विचाराची उत्पत्ति अथवा त्या दोघांपासून विचारकर्त्याची उत्पत्ति होते असें कदापि ह्मणतां येणार नाहीं. विचारणीय पदार्थांच्या योगानें विचारकर्त्याचे 'विचार' व्यक्त होतात; आणि विचार व्यक्त झाल्यानें विचारकर्ता व्यक्त होतो. परस्परांच्या अशा संबंधानें परस्परांची व्यक्तता होते, उत्पत्ति होत नाहीं. विचारणीय पदार्थांपासून जर विचाराची आणि या दोघांपासून विचारकर्त्याची उत्पत्ति मानली तर पुत्रापासून पित्याच्या उत्पत्तीसारखा अनर्थ होईल. याकरितां उत्पत्तीसारखा 'जन्यजनकभाव' परस्परांत मानतां येत नाहीं, विचारणीय पदार्थ नसले ह्मणून विचाराचा अभाव ह्मणतां येत नाहीं. विचारकर्त्यांत ते लीन आहेत. ह्म० विचाराचा व विचारकर्त्याच्या अभेद आहे. बरें, हा अभेद जावत्कालपर्यंत आहे तावत्कालपर्यंत विचारणीय पदार्थांस हे पदार्थ आहेत, असें तरी ह्मणावें कोणीं ? त्या पदार्थांत अस्तित्वाची सत्ता यावी कोठून ? व ती वाटावी तरी कोणास ? विचारकर्त्याच्या ठिकाणीं विचाराचा उदय झाल्यावांचून पदार्थ अस्तित्वांत आहेत असें

ह्मणतां येत नाहीं. आणि अस्तित्वरहित पदार्थ असूं शकल्यास वंध्यापुत्र व अश्वशृंगही असूं शकेल. करितां विचाराच्या उदयानेंच पदार्थांचें अस्तित्व सिद्ध होतें. व विचाराच्या लयानेंच पदार्थांतील अस्तित्व लय पावतें. अस्तित्वरहितास 'पदार्थच' ह्मणतां येत नाहीं. यावरून पदार्थाच्या अस्तित्वास विचाराचा उदय कारण झाला. व तो 'विचार' विचारकर्त्यांत लीन असल्यानें विचारकर्ता स्वतंत्र झाला. त्याच्या स्वतःचें अस्तित्व त्याचे स्वरूपीं आहेच. तें परावलंबी नाहीं. पदार्थाचें अस्तित्व मात्र परावलंबी झालें. परमात्म्याच्या स्वरूपीं ईक्षणाच्या स्फुरणानेंच सृष्टींत अस्तित्व सत्ता आली. व त्या स्फुरणाच्या लयानेंच सृष्टीचा लय होतो. ह्मणून **परमात्मा** विचारकर्ता 'अनंत' आहे व सृष्टि 'सांत' आहे. आतां 'विचारकर्ता' आणि 'विचार' हे अभिन्न आहेत. या अभिन्न रूपांस भिन्नत्व दिसण्यास केवळ विचारणीय 'पदार्थ' हेतु आहेत. या पदार्थामुळेंच विचाराचें स्फुरण झालें. आतां ज्या पदार्थांनीं विचारकर्त्यांत व विचारांत भेद नसतांही भेदप्रतीति झाल्यासारखी दिसली, त्या पदार्थांत व विचारांत तरी भेद आहे काय? नाहीं. ज्या विचाराच्या अस्तित्वानें पदार्थांत अस्तित्व आलें व ज्याच्या स्फुरणानें त्या पदार्थांत प्रतीति आली तो त्याहून भिन्न होऊं शकत नाहीं. तद्रूपच असला पाहिजे. कारण त्याला जर पृथक् सत्ताच नाहीं, तर मग भिन्नता तरी कशी यावी. विचाराच्या उदयावरोबर पदार्थांत अस्तित्व येतें आणि विचाराच्या लयाबरोबर पदार्थाची सत्ता नष्ट होते. तेव्हां विचार आणि पदार्थ एकरूप व अभिन्न झाले; आणि विचारकर्ता व विचार हे मूळचेच अभिन्न आहेत. अर्थांत तिघेही अभिन्न स्वरूप झाले, ह्मणून विचारकर्ता **परमात्मा**, विचाररूप **माया** आणि विचारणीय पदार्थरूप **सृष्टि** हीं तिन्ही अत्यंत ऐक्यरूप असल्यानें कोणीं कोणास पहावें व कोणापासून कोणाची उत्पत्ति ह्मणावी. स्वतःपासून स्वतःची उत्पत्ति कधींच संभवत नाहीं. ती केवळ स्वयंसिद्धता आहे. अशा स्वयंसिद्धतेंत भिन्नता नसतां जी त्रिविध भेदप्रतीति होते त्यासच '**भ्रम**' असें ह्मणतात. आणि भ्रमकालपर्यंत प्रतीति व भ्रमनिवृत्तींत अप्रतीति हीच '**अनिर्वचनीयता**' आहे. भ्रमनिवृत्तींत तरी भ्रमाचा पदार्थ जसा अधिष्ठा-

नांतच लय पावतो ह्म० अधिष्ठानरूपच होतो. तशी वरील त्रिविध भेदप्रतीति एक परमात्माधिष्ठानरूप होते. सृष्टि परमात्म्याहून कांहीं भिन्न पदार्थ असता तर ती उत्पन्न झाली असती. ती वेगळी नसल्यानें कार्यकारणभावसंबंध ह्मणतां येत नाहीं. परमात्म्याच्या स्वरूपावलोकनाचें जें स्फुरण तेंच सृष्टिरूप झालें. व परमात्म्याचा स्वस्वरूप ' द्रष्टेपणा ' तोच ' जगत्स्रष्टेपणा ' झाला. या स्थूल उदाहरणावरून ज्या विचारशीलांस स्वस्वरूपावलोकनाची किल्ली गुरुकृपेंकरून सांपडेल, त्याच्यांच दृष्टीनें सृष्टीचा अंत झाला ह्म० स्वस्वरूपांत सृष्टीचा लय होऊन भेदप्रतीति गेली. बाकीच्या अविचारशीलांस सृष्टि जशी अनादी आहे तशीच अनंतही आहे.

---

## सूक्ष्म सृष्टि.

महाकारणस्वरूपीं परमात्म्यांत ईक्षणाच्या स्फुरणानें **अहंकार, मन** आणि **बुद्धि** अशी गुणानुरूप कारणसृष्टि होऊन पुढें सूक्ष्मसृष्टीचें प्रथम कार्य **आकाश** झालें. आकाशापासून **वायु**, वायूपासून **अग्नि**, अग्नीपासून **जल** आणि जलापासून **पृथ्वी** अशीं पंचमहातत्त्वें निघालीं. या सर्व तत्त्वांत मायेचे **गुण** अनुस्यूत असल्यानें ते तत्त्वांतील **गुणांस** कारण झाले. ह्म० आकाशाचा गुण **शब्द**, वायूचा **स्पर्श**, तेजाचा गुण रूप, जलाचा **रस** आणि पृथ्वीचा **गंध** असे व्यक्त झाले. त्यांत एकापासून दुसरा, दुसऱ्यापासून तिसरा, असा व्यक्ततेचा क्रम झाल्यानें गुणाच्या व्यक्ततेचेंही आधिक्य होत गेलें. व त्या न्यूनाधिकतेनें तत्त्वाच्या व्यक्ततेचा अनुक्रम सिद्ध झाला. पेक्षां कोण आधीं व्यक्त झाला व कोण मागून झाला हा नियम कळला नसता. प्रथम आकाश व्यक्त झालें, त्याचा गुण 'शब्द' आहे. आकाशापासून वायु व्यक्त झाला, त्यांत वायूचा स्वतःचा गुण स्पर्श व्यक्त होत असून आकाशाचा गुण जो शब्द तोही वायूंत आहे. तो सोसाट्याच्या रूपानें ऐकूं येतो. असे वायूंत दोन गुण ह्म० 'शब्द आणि स्पर्श' आले. वायूपासून अग्नि निघाला, त्याचा स्वकीय गुण

रूप असून वायूचा स्पर्श व आकाशाचा शब्द आला. रूप म्हणजे दिसणें, स्पर्श म्हणजे चटका बसणें. शब्द ह्मणजे अग्नीच्या ज्वालांत भडभड–भुग्भुग् असा निघतो. असे अग्नींत 'शब्द, स्पर्श व रूप' हे तीन गुण आले. अग्नीपासून जल निघालें, त्यांत स्वकीय रस गुण असून अग्नीचा रूप म्हणजे दिसणें, वायूचा स्पर्श होणें आणि आकाशाचा शब्द झुळझुळ, असे जलांत 'रस, रूप, स्पर्श आणि शब्द' हे चार गुण व्यक्त झाले. पुढें जलापासून पृथ्वी व्यक्त झाली; तिच्यांत स्वकीय गुण गंध हा असून जलाचा रस म्हणजे स्वाद, अग्नीचा रूप म्हणजे दिसणें, वायूचा स्पर्श म्हणजे कठोरपणा वाटणें आणि आकाशाचा शब्द कडकड, धडधड इत्यादि प्रकारचा असे पृथ्वींत 'गंध, रस, रूप, स्पर्श आणि शब्द' असे पांच गुण आहेत. याप्रमाणें तत्त्वांत स्वतःचा गुण एक आणि वरच्या पिढीच्या अधिक गुणांचा समावेश होत गेल्यानें आकाशापासून तों पृथ्वीपर्यंत तत्त्वांच्या व्यक्ततेचा अनुक्रम स्पष्ट दिसत आहे. ही येथपर्यंत सूक्ष्मसृष्टीची रचना झाली. इच्यांत परमात्मा व माया हीं अधिष्ठानरूपें तर सर्वत्र आधार असावयाचींच याची तर मोजणीच नको. यांच्या खेरीज जें न्यूनाधिक्य होईल तेंच मोजणींत धरलें पाहिजे. अर्थात 'अहंकार, मन, बुद्धि, आकाश, वायु, अग्नि, जल आणि पृथ्वी' असे मुख्य आठ पदार्थ अथवा आठ **तत्त्वें** सूक्ष्मसृष्टींत आलीं, हें वाचकांनीं नीट लक्षांत ठेविलें पाहिजे.

**महाकारण, कारण आणि सूक्ष्म** अशी येथवर सृष्टीची रचना झाल्यांत परमात्मा तर सर्वत्र अधिष्ठानरूप राहणारच. त्यास पृथक् ठेवून हीं वर निर्दिष्ट केलेलीं जीं आठ तत्त्वें आलीं तीं सर्वच सूक्ष्म स्थितींत आहेत. या सर्वांच्या अभिव्यक्ततेनें आणखी तीन पदार्थांचीं सहज व्यक्तता झाली. ते पदार्थ कोणते ( पदार्थ हा शब्द केवळ वस्तूनिर्देशवाचक समजावा ) तर **काल, कर्म आणि गुण** असे तीन व्यक्त झाले. काल म्हणजे वेळ, कर्म म्हणजे क्रिया आणि गुण ह्म० स्वभाव असें समजावें. **काल** अथवा वेळ याची प्रतीति पदार्थांच्या उत्पत्तिस्थितिलयांवर अवलंबून आहे. अमुक पदार्थ निर्माण झाला कीं त्या पदार्थामागें उत्पत्तिकाल लाग-

ला. तो पदार्थ आहे तोंवर स्थितिकाल आणि नष्ट झाल्यावर विनाशकाल. अशी कालाची प्रतीति वस्तूवांचून होत नाहीं. ज्या सूर्याच्या उदयास्तांनीं आपल्यास दिवसरात्र–मासऋतु–अयन–वर्ष-युग–आणि कल्प. इ० गणना करिता येते, ती कालगणना स्वतः सूर्याच्या उपयोगाची नाहीं. कारण तो स्वयंप्रकाश असल्यानें त्यास दिवस रात्र हा भेदच ठाऊक नाहीं. त्याच्या गतीची गणना त्यास संक्रांतमानावर ठेवावी लागते. अर्थात ज्याला आपण बारा महिने ह्मणणार त्याला सूर्य आपल्या प्रदक्षणेचे बारा मुक्काम ह्मणणार. सारांश कालगतीचा मानदंड असाच पुढें वाढवीत गेल्यास **महामाया** आदिशक्तीचे ठिकाणीं सृष्टीचा उत्पत्ति स्थिति लय असा त्रिविध भेद केवळ तीन क्षणांप्रमाणें प्रतीत होणार आहे. आणि परमात्मस्वरूपीं तर केवल स्फुरणरूप निमिषोन्मेषण ह्म० पात्यांस पातें लागतें न लागतें इतक्यांतच सर्व उलगडा होणार. त्या स्फुरणमात्रांचीं ही अनंत काल खंडें जाहलीं आहेत. शांत–गंभीर–परमात्मस्वरूपीं जें स्फुरण झालें हेंच कालरूपानें प्रतीत होऊन पदार्थांमागें लागलें. आणि उत्पत्ति स्थिति लय कालरूप झाले. अर्थात पदार्थांच्या ह्म० तत्त्वांच्या उत्पत्तीनें कालाची प्रतीति झाली.

**कर्म** ह्म० **क्रिया,** गति अथवा आघात देणें ह्म० पुढें ढकलणें. या ठिकाणीं आघातपरंपरेचें विवेचन मायाप्रकरणांत झालें आहे तें वाचकांनीं नीट ध्यानांत आणावें. मी पुनरुक्ति करीत नाहीं. महाकारणस्वरूपीं सृष्टिबीजासह महामाया केवल संस्काररूपानें परमात्माधिष्ठानरूपीं लीन होती. त्या लीन सृष्टि संस्काराला अनुकूल कालीं कर्माचा धक्का अथवा आघात बसतांच ईक्षणाची ऊर्मि उसळली व त्या उर्मीची आघातपरंपरा जी सुरू झाली ती शेवटपर्यंत येऊन धडकली. तिच्या योगानें प्रत्येक तत्त्व सहज कार्यक्षम होऊन जी ‘ क्रिया ’ घडूं लागली, ती **कर्म**संज्ञक झाली.

आतां **गुण** ह्म० स्वभाव, हा प्रत्येक पदार्थांत अथवा तत्त्वांत सहज व स्वयंसिद्ध असतो. त्या गुणाला **धर्म** असेंही ह्मणतात. महाकारणस्वरूपीं माया अव्यक्तत्रिगुणा होती ती कारणसृष्टींत

व्यक्तत्रिगुणा झाली. या इचे 'सत्व, रज, तम,' त्रिगुणांपासून पुढें प्रत्येक तत्त्वांत गुणवत्ता आली आणि पदार्थ गुणवान् ह्मणवूं लागले व त्या गुणानुरूपच पदार्थांचा स्वभाव सिद्ध झाला. गुण, धर्म, स्वभाव, या शब्दांत विशेष भेद नाहीं. प्रसंगवशात् अर्थांत कांहीं सूक्ष्म फरक दिसतो. तथापि सर्व पर्यायशब्दच आहेत ह्मटल्यास चालेल. असो, यावरून तत्त्वांचे व्यक्ततेनें 'काल' 'कर्म' आणि 'स्वभाव' हे सहज व्यक्त होऊन अगदीं पदार्थांत अनुस्यूत झाले. ह्म० कोणतेंही तत्त्व अथवा पदार्थ अवलोकन केल्यास त्यांत काल—कर्म—आणि स्वभाव बनलेच आहेत. पदार्थांच्या व्यक्ततेवांचून हे तीन व्यक्त होत नाहींत. आणि ह्या तिघांच्या साहाय्यावांचून पदार्थसिद्धि होत नाहीं. अशी चमत्कारिक सांगड पडली आहे. याचा अन्योन्याश्रय अथवा कार्यकारणभाव कांहींच परस्परांत ह्मणतां येत नाहीं. अनिर्वचनीय संबंध ह्मणावा लागतो.

वरील तत्त्वांच्या व्यक्ततेनें काल कर्म—स्वभाव यांची व यांनीं तत्त्वांची अशी परस्परांची व्यक्तता सिद्ध झाली तशीच या सर्वांच्या व्यक्ततेबरोबर एक आणखी पदार्थ व्यक्त झाला. तो कोणता तर **देश,** देश ह्म० स्थल अथवा जागा. कांहीं जरी झालें अथवा घडलें तर तें कोठें तरी झालेंच पाहिजे. कोठें तरी कांहीं झालें कीं त्या घडल्यानें स्थलनिर्देश झाला. कांहीं तरी घडण्यास स्थलाची अपेक्षा आणि तें घडण्यानें स्थलाची अभिव्यक्तता असा वरीलप्रमाणेंच अनिर्वचनीय संबंध झाला.

याप्रमाणें सूक्ष्म सृष्टीपर्यंत परमात्माधिष्ठानावर अहंकार, मन, बुद्धि, आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, काल, कर्म, गुण आणि देश असे **बारा पदार्थ** व्यक्त झाले. ( पदार्थ हा शब्द निर्देशवाचक आहे असें मागें सांगितलेलें नेहेमीं ध्यानांत असूं द्यावें. ) यांत एकापासून दुसऱ्याची व्यक्तता असा क्रम दिसतो, कार्यकारणभाव दिसत नाहीं. तथापि केवळ स्थूल समजुतीकरितां कार्यकारणभाव निर्देश श्रुतीनें केला आहे. वास्तविक प्रकार तसा नाहीं. कारण, ज्या कारणापासून जें कार्य होतें तें कार्य कारणाच्याच जातीचें असतें. मृत्तिका कारणरूपापासून जें घटरूप कार्य होतें, तें मृत्ति-

केच्याच जातीचें असतें. मृत्तिकेहून भिन्नगुणी नसतें. असा कार्य-कारणभावाचा नियम दिसतो. वर दाखविलेले बारा पदार्थ अगदीं एकाहून एक भिन्नजातीय दिसतात. हे कार्यकारणभावानें झाले असते तर सर्वच सजातीय एकरूप झाले असते. अगदीं एकाच्या उलट दुसरा पदार्थ असा जो हल्लीं क्रम दिसतो, तो दिसला नसता. यावरून कार्यकारणभाव सिद्ध होत नाहीं. तमप्रकाशाचा ' विरोधी भाव ' संबंध आहे. ह्म० प्रकाश नव्हे तो अंधकार व अंधकार नव्हे तो प्रकाश असा तमप्रकाशाचा ' भावाभावसंबंध ' मानला आहे. हा संबंध वरील पदार्थांत लावावा तरी चालत नाहीं. कारण प्रकाश कधीं अंधकाररूप होत नाहीं. आणि अंधकार कधीं प्रकाशरूप होत नाहीं. हे सदैव परस्परविरोधीच असावयाचे. एकापासून दुसऱ्याची उत्पत्ति नाहीं, हें तर मागेंच सिद्ध झालें आहे. तेव्हां वरील पदार्थांत जन्यजनकभाव, भावाभाव अथवा कार्यकारणभाव, असा कोणताही संबंध लागत नाहीं. अशा ठिकाणीं कोणता नियम लागू व्हावा ? अशी अडचण दिसली, तेव्हां श्रुतीनें **अनिर्वचनीय संबंध** सिद्ध केला. ह्म० कांहीं कारणामुळें एका पदार्थाचें दुसऱ्या तऱ्हेनें प्रतीत होणें आणि कारणनिवृत्तीनें दुसऱ्या तऱ्हेनें भासलेला पदार्थ पुन्हां पूर्वरूप दिसणें हीच 'अनिर्वचनीयता' आहे आणि मूळचा एकच पदार्थ असून तो कारणामुळें वर निर्दिष्ट केलेल्या बारा पदार्थरूपानें दिसूं लागला आहे. तो कसा दिसतो हें आपण अति सूक्ष्म विचारानें पाहूं.

---

## ' संस्काराचा आघात '

**विचारकर्ता परमात्मा**, विचाररूप **माया** आणि विचारणीय पदार्थरूप–**सृष्टि** अशा त्रिपुटीचें ऐक्य कसें आहे हें वर दाखविलेंच आहे. मूल पदार्थ एकच असून कारणामुळें त्रिविध भेद प्रतीति आली. तें ' कारण ' तरी परमात्म्यांतच होतें. गाढ निद्रेंत निमग्न असतां अथवा निद्रा लागत असतां ' मी खालीं पडलों ' असा किं-

वा दुसरा कसला अकस्मात् भास वाटून दचका बसतो आणि जागृति येते. यांत दचकण्यास ज्या 'भासाचा' आघात (धक्का) बसला तो आघात आंतच ह्म० शरीरांतच होता. निजणारा खरोखरच खालीं पडून जागा झाला नाहीं. 'दृष्ट संस्कारानें' आंतल्या आंतच धक्का देऊन जागृति आणिली व 'निद्रा' आणि 'जागृति' असा भेद केला. यांत ज्या 'संस्कारानें' धक्का देऊन जागृति आणिली तो 'संस्कार' तरी पूर्व जागृद्दृष्टाचाच होता. नवा नव्हता. त्या धक्क्यानें जागा झालेल्यास उगीच थोडी जाग येऊन किंचित् डोळे उघडून पाहतो आणि उगीच धक्का बसला, मी आहें तसाच आहें. ह्म० ज्या स्थानीं होतों तेथेंच आहे, असें वाटून लागलेच पुन्हां डोळे मिटून निद्रेंत लीन होतो. जसें या डोळे उघडझांकीच्या निमिषांत जें कांहीं आभास मात्र दिसतें, तें यथार्थ दिसतें असें ह्मणतां येत नाहीं. व त्या आभासानें निद्राभंगही होत नाहीं. तसेंच परमात्मस्वरूपीं पूर्व सृष्टि 'संस्कारानें' धक्का बसून 'ईक्षण' रूप स्फुरणानें जें कांहीं आभासमात्र स्फुरलें ती 'सृष्टि' झाली. पण 'उगीच धक्का बसला. मी स्वस्थितींतच आहे' ह्मणून पुन्हां स्फुरण लीन झालें. अशा निमिषार्धांत झालेल्या आभासमात्र 'सृष्टीस' अधिष्ठानाहून भिन्न सत्ता न येतां अधिष्ठानरूपच झाली. अर्थात् ती परमात्म्याहून अभिन्न आणि अनादि झाली. जशी आभासमात्रानें सृष्टींत परमात्माधिष्ठानाहून भिन्नता न येतां परमात्मरूपच राहिली तशीच सृष्टिरूपानें दिसणारे वर निर्दिष्ट केलेले बारा पदार्थही परमात्म्याहून अभिन्न असे एकरूप आहेत. ज्या स्फुरणाच्या आघातानें परमात्म्यांत व सृष्टींत भिन्नाभिन्नता आली त्याच आघातपरंपरेनें बारा पदार्थांतही भिन्नाभिन्नता आली आहे. वास्तवीक सर्व पदार्थ एकरूपच आहेत.

---

## एक परमात्मा सृष्टीचीं बारा तत्त्वें कसा झाला.

वरील पदार्थांचें परमात्मा, माया व सृष्टिरूपानें त्रिपुटींत सर्वां

शीं ऐक्यच आहे. भिन्नता राहिली नाहीं. तथापि वेगळ्या तऱ्हेनें आपण सर्वांचें पृथक् पृथक् ऐक्य करून पाहूं. परमात्म्याहून पदार्थांस वेगळें करणें हा तरी कल्पनेचा कल्पित खेळ आहे. लोण्याच्या एका मोठ्या गोळ्यांतून लहान मोठे असे अनेक गोळ करून त्यांस लहान मोठे ह्मणणें व पुन्हां एकत्र करून एक गोळा झाला असें ह्मणणें यांत जशी बालकांस मौज वाटते, तशीच श्रुतिमातेनें आपल्या कृपापात्र अज्ञ बालकांस एक अखंड परमात्मस्वरूपाचीं अनेक पदार्थरूपें करून पुन्हां ऐक्यरूपाची क्रीडा करून दाखविली आहे. याचें तात्पर्य, केवळ विचारशील जीवास सर्वात्मैक्यभावप्रतीतीनें निरतिशयानंद प्राप्त व्हावा हें आहे. असो. आतां मी जी ही एकीकरणकल्पना बसवीत आहें ही अन्यत्र आधारानें बरोबर जुळल्यास उत्तमच झालें. कदाचित् कोठें विसंगतता वाटल्यास हा कल्पनेचा खेळ आहे. याचें ऐक्यरूप तात्पर्य ग्रहण करून चुकीची क्षमा असूं द्यावी.

आतां आपण सजातीय सजातीयांचें वर्गीकरण करूं. प्रथम वर्गांत परमात्मा—काल—देश—अहंकार—आणि आकाश असे पांच. दुसऱ्या वर्गांत माया—कर्म—गुण—मन—बुद्धि—वायु—अग्नि—जल—आणि पृथ्वी, असे नऊ मिळून चवदा झाले. वरच्या मोजणींत परमात्मा व माया नव्हती ती यांत घेतल्यानें बाराचे चवदा झाले आणि इतक्यांच्या भेदप्रतीतीस कारण ‘ भ्रमरूप संस्कार ’ हा आहे. यानेंच हा अनिर्वचनीय भेद उभा राहिला. शांत अशा निद्रिस्तपणांत जो ‘ धक्का ’ बसून जी कांहींशी जाग आली त्या योगानें **‘ माझ्याच ठिकाणीं माझाच मला हा धक्का उगीच बसला ’** असें निद्रिस्तास भान झालें. यांत शांत स्वरूपयोगनिद्रिस्त **परमात्मा** याला संस्काराच्या धक्क्यानें **‘ त्याचेंच स्फुरण त्याच ठिकाणीं झालें. ’** यांत धक्का बसण्याचें ठिकाण त्याहून पृथक् नसून तोच असल्यानें ‘ ठिकाण ’ ह्म० **देश** तोच परमात्मा झाला. धक्क्यानें जाग आली. ह्या जागनें* ‘ वेळ ’ निर्दिष्ट झाली ती वेळ त्याचीच (परमात्म्याची) ‘जाग झाल्यानें वेळ ह्म० **काल** हाही तोच परमात्मा झाला. ‘ मला धक्का बसला ’ यांत ‘ मला ’ हा

* जागतीनें.

अहंकारही परमात्माच झाला. आकाश हें तरी सर्व सृष्टीचा समावेश होण्याचें स्थल असल्यानें परमात्मदेशांत याचा अंतर्भाव होऊन परमात्माच आकाशरूप झाला. ह्मणून परमात्म्यास नेहमीं आकाशाचाच दृष्टांत लागू पडतो. आकाशांत 'आकाश' हा शब्दमात्रच परमात्म्याहून भिन्न उपाधि आहे. व या उपाधीनेंच परमात्म्याहून तें भिन्न दिसलें आहे. पक्षां तें अभिन्नच आहे. अर्थात् 'काल–देश–अहंकार आणि आकाश' यांची परमात्म्याशीं ऐक्यरूपता आहे. यांचा मिळून एक प्रथम वर्ग झाला.

येथपर्यंत आघाताचा धक्का आल्यानें मायेचें पूर्णरूप व्यक्त झालें. आतां तोच 'धक्का' पुढें चालू झाल्यानें जो अहंकार शांत अथवा स्थिर होता तो गतिरूप चंचल होऊन 'मनबुद्धि' रूप झाला. अर्थात् अहंकाराचें–मनबुद्धींशीं ऐक्य झालें. हें इतकें कार्य झाल्यानें मायेच्या तम, रज व सत्व असे तीन गुणांचा, अहंकार–मन आणि बुद्धींत अंतर्भाव होऊन परस्परांचें ऐक्य झालें.* येथपर्यंत परमात्म्याशीं काल–देश–अहंकार–मन–बुद्धि–आकाश आणि गुण यांचें ऐक्य झालें. यांत ( मागून ) चालू असलेला संस्काराचा 'धक्काच' स्वत: कार्यकर्तृक ह्म० कर्मरूपानें स्पष्ट झाला. पुढें तो कर्मरूप आघात गतिमान् होऊन महाकाशांत कांहीं भागास परिभ्रमण जें झालें त्या योगानें महाकाशाचा तो भाग गतिरूप झाला. त्या गतिरूप भागास वायु अशी संज्ञा आली. आपण स्वस्थ बसलेले चालूं लागतों, यांत स्वस्थ बसणें हें शांतरूप आणि चालूं लागणें हें चंचलरूप या दोन्ही स्थिति आपल्याच झाल्या. दोन स्थिति झाल्यानें आपलेपणांत अंतर आलें नाहीं. समुद्रांत कांहीं ठिकाणीं पाण्याचे असे मोठे आवर्त ह्म० भोंवरे आहेत कीं ज्यांचा ओढा पुष्कळ मैल दूरचें पाणी ओढतो. त्या ओढ्यांत जहाज सांपडल्यास तें परिभ्रमणांत पडून सरते शेवटीं तळास जातें असें सर्वश्रुत आहेच; असें जरी आहे तरी नौकानयनकुशल तो प्रदेश वांचवून जातात. कारण सर्व समुद्र आवर्तरूप नाहीं. त्याच्या एका प्रदेशीं आवर्त असून त्या आकर्ष-

* तमोगुणापासून अहंकार, रजोगुणापासून मन व सत्वगुणापासून बुद्धि झाली असल्याचें मागें सिद्ध झालें आहे. हेंच परस्परांचें ऐक्य आहे.

णाच्या सीमेच्या बाहेर समुद्र शांत असतो. यावरून लक्षांत येईल कीं महाकाशांत जितका कांहीं प्रदेश आघातानें परिभ्रमण करीत आहे तेंच 'वायुमंडळ' ह्मटलें जातें. शांत आणि चचल अशीं दोन्ही आकाशाचींच रूपें असल्यानें आकाशाचा व वायूचा अभेद झाला. आणि दोन्ही रूपेंही अमूर्तच आहेत. स्थिराला गतिरूपता आली ह्मणजे त्या गतीचा आघात दुसऱ्यास लागला असतां तो आघात कळतो हें कळणेंच स्पर्शगुणरूप झालें. अर्थात वायु हें रूप आकाशाचेंच झालें. यांत सूक्ष्म रीतीनें पहा 'देश–काल–कर्म आणि गुण' यांची कशी अनुस्यूतता बरोबर येत चालली आहे ह्म० हे सर्व एकरूपानें बरोबर मिसळलेले चालले आहेत. व यांच्याच योगानें यांच्यांत पुढें पुढें फरकही पडत जात आहे. 'स्थिर' आणि 'चंचल' हा फरक तरी यामुळेंच झाला आहे.

आतां जें शांत होतें तेंच गतिरूप झालें असें ह्मटलें पाहिजे. गतीचें परिभ्रमण कांहीं वेळ चालूं राहिल्यानें अर्थात तें 'घर्षणरूप' झालें. घर्षणरूप होतांच आवर्ताच्या मध्यभागीं घर्षणाचा वेग वाढल्यानें तेथें उष्णता उत्पन्न झाली. येथें जो घर्षणरूप वायु होता तो अग्निरूप झाला. त्याचा गुण प्रकाश ह्म० 'रूप' झाला. अर्थात जें आकाश आपल्या कांहीं प्रदेशांत वायुमंडल झालें होतें तेंच वायुमंडलाच्या मध्यप्रदेशीं अग्निमंडल झालें. कालकर्मादिकानें जें शांत होतें तें शांततेच्या उलट चंचळ झालें. जें चंचल होतें त्याच्या पुढें उष्ण झालें. आतां उष्णाचें उलट काय झालें पाहिजे? तर थंड ह्म० शुष्करूप उष्ण होतें तेंच आर्द्ररूप थंड झालें. शुष्कता गेली ह्म० तिच्या उलट आर्द्रता आणि उष्णतेच्या उलट शीतलता आलीच पाहिजे. अर्थात आर्द्र व शीतळ असा जलरूप अग्नीच झाला आणि येथवर आघाताच्या परिभ्रमणानें मध्य केंद्रस्थानीं सर्व तत्त्वांच्या घर्षणापासून जो कांहीं परिणाम झाला तो जलाच्या आर्द्र व मृदुपणाहून भिन्न शुष्क व कठोर असा 'मृदंश' भूमंडलरूप झाला. आणि तोच मृदंश परिभ्रमणाच्या वेगानें जो पुन्हां वर चढला तो सर्व तत्त्वांस स्थूलरूप देण्यास कारण झाला. याचा प्रकार पुढें पंचीकरणांत येईल. सारांश या

सर्व पदार्थांचें एकीकृत महास्वरूप **परमात्मा** आणि परमात्म्याचींच अपृथक् भिन्न रूपें **तत्त्वरूपानें** कशीं दिसत आहेत, हेंच मुख्य सार वाचकांनीं लक्षांत नीट आणावें.

येथवर ही **सूक्ष्मसृष्टि** झाली. यांत वर निर्दिष्ट केलेले पदार्थ हे सर्व सूक्ष्मरूप आहेत. पूर्व संस्काराच्या आघातांची अनुस्यूतता सर्वांत बरोबर येत चालली असल्यानें पुढें स्थूलसृष्टींत जे जे कांहीं पदार्थ, जीव, जीवकृत कर्मै, आणि कर्मानुरूप विषयभोग इ० हे सर्वच सूक्ष्मसृष्टींत सूक्ष्मरूप ह्म० स्वप्नसृष्टीप्रमाणें कल्पनामय असल्यानें सृष्ट पदार्थाचा, जीवाचा, व जीवकृत कर्माचा आणि तद्नुरूप भोगाचा वृद्धि क्षय न होतां सूक्ष्मसृष्टीच्या अगम्य कालापर्यंत ही अशीच स्थिति राहिली. वर सांगितलेलीं तत्त्वांचीं मंडलें एकाच्या आंत एक लहान होत गेल्यानें सर्वांच्या आंतील 'भूमंडल' आणि सर्वांच्या बाहेरील महाकारणावस्थेचें मायासंवलित 'आत्ममंडल' अशी रचना झाली. मंडल वर्तुलाकार होत असतें. आणि बिंदूचीही आकृति वर्तुल अंडाकार असते. मायोपाधीनेंच अव्यक्त परमात्मबिंदु **ब्रह्मसंज्ञक** झाला. आणि त्याच्या आंत सर्व सृष्टिरचना झाली म्हणून तिजला (ब्रह्म—अंड) **ब्रह्मांड** अशी संज्ञा झाली. हें ब्रह्मांड स्थूल होण्यापूर्वीं सूक्ष्मावस्थेंत अगदीं सर्वावयवपूर्ण तयार झालें. जसा गर्भस्थ जीव जन्म घेण्याच्या पूर्वक्षणीं सावयव तयार असतो. फक्त गर्भाशयांतून व्यक्त होण्याचीच बाकी असते. तसें हें ब्रह्मांड सूक्ष्मावस्थेंत तयार झालें. केवळ पंचीकरण होऊन स्थूलावस्थेंत व्यक्त होणेंच बाकी राहिलें. अशी जी अवस्था ती **सूक्ष्मसृष्टि** झाली. आतां पंचीकरणपूर्वक स्थूलसृष्टीचा विचार करूं.


---

## सूक्ष्मसृष्ट्यात्मक ॐकाराचें स्वरूप.

पंचीकृत स्थूलसृष्टीचा विचार करण्यापूर्वीं आपल्यास प्रथम **ॐ**काराचा विचार केला पाहिजे. निर्गुण, अव्यक्त, आणि व्यापक **परमात्मा**, सृष्टिसंस्काररूप मायोपाधीनें महाकारण, कारण आणि

सूक्ष्म अशा सृष्टीच्या उपाधीनें सर्वाधार, सर्वस्वरूप आणि सर्वमय तोच झाला. सूक्ष्मसृष्टींत जीं तत्त्वें सूक्ष्मरूपानें व्यक्त झालीं तीं सर्व परमात्म्यायाचींच अभिन्न रूपें झालीं. ज्याअर्थीं निर्गुण परमात्मा सृष्टिसंस्कारोपाधीनें स्वतः सृष्टिरूप झाला त्याअर्थीं त्याचें ' वाचक ' निर्गुण नाम ॐ हेंही तन्मय असल्यानें तद्रूप ह्म० सृष्टिरूप झालेंच पाहिजे. परमात्मा सृष्टीच्या अवस्थारूप झाला तसा त्याजबरोबर ॐकारही सृष्ट्यवस्थारूप झाला. परमात्म्यांत सृष्टि ' महाकारण ' स्वरूप ह्म० केवळ ' अस्तित्वसंस्काररूप ' झाली. तेथें ॐकाराचेंही स्वरूप ' अमातृरूप ' ह्म० केवळ संस्काररूप होतें. पुढें सृष्टि ' कारणावस्थेंत ' निरवयव अमूर्त होतांच ॐकाराचें स्वरूपही निरवयव अमूर्त ह्म० केवळ विंदुरूप झालें. ( ० ) आणि जेव्हां पुढें सृष्टि सूक्ष्मावस्थेंत येऊन सर्व तत्त्वें सावयव, मूर्त्त आणि सूक्ष्म कल्पनारूपानें तयार झालीं ह्म० ब्रह्म—अंडाची गर्भावस्था सावयव पूर्ण तयार झाली. ईचे बरोबरच ॐकारही विंदुरूपांत सावयव व्यक्त होऊन त्या त्या अवयवांत तीं तीं तत्त्वें सृष्ट्यवयवरूपानें व्यक्त होऊं लागलीं ह्मणजे सूक्ष्मसृष्टि सूक्ष्म ॐकाररूप झाली. त्याची आकृति पहा. यावरून ' सृष्टि ' प्रणवबीजरूप आणि परमात्मरूप कशी आहे हें चांगलें लक्षांत येईल. याप्रमाणें सूक्ष्मसृष्टिपर्यंत परमात्मरूप ॐकार आणि सृष्टि यांचें स्वरूपैक्य पूर्ण सिद्ध झालें. आतां स्थूलसृष्टीकडे वळूं.

नंबर ५.



---

## स्थूलसृष्टि.

सूक्ष्मसृष्टींत सर्व तत्त्वें सूक्ष्मरूप असल्यानें त्यांपासून जीवास यथार्थभोग आणि कर्मफल प्राप्त होऊं शकेना, त्यामुळें सृष्टीची क्षय-

वृद्धि कुंठित होऊं लागल्यानें कालकर्मगुणानुरूप पूर्व संस्काराच्या प्रचंड आघातानें सर्व तत्त्वांचें परस्पर ' मिश्रण ' होऊन एकदम सर्वांचीं स्थूलरूपें व्यक्त होऊं लागलीं. या स्थितींत कोणतेंही तत्त्व निव्वळ एकटें राहिलें नाहीं. जें कोणतें तत्त्व किंवा पदार्थ अवलोकन करावा, त्या एकांत सर्व तत्त्वें आढळूं लागलीं. पण प्रत्येक तत्त्वांत एक प्रधान आणि बाकी तत्त्वें न्यून असा तारतम्यभाव दिसूं लागल्यानें कांहीं परिमित भागांनीं तत्त्वांचीं मिश्रणें झालीं असावीं असें सिद्ध होतें. या मिश्रणास **पंचीकरण** असें ह्मणतात. त्याचा प्रकार श्रुतीनें सांगितला तो येणेंप्रमाणें.—


---

## पंचीकरणप्रकार.

**आकाश—वायु—अग्नि—जल**—आणि **पृथ्वी** या पांच तत्त्वांचे बरोबर दोन दोन भाग करावे. आणि एक अर्धा भाग पृथक् ठेवून दुसऱ्या अर्ध्या भागाचे बरोबर चार भाग करावे आणि स्वतःच्या पूर्ण अर्ध्या भागास सोडून दुसऱ्या तत्त्वांच्या पूर्ण अर्ध्या भागांत मिळवावें ह्म॰ प्रत्येक तत्त्व स्वतःच्या एक अर्ध्याभागानें आणि दुसऱ्या तत्त्वांचे चार भाग मिळून अर्ध्या भागानें असें पूर्ण झालें. उदाहरणार्थ लोखंड—जस्त—सोनें—चांदी—आणि तांबें अशा पांच धातू एक एक रुपयाभार घ्या. त्याचे दोन दोन भाग आठ आठ आणेभार करा. आणि एक भाग आठ आणे भाराचा वेगळा ठेवून दुसऱ्या आठ आण्यांतून चार भाग केले ह्म॰ ते दोन दोन आणेभार झाले. हे दोन दोन आणे आपले आठ आण्यांचा भाग सोडून दुसऱ्याच्या आठ आण्यांच्या भागांत मिळविले ह्मणजे प्रत्येक धातू एक अंश स्वतःचे आठ आणेभार व दुसऱ्याच्या दोन दोन आणेभार चार अंश मिळून सोळा आणे भार अशा पांच अंशांनीं युक्त झाली. प्रत्येक तत्त्वांचे पांच पांच अंश मिळून एकूण पंचवीस अंश झाले. व पंचवीस अंशांनीं युक्त अशीं पंचतत्त्वें झालीं. यांस **पंचीकृत पंचमहाभूतें** असें ह्मणतात. या पंचीकरणांतही ' देश, काल, कर्म, आणि स्वभा-

वाची ' शृंखला कशी बरोबर येत चालली आहे, ही बारकाईनें लक्षांत आणिली पाहिजे. जेव्हां पंचीकरण झालें, तो ' काल, ' ज्या आधारावर झालें तो ' देश ' मिश्रणाक्रिया, हीं ' कर्म ' आणि ' गुण ' ह्म० शब्दस्पर्शादिक असे प्रत्येकांत आढळतील. त्यावांचून कोणत्याही पदार्थाचें स्वरूप सिद्ध होत नाहीं. हीच कालदेशगुणकर्मांची अनुस्यूतता आहे. याप्रमाणें सर्व तत्त्वें पंचीकृत स्थूलरूप होतांच जी सर्व सृष्टिरचना सावयव व काल्पनिक होती ती एकदम स्थूलरूपानें व्यक्त होऊन सर्व पदार्थ निरनिराळे अभिव्यक्त झाले. तसेंच सर्व स्थूलसृष्टीचें प्रणवरूप बीज हें जें बिंदूंत व्यक्त होतें, तें पंचीकृत भूतांसह वेगवेगळ्या अवयवानें सुंदर प्रकाशमान झालें. ह्म० ॐकाराच्या प्रत्येक अवयवांत जीं सूक्ष्म तत्त्वें होतीं तीं पंचीकृत होऊन प्रत्येक अवयव पंचभूतांनीं मिश्रित असा सृष्टितत्त्वरूप झाला. तो पूर्णावयव सर्वतत्त्वमय आणि सर्वसृष्टिरूप ॐकार हा ☞ यापासून पुढें स्थूल सृष्टीची काय रचना झाली याचा आतां विचार करूं.

नंबर ६.




## सृष्टीची रचना.

स्थूल सृष्टीकडे पाहून तिचे स्वरूपाविषयींचा, तिच्यांतील अनंत पदार्थांच्या अनंत जातींचा, त्यांच्या अघटित रचनेचा, आणि स्वभाववैचित्र्याचा थांग कधीं लागूं शकत नाहीं. तिचें यथार्थ वर्णन करण्यास सहस्रमुखाची शक्ति आणि अगाध ज्ञान जरी असलें तरी तेंही कुंठित होणार. तेथें अल्पज्ञांची कथाच काय आहे. श्रुतीची प्रवृत्ति सृष्टिवर्णनाकडे अति थोडी आहे, असें ह्मटल्यास बाध नाहीं. कारण एक तर सृष्टीच्या वैचित्र्याचा अंत नाहीं. दुसरें सृष्टीची

स्थिति क्षणभंगुर असल्यानें जी आज पहावी ती उद्यां दिसत नाहीं. अशा क्षणिक पदार्थांच्या वर्णनांत महत्त्व तें कोणतें? तिसरें ज्या सृष्टीचा पाया मुळींच 'कल्पनारूप' त्यांत सत्यांश कितीसा असणार. सत्य अधिष्ठानावर नामरूपात्मक सृष्टीचा आरोप आहे. मूळ सत्य अधिष्ठान जाणण्याचें मुख्य तात्पर्य आहे. जसें एका सुवर्णाचे अनेक पदार्थ अथवा डागिने वाटतील तितके करीत बसल्यास अंत लागणार नाहीं, आणि अनेक डागिन्यांचें मूलतत्त्व एक सुवर्ण यथार्थ कळलें ह्म० सर्व डागिने नामरूपात्मक हवे तितके कल्पितां येतील, अर्थात सर्व डागिने कळल्यासारखे होतील. तसें सृष्टीचें सत्य अधिष्ठान परमात्मस्वरूप कळलें ह्म० सर्व सृष्टि कळल्यासारखी होते. तें सत्य अधिष्ठान कळण्याकरितां नामरूपात्मक कल्पित अशा ठळक गोष्टींचा विचार श्रुतींत केला आहे. त्यावरून पुढें जसे बुद्धिमान् शोधक होत गेले, त्यांनीं सृष्टींतील स्वयंसिद्ध गोष्टींचा बुद्धिबलानें शोध लावून सृष्टिवर्णनांत अधिक भर घालीत गेले. त्यामुळें ग्रंथसमूह वाढून पुढील होतकरूंस तें आयतें ज्ञानभांडार सांपडत गेलें. परंतु सर्वांचें तात्पर्य निवृत्तिपरच राहून शेवटीं पर्यवसान सत्यावरच येऊन ठेपतें. असो. तात्पर्य, सृष्टींतील प्रधान गोष्टींचा विचार केल्यानें तदंतर्गत सर्व लहान गोष्टींचा त्यांत समावेश होतो. करितां सृष्टींतील मुख्य गोष्टींचाच आपण विचार करूं.

स्थूलसृष्टीचे मुख्यतः तीन वर्ग आहेत. भोग्य '**विषय**' भोगसाधन '**इंद्रियें**' आणि भोगभोक्ते '**जीव**' या तिघांचाही समावेश स्थूलसृष्टींत होतो. अथवा या तिघांचा आपसांत जो प्रत्यक्ष स्थूलरूपानें संबंध होतो यासच 'स्थूलसृष्टि' ह्मटली पाहिजे. वर दाखविलेले बारा पदार्थ व त्यांचें परस्परांत झालेलें मिश्रण यापासूनच ही त्रिवर्ग स्थूलरूप '**सृष्टि**' झाली आहे. काल कर्म गुणाच्या साह्यानें मायेचे 'सत्वरजतम' जे गुण प्रत्येक तत्त्वांत मिश्रित आहेत त्यांतील तमोगुणप्रधान तत्त्वांशापासून भोग्य **विषय** झाले. तत्त्वांच्या रजोगुणप्रधानांशापासून भोगसाधन **इंद्रियें** झालीं. आणि तत्त्वांच्या सत्वगुणप्रधानांशापासून बुद्धिसंपन्न '**भोक्ते**' जीव झाले. 'प्रधानांश' ह्मणण्याचें कारण कीं प्रत्येक तत्त्वांत सर्व तत्त्वांचें

आणि तत्त्वांतील गुणांचें मिश्रण झाल्यानें, स्थूलसृष्टींत कोणताही पदार्थ निव्वळ एकतत्त्वरूप अथवा गुणरूप कधींच सांपडत नाहीं. जो एक पदार्थ पहाल त्यांत सर्व तत्त्वांचे अंश सांपडतील. आणि जो 'तत्त्वांश' अथवा 'गुण' अधिक असेल त्याच प्रधानांशानें तें तत्त्व अथवा पदार्थ बोलिला जाईल. ही गोष्ट ध्यानांत चांगली ठसण्याकरितां आपण पंचीकृत तत्त्वांचेंच उदाहरण पाहूं.

**वायु**—हा जो स्पर्शवान् आपल्यास वाटतो यांत गति आणि गतीच्याच योगानें 'स्पर्शगुण' हा वायूचा प्रधानांश आहे. 'शब्द' हा आकाशाचा सूक्ष्मांश आहे. शीतोष्ण स्पर्श हे अंश जलाग्नीचे आहेत. आणि वायूंत गुरुत्व ह्म० वजन हा पार्थिवांश आहे आणि 'गंध' पृथ्वीचाच अंश आहे. ह्मणून वायूबरोबर सुगंधही येतो. असा वायूंत स्वतःचा प्रधानांश आणि बाकींच्या तत्त्वांचा न्यूनांश आहे. **जलांत** आर्द्रता व शीतलता हे स्वतःचे प्रधानांश असून त्यांत आकाशाची व्याप्ति आणि शब्दगुण आहे. वायूची गति व स्पर्श आहे. अग्नीचें रूप ह्म० दिसणें आणि उष्णता आहे. उष्णता नसल्यास पाणी गोंठून वर्फ होईल. गुरुत्व आणि गंध हे पार्थिवांश जलांत आहेत. **अग्नींत** प्रकाश आणि दाह हे स्वतःचे प्रधानांश असून आकाशाची व्याप्ति आणि शब्द गुण आहे. वायूची गति व उष्ण स्पर्श आहे. अग्नीची ज्वाला आर्द्रतेच्या अंशावांचून व्यक्त होऊं शकत नाहीं. आणि पार्थिवांशाच्या आधारावांचून स्वतः अग्नि व्यक्तच होऊं शकत नाहीं. **पृथ्वींत** गुरुत्व आणि गंध हे तिचे प्रधानांश असून आकाशाची व्याप्ति व शब्दगुण तिच्यांत आहेत. मृदु व कठोर स्पर्श व गति हे वायूचे अंश आहेत. ह्मणून भूमींतला खळगा बुजतो. अर्थात माती पुढें सरकते हें सिद्ध आहे. आणि उष्ण, शीत, स्पर्श तिच्यांत हे अग्निजलांश असून गुरुत्व स्वतःचेंच आहे. आतां राहिलें **आकाश**. आकाशांतील जितक्या प्रदेशीं वर दाखविलेल्या सर्व तत्त्वांचें मिश्रण झालें आहे, तितका आकाशाचा प्रधानांश या सर्व तत्त्वांत मिसळून हीं सर्व तत्त्वें न्यूनांशानें त्यांत मिसळल्यासारखींच आहेत. हें सर्वांहून मोठें आणि व्यापकस्वभावी असल्यानें या सर्वांत मिसळून अ-

लिप्त राहतें. 'देश,' 'काल,' 'कर्म', व 'गुणां'ची अनुस्यूतता नुकतीच पंचीकरणांत सांगितली आहे. ती येथें जुळवून घेतली ह्म० खास दिसून येईल कीं सृष्टींतील एक दगड अथवा काडी हातीं घेऊन विचार करूं लागल्यास त्या काडींत सुद्धां बारा तत्त्वें आढळतील. बारा तत्त्वांच्या साहाय्यावांचून एक काडी सुद्धां निर्मिली जाऊं नये, ही केवढी अतर्क्य योजना त्या जगन्नियामकाची आहे. योजना कसली आली, तो स्वयं एकरूप अनंतरूपांनीं विलसत आहे. मित्रांनो, याचा क्षणमात्र नीट विचार कराल तर बुद्धि आश्चर्यांत गोंधळल्यावांचून रहाणार नाहीं. आणि त्या जगदात्म्यानें जी बुद्धि आपणांस दिली आहे तिचा मुख्य उपयोग याच विचारांत आणि शेवटीं आनंदप्राप्तींत आहे. असो. तात्पर्य प्रकरणारंभीं दृष्ट श्रुत आणि मनोवेद्य ह्मणून जें कांहीं आहे ती सर्व सृष्टीची सीमा आहे, असें जें सांगितलें होतें तें वाचकांच्या लक्षांत असेलच. त्या सीमेपर्यंत जी कांहीं सृष्टि आहे ती या बारा तत्त्वांच्या मिश्रणानें झाली आहे. ज्याला ह्या बारा तत्त्वांचें खरें स्वरूप आणि त्यांचें झालेलें मिश्रण यथार्थ कळलें त्याला सृष्टीचें पूर्ण ज्ञान झालें; अज्ञात असें कांहींच रहात नाहीं. आणि जो या मिश्रणापासून काय काय पदार्थ झाले त्या पदार्थांच्या शोधांत लागतो त्याला सृष्टींतील एक पदार्थ सुद्धां धड कधींच कळणार नाहीं, व त्या शोधकासही कळल्यासारखा वाटणार नाहीं. आणि वाटल्यास ही त्याची चूक आहे. मनुष्याच्या अल्प बुद्धीनें अगाध ईशसृष्टीचें ज्ञान त्रिकालांतही यथार्थ संभवतच नाहीं. अशा स्थितींत सृष्टिज्ञानाचा गर्व वाहणें व्यर्थ होय. असो.

वर सृष्टीचें त्रिविधरूप ह्म० भोग्य विषय, भोग साधनें इंद्रियें, आणि भोगभोक्ते जीव, असें सांगितलें आहे. यांत भोग्य 'विषय' ह्मणजे **शब्द–स्पर्श–रूप–रस–**आणि **गंध** हे आहेत. भोगसाधन 'इंद्रियें' ह्म० पंच **कर्मेंद्रियें** आणि पंच **ज्ञानेंद्रिया**दिक हीं आहेत. देहेंद्रियादि साधनसंपन्न असा भोग 'भोक्ता' **जीव** आहे. जीवांच्या चार 'खाणी' ह्म० जाती, जरायुज,–अंडज,–स्वेदज,–आणि उद्भिज्ज अशा आहेत. यांत तीन जाती देहेंद्रियादि साधनसंपन्न अ-

सल्यानें जीवकोटींत गणल्या गेल्या आहेत आणि उद्भिज्ज वर्ग निरिंद्रिय असल्यानें त्याची गणना जडांत झाली आहे. पण तात्त्विकदृष्ट्या ते जड नसून सर्व सचेतन आहेत. ह्मणूनच ते जीवकोटींत मानले आहेत. तथापि व्यवहारांत 'सजीव' आणि 'निर्जीव' असे दोन भेद ह्मटले जातात. जीवांच्या यथार्थ स्वरूपाविषयीं विचार स्वतंत्र रीतीनें पुढल्या जीवप्रकरणांत करावयाचा आहे, करितां त्याचा विस्तार येथें न वाढवितां भोग्य विषय 'सृष्टीचा' मुख्यत: आणि सामान्यत: 'जीवांचा' या प्रकरणीं विचार करूं.


# चतुर्दश भुवनरचना.

यावत् जीवमात्रांच्या सुखदु:खरूप विषयभोगार्थ आणि त्यांच्या च्या कर्मांच्या वृद्धिक्षयार्थ जीं अनंतकोटि ब्रह्मांडें निर्माण झालीं आहेत, त्यांतील सामान्यत: लोकरचनेचें वर्णन, श्रुति, शास्त्र, पुराणादिकांत सर्वज्ञ आचार्यांनीं केलेलें सुप्रसिद्धच आहे. त्या सर्व वर्णनाचा संग्रह करणें ह्मणजे त्याचा स्वतंत्र ग्रंथ मोटाच होणार. तसें करणें अप्रयोजक असल्यानें त्याचें सामान्य दिग्दर्शन करून मुख्यत: लोकांतर वर्णनाविपयीं आलीकडे लोकांचा अश्रद्धेनें गैरसमज होत चालला आहे. तो सुधारण्याविषयीं मी आपले अल्पबुद्धीनें प्रयत्न करून पहातों. तो कितपत साध्य झाला असेल याची तुलना वाचकांवर अवलंबून आहे. आणि सर्वांचाच समज माझे ह्मणण्याप्रमाणें होईल अशी मला आशा करितां येत नाहीं. मी माझे समजुतीप्रमाणें लिहितों. असो.

मागील ईश्वरप्रकरणांत विराटाचे शरीररचनेंत चतुर्दश भुवनांची रचना सांगितली आहे, ती येथें पुन्हां दाखविणें भाग आहे. ज्या 'भूगोलावर' आपण आहोंत हा 'भूलोक' अथवा 'मृत्युलोक' ह्मटला जातो. याच्यावरती सहा लोक ह्म० 'भुवर्लोक—स्वर्लोक—महर्लोक—जनोर्लोक—तपोलोक आणि सत्यलोक' असे आहेत. या सर्वांस **स्वर्गलोक** अशी संज्ञा आहे. आणि आपल्या भूमंडळाखा-

लीं ' अतल–वितल–सुतल–तलातल–रसातल–महातल आणि पाताल ' असे सात लोक आहेत. या सर्वांस **पाताललोक** अशी संज्ञा आहे. या भागत्रयांस ' स्वर्ग मृत्यु पाताल ' अशी **त्रैलोक्य**-संज्ञा आहे. या हीं चतुर्दश भुवनें ह्म॰ जसा आपला भूगोल आहे अशींच हीं भुवनेंही गोलरूपाचीं मंडलें आहेत. पण हे चवदाच ' गोल ' ह्म॰ सृष्टीची उतरंड आहे व एवढ्यानें सर्व खटलें भागलें असें नाहीं. हीं चवदा भुवनें ह्म॰ जें, महाकारण दशेंतून सूक्ष्मसृष्टींत परिपक्व दशेस आलेलें जें अखिल सृष्टिरूप ' **ब्रह्म–अंड** ' त्या अंडाच्या ह्या चवदा आडव्या ' फांकी ' आहेत, ह्मणजे मंडलाकार चवदा थर आहेत. या थरांतील एक एक परमाणुरूप अथवा बिंदुरूप जे गोल त्यांस भुवनें अशीं नांवें ठेविलीं. आणि त्या गोलांनीं तो सर्व प्रदेश सूचित झाला आहे. त्या गोलांच्या आसमंतात् अनंत गोल आहेत त्यांचीं वर्णनें कोठवर होणार. या चतुर्दश भुवनांची रचना त्या त्या लोकीं राहणारे जीवांच्या पुण्य सुकृ-

## नंबर ७



तानुरूप झाली आहे. व त्या लोकांतील जी अत्युत्कट पुण्यवान् विभूति असेल त्या विभूतीच्या स्वाधीन त्या लोकांचा अधिकार राहून तो 'लोक' ह्म० 'गोल' त्या विभूतीच्या नांवानें नांवाजला जातो. जसें 'मर्त्य प्राणी' आपण ज्या लोकीं वास करितों तो 'मृत्युलोक' सगुण निर्गुण ब्रह्मोपासकांस प्राप्त होणारा अर्थात त्यांच्या राहण्याचा ब्रह्मलोक, पितरांचा पितृलोक, इंद्राचा इंद्रलोक, अग्नीचा अग्निलोक, यमाचा यमलोक, निर्ऋतीचा नैर्ऋत्यलोक, वरुणाचा वरुणलोक, वायूचा वायुलोक, सोमाचा सोमलोक, सूर्याचा सूर्यलोक, त्याचप्रमाणें मंगल, बुध, बृहस्पति, शुक्र, शनैश्वर, इ० ग्रह, अश्विनीभरण्यादि नक्षत्रें, मेषवृषभादि राशी, सप्तर्षि, ध्रुवमंडल इत्यादिक जे महाकाशांत असंख्य तेजोगोल आपण नित्य पहातों, याशिवाय दृष्टीनेंही न दिसणारे किती अनंत गोल असतील याचा पार नाहीं. हीं सर्व मंडलें तेथील अपूर्व रचनांनीं आणि जीवांनीं भरलेलीं आहेत; आणि ते जसे आपल्यास प्रकाशमान दिसतात तसाच आपलाही भूगोल त्यांस प्रकाशमान दिसतो. या सर्व अनंत गोलांचा आपापसांत कांहींचा अति सूक्ष्म व कांहींचा अति स्थूल असा परस्पर संबंध असून, त्या संबंधापासून एकमेकांचा एकमेकांवर कांहीं तरी परिणाम घडत असतो. सूर्याच्या उष्णतेपासून आणि चंद्राच्या शीतलतेपासून आपल्या या भूमंडलावर केवढा जबरदस्त परिणाम घडत आहे कीं, सर्व भूमंडळांतील प्रत्येक जीव आणि पदार्थमात्रांचें जीवन, पोषण आणि मरण त्याच्यावर अवलंबून आहे. या सूर्यचंद्रांच्या उष्णशीतलतेप्रमाणेंच ग्रहनक्षत्रांचे परिभ्रमणाचा मोठा परिणाम इष्टानिष्टकारक या भूमंडळावर घडतो. त्या अर्थीं या भूमंडळाचाही कांहीं तरी परिणाम त्या गोलांवर घडलाच पाहिजे, व तो त्या गोलांवरील राहणाऱ्या जीवांस कळलाच पाहिजे. तेथील ज्ञान जरी आपल्यास बरोबर प्रत्यक्ष कळत नाहीं, तथापि प्रत्यक्ष न कळणाऱ्या अनेक गोष्टींचें ज्ञान अनुमानानें व इतर प्रमाणसाधनांनीं सिद्ध करतां येतें. ज्या गोष्टींच्या यथार्थ ज्ञानाचीं साधनें आपल्यास अजून उपलब्ध नसलीं आणि दुसऱ्यास कांहीं वेगळ्या साधनानें

अपूर्व शोध लागला असेल, आणि त्या साधनांची सिद्धि जर आपल्या आटोक्यांत येत नसेल, तर त्या शोधकाचा शोध एकदम अशुद्ध मानणें अथवा त्यास तुच्छ करणें हें बुद्धिमानांस योग्य नव्हे. ( या माझ्या लिहिण्याचा पत्ता पुढें निघणार आहे. ) श्रीमद्भागवत पुराणांत श्रीवेदव्यासांनीं—वैकुंठ—कैलास—ब्रह्मलोक, इंद्रलोक, चंद्रलोक, पितृलोक, यमलोक इ० लोकांचीं वर्णनें अति सुरम्य केलीं आहेत; तीं वाचून व ऐकून तेथील अपूर्व भोग, अमृतप्राशन, हीरकादिक मण्यांचीं सुंदर मंदिरें, सदैव सुंदर राहणारे वृक्ष, मौक्तिकांची भूमी, स्त्रीपुरुषांचें अतिमोहक सौंदर्य, इच्छित क्रीडासंचार, यथेच्छ विहारादिक अद्भुत रचना ऐकून पुष्कळ लोकांची विपरीत कल्पना आणि अश्रद्धा होते, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, यांत या लोकांस असंभवनीयता काय वाटते ती न कळे. किती जरी अद्भुत रचना झाली तरी आहे बारा पदार्थांचें मिश्रणच. त्याच्या बाहेरचें कांहीं असेल तर आश्चर्य. ज्या बारा तत्त्वांचे मिश्रणानें हा आपला भूगोल झाला आहे त्याच तत्त्वांनीं हे अनंत गोल झाले आहेत. ज्या नवरत्नांच्या खाणी ह्या आपल्या भूगोलांत आहेत, त्या थोड्या असल्यानें तीं रत्नें केवळ आभूषणांत राहतात, ह्मणून त्यांचें माहात्म्य मोठें आहे. तथापि संपत्तीचे अतिशयानें राजविभूतीनें उपभोगार्थ केलेले सिंहासनादि अपूर्व व अमूल्य पदार्थ आज येथें उपलब्ध आहेत. ह्याच नवरत्नांची अन्य गोलांत अत्यंत विपुलता असल्यास त्यांनीं त्यांचीं घरें बांधण्यांत आश्चर्य कोणतें. अप्राप्यतेमुळें आपण ज्यांस रत्नें ह्मणतों त्यांस दुसरे, वैपुल्यामुळें दगड ह्मणून त्याचा तसा उपयोग करीत असतील. आपल्या येथें ऋतुमानाच्या न्यूनाधिकपणानें वृक्षांस पर्णें, पुष्पें, फळें येतात. अन्य गोलांत ऋतुमान वेगळें असून सदैव फलपुष्पवान् वृक्ष राहणें असंभवनीय नाहीं. अशा वृक्षाच्या उपवनास नंदनवन ह्मणण्यांत हानी काय झाली ? आपल्या भूगोलांत अमुक ठिकाणचें हवा—पाणी फार चांगलें आहे. रोगी मनुष्य तेथें लवकर चांगला होतो, तेथील रहिवासी सशक्त बलाढ्य असतात, अशा अनुभवांनीं श्रीमानादिक लोक स्थलांतरें करित असतात; व त्याचा अनुभवही बरोबर मिळतो. भारत वर्षापेक्षां अन्य

द्वीपांतील माणसें अधिक बलाढ्य असून जास्त दिवस जगतात अशी अलीकडे समजूत झाली आहे. यांत तथ्यांश काय आहे, हा भाग निराळा. पण जगण्याकरितां भोंवतालच्या परिस्थितीचें कारण असेल तर अन्य गोलांत सहस्रावधी वर्षें जीवांनीं जगण्याजोगी परिस्थिति असणें अशक्य नाहीं. अशा जीवांस 'अमर' ह्मणण्यांत बाध काय झाला ? आज ह्या भारत वर्षांत अशीं कंद, मूलें उपलब्ध आहेत कीं, ज्यांच्या खाण्यानें शक्ति क्षीण न होतां पुष्कळ दिवस क्षुधातृष्णेची बाधा होत नाहीं. जर अन्य गोलांत अशीं पुष्कळ विपुल गुणवान् फलें अथवा पदार्थ असल्यास आणि जलही असेंच विलक्षण गुणकारी असल्यास त्याजला अमृताचें खानपान ह्मणण्यास हरकत कोणती ? असे खानपान व्यवहारीच 'अमर' ह्मणवितात. आपले भारत वर्षांत काश्मीर देश स्त्रीपुरुषांविषयीं आणि मालव, बंगाल, गुर्जर देश केवल स्त्रियांविषयीं सौंदर्यतेबद्दल सुप्रसिद्ध आहेत. याशिवाय अन्य द्वीपांतही अशीं स्थलें आहेत. या सौंदर्यास तेथील खानपान व परिस्थिति कारण आहे. त्यांतूनही क्वचित् स्त्रीपुरुष लोकोत्तर सौंदर्यवान् दृष्टीस पडतात. त्या कालीं आपापले मनोधर्मानुरूप जशा भावना होतात त्या सर्वांनुभूत आहेतच. आतां ज्या अन्यगोलांत येथल्यापेक्षां सहस्रावधि पटीनें अधिक खानपानादि परिस्थितीचें आनुकूल्य असेल तर तेथील स्त्रीपुरुषांचें सौंदर्य आपल्यापेक्षां सहस्रावधीपटीनें अधिक असण्यांत आश्चर्य तें काय ? अशा सुंदरांत जे अपूर्व सुंदर असतील त्यांस 'रति-मदन' अशी उपमा आली. येथें जीं गायनवादनें एकापेक्षां एक अधिक ऐकूं येतात त्यापेक्षां ज्या अन्य गोलांत स्त्रीपुरुष या कलेंत सहस्रपटीनें अधिक निष्णात आहेत, ते अप्सरा गंधर्व किन्नर ह्मटले गेले. अशा प्रकारचीं अपूर्व वर्णनें ऐकून जें आश्चर्य वाटतें त्याचें कांहींच कारण नाहीं. ईश्वराची सृष्टि अनंत आहे त्यांत सर्वच असणें संभवनीय आहे.

सूर्यलोक अति प्रज्वलित आहे. चंद्रलोक अति शीतल आहे. तेथें प्राणी राहूं शकत नाहीं, अशी अनेकांची कल्पना आहे. आपण मध्यकटिबंधांतील प्राणी उत्तर हिमालयांत शिरल्यास सर्व शरीर आंखडून गठडी होण्याची पाळी येते. आणि आफ्रिकेंत बारा महिने

अति कडक उष्ण प्रदेशीं गेल्यास शरीराची राखुंडी होते. अशा ठिकाणीं सुद्धां जीवांची उत्पत्तिस्थिति होऊन जीव आनंदांत असतात. कारण जन्मतःच त्यांचे स्थूल शरीरास जशा परिस्थितीचा अभ्यास होतो, त्यांतच जीवांचें जीवन आनंदानें होतें. अनेक वनस्पतीही उगवतात. ज्या वातावरणांत आपण श्वासोच्छ्वास करितों व जितका मोकळा वायु आपल्या प्राणजीवनार्थ आपल्यास पाहिजे असतो त्यापेक्षां अति न्यून वाताभिसरण प्रदेशींही असंख्य जीव राहूं शकतात. ज्या भूगर्भांत वायूची केवळ व्यापकता असून अभिसरण अतीच सूक्ष्म असतें, अशा भूगर्भांतही असंख्य जीवांचें जीवन होतें आणि त्यांचे जीवरक्षणार्थ तितकाच वायु बस्स होतो. त्यांची शरीररचना त्यांच्या परिस्थितीस अनुकूल अशीच निर्माण होत असते. जलाशयांत इतर भूचर-खेचर जीवांस श्वासोच्छ्वास करितां येत नाहीं, पण जलचर आनंदानें असतात; कारण त्यांची स्थूल शरीररचना त्यांच्या परिस्थितीस अनुकूल अशी असते. भूगर्भस्थ जीवांस स्वव्यापाराकरितां सूर्यप्रकाशाचीही अपेक्षा नसते. सारांश जो जीव ज्या परिस्थितींत जेथें जसा असतो त्या परिस्थितीच्या अनुकूलच त्या जीवाची शरीररचना, जीवनव्यापार, सुखदुःखाचीं साधनें, तशींच बुद्धींद्रियादि ज्ञान-साधनें सर्व यथास्थित असतात. आपल्या अनुकूल प्रतिकूल स्थितीवरूनच अन्य गोलांवर जीवांची वस्ती नाहीं, ते केवळ तेजोगोलच असून फक्त प्रकाशमानच दिसतात, ते केवळ निर्जीव आहेत असें ह्मणणें चुकीचें आहे. आपला हा भूगोल ज्या दुसऱ्या असंख्य गोलांचे सहस्रावधि पटीच्या मोठेपणापुढें सुपारीएवढासुद्धां ठरणें कठिण, अशीं अनंत तेजोमंडलें ज्या महाकाशांत आपल्या भोंवतीं परिभ्रमण करीत असलेलीं आपण प्रत्यक्ष पाहत असतां आणि दृष्टीच्या बाहेरही अनंतगोल आहेत असें पुरतेपणीं जाणत असतां, जेवढें कांहीं सचेतन, सज्ञान जीवांनीं भरलेलें आणि सुखदुःखसीमेचें भांडार जें जें कांहीं ह्मणून चांगलें वाईट ईश्वरनिर्मित अथवा स्वयंभू आहे तें आपला भूगोलच आहे. बाकी असंख्य गोल, हे केवळ निर्जीव कांहीं तरी प्रकाशरूप आहेत असें मानणें ह्म० मानवी बुद्धीच्या विशाल ज्ञानास अति आकुंचित करून धुळींत मिळविणें हो-

य. कूपांतील बेडुकानें समुद्रांतील बेडुकास उड्डाण मारून विचारलें कीं, तुझा समुद्र एवढा आहे काय ? दुसऱ्यानें छेः ह्मटलें, त्यावरून यानें पुनः परत उड्डाण करून, एवढा आहे काय? दुसऱ्यानें छेः ह्मटलें, त्यावरून हा रागावून तूं लबाड आहेस ह्मटलें. त्यावर दुसरा हांसून ह्मणाला, बाबा कूपांत उड्या मारून समुद्राची लांबी रुंदी कळत नसते. तसें आपल्या भूगोलावरून सर्व सृष्टीचें अनुमान करणें आणि आपल्या ज्ञानाच्या आटोक्यापलीकडे जें कांहीं आहे तें नाहींच ह्मणणें हें केवळ अज्ञानाचेंच फल होय. अनंत गोलांत अनंत प्रकारचे जसजसे जीव असतील त्यांच्या अनुकूल तेथील लोकरचना असण्याचा ईशसंकेत असतो. त्याच्या अद्भुत वर्णनांचें कांहीं आश्चर्य मानावयास नको. हल्लीं सुधारणाकालांत ह्म० ज्या सुधारणेचें आह्मास आज मोठें आश्चर्य व कौतुक वाटतें, त्या सुधारणेच्या प्रगतीनें भूगोलांतील व खगोलांतील पुष्कळ नवीन नवीन शोध निघून मंगलादिक कांहीं ताऱ्यांचा वेध करून पाहिल्यानें त्यावर भूप्रदेश, पर्वत व नद्या इ० कांहीं पदार्थ दुर्बिंगांतून दिसूं लागले आहेत. चंद्रावरही कांहीं रचना दिसते. असेंच प्रयत्न कांहीं शतकें चालल्यास आणखीही जास्त माहिती होईल. पण ती सृष्टिमानाला कितीशी पुरती होईल हें दिसतच आहे. तथापि शोधकांचा उद्योग स्तुत्य व प्रशंसनीय आहे. मानवी बुद्धि हा ईश्वराचा एक छापखाना आहे. ज्या ज्या कालीं जे जे ईश्वराला आपल्या सृष्टीचे स्वयंसिद्धान्त सृष्टींत व्यक्त करावयाचे असतात, तेव्हां तो बुद्धिमान जीवांच्या बुद्धींत प्रकाश करून स्फुरण देतो व त्यांच्या द्वारें ती गोष्ट जगांतील विचारशील इतर जीवांस स्पष्ट करून दाखवितो. असे विचार ज्या विभूतीच्या द्वारा प्रगट होतात ती विभूति **शास्त्रकार** ह्मणविते. याच नियमानें सर्व शास्त्रें प्रगट झालीं आहत. आतां **शास्त्र** ह्म० ज्या भाषेंत तें लिहिलें असेल ती ' भाषा ' शास्त्र नव्हे. त्या भाषेंत प्रतिपादित जो ' अर्थ ' तें शास्त्र आहे. जो अर्थ ह्म० जी गोष्ट प्रतिपादन करणाराच्या मनांत येते ती गोष्ट प्रथमच सिद्ध असते. जसें ' काळा आणि पिंवळा हे दोन रंग एकत्र केले ह्मणजे हिरवा रंग होतो. ' हें वाक्य भाषा झाली. हें वाक्य ऐकून समजणाराच्या

अंतःकरणांत ज्या कृतीचा बोध होतो, तो बोध ' अर्थ ' होय. या अर्थास समजून जी कृति केली व त्यापासून जो हिरवा रंग झाला, हा ' हिरवा रंग ' दोन रंगांच्या मिश्रणानें होणें ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. मिश्रणकर्त्यानें हिरवेपणा स्वतां आपले पदरचा आणला नाहीं. जो स्वयंसिद्ध हिरवेपणा अव्यक्त होता तो व्यक्त झाला. ही स्वयंसिद्धता विचार करणाराच्या मनांत स्फुरण होऊन तदनुरूप त्याच्या हातून क्रिया घडून व्यक्त झाली व ती क्रिया त्यानें ज्या अर्थबोधक भाषेंत लिहिली तो भाषाग्रंथ शास्त्र ह्मणविलें जातें. व तो लेखक त्याच शास्त्राचा आचार्य ह्मणवितो. याप्रमाणेंच सर्व शास्त्रें प्रगट होऊन त्यांचे व्यक्तकर्ते महर्षि ' आचार्य ' ह्मणविले. त्यांनीं प्रतिपादन केलेले सिद्धांत ईशसृष्टींत अनादि स्वयंसिद्ध असावयाचेच. ही ईशसिद्धांतांची स्वयंसिद्धता आणि त्यांतील अगाध गांभीर्यता ज्या आचार्यास कळते त्याची बुद्धि गलिताभिमानानें शुद्ध होते आणि ' मी केवळ वदणारा निमित्त मात्र असून शास्त्रप्रगटतेच्या ईशकृपेस पात्र झालों. ' याचा त्यांना सप्रेम आनंद होतो. व धन्यता वाटते. अशा प्रतिपादकांचींच शास्त्रें पूर्ण सिद्धांतापर्यंत पोंचतात. नाहींपेक्षां अपूर्तींच राहतात. ईशसृष्टींत जे अनंत गोल आहेत त्यांत अनंत आचार्यद्वारा प्रगट झालेलीं वेद, शास्त्र पुराणादिक हीं अनंत आहेत. त्यांचा अंत कळणें अशक्य आहे. या आपल्या भूगोलांतच वेदशास्त्रपुराणादिकांचा इतका संग्रह आहे कीं, अनेक जन्मांतही त्यांचें पूर्ण अध्ययन होणें अशक्य आहे.

त्यांची सामान्य संख्या चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें—चौदा विद्या—चौसष्ट कळा इ० आहे. याशिवाय याचे आणखी उपभेद आहेत ते निराळेच. या सर्वांचीं स्वतंत्र ग्रंथभांडारें आहेत. त्यांपैकीं कशाचेंच मजला यत्किंचितही ज्ञान नसल्यानें त्यांचे अधिक वर्णनाचें अवडंबर घालणें वृथा आहे. करितां ज्या कांहीं गोष्टी ऐकिल्या आहेत व ज्या मुद्यांचें मजला मुख्य प्रयोजन आहे त्यांचें दिग्दर्शन करितों. त्या दिशेनें जे कोणी सुज्ञ मार्मिक विद्वान् विचार वाढवून यथार्थ मुद्दे काढून मजला कळवितील तर त्यांचा संग्रह या ग्रंथांत करून मी त्यांचा आभारी होईन. जे सिद्धांत सर्व

शास्त्रांतून सुप्रसिद्ध आहेत त्यांचे केवळ उतारे देत बसणें मजला इष्ट नसून पुढील विचारकर्त्यांस विचाराची नवी दिशा दाखविणें आहे.

## सृष्टीसंबंधीं ज्योतिष व योगांतील कांहीं विचार.

**जगदीश्वरानें** अनेक सर्वज्ञ आचार्यांच्या बुद्धिद्वारा आपले ज्ञानभांडारांतील स्वयंसिद्ध विचाररत्नांचा समूह जगांत असा पाठविला आहे कीं जो बुद्धिमान् ज्या विचारशास्त्रांत निमग्न होतो त्यांतच त्यास अपूर्व आनंद प्राप्त होतो. सर्व शास्त्रें पर्यायानें निवृत्तिपर आणि सत्यपर्यवसायी आहेत. अनेक शास्त्रें जीं प्रादुर्भूत झालीं, त्यांत **ज्योतिषशास्त्र** आणि **योगशास्त्र** हीं ज्या महर्षींच्या द्वारें आपल्या या भूलोकीं आलीं, त्यांचा प्रधान उद्देश, या भूगोलवासी जनांस अंतरिक्षस्थ अनेक तेजोगोलांशीं असलेला आपला संबंध, त्यांच्या संबंधापासून आपल्यावर घडत असलेले त्यांचे परिणाम आणि त्यांच्या स्थितिचालनानें होणारे जगांत फेरफार यांचें त्रिकालज्ञान ज्योतिषद्वारा होतें. आणि अनेक गोलांत कोठें कशी स्थिति आहे, तेथें वास करणारे जीव कसे आहेत, त्यांचें ऐश्वर्य काय आहे, कोणत्या कर्मांनीं अथवा साधनांनीं त्या दिव्य लोकीं गमन आणि वास होऊं शकतो, या भूगोलांतील प्राणी सदेह व जीवंत असतां देशांतरीं व लोकांतरीं कसें गमन करूं शकतो, अदृश्य ज्ञान कसें होतें इ० अपूर्व सामर्थ्य योगाभ्यासानें मनुष्यास साध्य करून घेतां यावें. आणि मानवी कृति व शक्तीच्या बाहेर ईशकृति व शक्ति कशी अतर्क्य व अचिंत्य आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव आणि निश्चय होण्याकरितांच हीं ' शास्त्रें ' या भूलोकीं प्रादुर्भूत झालीं आहेत. ज्या कोणांस सृष्टीची मौज पहावयाची असेल त्यांनीं या शास्त्रांत प्रवेश करून जसा अभ्यास वाढेल तसा अनुभव येतो कीं नाहीं हें स्वतः पहावें. ज्या गोष्टी मानवी बुद्धीच्या आणि शक्तीच्या पलीकडे असून असंभवनीय आज आपल्यास वाटूं लागल्या आहेत हें केवळ आपलें आंध्य आहे. ईश्वरानें जी सृष्टि निर्माण केली व त्यांत जे जीव सज्ञान निर्माण केले त्यांशीं त्यानें कोणतीच प्रतारणा अथवा

पक्षपात न करतां सर्वांस सर्व ठिकाणचें ज्ञान व्हावें, सर्वांनीं सर्व ठिकाणचे सुखोपभोग घ्यावे व कोणास कांहींच अप्राप्य राहूं नये ह्मणून सर्व साधनें व मार्ग अगदीं उघड करून ठेविले आहेत. मनुष्यानें आपल्या अधिकारपरत्वें साध्य करूं इच्छिल्यास सर्व कांहीं होऊं शकतें, पण आस्थापूर्वक परिश्रम मात्र केले पाहिजेत. असो. हा भूगोल निर्माण होऊन न जाणें किती अनंत काल लोटला असेल किंवा उत्पत्तिरहित जरी मानला तरी अनंत कालचाच मानावा लागेल. आकाशस्थ अनंत तेजोगोलांचा व भूगोलाचा संबंधही अनंत कालापासूनच चालूं आहे. कोणते गोल आधीं व कोणते मागून झाले याचा अंत लागणें शक्य नाहीं. अनंत कालापासून परस्परांचा चालूं असलेला संबंध, आकाशस्थ गोलांचीं क्रांतिवृत्तें, त्यांच्या गतीचा काल व कालगतीनें घडणारा परस्परांवर परिणाम, त्या परिणामापासून होणारें इष्टानिष्ट फल, या सर्वांचा संबंध बरोबर बिनचुक चालू आहे. अशा सर्व नियमांच्या संग्रहास **ज्योतिष शास्त्र** असें नांव आहे. त्या शास्त्रांत दोन भाग आहेत. गोलाच्या परिभ्रमणाच्या वृत्ताची कालगणना ज्यांत बांधली गेली त्यास गणित असें ह्मणतात. आणि परस्परांच्या परिभ्रमणापासून परस्परांवर घडणाऱ्या बऱ्या वाईट परिणामाचा अति सूक्ष्म निर्णय ज्या भागांत केला त्यास फलित असें ह्मणतात. हे ज्योतिषशास्त्राचे नियम कधीं बांधले गेले याचा अंत लागणें नाहीं. ज्या ज्या महर्षी आचार्यांनीं या शास्त्रावर ग्रंथसमूह निर्माण केले त्यांस पूर्व पूर्व आधार मिळतच गेले आहेत. हल्लीं सुधारणाकालांत पाश्चात्य पंडितांनीं ज्योतिषांतील गणितभागास व खगोल शोधास फार उन्नति आणली आहे, ही गोष्ट मोठ्या आनंदाची आहे. पण फलितशास्त्राकडे मात्र अगदीं दुर्लक्ष आहे तेंही पुढें कालांतरानें होणार आहे. भारत वर्षांत फलज्योतिष अति उच्च शिखरावर गेलेलें आहे. सर्व जगांतील भूत भविष्य वर्तमान असें त्रिकालज्ञान सृष्ट्यारंभापासून तों शेवटपर्यंत दर्पणाप्रमाणें स्पष्ट केलें आहे. आणि सर्व गोष्टी सिद्धांताप्रमाणें बिनचूक मिळावयाच्याच. पण ग्रहांची गति सदैव कायमची नसल्यानें ग्रहांचे स्थलांत जो फरक पडत जातो

त्याचा शोध वारंवार होणें अत्यावश्य आहे. तो भारतवर्षांत बरेच शतकांपासून झाला नसल्यानें फलितशास्त्रास मालिन्य येऊन, दैवज्ञ विद्वान निर्बल होऊन अश्रद्धेस पात्र झाले आहेत. हें भारतवर्षाचें दुर्दैवच होय. तथापि अजूनही कांहीं विद्वद्रत्नें बिनचूक भविष्य सांगणारीं आहेत. याच वर्षीं ह्म० सं० १९१३।१४ नांत कांहीं विद्वानांनीं भविष्यें प्रसिद्ध केलेलीं पुष्कळ अंशीं बिनचूक पटलीं. पण त्या बिचाऱ्यांची किंमत करतो कोण. असो.

पृथ्वीवर पर्जन्यवृष्टि होणें, त्यांतही ग्रहांच्या योगानें अकालिक वृष्टि, अनावृष्टि, वृष्टिस्तंभ, अतिवृष्टि इ० फेरफार होणें, धान्येश ग्रहाच्या अनुकूलप्रतिकूलतेनें धान्यांत न्यूनाधिकता होणें, जीवांच्या उत्पत्तिस्थितिलयादी जीवन परिचर्येशीं ग्रहाचा अति निकट संबंध असणें, त्यावरून इष्टानिष्टज्ञान होणें, जन्मकुंडलीवरून मनुष्यवर्गांत, स्त्री, पुरुष, ब्राह्मण शूद्रादि भेद कळणें, बुद्धिमान्, जडबुद्धि, दुष्टबुद्धि, अंध, बधिर, मूके इ० लक्षणें मिळणें, पशूंच्या जन्मकुंडली तयार होतात त्यावरून पशूंचीं सर्व लक्षणें मिळणें इ० सर्व गोष्टी फलित सिद्धांतानें बिनचूक मिळवितां येतात. व मिळवून देणारेही आज जगांत नाहींत असें नाहीं. पण असे थोडेच निवतील. फल न मिळण्याचें कारण, गणितांत, ग्रहचालनांत व कुंडलींत चूक राहणें हें आहे. सिद्धांतग्रंथ कधींच अन्यथा होऊं शकत नाहींत. जे त्यांस अन्यथा ह्मणतील तें त्यांचें अज्ञान होय. कोणतीही अन्यथा गोष्ट जगांत फार दिवस टिकत नाहीं व जगमान्यही होत नाहीं. उन्नति व अवनति ही कालमानानें प्रत्येक गोष्टीमागें लागली आहे.

जी गोष्ट स्वयंसिद्ध असते तीच कालेंकरून व प्रयत्नेंकरून व्यक्त होते. ती ज्या रीतीनें व्यक्त झाली ती रीति सिद्धांत ठरते. जसें रासायनिक प्रयोगानें ज्या गोष्टी सिद्ध करून दाखवितात त्या रीति तरी अशाच शोधानें सिद्ध होतात. व जी रीति एकदां कायम झाली तिच्यांत जराशी गोष्ट चुकल्यास प्रयोग सिद्ध होत नाहीं. तसेंच, ज्योतिषनियमांत जरा चूक झाली कीं, फलसिद्धींत अशुद्धता आली. यावरून आपणास आतां ही गोष्ट लक्षांत आणिली पाहिजे कीं ज्याप्रमाणें पिंवळ्या व काळ्या रंगांचें मिश्रण केल्यानें हिरवा

रंग होतो हें आपणास त्या रंगांच्या मिश्रणानें समजलें; पण त्या मिश्रणानें तसें होणें हें स्वतःसिद्धच होतें. आतां हें जर आपल्या कृतीनें झालें असें ह्मणाल तर काळ्या पिंवळ्या रंगांच्या मिश्रणानें लाल रंगही झाला पाहिजे; पण तो होत नाहीं. ह्मणून ईशसृष्टीचे नियम सृष्टीबरोबर चालू असतात. ते ईशसंकेतानेंच ठराविक वेळीं बाहेर व्यक्त होतात. कारणपरत्वें लुप्त होतात व पुनः प्रगट होतात. कधीं वेगळ्या रीतीनेंही तीच गोष्ट कालांतरानें सिद्ध होते. अशी ही उघडझांक झाल्यानें सिद्धांत बदलत नाहींत, व त्यांचें अनादित्व नष्ट होत नाहीं. कार्यावरून कारणाचें ज्ञान होत असतें असा नियम आहे. भूगोलावर घडत असलेल्या बऱ्या वाईट परिणामावरून चंद्रसूर्यांच्या स्थूलसंबंधद्वारा, ग्रहनक्षत्रादिकांचे सूक्ष्मसंबंधापर्यंत मजल पोहोंचून सर्व अंतरिक्षगोलांची व भूगोलाची संबंधशृंखळा बळकट असल्याचें द्योतक ज्योतिषशास्त्र व्यक्त झालें. हें व्यक्त होण्यापूर्वीं अथवा कालांतरानें लोप झाल्यास गोलांचा परस्परसंबंध नव्हता. अथवा राहणार नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. ईश्वरी 'ज्योतिषशास्त्र' अखंडचें कायम आहे, व तें त्याच्या इच्छेनें पाहिजे तेव्हां व्यक्ताव्यक्त होतें असें तें 'अनादि' आहे.

यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, जसा भूगोलाचा व खगोलांचा अनादि संबंध आहे त्या संबंधाबरोबरच घडणारे परिणामही अनादिच आहेत. ज्या मनुष्याच्या अथवा पशूच्या जन्मकुंडलींत जे ग्रह जसे असतात, तदनुकूल त्या जीवांची स्थिति सुखदुःखात्मक असते, ह्म० भूगोलस्थ जीवांच्या जन्मादिकांस खगोलस्थ ग्रह 'कारण' झाले. आणि खगोलस्थ ग्रहांच्या स्थित्यनुरूप भूगोलस्थ जीवांची स्थिति हें त्याचें 'कार्य' झालें. कार्यकारणाचा अभिन्न संबंध असतो. अर्थात भूगोलखगोलांचा अनादि संबंध आहे व घडणारे परिणामही अनादि आहेत. तो संबंध द्योतक, ब्राह्मण शूद्रादि ज्ञातिभेद, बुद्धिमत्ता, पराक्रम-शीलता, वैगुण्यता इ० गुणविशिष्ट मानव जाती, व पश्वादि जाती, जें कांहीं आहे तें सर्व अनादि आहे. जर बुद्धिमान व पराक्रमशाली पुरुष अनादि कालापासून आहेत तर जगाची सुधारणाही अनादि कालापासून चालत येत आहे. कारणपरत्वें अवनति-

ही येते. पुन्हां सुधरते. ह्मणून जगाची मानवी सुधारणा कांहीं हजार वर्षांचे आंत ओढून वेदांच्या उत्पत्तीचा कालनिर्णय ठरविणें हा केवळ आपल्या बुद्धीचा कोतेपणा प्रदर्शित करणें होय.

सामुद्रिकशास्त्र हेंही ज्योतिषशास्त्राचा एक भाग आहे. यानें तर जीवांचे शरीराशीं आणि खगोलस्थाशीं इतका सूक्ष्म व प्रत्यक्ष संबंध नेऊन भिडविला आहे कीं, हस्तरेषा व शरीरचिन्हादिकांवरून ग्रह-कुंडली तयार होते. यावरून खगोलाच्या हेरफेरीनें जीवांच्या शरीरावरील चिन्हांत सुद्धां फरक दिसूं लागला. यावरून परस्पर गोलांचा यापेक्षांही अधिक व किती सूक्ष्म संबंध असेल याचा पत्ता लागणें मानवी बुद्धीस अशक्य आहे व शक्यही आहे. ईश्वरास आपले अनंतसिद्धांत आणखी किती व्यक्त करावयाचे असतील हें न कळे! तसेंच ते व्यक्त होण्यास न जाणों किती विभूति त्याच्या अनुग्रहास पात्र होणार असतील? शास्त्रांचे केवळ समुद्र आहेत. मला त्यांतील गंधही नसल्यानें मीं केवळ दिग्दर्शन केलें आहे. बुद्धिमानांनीं व विद्वानांनीं त्या शास्त्राचा पुढाकार घेऊन त्यास उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य-कर्म आहे. मानवी बुद्धीस ईश्वरानें अचिंत्य शक्ति दिली आहे, तिच्या बळावर पाहिजे ती गोष्ट होणें शक्य आहे.

रामकृष्णादिकांस आपण ईश्वरी अवतार ह्मणतों; पण अलीकडील विद्वानांनीं त्यांस मनुष्यकोटींत मोजून त्यांचीं चारित्रें ह्म० केवळ कादंबऱ्या रचिल्या आहेत. त्यांतील वर्णनें मनुष्यशक्तीच्या बाहेरचीं व असंभवनीय आहेत आणि ते सर्व पुरुष याच सहा सात हजार वर्षांच्या अलीकडील आहेत, असें चमत्कारिक प्रमाणांनीं सिद्ध केलें आहे. कालगतीचा मानदंड ह्म० "ईसवी सनाचीं अमुक शतकें पूर्वीं" हा ठरला आहे. ग्रंथ चाळविण्यांत ओझरत्या दृष्टीनें जें कांहीं दिसलें त्यांत बुद्धिकल्पना लढवून कांहीं तरी लिहावें, अशी हल्लीं ज्ञानवृद्धीची दिशा बदलली आहे; वेदशास्त्रादिक जे ग्रंथ केवळ ज्ञानाचे समुद्र आहेत, त्यांचें अध्ययन व यथार्थ पर्यालोचन करून' त्यांतील चूक काढणें महा दुर्धर काम आहे. सर्व वेद, सर्व शास्त्रें व सर्व पुराणें यांचें अक्षरशः बारीक रीतीनें पर्यालोचन करण्यास एक जन्म तर पुरूंच शकत नाहीं. मग त्यांतील यथार्थ सार काढणें ही

गोष्ट फार दूरची आहे. ग्रंथाध्ययनानें ग्रंथांत चूक सांपडत नसते व त्याचे अध्ययनावांचून त्याचें यथार्थ ज्ञान होत नसतें. यथार्थ ज्ञान झाल्यावांचून त्यावर टीका करणें हें धाष्ट्य आहे. ज्या फलज्योतिषाविषयीं ज्या लोकांचा विपरीत ग्रह झाला असेल त्यांनीं त्याचें स्वतः अध्ययन करून मग त्यांत चूक दाखववावी तरच किंमत आहे. अध्ययन केल्यावर चूक दाखवितांच येणार नाहीं. अशा प्रकारें संपादन केलेल्या ज्ञानानें शास्त्रावलोकन केल्यास सर्व ईशसृष्टीचे सिद्धांत डोळ्यांसमोर येऊन उभे राहतील व मग त्यांस मिथ्या ह्मणण्यास लज्जाच उत्पन्न होईल.

ज्या रामकृष्णादिक अवतारमूर्तींस—आधुनिक शोधकांनीं अगदीं अलीकडील सामान्य मानवकोटींत ओढलें आहे व कालनिर्णय ठरविला आहे, हा हल्लीं उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक माहितीनें मनरंजनार्थ अवलोकन केलेल्या रामायणादि ग्रंथांवरून आणि आपल्या ह्म० मानवी शक्तीच्या बाहेरील पराक्रमाच्या अस्तित्वाविषयीं असंभवनीयता वाटूनच वाक्पांडित्यें झालीं आहेत. पण खरा शोध लावण्याची दिशा ही नव्हे. रामायणांत **रघुकुलमणि रामचंद्राच्या** जीवनचरित्रवर्णनांत त्यांनीं जन्मादारभ्य स्वर्गारोहणापर्यंत दहा हजार वर्षांच्या आयुष्यमर्यादेंत मानवी शक्तीच्या बाहेर जीं अद्भुत कृत्यें केलीं तीं अमानुष होतीं ह्मणूनच राम ईश्वरावतार समजला गेला. पण हल्लीं ईश्वराच्याच अचिंत्य शक्तीची कल्पना शिथिल होत चालली आहे. मग ईश्वरावतार व अमानुष कृत्यें असंभवनीय वाटणारच; यांत आश्चर्य नाहीं. रामचरित्रांत रामाची जन्मकुंडली व कृष्णचरित्रांत कृष्णाची जन्मकुंडली दिलेली आहे. त्यावरून रामाचें आयुष्य दहा हजार वर्षें व कृष्णाचें एकशें वीस वर्षें, रामाचा सार्वभौम सत्तेचा योग व कृष्णास स्वतःचें राज्यपद नसण्याचा योग, दोघांचे हातून अमानुष कृत्यें घडण्याचा योग,— आणि रामास वनवास, सीतावियोग, बंधुवियोग इ० सर्व गोष्टींचे योग त्याच्या जन्मदशेवरून गणित करून पाहिल्यास सर्व सिद्धांत बिनचूक मिळतील. आतां रामकृष्णांच्या जन्मलग्नांवरून वर्षलग्न व 'जगल्लग्नकुंडली' तयार केल्यास त्यावरून त्या युगांत ग्रहांची स्थि-

ति कशी होती व त्या युगांत रामाच्या समकालीं जन्मणाऱ्या मनुष्यांची आयुर्मर्यादा दहा हजार वर्षांपर्यंत येते किंवा नाहीं हें पहावें. बुद्धिमत्ता, पराक्रमशीलता इ० गुण त्या कालांतील मनुष्यांत होते अथवा नव्हते हें पहा, ह्म० तत्कालीन ग्रहगणितावरून त्याकालीं घडणाऱ्या सर्व गोष्टींचा संभव सिद्ध होईल. आतां ज्या युगांत मनुष्याचें आयुष्य दहा हजार वर्षांचें, त्या आयुष्यमर्यादेप्रमाणें त्याच्या शरीराची वाढ, त्या वाढेनुरूप त्याच्या बालतारुण्यादि अवस्था, त्या अवस्थेप्रमाणें त्याच्या शक्तीची वृद्धि, ज्ञानाची वृद्धि आणि त्यायोगानें होणारी पराक्रमवृद्धि इ० सर्व गोष्टी घडणार. तेव्हां तो काल कसा व किती सुधारलेला असला पाहिजे याची कल्पनाही करितां येऊं नये काय ? हल्लीं शंभर वर्षांचें आयुष्य, तेंही धड पुरतें पदरीं पडत नाहीं. अशा अल्प आयुष्यांतील बुद्धिबलानुरूप सुधारणेची जी प्रगति होत होत ती आज ज्या कक्षेपर्यंत आली आहे, हीच जगाची सुधारणा असें कायम करून आपल्या वीतभर लांब दृष्टीनें जगाचा शोध करावयाचा व आजच्या व मागल्या सुधारणेशीं ताडून पहावयाचें ह्म० मागें सांगितलेल्या बेडुकाच्या गोष्टीप्रमाणेंच हा सर्व न्याय झाला. पण अचिंत्य शक्ति अचिंत्य पराक्रम व अचिंत्य ज्ञानप्राप्तीचीं साधनें व शास्त्रें प्रत्यक्ष आज अस्तित्वांत आहेत. तीं अन्यथा होत नाहींत. त्या मार्गानें बिनचूक जाणारास सर्वसिद्धि होतेच होते.

यावर कोणी ह्मणतील कीं, जर सर्व सामर्थ्यांचे मार्ग सिद्ध आहेत तर सिद्ध करून दाखवावे. त्याचें उत्तर असें आहे कीं, आज जीं यंत्रशास्त्रें व रसायनशास्त्रें सुधारलेल्या स्थितींत आलीं आहेत त्यांचे प्रयोग करून दाखविणारे ज्ञाते व यंत्रसाधनें आणि साधनसामुग्री ह्म० द्रव्यादिक या तीन गोष्टींनीं प्रयोग सिद्ध होतो. या तिहींपैकीं एक गोष्ट कमी पडल्यास प्रयोग सिद्ध होणार नाहीं हें खास. सिद्धीचीं शास्त्रें व मार्ग सिद्ध आहेत, व सिद्धि करणारेही सिद्ध आहेत. पण सामुग्रीची परिस्थिति बिघडल्यानें सिद्धीची असिद्धि झाली. तिन्ही गोष्टी सिद्ध असतां तिहींतून जी एक गोष्ट नष्ट होणें यासच अवनतिकाल ह्मणतात, व ती उणीव भरून येणें अ-

थवा अन्य मार्गानें तिची पूर्णता होणें हाच उन्नतिकाल आहे. तो धर्मावनतिकाल भारतीयांचा पुष्कळ शतकांपासून चालू असल्यानें भारतीय विभूतींस जो जें ह्मणेल तें त्यास अधोवदनानें ऐकावें लागत आहे. पण धर्माच्या अवनतीनंतर धर्माची उन्नतीही होण्याचा ईश-सिद्धांत आहे. ज्योतिषशास्त्र ह्म० हें प्रत्यक्ष विश्वचक्षु आहे. यांतील फलित भागास जितकी उन्नति अधिक येईल तितकीच सृष्टीच्या सुधारणेची अनादिसिद्धता प्रमाणानें सिद्ध करितां येईल.

रामकृष्णादिकांच्या प्रसिद्ध कुंडल्यांचें ग्रहचालन करून कालनिर्णयाचा अति स्थूल मानदंड कायम केल्यास रामावतारापासून कृष्णावतारापर्यंत किती काल लोटला व तेथून आज किती काल लोटला हें सिद्ध होणें शक्य आहे. पण प्रयत्न महा दीर्घ आहेत. जी अष्टग्रही येत्या छपन्नांत येणार आहे, ही पांच हजार वर्षांपूर्वीं पांडवांच्या भारतकालांत आली होती असें ह्मणतात. हीच अशी पांच हजार वर्षांमागें ओढित नेल्यास रामरावणांचे युद्धकालापर्यंत जाऊन पोंचेल असें वाटतें.

त्याकालीन ग्रहांचें चालन करून जर एक वर्षाची राष्ट्रकुंडली तयार केली तर त्या कालांतही ब्राह्मण क्षत्रिय शूद्रादिक वर्णभेदांचीं माणसें जन्मल्याचा पत्ता लागणें शक्य आहे. हा पत्ता लागल्यास ब्राह्मणादि वर्णभेद व त्या वर्णभेदांचीं भिन्न कर्में हीं अनादि होतील. भिन्न कर्में अनादि ठरलीं कीं कर्मप्रतिपादक वेदशास्त्रेंही अनादि असलींच पाहिजेत. त्यावांचून कर्मानुरूप वर्णभेद ठरणार नाहींत. या गोष्टी सिद्ध झाल्यावर एकच आर्यांचीं सर्व मानवमुलें कांहीं मध्य प्रदेशीं गेलीं तीं ब्राह्मण झालीं. कांहीं अरण्यांतच राहिलीं, तीं अन्य व्यवहारानें राहिलीं. वस्तुतः सर्व जाती वर्ण एकच असून फक्त स्त्री आणि पुरुष हीच ईश्वरी जाति आहे असें समजून जी वर्णसंकराकडे लोकांची प्रवृत्ति होते ती सर्व भ्रांति दूर होईल. या सर्व गोष्टी फलज्योतिषानें सिद्ध होणें अगदीं शक्य आहे. गणितशास्त्राचें पर्यवसान व प्रवृत्ति फलिताकरितांच झाली आहे. जर ग्रहांच्या चालनापासून फलोद्देश नसता व त्यांचा व भूगोलस्थ जीवांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नसता तर असंख्य योजनें दूर फिरणारांची आह्मीं उठाठेव क-

रण्याचें कांहीं कारण नव्हतें. व अजूनही सर्व खगोलस्थांचें आह्मास पुरतें परिज्ञानही नाहीं व त्यापासून काय काय परिणाम घडत असतील हेंही कळत नाहीं. स्थूल व्यवहारमानानें जितक्या ग्रहादि गोलांचा शोध लागला व त्यापासून घडणारें परिणाम—दर्शन झालें. त्याचे नियमसंग्रह ज्योतिषशास्त्र हें प्रादुर्भूत झालें आहे. हें जरी पुढें आणखी उन्नत व्हावयाचें असेल तरी आज सर्व सृष्टीचें त्रिकालज्ञान होण्यापुरतें साहित्य यांत भरलें आहे. शास्त्र कधीं अन्यथा होणार नाहीं व त्याचें अध्ययन केल्यावर त्यांतील गुणदोषचिकित्सा करणें योग्य आहे; पण अध्ययन केल्यावर चूक सांपडणें कठिण होतें. व सिद्धांत कबूलच करावे लागतात. असो. मला या विषयाचें परिज्ञान नसल्यानें या लेखांत पुष्कळ चुका असणें शक्य आहे. ज्ञात्यांनीं त्याची क्षमा करून माझ्या चुकीची दुरुस्ती करण्याची कृपा करावी. मी त्यांचा अत्यंत आभारी होईन.

भूगोलाचा व खगोलाचा संबंध व परस्परांवर परस्परांचे घडणारे परिणाम हा नियम सृष्टीबरोबरच कायम झाला आहे. ज्या १२ तत्वांच्या मिश्रणाचा मूळ खजिना तयार झाला, त्यांतूनच हे अनंत गोल व्यक्त झाले; ह्मणून सर्वांचीं घटकद्रव्यें बारा पदार्थमय आहेत. दारूकामाची चरखी चित्रविचित्र वर्णप्रकाशक द्रव्यांनीं भरलेली असते, ती जोंवर नुसती ठेविली आहे तोंवर त्यांत कांहीं चमत्कार नाहीं, पण तिला एकवार बत्ती लागली कीं नानाप्रकारच्या रंगीत प्रकाशाचा व असंख्य अग्निकणांचा मंडलाकार जोराचा प्रवाह सुरू होऊन त्या एका महावेगांत पडलेले अग्निकणही परिभ्रमण करीत असतात. त्याची जशी पहाणारांस मौज दिसते त्याप्रमाणें पूर्व सृष्टिसंस्काराच्या आघाताची बत्ती या माया महाशक्तिचक्रास लागून जो अखंड मंडलाकार धाराप्रवाह सुरू झाला आहे, त्यांतील अग्निकणरूप हे अनंत तेजोगोल सारखे वेगांत सांपडलेले अखंड परिभ्रमण करीत आहेत, त्याची मौज आपण नित्य पाहत आहोंत. महाशक्तीच्या मंडलाकार वेगाचा प्रवाह सुरू झाल्यानें व तो सारख्या वेगांत असल्यानें त्या प्रवाहांत अनंत तेजोगोल जे जे जेथें निर्माण झाले ते ते तेथून परिभ्रमणांत सांपडले व समान गतीनें चालले, ती

त्यांची एक प्रदक्षिणा एक क्रांतिवृत्त कायम झालें. शक्तीचा प्रवाह चालू असल्यानें गोलास आपल्या वृत्ताबाहेर जातां येत नाहीं, ह्मणून ठराविक गतीनें परिभ्रमण करितात. जसें घड्याळाच्या यंत्रास किल्ली दिली ह्म० त्यांतील सर्व चक्रें एकमेकांस ढकलीत आपआपल्या गतीनें सारखीं फिरतात. एक किल्लीच्या ठिकाणीं जसा सर्वांचा आघातसंबंध एक दुसऱ्याशीं लागला असतो त्याप्रमाणें 'महाकारण सृष्टींत' 'परमात्माधिष्ठान' किल्लीच्या ठिकाणांतून जो 'सृष्टिसंस्काराचा वेग' निघाला तो १२ तत्त्वें व्यक्त करीत व त्यांचें मिश्रण करून सूक्ष्म स्थूल सृष्टि निर्माण करीत, तदंतर्गत असंख्य पदार्थांस आंतून बाहेर ढकलीत ढकलीत पुन्हां मागें चढून किल्लीस्थानीं येतो; व तेथून पुनः बाहेर पडतो. असा जो अघाताचा स्पर्शास्पर्शसंबंध गच्च बांधला गेला त्यांत हे अनंत गोल ठिकाणच्या ठिकाणीं जखडले गेले आहेत. घटीयंत्रांतील कोणतेंही चक्र बोटानें रोंकल्यास सर्वांचा संलग्न संबंध असल्यानें सारीं चक्रें बंद पडून कोणास फिरतां येत नाहीं. त्याप्रमाणें या अनंत गोलांतून एकादा गोल जर फिरणें बंद पडेल तर सर्व गोलांची गति बंद पडून अनर्थ होईल. असा अनर्थ न होऊं देणारी **माया महाशक्ति** महावेगानें महामंडलाकार परिभ्रमण करून, सर्व तत्त्वांचें महामिश्रण परिभ्रमणानेंच करून त्या मिश्रणांत त्याचे अनंत गोल ठिकाणच्या ठिकाणीं बांधून, त्या सर्वांस नियमित वेगांत ढकलले; त्यायोगानें अनंत गोलांत असलेल्या अनंत पदार्थांतही अत्यंत सूक्ष्म वेग येऊन सर्वच वेगमय होऊन अचिंत्य भोंवरा अखंड चालू झाला आहे. रेल्वेंत बसलेला मनुष्य रेल्वे चालू असतां उतरल्यास आपटतो; याचें कारण अंगांत वेग भरलेला असतो. आंत बसून बाहेर दगड फेंकल्यास तो सुधा पडणार नाहीं. कारण रेल्वेंत वेग असल्यानें तिच्यांतील प्रत्येक पदार्थांत वेग भरलेला असतो, असा वेगाचा नियम आहे. त्यामुळें सृष्टींतील प्रत्येक पदार्थ मात्र स्वतः गतींत असून आपल्या सूक्ष्म वेगानें आपल्या आसमंतात् असलेल्या प्रत्येक पदार्थास अति सूक्ष्म धक्का देत आहे व ढकलीत आहे, ह्मणून सृष्टींतील प्रत्येक पदार्थाचा सर्व सृष्टीशीं अतिसूक्ष्म संबंध आहे.

ज्याप्रमाणें पुष्कळशा गारा, थंड पाण्यांत भांड्यांत भरून ढवळूं लागलें ह्मणजे पाण्याच्याच गारा; पाण्यांत पाण्याहून वेगळ्या रूपानें परिभ्रमण करीत असलेल्या दिसतात. त्यांत सूक्ष्म विचारानें पाहिल्यास पाणी आणि गारा यांचें द्रव्य एकच असून शीतलता ही कांहीं न्यूनाधिक प्रमाणानें त्यांतल्या त्यांतच आहे; व पाण्यांतल्या न्यूनशीतलतेचा गारांतल्या अधिक शीतलतेशीं एकाच भांड्यांत अभिन्न संबंध आहे. कांहीं काल तो वेगळा चमत्कार वाटून ढवळण्याचे प्रवाहानें शीतलता समान झाली ह्म० पाणी व गारा यांचें एकरूप होतें. कारणपरत्वें शीतलतेनें पुन: थिजतील पुन: विरघळतील असा खेळ दिसेल. त्याप्रमाणें मागें दाखविलेल्या ब्रह्म-अंडरूप 'भांड्यांत बारा तत्त्वरूपाचें 'जल' भरलें आहे. त्यांतूनच 'गारां'प्रमाणें हे अनंत गोल झाले असून संस्काराचे आघातरूप 'ढवळण्यानें' कांहीं कालपर्यंत बारा पदार्थांहून भिन्नाभिन्नरूपानें थिजलेले साकार 'गोल' दिसून लुडकत फिरतात. महाप्रलयकालरूप 'समानशीतलता' झाली ह्म० पुन: तत्त्वरूपांत अभिन्न होतात. सृष्ट्युत्पत्तिकालीं पुन: थिजून अनंत 'गोल'रूप होऊन लुडकतात, असा त्या **जगदात्म्याचाच** हा खेळ चालला आहे. ज्यांना मौज पहातां येईल त्यांनीं पहावी. सारांश असा कीं, अखिल गोल बारा तत्त्वांचे मिश्रणांशापासून झाले असून प्रत्यक पदार्थांत बारा तत्त्वें भरलीं आहेत असे हे 'मूर्त' पदार्थ आहेत. याशिवाय एका गोलापासून दुसऱ्या गोलापर्यंत जो अनंत अवकाश आपल्यास रिकामा वाटतो हा अवकाश रिकामा नसून बारा तत्त्वांच्या अमूर्त मिश्रणानें भरला आहे. हा अमूर्त तत्त्वांचा प्रदेश भांड्यांतील जलाप्रमाणें आहे; व 'मूर्तगोल' गारांप्रमाणें आहेत. जसें जलाच्या व गारांच्या स्वभावशीतलतेंत ऐक्य आहे, तसेंच बारा पदार्थांच्या मूर्तामूर्ततेंत स्वभावैक्य असल्यानें सृष्टींतील प्रत्यक पदार्थाचा आपसांत अभिन्न संबंध आहे. ह्मणूनच सर्व अनंत गोलांचे आपापसांत एकमेकांवर परिणाम घडतात व त्यांपासून इष्टानिष्ट कार्यें होतात; असें हें ईश्वरी ज्योतिषशास्त्र अखंड अनादि आहे. त्याचे नियम व्यक्त होणें न होणें यावर परिणाम घडणें न घडणें अवलंबून नाहींत; आपल्यास क-

ळणें न कळणें हें त्या नियमावर अवलंबून आहे. असो. यावरून सर्व गोलांचा संबंध कसा आहे व त्याचें ज्ञान ज्योतिषशास्त्रद्वारा कळणें कसें शक्य आहे हें आपल्यास कळलेंच पाहिजे. आतां या गोलावरून त्या गोलावर जातां येणें व तेथील रचना प्रत्यक्ष पहाणें हें कोणत्या साधनानें होऊं शकतें याचा विचार करूं.

वरील एकंदर वर्णनावरून ही गोष्ट सिद्ध झाली कीं, सर्व सृष्टींतील अनंत गोल जे आहेत ते बारा तत्त्वांचे मिश्रणरूप असून मूर्तरूप दिसतात व अंतरिक्षावकाशांत तत्त्वांचें मिश्रण अमूर्तरूप ह्मणजे दृष्टीस अगोचर असें आहे. कारणपरत्वें तत्त्वांत मूर्तामूर्त असा भेद दिसला तरी मूलस्वरूपांत भेद आला नाहीं. त्यामुळें सृष्टिसीमेच्या आंत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत यावत् पदार्थमात्राचा, आघात ह्मणजे 'स्पर्श'रूपानें आपसांत अभिन्नसंबंध झाला आहे. मोठ्या भांड्यास एखाद्या ठिकाणीं जरा टिचकी मारल्यानें त्याचा झणत्कार जसा सर्व भांड्यांत पसरतो, याचें कारण असें कीं, भांडें हें धातूच्या अत्यंत सूक्ष्म परमाणूंच्या घनीभावानें झालें आहे. ते परमाणू आपसांत संलग्न असल्यानें जितक्या परमाणूंच्या जागीं टिचकीचा आघात झाला, त्या परमाणूंनीं तो आघात सर्व परमाणूंस पोंचविला. त्याप्रमाणें ब्रह्म अंडरूप भांड्याचे हे अनंत गोल आणि हीं तत्त्वें हे परमाणू आहेत. यांचा सर्वांचा अभिन्नसंबंध असल्यानें एका गोलावरील हालचालीचा स्पर्श सर्व गोलांस पोंचतो व त्यापासून स्पर्शाचे स्थूलसूक्ष्मतेप्रमाणें स्थूल सूक्ष्मच परिणामही घडतात. एक दृष्टांत आणिक देतों. साखरेचा पाक भांड्यांत भरला ह्मणजे त्यांत चाचणीचे रवे लहान मोठे कांहीं होतात, कांहीं चाचणी पातळच असते, असा जरी प्रकार दिसला तरी आहे सर्व शर्कराच. तसे अनंत गोल मूर्त रवे व बाकी अमूर्त मिळून आहे सर्व तत्त्वांच्याच मिश्रणाचा पसारा, अन्य कांहीं नाहीं. असो.

हा सर्व भिन्नाभिन्न चमत्कार होण्यास मूळ कारण पूर्वसृष्टि 'संस्काराचा आघात' ही गोष्ट मागें पुष्कळ ठिकाणीं सिद्ध झालीच आहे. आणि 'संस्कार–वासना–संकल्प–मनोरथ' इ० हे सर्व एका अर्थाचेच पर्याय शब्द आहेत हेंही ठरलें आहे. आतां असा

विचार पहा कीं, एकंदर सृष्टींतील व्यापाराची उठाठेव आपण आपल्या मनोरथानुरूप स्थूलदेहद्वाराच करितों. सृष्टींतील प्रत्येक पदार्थ तत्त्वांचें मिश्रण आहे, त्याअर्थीं आपला देहही तेंच मिश्रणरूप आहे. हा देह एका स्थलाहून दुसऱ्या स्थलीं नेणें ह्म० जाणें, इच्छित व्यापार करविणें ह्म० करणें, हे सर्व पांचभौतिक पदार्थांचे व्यापार पांचभौतिक देहांनीं केवळ मनोरथाच्या वलावर आपण करीत आहोंत. मनोरथ उत्पन्न न झाल्यास सर्व चेष्टा बंद पडतात. याचा सामान्य अनुभव सुषुप्तींत आहेच. कल्पनेच्या ह्म० मनोरथाच्या वलावर आपण या जड स्थूल देहास आपल्या सर्व भूगोलभर घेऊन फिरतों. जलावर गति चालली नाहीं तेथें जहाजें काढून पर्वत फोडून आपण अन्य द्वीपांतरीं पोंचतों. शीघ्रवेगाचीं वाहनें तयार करून हवें तिकडे जाऊं शकतों. पाहिजे तें करूं शकतों; पण हा सर्व व्यापार तत्त्वांच्या स्थूल मिश्रणांनींच स्थूल मिश्रणांत करतों. आणि हे सर्व इतर अनंत गोलही स्थूल मिश्रणाचेच स्थूल व्यापारी आहेत. तेथें पोंचल्यावर इच्छित व्यापार करतां येतील; पण त्यांच्यांत व आपल्यांत जें अंतरिक्षस्थल, तत्त्वांच्या सूक्ष्म मिश्रणानें भरलें आहे तें सूक्ष्म ह्म० अति हलकें असल्यानें त्या प्रदेशांतून ह्या वजनदार स्थूल शरीरास वर नेतां येत नाहीं ही मोठी अडचण आहे. आपल्या शरीरापेक्षां पाणी अति हलकें आहे. त्यांतून तरून जाण्यास दोनच मार्ग ह्म० नौका अथवा स्वबाहूंनीं पोहोण्याची विद्या हीं साधनें आहेत; याशिवाय अन्य मार्ग नाहीं. नौका ही जरी जड असते तरी तिच्यांत तारण्याचा स्वभाव अथवा गुण आहे, ह्मणून तिच्या बलावर नदीपार जातां येतें. पण तसें जाणें पराधीन ह्म० नौकावलंबी राहतें. ती नसली ह्म० ठिकचे ठिकाणींच रहावें लागतें. पण तिच्यांतून मोठ्या नदींत प्रवास करणें एक प्रकारें सुरक्षित असतें. नौकाच फुटली तर बुडणें कपाळीं आलेंच. स्वतःची नौका तयार करण्यास पैसे अधिक लागतात, पण हवें तेव्हां जातां येतें. आणि दुसऱ्याच्या नौकेंतून जाणें थोडे पैसे देऊन होतें, पण तें नेणाराच्या इच्छेनें होतें. सत्ता चालत नाहीं. दुसरा उपाय स्वबाहूबलानें पोहोण्याचा, हा मात्र अगदीं स्वतंत्र आहे; पण साध्य हो-

ण्यांत बऱ्याच परिश्रमाचें व धोक्याचें काम आहे. पाण्यांत उतरण्यास आधीं जीव घाबरणार, नाकातोंडांत पाणी शिरणार व गटंगळ्याही खाव्या लागणारच. आणि त्यांत शिकविणारा कच्चा असला अथवा त्याची नजरचूक झाली कीं हा शिकणारा तळाशीं गेलाच. इतक्या खटपटींतून पार पडून पोहणें साध्य झाल्यास हवें तेव्हां पार जातां येतें. पण तरावयाची जशी मोठी नदी असेल तसा अभ्यास वाढवावा लागतो. नाहींपेक्षां हात थकले कीं गोताच. त्यांतूनही मोठ्या वादळांत सांपडल्यास भाग्यानें प्राण वांचले तर वांचले. तथापि ही गोष्ट स्वतंत्र व स्वाधीन पुरुषार्थाची आहे. हे दोनी दृष्टांत वाचकांनीं सूक्ष्म रीतीनें लक्षांत आणावे. यांत मुख्य कला, पाण्यापेक्षां आपलें शरीर जड असतांही, दम साधण्याची क्रिया साध्य झाल्यानें अति हलक्या जलावर अधर राहतां फिरतां येण्याची जशी जड शरीरांत शक्ति आणतां आली, तशी सूक्ष्म तत्त्वांचें अमूर्त मिश्रणरूप समुद्रांत अधर राहण्याची व सचार करण्याची युक्ति सांपडल्यास या गोलावरून त्या गोलावर सहज जातां येतां येईल.

जसें अति हलक्या जलावरून सुखसंचार करण्यास दोनच मार्ग आहेत, तसें तत्त्वांच्या अमूर्त समुद्रांतून सुखसंचार करीत स्वर्गादि अन्य गोलांवर जाण्यास जगन्नियंत्यानें दोनच मार्ग कायम केले आहेत. एक **कर्ममार्ग** व दुसरा **योगमार्ग**. कर्ममार्ग वरील नौकेच्या दृष्टांताप्रमाणें आहे व योगमार्ग स्वबाहुबलानें संतरण्याप्रमाणें आहे. पैसे खर्चल्यानें स्वतःच्या नौकेंतून सुखरूप जलसंचार करतां येतो. तसें **कर्म** हें जड असतांही त्यांत तारकशक्ति असल्यानें तें करणारास पैसेरूप होऊन त्यापासून नौकेप्रमाणें विमानादिकांतून स्वर्गादिगोलांवर सुखसंचार करणें बिनाधोक्याचें आहे. पण नौका फुटल्यास बुडावें लागतें, तसें कर्म फुटल्यास अधःपात होतो. हा प्रवास तरी अमूर्तरूपानेंच होणार आहे. याचें सविस्तर वर्णन आतां पुढेंच होणार आहे. दुसरा मार्ग ह्मणजे स्वबाहुबलानें संतरण्याप्रमाणें योगमार्गाचा आहे. आरंभीं प्राणायामादि मुद्रासाधनांत जीव घाबरणार. शिक्षकांची नजरचूक झाल्यास जीवास मुकणार. महा कष्ट करून ईशकृपेनें साध्य झाल्यावरही नेहमीं दृढाभ्यास ठेविला पाहिजे. ज्याप्र-

माणें अति हलक्या जलावर संचार करण्यास दम साधण्याची क्रिया साधावी लागते, त्याप्रमाणेंच वायुचक्रावरही अधर राहून सुखसंचार करण्याची शक्ति योगाभ्यासानें साध्य होऊन, अमूर्त तत्त्वमय प्रदेशांतून निघून अन्य गोलावर पोंचतां येतें. यांत स्वतःचें शरीर अमूर्तरूप करून ' संकल्प ' अथवा वासनेच्या बलावर अन्य स्वर्गादि गोलांवर नेतां येणें शक्य आहे. जसें वासनेनुरूप स्थूल शरीराकडून गमनागमनादिव्यापार ह्या लोकीं करतां येतात, तसेंच वासनेनुरूप स्थूल शरीरास अमूर्तरूप देऊन अन्य लोकीं व्यापार करतां येणें हें सामर्थ्य योगाभ्यासानें येतें.

भूगोलाच्या सभोंवतीं अति विस्तीर्ण जें वायुमंडल आहे, त्यांतील भूगोलाजवळ जवळच्या वायुप्रदेशांतील वायूंत पार्थिवांश अधिक असल्यानें तितक्या वायूंत गुरुत्वही जास्त आहे. व दूर दूर वरती वायु अधिकाधिक स्वच्छ व हलका आहे. त्या हलक्या वायुप्रदेशांत राहणाऱ्या पदार्थांचें वजनही हलकें करून त्यांत शुद्ध वायु सांठविल्यास तो त्या पदार्थास आपल्या वेगानें वर अधर नेऊं शकतो. याच मूलतत्त्वावर (वेलून इ० ) गुब्बारे उडविण्याची क्रिया पाश्चात्य शोधकांनीं चालू केली आहे. ते ज्या रासायनिक शक्तीनें जड वायूस शुद्ध हलका करून गुब्बाऱ्यांत भरतात व अंतरिक्षांत नेतात, ती रासायनिक युक्ति योगक्रियेंत स्वयंसिद्ध असल्यानें प्राणायामांत वायु जितका जितका अधिक कुंभक होत जाईल तितका तितका तो जास्त शुद्ध होत जाऊन ब्रह्मांडांत चढवीत चाललें कीं, त्या वायूचा शुद्ध वेग वाढून शरीर वर उचललें जातें. हा अभ्यास जसा जसा दृढतर वाढत जाईल व त्या वायुरुद्ध स्थितींत ' मनोवासना ' जिकडे सुकाणूं फिरवील तिकडे शरीर मूर्तरूपानें अथवा अमूर्तरूपानें संकल्पाप्रमाणें रवाना होऊन इच्छित व्यापारांत प्रवृत्त होईल. पुनः परत येईल. हव्या त्या इच्छित गोलावर जाईल, पाहील आणि सुखोपभोग घेईल.

योगाभ्यासांत मुख्य साधन वायूचें आहे. कारण गति हा गुण वायूंत प्रधान असल्यानें वायूच्या रोधानें सर्व तत्त्वांचा रोध होतो. आणि वायूच्या गतीनें सर्व तत्त्वांत गति उत्पन्न होते. तत्त्वांच्या पं-

चीकरणांत वायूंतही पांची तत्त्वांचें मिश्रण आहे, असें मागें सिद्ध झालेंच आहे. योगाभ्यासांत प्रथम वायु शुद्ध करून शरीरांत इच्छित ठिकाणीं नेतां येणें व तेथें रोध करून ठेवतां येणें हीच मुख्य क्रिया साध्य करावयाची असते. प्राणायामांत वायु जसजसा कुंभक होत जाईल तसतसा तो अधिक शुद्ध होत जाईल. ह्म० त्यांत आणखी दुसऱ्या तत्त्वांचा जो अंश आहे तो कमी होऊन वायु निवळतो, व शुद्ध झाला ह्म० इच्छित स्थलीं त्यास नेतां येतें, व त्यांत मिसळलेल्या इतर तत्त्वांतून इच्छित तत्त्वांतही अधिक शक्ति आणतां येते. वायूच्या गतिस्वभावामुळें त्यांत मिसळलेलीं तत्त्वेंही सूक्ष्मरूपानें वायूबरोबर परिभ्रमण करीत असतात. त्याचे सर्व नियम योगशास्त्रांत बांधले आहेत. तीन घटका एक तत्त्व वायूंत प्रधान रहातें, ह्म० साडेपंधरा घटकेंत सर्व तत्त्वांची एक प्रदक्षणा होते. पहांटे आठ घटका रात्रीं उठून शौचमुखमार्जन करून एकांत व निर्वातस्थळीं अंधारांत आसनावर ताठ सरळ बसून नासाग्रदृष्टीनें श्वासोच्छ्वासाचे वायूकडे पहात बसावें. रोज चार घटका असें सहा महिने अनुष्ठान चालविल्यास तत्त्वांचे ठराविक रंग अंधारांत श्वासोच्छ्वासांत स्पष्ट दिसूं लागतात. अशी तत्त्वांच्या वेळेची व रंगाची पक्की ओळख जमली ह्म० ज्या वेळीं श्वासांत जें तत्त्व असेल त्या वेळीं वायुरोध केल्यास तेंच तत्त्व वायूंत रोधलें जाऊन त्याची शक्ति अधिक वाढते. आणि बाकीचीं तत्त्वें सूक्ष्म होतात ह्म० हलकीं पडतात. ही शक्ति जितकी प्रबल करतां येईल तसें तत्त्वाकडून काम घेतां येईल. याप्रमाणें पूर्ण शक्ति अंगीं आल्यावर पृथ्वीतत्त्वाच्या वेळीं योग्यानें वायुरोध केल्यास शरीर अति जड होईल, त्यास दुसरा उचलूं शकणार नाहीं. अथवा भूगर्भांत प्रवेश करतां येईल. जलतत्त्वाच्या वेळीं वायु रोधल्यास शरीर जलांत बुडणार नाहीं, अथवा शरीरच पाणी होईल. अग्नितत्त्वांत रोध केल्यास अग्नींत प्रवेश करतां येईल. अथवा शरीर जाळतां येईल. योगी देहावसानीं आपलें शरीर योगाग्नीनें जाळतात तें असेंच. वायुतत्त्वकालीं प्राणरोध केल्यास शरीर वायुरूप होतें, मग या गोलावरून त्या गोलावर जाण्यास उशीर काय? आकाशतत्त्वकालीं रोध केल्यास शरीर शून्यरूप होतें.

असें तत्त्वांच्या कालांत प्राणरोध करून ज्या तत्त्वाकडून जें काम घेण्याचा संकल्प असेल तें काम तें तत्त्व करूं लागतें. याप्रमाणें शरीरांतल्या शरीरांत सर्व तत्त्वें शुद्ध करून त्यांच्याकडून इच्छित कार्यें करविणारा योगी सर्वशक्तिमान् होतो. प्राणायामानें वायुरोध करून शरीरांत ज्या ठिकाणीं तो वायु ज्या नाडीद्वारा नेतां येईल व त्याजकडून इच्छित कार्य करवितां येईल अशी क्रिया साध्य होण्यास आसनें व मुद्रा साधाव्या लागतात इ० त्यायोगानें सर्व शरीरभर वाटेल त्या नाडींतून वायूस ओढून नेतां येतें आणि इच्छित स्थळीं रोधून संकल्पानुरूप कार्य करतां येतें. ही सर्व सिद्धि योगशास्त्रांत सविस्तर लिहिली आहे, वाटेल त्यांनीं अनुभव पहावा.

मानवी शरीर हें स्थूल सृष्टिरूप विराटात्म्याचें अति सूक्ष्म प्रतिबिंब आहे. वाटीभर पाण्यांत अथवा आरशांत अति विस्तीर्ण आकाश असंख्य नक्षत्रमंडळासह सर्व दिसतें. नवीन निघालेल्या फोटोग्राफिक यंत्रानें अति विस्तीर्ण सृष्टिदेखाव्यास इतक्या अति सूक्ष्म तसविरींत सावयव आणतां येतें कीं, सूक्ष्मदर्शक उपनेत्राशिवाय दिसूंच शकत नाहीं. ही गोष्ट जी आज मानवी कृतीनें व्यक्त झाली ती गोष्ट ईश्वरी सृष्टींत स्वयंसिद्ध आहे. विराटात्म्याच्या स्थूल शरीरावर सर्व सृष्टिरचना जी ईश्वरप्रकरणांत सविस्तर सांगितली आहे, ती सर्व सृष्टिरचना हुबेहूब अति सूक्ष्मरूपानें मनुष्यशरीररचनेंत आली आहे. ती योगचक्षूंनीं दिसूं शकते. स्थूलदृष्टीनें दिसत नाहीं. विराटाच्या शरीरांतील ज्या अवयवावर चतुर्दश भुवनें आहेत; शरीरांतील अस्थि, रुधिर मज्जादि धातूंपासून जे जे पदार्थ झाले आहेत, ज्या ज्या इंद्रियांपासून ज्या ज्या देवता झाल्या आहेत, तींच भुवनें, तेच पदार्थ आणि त्याच देवता या मनुष्यशरीररचनेंत सूक्ष्मरूपानें अगदीं बरोबर आल्या आहेत. ( याचें विशेष वर्णन पुढें जीवप्रकरणांत येईल ) मग बारा तत्त्वें आलीं आहेत हें वेगळें सांगणें नकोच. प्रवासाला निघाल्यास सर्व देशाचा नकाशा हातीं आल्यावर आणि पैशाचें बळ जवळ असल्यावर मग इच्छित स्थळीं आनंदानें फिरण्यास, विहार करण्यास जसे सर्व मार्ग मोकळे होतात, त्याप्रमाणें ईशसृष्टीचा नकाशा हें मनुष्यशरीर आपल्यास मिळालेंच

आहे. सृष्टीचा प्रवास करण्याची इच्छा असल्यास योगसाधनाचें द्रव्यबल अंगीं संपादन केल्यावर मग तत्त्वांच्या सूक्ष्म-स्थूल मिश्रण-पसाऱ्यांतून मूर्त अमूर्त जसें वाटेल त्या रूपानें हव्या त्या स्वर्गादि गोलावर सुखसंचार करून यथेच्छ विहार करण्यास ईश्वराकडून आनंदानें मोकळीक आहे.

---

## सृष्टीची कर्मप्रधानता.

श्वासोच्छ्वासावर दृष्टीची धारणा बसविल्यानें तत्त्वांचे रंग दिसतात, असें वर सांगितलें आहे. त्यांत आकाशानंतर वायु असा जो तत्त्वांचा क्रम सांगितला आहे त्याच क्रमानें तीन तीन घटकांनीं तत्त्वांचे रंग पालटलेले दिसतात. यावरून असें प्रत्यक्ष सिद्ध होतें कीं सर्व तत्त्वांचीं स्वरूपें दृश्य व अदृश्य ह्म० स्थूल व सूक्ष्म अशीं असून त्यांतील कांहीं अंशांचे स्थूल पदार्थ होऊन जे सूक्ष्मांश उरले, तेही 'संस्काररूप आघाताच्या' धक्क्यानें मंडलाकार प्रवाहरूप गतींत सांपडून एका मागून एक अनुक्रमें परिभ्रमण करिताहेत. ज्याअर्थीं मूलतत्त्वेंच सदैव परिभ्रमण करीत आहेत, त्याअर्थीं मूलतत्त्वांच्या मिश्रणांत गारांप्रमाणें गोठून झालेले यावत् पदार्थमात्रही परिभ्रमणांत अखंडचे असलेच पाहिजेत. परिभ्रमण झालें ह्म० एक पदार्थाचा दुसऱ्यास स्पर्श अथवा धक्का लागलाच पाहिजे, धक्का लागला ह्म० एकाचा दुसऱ्यावर कांहीं तरी परिणाम घडलाच पाहिजे. परिणाम घडणें ह्म० एकमेकांच्या स्थूल अथवा अति सूक्ष्म अंशांचें परस्परांत मिश्रण होणें हें आहे. अत्तराच्या कुप्या ज्या पेटींत आहेत त्यांतच एक राकेल तेलाची शिशी भरून पेटी बंद केल्यास सर्व अत्तराची घाण होईल. कस्तूरीच्या पोत्यांत एक लशुनाची कांडी टाकल्यास सर्व कस्तूरीची माती समजा. आणि तीच थोडी काळी माती कस्तूरीच्या पोत्यांत घातल्यास कांहीं वेळानें मातीचे कण ओळखतां सुद्धां येणार नाहींत. असाच नियम सर्वदां सर्व पदार्थांस लागू समजावा. यावरून प्रत्येक पदार्थमात्र गतींत असून आपल्या आसमं-



[library stamp]

तातच्या पदार्थांस अति सूक्ष्म रीतीनें स्पर्श करीत ह्म० धक्का देत आहेत, व त्यामुळें प्रत्येकांचा कांहीं तरी अति सूक्ष्मांश परस्परांत मिश्रण पावत आहे. तसेंच न वापरतां उगीच ठेवलेले पदार्थ कांहीं कालानें जुने व निर्जीव होतात. व कांहीं पदार्थ चांगलेही होतात. यावरून पदार्थांतून कांहीं तरी अंश अमूर्तरूपानें बाहेर जात आहे, व कांहीं तरी आंत येत आहे ही गोष्ट सिद्ध झाली. अर्थात् प्रत्येक पदार्थ सजीव निर्जीव कसाही असो, तो वेगांत असून कांहीं तरी आपला अंश दुसऱ्यास देण्या घेण्याची ' क्रिया ' सहज व स्वाभाविक करीत आहे; अथवा त्याजकडून घडत आहे. त्यामुळें एकाचा दुसऱ्यावर बरा वाईट परिणामही घडत आहे. स्थूल परिणाम घडतात ते लागलेच समजतात, आणि सूक्ष्म घडतात ते अज्ञात राहतात; अथवा कालेंकरून समजतात. आपल्यास न समजल्यानें घडणारे परिणाम बंद राहतात असें नाहीं; ते परस्पर घडावयाचेच.

अशा या परस्परांच्या परस्परांवर घडणाऱ्या परिणामाची जी ' **क्रिया** ' सहज आणि स्वाभाविक अखंड चालू आहे, त्यांत दोन प्रकारचा भेद आहे. एक ' **अहेतुक** ' घडणारी क्रिया, आणि दुसरी ' **सहेतुक** ' घडणारी क्रिया अशी आहे. गतीच्या प्रवाहांत जडचैतन्य सर्वच पदार्थ आहेत. त्यांतून अचेतन पदार्थांकडून जी क्रिया घडते ती स्वाभाविक व अहेतुक घडणारी असते. कारण जड पदार्थांस ज्ञानाचा अभाव असल्यानें त्यांच्या ठिकाणीं ' हेतु ' ह्म० इच्छा संभवत नाहीं. हेतुराहित्यानें जी क्रिया घडते ती सहज व स्वाभाविक जाणावी. सहज घडणाऱ्या क्रियेंत अनुकूलप्रतिकूलतेचा भेद नसतो, स्वाभाविक रीतीनें जें घडावयाचें असतें तें घडतें. सहेतुक क्रियेची तशी गोष्ट नाहीं. सजीव पदार्थ ह्म० ज्ञानगुणविशिष्ट जीव यांजकडून घडणारी क्रिया ' सहेतुक ' असते, ह्म० घडणाऱ्या क्रियेशीं जीवाच्या ' हेतूचा ' कांहीं तरी संबंध असतो. संबंध असणें ह्म० आपल्यावर दुसऱ्याकडून घडलेला कोणताही परिणाम, आणि आपल्याकडून दुसऱ्यावर घडलेला परिणाम, असें दोन्ही गोष्टींचें जीवांस ज्ञान असतें. ज्ञान असल्यानें जीवांकडून घडणाऱ्या क्रियेवर जीवांस कर्तृत्वभाव येतो ह्म० ' मी क्रियेचा कर्ता ' असें वाटतें. कर्तृत्वभाव

अंगीं येऊन केलेली जी क्रिया इलाच ' **कर्म** ' अशी संज्ञा आहे. क्रियेचा कर्तृत्वभाव येतांच माझ्या क्रियेचा दुसऱ्यावर परिणाम घडतो, आणि दुसऱ्याचे क्रियेचा मजवर परिणाम घडतो, असा भेद प्रतीत होऊं लागला. भेदप्रतीति येतांच अनुकूलप्रतिकूल ज्ञान होऊं लागलें. हें ज्ञान होतांच क्रियेंतही अनुकूल प्रतिकूलतेचा भेद येऊन तशी क्रिया घडूं लागली. ती तशी घडूं लागतांच विधिनिषेध उभा राहिला. आपल्यास अनुकूल तो **विधि** आणि आपल्यास प्रतिकूल तो **निषेध** असें वाटूं लागलें. असें हें अनुकूल प्रतिकूल अथवा विधिनिषेधज्ञान जीवमात्रांस येतांच आपल्यास अनुकूल जी क्रिया ती करावयाची व आपल्यास प्रतिकूल जी क्रिया ती करावयाची नाहीं. तसेंच दुसऱ्याकडून आपल्यावर घडलेली क्रिया आपल्यास अनुकूल असल्यास सहन करावयाची ह्म० स्वीकारावयाची आणि आपल्यास प्रतिकूल असल्यास तिचा प्रतिकार करावयाचा. प्रतिकार करण्यांत तीन प्रकारचा भेद सहजच येतो. आपली शक्ति न्यून असल्यास आपल्यावर घडलेली क्रिया सहन करून प्रतिकाराची संधि पहाणें, आपल्यावर घडणारी जी क्रिया तिचा रोध करणें ह्म० तिचा परिणाम आपल्यावर न होऊं देणें, आणि आपल्यावर क्रियेचा आघात घडतांच लागलींच उलट आघात देणें, असा स्वाभाविक धर्म येतो.

असा त्रिविध भेद झाला. यांत सूक्ष्म विचार करा कीं जी क्रिया एकाकडून दुसऱ्यावर घडली ती अनुकूल अथवा प्रतिकूल कशीही असो, त्या क्रियेचा अनुकूल अथवा प्रतिकूल प्रतिकार दुसऱ्याकडून पहिल्यावर जो घडला, तो प्रतिकार उलट येण्यास पहिल्याची क्रिया कारण झाली. कारण एकानें क्रिया केली नसती तर दुसऱ्यास प्रतिक्रिया करण्याचें कारण नव्हतें. अर्थांत एकाकडून घडलेली जी 'क्रिया' तीच क्रिया प्रतिक्रियेच्या रूपानें दुसऱ्याच्या द्वारा परत आली. ह्म० आपलीच क्रिया आपल्यावर उलट घडली असें सिद्ध होतें. आणि आपण ' क्रिया न करतां दुसऱ्याकडून आपल्यावर क्रिया घडली तर त्याची प्रतिक्रिया करणें हें आपलें कर्तव्य ठरतें, तें आपण न केल्यास आपल्यावर उसनें राहतें. याप्रमाणें प्रत्येकाच्या क्रियेच्या आघाताची प्रतिक्रिया दुसऱ्याच्या द्वारा परत येणें ह्म० ज्याचीच क्रिया त्याच्या-

वर घडते असेंच ह्मणावें लागतें. आणि प्रथम जी क्रिया घडते ती पुन्हां परत ज्या स्वरूपानें येते तें स्वरूप त्या क्रियेचें अथवा कर्माचें 'फल' असें ह्मटलें जातें. आणि या फलासच 'भोग' अशी संज्ञा आहे. हा भोग वर सांगितलेल्या त्रिविध भेदांनींच येतो. तो आल्यावर जसा क्रियेवर 'कर्तृत्वभाव' येऊन क्रिया घडते तशीच फलरूपानें परत आलेल्या क्रियेस स्वीकारण्याचा 'भोक्तृत्वभावही' येतो. आणि फलानुरूप भोग घ्यावा लागतो. हा भोग आपल्याच क्रियेच्या प्रतिक्रियारूपानें आला आहे. असें ज्ञान न होतां एकमेकांनीं क्रिया प्रतिक्रिया चालू केल्यानें 'प्रियद्वेष्ट' भाव उत्पन्न झाला. अनुकूल प्रतिक्रिया करणारा 'प्रिय' झाला, आणि प्रतिकूल प्रतिक्रिया करणारा 'द्वेष्य' झाला. असें द्वंद्व होतांच द्वंद्वक्रियेंतही वेग वाढला. आणि क्रिया ह्म० 'कर्म' व प्रतिक्रिया ह्म० 'फल' अशी आघातपरंपरा सुरू झाली. जडांत अज्ञातपणा आणि चेतन ह्म० जीवास ज्ञातपणा इतकाच भेद राहून मंडलाकार धाराप्रवाह सुरू झाला. या प्रवाहाच्या आघातानें मायेच्या शक्तीच्या प्रवाहांत वेग भरला जातो. आणि त्या वेगानें मायाप्रवाहांत असलेल्या जडचैतन्य पदार्थांत 'सहेतुक व अहेतुक' रूपाचा आघात सुरू होतो. आतां मायेच्या आघातप्रवाहदृष्टीनें पाहूं लागल्यास त्यांत पदार्थाच्या सहजक्रियेच्या आघातानें वेग भरला जातो. आणि पदार्थाच्या सहजक्रियाप्रवाहाकडे वाहूं लागल्यास मायाप्रवाहाच्या आघातानें यांत गति आलेली दिसते. कोणाच्या आघातानें कोणांत गति आली आहे, याचा थांग लागणें अशक्य झालें आहे. 'पदार्थ' अक्रिय झालेले क्षणभर जरी थांबतील तरी मायाप्रवाहानें त्यांत गति आली असें ह्मणतां येईल अथवा मायाप्रवाह क्षणभर थांबेल तर पदार्थ त्यांत आघातानें गति उत्पन्न करतात असें ह्मणतां येईल. पण दोघांच्याही गति थांबत नसल्यानें निर्णय होऊं शकत नाहीं.

झोंपाळ्यावर झुलत असलेल्या माणसाकडे पाहून विचार करा कीं, झोंपाळा झुलत आहे कीं माणूस झुलत आहे, झोंपाळा झुलतो ह्मटल्यास माणूस आपल्या पायानें त्यांत वेग आणीत आहे. माणूस झुलतो ह्मटल्यास झोंपाळ्यावांचून माणसास झुलतां येत नाहीं. माण-

सांत झुलण्याचा वेग झोंपाळ्यानें आणला आहे, आणि झोंपाळ्यांत वेग माणसानें आणिला आहे. असा परस्परांचा वेग परस्परांत भरला असल्यानें झुलणारानें अंमळ पाय वर उचलले तरी वेग भरला असल्यानें झोंपाळा थांबत नाहीं. यामुळें झोंपाळा झुलतो असें वाटतें. झोंपाळ्याचा वेग अगदीं शांत होईपर्यंत बसणारा पाय न हालविल तर झोंका अगदीं बंद होईल. पण झोंपाळ्यांत पुष्कळ झुलणार बसून सारखा झोंका घेत असल्यास एकाच्या पाय थांबविण्यानें काय होणार? अनेक नादी झोंपाळूंच्या पायानें जसा झोंपाळ्यांत वरच्यावर वेग भरला जात आहे, तसा **मायाचक्रास** आघात देणारा एक पदार्थ अथवा एक जीव असता तर एकाचा आघात थांबल्यानें मायाप्रवाह थांबला असता. मायाप्रवाहांत असंख्य पदार्थ व जीव हे 'अहेतुक' व 'सहेतुक' क्रियेच्या आघाताचा वेग सारखा भरत असल्यानें हें **सृष्टिचक्र** अनादि अनंत कालापासून चाललें आहे. सृष्टींतील भोग्यविषय ह्म० यावत् पदार्थ मात्र जे आहेत ते जीवाच्या 'कर्म' रूप ह्म० 'क्रिया' रूप आघाताच्या उलट 'प्रतिक्रिया' ह्म० 'फल' रूपानें जीवाला भोगावयास मिळत आहेत, ह्म० यावत् भोग, जीवांच्या क्रियाप्रतिक्रियारूप आहेत, ह्म० जीवांच्या कर्माचें जें 'फल' हेंच भोग्य पदार्थ आहेत. अर्थात जीवांच्या 'कर्मांनीं भोग्य पदार्थ निर्माण झाले असेंच म्हणावें लागतें. प्रत्येक जीवाकडून जशी भिन्न स्वभावानुरूप भिन्न क्रिया घडूं लागली, त्या क्रियेनुरूप भिन्न प्रतिक्रियारूपानें 'फलें' भोगावयास मिळूं लागलीं. आणि स्वतःचे भोगापेक्षां इतरांच्या भोगांत आधिक्य दिसूं लागतांच ईर्षा उत्पन्न होऊन अधिक फलांच्या अभिलाषानें क्रियेंतही अधिक कर्तृत्वभाव वाढला आणि क्रियेनुरूप 'फल' व फलानुरूप 'क्रिया' अशी गच्च शृंखला पडली. ही शृंखला पडतांच अमुक क्रियेचें अमुक 'फल' आणि अमुक फलाकरितां अमुक 'क्रिया' असा नियम सहजच व्यक्त होऊं लागला. हा नियम व्यक्त होतांच नियमानुरूप उद्दिष्ट फलप्राप्त्यर्थ क्रिया करण्याची जीवांची प्रवृत्ति होऊं लागली. नियमानुरूप क्रिया घडतांच ठराविक फळें मिळूं लागलीं. असा भोग्य विषयांचा आणि भोगभोक्ते जीवांचा 'भोग्यभोक्ते 'प-

णाचा संबंध झाला. हा संबंध जुळतांच भोगार्थ ‘ कर्म ’ आणि कर्मार्थ ‘ भोग ’ असें मालाकार परिभ्रमण सुरू झालें. या परिभ्रमणानें मागें सांगितल्याप्रमाणें ह्म० जसें पदार्थांतून कांहीं तरी मूर्त अमूर्त जात येत असतें, तसें भोग्य विषयाचे अंश भोक्त्यांत प्रवेश करून पदार्थ क्षीण होऊं लागले; आणि भोक्ते जीव भोगासक्तीनें अतृप्त राहून भोग्य विषयांच्या पुष्ट्यर्थ त्यांत कर्माची भर घालूं लागले. पण कालेंकरून आपणच क्षीण होऊं लागले, तेव्हां आपल्या पुष्ट्यर्थ कर्म करूं लागले. मग जों जों आपण शक्तिमान् होत चालले तों तों क्रियेंतही अधिक शक्ति येऊं लागली, क्रियेंत अधिक शक्ति येतांच त्यांचीं फलेंही अधिकाधिक जोरदार पुष्ट होऊन भोक्त्यांस जास्त असंतुष्ट करूं लागलीं. अशा ह्या सर्वांच्या परस्पर अति उत्कट चढाओढीचा परिणाम काय झाला? तर ‘ अखिल सृष्टि ’ **कर्मप्रधान** होऊन बसली. अर्थात् भोग्य **विषय**, भोगसाधन **इंद्रियें** आणि भोक्ते **जीव** अशी त्रिपुटी केवळ **कर्ममूल** झाली. आणि अखिल जीवमात्रांच्या कर्माचा प्रवाह अखंड मंडलाकार सुरू झाला.

# क्रियेच्या मंडलाकार प्रवाहाची सिद्धि.

‘ मंडलाकार प्रवाह ’ तुह्मी जागोजागीं स्थापन करतां तो कां? सरळ नदीसारखा वाहता प्रवाह ह्मणण्यांत अडचण काय? अशी शंका कोणीं केल्यास त्याचें उत्तर असें कीं, सरळ वाहत्या प्रवाहाच्या कांठीं बसून एकादी हलकी वस्तू वाहती सोडल्यास तिची आपली पुन्हां गांठ पडत नाहीं. असा सरळ प्रवाहाचा नियम आहे. आणि दिसतांना तर सरळ प्रवाह दिसतो, पण टाकलेली वस्तू दुसऱ्या बाजूनें पुन्हां आपली आपल्याजवळ येते; यावरून जो प्रवाह आपल्यास समोर वाहता दिसतो तो पुन्हां आपल्या पाठीशीं येऊन पुढल्या प्रवाहास ढकलतो. अर्थात तो सर्व प्रवाह एकच असून मंडलाकार फिरत आहे असेंच सिद्ध होतें. प्रवाहांत सांपडलेल्या पदार्थांत जे लघु ह्म० निर्जीव असतात ते प्रवाहास अनुकूल राहून तर-

गत जातात, आणि जे गुरु म्ह० वजनदार असतात ते प्रवाहाच्या वेगानें थांबूं शकत तर नाहींतच, पण वजनाच्या भारानें तळाशीं जातात आणि वेगाच्या आघातानें स्वतःभोंवतीं लुडकणें आणि प्रवाहांत वाहणें असे दुहेरी परिभ्रमणांत सांपडतात. सृष्टींतील यावत् पदार्थमात्र दुहेरी परिभ्रमणांत आहेत. एक तर मायामहाशक्तीचा प्रवाह चालूंच आहे. ती प्रचंड गति सर्वांस एका ठराविक गतीनें भ्रमण करवीत आहे. तें तिच्या प्रदक्षिणेचें एक वृत्त 'सृष्ट्युत्पत्ति स्थिति लय'रूप आहे. त्या प्रवाहाच्या अंतर्गत जडचेतन पदार्थांनीं व जीवांनीं 'सहेतुक व अहेतुक' क्रिया आपल्याकडे ओढल्यानें स्वतःच्या भोंवतीं लुडकण्याचीं प्रत्येकाचीं भिन्नभिन्न वृत्तें आपलीं आपणच बांधून घेऊन आपल्यास दुहेरी परिभ्रमणांत पाडून घेतलें आहे. त्यांत निर्जीव पदार्थ तर वर तरंगत फिरत जातात. त्यांची क्रिया 'हेतुरहित' स्वाभाविक असल्यानें क्रियेवर कर्तृत्वभाव येत नाहीं आणि कर्तृत्वभावावांचून भोक्तृत्वभाव येत नाहीं, यामुळें ते सहजावस्थेंत राहतात. जीवाच्या ठिकाणीं 'अहं'-पणाचें 'गुरुत्व' असल्यानें प्रवाहाच्या तळाशीं जाऊन, स्वाभाविक क्रियेवर कर्तृत्वभाव धरला आणि प्रतिक्रियारूप फलांवर भोक्तृत्वभाव आणिला व स्वतःच्याभोंवतीं परिभ्रमणाचें वेगळें वृत्त कायम करून घेऊन दुहेरी लडकूं लागलें. जसें फार मोठ्या चक्राशीं अति लहान चक्राच्या गतीचा संबंध जोडल्यास मोठ्या चक्राच्या एका फेऱ्यांत लहान चक्राचे पुष्कळच फेरे होतात, तसें 'मायामहाचक्राशीं' जीवांची अति सूक्ष्म चक्रांची गति जोडली आहे. त्यामुळें परस्परांचीं चक्रें फिरल्यानें परस्परांत अकुंठित गति आली आहे. मायाचक्राच्या एका फेऱ्यांत जशी सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाची एक प्रदक्षिणा होते, तशा त्या एका फेऱ्यांत जीवांच्या उत्पत्तिस्थितिलयाच्या नकळे किती अनंत प्रदक्षणा होत असतील, याचें अनुमान सुद्धां करतां येणार नाहीं. यांत चक्राच्या परस्पर गतीचा अभिन्न संबंध सारखा चालू असल्यानें मोठ्या चक्राच्या गतीची एक प्रदक्षणा व सूक्ष्म चक्रांच्या गतींच्या अनंत प्रदक्षणा, असा तर भेद दिसतो; पण कोणतें चक्र कोणांत गति भरतें, याचा थांगच लागत नाहीं. आणि

थांग लागावा ह्मणून जो कोणी जी क्रिया करतो ती क्रिया त्या वेगाच्याच अधिक भरतीला कारण होते. जसें लांकडी तक्तपोशीछतावर धांवूं लागल्यास दण–दण असा नाद निघूं लागतो, त्या नादाच्या शोधार्थ चहूंकडे जितकें अधिक धांवाल तितका शोध न लागतां नादच अधिक वाढेल. स्वस्थ उभें राहून व आधाराकडे पाहून विचार कराल तेव्हांच हें कळेल कीं, माझ्या पायांच्या आघातानें हा दणका निघतो. मग पाऊलच पुढें न टाकिल्यास नाद कोठून निघेल? तसें मायेचें महाचक्र व जीवांचें सूक्ष्म चक्र अशीं दोन्ही क्रियारूप आघातानें चालू आहेत. यांत कोण कोणावर आघाताची क्रिया करीत आहे हें शोधण्यांत जी क्रिया कराल ती आघातरूप होऊन अधिक परिभ्रमणासच कारण होईल. आणि शोधक स्वतः ‘ अक्रिय ’ होऊन स्वस्थ बसला तर त्याच क्षणीं थांग लागेल कीं, कोण कोणावर आघात करीत आहे, आणि कोणाच्या आघातानें कोणांत गति येत आहे. मग अनंत जीव आघातरूप क्रिया करणारे आहेत, आणि त्यांच्याच प्रतिक्रियारूप ‘ फलभोगार्थ ’ ही प्रचंड सृष्टि त्यांनींच उभी केली आहे. अर्थात् **कर्मप्रधान सृष्टि** आहे असेंच कबूल करावें लागेल, आणि हाच श्रुतीचा सिद्धांत आहे.

---

# जीवाचा ईश्वराशीं संबंध.

या स्थलीं सुज्ञ वाचकांनीं अव्यक्तबोधांतील **जीवनराव** आणि **माधवराव** यांचा दुसरा संवाद जो कारणविचारप्रकरणांत झाला आहे, तो पूर्णपणें ध्यानीं आणावा, ह्म० येथील सर्व गोष्ट उत्तम प्रकारें गळीं उतरेल. सारांश, अखिल **सृष्टि** ‘ कर्मप्रधान झाली. ’ **कर्म** ह्म० अहेतुक अथवा सहेतुक घडणारी क्रिया असें सिद्ध झालें आहे. तथापि अहेतुक क्रिया कर्तृत्वभावावांचून घडते, त्यामुळें प्रतिक्रियारूप फल जें परत येतें त्यावर भोक्तृत्वभाव येत नाहीं. कर्तृत्वभोक्तृत्वभावावांचून घडलेली क्रिया भेदभावास कारण होत नाहीं. भेदभावावांचून अनुकूल प्रतिकूलता प्रियद्वेष्यभावादि वर सांगितलेली परंपरा चालू

होत नाहीं. ह्मणून अहेतुक घडणारी क्रिया अक्रियेसारखीच राहते, ह्म० तिच्यापासून क्रिया प्रतिक्रियारूप चढाओढी होत नाहींत. त्यामुळें ती क्रिया एक दुसऱ्याच्या स्पर्शास्पर्शरूप आघातास निमित्त होते असें दिसतें; पण तें दिसणें उगीच आहे. कारण त्यास स्वतः प्रवृत्ति अथवा निवृत्ति नसते. दुसऱ्याच्या प्रेरणेनें त्यांची प्रवृत्ति होते. आतां सचेतनाकडून प्रवृत्ति होत नसती तर अचेतन स्वतः प्रवृत्त होतात असें ह्मटलें असतें; पण चेतनाकडून आघात बसल्यावांचून अचेतन प्रवृत्त होत नाहीं असें मागें ईश्वरप्रकरणांत* सिद्ध झालें आहे, हें लक्षांत आणावें. अर्थांत चेतन व अचेतनाची प्रवृत्ति व निवृत्ति केवळ चेतनाकडूनच होते. ह्म० अहेतुक क्रिया घडण्याचा आघात जडाकडून देवविण्यास सहेतुक क्रिया करणारे जीवच कारण झाले. आणि सहेतुक क्रियाभिमानाप्रमाणें अहेतुक क्रियेचा आणि ती क्रिया करणाऱ्या जड पदार्थांचा आणखी अभिमान आपल्याच डोक्यावर ओढून घेतला. कर्तृत्वाभिमान ओढून घेतांच भोक्तृत्वाभिमान आला. त्यामुळें झालें काय कीं, यावत् जड पदार्थरूप भोग्य विषय जीवांच्या ताब्यांत येऊन भोग्य सृष्टीचे भोक्ते जीव झाले. उदाहरण, बागेंतील झाडें स्वाभाविक धर्मानें वृद्धि पावतात. पण झाडें लावणारा मीं झाडें वाढविलीं असें ह्मणतो. ह्म० त्याच्या अहेतुकी वृद्धीच्या क्रियेचा अभिमान जीवांनीं ओढून घेतला. पुढें फळें आलीं अथवा झाडें मेलीं तर हा लावणारा सुखी दुःखी होतो, ह्म० भोक्तृत्वाभिमान धरतो. सारांश, सचेतन अचेतनाकडून घडणाऱ्या सहेतुक अहेतुक क्रियेचा कर्ता भोक्ता ' जीव ' आहे हें सिद्ध झालें.

जीवाच्या हातून जी स्वाभाविक क्रिया ह्म० कर्म घडत आहे त्याचे पुष्कळ भेद आहेत. पण मुख्यतः दोन भेद आहेत. एक मानसिक क्रिया व दुसरी शारीरिक क्रिया अशी आहे. मानसिक क्रियेच्या प्रेरणेवांचून शारीरिक क्रिया घडत नाहीं, व मानसिक क्रिया घडण्यास शारीरिक क्रियेचें साहाय्य लागत नाहीं. ह्मणून मानसिक कर्म स्वतंत्र व श्रेष्ठ आहे. शारीरिक क्रियेस मुख्य साधनें इंद्रिया-

* पंचमहाभूतांच्या जडांशांत व्यापक चेतनांशाकडून प्रवृत्तीची सिद्धि ७९ ते ८३ पृष्ठांत झाली आहे ती पहावी.

दिक आहेत. व मानसिक क्रियेंत मुख्य साधन विचारशक्ति आहे. विचारशक्तींत जसा विचाराचा उदय होतो, त्याचा आघात ज्या ज्या इंद्रियांवर बसतो तीं इंद्रियें उद्दिष्ट कार्यांत प्रवृत्त होतात आणि जो विषय परत आणतात त्याचा भोग होतो. त्या भोगाचा संस्कार ह्म० स्मृति ही विचारशक्तींत गढून बसते आणि या स्मृतीच्या आघातानेंच पुन्हां विचारशक्तींत विचाराचा उदय होतो. असें हें चक्र सुरू होतें. यांत अति सूक्ष्म विचार करून पहा ह्म० कळेल कीं, ज्या कालीं ज्या विषयासंबंधीं विचार चालू असतात ते विचार पुढें मांडल्यासारखे वाटतात. आणि ज्या गोष्टींची जेव्हां स्मृति होते तो स्मृतिरूप विचार पाठीमागून आल्यासारखा वाटतो. आणि कांहीं गोष्ट मुद्दाम आठवावी लागते, तेव्हां आपल्यास मागें मागेंच विचाररूप स्मृतिसमूह चाळवीत चाळवीत उद्दिष्ट गोष्ट शोधून आठवून काढावी लागते. अर्थात् जसें शारीरिकक्रियेंत भूतभविष्यवर्तमानकालानें संचित क्रियमाण असा प्रालब्धभेद येतो आणि मालाकार भ्रमण होतें, तसेंच मानसिकक्रियेचेंही त्रिविध भेदानें मालाकार परिभ्रमण होतें. मानसिकभ्रमणाचें चक्र आंत असतें व शारीरिकक्रियेचें स्थूल चक्र बाहेर असतें. आंतील चक्राच्या आघातावांचून बाहेरचें चक्र फिरत नाहीं. अंतःप्रेरणेनेंच बहिःक्रिया घडते, व बहिःक्रियेचे संस्कार व अंतःक्रियेचे संस्कार सर्व एकंदर विचारशक्तींत भरले असतात. ते ते कालानुरूप उदय पावून पुढें प्रवृत्त होतात, व तदनुकूल क्रिया घडूं लागते. क्रियेचे ‘ संस्कार ’ व संस्कारानुरूप ‘ क्रिया ’ अशी परंपरा विचारशक्तींत नेहमीं चालू असते. आणि फलभोगार्थ हा जीव स्वकर्मानुरूप देहांतरें व लोकांतरें करीत अखंड परिभ्रमण करीत असतो. देशांतरीं व लोकांतरीं अनेक जीवांच्या अनेक कर्मानुसार अनेक प्रकारचे न्यूनाधिक भोग पाहून अथवा ऐकून याची भोगवासना अधिकाधिक प्रबल होते. त्यामुळें दुसऱ्याविषयीं ईर्षा उत्पन्न होते. ईर्षा झाली ह्म० दुसऱ्याचें अधिक भोगैश्वर्य मला मिळावें या हेतूनें दुसऱ्यास प्रतिकूल होय अशी क्रिया करूं लागतो. दुसरा न्यूनबल असल्यास त्याचा भोग हिरावून घेतो. पण पुन्हां दुसरा कोणी माझेपासून हिरावून घेईल काय ? अशा वि-

वंचनेंत पडतो. आणि दुसरा अधिक बलवान् असल्यास तो याचा प्रतिकार करतो. सारांश जीवांनीं सहेतुक क्रिया करण्यास आरंभ करतांच—निजपरभाव, हर्षामर्ष, रागद्वेष, ईर्षा इ० द्वंद्वें उभीं राहून सर्व सृष्टि कलहरूप झाली. याचें मूलकारण नीट शोधल्यास हेंच सांपडेल कीं माझीच केलेली क्रिया मला प्रतिक्रियारूपानें फलद्रूप होते, असें प्रत्येक जीवांस भान राहिलें असतें तर दुसऱ्यावर रागद्वेष करण्याचें कारण नव्हतें. आपल्या दांतांनीं आपली जिव्हा चावली गेल्यास राग कोणावर करणार, समाधानच मानावें लागतें. आणि तीच जिव्हा दुसऱ्याच्या धक्यानें दबल्यास मग पहा कशी स्थिति होते ती ! पण सर्व जीवांस आपल्या कृत कर्माची विस्मृति पडून ज्या जीवांच्या द्वारा प्रतिक्रिया 'फल' रूपांनीं परत येऊं लागली त्याविषयींच प्रियद्वेषबुद्धि उत्पन्न होऊन ती पुढें वाढत चालली. असें हें विपरीत व्यापाराचें जें स्वरूप हेंच जीवाश्रित अज्ञान होय.

या अज्ञानांत हा जीव व्यामोहित होतांच स्वाधीन होता तो परतंत्र झाला. आणि आपलीं कृत कर्में विसरल्यावर माझ्या कर्मानुरूप मी फलें भोगतों, हें विसरलेंच पाहिजे. पण जीव जरी आपल्या कर्मास विसरला ह्मणून त्याचीं कर्में व फलें त्यास सोडीत नाहींत, व तो जेथें असेल तेथें नेमकीं पोंचून भोग दिल्यावांचून रहात नाहींत. आणि हा जीव हें विसरल्यानें अन्य जीवांविषयीं रागद्वेषाभिनिवेश करूं लागला. अशी यावत् सृष्टींतील जीवांत द्वंद्ववृद्धि होऊन तदनुरूप क्रियावृद्धिही होत चालली. त्यामुळें सर्व जीवांस असमाधान वाटून जिकडे तिकडे शत्रुमित्रभाव वाढत चालले आणि अराजकी प्रजेप्रमाणें सृष्टींतील शांतता व सुरक्षितपणा नष्ट होण्याची पाळी आली. कां सुज्ञ वाचकांनो ? रागद्वेषानें शत्रुमित्रभावाचे दोन पक्ष प्रबल होऊन कलह माजतांच तटस्थ लक्षणी अशा तिसऱ्याचें काम आतां आलेंना ! अव्यक्तबोधांतील तटस्थ लक्षण न्यायकोटींची रचना येथें सर्व ध्यानांत आणा. त्याचें हें स्थल आहे. सृष्टीची त्रिकालांत कधींच अव्यवस्था न व्हावी ह्मणून जीवाच्या संकल्पानुरूप तटस्थ लक्षणीं जगन्नियामकत्वाभिमानी, सच्चिदानंदघन विरा-

टात्मा अहेतुकत्वानें आपले स्वरूपभूत अनंत सूक्ष्म जीवांचें त्यांच्या कर्मानुरूप सुव्यवस्थितपणें अखंड नियमन करीत आहे; त्यामुळें ईश्वराचा व जीवाचा पोष्यपोषक, उपास्यउपासक आणि नियम्यनियामकभावसंबंध कायमचा जडला आहे.

---

## विधात्याचा प्रादुर्भाव.

परमात्मा विराट ईश्वरानें सृष्टिनियमन करणें ह्म० एकाद्या राजाप्रमाणें लढाया जिंकून शत्रूचा पराभव करून राज्यव्यवस्था लावित बसण्यासारखें नव्हे. त्यानें नियमन करणें ह्म० सृष्टीकडे एकवार ईक्षण ह्म० विचारपूर्वक अवलोकन करणें हेंच होय. कारण परमात्मस्वरूपसिंधूंत सृष्टि ही तुषाराप्रमाणें देखील नाहीं. तेव्हां तिच्या नियमनार्थ ईक्षणसुद्धां अधिक आहे. तें ईक्षण स्फुरतां बरोबर सृष्टिनियमनार्थ परमात्म्याच्या अंशविभूती व्यक्त झाल्या. व त्यांनीं ईशसंकेताच्या हेतूस जाणून आपापल्या नियमानुरूप अधिकारारूढ होऊन 'सृष्ट्युत्पत्ति, स्थिति, लय' इत्यादि कार्यांत प्रवृत्त झाल्या. सृष्टींतील अखिल जीवमात्रांत, परमात्मा सर्वांतरात्मत्वानें सारखा भरला आहे. त्यांत यत्किंचितही न्यून नाहीं. पण शरीरेंद्रियादिक उपाधी आपापल्या कर्मानुसार प्राप्त होत असल्यानें देव, मनुष्य, तिर्यगादि भेद झाला आहे. या सर्व जीवांत आद्य जीव भगवान् पितामह ब्रह्मदेव हा आहे. आणि या अधिकारापर्यंतच कर्मफलप्राप्तीची ठेप आहे. यापुढें कर्मांची गति नाहीं. अशा विधात्याच्या ब्रह्मलोकीं दिव्यैश्वर्य भोगानेंही जर जीवाची वासना तृप्त न झाली व विषयाचा कंटाळा न आला तर त्याच्या वासनेची कमाल होऊन तो अधःपातासच योग्य होईल. पण तें स्थल तसें नव्हे. तेथें जातांच सर्व वासना शांत होतात व कैवल्यपदप्राप्तीची इच्छा होऊन तो जीव कल्पांतीं परमात्मस्वरूपीं लीन होतो. मग त्यास पुनरावर्तन नाहीं. भगवान् जगत्पालक महाविष्णु आणि भगवान् जगत्संहारक श्रीसदाशिव ह्या उभय विभूती विराटात्म्याच्या स्वतंत्र इच्छानि-

र्मित आहेत. यांचे अधिकार कर्मनिर्मित नसल्यानें हीं पदें जीवांस प्राप्त करून घेतां येत नाहींत. अशा ' त्रिमूर्ति त्रिगुणप्रधान ' होऊन विराटात्म्याच्या प्रेरणाज्ञेनुरूप जगाचें नियमन करूं लागल्या. असो.

अगाधात्मानंदसिंधूंत **भगवान्** अनंतशयनाच्या मायासंवलित नाभिबिंदूपासून ' जगत्कर्तृत्वाहंकार ' रूप कमलाचें उत्थान होऊन त्यांत ' रजोगुणक्रियाशक्तिप्रधान ' भगवान् **पितामहाची** विभूति प्रादुर्भूत झाली. उत्पन्न होतांच ' अज्ञान ' यावयाचेंच व तें पुढें विचारशक्तीच्या उदयानें निवृत्त व्हावयाचें हा सिद्धांत आहे. त्याप्रमाणें भगवान् पितामह क्रियाशक्तिसंपन्न तर झाला, पण ' कर्तव्य ' काय याचा बोध होईना. सर्व सृष्टि अव्यक्त असल्यानें कोठें कांहींच दिसेना. केवळ स्वतःची मात्र प्रतीति होऊन स्वातिरिक्त सर्व शून्यरूप भासूं लागलें. मी किमर्थ निर्माण झालों, मला कोणीं निर्माण केलें आणि माझें पुढें कर्तव्य काय ? या कल्पनेचा उदय होईना. तेव्हां स्वस्वरूपातिरिक्त भासत असलेलें जें ' शून्य ' त्या शून्यांतच कल्पनेचा रोध करून शून्यशोधनांत निमग्न झाला. तेथें शून्यस्थितीचाच आनंद अनंतकाल उपभोग घेता झाला. असें जें ' आनंदाचें शून्य ' तोच **परमात्मबिंदु** आणि या बिंदूचा जो भोग हेंच महा ' परम तप ' आहे. असें हें विधात्याचें अगणित काल तप सिद्ध होतांच हृदयाकाशांत दिव्य प्रकाश होऊन त्यांत तेजोमय दैदीप्यमान ' प्रणवाकृति ' झळकून त्या आकृतींतूनच ॐ हा ध्वनि व्यक्त झाला. असा त्या विराटात्म्याचा महा**प्रसाद** विधात्याच्या हृदयमंदिरीं होतांच दिव्य ज्ञानाचा उदय झाला. मागल्या कल्पांतील अखिल चराचरात्मक सृष्टीचें प्रत्यक्ष दर्शन त्या तेजोमय प्रणवांत झालें. मग त्या संस्कारानुरूप एकदम सर्व सृष्टि प्रगट केली. एखाद्या पेटींत कांहीं अमूल्य पदार्थ ठेविलेले असून तिचें झांकण उघडतांच जसे ते सर्व दिसतात, त्याप्रमाणेंच विधात्यास प्रणवोपदेश होतांच त्यांत सर्व सृष्टि यथास्थित दिसूं लागली.

**टीप**—ज्या प्रणवरूप पेटींत विधात्यास सर्व सृष्टि दिसली, तो अद्भुत व अपूर्व खेळ प्रत्यक्ष दाखविण्याची ' ब्रह्मांडपेटी ' आह्मीं त-

यार केली आहे. तिची जास्त सुधारणा करीत आहोंत. पण ती स-र्वांस घेणें सुलभ होणार नाहीं. ह्मणून दुसरी ' ब्रह्मांडपुडी ' तयार केली आहे. ह्म० सर्व सृष्टि एका पुडींत बांधली आहे, असें प्रत्येक विचारवानास प्रत्यक्ष दिसणार आहे. तिच्या व्याख्येचें लहानसें पु-स्तक व पुडी तयार आहे. किं० २ रु. हून अधिक होणार नाहीं. परंतु हजार वर्गणीदार जमल्यावांचून तिची प्रसिद्धी करतां येत नाहीं. काशीचे मोठमोठे संस्कृत व इंग्रजी विद्वान् व्याख्यानपूर्वक पुडीचा चमत्कार पाहून थक्क झाले आहेत व सन्मानपत्रें दिलीं आहेत. ही पेटी व पुडी कोणा पाश्चात्यानें काढली असती तर सर्व जग ढव-ळलें असतें. पण तितकें भाग्यानुकूल्य आह्मां भारतीयांस प्रस्तुत नाहीं. असो.

---

## श्रुतीची अपौरुषेयता, स्वयंसिद्धता व ज्ञानरूपता.

ह्या कालापर्यंत विधात्याचें स्वरूप तेजोमय अमूर्त होतें. आणि मनोव्यापारही शून्यशोधनांत निमग्न असल्यानें शब्दाचा व्यापार न-व्हता. पण हृदयाकाशांत विराटात्म्याचा प्रणवोपदेशप्रसाद होतांच त्या ॐकाराच्या व्यापक ध्वनींतून, वाणीनें होणारा अखिल शब्द व्यापाररूप विराटात्म्याची अहेतुकी, तटस्थ लक्षणी, स्वरवर्णसंयु-क्त, अर्थगांभीर्यप्रपूरित, महा गूढ अशी साक्षात् **वेदवाणी** व्यक्त झाली. ती विधात्यानें ऐकतांच त्याची बुद्धि त्रिकालज्ञानसंपन्न हो-ऊन सृष्टिकार्यार्थ सज्ज झाली. ही ज्ञानभांडाररूप वाणी प्रण-वांतून व्यक्त झालेली विधात्यानें श्रवण केली ह्मणून तिला **श्रुति** असें त्यानें नांव दिलें. पुढें ती विधात्याच्या मुखानें सनकसनंदनादि ब्रह्म-मानसपुत्रांस प्राप्त होऊन परंपरेनें क्रमशः सर्व सृष्टींत पसरली. यांत सृष्ट्युत्पत्तिस्थितिलयाचा सर्व क्रम, धर्मकर्मवर्णाश्रमव्यवस्था, क-र्मानुरूप मिळणारीं फलें व फलेच्छेनें करावयाचीं कर्में, त्यांचे वि-धिनिषेध, स्वर्गनरकादिभोगरचना, तेथें जाण्याचे मार्ग इ० सर्व सृष्टि-व्यापाराचे अप्रतिहत, अखंडित, अमोघ, असे नियम व्यक्त झाले.

आणि जीवांनीं केवळ विषयासक्तीनें ह्या भवचक्रांतच निमग्न न राहतां अखंडैश्वर्यपदप्राप्त्यर्थ आणि कैवल्यरूप होण्याकरितां अत्यंत दयार्द्र अंतःकरणानें श्रुतीनें मोक्षमार्गोपदेशही केला आहे. अशी ही ईश्वराची वेदवाणी सर्वगुणसंपन्न आहे. यांत भ्रमाचा अथवा अन्यथा लेश सुद्धां नाहीं. केवळ जीवाचे कल्याणार्थच इची प्रवृत्ति आहे, **वेद** हे केवळ मंत्रराशी आहेत आणि अनंत आहेत. यांचा कधींही कोणास अंत लागला नाहीं. जशी नवरत्नांची पर्वतप्राय मोठी राशी सांपडल्यास कुशल बुद्धिमान् त्यांतून रत्नें निवडून घेऊन, सुंदर आभूषणें करतांना जशी रत्नांची ठिकठिकाणीं जडणी करतात, त्याप्रमाणें अनंत वेदमंत्रराशींतून ज्या ज्या मंत्रांची ज्या कर्मप्रयोगांत जशी योजना पाहिजे ती सर्व व्यवस्था विधात्याच्या द्वारा प्रगट झाली. चतुर व्यवस्थापक, स्वामीच्या हेतूस पूर्ण ओळखूनच अबाधित व्यवस्था करितात. त्यांच्या योजनेंत स्वामींचा हेतु अगदीं अनुस्यूत असतो. त्यांत चूक कधीं पडावयाचीच नाहीं.

सर्वज्ञ विधात्यानें ईश्वरोपदेशानुरूप वैदिकी कर्मरचना अशी सुलभ व सुयंत्रित केली कीं, त्या कर्मानुष्ठानानें जी इच्छा असेल ती फलसिद्धि व्हावयाचीच. वर्णाश्रमाचाराचे जे जे अबाधित नियम सिद्ध झाले त्यांच्या आचरणानें तीं तीं ठराविक फलें मिळावयाचींच. तद्विरुद्ध स्वेच्छाचारानें वागणारास अनिष्ट फलरूप शासन व्हावयाचेंच. यावत् सृष्टींत, ' कर्म '—आणि कर्म ' फल ' व कर्मफलाचे द्योतक ' नियम ' अशी अभिन्नसंबद्ध शृंखला पडली. कर्मावांचून कोणतेंही फल त्रिकालांत व्हावयाचें नाहीं. आणि फलोद्देशावांचून कर्मांत त्रिकालांत प्रवृत्ति व्हावयाची नाहीं. आणि कोणत्या कर्माचें कोणतें फल व कोणत्या फलार्थ कोणतें कर्म या नियमाचा बोध श्रुतीवांचून त्रिकालांत होणें नाहीं. येथें सूक्ष्म विचार करा कीं, कर्मावांचून फल उत्पन्न होत नाहीं. व फलोद्देशावांचून कर्मांत प्रवृत्ति होत नाहीं, आणि कर्त्यावांचून कर्म होत नाहीं, व कर्मावांचून कर्ता होत नाहीं, व नियमावांचून कर्मफलसिद्धि होत नाहीं. असे एकमेकांवर एकमेक अवलंबून असल्यानें प्रथम कोण झाला याचा निर्णय कोणी करूं शकेल काय ? कधींच करतां येणार नाहीं. तेव्हां कर्मकर्ते **जीव**, कर्मानुरूप **फलें**,

आणि कर्मफलनियमबोधक श्रुति हे तिघेही अनादीच ह्मणावे लागतील. ज्या नियमांचा अर्थबोध ज्या वाक्यांत व शब्दांत भरला आहे तो ' अर्थ श्रुतिरूप ' होय. जसें, अर्थाचा बोध हृदयांत झाला असतां त्या बोधानुरूप कर्मांत प्रवृत्ति होतांना शब्दोच्चार न केला तरी क्रियेचें पर्यवसान फलांत होतें. व त्या फलाच्या अनुरोधानें पुन्हां कर्मांत प्रवृत्ति होते. यांत कर्मफलबोधक जो ' अर्थ ' त्याचा 'ज्ञानाशीं' संबंध आहे. अर्थात ज्ञानांत कर्मप्रवृत्ति व फलबोध या दोघांचाही समावेश असल्यानें **वेद** हे **ज्ञानरूप** ह्म० **ज्ञानमय** आहेत हें सिद्ध झालें. शब्दांनीं व्यक्त होणें अथवा न होणें यावर वेदांची उत्पत्ति अवलंबून नाहीं. आणि ज्या व्यक्तीच्या शब्दद्वारा ' वेद ' व्यक्त झाल्यासारखे दिसतील, त्या व्यक्तीकडे वेदकर्तृत्वभाव तर नाहींच, पण वक्तृत्वभाव सुद्धां येत नाहीं. कारण वक्त्याच्या इच्छेनें ते वदले जात नाहींत. ते स्वेच्छेनें प्रगट होऊं इच्छितात, तेव्हां वक्त्याच्या वाणीवर महाप्रसाद होऊन त्याची वाणी वेद उच्चारण्यास समर्थ होते ह्मणून ही विराटात्म्याची वेदवाणी स्वयंसिद्ध, स्वयंभू आणि स्वतःप्रमाण अपौरुषेय अशी आहे.

# प्रणवाची सर्वात्मकता व सर्वरूपता.

## ( वर्णमाला व संख्या. )

ही परमात्म्याची ज्ञानमय वेदवाणी ॐकारांतून शब्दरूपानें आणि अक्षररूपानें अभिव्यक्त झाली. त्यांत शब्दरूपानें ह्म० वाणीच्या उच्चाररूपानें प्रथम व्यक्त झाली. त्या शब्दोच्चारांचीं स्वरवर्णरूप मूलतत्त्वें ॐकाराच्या व्यापक बिंदुनादापासून कशीं उत्पन्न झालीं, आणि शब्दाचें स्वरूप चिरस्थाई होण्याकरितां हस्तलिखित स्वरवर्ण मूलतत्त्वरूप वर्णमाला ॐ काराच्या रेषासंवलित मूलबिंदूस्वरूपांतून कशी व्यक्त झाली याचें मार्मिक रीतीनें वर्णन अव्यक्तबोधांतील नामप्रकरणीं झालें आहे तें येथें पूर्णपणें लक्षांत आणिलें ह्म० प्रणवांतून श्रुती कशा व्यक्त झाल्या, आणि ' सर्व श्रुति-

बीज ' ॐकार कसा आहे, हें चांगलें ध्यानांत येईल. ही परमात्म्याची ध्वनीवर्णरूप वेदवाणी सृष्टींतील यावत् जीवमात्रांच्या भाषेची जननी आहे. इच्यांतून अनंत भाषा देव, मनुष्य, पशु, पक्षी यावत् जीवांच्या क्रमशः निर्माण होत गेल्या आहेत. वर्णमालेचा चित्रपट पहा, ह्म० एका ॐ काराच्या अष्टावयवांपासून शब्द व अक्षररूप वर्णमाला निर्माण कशी झाली व कालगणना, पदार्थगणना, आणि लघु गुरुत्व परिमाणदर्शक एकापासून नवांपर्यंत संख्याबोधक ' अंक ' हेही त्याच प्रणवावयवापासून कसे निर्माण झाले आहेत हें पूर्ण हृदयांत बिंबेल.

वर्णमाला निर्माण होण्यापूर्वीं संख्या निर्माण झाली आहे असें मला वाटतें. कारण वर्णमाला उच्चारण्यास जीवाची उत्पत्ति झाली पाहिजे. आणि संख्याद्योतनार्थ फक्त पदार्थच व्यक्त झाले पाहिजेत. जीव उत्पन्न होण्यापूर्वी पंच भूतादिक पदार्थ निर्माण झाले असल्यानें पदार्थभेददर्शक संख्याही त्यांजबरोबर निर्माण असलीच पाहिजे. जीवांनीं त्यांची मोजणी पुढें केली. असो, पण मोजणी करणें न करणें यावर पदार्थभेद अवलंबून नाहीं. तो भेद होतांच त्याजबरोबर संख्या सहज निर्माण झाली. ती पुढें जीवांस कळली व त्यांनीं त्यांस एक दोन तीन अशी अंकसंज्ञा दिली. याशिवाय वर्णमाला तयार होण्याकरितां ॐकाराच्या बिंदूस सोडून सात अवयवांची अपेक्षा लागते आणि संख्या ॐकाराचे प्रथम तीन अवयव अथवा दुसरा व तिसरा अशा दोनच अवयवांनीं संख्यादर्शक चिन्हें तयार होतात. प्रथमावयव अहंकार, दुसरा मन, आणि तिसरा बुद्धि, असे ॐकाराचे तीन अवयव प्रथम व्यक्त झाले आहेत. तीन पदार्थांस बहुवचनी संज्ञा येत असते. परमात्मस्वरूपीं कारणावस्थेंत अहंकार व सूक्ष्मावस्थेंत मनबुद्धिरूप ऊर्मी जागृत झाली ह्म० **'एकोऽहं बहुस्यां'** ही ऊर्मी आली. त्या अवस्थेंत पंचभूतादि तत्त्वें व्यक्त झालीं नव्हतीं. अर्थात् ॐकारही त्या अवस्थेंत बिंदु व मात्रारूप होता. पूर्णावयवांनीं युक्त झाला नव्हता. तेव्हां जे तीन अवयव व्यक्त झाले व अहंकार, मन आणि बुद्धि हीं तीन तत्त्वें त्या अवयवांत व्यक्त झालीं, यावरून बहुवचनी संख्याभेददर्शक तीन पदार्थ

झाले, व या तीनच अवयवांनीं बहुवचनी ह्म० एकापासून नवापर्यंत संख्या तयार होऊं शकते. एकापासून दुसरा व दुसऱ्यापासून तिसरा असा पदार्थभेद होतांच त्याच्याबरोबर भेददर्शक संख्या निर्माण झाली असें सिद्ध होतें. पुढें जीव निर्माण झाल्यावर त्यांनीं वर्णमालेचा उच्चार केल्यावर पदार्थभेदास एक दोन तीन असे संख्येचे अंक ह्मटले आहेत. उदाहरण अज्ञानी बालक ज्यास वर्णोच्चार करतां येत नाहीं, अशापुढें खेळण्यास चार पदार्थ ठेविले, तर तो प्रथम एक पदार्थ घेऊन खेळूं लागेल, लागलाच तो टाकून दुसरा–तिसरा–अशी धरसोड करूं लागतो. यावरून त्यास पदार्थभेद कळतो. नामभेद कळत नाहीं असें दिसतें. जन्माचा मुका मनुष्य जन्मबधीर असतो. त्यामुळें त्यास शब्दच ऐकूं येत नाहीं. अशा मूक मनुष्यास आमरणपर्यंत शब्दवर्णज्ञान नसतें, पण पदार्थाच्या भेदाचा बोध असतो तो बोटाच्या संज्ञेनें दाखवितो. अर्थात पदार्थभेद हाच संख्येस मूलकारण आहे. अव्यक्तास्थितींत पदार्थच अव्यक्त असल्यावर–संख्या–व नाम ह्म० वर्ण यांतून प्रथम कोण याचा निर्णय होऊं शकत नाहीं. पण व्यक्तदशेंत प्रथम पदार्थभेद व नंतर नामसंज्ञा ह्म० 'वर्ण' असें दिसतें. त्यावरून प्रथम 'संख्या' व मागून 'वर्णमाला' झाली असावी असें मला वाटतें. एक दोन तीन चार हें ह्मणणें ह्म० संख्येविषयीं शब्दव्यापार करणें होय. तो वर्णमालेनंतर होणें साहजिक आहे. असो. तात्पर्य ॐकाराच्या सात अवयवांपासून वर्णमाला व संख्या व्यक्त झाली आहे. **श्रुति** ही वर्णसिंधु आहे. तिचा समावेश व व्यक्तता ही 'परमात्म प्रणवबिंदू'तच आहे. म्हणून प्रणव हें श्रुतीचें मूल**बीज** आहे. या बीजांतूनच 'श्रुतिवृक्ष' आणि 'कर्मभोगफलरूपसृष्टि' निर्माण झाली आहे, हें पूर्ण ध्यानांत आणिलें पाहिजे.

येणेंप्रमाणें विचारल्यास प्रणवोपदेश होतांच बीजांतून वृक्षफळें निर्माण जशीं होतात, त्याप्रमाणें प्रणवबीजांतून श्रुतिवृक्ष व कर्मफलरूप सृष्टि निर्माण होते. बीज हेंच वृक्षाच्या आणि पुष्पफलांच्या परिणामास प्राप्त होतें. असा जरी बीजवृक्षफलांचा त्रिविध भेद दिसला तरी मूलस्वरूप बीजच आहे. ह्म० त्रिविध भेद जसा बीजमय आहे,

तसें प्रणवांतून निघालेल्या श्रुति व सृष्टि ह्या सर्व प्रणवमय आहेत. आणि ' प्रणव ' परमात्मरूप असल्यानें सृष्टि व श्रुतिही परमात्ममयच झाल्या ह्मणून श्रुतीनें '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' आणि '**ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म**' अशी ब्रह्माची, प्रणवाची आणि सृष्टीची एकरूपता प्रतिपादन केली आहे. श्रुतीची आणि प्रणवाची एकरूपता मागें झाली. आतां सृष्टीची व प्रणवाची एकरूपता कशी आहे हें पाहूं.

जेव्हां जेव्हां ज्या ज्या कल्पांत जी विभूति ब्रह्मपदीं सृष्ट्युत्पादनार्थ आरूढ होते, आरूढ होते ह्मणण्याचें कारण कीं ब्रह्मपदाच्या अधिकारप्राप्तीपर्यंतच कर्माची इयत्ता आहे असें मागें सांगितलें आहे. पुढील सृष्टिकल्पांत अगस्ति ऋषि ब्रह्मदेव होणार आहेत असें सिद्ध आहे. अशा तपोनिधि विभूति मागल्या कल्पांत ब्रह्मपदप्राप्त्यर्थ तपानुष्ठान करून त्या पदप्राप्तीचा ईश्वरानुग्रह प्राप्त करून घेतात; पण ब्रह्मपदीं आरूढ झाल्यावर सृष्ट्युत्पत्तिसामर्थ्य आणि त्याचें ज्ञान संपादनार्थ पुन: वेगळें तप करावें लागतें. ह्म० जें मागें शून्यशोधनांत गुंतून, शून्याचा ग्रास करून शून्यातीत होणें सांगितलें आहे, तें दिव्य तप होतांच विराटात्म्याचा प्रणवोपदेश होतो. त्या योगानें ब्रह्मपदारूढ झालेली विभूति त्रिकालज्ञानसंपन्न होते. आणि तिला ॐकारांत पूर्व सृष्टीच्या सर्व संस्काराचें यथार्थ दर्शन होतें. यथार्थ दर्शन झालें ह्म० '**धाता यथा पूर्वमकल्पयत्**' या श्रुतीच्या दाखल्याप्रमाणें जे जे जीव आपले पूर्व कल्पाच्या संस्कारांत लीन पडले असतात व त्यांच्या वासना, शरीर, इंद्रियें व भोगाविषयीं जशा कांहीं वासना असतात व त्या वासनेंत जसें कांहीं कर्माचें बल असतें, त्या कर्मानुरूप सिद्ध असलेलीं शरीरेंद्रियादिक आणि भोग्यविषयादिक सर्व साहित्यें, विधात्यास यथास्थित निर्माण करून द्यावीं लागतात, तींच ही भोगभोक्ते जीव, भोगसाधन इंद्रियें आणि भोग्य विषय अशी त्रिपुटीरूप अखिल चराचरात्मक व चतुर्दशभुवनात्मक सृष्टि आहे. सृष्टींत या त्रिपुटीच्या बाहेर कोणताच पदार्थ कधीं आढळणार नाहीं. ही त्रिपुटीरूप **सृष्टि** विधात्यास ॐकार बीजांत अव्यक्त रूपानें जशी दिसली तदनुरूप त्यानें सर्व रचना केली आहे.

---

# चतुर्विध जीवांची उत्पत्ति.

ही सर्व सृष्टि पंचीकृत पंचमहाभूतांपासून निर्माण झाली आहे. तत्त्वांचें पंचीकरण होऊन तीं पंचीकृत तत्त्वें ॐकाराच्या अवयवांत आलीं आहेत. इ० सविस्तर वर्णन मागें झालेंच आहे. त्या पंचीकृत तत्त्वांपासून व तत्त्वरूप प्रणवावयवांपासून 'चतुर्वर्ग' रूप सृष्टि व्यक्त झाली. प्रथम वर्गांत जरायुज ह्म० मैथुनी प्रजा, यांत मनुष्य आणि सर्व जातींचे पशु हे येतात. अंडज प्राणीही मैथुनी आहेत, पण त्यांजवर अंडाचें आवरण असल्यानें गर्भाशयांतून अंडरूपानें बाहेर पडून अंड परिपक्व झाल्यावर त्यांतून पुढें सावयव बाहेर येतात. त्यामुळें अशा प्राण्यांस ' द्विज ' अशी संज्ञा आहे. या वर्गांत यावत् पक्षी जातीचा समावेश असून कांहीं सर्प विंचू इत्यादिकांचाही जन्म तसाच अंडांतून होतो. तृतीय वर्ग स्वेदज यांत ऊष्म बिंदू अथवा स्वेदबिंदूपासून उत्पन्न होणारे यावत् दंश, कीट, पतंग इ० सर्व येतात. यांतही कांहीं जीव प्रथम तर स्वेदापासून होतात, पण पुढें अंडींही ठेवितात. असे प्राणी फार थोडे. चतुर्थ वर्गांत उद्भिज्ज वर्ग येतो. यांत भूमि, पर्वत, वृक्ष, वनस्पति, वल्ली, नदी, खाणी व धातु, इ० यावत् पदार्थमात्र येतात. हे पदार्थ जीवकोटींत येण्याचें कारण कीं यांची सहज उत्पत्तीची स्थिति चेतनरूप आहे, पुढें हे पदार्थ स्वोत्पत्तिस्थानापासून भिन्न झाले ह्म० अचेतन होतात. म्हणून त्यांस जड ह्मणण्याचा प्रघात आहे. वास्तविकदृष्ट्या सृष्टींत अचेतन असें कांहींच नाहीं. या उद्भिज्ज वर्गापासून जीवांस लागणारे यावत् विषयोपभोग्य पदार्थ निर्माण होऊन जीवांच्या भोगार्थ उपयोगीं पडतात. भोग्य विषयांत अचेतन पदार्थ तर येतातच, पण सचेतन जीवांचाही भोग्य विषयांत समावेश होतो. जसें स्त्री, अश्व, हत्ती, बैल, इ० हेही जीवांच्या सुखोपभोगार्थ साधनीभूत आहेत. अर्थात या सर्वांचा उपभोग जीवांस परस्पर मिळतो.

अशी ही चतुर्विध जीवसृष्टि निर्माण करतांना विधात्यास सर्व जीवांच्या सावयव छायेप्रमाणें आकृत्या प्रणवाच्या अवयवांत भास-

त्या व तदनुकूल त्यांनीं सर्व रचना केली. त्या प्रणवांत भासलेल्या आकृत्या चित्रपटांत नीट विचारपूर्वक अवलोकन केल्या पाहिजेत. विशेष खुबी ही आहे कीं, पंचमहाभूतांपासून सर्व स्थूल सृष्टि निर्माण होऊनही जशीं पंचतत्त्वें शेष राहतात त्याप्रमाणें प्रणवाच्या अवयवांतून सर्व आकृत्या निर्माण होऊनही कांहीं अवयव शेष उरतात. त्यांतूनही प्रथमावयव जो ' अहं बिंदु ' हा तर सर्वांहून अलिप्त राहून शेष उरतोच. कारण बिंदु स्वस्थान न सोडतां रेषा व अक्षररूप होतो. यांत रेषा, अक्षर हीं बिंदूचींच विकारी स्वरूपें आहेत. आणि परमात्माही स्वस्थानाची व्यापकता न सोडतां माया व सृष्टिरूप होतो. यांत माया व सृष्टि हीं परमात्म्याचींच विकारी स्वरूपें आहेत. **बिंदु व परमात्मा** आपलीं स्थानें न सोडतां विकारी रूपें धारण करून हीं पुन्हां स्वतः आपल्या स्थानीं अलिप्तच राहतात. म्हणून श्रुतीनें ' **अत्यातिष्ठद्दशांगुलं** ' अशी परमात्म्याची व्यापून अलिप्तता जशी दाखविली, तशीच ॐकाराच्याही प्रथम बिंदूची सर्व आकृत्यांत व्यापून अलिप्तता दिसत आहे.

याप्रमाणें विधात्यानें जीवांच्या कर्मानुरूप जीवांचीं शरीरें, इंद्रियें आणि त्यांच्या भोगार्थ चतुर्दश भुवनें; सर्व प्रकारच्या भोगानें प्रपूरित निर्माण केलीं. त्यांत दिव्यभोग लोकांतील दिव्य शरीरधारी, दिव्य आयुषी जीव आपल्या दिव्य कर्माच्या बलानें ' देव ' ह्मणविले. त्यांच्या कर्मसंचयांत सात्विकी कर्म ह्म० पुण्य अतिशय असल्यानें त्यांची देवयोनी ह्मणविली. आणि त्यांच्या कर्मांत रजोगुणी व तमोगुणी क्रियेचा अंश अतीच थोडा असल्या कारणानें पाप आणि हिंसा त्या लोकीं व त्या जीवांत नाहीं. ज्या जीवांचे कर्मफलांत सात्विकी आणि राजसी कर्म बरोबर असून तामसी क्रिया कमी, असे जीव ' मनुष्य ' ह्मणविले व त्यांच्या कर्मानुरूप मृत्युलोकींचीं सुखें व दुःखें जशीं कांहीं न्यूनाधिक प्राप्त होतात तीं सर्व प्रत्यक्ष आहेतच. आणि ज्या जीवांच्या कर्मांत तमोगुणक्रिया अति असून सत्वांशाचा व रजोगुणाचा उगीच लेशमात्र आहे असे जीव ' तिर्यक् योनी ' ह्म० पशु, पक्षी, सर्प, कीटकादि जीव ह्मणवितात. सारांश सर्व जीवांस विधात्यानें निर्माण करून त्यांच्या कर्मानुरूप सर्व

भोग त्यांस सज्ज करून दिले. येथवर विधात्याच्या कामाची इयत्ता आहे.

---

## श्रीविष्णु रुद्रांचीं कार्यें.

पुढें यावत् आयुष्यमर्यादेपर्यंत जीवांस त्यांच्या कर्माप्रमाणें सुखदुःखभोग, कालानुरूप सुव्यवस्थेनें ज्यांचे त्यांस रतिभरसुद्धां न्यूनाधिक न होतां जसेच्या तसे, तो जीव जेथें ह्म० ज्या लोकीं असेल तेथें पोंचवून देणें हें काम श्रीभगवान् सत्त्वगुणप्रधान विराटात्म्याची स्वयंविभूति **श्रीमहाविष्णूचें** आहे. तें ते विराटाज्ञेनुरूप सदैव अहेतुकपणें जीवांच्या संरक्षणार्थ आणि कल्याणार्थ करण्याकरितां वैकुंठधामीं विराजमान आहेत. पुढें जीवांच्या आयुःसमाप्तीनंतर जीवसंहारार्थ व भोग्य पदार्थ जीर्ण झाल्यावर भोगसंहारार्थ आणि सरतेशेवटीं कल्पांतीं सृष्टिसंहारार्थ श्रीविराटात्म्याची स्वयंविभूति तमोगुणप्रधान श्रीमहाकालरुद्र भगवान् **श्रीसदाशिव** रूपानें दिव्य कैलासभुवनीं विराजमान आहे. ज्याप्रमाणें श्रीविराटात्म्याच्या स्वरूपभूत विभूति श्रीमहाविष्णु श्रीमहाकाल रुद्र आणि श्रीपितामह ब्रह्मा ह्या त्रय विभूति प्रादुर्भूत झाल्या, त्याप्रमाणें **श्रीमहामाया** आदिशक्तीच्याही तीन विभूति **श्रीमहालक्ष्मी, श्रीमहाकाली,** व **श्री महासावित्री** अशा त्रिमूर्तींच्या स्वरूपाश्रित शोभायमान व विराजमान होऊन उत्पत्तिस्थितिलयरूप सृष्टिकार्यार्थ प्रवृत्त झाल्या. 'शक्ति' ह्या पुरुषाश्रित राहून—पुरुषांच्या इच्छेनुरूप कार्यांत प्रवृत्त होतात. अशा शक्तिसंयुक्त त्रिमूर्तींनीं सृष्टिकार्यें सांभाळलीं. त्यांतून सृष्ट्युत्पत्ति व स्थिति यांचें सविस्तर वर्णन येथपर्यंत जसें कांहीं अल्प मतीस करतां आलें तसें केलें आहे. न्यून असेल तें सुज्ञांनीं पूर्ण करून घ्यावें. आतां मी सृष्टीच्या लयाचा ह्म० संहाराचा प्रकार दाखवून उत्पत्त्यारंभाशीं संविधानक मिळवून हें सृष्टिप्रकरण पुरें करितों. सुज्ञांनीं लक्ष असूं द्यावें.

---

# सृष्टिसंहार अथवा प्रलय.

कोणतीही वस्तु जी निर्माण होऊन बुद्धिगोचर व दृग्गोचर होऊं लागली कीं तिचा केव्हां तरी नाश होणारच. ज्या वस्तूचा नाश त्रिकालांतही कधीं नाहीं, अशी वस्तु सृष्टींत कधींच निर्माण होत नाहीं. निर्माण होणें हाच मुख्य नाशास हेतु आहे. निर्माण तीच वस्तु होते कीं, जी निर्माण होण्यापूर्वीं नसते. वस्तूचें नसणें हें ' अभावरूप ' आहे. आणि वस्तूचें असणें हें ' भावरूप ' आहे. वस्तूच्या अभावरूपतेपासून पुढें वस्तूची भावरूपता उत्पन्न होते असें दिसतें. आणि वस्तूचा नाश झाल्यावर पुन्हां वस्तूचा अभाव होतो. आतां जी वस्तू आरंभीं अभावरूप आणि शेवटींही अभावरूप तिचा मध्य तरी भावरूप कसा होऊं शकतो ? असत्यापासून सत्याची उत्पत्ति होणें कधीं शक्य नाहीं, तसेंच सत्यापासून असत्याची उत्पत्ति कधीं होत नाहीं, असा नियम आहे. त्याअर्थीं वस्तूच्या अभावरूपतेपासून वस्तूची भावरूपता सिद्ध होत नाहीं. बरें वस्तू अभावरूपच जर मानावी तर ज्या वस्तूचा सदैव अभावच आहे, अशी वंध्यापुत्रवत् वस्तू कधीं प्रतीत होत नाहीं. जी आदि अंतीं अभावरूप व मध्यें उगीच भावरूप अशी वस्तु ' अनिर्वचनीय ' ह्मणावी लागते. आणि अनिर्वचनीय वस्तूचा लय अधिष्ठानांत होत असतो, असें मागें सिद्ध झालेंच आहे. अधिष्ठानावर आलेली अनिर्वचनीय वस्तु, केवळ अधिष्ठानाहून भिन्न नामरूपानेंच मात्र कल्पित असतें. त्या कल्पित वस्तूचा अधिष्ठानांत लय होतो. लय होणें ह्म० केवळ कल्पित नामरूप जाणें हें होय. तें नामरूप तरी अन्य कोठें जात नाहीं. कल्पित वस्तूचा अधिष्ठानांत लय होतांच तें नामरूपही वस्तूबरोबर अधिष्ठानांतच लीन होतें.

व्यावहारिक दृष्टीनें वस्तूचा नाश दोन प्रकारचा आहे. जसें सुवर्णाचीं आभूषणें गाळून पुन्हां सुवर्णाची कांबी करणें अथवा घट फोडून भूमींत मिळवणें, अशा प्रकारें वस्तूच्या नाशास अधिष्ठानांत ' लय ' असें ह्मणतात. आणि पदार्थाची अगदीं राखरांगोळी करू-

न नाहींसा करणें यांस ‘ ध्वंस ’ असें ह्मणतात. असा जरी द्विविध भेद दिसतो तरी सूक्ष्म रीतीनें पाहूं गेल्यास वस्तूचा ध्वंस कधींच होऊं शकत नाहीं. जरी राखरांगोळी केली तरी त्या राखेचा कोणत्या तरी तत्त्वांत लय होणारच. पदार्थास नष्ट करणें ह्म० त्याचीं नामरूपें नष्ट करणें होय. पदार्थ नष्ट झाल्यानें पदार्थाचें मूलतत्त्व नष्ट होत नाहीं. त्या तत्त्वांचा अन्य तत्त्वांत लय होतो. लय झाल्यानें तो पदार्थ पुन्हां उत्पन्न होऊं शकतो. अत्यंत नाश ह्म० ध्वंस असा कधींच कोणत्या वस्तूचा होत नाहीं. लय होण्यांतही आणखी सूक्ष्म प्रकार आहे. तो असा कीं, लय होणें ह्म० अधिष्ठानाशीं तादात्म्य होणें हें होय. लय झाल्यावर वस्तु होती कीं नव्हती असें भान सुद्धां होतां कामा नये. जसा सुवर्णाचा अलंकार गाळून सुवर्ण केलें ह्म० अन्य पाहणारास याचा डागिना होता कीं नव्हता हें भान न होतां केवळ सुवर्णच भासणें, हा ‘ तादात्म्यरूप ’ लय आहे. हा तादात्म्यलय आपले मूलकारणावांचून अन्यांत होणार नाहीं. मूलकारणावांचून अन्य पदार्थांत लय केल्यास तो लय न होतां ‘मिश्रण’ ह्मणवेल. सोन्याचा डागिना अन्य धातूंत गाळून मिळविल्यास तो लय न होतां दोन धातूंचें मिश्रणच ह्मणवेल. अर्थात जी वस्तु ज्या तत्त्वांतून निघाली असेल तिचा खरा लय त्याच तत्त्वांत होईल, अन्यांत होणार नाहीं; हें सिद्ध होतें.

इंद्रियगोचरत्वाची आणि मनोवेद्यत्वाची जेथवर सीमा आहे तीच सीमा सृष्टीची ह्म० सृष्टपदार्थांच्या स्वरूपाची आहे. ‘ पदार्थ ’ ह्मटला कीं तो कधीं तरी उत्पन्न झाला पाहिजे; व कोणीं तरी उत्पन्न केला पाहिजे. ‘ सृज् ’ धातूपासून **सृष्टि** हें नांव झालें, ह्म० उत्पन्न केली जाते, ह्मणून सृष्टि हें नांव पडलें आहे. आणि सृष्टीच्याच उपाधीनें **सृष्टिस्रष्टा** झाला आहे. जो पदार्थाचा **स्रष्टा** असतो तोच पदार्थाच्या उत्पत्तिस्थितिलयांचा **द्रष्टा** असतो ह्म० पदार्थाहून वेगळा असतो. परमात्म्याचा जगद्द्रष्टेपणाच जगत्स्रष्टेपणा आहे. त्याच्या स्वस्वरूपीं ईक्षणाच्या उदयानें सृष्टीचा उदय होतो. आणि ईक्षणाच्या लयानें सृष्टीचा लय होतो, असें प्रकरणारंभीं सिद्ध झालेंच आहे. अहेतुक परमात्मस्वरूपीं ‘ ईक्षणाचा ’ उदय ज्या पूर्वसृष्टिसं-

स्काराच्या 'आघातानें' होतो, तोच आघात शांत पडला ह्म० पुनः सृष्टीचा लय होतो. आणि तोच संस्कार बीजरूप राहून पुनरपि उदयाच्या आघातास कारण होतो. यावरून सृष्टीचा नाश ह्म० विध्वंस न होतां लय होत असतो. सृष्टीचें अधिष्ठान परमात्मा असल्यानें त्यांतच तिचा लय होतो. आतां आरंभीं परमात्मा 'भावरूप' व अंतीं परमात्मा 'भावरूप' मग मध्येंच सृष्टि 'अभावरूप' कशी होऊं शकते. तीही भावरूपच असली पाहिजे. तिला परमात्माधिष्ठानरूपता येतांच मग सृष्टीची भिन्न नामरूपात्मकता कोठें राहिली ? अर्थात तिचा अभाव ह्म० केवल नामरूपात्मकतेचा अभाव झाला.

---

## प्रलयाचा प्रकार.

जी वस्तु जशी एकदम निर्माण होते, तिचा लयही तसाच एकदम होत असतो. वस्तूच्या उत्पत्तिकालाबरोबरच वस्तूचा विनाशकालही उत्पन्न होत असतो. तो निश्चित वेळीं व्हावयाचाच. यावत् जीवमात्रांच्या युगपत् भोग्योदय कालानेंच सृष्टिसंस्काररूप वासनेची परमात्मस्वरूपीं जशी 'ऊर्मी' येते तशीच अखिल जीवमात्रांच्या भोगाचा एकसमयावच्छेदें*करून लोप होण्याचा समय येतांच सर्व सृष्टीचा समेट एका वासनेंत होऊन तीच वासना परमात्मस्वरूपीं लय पावून सृष्टि अदृश्य होते. ह्म० परमात्माधिष्ठानीं लय पावते. एवढी प्रचंड अवाढव्य सृष्टि एकदम नाश कशी पावेल ! याबद्दल आश्चर्य अगदीं करावयास नको. हिची प्रचंडता आपल्या दृष्टीनें आहे; पण परमात्मस्वरूपीं सृष्टीची किंमत निमिषोन्मेषणाहून अधिक नाहीं. विद्युद्दीपयंत्राचा दृष्टांत मागें सांगितलाच आहे. सामान्य वस्तूचा नाश सामान्य रीतीनें होतो. त्याची विशेषता वाटत नाहीं. पण वस्तुसमूहाचा एकदम एकाच क्षणीं नाश व्हावयाचा असला ह्म० त्या वस्तूच्या स्वरूपाप्रमाणेंच जबरदस्त आघाताचा तडाका बसतो. आणि

* एकसमयावच्छेदेंकरून.

सर्व वस्तूंचा एकदम फडशा उडतो. अशा तऱ्हेच्या नाशास आपण ' अपघात ' ह्मणतों. हा अपघात वस्तुसमूहनाशाचा युगपत् काल आल्यावांचून कधीं होत नसतो. भगवान् काल रुद्राचीं अपघातरूप तीक्ष्ण शस्त्रें आहेत; त्यांचा प्रहार समयावांचून होत नाहीं व त्या समयाचें यथार्थ ज्ञान कधींच कोण्या जीवास होत नाहीं. महामारी, रोगाच्या दिव्य सांथी आणि युद्धसंग्राम इ० हीं सर्व शस्त्रेंच आहेत. पण त्यांच्या निवारणार्थ बुद्धिकौशल्य खर्च करण्यास सवड मिळते, व असल्या सामान्य प्रसंगांत मनुष्याच्या बुद्धीस उड्या मारण्यास ईश्वरानें बुद्ध्या फुरसत दिली आहे व त्याचें कौतुकही परमात्मा करतो; पण खरोखरच जेंव्हां दिव्य संहारारंभ होतो तेंव्हां बुद्धिमानाचें बुद्धिवैभव एका कोंपऱ्यांतच तोंड घालून बसतें; याचा अनुभव यंदां प्लेगनें दिलाच आहे. असो. नौकेंत अथवा आगबोटींत सहस्रावधि मनुष्यें जलप्रवास नेहमीं करतात, पण एका समयावच्छेदीं मृत्युमुखीं अर्पण होणाऱ्या जीवांचा समूह कोणासही न कळतां एका नौकेंत आरूढ होतो. त्यांत भिन्नभिन्न जीवांच्या भिन्न प्रदेशीं गमनाच्या वासना असतात, त्या सर्व ज्याच्या त्याच्या जवळच राहून त्या सर्वांची एक बिंदडी ( वंगी ) तयार होऊन ठरावीक जागीं फाडून भक्षण करण्याकरितां महाकालरुद्राकडे रवाना होत असते. आणि नेमल्या ठिकाणावर येतांच प्रचंड आघाताचा तडाका बसून मृत्युमुखीं स्वाहा. मग तेथें पत्ता कसचा आहे. ही खबर पुढें पसरल्यावर मग तीरावरील मंडळींच्या शास्त्रार्थाची झोड एकावी. अहो तें अमुक चुकलें असेल म्हणून असें झालें. पण हे शास्त्रार्थे तेच जर स्वत: त्या नौकेंत असते तर त्यांस सुचते काय ? व्हावयाचें तें कोणाच्यानें टळत नाहीं. तथापि जीवकृत गोष्टींत घडलेल्या आघाताबद्दल एकमेकांवर दोषारोप करण्याची सवड सांपडते व तोंडसुख घेतां येतें. ज्या नगराचा अथवा फार मोठे शहराचा एका क्षणीं नाश होण्याचा ईशसंकेत आला असल्यास त्याचा फडशा होण्यास पांच मिनिटें सुद्धां नकोत. घोर पर्जन्यांत जेंव्हां गारांची वृष्टि सुरू होते तेंव्हां गारा वेंचून खाण्यांत जे निमग्न होतां तेच जरा अंमळ वर पाहून विचार करा, कीं जी गार लहान आहे हीच जर दोन

चार शेर वजनाची होऊन सपाट्यानें पडण्यास आरंभ झाल्यास सर्व शहरचा फन्ना होण्यास पांच मिनिटें तरी लागतील काय ? नको. पण यांत आतां आमचा सर्वांचा नाश होणार इतकी तरी विचारास फुरसत सांपडते. आणि जेव्हां प्रचंड विद्युत्पातानें व प्रचंड भूकंपानें धरणी विदारण होऊन त्यांत शहरांचीं शहरें एकदम गडप होतात तेथें बाहेर गेलेला श्वास सुद्धां परत येण्याची मारामार, मग विचाराचा उदयच कशास होतो ! प्रवासांत वर्षाकालीं क्वचित् प्रसंगीं उघड्या मैदानांत रात्रीं घोर पर्जन्यवृष्टींत सांपडल्यावर चहूंकडून इतकी शीघ्र वीज लवण्याची व गर्जनेची गर्दी उडते कीं, नेत्र उघडझांकीची व पुढें पाऊल टाकण्याची सुद्धां पंचाईत पडते. हा अनुभव बहुतांशीं सर्वांस कधींना कधीं येतोच. आतां त्या अनुभवाच्या क्षणाचा विचार करा कीं, एका विद्युत्पाताच्या प्रहारानें उच्च पर्वत सुद्धां जमीनदोस्त होतो. आणि चहूंकडून जो विद्युत्‌चा सारखा चमचमाट होत आहे तो जर प्रहाररूपी झाला तर या आपले भूगोलाचे छारछार तुकडे उडण्यास कांहीं वेळ लागेल काय ? मुळींच नाहीं. परमात्म्याजवळ एकदम सृष्टीच्या उत्पत्तीचीं साहित्यें आहेत; त्याप्रमाणेंच एकदम नाश करण्याचीं दिव्यशस्त्रें जाज्वल्यमान सदैव तयार आहेत. फक्त समयाची मात्र अपेक्षा आहे. जीं पंचभूतादि तत्त्वें सृष्ट्यारंभीं सृष्टीस साधक झालीं आहेत व विराटात्म्याच्या चंडशासनानें सुयंत्रित सृष्टिकार्यें वहात आहेत, तेंच चंडशासन जीवसंहारकाल येतांच शिथिल पडतें. शिथिल पडलें कीं या तत्त्वांत क्षोभ उत्पन्न होतो आणि यादवी माजते. मग प्रबल असेल तो निर्बलास ग्रासतो. सरते शेवटीं सर्वच लय पावतात. यास **कल्पांत** अथवा **महाप्रलय** असें ह्मणतात.

सृष्ट्यारंभापासून सृष्टीचा लय होईपर्यंत जो काल व्यतीत होतो आणि जी सर्व घडामोड होते यास **सृष्टिकल्प** अशी संज्ञा आहे. यांत ज्या ज्या सृष्टिव्यवस्थापक 'विभूति' आहेत, त्यांत फक्त शिव, विष्णु या उभय विभूति स्वयंसिद्ध असून बाकी ब्रह्मदेवापर्यंत सर्व विभूति अमोघ कर्मबलानें झालेल्या असतात. या सर्वांची आयुष्यमर्यादा कल्पांतापर्यंत असते. त्यांतून ज्याला कैवल्यपदेच्छेनें ज्ञान-

प्राप्ति सद्गुरुद्वारा होते ते पुढें कल्पांतीं परमात्मस्वरूपीं लीन होतात. ज्यांच्या वासना श्रेष्ठ अधिकार व भोग प्राप्त्यर्थ बाकी राहतात ते पुन्हां सृष्ट्यारंभीं भूलोकीं जन्म घेऊन तपानुष्ठानानें वरचे पायऱ्यांवर चढत जाऊन सुदैवानें ज्ञानप्राप्तीची वासना जागृत झाल्यास मोक्षपदीं जातात. नाहींपेक्षां पुनरावृत्ति आहेच. असे ' स्वर्ग, मृत्यु, पाताळ ' त्रिभुवनांतील यावत् जीवमात्र आपापल्या कर्मानुरूप सुखदुःखात्मक भोग भोगीत देहांतरें व लोकांतरें करीत फिरत असतात. नानाप्रकारचे मनोरथही करीत असतात. त्या मनोरथसिद्ध्यर्थ अनंत जीवांचीं अनंत कर्मेंही चालूच असतात. सारांश चतुर्दश भुवनांत जशी जी रचना असते व घटना चालू असते, ती सर्व जशीच्या तशीच व्यवस्थित असतां अकस्मात् एकदम सर्वांतकृत, महाप्रचंड, भयानक, महारौद्र, प्रलयकारक असा जगत्संहारकालाचा **क्षण** दाखल होतो. त्या कालीं विराटात्माश्रित **महामाया** प्रचंड ' तमोगुणप्रधान ' क्षोभानें खवळून जगत्संहारार्थ प्रवृत्त होते. विद्युत्पात हा जिचा सहज अंगुलीस्पर्श आहे, याच्या अनंत सहस्रपट तीक्ष्ण शक्तीचे प्रहार सुरू जाहल्यावर मग बिचाऱ्या सृष्टीची दाद कोठें लागणार ? व त्यांत वसलेल्या मोठमोठ्या विचारवानांस सृष्टिसंहार कोणत्या अनुक्रमानें कसा होतो याचा विचार करण्यास हृदयाकाशांत विचारमार्तंडाचें एक किरण तरी झळकूं शकतें काय ? जेथें स्वतः मार्तंडाचाच चुराडा होण्याचा प्रसंग तेथें किरणाची गति काय ? सृष्टीची जी जशी स्थिति असेल ती तेथल्या तेथें एकदम गारद होते. प्रिय वाचकानों सामान्य अपघाताच्या स्वरूपावरून जर सृष्टीच्या संहाराची उगीच कल्पना क्षणभर करण्यांत गुंतल्यास अंतःकरणाची कशी भयंकर स्थिति होऊन गाळण उडेल व घाबरून ते विचार सोडावे लागतील; मग प्रत्यक्ष संहारकालीं कोणाची कशी स्थिति होईल याची कल्पना तरी करितां येईल काय ?

# भौतिक जीवांचा लय.

अशा संहारकालीं **माया** क्षुब्ध गुणवती होऊन ज्या पूर्वक्रमानें बारा तत्त्वें निर्माण झालीं व त्यांच्या मूर्तामूर्त मिश्रणानें सूक्ष्म-स्थूल सृष्टि जशी झाली असते त्याच्याच उलट क्रमानें सर्वांचें भक्षण करून सर्वांच्या संस्कारासह परमात्मस्वरूपीं लीन होते. येथें बारीक विचार करण्याची जागा आहे कीं, एक विचारवान् व दुसरा अविचारवान् या दोघांसही आपला नाश होणार असें पक्कें समजल्यास विचारी मनुष्य सर्व विषयांतून निराशेनें आपल्या आशा निवृत्त करूं लागतो, आणि अविचारी मनुष्य जास्त घाबरून अति आशाबद्ध होतो व रडतो. अशी दोघांची दोन तऱ्हेची स्थिति होते. ह्म० यांत विचारवानास आशा निवृत्त करतां येण्याचा संभव असतो. पण सर्व सृष्टि एका क्षणांत एकदम फन्ना होते, यामुळें होतें काय कीं सृष्टींतील जीवमात्र जे ज्या कर्मांत, जे ज्या धर्मांत, जे ज्या वासनेंत आणि जशा स्थितींत जेथें जसे गुंतले असतात, ते ठिकाणच्या ठिकाणीं एकाच क्षणार्धांत ठार मारले जातात. त्या योगानें त्या संहारक्षणीं जो ज्या जीवाचा संकल्प अथवा जी वासना असेल तो जीव त्याच **वासनेंत** चेंदला जातो. दुसऱ्या वासनेच्या उदयास सवडच सांपडत नाहीं. नित्य निजते वेळीं जे जे विचार करून व व्यवस्था लावून निजतो ती सर्व व्यवस्था व ते विचार पुन्हां जागृति झाल्यावर बरोबर रीतीनें सांपडतात. हा सर्वांस अनुभव नित्य आहेच. यांत संकल्पाशीं व काळ ह्म० वेळेशीं कशी बद्ध शृंखला पडते ही गोष्ट अ०बो०त सिद्ध करून दाखविलीच आहे. **महाप्रलय** ही विराटात्म्याची निद्रा आहे. यांत अखिल जीव आपापल्या वासनेच्या **संस्कारांत** गुंडाळलेले अव्यक्तरूपानें लीन होऊन पडले असतात. त्या सर्वांचा समेट मायेच्या एका संस्कारांत होतो. असा अनंत काल लोटल्यावर पुन्हां सृष्ट्यारंभकालीं माया संस्काररूपानें उदय पावून त्यांत जे जे जीव ज्या ज्या संकल्पांत पूर्वीपासून गुंडाळलेले पडले असतात, ते ते आपल्या संस्कारानुरूप पुन्हां उदय पावतात व ल-

यकालीं त्यांनीं जशी आपली व्यवस्था मांडलेली सोडली असेल ती ज्याची त्यास पुन्हां मिळून राहाटगाडगें चालू होतें. जो जीव निः- संकल्प ह्म० निर्वासनिक क्षणीं लय पावला असेल तो पुनरावृत्तींत कशाचे बलावर येणार ? तो गेला तो गेलाच. सारांश, भूतसृष्टीचा लय होण्यापूर्वींच भौतिकसृष्टि ह्म० जीवमात्र सर्व लय पावतात. कारण जीव फार कोमल असल्यानें पूर्ण आघाताच्या पूर्वींच मरण पावतात. असो.

---

## महाभूतांचा लय.

आतां बारा तत्त्वें व्यक्त होऊन सृष्टिरूप झालीं तींच पुन्हां उलट क्रमानें कशीं लय पावतात याचा विचार करूं. यांत प्रथम पंच म- हाभूतांचाच विचार केला पाहिजे. आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून जल, आणि जलापासून पृथ्वी अशीं तत्त्वें व्यक्त झालीं आहेत. यांत आकाशांत जितक्या प्रदेशीं पूर्व सृष्टिसंस्काराचा आघात बसून त्याच्या योगानें जें कांहीं परिभ्रमण झालें तें वायुमंडल ह्मणविलें. यांत वायूपेक्षां पुष्कळ पटीनें आकाश मोठें आहे. वायुमं- डलांत केंद्रस्थानीं अति घर्षणानें अग्निमंडल लहान झालें. अग्नीपेक्षां जलमंडल लहान व जलापेक्षां भूमंडल फार लहान अशीं मागील तत्त्वें एकापेक्षां एक मोठीं व पुढील तत्त्वें एकापेक्षां एक लहान असा क्रम मागें दाखविलाच आहे. यांत पृथ्वी सर्वांहून लहान व आकाश स- र्वांहून मोठें असें सिद्ध झालें. मोठ्याचे पोटीं लहानाचा अंतर्भाव होतो. ज्या ‘ कारणा ’ पासून जें ‘ कार्य ’ झालें असेल अथवा कारणामुळें ज्या वस्तूचें ज्यांत ‘ रूपांतर ’ झालें असेल त्या का- र्याचा लय कारणांतच होईल व रूपांतराचें कारण गेल्यास वस्तु पुन्हां पूर्ववत् होईल. तत्त्वांचा कार्यकारणभावसंबंध मानल्यास उत्तर उत्तर कार्यरूप तत्त्वांस पूर्व पूर्व तत्त्वें कारणरूप आहेत. त्यांचा अ- नुक्रमें लय होईल. आणि कारणामुळें तत्त्वांचीं रूपांतरें मानल्यास कारणाच्या निवृत्तीनें तत्त्वें पूर्व पूर्व रूपास येत जाऊन अगदीं पूर्वीं-

चें 'कारण संचाररहित' जें तत्त्व असेल तेंच कायम राहील.

पृथ्वी हें जलाचें कार्य अथवा रूपांतर झालें आहे. याचा लय जलांतच होईल. पृथ्वीचे मृत्कण जसे जलाशीं तादात्म्य पावतात तसे इतर तत्त्वांशीं पावत नाहींत. रंगाचा एक कण गंगाळभर पाण्यांत टाकल्यास पत्ता लागणार नाहीं. शर्करा अथवा मीठ पाण्यांत टाकल्यास अगदीं जलरूप होतें. तेच रंग शर्करा व मिठाचे कण अग्नींत टाकल्यानें रक्षारूपानें पुन्हां सांपडतील. वायूंत उडविल्यास कोठें तरी पुन्हां भूमीवरच पडतील. आकाशाला तर स्पर्शच काय करणार. तस्मात् पृथ्वीचा लय जलांत होईल, इतर तत्त्वांत होणार नाहीं. जरी पूर्वतत्त्वें 'कारणरूप' आहेत तरी तीं अनुक्रमें पर्यायानें आहेत, साक्षात् नाहींत. त्यामुळें अनुक्रम सोडून पुढील तत्त्वांस आपल्यांत लीन करूं शकत नाहींत. पर्यायानें आल्यावर ग्रासण्यास तयार.

हल्लीं ज्या भूगोलावर आपण आहोंत याचा भूपृष्ठभाग एक तृतीयांश कोरडा ह्म० मोकळा असून दोन तृतीयांश भाग जलानें ह्म० समुद्रानें वेष्टित आहे. यांत पृथ्वीवर जमिनीपेक्षां पाणी दुप्पट झालें. हा प्रकार मोकळी जमीन व मोकळें पाणी यांच्या पृष्ठभागाचा झाला. आतां भूगर्भांतही अमोघ जलाशय भरला आहे कीं, ज्यांतून सहस्रावधी महानद्या—ओढे—मोठे तलाव—सरोवरें—वावड्या—कूप—झरे इत्यादिकांची उत्पत्ति होते. या सर्व जलाचा हिशेब करतां येणेंच अशक्य आहे. तथापि निदान दशगुणित तरी भरेल असें वाटतें. येथें अशी शंका सहज वाटते कीं अधिकपट जलाशयांत हा भूमृत्पिंड घुळल्यावांचून टिकतो कसा ? त्याचें समाधान असें कीं, भूगर्भांत अनेक ज्वालाग्राही दाहक पदार्थांच्या विस्तीर्ण खाणी असंख्य भरल्या असल्यानें व त्यांची ज्वलनक्रिया आंत चालू असल्यानें भूगर्भांतील जलाची आर्द्रता मृत्पिंडास भिजवून आर्द्र ठेवते व जास्त आर्द्रता ते ज्वालाग्राही पदार्थ शोषित असतात. असें जलाचें व उष्णतेचें परिमित मिश्रण झाल्यानें, ज्वालाग्राही पदार्थांस विझवून मृत्पिंडास घुळवून टाकण्यास जलाची शक्ति चालत नाहीं. आणि ज्वालाग्राही पदार्थ जलास शोषून मृत्पिंडास दग्ध करूं शकत नाहीं,

असें एकमेकांच्या शक्तीनें एकमेकांचा रोध होऊन भूगोलाचें पोषण होतें. याशिवाय समुद्रादि महानद्यांचें उघड जल भूपृष्ठावर पसरलें आहे. त्याच्या शोषणाची व परिमित सीमेंत राहण्याची तजवीज सूर्याच्या उष्ण किरणांत परमात्म्यानें लावून ठेविल्यानें ईशसंकेतापर्यंत भूगोल सुव्यवस्थित राहतो. महाप्रलयकालीं आंतील व बाहेरील उष्णता अग्नितत्त्व व जलतत्त्व अशीं दोन्ही क्षोभून भूगोलाचा क्षणार्धांत नाश होतो. व भूतत्त्वाचा मागमूस सुद्धां लागत नाहीं. येणेंप्रमाणें या भूलोकाचीं व्यवस्था आहे. सृष्टींत अनंत तेजोगोल आहेत, त्यांत पुष्कळ सूर्यासारखे केवळ अग्निगोल आहेत व चंद्रासारखे केवळ जलमय आहेत. कोणत्या गोलाची रचना कोणत्या तत्त्वाधिक्यानें झाली असेल याचा काय अंत आहे. प्रलयकालीं सर्व ठिकाणचीं तत्त्वें क्षोभून संहारारंभ होतो तेव्हां सर्व सृष्टीचीं तत्त्वें एकीकृत होतात. यांत जलतत्त्वाचें आधिक्य असल्यानें त्यांत भूतत्त्वाचा लय होतो. कार्यकारणभावानें पृथ्वीरूप ‘ कार्य ’ ‘कारणरूपी’ जलांत लीन होतें. आणि कारणामुळें रूपांतर होण्याच्या नियमांनीं भूतत्त्वाचें कारण न राहिल्यानें भूतत्त्व पुनः पूर्ववत् जलतत्त्वरूपीं झालें ह्म० सृष्टितत्त्वांतील एक ‘ भूतत्त्व ’ अज्ञी लय पावलें.

हें ‘ **भूतत्त्व** ’ पार्थिवांश जडरूप होतें आणि या तत्त्वाच्या जडांशाच्याच आधारावर इतर तत्त्वांस मूर्तरूपानें व्यक्त होतां येत होतें. जलांत जडांश ह्म० गुरुत्व हा पार्थिवांश आहे. हा पार्थिवांश नष्ट जहाल्यास जलाचें रूप केवळ शीतल व अमूर्त राहील. वायु अति गार लागतो तेव्हां त्यांत गारपणा हें जलाचें अमूर्तरूप आहे. त्या अमूर्तरूपानें, स्थूल जलरूपापासून होणारीं कोणतींच कार्यें होणार नाहींत. ह्म० तृषाशांति, पिंडीकरण, पोषणादि व्यवहार, कोणतेच होणार नाहींत. केवळ वायुसाह्यानें शीतस्पर्श मात्र कळणार आहे. तीच वाट अग्नीची. अग्नीस प्रज्वलित रूपानें व्यक्त होण्याकरितां पार्थिवांशाचाच आधार पाहिजे. त्यावांचून अग्नीचें केवळ उष्णतेचें अमूर्तरूप आहे. तें वायूच्या साह्यानें उष्णस्पर्शरूपानें कळतें. बरें, या दोन तत्त्वांस ह्म० जलाग्नीस वायूच्या साह्यानें अमूर्तरूप तरी राहतां येतें, पण वायूचा जो स्पर्श अंगास लागून कळतो

हें कळण्यास मूलकारण वायूच्या अंगचें गुरुत्व आहे. गुरुत्वावांचून स्पर्श कळणार नाहीं. अंगावर खडा फेकल्यास किंवा बोट लाविल्यास जो स्पर्श कळतो यास हेतु गुरुत्व आहे. ' गुरुत्वास ' गतीची साह्यता मिळाली अथवा गतींत गुरुत्व आलें ह्म० स्पर्श कळत असतो. वायूच्या गतींत गुरुत्वाचें मिश्रण आहे तोंवरच वायूचा स्पर्श होतो. नाहींपेक्षां कधीं स्पर्श कळणार नाहीं. हें वायूचे अंगीं ' गुरुत्व ' पार्थिवांशाचें आहे. आतां सूक्ष्म विचार करून पहा कीं एका ' पार्थिवांशाचा ' ह्म० भूतत्त्वाचा लय जहाल्यानें केवढा अनर्थ घडतो. सारीं तत्त्वें अमूर्तरूप होऊन कार्यक्षम रहात नाहींत. हें सर्व तत्त्वांचें जें अमूर्तरूप हेंच **अपंचीकृतरूप** ह्मणवितें. यापासून कार्य होत नाहीं ह्मणूनच पंचीकरणाची योजना ईश्वरानें रचली आहे. असो.

येथें अशी शंका येईल कीं, पार्थिवांशाच्याच योगानें जर सर्व तत्त्वांस मूर्तरूपानें दिसतां आलें तर पार्थिवांश नष्ट झाल्यावर बाकी तत्त्वांस अमूर्तरूप तरी कसें व कशाच्या आधारावर राहतां आलें. भूतत्त्वाच्या अभावानें सर्व तत्त्वांचा अभाव झाला असें ह्मणण्यास हरकत कोणती ? याचें उत्तर असें कीं.

**मृदंश** हा सर्व तत्त्वांचें ' कारणरूप ' नसून पर्यायानें अगदीं शेवटील ' कार्यरूप ' आहे. अथवा कारणामुळें शेवटचें रूपांतर आहे. घटरूप कार्य नष्ट झाल्यानें कारणरूप मृत्तिका नष्ट होते असें नाहीं. तसेंच कारणामुळें झालेलें रूपांतर टाकून पुन्हां पूर्वरूपांत राहतां येत नाहीं असें नाहीं. जलानयनादि क्रियारूप ' कार्यास ' घट हा मूल ' कारण ' आहे. व घटरूप कारणापासून जलानयनादि क्रियारूप कार्य होतें. असा घटाचा व क्रियेचा कार्यकारणभावसंबंध आहे. आतां जलानयनक्रियारूप कार्य न राहिल्यास, कारणरूप घटाचा अभावच झाला पाहिजे असें नाहीं. त्यांतूनही, घट फुटून त्याचीं दोन तीन शकलें झालीं तर त्या शकलांपासून कांहीं क्रिया घडणार नाहीं. पण तीं शकलें कायम आहेत तोंवर भग्नघट असें नांव कायम राहील. त्या शकलांचें अगदीं पीठ कराल तेव्हां ती मृत्तिका ह्मणवेल. कार्याक्षम असा ' भग्नघट ' के-

वळ मृत्तिकारूपच आहे. कार्याक्षमतेच्या स्थितींत–घटास–जलानयनादि कार्य करतां येत नाहीं. पण आपलें मूलकारण जी मृत्तिका तिच्या रूपांत जसें राहतां येतें; त्याप्रमाणें तत्त्वांस कार्याक्षमता आल्यामुळें आपली पुढील पुढील कार्यरूपता टाकून मागील मागील कारणरूपतेंत राहतां येतें. जलतत्त्वाचें कार्य अथवा रूपांतर भूतत्त्व आहे. आतां, कारण न राहिल्यामुळें भूतत्त्वाचा लय जरी झाला तरी जलतत्त्वास कार्याक्षम स्थितींत आपलें मूलकारण जें तेजतत्त्व त्यांत भग्नघटाप्रमाणें नामशेष रूपानें राहतां येणें शक्य आहे. सृष्टिरूपक्रिया घडण्याचें कारण होतें ह्मणूनच तत्त्वांचीं रूपांतरें होत गेलीं. व रूपांतरामुळेंच भिन्न भिन्न नांवें येत गेलीं व तशी भिन्न भिन्न क्रियाही घडत चालली, नाहींपेक्षां ‘ क्रियासंचाररहित ’ जें मूळचें एकत्व आहे त्यास अनेकत्व येण्याचें कारणच नव्हतें. असा जरी प्रकार सकृद्दर्शनीं दिसतो तरी तें **एकत्व** असें शक्तिमान् आहे कीं, अनेक रूपानें परिणामाला पावून अथवा रूपांतरें करूनही ज्याची एकरूपता त्रिकालांत कधींच जात नाहीं. हीच मुख्य गोष्ट सर्व तत्त्वांचे उत्पत्तिलयांच्या क्रियेवरून विचारवानांनीं समजून घेण्याचें मुख्य तात्पर्य आहे.

सृष्टींतील **पृथ्वी**तत्त्वाचा आपल्या कारणस्वरूपीं ह्म० **जल**तत्त्वांत लय झाल्यावर जलतत्त्वही कार्याक्षम होऊन आपले कारणस्वरूपीं ह्म० **अग्नितत्त्वांत** लय पावतें. जलाचा आर्द्रगुण असल्यानें व अग्नीचा शोषकगुण असल्यानें अग्नीच जलास शोषतो. अग्नीवांचून इतर तत्त्वें जलास शोषूं शकत नाहींत. कोणी ह्मणतील कीं, भूमीवर पाहिजे तितकें पाणी सांडा, भूमी त्या पाण्यास शोषते. तसेंच भिजलेलें वस्त्र वाऱ्यानें वाळतें. जल शोषण्यास अग्नीच कशास पाहिजे? त्याचें उत्तर असें कीं वायूंत व पृथ्वींत जी अग्नितत्त्वाच्या अंशाची व्यापकता आहे त्या तत्त्वाच्या बलावर पृथ्वी आणि वायु जलास शोषतात ह्म० तो अग्नीचा अंशच अन्य तत्त्वांच्या द्वारा जलास शोषतो. अन्य तत्त्वें तसें करूं शकतीं तर वर्षाकालांत वृष्टीनें भूप्रदेश व वातावरण आर्द्र झालेलें असतें ह्म० त्यांत अग्नितत्त्वापेक्षां त्यावेळीं जलतत्त्वाचें आधिक्य असतें. अशा वेळीं भूमीवर पाणी सांडलेलें

शुष्कही होत नाहीं व धोतरेंही लवकर वाळत नाहींत. अर्थात् जलाचा लय अग्नितत्त्वांतच होतो. यावर पुन्हां शंका येईल कीं अग्नींत जलाचा लय कां ह्मणतां ? जलांत अग्नीचा लय होत नाहीं कीं काय ? पेटलेली आग पाण्यानें विझते. जळत निखार पाण्यांत टाकल्यास कोळसे होतात. अग्नीचा नाश पाणीच करीत असतें. त्याचें उत्तर असें कीं पेटलेल्या घरावर तांब्याभर पाणी टाकल्यास विझेल काय ? अथवा मोठ्या लांकडाचा निखारा पळीभर पाण्यांत बुडविल्यास कोळसा होईल काय ? तर नाहीं. अर्थात् अग्नीहून जल पुष्कळ अधिक पाहिजे तेव्हां वरील काम होईल. पण अग्निमंडलांतून जलमंडल उत्पन्न झालें आहे. ' कार्या '. पेक्षां ' कारण ' फार मोठें असतें. सर्वच कारण कार्यरूप होत नाहीं. ज्या भूमींतून घटरूप कार्य होतें ती सर्वच भूमी घट झाली असती तर घटापासून भूमी ? कीं भूमीपासून घट ? असा घोटाळा होऊन कार्यकारणाचाच पत्ता लागला नसता. याचप्रमाणें सर्वच कारणरूप अग्नि, जलरूप कार्य झाला असता तर अग्नींचें रूपच शेष राहिलें नसतें. अर्थात् अग्निरूपकारणांतील कांहीं अंश जलरूप कार्य झाल्यानें जलाचाच लय अग्नींत होईल. आणि जलाच्या रूपांतराचें कारण न राहिल्यानें अग्नि जलरूप टाकून पूर्ववत् सर्वत्र आपला भाग अग्निरूप करून घेतो. येणेंप्रमाणें सृष्टींतील **पृथ्वी** आणि **जल** अशीं दोन तत्त्वें लय पावलीं.

पृथ्वीचा जडांश आणि जलाची आर्द्रता अशा दोन अंशांच्या आधारावर अग्नीस मूर्तरूपानें राहतां येतें. काष्ठादि इंधनांत जे अग्नीचें प्रज्वलितरूप दिसतें तें जोंवर काष्ठाच्या आंगीं आर्द्रता असते तोंवरच त्यांतून धूर व ज्वाला निघते आणि आर्द्रांश कमी झाला ह्म० अग्नि केवल अंगाररूप राहतो. पुढें क्रमानें आर्द्रतेच्या अभावानें अग्नि विझून लय पावतो. हा अग्नीचा लय कशांत होतो ? तर वायूंत होतो. कारण अग्नीला मूर्तरूपास आधार जडांश व जलांश होता तो अग्नीनें दग्ध केला. आतां जसें घटाचें जलानयनादि कार्य होतें ती कार्यकर्तृत्वशक्ति भग्न झाल्यानें घटास आपल्या कारणरूप मृत्तिकेंत लय पावणें पडलें. तसेंच अग्नीचें दग्ध करण्याचें कार्य

होतें तें संपलें ह्म० दग्ध करण्या योग्य कांहीं द्रव्यच राहिलें नाहीं. त्यामुळें अग्नीची दाहकशक्ति भग्न झाली. अग्नि दाहकक्रिया करीत आहे तोंवरच अग्नीचें मूर्तरूप असतें. त्या क्रियेवांचून अग्नि अमूर्तरूप आहे. वाचकांनीं नीट लक्ष असूं द्या. पहा विपरीत काळ आला ह्म० आपलीच साधक क्रिया आपल्यास बाधक होऊन आपल्या हातानें आपला नाश होतो. आपलीच क्रिया आपल्यास प्रतिक्रियारूपानें फलद्रूप होत असते. अग्नीची दाहकक्रिया अग्नीच्या मूर्तरूपास साधक आहे. जर दाहकक्रिया अग्नि न करता तर अग्नीस प्रगटच होतां येतें ना, व अग्नि आहे अशी प्रतीतिही कोणास झाली नसती. पण विचार जडांश व जलांश होते तोंवर अग्नीस दाहकक्रिया न करतां काष्ठादिकांत अमूर्त तरी राहतां येत होतें आणि घर्षणानें हवें तेव्हां पुन्हां व्यक्त होतां येत होतें. पण **अग्निनारायणानें** मूर्त अमूर्त रूपानें यावत् सृष्टींतील जलांश व जडांशाची एकदम पूर्णाहुति करून स्वतःचे पृथक् अस्तित्वास कांहींच आधार न ठेविल्यानें आपलें मूलकारण जो **वायु** त्यांत त्यास लीन व्हावें लागलें. कारणांतूनच कार्याची उत्पत्ति, स्थिति व त्यांतच कार्याचा लय होत असतो. वायुपासूनच अग्नीची उत्पत्ति, वायूंतच स्थिति व पुन्हां वायूंतच लय होतो. दिवा वाऱ्यानें जातो व वाऱ्यानेंच रहातो. वायुसंचाररहित प्रदेशीं दीप कधींच लागणार नाहीं, व राहणार नाहीं. दिव्यावर छिद्ररहित भांडें पालथें घातल्यास तात्काळ दिवा विझेल. तांब्यांत निखारा टाकल्यास लागलाच कोळसा होईल. जळत्या लंपाच्या चिमणीवर झांकण ठेविल्याबरोबर अंधार होईल. वाताकर्षक यंत्रानें केलेल्या वायुशून्यस्थलीं दीप कधींच प्रज्वलित करतां येणार नाहीं व ठेवतांही येणार नाहीं. वायूच्या साह्यानेंच दीप राहील. व वायूच्या अभावानें जाईल. ज्याच्या साह्यावांचून ज्यास राहतां येत नाहीं अर्थात् त्याच्या साह्यावांचून त्यास उत्पन्नही होतां येणार नाहीं. ह्मणूनच **मरुत्सखा** असें विशेषण अग्नीस मिळालें आहे. वायूंत अग्नीची उत्पत्ति, स्थिति, लय, कार्यकारणन्यायानें होत असल्यानें वायूंतच अग्नीचा लय झाला. आणि दाहकप्रकाशादि क्रियेचें कारण होतें ह्मणून वायूच्या कांहीं अंशाचें अग्नींत रूपांतर झालें

होतें. तें कारण न राहिल्यानें अग्नीचें रूपांतर केलेला वायूचा अंश आपल्या पूर्ण वायुस्वरूपीं मिळाला.

येथें कोणास कदाचित् अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, अंतरिक्षांत केवळ वायुवायूंचे संघर्षणानेंच विद्युत्प्रकाश होतो व वृष्टीहि होते. अन्य द्रव्याची कांहीं जरूर नाहीं. त्याचें उत्तर असें कीं, ज्या वातावरणप्रदेशीं विद्युत्प्रकाश व वृष्टि होते तेथें त्या वायवांशांत जडद्रव्यांश, जलांश, व उष्णता अशा तीन द्रव्यांच्या मिश्रणानें विद्युत्प्रकाश व जलवृष्टि होते. निखालस वायूच्या घर्षणानें विद्युत्प्रकाश होणार नाहीं. प्रकाश हें अग्नीचें मूर्तरूप आहे. तें जडांश व जलांशाच्या साह्यावांचून दिसणेंच अशक्य आहे. वायूंत जडांशाचें गुरुत्व असल्यावांचून गतीचा स्पर्श होणार नाहीं, स्पर्शावांचून घर्षण होत नाहीं, व घर्षणावांचून प्रकाश होत नाहीं. सारांश अग्नीला जोंवर जडांशाचें व जलांशाचें साहाय्य आहे तोंवरच मूर्त अमूर्तरूपानें राहतां येतें. नाहींपेक्षां नामशेषता ठेवून आपल्या मूलकारण वायूतत्त्वीं लयास जावें लागतें. एवंच सृष्टींतील **भूमी–जल** आणि **अग्नि** अशीं तीन तत्त्वें अज्जीं लय पावलीं. आतां उरलीं दोन तत्त्वें ह्म० वायु आणि आकाश यांचाही कसा लय झाला तो पाहूं.

**वायूची** प्रतीति शीतोष्ण अंशयुक्त स्पर्शानें होते. वायूच्या आंगीं जावत्काल गुरुत्व आहे तावत्काल वायूचा स्पर्श होणार. तो जडांश व जलांश अग्नीनें भक्षण करून स्वत:ची उष्णताही नाहींशी करून घेऊन वायूंत लीन झाले. आतां जडांश, जलांश व उष्णता या तिघांचाही लोप झाला तेव्हां वायूचा स्पर्श तरी कोणत्या रीतीनें व्हावा. हे तिन्ही अंश वायूच्या मूर्तरूपास कारण होते ते तिन्ही नष्ट झाल्यानें उष्ण, शीतल व स्पर्श या तिन्ही गुणांनीं रहित **वायु** अमूर्तरूप झाला. वायूचा मुख्य गुण कायतो ' स्पर्श ' तोच जर गतीच्या अभावानें नष्ट झाला तर वायूचें अमूर्तरूप ह्म० शून्यरूपच झालें. वायूचें शून्यरूप होणें ह्म० आपलें कारणरूप जें ' आकाश ' त्यांत लय पावणें हेंच होय. असें गतिस्पर्शरहित वायूचें शून्यरूप हेंच आकाशाचें ' शून्यरूप ' आहे. आणि पूर्व सृष्टिसंस्काराच्या आघाताच्या धक्क्यानें जितक्या कांहीं आकाशप्रदेशीं गतीचें परि-

भ्रमण झालें होतें त्या आकाशाच्या प्रदेशास ' **वायु** ' अशी संज्ञा आली होती. तें गतीचें परिभ्रमण बंद पडतांच ह्म० त्याचें कारण न राहिल्यानें वायूंत रूपांतर झालेल्या आकाशांचा भाग पूर्ववत् पूर्णाकाशरूप झाला. आणि कार्यकारणभावानें वायूचा लय आकाशांत झाला. कारण आकाशावांचून दुसरें कोणी मोठें तत्त्वच उरलें नाहीं. असो, एकूण सृष्टींतील **पृथ्वी–आप–तेज**–आणि **वायु** अशीं चार तत्त्वें लयास गेलीं.

आतां उरलें केवळ शब्दगुणी आणि शून्यरूप असें **आकाश**. आकाशांतील गुण जो शब्द हा आघातावांचून व्यक्त होऊं शकत नाहीं. आणि आघात देऊन व्यक्त करणारीं सर्व तत्त्वें लय पावलीं. तेव्हां अव्यक्त शब्द ' शून्यरूप ' झाला. ह्म० शब्दाचा लय शून्यांत झाला असें ह्मटलें पाहिजे. आतां आकाश शब्दरहित असें केवळ **शून्यरूप** राहिलें. आकाशाचें लक्षण ' अवकाश ' असेंही आहे. पण अवकाश लक्षणाची अपेक्षा पदार्थावलंबी आहे. कारण पदार्थ असले ह्म० त्यांस राहण्यास अवकाश पाहिजे आणि पदार्थाचाच लोप झाला तर अवकाशाची जरूरच कोठें राहिली ? अर्थात आकाशाचें अवकाशरूप लक्षणही जाऊन निखालस आकाश **शून्यरूप** असतें झालें.

प्रिय सुज्ञ वाचकांनों, आपल्या विचारांशाची मजल शून्यरूपापर्यंत येऊन ठेपली. आतां आपल्यास शून्यमय प्रदेश ओलांडून शून्यातीत स्थलीं जावयाचें आहे. करितां विचारशक्तीस अति सूक्ष्म करून स्वतःच्या **अस्मितेस** चांगलें व खबरदार ठेवाल तरच हा शून्यप्रदेश ओलांडून जाऊं शकाल. नाहींपेक्षां स्वतःच शून्यांत हरवाल. मग दुसऱ्यानें तुह्मास ओढून काढल्यावांचून स्वतः बाहेर निघतां येणार नाहीं. ह्मणून मी आपल्यास अत्यंत कळकळीनें ही सूचना करून शून्यांत प्रवेश करतों. जर खरोखरच आपल्यासही शून्यांत प्रवेश करणें असेल तर माझी विनंति हृदयांत जागृत ठेवून या ठिकाणच्या लेखांतील ' विचारांशांत ' निमग्न व्हाल. नाहींपेक्षां अक्षराच्या ओळीवांचून पुढें चालते व्हाल.

**आकाश** हे शब्द गुण आणि अवकाश लक्षणरहित असें केवळ

**शून्यरूप** राहिलें. हीं दोन्ही लक्षणें आकाशांतील गेल्यानें पांची तत्त्वांत जे **शब्द,–स्पर्श–,रूप–,रस**–आणि **गंध** असे गुण होते ते तत्त्वांच्या लयाबरोबर लय होत जाऊन जशीं सर्व तत्त्वें पर्यायानें आकाशांत लय पावलीं तसे सर्व गुणही आकाशाच्या **शब्दगुणांत** लय पावून आकाशाचा शब्दगुणही शून्यांत लय पावल्यानें, पर्यायानें सर्वच गुण शून्यरूप झाले. यामुळें पंचीकृत स्थूलसृष्टि तर लय पावलीच, पण अपंचीकृत सूक्ष्मसृष्टि जी केवळ अमूर्त तत्त्वरूप होती तीहि लयास गेली. असें हें ' गुणतत्त्वविकृतिलयरूप ' जें सृष्टीचें स्वरूप हेंच **कारणसृष्टीचें** स्वरूप होय. या कारणस्वरूपीं सृष्टि आपल्या सर्व संस्कारासह ' शून्यरूप ' झाली; हीच आकाशाची ' शून्यरूपता ' होय. असें सर्वच शून्यरूप असतें झालें. आतां शून्य ह्म० जें कांहींच नाहीं असें ' जें ' तें शून्य ह्मणवितें. बरें, जें कांहींच नाहीं तें असूं तरी कसें शकेल व कल्पनेनें ग्रहण तरी कसें करतां येईल ? वंध्यापुत्राचें व शशशृंगाचें अस्तित्व सर्वथा कल्पनेस ग्रहण होत नाहीं. कारण त्यांत अस्तित्वसत्ताच नाहीं. आणि हें सृष्टीचें ' शून्यत्व ' कल्पनेनें ग्रहण होतें. कारण पदार्थाच्या भावरूपतेबरोबर कल्पना होती ह्मणूनच पदार्थाचें ज्ञान होतें. ती कल्पना पदार्थाबरोबर येत असतां पदार्थ नाहींसा झाल्यास त्या पदार्थाच्या अभावासही ती कल्पना पाहिल्यावांचून राहणार नाहीं. बरोबर असलेला सोबती नाहींसा झाला तर सोबत्याच्या भावरूपतेस व अभावरूपतेस पहाणारे आपण असतोंच. कारण अभाव सोबत्याचा झाला आहे, आपला झाला नाहीं. आपलाच झाला असता तर सोबती गेला हें आपल्यास कधींच कळलें नसतें. पदार्थाच्या भावाभावांस जसें आपण पृथक्रूपानें पाहूं शकतों, तसेंच सृष्टीच्या उत्पत्तिक्रमाच्या अनुरोधानें सृष्टीच्या लयापर्यंत आपली विचारशक्ति अगदीं पदार्थांस धरून बरोबर येत आहे, त्याच विचारशक्तीनें सर्व पदार्थांच्या अभावरूपतेस आतां कांहीं उरलें नाहीं. ' **तें शून्य** ' अशी संज्ञा दिली, भांडारगृहांत अंधारांत प्रवेश केल्यास कोणताही पदार्थ दिसत नाहीं. किंबहुना स्वतःचें शरीर सुद्धां दिसत नाहीं. येथपर्यंत सर्व वस्तूंचा अभाव होतो, पण सर्व वस्तूंच्या अभावास कारण

जो अंधकार त्यानें सर्व वस्तूंचा अभाव तर केला, पण अंधकाराच्या द्रष्ट्याचा अभाव करूं शकला नाहीं. व ‘ द्रष्टाही ’ सर्व वस्तूंच्या अभावास कारण जो अंधकार त्यास मात्र पहात आहे. जर त्याचाच लोप झाला असता तर अंधकाराचा साक्षी तरी कोण राहता. त्याचें द्रष्टेपण हेंच अंधकाराचे अस्तित्वास कारण आहे. ह्म० अंधकारांत अस्तित्वसत्ता द्रष्ट्याची आहे. सृष्टीच्या लयानुक्रमाबरोबर विचारशक्तीची कल्पना तादात्म्यरूपानें संलग्न येत चालली असल्यानें तिनें सर्व तत्त्वांच्या लयास ‘ शून्य ’ रूपानें पाहिलें; हेंच शून्यरूप ‘आकाश,’ आणि द्रष्ट्याच्या ‘कल्पनेची’ जी **सत्ता** तीच आकाशाच्या शून्यसत्तेच्या अस्तित्वास कारण झाली. ह्मणून ‘ **शून्य असतें झालें.** ’ असा श्रुतीनें निर्देश केला आहे. याप्रमाणें शून्य अथवा आकाश कांहीं म्हणा एकच आहे. मित्रांनों पहा, आपण शून्याच्या अगदीं तळास येऊन दाखल झालों. आतां येथून सद्गुरुचरणावलंब असेल तरच वर उड्डाण होईल, नाहींपेक्षां पुरा गोता. आणि याच स्थलीं योगी गोता खातो. इतरांची कथा काय आहे. गुरुवाक्यावर दृढविश्वास आणि त्यांचाच बळकट हस्त मागून धैर्यानें उड्डाण फेका. हस्तावलंब दृढ असल्यास भाग्योदयानें शिखरास पोहोंचाल. निदान गोता न खातां सुखरूप मागें तरी याल. आणि पुन्हां प्रयत्न कराल, वाचकांस कदाचित् हीं वाक्यें अप्रकृत वाटतील, पण बुद्धीच्या विचारशक्तीच्या विश्रांतीस्तव आणि गुरुकृपामृतपोषणानें सशक्त होण्याकरितां दिलीं आहेत. विचारवानास जरी पुढें चलतां न बनलें तर मागें तरी सुखरूप जातां यावें. एतदर्थ गुरुस्मरण अवश्य आहे. तें करून पुढें चलावें. असो.

याप्रमाणें ‘ **कारणसृष्टि** ’ सर्वांचा अभाव शून्यरूप झाली. आणि कल्पनाशक्तीनेंही सर्वाभावरूप शून्यग्रहणापर्यंत जोरानें टांकर दिली, ह्मणून ‘ शून्य ’ अस्तित्वांत राहिलें. आतां कल्पनाशक्तीस शून्यांत निरालंब रहातां बनेना, तेव्हां तिनें ‘ शून्यकल्पना ’ सोडिली. तिनें शून्यकल्पना सोडतांच ‘शून्य’ अस्तित्वरहित होऊन खास ‘ कल्पनेंतच ’ लय पावलें. तेव्हां आतां सर्वाभावस्थलीं उरलें तरी काय ? अशी स्वतः ‘ कल्पनाच ’ स्वतः आंन ‘ कल्पना ’ करूं

लागली. हें **मनाचें** स्वरूप होय. लागलींच पुढें दुसरी कल्पना आली कीं, सर्वाभावाची ' द्रष्टी ' उर्वरित **मी आहें**, आतां दुसरें काय पहाणें आहे असा निश्चय झाला. हें **बुद्धीचें** स्वरूप होय. शून्याचा लय या दोन ' कल्पनांत ' होऊन या दोन्हींचा एकदम लय पुढील भावनेंत होतो. आणि ' **माझी मीच आहें** ' अशी भावना उदय पावते. हें अहंकाराचें स्वरूप होय. आणि हीच परमात्मस्वरूपीं मायेची **महाकारणावस्था** आहे. यांत ' माझी मीच ' आहें, ही **भावनाच** महामायेचें स्वरूप आहे. येथपर्यंत त्रिगुणांची सीमा आहे. पुढें मायेस गुणसाम्यावस्थेंत केवळ संस्काराच्या बला**वर** ' माझी मीच आहें ' इतक्याच भावनेनें राहतां बनत नाहीं. म्हणून ' माझी—मी ' इतका ही शब्दांत भेद न ठेवितां ' **मी आहें** ' इतक्याच भावनेनें राहते. ' मी आहें ' या शब्दांत प्रकृति-पुरुषभेद दिसत नाहीं. पुढें कांहीं कारणच न राहिल्यानें ' मी आहें ' या कल्पनेचाहि मूलाधारांत लय झाला. आतां ' **जें जसें आहे तें तसें आहे** ' जेथें कल्पनेचाच प्रवेश नाहीं तेथें शब्द कसा जाईल ? वाचकांनो ! मौन्यानेंच स्वसंवेद्यानुभूति आहे. या स्थलीं पूर्ण निमग्न होऊन ' **तुमचे तुह्मीच व्हा** ' दुसरें कांहीं बोलतांच येत नाहीं. दुर्भाग्यानें कोठें येथें पुन्हां ' शून्य ' अथवा ' अज्ञेय ' अशी कल्पना आणूं नका. कारण, शून्याचा लय पूर्वींच करून तुह्मी चार पांच पायऱ्या वर चढला आहां. आतां जर येथून पुन्हां शून्यांत घसराल, तर पूर्ण भाग्यशून्यच आहां असें ह्मणणें भाग पडेल.

आतां बारा तत्त्वांत आपल्याजवळ काय शिल्लक राहिलें हें पाहिलें पाहिजे. पंचमहातत्त्वांचा विराटात्म्याच्या मनबुद्धिरूप कल्पनेंतच लय झाला. मनबुद्धींचा अहंकारांत लय झाला. अहंकाराचा केवळ अस्मितारूप मायेंत झाला. यांत सृष्टीचीं मुख्य तत्त्वें **पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि** आणि **अहंकार** अशा आठजणांचा लय झाला. आतां यांच्या प्रतीतीमुळें जे प्रतीत झाले होते तेही यांजबरोबर लयास गेले पाहिजे. ते कोणते ? तर **काल, देश गुण** आणि **कर्म**. मनबुद्धिअहंकाराश्रित मायेच्या रज-सत्व-तमो-गुणांचेच परि-

णाम अथवा रूपांतर आकाशादि तत्त्वांच्या शब्दादि गुणांत झालें होतें व गुणानुरूपक्रिया ह्म० कर्म घडत होतें. तीं आधारभूत तत्त्वेंच लोपल्यानें तदाश्रित **गुण** व **क्रियाही** लय पावल्या. अशीं दहा तत्त्वें गेलीं. पदार्थ आहेत तोंवर पदार्थ ठेविण्यास जागा पाहिजे. पदार्थ नसल्यावर स्थलाची अपेक्षा नाहीं. सर्व स्थूल सूक्ष्म सृष्टीच्या समावेशाचें स्थल ' महाकाश ' होतें तें पूर्वींच लय पावून मनबुद्धीच्या संचारानें कांहीं स्थलनिर्देश होत होता, तोहि त्यांजबरोबर लय पावला. अर्थात् **देशही** गेला. उरला विचारकाल. त्याची प्रतीति तरी जोंवर स्थूल–सूक्ष्म तत्त्वांच्या उत्पत्तिलयांची गडबड अथवा निदान कल्पनेची जरी हालचाल होती तोंवर कालाचीही स्थूल सूक्ष्मरूपानें कशी तरी प्रतीति होत होती. तें सर्वच शून्य झाल्यानें शून्य होईपर्यंत कालानें आपली मजल पोंचवून तोही स्वतः शून्य झाला. एवंच सृष्टीचे मूल बारा पदार्थ सर्वच लयास गेले. पण सर्व ' सृष्टिसंस्कारास ' गिळून जी एक **महामाया** परमात्माधिष्ठानीं स्वस्वरूप टाकून जरी लीन झाली तरी पुन्हां पुढील सृष्टीचा ' **आघात** ' रूप धक्का देण्यास **बीजरूप** शेष आहे. यामुळेंच सृष्टि निर्मूल न होतां पुन्हां उदय पावते, व पुन्हां अस्तंगत होते. त्या प्रत्येक उदयास्तांचा उत्पत्तिलयक्रम जसा कांहीं अल्प बुद्धीस दाखवितां आला तसा दाखविला आहे. न्यून असेल तेथें पूर्ण करून घ्यावें. सारांश, व्यष्टीच्या त्रिगुणातीत अवस्थेच्या अनुभवावरून ईशसमष्टीच्या गुणातीतावस्थेचें प्रत्यंतर मिळणार आहे. ती अवस्था श्रीसद्गुरुकृपेनें प्राप्त झाली तरच सर्व गोष्टीचा प्रत्यक्ष मेळ पटतो, नाहींपेक्षां बुद्धीच्या विचारशक्तीचें पर्यवसान अज्ञानांत होतें. व सर्व ' अज्ञेय ' आहे असें वाटतें. हा जो प्रलयाचा प्रकार वर्णन करून दाखविला आहे हा मनन करण्यायोग्य आहे. यास ' लयचिंतन ' असें ह्मणतात. आत्मानुभवसिद्ध्यर्थ हें साधनांत मोजलें आहे. विचारशक्तीनें पदार्थाचें लयचिंतन करून बुद्धीची निर्विषय अशी एकांत स्थिति ओळखण्याचें मुख्य प्रयोजन आहे.

ॐतत्सदिति.

ॐ तत्सत्जीवात्मने नमः

... समाजा ... चिपळूणकर.

# प्रकरण पांचवें.

# जीवानंदप्रदेश.

बीजं संसृतिभूमिजस्य तु तमोदेहात्मधीरंकुरो ।
रागः पल्लवमंबुकर्म तु वपुः स्कन्धोऽसवः शाखिकाः ॥
अग्राणींद्रियसंहतिश्च विषयाः पुष्पाणि दुःखं फलं ।
नानाकर्मसमुद्भवं बहुविधं भोक्ताऽत्र 'जीवः' खगः ॥ १ ॥

'श्रीमच्छंकराचार्यभगवत्पूज्यपादाः'

गेल्या प्रकरणांत परमात्म्यापासून सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय कोणत्या प्रकारें व कसे होतात इ० वर्णन सविस्तर झालेलें वाचकांच्या पूर्ण लक्षांत आलेंच आहे. आतां या प्रकरणांत स्वतंत्रपणें जीवाचा विचार कर्तव्य आहे. करितां सृष्टिप्रकरणांतील सारभूत कांहीं मुद्दे दिग्दर्शनार्थ येथें मांडतों, ह्म० पुढें लिहावयाची गोष्ट चांगली ध्यानांत येईल. अखिल चराचरात्मक सृष्टि बारा तत्त्वांचे मिश्रणापासून झाली, तीं बारा तत्त्वें एकापासून एक अशीं अनुक्रमें कार्यकारणरूपानें व्यक्त होत गेलीं व तशींच पुन्हां उलट क्रमानें लय पावून एकरूप झालीं. अथवा ज्याप्रमाणें नाट्यकलाकुशल नट रंगभूमीवर लोकरंजनार्थ समयानुकूल व कार्यानुरूप अनेक प्रकारचीं वेषांतरें करून खेळ करितो, आणि अनेक वेषधारी व्यक्ति असाव्या असें प्रेक्षकांस भासवितो, आणि वेषाचे भिन्न स्वरूपास व भिन्नकार्यास पाहून प्रेक्षकही वरचेवर मोह पावून मूळचे एका व्यक्तीस विसरतो. अशी जरी सामान्य नटांत शक्ति आहे; तथापि एकाच क्षणीं एकदम चार सोंगें घेण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य नसतें. एक वेष टाकून दुसरा घ्यावा लागतो. अथवा वेगळ्या चार व्यक्ति तयार कराव्या लागतात. तशी गोष्ट या महाजगन्नाटक सूत्रधार **परमात्म्याची** नाहीं. हा सर्वाधार, सर्वस्वरूप, सर्वांतरात्मा, सर्वव्यापी आणि

सर्वमय असा असल्यानें सृष्टींत तद्व्यतिरिक्त एक काडीसुद्धां सांपडणें कठिण आहे. इतकीं अनंत स्वरूपांतरें व वेषांतरें एका क्षणार्धांत धारण करतो आणि सोडतो. जसा एकच सूर्य अनेक दर्पणोपाधींत प्रतिबिंबित होऊन उपाधि चंचल झाल्यानें तो ( ह्म० सूर्य ) प्रचलित झालेला दिसतो, तसा परमात्मा अनंत उपाधींत सर्वांतरात्मत्वेंकरून विलसत असतो. आणि उपाधिकृत कार्यांनीं कार्यकर्ताही दिसतो. पण जेथें उपाधि ही परमात्मा व उपाधींत असलेलाही परमात्माच, मग कार्य तरी परमात्मरूपतेहून भिन्न कसें होऊं शकतें. ह्मणूनच परमात्म्यास **सर्वमय** हें विशेषण लागतें. आणि सर्व स्वरूपें धारण करून ही सर्वांहून पृथक् स्वरूपानें त्यास राहतां येतें. असें अचिंत्य आणि अगाध सामर्थ्य परमात्म्यांत असल्यानें स्वेच्छाविहारार्थ सृष्टिकार्यांत प्रवृत्त होऊन जसें कारण लागत गेलें, तशीं अनेक रूपांतरें केलीं. त्यांतील जगन्मूलकारण आठ तत्त्वें व्यक्त झालीं व त्यांचे योगानें चार तत्त्वें आणखी व्यक्त झालीं. अशीं एकंदर बारा तत्त्वें होऊन त्या सर्वांची मूल जननी ह्म० सृष्टिविहारार्थ प्रवृत्तीची इच्छा, हीच परमात्म्याची **इच्छा** आदिमाया चिच्छक्ति आणि **'जगन्मूलकारण'** आहे. येथपर्यंत कारणपरत्वें रूपांतरें करून कारणसंचाररहित असें **अधिष्ठानरूप** अलिप्त आहे तसेंच आहे. प्रवृत्तीची इच्छा झाली कीं, इच्छेनें पुढील सर्व खेळ मांडलाच व इच्छानिवृत्ति झाली कीं, सर्व खेळ एकदम कसा समेटला जातो याचा प्रकार गेल्या प्रकरणाचे आरंभीं सृष्ट्युत्पत्तिक्रम आणि प्रकरणसमाप्तींत सृष्टिलयक्रम सविस्तर दाखविलाच आहे. त्यांत मुख्यतः ही गोष्ट ध्यानांत आणिली पाहिजे कीं, लयाचा जो अनुक्रम दाखविला आहे, त्यांत ह्म० सहस्रावधि युगें लागलीं असतील असें नाहीं. तर परमात्म्याचे निमिषोन्मेषणाचा काल तितक्या कार्यास बस्स आहे.* त्या एकदम होणाऱ्या संहारक्षणीं सृष्टीच्या सीमेंत यावत् पदार्थमात्र व जीवमात्र जे जेथें जशा स्थितींत संकल्पबद्ध असतील ते तेथल्या तेथेंच संहार पावतात. उत्तरक्षणांत अन्य संकल्प उदय पावण्याची सवडच सांप-

* उत्पत्तीपेक्षां संहारास काल थोडा लागतो. एकादें शहर वसाविण्यास व घर बांधण्यास जितके दिवस लागतात तितके विध्वंस करण्यास नकोत.

डत नसल्यानें जड पदार्थ आपले मूलबीजांत व जीवमात्र आपले **संकल्पांत** लय पावतात इ० नाश पावत नाहींत. लय होणें आणि नाश पावणें यांत महदंतर आहे, तें मागें दाखविलेलें लक्षांत असूं द्यावें. लय झालेल्यांचा संस्कार शेष उरत असतो तोच पुनः पुनरुत्पत्तीस कारण होतो.

येथें अशी शंका येईल कीं, संहारक्षणीं जे जीव निद्रिस्त असतां मरण पावतील, त्यांस संकल्पाचा उदय नसल्यानें ते पुनरुत्पन्न कां होतील? त्याचें उत्तर असें कीं, पुनर्जन्म न होण्यास संकल्पाचा 'लय' हेतु नाहीं. संकल्पाचा 'नाश' झाला पाहिजे. तो नाश सुषुप्तींत होत नाहीं ही गोष्ट अ० बो० कारणप्रकरणांत सिद्ध झाली आहे. व पुढेंही आणखी येणार आहे. महाप्रलयक्षणीं निद्रिस्त असो, स्वप्नांत असो, जागृतींत असो, मूर्छेत असो वा कसाही असो, जावत् कालपर्यंत संकल्पाचा क्षय झाला नाहीं, तावत् कालपर्यंत कोट्यवधी सृष्टिकल्प जरी लोटले तरी पुनरुत्पत्ती पिच्छा सोडीत नाहीं. ज्ञानप्राप्तीवांचून संकल्पक्षय त्रिकालांतही होणें नाहीं व होत नाहीं. पण ज्ञानावांचून संकल्पक्षय इ० काय हेंही यथार्थ समजणें दुरापास्तच आहे. संकल्प शेष राहिल्यानें पुन्हां परतावें लागतें हें खास समजावें. असो.

प्रलयकालीं ज्या जीवानें आपली जशी स्थिति व जो संकल्प सोडला असेल त्या संकल्पाच्या अनुरोधानें, पुन्हां सृष्टि उदय पावली इ० जीवमात्रांस आपापली स्थिति प्राप्त होते. इ० जसें कांहीं संचित **कर्म** असेल व कर्मानुरूप संकल्प असेल तशी भोग्य विषयसामुग्री इ० शरीर, इंद्रियें आणि भोग्य पदार्थ जन्मापासून अनुक्रमें प्राप्त होऊं लागतात. केवळ संकल्पानेंच काम चालावयाचें नाहीं, संकल्पांत कर्माचा जोर असला पाहिजे. दरिद्री मनुष्यास मरतांना मीं पुढें राजा व्हावें अशी वासना राहिल्यानें तो राजा होणार नाहीं. राज्यपदप्राप्त्यर्थ जें तपानुष्ठान सांगितलें आहे तें पूर्ण करून ठेविलें असेल तरच पुढील जन्मांत राज्यपदप्राप्ति होईल, इ० राजकुलांत जन्म होईल. अथवा पराक्रमाची अनुकूल सामुग्री मिळून स्वबलानें राज्य* मिळवितां येईल. अशा प्रकारच्या तपानुष्ठानकर्मानें बद्ध

* शिवाजीमहाराज आपल्या प्रतापानें छत्रपती झाले.

झाल्यावर—मरणकालीं मला राज्यपद नको—अशी जरी जीवाची वासना झाली तरी राजकुलीं जन्म मिळाल्यावांचून राहणार नाहीं. संकल्पाचें एवढेंच कार्य आहे कीं, जीवास कर्मांत प्रवृत्त करणें ह्म० ज्या फलप्राप्त्यर्थ जें कर्म केलें पाहिजे त्या फलेच्छेनें त्या कर्मांत प्रवृत्ति करून देणें. बस इतकेंच कार्यतें. यथासांग कर्म घडलें असलें ह्म० तें फल दिल्यावांचून राहत नाहीं. कर्मबलावांचून कोरडे संकल्प जसे उत्पन्न होतात तसेच ते निष्फल जातात "उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः" असें कवीचें ह्मणणें आहे. सारांश पुनरुत्पत्तिकालीं जीवमात्रांस आपले पूर्वकर्मानुसार सर्व स्थिति प्राप्त होते. कोणी ह्मणतील कीं आमचीं मातापितरें, नवराबायको, मुलें, बंधु, इष्ट, मित्र, इ० सर्व पुन्हां भेटतील काय ? होय, होय, सर्व भेटतील, पण भेद इतकाच आहे कीं, आपण कोणी कोणास ओळखूं मात्र शकणार नाहीं. असें दीर्घतम अज्ञानाचें आवरण आपल्यावर छावणार आहे. सुषुप्तींत नित्य पांच चार तासच अज्ञानांत आपण राहतों, त्यामुळें आदले दिवशीं सामान्य पाठ केलेले धडे व सामान्य किरकोळ गोष्टींची विस्मृति पडते. पुष्कळ दिवस न पाहिलेल्या अशा आपल्याच आप्ताची ओळख आपण विसरतों. पुष्कळ दिवसांची विस्मृत वस्तु पुन्हां प्रयत्नानेंही लवकर आठवत नाहीं. अशी सामान्य अज्ञानावस्थेची गोष्ट आहे. मरणकालीं महासुषुप्तींत प्रवेश होतो; त्यांत बराच काल अज्ञानांत व्यतीत होतो. आणि पुढें देहादि सर्वच प्रपंच नवा प्राप्त होत असल्यानें पूर्वस्थितीची वर्तमानकालच्या सृष्टींतल्या सृष्टींतच अशी विस्मृति पडते. मग जेव्हां सृष्टीचाच प्रलय होऊन अनंतकालपर्यंत प्रचंड अज्ञानांत केवळ संस्काररूपानें जीवमात्रांस अव्यक्त दशेंत लीन रहावें लागतें, तेथें स्मृतीचा काय पत्ता आहे. आणि त्यांतून पुढें बाहेर जे निघणार त्यांस आपण पूर्वी कोण व कोठें होतों याचा पत्ता लागतो कशाला, आणि हा पत्ता लावण्याची कोणी खटपटही करतो कशाला. कारण त्यावांचून कोणाचें कोणतेंच काम अडत नाहीं. असो. मरण आणि महाप्रलय हे तर दीर्घाज्ञानाचे विस्मृतिरूप प्रदेशच आहेत. यांत स्वतःची विस्मृति पडण्यांत जीवाचा कोणताही अपराध नाहीं. पण मित्रानों, जिला आपण सज्ञानावस्था ह्मणतों, सृष्टिन्या-

पार करितों, आपल्यास विचारसंपन्न समजून हल्या त्या इच्छिआहे. जीवि-र्यास प्रवृत्त होतों, फळें साध्य करून घेतों, त्यांचे भोगही श्य असतो. त्यांपासून सुखी व तसेच दुःखीही होतों. आणि जन्मापासूनद झाले आ-पर्यंत स्वार्थांत प्रवृत्त राहून न जाणें काय काय करतों; पण अथवा जड करतो कोण ? कोणासाठीं करतो ? व याचा भोक्ता जो मी–म्रसमर्थ अ-राहिला आहे हा–मी कोण आहे. याचा जर अज्जीं पत्ता कोण्र्चीं पडलीं वीत नाहीं. आणि जीवित्वाचे स्थितींतच स्वतःला जर विसरून ख्य देहां-त आहे, तर मग मेल्यानंतर पुनरुत्पत्तींत पूर्वीं मी कोण होतजीवन-माझे आप्तबंधू कोण होते याचा काय ठिकाण लागणार आहे. वि-प-चारी मनुष्यांस ही गोष्ट केवढी लज्जास्पद आहे बरें ? कीं मी–मी करून सर्व सृष्टीची उठाठेव डोक्यावर घ्यावी आणि हें डोकें कोणाचें व मी कोण याचा थांग लागूं नये आणि त्यानेंही पण लावूं नये, या अंधेरास ह्मणावें तरी काय ? करितां आधीं आपण कोण आहों याचा पत्ता लाविलाच पाहिजे. यांत हयगय करणें ह्म० महा भयंकर चूक करणें आहे. या चुकीहून कोणतीही दुसरी मोठी चूक सृष्टींत नाहीं. सर्व प्रकारच्या यावत् चुकीची–ही चूक आद्यजननी आहे. आणि विचारी पुरुषाच्या विचारांत जोंवर ही पर्वताएवढी चूक आहे व ती त्यास समजल्यावरही त्यानें न काढली तर त्यास विचारशील हें नांव शोभणार नाहीं. यास्तव प्रत्येकानें त्याविषयीं आळस न क-रितां मी कोण आहें याचा प्रथम शोध केला पाहिजे. ह्मणून आतां आपण आपलें शोधार्थ वळूं.

**जगदीशानें** आपल्या स्वरूपापासून चराचरात्मक सृष्टि निर्माण करून तोच सर्वात्मस्वरूपानें प्रत्येक उपाधींत विराजमान झाला आहे. त्यानें अनंत नामें व अनंत रूपें धारण करून आपले स्वरू-पाची, आपले गुणाची, आपले शक्तीची व आपले ऐश्वर्याची सर्व-गुणसंपन्न अशी अतिसूक्ष्म प्रतिमा जो मनुष्य जीव तो निर्माण करून त्यास विचित्र पण खुबीदार अशी विचारशक्ति देऊन व त्यास स्व-तंत्र करून त्याचे उन्नति व अवनतीची सर्व जबाबदारी त्याजवर सों-पविली आणि आपण मोकळा झाला. त्यानें ज्याप्रमाणें मनुष्यास बु-द्धि दिली आहे त्याप्रमाणें मनुष्येतर जीवमात्रांसही बुद्धि दिली आहे,

जीवांचे बुद्धींत सारासारविचारशक्ति दिली नसल्यानें स्व-ति, अवनति व सुधारणा इ० गोष्टींची जबाबदारी त्यांज-नाहीं. ते केवळ देहधारी असून देहाचे जीवनपरिचर्येस अति वढेच व्यवहार करण्याचें ज्ञान त्यांस असतें, ह्म० आहार, थुन, प्राणरक्षण व प्रबलानें निर्बलास खाणें, पछाडणें इ० च कायतो त्यांचा जगद्व्यापार आटोपतो. यापेक्षां जगांत अधिक कर्तव्य नसतें. कारण या सर्व भोगयोनी आहेत. क-योनी कायती मनुष्याचीच. मनुष्याकडून सामान्य चांगलीं वा-ईट जशीं कर्मे घडतील त्यांचा उपभोग मनुष्यदेहानें होतो. अति चांगलीं कर्मे घडलीं तर त्यांचे भोगार्थ देवशरीरें प्राप्त होतात. आणि अति नीच कर्मे घडलीं ह्म० त्यांच्या दुःखभोगार्थ मनुष्येतर देह प्राप्त होतात. अशी देवयोनी व तिर्यक् ह्म० मनुष्येतर योनी ह्या भोगयोनी आहेत. ह्म० पूर्व कृतकर्मांचा भोगच फक्त त्यांत होतो. त्या योनींत कर्तव्यता नाहीं. आणि मनुष्ययोनींत सर्व कर्तव्यता व शक्ति अस-ल्यानेंच मनुष्यजन्म सर्वांत श्रेष्ठ मानला गेला आहे. परमात्म्यानें त्यास विचारशक्ति देऊन पूर्ण समर्थ केला आहे. तिच्या बळावर तो पुन्हां परमात्मस्वरूपीं प्राप्त होऊन जन्ममरणरहित होतो. वा-स्तविकरीत्या जीवास जन्ममरण नाहीं; तथापि त्यानें आपले अज्ञा-नानें बळेंच तें आपल्यावर ओढून घेऊन भ्रांतीनें मी जन्मतों, मरतों असें अज्ञान धरून तो बसला आहे. तें अज्ञान दूर झालें कीं तो परमा-नंदस्वरूपच आहे. आपले स्वरूपविस्मृतीनेंच हें अज्ञान आलेलें आहे. तें आपले स्वरूपज्ञानानेंच जाणार आहे. त्या स्वरूपाचे शो-धार्थच मी कोण आहें या गोष्टीचा शोध विचारशीलांनीं अवश्य केला पाहिजे.

## जीव शब्दाची व्याख्या.

कोणीही विचारी पुरुष ईश्वरनिर्मित अतर्क्य सृष्टिरचनेकडे वि-चारपूर्वक अवलोकन करूं लागल्यास अनंत प्रकारच्या मनुष्य, पशु, पक्षी, कीटकादि सर्व जीवकोटींतील एक जीव मीहि आहें; व सृष्टि रचनेशीं माझा पुष्कळ प्रकारें संबंध आहे, असें त्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं. जन्मापासून मरण येईपर्यंत प्रत्येक प्राण्याचा जो सृ-

ष्टीशीं संबंध असतो त्यास मुख्य हेतु प्राण्याचें जीवित्व आहे. जीवित्व न राहिलें ह्म० जो सृष्टीचा संबंध असतो तो अदृश्य असतो. जीवित्वव्यवहारावरूनच सजीव व निर्जीव असे दोन भेद झाले आहेत. जीवंत असलेला सजीव आणि मृत झालेल्यास अथवा जड पदार्थास निर्जीव असें ह्मणतात. यावरून जीवनव्यापारसमर्थ असा **जीव** आहे. या जीवावर शरीराचीं वेष्टनें अनेक प्रकारचीं पडलीं आहेत. मनुष्यदेह, पशुदेह, पक्षीदेह, कृमिकीटादि जातींचे असंख्य देहांचीं आच्छादनें जीवावर पडून देहस्थित जीव देहद्वारा आपले जीवनव्यापार करतो. देहाचे आवरणांत अनंत प्रकारचा विचित्र भेद असल्यानें देहस्थित जीवांतही भिन्नता दिसूं लागली. तथापि देहास जशीं भिन्नरूपें व भिन्ननामें आलीं तशीं देहस्थित जीवांस आलीं नाहींत. ह्म० मनुष्यदेहांतही जीव आहे. पशुदेहांतही जीव आहे; आणि कृमीदेहांतही जीवच आहे. देहाच्या भेदानें जशा भिन्न जाती दिसतात त्या भिन्न जातींप्रमाणें जीवही भिन्न दिसला पाहिजे होता. पण **मी** आहें, या शब्दांत जसा स्त्रीपुरुषादि जातीभेद दिसत नाहीं, तसाच **जीव** या शब्दांत कोणत्याही शरीराचा भेद प्रतीत होत नसल्यानें सृष्टींतील यावत् देहधारी प्राण्यांत जीव हा एकरूपानें आहे. ह्मणूनच यावत् जीवमात्रांची फक्त जीवनरक्षणाची क्रिया अगदीं एकसारखी आहे; व तितक्याच क्रियेला अनुकूल असे शरीरधर्मही सर्वांचे समान असतातः यावरून सृष्टींतील यावत् देहधाऱ्यांत जीवित्वप्रतीतीस कारण जो **जीव** हा सर्वांत एकरूप आहे. याचे स्वरूपांत भेदाचा लेशसुद्धां नाहीं. अशा अभिन्न स्वरूपी जीवास **प्राण**-**आत्मा** असेंही ह्मणतात.

## जीवाचे स्वरूपाचा शोध.

वरील व्याख्येवरून जीव हा शरीरांत असवा असें वाटतें आणि त्या जीवासच उद्देशून **मी** हा शब्द लाविला जातो. पण व्यवहारप्रवृत्तींत मनुष्य, मी अमुक काम करीन अथवा केलें असें प्रतिज्ञेनें सांगतांना मी ह्मणून छातीस हात लावून सांगतो व शरीराकडून घडणाऱ्या यावत् व्यापारांचा कर्ता मी आहें असें मानतो. असें मानतांना शरीरांत राहणारा मी वेगळा आहे असें यास भान रहात नाहीं,

अथवा होत नाहीं. यांत मी ह्मणून जो आंत होता तो शरीरावर बाहेर आला. म्हणजे जो मी निखालस जीव होता तो मी देहधारी अर्थात् देहरूप झाला. पुढें देहद्वारा सृष्टिव्यापारांशीं संबंध होतांच तेही व्यापार आपल्यावर ओढून तद्रूप होत चालला; तो इतका कीं, पुन्हां मागें परतून पाहणेंसुद्धां विसरला. त्यामुळें मूळचा मी कोण यांतच भ्रांति पडली; आणि हा मी कीं तो मी असा घोंटाळा उडाला. असो. उडाला तो उडाला पण घोंटाळा आहे, असें समजल्यावर तरी त्याचें निराकरण केलें पाहिजे. करितां आपण आतां मीपणाचे शोधार्थ तीन कक्षा प्रथम करून पाहूं. यांत पत्ता न लागल्यास आणखी आंत शिरूं. सध्यां आपण फार बाहेर आहों. ह्म० सृष्टिव्यापारांत आहों. येथून शोध करीत करीत आंत जावयाचें आहे. असा आंत आणि बाहेर दोन प्रकारचा भेद उंबरठ्याप्रमाणें या आपल्या देहानें केला आहे. ह्याच तीन कक्षा आपण सध्यां मानूं. बाहेरचा सृष्टिव्यापारी मी, मधला देहधारी मी, आणि आंतला जीव मी, अशीं मीपणाचीं तीन स्थलें झालीं. त्यांत प्रथम बाहेरचे कक्षेंतच शोध करूं. यावर कोणी वाचक ह्मणतील कीं, बाहेरून हेलपाटा खात जे आंत शिरणार ते आंतल्या आंतच शोध कां करा ना ? ह्म० पत्ता लवकर लागेल. त्यांस माझें सविनय उत्तर असें आहे कीं, यापूर्वीं जीं प्रकरणें लिहिलीं तीं सर्व आंतल्याच शोधाचीं आहेत. तेथें ज्यांस आपलेपणाचा पत्ता लागला असेल त्यांस बाहेरून शोध करीत जाण्याची जरूरच उरली नाहीं. पण ज्यांस तेथें थांग लागला नसेल त्यांनीं पुन्हां बाहेरून शोध करीत आंत जाऊन आपलेपणास शोधून घेण्याकरितांच स्वतंत्र हें प्रकरण लिहीत आहें.

---

## जीवशोधनाच्या तीन कक्षा.

### पहिली आद्य कक्षा.

जीवशोधार्थ केलेल्या तीन कक्षा ह्म० व्यवहारी मी, देहधारी

मी आणि जीव मी, यांत प्रथम व्यवहारी मी या कक्षेचा शोध केला पाहिजे. व्यवहारी मीपणांत मनुष्य देहाहून पृथक् सृष्टिव्यापारांत घडणारी यावत् क्रिया आणि पदार्थ यांचा आरोप आपल्या शिरावर घेऊन तन्मय होतो. जसें मी राजा, मी प्रधान, मी धनवान्, मी पेढीवाला, मी व्यापारी, मी शूर योद्धा, मी विद्वान्, मी वक्ता, मी दाता, मी क्रियावान्, मी गुणवान्, मी शहाणा, मी मूर्ख ( मी मूर्ख असें सृष्टींत क्वचितास वाटत असेल. त्यांत मूर्खास तर कधीं वाटणारच नाहीं. ) मी दरिद्री इ० जितक्या विशेषणांत मीपणा गुंतला आहे तीं सर्व विशेषणें केवळ बाह्योपचारिक आहेत. त्यांत हीं माझीं विशेषणें असून मी विशेष्यरूप याहून कोणी वेगळा आहें असें यास भान न राहतां विशेषणरूप होतो. कसा तो पहा. मी राजा, यांत राष्ट्रसीमेपर्यंत भूमि, कोश ह्म० खजिना, चतुरंग सेना ह्म० पायदळ घोडेस्वार इ०, तोफखाने आणि यांस लागणारी खटपटी मंडळी, प्रधान आणि सेनाधिपापासून तों कनिष्ठ शिपाई यांपर्यंत सेवक वर्ग, आश्रित, विद्वान्, सभासदादिक, बंधुजनादि आप्तवर्ग आणि प्रजाजन इ० सर्वांचें नीतीनें, प्रेमानें आणि दक्षतेनें नियमन करणारी जी एक व्यक्ति तिचें विशेषण राजा हें आहे. व नियमन करणें हें त्या व्यक्तीचें कार्य आहे. तें कार्य जोंवर त्याजकडे आहे व यथास्थित चालू आहे, तोंवर ती व्यक्ति राजा आहे. अन्य प्रबल राष्ट्राधिपानें याला पदच्युत करून सर्व ऐश्वर्य हरण केल्यावर या व्यक्तीचें राजा हें विशेषण जाऊन केवळ व्यक्तीचें पाळण्यांतलें नांव शेष राहील. यावरून राज्यपद व राजशासन ह्या औपचारिक उपाधि असून त्यांत गुंतलेली व्यक्ति आपलें व्यक्तित्व विसरून मी राजा असें ह्मणते. यांत राज्य हें व्यक्तीचा एकादा अवयव अथवा तिचें शरीर नसून त्याच्या नाशानें व्यक्तीचा नाशही होत नाहीं. त्याअर्थी मी राजा ह्मणण्यांत मीपणा राजा नव्हे. राजेपणापासून मी वेगळा आहे तोच प्रकार मी प्रधान आहें यांत समजला पाहिजे. प्रधानगिरी हें काम असून मी ह्मणणारी व्यक्ति ही कामाहून पृथक् असल्यानें मीपण प्रधान नव्हे. मी धनवान्, मी पेढीवाला, मी व्यापारी यांत धनाचे ह्म० नाण्याचे विपुलतेनें धनिकत्व आलें आहे, दहा ठिकाणचे व्या-

पाराच्या एकीकृतसंबंधानें पेढीवालेपणा आला आहे. व्यापाराचे अनेक पदार्थ एका दुकानांत जमवून देण्या घेण्याची क्रिया करणारा व्यापारी ह्मणवितो. अशीं ह्या धनद्रव्यादि पदार्थांच्या संग्रहादि व्यापारानें धनिक, पेढीवाला व व्यापारी ह्या उपाधींचीं विशेषणें मीपणावर आलीं आहेत. द्रव्यादि पदार्थनाशानें मीपणाचा नाश होत नाहीं. अथवा त्या क्रिया बंद पडल्यानें मीपणांतून कांहीं तूटफूट होत नाहीं. तेव्हां यांतून मी वेगळा आहे. मी योद्धा, मी विद्वान, मी वक्ता, मी दाता, मी क्रियावान्, मी गुणवान् ह्मणून शहाणा, मी मूर्ख, या विशेषणांत मी योद्धा ह्म० युद्धकलेची विद्या, शस्त्रादिक वाहनादि सामुग्री, आंगीं निर्भयता आणि संग्राम व शत्रु, इतकीं साहित्यें ज्या व्यक्तीस प्राप्त होतील ती व्यक्ति शूर योद्धा ह्मणवेल. यांतून एक जरी गोष्ट कमी असली तर याच्या योद्धेपणांत न्यूनता आली, पण मीपणांत मात्र कांहीं न्यूनता आली नाहीं. तरी या सर्व साहित्यांहून मी कोणी वेगळा आहे. तसेंच विद्यासंपादनानें विद्वान् व वक्तृत्वगुणानें वक्ता, दातृत्वशक्तीनें दाता, चांगल्या क्रिया करण्यानें क्रियावान्, उत्तम गुण आंगीं आल्यानें गुणवान्, शहणा आणि तद्विरुद्ध मूर्ख इ० हीं विशेषणें मीपणामागें लागलीं आहेत. या गुणांच्या न्यूनतेनें अथवा अभावानें मीपणांत न्यूनता अथवा मीपणाचा अभाव होत नाहीं. तेव्हां मी या सर्वांहून वेगळा आहे. राजा आणि धनिक यांचा प्रतिपक्षी दरिद्री आहे. यांच्या परस्पर वैभवाची आपसांत बदली केल्यास एक दुसरा होतो ह्म० राजा दरिद्री आणि दरिद्री राजा तत्काल होतो. उशीर लागत नाहीं. कारण मावस बंधू पडलेना ? मोठ्या बहिणीचे ( ह्म० आकाबाईचे ) चिरंजीव दरिद्री आणि धाकटीचे ( ह्म० लक्ष्मीबाईचे ) श्रीमान्, परस्पर प्रेम फारच; मग बदलींत वेळ कशाला लागणार. असो. आतां कोणी सर्वशक्तिमानानें राजास ह्म० राजव्यक्तीस सर्व वैभवापासून नागवून एका वस्त्रानें ठेवून निकृष्ट स्थितींत उभें केलें आणि दरिद्र्याचेंही दारिद्रैश्वर्य स्वयंहरण झालेलेंच आहे. त्याजलाही एका वस्त्रानें उभें केलें. असे दोघेही जोडीनें उभे असलेले कोण्या तिऱ्हाइतानें पाहिल्यास त्याजला ते श्रीमान् व दरिद्री या भेदानें न दिसतां केवळ मनुष्य व्यक्ति-

रूपानें एकच दिसतील. मनुष्यदेहांत व्यक्तींनीं संपादिलेल्या गुणांनीं व द्रव्यादिक ऐश्वर्य भोगसाधनांनीं वरील दाखविलेलीं सर्व विशेषणें व्यक्तीस लागून सर्व गुणविशिष्ट व्यक्ति झाली आहे. हे सर्व गुण व्यक्तीचे अवयव अथवा अंग नसून सृष्टिव्यवहारानें व्यक्तीवर औपचारिक आले आहेत. गुणांचे न्यूनतेनें अथवा राहित्यानें व्यक्तींत न्यूनता येत नाहीं. व व्यक्तित्व नष्ट होतें असेंही नाहीं. मीपणामागें ह्या सर्व उपाधी लागल्या आहेत. व उपाधींत वेष्टलेला जो 'मी' तो उपाधि नसून उपाधीस आपल्याहून वेगळा पहाणारा साक्षीरूप आहे. अर्थात् या सर्वांहून मी ह्मणणारा कोणी वेगळा आहे हें सिद्ध झालें. या दिलेल्या उदाहरणावरून वाचकांनीं आणखी हवीं तितकीं उदाहरणें जुळवून घ्यावींत. मी सर्वांहून पृथकच सांपडेल. असो. मित्रांनों, आपण आपले मीपणास धुंडण्याकारितां ज्या तीन कक्षा केल्या आहेत त्यांतील बाह्यकक्षा जी सृष्टिव्यापारी मीपणाची होती, त्यांतील प्रमुख मुद्याचे ठिकाणीं आपण मीपणाचा शोध केला. परंतु शोधाअंतीं मी ह्मणणारा सृष्टिव्यापारकक्षेंतून निसटला. अविचारकालांत मी राजा, मी योद्धा, मी श्रीमान्, मी चतुर, मी विद्वान्, असें मी मी ह्मणत पुढें सरसावला होता, पण विचाराअंतीं बाह्यकक्षेंत मी नाहीं, असें सिद्ध झालें. आणि आपणास तर मी कोण हें धुंडून काढावयाचें आहे, तेव्हां येथें स्वस्थ न बसतां दुसऱ्या कक्षेंत ह्म० मधल्या **मी देहधारी** या कक्षेंत चलून शोध केला पाहिजे. कारण हा येथून आंत पळाला आहे, असा त्याचा बाहेरूनच सुगावा लागत आहे. ह्म० मी राजा, मी योद्धा, मी विद्वान्, असें दुसऱ्यास दरडावून सांगतांना हा छातीस हात ठोकून आपली धमक दाखवितो. कार्यार्थ अंगविक्षेपही करतो ह्म० शासन करीन असें ह्मणून हात उचलतो, लत्ताप्रहार करतो, आणि विशेषतः **मी मी** तोंडानें ह्मणतो. तेव्हां याचें तोंडच आधीं धरलें पाहिजे. मग कोठें पळतो तो पाहूं.

---

## जीवशोधनाची दुसरी मध्य कक्षा.

मित्रांनों, मी म्हणणारा हा गृहस्थ असला धूर्त व चपल आहे कीं, याचे शोधार्थ कोणी याचा पाठलाग करूं लागल्यास केव्हांच डोळा चुकवून भुलथाप देऊन नाहींसा होतो हें कळत सुद्धां नाहीं. धुंडणारा पूर्ण चतुरच असला तरच त्यास सांपडतो. नाहींपेक्षां सरतेशेवटीं तो धुंडणाराच्या आंत लपून धुंडणारास तोंडघशीं पाडतो. याकरितां शोधकानें फार सावधगिरी ठेवून याचा पिच्छा सोडतां कामा नये. हा मलत्यालाच तुमचे ह्म० शोधकाचे हातीं मी ह्मणून धरवून आपण लांब होत असतो. ही याची मुख्य लपंडावी आहे. हा जरी समोरून निसटला तरी याचा पायमाग सोडूं नये. हीच याच्या धरण्याची मुख्य किल्ली आहे. मागल्याच कक्षेंत पाहाना, सृष्टिव्यापार हे सर्व क्रियारूप आणि उपाधिरूप आपल्याहून अगदीं पृथक् असतां व आपण क्रियेचा कर्ता असतां कर्तृत्वरूप टाकून क्रियारूप झाला. विशेष्यरूप असतां विशेषणरूप बनला. आणि शोधक पाठलाग करितो असें दिसतांच सृष्टिव्यापारांत त्यास भुलवून त्याचे हातीं क्रियारूपत्व देऊन क्रियेचा कर्ता जो मी तो आपला लांब झाला. कां याचा धूर्तपणा ध्यानांत आलाना ? पण मी मी असें ह्मणून छातीस हात लावतो. या खुणेवरून तोच त्याचा हात बळकट धरला ह्मणून स्वारी उभी तरी आहे. असो. आतां येथून नव्या प्रकारच्या जिज्ञासेनें प्रवृत्त झालेल्या जिज्ञासूच्या संविधानकरूपानें विषयारंभ करितों; लक्ष असूं द्यावें.

स्वानंदनगरीं सदैव वास करणारा महाप्रबल प्रतापशाली आणि सार्वभौम सत्ताधीश असा **शीलनिधि** नामें राजा राज्य करीत असे. तो अत्यंत विचारशील होता. त्याला कांहीं कारणानें 'शरीरांत 'मी' ह्मणणारा कोण आहे' हें जाणण्याची अकस्मात् जिज्ञासा होऊन किंचित् अविचारानें व लीलेनें* त्यानें सर्व वर्गांच्या एकेक प्रमु-

* राजानें असें करण्यांत त्याचा कांहीं दुष्ट हेतु नव्हता. स्वतःची जिज्ञासा पूर्ण व्हावी आणि इतरांस जिज्ञासा उत्पन्न व्हावी. आणि या समुदायांत कदाचित् कोणी आत्मनिष्ठ विभूति सांपडल्यास तिच्या कृपेनें आपल्यास कृतकार्य होतां येईल, असा त्याचा उद्देश होता. ह्मणून त्यानें शीघ्र विचाराची चमत्कारिक दिशा धरली.

ख व्यक्तीस सर्वस्वीं नागवून एका वस्त्रानिशीं समोर उभें करून, आतां सत्य बोला तुह्मी सर्व कोण आहां ? असा प्रश्न करितांच सर्वस्व नागविल्याचे लज्जेनें त्यांस एकदम उत्तर देतां बनेना, तेव्हां आपसांत सल्ला करून हळूच प्रत्येक सांगतात; हे राजन् माझें सर्वस्व राज्य हरण झाल्यानें आतां मी केवळ **शांतिवर्मा** नामक क्षत्रियजाति आहें. व माझा क्षात्र धर्म आहे. दुसरा ह्मणतो मी **सुबोधशर्मा** ब्राह्मण असून श्रुतिस्मृत्युक्त माझा वैदिक धर्म आहे. मी **भद्रसेननामा** वैश्य असून वणिज व्यापार माझा धर्म आहे. मी **सुदास नामक** शूद्रजाति असून माझा सेवा धर्म आहे. याप्रमाणें अनेक भिन्न जातींनीं आपलीं नामें व धर्म सांगितले. तथापि राजाचा त्या सर्वांचे सांगण्यावर प्रथम भरंवसा बसेना. त्यानें जास्त बारकाईनें पाहतांच एक दोन वर्गांत त्याजला आणखी पोटभेद दिसून आले त्यांवरून विचारतां पुनः ते एक ब्रह्मचारी, दुसरा गृहस्थ, तिसरा वानप्रस्थ, चौथा यती, असे वर्णांतर्गत आश्रमही सांगू लागले. तेव्हां शोधक राजास जास्त संशय आला. कारण हे सर्व दिसण्यांत तर सारखे दिसतात. पण एकाचे बोलण्याचा दुसऱ्याशीं मेळ पटत नाहीं. तेव्हां राजानें यथार्थ बोलण्याकरितां पुनः तोच प्रश्न केला. त्यावर मी ब्राह्मण ( ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, यती )' मी क्षत्रिय, मी वैश्य, मी शूद्र ( मी सोनार, शिंपी इ० सरतेशेवटीं मी चर्मक, मी श्वपच ) अशींच सर्वांनीं उत्तरें ( नामवर्णधर्माश्रम युक्त मी ह्मणून ) दिलीं. त्यावर राजा रुष्ट होऊन पुन्हां ह्मणाला कीं माझा प्रश्न काय ? आणि तुह्मीं उत्तरें देतां कोणती तुह्मांस आपली शुद्धि आहे काय ? त्यावर सर्वांनीं तींच उत्तरें दिलीं कीं **मी** ह्मणणारेच आह्मी ब्राह्मण क्षत्रियादिक आहोंत. याहून आह्मी कोणी वेगळे नाहींत. त्यावर जिज्ञासु राजा ह्मणतो तुह्मी कोणी माझ्या प्रश्नांचें बरोबर उत्तर देत नाहीं. व मला फसवूं इच्छित आहां, याकरितां तुह्मां सर्वांस एका जागीं ठेवतों. तेथें तुह्मीं सर्वांनीं एक रात्र राहून एक खानपानव्यवहार करून सर्वांनुमतें विचार करून माझें उत्तर उदईक द्यावें. अशी कडक आज्ञा देतांच सर्वांनीं हाहाःकार केला. कीं, हे राजा हा काय वर्णसंकर करितोस. अरे, अशा

व्यवहारानें आमची जाति, धर्म, आश्रम, वर्ण इ० सर्व नष्ट होतील. असें भलतेंच करूं नको. त्यावर राजा ह्मणतो, कां बरें ? तुमचे वर्णाश्रम, धर्म व जाति हे नष्ट होतील, तुह्मीं तर नष्ट होणार नाहींना ? जाति, वर्णाश्रम तुह्मी आहांत किंवा तुह्मास जातिवर्णाश्रम आहेत ? जर तुह्मास जातिवर्णाश्रम आहेत तर तुह्मी जातिवर्णाश्रमाहून **मी** ह्मणणारे कोणी वेगळे आहांत हें उघड आहे; त्याअर्थी तेच तुह्मी कोण आहां, हें सांगा. हें ऐकतांच सर्वजण एकदम चुप झाले.

विचारशील राजानें सर्वांस कुंठित करून, जाति, आश्रम, धर्म, कर्म हें सर्व नष्ट झालें तरी ' मी ' ह्मणणारे तुह्मी नष्ट होत नाहीं. आणि वर्णधर्मरहित तुह्मास राहतां येतें, मी, मी, ह्मणतां येतें. हें तुह्मी कशाचे आधारावर ह्मणतां आणि तो तुमचा आधार कोणता आहे कीं ज्याचे नष्ट झाल्यानें तुह्मी नष्ट होऊन मी मी ह्मणूं शकणार नाहीं. ते तुह्मी कोण आहां हें सांगा ? असा पुनः प्रश्न केला, त्यावर कित्येकांनीं विचार करून उत्तरें दिलीं कीं, हे **राजा,** आमचें मी ह्मणणें जोंवर आमचा देह कायम आहे तोंवर कायम आहे. देह नष्ट झाला ह्म० आह्मी नष्ट होऊं. यावरून आह्मी मनुष्यदेहधारी **जीव** आहोंत. असें तूं समज. हें ऐकतांच राजा ह्मणतो कीं तुह्मी मनुष्य ' देहधारी ' आहांना ? ह्म० तुह्मीं मनुष्यदेह धारण केला आहे व तुमचा देह आहे. अर्थात जसे वर्णाश्रम तुह्मीं धारण केले होते ते तुमच्याहून पृथक् होते; ते तुह्मी नव्हतां. त्याप्रमाणेंच देह हा तरी तुह्मीं धारण केला आहे. ह्मणजे तुमच्याहून पृथक् आहे. देह तुह्मी नव्हे. तुमचा देह आहे. तुह्मी देहांतून पृथक् मी ह्मणणार कोण आहां हें जर यथार्थ सांगणार नाहीं तर या देहांत **मी** ह्मणणारा देहाहून पृथक् कोण आहे हें पाहाण्याकरितां मी एकाद्याचें शरीर फाडून पाहतों. ह्म० **मी** जो आंत लपला आहे तो बाहेर निघेल. असें ह्मणून राजानें खड्ग काढतांच एका यतीनें विचार केला कीं, राजाचा हेतु चांगला आहे, पण क्रियेची दिशा मात्र चुकत आहे. आणि अज्ञानानें फुकट हिंसा करून दोषी होत आहे. याची दिशा बदलली पाहिजे. असें समजून तो यति गंभीर भाषणानें राजास ह्मणाला हे **राजा,** **मीपणाचा** शोध

राजशासनानें व खड्गबलानें लागणार नाहीं. खरी जिज्ञासा असेल तर क्षणभराकरितां तूं सिंहासन आणि खड्ग बाजूस ठेव आणि जसें तूं आह्मास एका वस्त्रानें उभें केलें आहेस, तसा तूं एका वस्त्रानें आमचेजवळ येऊन उभा रहा. हें ऐकतांच राजानें तसें करून तो यतिवर्यासमीप आला. तेव्हां पुन्हां यति ह्मणाला, राजन् तुला आह्मी कोण आहों हें शोधावयाचें आहे, कीं मी कोण हें शोधावयाचें आहे ? आह्मी कोण हें शोधून तुझा उपयोग होणार नाहीं. मी कोण हेंच तुला शोधलें पाहिजे. करितां जे प्रश्न तूं आह्मास पूर्वी केले व त्यांचीं उत्तरें आह्मीं दिलीं त्यांचा आमचे मंडळींत एकवार पुन्हां विचार स्वतःचे व्यक्तीस धरून कर ह्म० मी देहधारी जीव आहें येथवर तुझे विचाराची मजल येऊन पोंचेल. पुढें देहांत **मी** जीव कोण आहें याचा देहापासून विचार कर. देह नष्ट करून मी ह्मणणारा सांपडेल तर प्रेतें मागवून पहा. बुध्या हत्या कशास करितोस. देह सजीव आहे तोंवरच त्यांत मी ह्मणणारा कोण याचा पत्ता लागेल. केवळ देहधारीपणाच्या स्थितींत या वेळीं तूं आणि आह्मी सर्व सारखेच आहोंत, करितां विचाराचा प्रज्वलित दीप हातीं घेऊन **मी देही** या उंबऱ्यास ओलांडून **मी** शोधार्थ शरीरांत प्रवेश कर ह्म० शोध लागेल. या विचाऱ्या सर्व मंडळीस वर्णधर्मकर्मादिकांचा रोध करून कां उगीच त्रास देतोस. ही गोष्ट विचारशील राजास मान्य होऊन त्यानें सर्वांस मोकळीक दिली. पण त्या यतिवर्यास मात्र त्याचे चरण धरून पूज्य सिंहासनीं स्थापित करता झाला. असो.

वाचकांनो मी ह्मणणारा धूर्त गृहस्थ शेवटीं शोधकांतच जाऊन लपतो ह्मणून जें वर सांगितलें आहे, तेंच हें ह्म० सृष्टिव्यापारी मीपणानें शोधकास जातिवर्णाश्रमनामाचे घोटाळ्यांत गुंतविलें आणि सरते शेवटीं देहावर आणून शोधकास शरीर गुहेच्या अंधकारांत लोटून देऊन **मी** ह्मणणारा निसटून दूर गेला. असो. आतां आपला दोन कक्षांचा शोध आटोपून तिसरी अंतरकक्षा '**जीव मी**' अशी जी आहे त्यांत प्रवेश केला पाहिजे. जशा जलांत बुडलेल्या अथवा अंधकारांत ठेवलेल्या वस्तू चापसून काढाव्या लागतात तेथें चर्मचक्षूंचा उपयोग न होतां केवळ विचारचक्षूंनीं पाहून नीट शोध

करावा लागतो. तसें मीपणानें शोधकांस येथवर तर स्थूल पदार्थ हातीं देऊनच झुलविलें. पण आतां आंत एकापेक्षां एक अति सूक्ष्म पदार्थ आहेत ते त्यांनीं हातीं दिल्यावर त्या पदार्थांस सोडून मीपणास धरणें महा दुर्धर काम आहे. विचारवान् वारंवार घोटाळ्यांत पडून गोता खातो. अशा वेळीं मर्मज्ञ ज्ञात्याचा हस्तावलंब असला तरच शेवट हातीं लागतो. नाहींपेक्षां शोधून शोधून थकलें तरी कांहीं होत नाहीं. करितां मर्मज्ञ सद्गुरुचरणावलंब बळकट धराल तरच तराल.

---

# जीवशोधनाची तिसरी अंतरकक्षा.

विचारशील मी शोधक राजानें, बाह्यकक्षा जी मी व्यवहारीपणाची होती, त्यांत शोध केल्यावर केवळ सृष्टिव्यवहाराचीं विशेषणें ह्म० मी राजा, मी योद्धा, मी धनिक, मी विद्वान् शहाणा, इ० अशींच सांपडलीं. या विशेषणांचा जो विशिष्ट, मीपणा, हा सांपडला नाहीं. हीं विशेषणें मीपणामागें उपाधिरूप लागलीं असून या सर्व उपाधींतून मी ह्मणणारा मोकळा आहे असें समजलें. पुढें दुसरी मध्यकक्षा देहधारी मीपणाची होती, तिचा शोध केला, त्यांतही मी ब्राह्मण, मी क्षत्रिय, मी वैश्य, मी शूद्र इ० जाति–वर्ण–नाम आश्रमधर्मादिक अशा देहाश्रित उपाधि मीपणाहून अगदीं भिन्न दिसल्या. कारण जातिवर्णाश्रमाच्या नाशानें देह नाश पावत नाहीं. मी ह्मणणारा देह जीवंत राहतो. बरें या देहासच मी ह्मणणारा मानावा तर मी देहधारी जीव आहें असें ह्मणतो. यांत देह धारण करणारा जीव कोणी वेगळा असावा व तो देहांत असावा. असें वाटून तो देहांतील मी ह्मणणारा बाहेर काढण्याकरितां राजा एकाद्याचें शरीर फाडणार होता. त्या व्यर्थ हिंसेपासून यतिवर्यानें निवृत्त केलें. आणि मीपणास देहांत शोधण्याची आज्ञा केली. पण तेवढ्यानें राजाची जिज्ञासा शांत होईना. तो मनांत विचार करी कीं, महाराजांनीं देहांत मीपणाचे शोधार्थ आज्ञा केली, पण शरीरांत रुधिर, मांस, अ-

स्थि इ०हून अधिक काय असणार आहे. मी शिकार खेळतांना सिंहादिकांला बाण मारतों तेव्हां ते तत्काल मरून अचेतन होतात. देह नष्ट झाल्यानें जीव नष्ट होतो. बोलत चालत नाहीं. करितां देहास एकदम नष्ट न करितां हळूहळू छिन्नभिन्न करून पहावा. ह्म० देहाचे छिन्नतेनें मीपणाचें काय तुटतें मोडतें हें पाहूं. असें समजून राजानें आपल्या सुनीति नामक प्रधानास, ज्यांचे अवयव तोडण्याची न्यायाधीशानें आज्ञा केली असेल, असे अपराधी आणून देण्याची आज्ञा केली. ही आज्ञा अवधूतांनीं ऐकतांच त्यांस राजाचा अंतस्थ हेतु कळून त्याचे अज्ञानाबद्दल हसूं आलें. पण सूक्ष्म बुद्धीची जिज्ञासा पाहून आनंदहि वाटला. जिज्ञासु आपल्याच स्वतःच्या कल्पनेनें कुंठित होऊन निवृत्त होईल तोंवर चांगले उपदेशक त्यास विशेष अडथळा न करितां अनुकुल युक्ति दाखवीत जातात, त्याप्रमाणें यतीनें राजास आज्ञा केली कीं, राजा तुझा हेतु मी जाणला. अपराध्यांस न्यायसभेंत काय शासन व्हावयाचें असेल तें होऊं दे. त्यांच्या अपराधांचा उपयोग जर तूं आपल्या जिज्ञासापूर्तींत करशील तर अवयवछेदनाच्या दोषास मात्र पात्र होशील. अपराध आणि जिज्ञासा ह्या दोन गोष्टी अगदीं पृथक् आहेत. यांचा समावेश एकत्र कधीं करूं नये. तुला आपले जिज्ञासापूर्तीस्तव बुद्ध्या कोणाचे अवयव छिन्नभिन्न करण्याचें कांहीं कारण नाहीं. प्रधानास आज्ञा कर ह्म० तुझ्या येथील अनाथगृह, धर्मशाळा आणि अन्नछत्रें यांतून जे बिचारे गरीब छिन्नावयवी जीव असतील, त्यांसच तो तुझ्यासमक्ष सोईनें प्रविष्ट करील. त्यांच्या दुःखाची तपासणी करून त्यांस अनुकूलसाधनानें सुखी ठेव ह्म० ते तुला शुभ आशीर्वचनें देतील, व तुझीही जिज्ञासा सहज पूर्ण होईल. ही गुरूची आज्ञा राजानें शिरसा मान्य करून तसें करविलें आणि आलेल्या अनाथ मंडळीस तुह्मी कोण आहांत असा प्रश्न केला. त्यावर एक ह्मणतो मी जन्मांध आहें. दुसरा हस्तसंज्ञेनें कळवितो मी मुका आहें, तिसरा ह्मणतो मी बधिर आहें, कोणी ह्मणाला मी पंगू आहें, मी थोटा आहें, मी काणा आहें. असे अनेक प्रकारचे दुःखी प्राणी पाहून राजा विचार करून पाहूं लागला कीं, जन्मांधास नेत्र नाहीं. पण मी-

पणा कायम आहे, एकास जिव्हा नाहीं. एकास पाय नाहीं, एकाचा हात मोडला आहे, पण मीपणा कायम आहे. एकाचें सर्व शरीरच निरुपयोगी झालें. पण मीपणा टणक जशाचा तसाच आहे. एक तर अगदीं मरणोन्मुख आहे; पण ' मी मी ' असें अगदीं खणखणित शब्दानें म्हणत आहे. अशीं इंद्रियें नष्ट झालीं. शरीरें क्षीण झालीं. आणि घटकेभरांनीं मरणार असें जरी प्रत्यक्ष दिसत आहे तरी **मीपणांत** मात्र यत्किंचितूही फरक पडलेला दिसत नाहीं. हात, पाय, डोळा इत्यादि अवयव हे तर शरीराचे आहेत. हे नष्ट झाल्यानें माझें शरीर अंधळें झालें, पंगू झालें, बहिरें झालें. असें म्हटलें पाहिजे होतें. पण मी अंधळा, बहिरा, पांगळा असें कां म्हणतो ? पूर्वीं हा देह मी असें म्हणत होता. आणि आतां देहास सोडून देहाचे आंत असलेलीं जीं इंद्रियें त्या इंद्रियांस मी म्हणूं लागला. पण त्यांच्या नष्टतेनें आपण नष्ट होत नाहीं. मी अंधळा इ० म्हणावयास जीवंत बनलाच आहे. आतां हा मी म्हणणारा कशाच्या आधारावर रहातो. असा विचार करीत आहे तोंवरच जो मरणोन्मुख होता तो तेथें राजाच्या समोरच मेला. त्यावर राजानें त्याचें शरीर नीट तपासून हालवून पाहिलें शेवटीं यांतील मी म्हणणारा जीव होता तो गेला. असा निश्चय झाला. पण हा जीव जातांना मला अगदीं दिसला नाहीं त्याअर्थीं हा कोणत्या रूपानें कसा गेला आणि शरीरांत रहातो तो तरी कोणत्या रूपानें कसा रहातो; हें कांहीं बरोबर न समजल्यानें फारच घोंटाळ्यांत पडून राजा चिंताग्रस्त झाला, असें पाहून यतिवर्यानें आज्ञा केली कीं, हे राजन् मी म्हणणाऱ्या जीव शोधनाची ही दिशा नव्हे. तूं मार्ग चुकत आहेस. अशानें जीव त्रिकालांत सांपडणार नाहीं. त्याचा मार्ग वेगळा आहे. अशी गंभीर वाणी ऐकून शीलनिधि राजानें अवधूताचे चरण धरून अनन्यभावें शरण होऊन, ' **मी कोण** ' याचा थांग लावून देण्याविषयीं विनंति केली. राजा शीलनिधि उपदेश श्रवणार्थ श्रीगुरु परमहंसाच्या समीप वसतांना आपली प्रिय धर्मपत्नी जी सुमेधाराणी, आपला प्रिय ज्येष्ठ पुत्र युवराज **चारुकर्मा**, आणि सुनीतिनामक प्रधानास आणि सुशील बुद्धिमान् स्वजन होते त्या **सर्वांस सन्निध बसवून गुरुचरणीं**

मस्तक अर्पण करून हात जोडून सविनय प्रश्न करितो कीं, हे भगवन् मी मी ह्मणणारा या शरीरांत कोण आहे ? याचें स्वरूप काय ? हा या देहांत कां राहतो ? कोठून येतो व कोठें जातो ? जन्म आणि मरण कोणास होतें ? या माझ्या संशयास स्वामींनीं कृपा करून निवृत्त करावें. हें ऐकून अवधूत ह्मणतात हे राजन्, मी मी ह्मणणारा या शरीरांत जीव आहे. या जिवाचें खरें स्वरूप अज्ञान हें होय. हा जीव स्वकर्मभोगार्थ शरीरांत राहतो. स्वकर्मानेंच अन्य देहांतून या देहांत येतो आणि या देहांतून अन्य देहांत जातो. जन्म आणि मरण हें जीवास नसून देहास आहेत. देहाचें जन्ममरण हें जीवाचें वेषांतर आहे. जीव हा नित्य आहे. अशीं संक्षिप्त उत्तरें ऐकून शैलनिधिराजानें प्रार्थना केली कीं, हे भगवन् अशा संक्षिप्त बोधवाक्यांनीं अह्मां अज्ञान्यांस बोध कसा होऊं शकतो ? यांत आह्मांस कांहीं कळलें नाहीं. करितां स्वामींनीं सविस्तर आज्ञा करावी. यति ह्मणतात, राजा तुझी उत्कृष्ट जिज्ञासा पाहण्याकरितांच मी संक्षिप्त उत्तरें दिलीं. आतां सविस्तर सांगतों, लक्षपूर्वक श्रवण कर.

---

## जीवाचें स्वरूप.

**हे राजन्**, हा **जीव** काल्पनिकसृष्टीचा राजा असून **अहंकार** हें याचें स्वरूप होय. **बुद्धि** ही याची प्रिय राणी आहे. **मन** हा त्याचा अति शहाणा, चपल आणि हितेच्छु असा प्रधान आहे. **चित्त** हें त्याचा सेनापति आहे. अनंत **वासना** ही त्याची सेना होय. **कर्म** हें त्याचा खजिना होय. **पंचप्राण** हीं त्याचीं वाहनें होत. **पंचज्ञानेंद्रियें** हीं त्याचे श्रेष्ठ अधिकारीवर्ग आहेत. पंच **कर्मेंद्रियें** हीं त्याचे सेवक होत. पांचभौतिक **स्थूलदेह** हा त्याच्या राहण्याचा राजवाडा आहे. या वाड्यांत **जागृत**, **स्वप्न**, **सुषुप्ति**, **तुर्या** आणि **उन्मनी** असे पांच खण आहेत. पैकीं तुर्या आणि उन्मनी या दोन **खणांस कुलुपें लागलीं असून त्यांची किल्ली सद्गुरूंजवळ आहे.**

त्यांनीं कृपा करून ती किल्ली दिल्यास त्या खणांतील देवादिकांसही दुर्लभ असा स्वरूपभोगानंद प्राप्त होतो. नाहींपेक्षां अनंत जन्मांपासून तीनच खणांत व्यापार करीत आहे व असाच पुढें करीत राहील. हा पांचभौतिकवाडा पंचकोशात्मक पंच आवरणांनीं युक्त आहे. पंचमहाभूतें ह्या लागवडी मसाल्यानें हा वाडा तयार झाला आहे. पंचविषय हे जीवाचे उपभोग्य पदार्थ होत. मृत्यु हा या जीवाचा प्रवल अजिंक्य शत्रु होय. जरा ही त्या मृत्यूची पत्नी आहे. अनंतरोगादि दुःखसामुग्री ही त्याची प्रधान, सेनापति, सेना, इ० राष्ट्रीयसंपत्ति होय. या सेनेचेद्वारा मृत्यु हा या जीवांवर सदैव प्रहार करीत असतो. सरतेशेवटीं जीवास भक्षण करितो. याचे तडाक्यांतून सृष्टींत कोणी वांचत नाहीं. केवळ जे जीव गुरुकृपामृतपानानें अजरामर होतात तेच या मृत्यूस जिंकतात ह्म० आत्मस्वरूपज्ञानेंकरून त्यांची देहात्मबुद्धि नष्ट होऊन परब्रह्मांत लीन होतात. मग त्यांस पुनरावृत्ति होत नाहीं. असें हें विलक्षण वैभव या जीवाचें आहे. याचें अनेक प्रकारच्या रूपकांनीं विद्वान वर्णन करितात. मुमुक्षूंनीं त्यांतील सारग्रहणावर तात्पर्य ठेवावें. आतां मी मुख्य गोष्ट वर्णन करितों.

ही चराचरात्मक सृष्टि बारा* तत्त्वांचे मिश्रणापासून स्थूलसूक्ष्मकारणरूप बनली आहे; जीवमात्राच्या व पदार्थमात्राच्या संग्रहास सृष्टि हें नांव आलें आहे. प्रत्येक पदार्थ बारा तत्त्वांचे मिश्रणाबाहेर नाहीं. हा जीव सृष्टींतलाच एक अंश असल्यानें तीं बारा तत्त्वें याच्यांतही आहेतच, पण त्याच तत्त्वांचे परिमित मिश्रणाच्या घटनेनें झालेल्या एकोणीस पदार्थांचे संघातास जीव अशी संज्ञा आहे. याच एकोणीस कलात्मक जीवास जागृत, स्वप्न, सुषुप्ती अशा तीन अवस्था आहेत. या तीन अवस्थांस तीन देह ह्म० स्थूल, सूक्ष्म, कारण अशा संज्ञा आहेत. याच देहत्रयांत अथवा अवस्थात्रयांत जीव पंचकोशानें वेष्टित आहे. ह्म० पांच आवरणें अथवा गवस-

* १ अहंकार २ मन ३ बुद्धि ४ आकाश ५ वायु ६ अग्नि ७ जल ८ पृथ्वी ९ काल १० देश ११ गुण १२ कर्म. अशीं बारा तत्त्वें गेल्या सृष्टिप्रकरणांत सांगितलीं आहेत.

ण्यांनीं जीव वेष्टित आहे. त्या कोशांचीं नांवें अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय अशीं आहेत. जीवाच्या एकोणीस कला पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, पंचप्राण आणि अंत:करणचतुष्टय, मन, बुद्धि, चित्त, अहंकार अशा आहेत त्याच प्रथम सांगतों.

## जीवाच्या एकोणीस कला.

सृष्ट्यारंभीं परमात्माधिष्ठानावर मायेनें आपले स्वरूपभूत असे तम, रज, सत्त्व गुणांपासून पंचमहाभूतें प्रथम आकाश, त्यापासून वायु, त्यापासून तेज, त्यापासून जल, आणि त्यापासून पृथ्वी, अशीं अनुक्रमें निर्माण केलीं. हीं तत्त्वें प्रथम सहजस्थितींत सूक्ष्म ह्म० कार्यअक्षम अशीं होतीं. तींच पुढें पंचीकृत होऊन अखिल जीव आणि यावत् पदार्थमात्र सृष्टीरूप झालीं. ती सर्व सृष्टि भोग्यविषयरूप, भोगसाधन इंद्रियरूप आणि भोगभोक्ते जीवरूप, अशी त्रिपुटीरूप आहे. ( त्यांत भोग्यविषयरूप सृष्टि गेल्या प्रकरणीं स्वतंत्र सृष्टिप्रकरण रूपानें वर्णन झालीच आहे. त्यांत पंचभूतांची उत्पत्ति, पंचीकरण आणि लय इ० सर्व गोष्टी सविस्तर वर्णन झालेल्या आहेत त्याची पुनरुक्ति करण्याची जरूर नाहीं. ) आतां जो एकोणीस कलात्मकजीव आहे. ह्म० ह्या एकोणीस त्रिपुटी जीवाच्या आहेत. ह्या त्रिपुटीद्वारा जीवाचा सर्व व्यवहार होत असतो. ह्या सर्व त्रिपुटी अपंचीकृत पंचमहाभूतांपासून झाल्या असल्यानें सर्व अमूर्त आहेत.

## ज्ञानेंद्रियपंचक.

आकाश, वायु, अग्नि, जल आणि पृथ्वी या अपंचीकृत ह्म० न मिसळलेल्या तत्त्वांचे पृथक् पृथक् सत्त्वगुणापासून पंचज्ञानेंद्रियें झालीं आहेत. आकाशाच्या सत्त्वगुणापासून श्रोत्रेंद्रिय झालें. श्रोत्रेंद्रिय ह्म० केवळ कान नव्हे. कारण कान बहिऱ्यासही असतात, पण श-

ब्द ऐकूं येत नाहीं. तरी ज्या कर्णगोलस्थ इंद्रियानें शब्दज्ञान होतें तें इंद्रिय **श्रोत्र** होय असें जाणावें. **वायूचे** सत्वगुणापासून त्वगिंद्रिय झालें. त्वगिंद्रिय ह्म० केवळ त्वचा नव्हे. वातानें त्वचा शून्य झाली असतां स्पर्श कळत नाहीं. ज्या इंद्रियानें स्पर्श कळतो तें इंद्रिय **त्वक्** होय. **अग्नीचे** सत्व गुणापासून चक्षुरिंद्रिय झालें. डोळा हाच केवळ चक्षु नव्हे. मृत मनुष्याचे डोळे अथवा कांहीं विकारानें अंध झालेल्याचे डोळे जसेच्या तसेच असतात पण दिसत मात्र नाहीं. तरी रूप ग्रहण करण्याची ज्यांत शक्ति आहे तें **चक्षुरिंद्रिय** होय. **जलाचे** सत्वगुणापासून रसनेंद्रिय झालें. केवळ रसना ह्म० जिव्हाच इंद्रिय नव्हे. ज्वरांत जिव्हा कायम असते पण रसास्वाद बरोबर मिळत नाहीं. तरी ज्या इंद्रियानें रसास्वाद कळतो ते इंद्रिय **रसना** होय. **पृथ्वीचे** सत्वगुणापासून घ्राणेंद्रिय झालें. नाक हेंच केवळ इंद्रिय नव्हे. सरदी अथवा पडसें झाल्यानें नाक कायम असतांही वास येत नाहीं. तरी ज्या इंद्रियानें वास येतो तें इंद्रिय **घ्राण** होय. अशीं हीं पांच **तत्त्वांच्या** पृथक् पृथक् **सत्वगुणापासून ज्ञानेंद्रियें** झालीं आहेत.

---

## कर्मेंद्रियपंचक.

पंच**तत्त्वांचे** पृथक् पृथक् केवळ **रजोगुणापासून** पंच **कर्मेंद्रियें** झालीं आहेत, म्हणजे **आकाशाचे** रजोगुणापासून वागिंद्रिय झालें. केवळ जिव्हा ही वागिंद्रिय नव्हे. मुक्यास जिव्हा असते, आणि क्वचित् वातादि विकारानें जिव्हा आंखडली ह्म० शब्द उच्चारतां येत नाहीं. तरी ज्या इंद्रियानें शब्द उच्चारिला जातो तें **वागेंद्रिय** होय. **जिव्हा** ही ज्ञानेंद्रियांत व कर्मेंद्रियांत अशी दोहींकडे काम करिते. ह्म० रसास्वाद घेते तेव्हां जिव्हा ज्ञानेंद्रियांत मोजली जाते. व शब्दोच्चार करते तेव्हां कर्मेंद्रियांत येते. जिव्हेंत ज्या दोन प्रकारच्या **शक्ति** आहेत तीं इंद्रियें होत. **वायूचे** रजोगुणापासून पाणी ह्म० हस्तेंद्रिय झालें आहे. केवळ हात हा इंद्रिय नव्हे. हातांत जी क्रिया

करण्याची शक्ति आहे तें हस्तेंद्रिय होय. हातास कांहीं विकार झाल्यास हात तर कायम असतो पण त्यानें क्रिया होत नाहीं. तरी **हस्तेंद्रिय** हें वेगळें आहे. **अग्नीचे** रजोगुणापासून पादेंद्रिय झालें आहे. केवळ पाय इंद्रिय नव्हे, पंगूचे पाय कायम असतात. पण चालतां येत नाहीं. तरी पायांत जी धावनशक्ति तें **पादेंद्रिय** होय. **जलाचे** रजोगुणापासून उपस्थेंद्रिय ह्म० जननेंद्रिय झालें आहे. केवळ जननेंद्रियच इंद्रिय नव्हे. कारण नपूंसकास इंद्रिय असतें पण त्यापासून रतिभोग होत नाहीं. फक्त मूत्रमार्ग असतो. तें इंद्रिय नव्हे, त्या इंद्रियांत जी भोगशक्ति तें **इंद्रिय** होय. **पृथ्वीचे** रजोगुणापासून **गुदेंद्रिय** झालें आहे. त्यांत मलत्याग करण्याची जी शक्ति तें इंद्रिय होय. पंचतत्त्वांचे निवळ तमोगुणापासून शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध झाले आहेत. हें पुढें येईल व मागें भोग्यरूप सृष्टींतही आलेंच आहे असो.

## प्राणपंचक.

पंचभूतांचे सर्व **रजोगुण** मिळून प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान असें **प्राणपंचक** झालें आहे. (याचे विषय पुढें दाखवितों.)

## अंतःकरण चतुष्टय.

पंचतत्त्वांचे सर्व **सत्वगुण** मिळून मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार असें **अंतःकरण** चतुष्टय झालें आहे. ( त्याचे विषय पुढें दाखवितों. ) येणेंप्रमाणें हा जीव एकोणीस कलात्मक आहे. कोणीं चित्त आणि अहंकाराचा मन आणि बुद्धींत अंतर्भाव करून सत्रा कलात्मक जीव वर्णन केला आहे. दोन्ही प्रकार नीट आहेत. असो.

हा जीव विराटईश्वराची अति सूक्ष्म प्रतिमा आहे. ह्म० गुण, रूप, ऐश्वर्य, विभूति इ० सर्वच गोष्टी अति सूक्ष्मांशानें या-

च्यांत आल्या आहेत, असें मागें वर्णन झालेंच आहे. विराटईश्वराच्या एकोणीस त्रिपुटी दाखविलेल्या आहेत. विराटात्म्याचे इंद्रियांवर ज्याप्रमाणें अधिष्ठात्री देवता आहेत त्याचप्रमाणें जीवाच्याही इंद्रियांवर देवतांचे सूक्ष्मांश आहेत. पण अंतर एवढेंच कीं, **विराटात्मा** सर्व विषयोपभोग इंद्रियाधिष्ठात्री देवतांकडे सोंपवून आपण अलिप्त राहिल्यानें कर्तृत्वभोक्तृत्वभावरहित असतो; आणि हा जीव आपले इंद्रियाधिष्ठात्री देवतांस एकीकडे सारून सर्व इंद्रियांचे द्वारा विषय भोक्ता **मी** अशा अहंभावानें बद्ध होऊन कर्तृत्वभोक्तृत्वभाव आपले शिरावर बळेंच ओढून पराधीन होऊन बसला आहे. ह्मणूनच मी अंधळा, मी पांगळा असें ह्मणत फिरतो. अंध झाले डोळे, आणि पंगू झाले पाय, हीं दोन्ही इंद्रियें अगदीं आपल्याहून वेगळीं असतां इंद्रियांचा भाव आपले शिरावर घेऊन बळेंच मी अंधळा, पांगळा बनतो. असो. जीवांनीं जरी इंद्रियाधिष्ठात्री देवतांस एकीकडे सारलें तरी त्या आपलें कार्य सोडतात असा अर्थ नाहीं. पण हा जीव मात्र उगीच मध्यें मी-मी करून मार खातो. दुसऱ्याची मालमत्ता व अधिकार कोणी उगीच मधल्यामध्यें बळकावूं इच्छिल्यास परिणामीं मार खाणें कपाळीं बनलेंच आहे. असा आपण व्यवहारांतसुद्धां नेहमीं अनुभव घेतों. मग ईश्वरी संकेतांत घालमेल करणारा शिक्षेवांचून कसा सुटतो. यामुळेंच मनुष्याच्या मागें सुखीदुःखीपणा आणि जन्ममरणाची शिक्षा अनंत कल्पांपासून लागली आहे. पण कैद्यास शिक्षा आंगवळणीं पडून जसा तो पुढें त्याच स्थितींत सुख मानूं लागतो तसा हा जीव जन्ममरणादि दुःखस्थितींत सदैव राबल्यानें त्यास तें दुःख न वाटतां त्यांत सुख मानून मार खाणेंच गोड वाटून निमग्न झाला आहे. संवय काय न करील? असो.

---

## देहत्रय.

अपंचीकृत पंचतत्त्वांच्या गुणांपासून जीवाच्या एकोणीस कला अथवा त्रिपुटी झाल्या, पण या एकोणीस त्रिपुटी सूक्ष्म ह्म० अमूर्त

राहिल्यानें त्यांपासून भोगही अमूर्तच ह्म० सूक्ष्म, केवळ स्वप्नभोगाप्रमाणें होऊं लागल्यानें कर्मक्षय बरोबर होत नाहीं. ह्म० स्थूलभोग यथार्थ होत नाहीं. ह्मणून ईशशक्तीनें तीं अपंचीकृत पंचमहाभूतें पंचीकृत झालीं, ह्म० परिमित अंशानें मिश्रण पावलीं. या मिश्रणास **पंचीकरण** असें ह्मणतात. तो पंचीकरणाचा प्रकार सृष्टिप्रकरणांत सविस्तर वर्णन झालेला लक्षांत आणावा. या पंचीकृत **पंचतत्त्वांचे** मिश्रणापासून हा स्थूलदेह उत्पन्न झाला व त्या देहावरोबरच देहाचे संरक्षक **धर्मही** उत्पन्न झाले. पंचतत्त्वांचें परस्पर मिश्रण झाल्यानें प्रत्येकांत सर्वांचे पांच पांच अंश मिळून पंचवीस अंश झाले. व त्या पंचवीस अंशांप्रमाणें स्थूलदेहांतही पंचवीस पदार्थ आले; ह्म० प्रत्येक तत्त्वापासून पांच पांच पदार्थ असे झाले.

---

## स्थूलदेह.

या स्थूलदेहांत पृथ्वीचा जडांश अधिक असल्यानें यास **पार्थिवशरीर** असें ह्मणतात. इतर तत्त्वांचे अंश थोडे आहेत.

**पृथ्वीच्या** पंचीकृत अंशापासून अस्थि, मांस, नाडी, त्वचा आणि रोम असे पांच पदार्थ झाले. त्यांत अस्थि हा पृथ्वीचा मुख्य भाग आहे, मांस हा जलाचा, नाडी हा तेजाचा, त्वचा हा वायूचा आणि रोम हा आकाशाचा गुण आहे. असे पांच झाले.

**जलाच्या** पंचीकृत अंशापासून शुक्र, शोणित, ( रुधिर ) लाळ, मूत्र आणि स्वेद हे झाले. यांत शुक्र हा मुख्य जलाचा भाग, रुधिर हा पृथ्वीचा भाग, लाळ हा आकाशाचा, मूत्र हा तेजाचा आणि स्वेद हा वायूचा भाग आहे. असे जलाचे पांच पदार्थ झाले.

**अग्नीच्या** पंचीकृत अंशापासून क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा आणि कांति हे झाले. त्यांत क्षुधा हा अग्नीचा मुख्य भाग, तृषा हा वायूचा, आलस्य हा पृथ्वीचा, निद्रा हा आकाशाचा आणि कांति हा जलाचा भाग आहे. असे पांच पदार्थ झाले.

**वायूच्या** पंचीकृत अंशापासून चलन, वलन, धावन, प्रसारण,

आणि आकुंचन असे पांच झाले. त्यांत धावन हा वायूचा भाग, चलन हा जलाचा, वलन हा तेजाचा, प्रसारण हा आकाशाचा, आणि आकुंचन हा पृथ्वीचा भाग आहे. असे वायूचे पांच अंश झाले.

आकाशाच्या पंचीकृत अंशापासून शिर, कंठ, हृदय, उदर, आणि कटी असे पंच अवकाश स्थूल शरीरांत झाले. त्यांत मस्तकांतील आकाश हा आकाशाचा मुख्य भाग, कंठावकाश हा वायूचा, हृदयावकाश तेजाचा, उदरावकाश जलाचा आणि कटिप्रदेशावकाश पृथ्वीचा भाग. असे पंचावकाश आकाशाचे अंश आहेत.

असा हा पंचतत्त्वमिश्रित, पंचवीस अंशांपासून, पंचवीस पदार्थांनीं घटित स्थूलदेह झाला आहे. हा अगदीं जड असून यांत स्वतः प्रवृत्ति अथवा क्रियाशक्ति मुळींच नसल्यानें केवळ सांपळ्याप्रमाणें अथवा घराप्रमाणें आहे. हेंच जीवाचें राहण्याचें घर आहे.

---

## सूक्ष्मदेह.

यांत वर सांगितलेला एकोणीस कलात्मक **जीव** येऊन राहतो. ज्याप्रमाणें आपण आपल्या सोईचें घर बांधून त्यांत वेळचे वेळीं वापरावयाचीं स्थळें नेमून तेथें लागणारें अत्युपयुक्त सामान खानपानादि वस्तु आणि जडजवाहीर द्रव्यादिक सांठवून नीट व्यवस्था करून ठेवितो, त्याप्रमाणें एकोणीस त्रिपुटीरूम सामान बरोबर बाळगणारा हा जीव या स्थूलशरीररूप वाड्यांत येऊन राहतो. आणि आपल्या सर्व सूक्ष्म त्रिपुटीरूप सामान स्थूल शरीरांतील इंद्रियगोलकांत सुव्यवस्थित रीतीनें मांडून ठेवितो, व्यवहार करितो आणि जातांना घेऊन जातो. हा जो एकोणीस कलात्मक जीव आहे. ह्याच्या एकोणीस कलांचा जो **संघात** ह्म० समूह यासच **सूक्ष्मदेह** ह्मणतात. याचा सामान्य अनुभव स्वप्नदर्शनांत होतो, आणि याच सूक्ष्मदेहानें जीव जन्मांतरें करीत असतो. स्थूलदेहाच्या नाशानें या सूक्ष्मदेहाचा नाश होत नाहीं. सूक्ष्मदेहाचा नाश होईल तेव्हांच हा जीव जन्ममरणरहित होईल.

# कारणशरीर.

सूक्ष्मदेहाचा नाशच झाला पाहिजे. लय होतां कामा नये. कारण लयांत सर्व संस्कार जसेच्या तसेच कायम राहून नाहींसे झाल्यासारखे भासतात. अर्थात् त्यांचा नाश होत नाहीं. जीव मातेच्या गर्भाशयांत येतो त्या वेळीं त्याच्या सर्व एकोणीस त्रिपुटी बरोबर असतात. पण त्या सर्व केवळ संस्काररूपानें लीन असतात. गर्भ जसा परिपक्व होऊन वृद्धि पावत जातो तसतशा सर्व त्रिपुटीही हळुहळू विकास पावत जातात. आरंभीं गर्भस्थितींत त्रिपुटीचा उदय नसतो. त्याचा प्रत्यक्ष अनुभव जरी कोणास होऊं शकत नाहीं, तरी त्याचा सामान्य अनुभव सुषुप्तींत सर्वांस नित्य होत आहे. विचार करून पाहिल्यास वर सांगितलेल्या एकोणीस त्रिपुटींचा सुषुप्तींत पूर्ण लय आहे. अशा निर्व्यापार स्थितीनें गर्भांत अथवा सुषुप्तींत जें जीवाचें राहणें यास जीवाचा **कारणदेह**, कारणशरीर अथवा कारणावस्था ह्मणतात. या देहांत त्रिपुटीचा उदय नसतां लय असतो. असा हा जीव कारणदेह आणि सूक्ष्मदेहरूपानें या पंचीकृत पांच भौतिक स्थूल देहांत येऊन राहतो. आणि शरीराचे स्थूलेंद्रिय गोलकांत* आपल्या सर्व सूक्ष्म इंद्रियांस स्थापून त्यांच्या द्वारें सर्व विषयोपभोग घेतो, सर्व क्रिया करितो आणि कर्तृत्वभोक्तृत्वभावानें बद्ध होतो.

जसा स्थूलदेह पांच भौतिक मिश्रणानें तयार झाला, तसेंच देहेंद्रियद्वारा भोगावयाचे शब्द—स्पर्श—रूप—रस—गंध हे विषयही पूर्वीं अमूर्तरूप होते. ते स्थूलरूप झाल्यानें उपभोगास योग्य झाले. आतां विषयभोग, भोगसाधन इंद्रियें आणि भोक्ता जीव अशी त्रिपुटी होते. विराट ईश्वराचे इंद्रियांवर भोगभोक्त्या अधिष्ठात्री देवता आहेत. व त्या देवतांच्या सूक्ष्मांशरूप देवता जीवांच्या इंद्रियांवर आल्या आहेत. त्यांची पर्वा न करितां हा जीव **मी भोक्ता** ह्मणून पुढें सरसावतो आणि बद्ध होतो, असें मागें सांगितलेंच आहे. तथापि जीवांनीं वि-

* हात, पाय, नाक, डोळे, कान व तोंड हे सर्व इंद्रियगोलक होत. आणि त्यांत जी कार्यकर्तृत्वशक्ति आहे तीं इंद्रियें होत.

राट ईश्वराचे उपासनेनें आणि प्रसादानें स्वतःला सर्व विकारांपासून अलिप्त ठेवितां येण्याकरितां पुन्हां सर्व त्रिपुटी सांगितल्या पाहिजेत.

# जीवाच्या एकोणीस त्रिपुटी.

## पंचकर्मेंद्रियत्रिपुटी.

| इंद्रियें. | अधिष्ठात्री देवता. | विषय. |
|---|---|---|
| १ वाक् | १ अग्नि | १ भाषण करणें, बोलणें. |
| २ पाणी | २ इंद्र | २ देण्याघेण्याची क्रिया करणें, |
| ३ पाद | ३ विष्णु | ३ गमनागमन करणें. |
| ४ उपस्थ | ४ प्रजापति | ४ रति भोग करणें. |
| ५ गुद | ५ यम | ५ मलत्याग करणें. |

ह्या त्रिपुटी क्रियाशक्तीसह स्थूलेंद्रियसंयुक्त जाणाव्या ह्म० हात, पाय व जिव्हा इ० शरीराचे अवयव आणि त्या अवयवांत जी शक्ति तीं इंद्रियें अशीं संयुक्त जाणावीं.

## पंचज्ञानेंद्रियत्रिपुटी.

| इंद्रियें | अधिष्ठात्री देवता. | विषय. |
|---|---|---|
| १ श्रोत्र | १ दश दिशा | १ शब्द ऐकणें. |
| २ त्वचा | २ वायु | २ स्पर्श कळणें. |
| ३ चक्षु | ३ सूर्य | ३ रूप पाहणें. |
| ४ जिव्हा | ४ वरुण | ४ रसास्वाद घेणें. |
| ५ घ्राण | ५ अश्विनीकुमार | ५ वास घेणें. |

ह्या त्रिपुटी स्थूलशरीराचे अवयव ह्म० कान, त्वचा, डोळे, जीभ, आणि नाक, यांच्यासह आणि क्रियाशक्तिसंयुक्त अशा जाणाव्या. क्रियाशक्ति हीं इंद्रियें आणि स्थूल अवयव हे इंद्रियें राहण्याचे गोलक असा नियम समजावा. कोणतींही इंद्रियें गोलकाचे

आश्रयावांचून स्थूलक्रिया करूं शकत नाहींत. स्वतःच्या सूक्ष्मक्रियेनें ह्म० केवळ संस्काररूपानें त्यांची अमूर्त स्थिति राहते. जसे डोळे उघडून बाहेरील सृष्ट पदार्थ पाहण्याची ही चक्षुरिंद्रियाची स्थूलक्रिया आहे. आणि डोळे मिटून पाहिलेल्या पदार्थांचे जे संस्कार आंत दिसतात ती इंद्रियाची सूक्ष्मक्रिया आहे. यासच संस्कार ह्मणतात.

... समाजा ... पिंपळीकर.

## प्राणपंचकत्रिपुटी.

| पंचप्राण वायु | या सर्वांची देवता वायु आहे. त्याचीं स्थलें येथें दाखवितों. | प्राणाचे विषय आणि क्रिया. |
|---|---|---|
| १ प्राण | हृदयस्थानीं राहतो | श्वासोच्छ्वास करणें. |
| २ अपान | गुदस्थानीं राहतो | मलमूत्रविसर्ग करणें. |
| ३ व्यान | अंगांतील सर्व संधींत रा० | अंगाचें चलन वलन क० |
| ४ उदान | कंठस्थानीं राहतो | भुक्त अन्नजलाचा विभाग करून ढेंकर, उचकी, शिंक इ० क्रिया करतो. |
| ५ समान | नाभिस्थानीं राहतो | भुक्त अन्नरसादिकांस सर्व शरीरभर पसरणें व सर्व अंगास पोषण करणें इ० |

पंचप्राणवायु हा एकरूपच असून शरीरांतील स्थानभेदांनीं व क्रियाभेदांनीं पांच प्रकारचा होऊन त्याचीं पांच नांवें झालीं आहेत. वास्तविक वायूचें स्वरूप एक आहे. ह्मणून त्याची देवताही एकच आहे.

# अंतःकरणचतुष्टयत्रिपुटी.

| अंत:करण | देवता | विषय. |
|---|---|---|
| १ मन | चंद्रमा | संकल्पविकल्प करणें ह्म० अमुक गोष्ट करूं किंवा नको करूं असें वाटणें. |
| २ बुद्धि | बृहस्पति | निश्चय करणें ह्म० अमुक असेंच करावयाचें असा ठराव करणें. |
| ३ चित्त | वासुदेव | चिंतन करणें ह्म० ठरविलेली गोष्ट कोणत्या उपायानें तडीस जाईल हें चिंतणें. |
| ४ अहंकार | रुद्र | अहंभाव, अमुक गोष्टी कर्ता धर्ता मी.मी अमका असा अहंभाव धरणें. |

असें हें अंत:करणचतुष्टय चार प्रकारचीं कामें करीत असतें. ' **करण** ' हें नांव साधनाचें आहे. ह्म० कोणतेंही काम करण्यास जें साधन लागतें त्या साधनास ' करण ' अशी संज्ञा आहे. जसें लेखनास लागणारी लेखणी, ढवळण्याकरितां लागणारी पळी, चमचा इ० अशीं जीं साधनें तीं ' करणें ' होत. हात, पाय इ० हीं सर्व इंद्रियें व्यावहारिक कार्याचीं ' करणेंच ' आहेत. हीं बाह्यव्यापार करितात, आणि मनबुद्धिचित्तादिक आंतरव्यापार करितात. मननचिंतनादिक आंतरव्यापार करण्याचीं मनबुध्यादि साधनें असल्यानें त्यांस अंत:करण अशी संज्ञा आहे.

येणेंप्रमाणें जीवाच्या ह्या एकोणीस त्रिपुटी स्थूलदेहाश्रित राहून जन्मापासून तों मरणपर्यंत यावत् व्यवहार करीत असतात आणि या त्रिपुटीद्वारा हा जीव वर वर्णन केल्याप्रमाणें सर्व कर्में, सर्व भोग आणि साऱ्या प्रकारचे विचार अहर्निश करून काल व्यतीत करीत असतो. त्या कालक्रमणेंत प्रतिदिवशीं जीवाच्या तीन अवस्था होत असतात. त्या तीन अवस्थांत रोजचे चोवीस तास व्यतीत करून एकदाचें आयुष्य संपवून मरतो. आणि पुढें पुन्हां जन्म घेऊन तोच

क्रम आरंभ करितो. असे अनंत जन्मांचे अनंत कल्पांपासून राहाटगाडगें चालू आहे. या एकोणीस त्रिपुटींचे बंधनांतून सुटावयास नको. आणि जन्ममरणरहित स्थिति प्राप्त व्हावयास नको असें हें जीवाचें अखंड परिभ्रमण चालू आहे. ईशकृपें सुटेल तेंव्हां सुटो.

## जीवाचें अवस्थात्रय.

जन्मदारभ्य मरणपर्यंत जीवाचा जो आयुष्यकाल व्यतीत होतो त्यांत प्रति दिवसरात्रींत जीवाच्या तीन अवस्था होत असतात. या तीन अवस्थांत हा जीव स्थूलसूक्ष्मदेहानें स्थूलसूक्ष्मइंद्रियद्वारा व्यावहारिक आणि स्वाप्निक भोग्य विषयांचा उपभोग घेत असतो. आणि कांहीं काल इंद्रियादिव्यापारशून्यस्थितींत अज्ञानांत लीन राहतो. अशा कालत्रय व भोगत्रयाच्या भेदानें ज्या तीन अवस्था झाल्या त्यांस **जाग्रत्**, **स्वप्न** आणि **सुषुप्ती** अशीं नांवें आहेत.

## जीवाची जाग्रदवस्था.

**जाग्रदवस्थेंत** जीवाचें वसतिस्थान विशेषतः नेत्रेंद्रियांत असतें. कारण बहुतांशीं जीवाचा सृष्टीशीं संबंध नेत्रद्वाराच जास्त असतो. ह्म० दृष्टीनें पाहूनच सर्व व्यवहार होत असतात. दृष्टीनें व्यवहार होतो ह्मणून बाकीचीं इंद्रियें स्वस्थ असतात असें नाहीं. व्यावहारिक कार्यांत नेत्रेंद्रियाची प्रधानता राहून त्या इंद्रियाचे अनुरोधानें इतर सर्व इंद्रियें काम करूं लागतात. प्रारब्धवशात् क्वचित् जीवाचें एकादें इंद्रिय नष्ट झालें असलें तर, त्या इंद्रियाची शक्ति इतर इंद्रियांत वांटली जाते; अज्जी नष्ट होते असें नाहीं. जसें जन्मांधास नेत्र नसतात, त्याचा सृष्टीशीं कर्णेंद्रिय आणि स्पर्शेंद्रियद्वारा जास्त संबंध असतो. हीं त्याचीं दोन्ही इंद्रियें इतर माणसांच्या कर्ण व स्पर्शेंद्रियापक्षां जास्त तीक्ष्ण असतात. अर्थात् नष्ट झालेल्या नेत्रेंद्रियाची शक्ति

कर्ण आणि त्वचा यांच्यांत वांटली जाते. मुक्या मनुष्याचें कर्णेंद्रिय आणि वागिंद्रिय नष्ट असतें. त्याची शक्ति नेत्रेंद्रियांत व हस्तेंद्रियांत वांटली जाते. ह्मणून तो सर्व व्यवहार नेत्रांनीं व खुणेनें जास्त करीत असतो. पंगु हातांनीं रखडत चालतो. सारांश कोणत्याही इंद्रियाच्या नष्टतेनें व्यवहार बंद पडतो असें नाहीं. त्याच्या शक्तीची उणीव इतर इंद्रियद्वारा भरून येत असते. आणि जीव आपला पूर्ण व्यवहार करीत असतो. किंबहुना जन्माभ्यासानें त्या जीवास कोणत्याही इंद्रियाच्या अभावानें दुःख अथवा खेद सुद्धां वाटत नाहीं. कारण ज्या इंद्रियाचा त्यास अनुभवच नसतो त्याचे अभावाचा त्यास खेद तरी कसा वाटणार ? अनुभूत विषयाच्याच नाशानें खेद होत असतो. असा नेम आहे.

वर सांगितल्या जीवाच्या एकोणीस त्रिपुटी स्थूल देहाचे आश्रित राहून सर्व त्रिपुटींसह तो देहेंद्रियद्वारा स्थूल सृष्टींतले सर्व स्थूल विषयांचा यथार्थ उपभोग घेतो, कर्में करितो, आणि सर्व कर्मांचा व भोगाचा कर्ता भोक्ता मी आहें असें चांगल्या खबरदारीनें ह्म० यथार्थ ज्ञानानें मानतो. असा यथार्थ सृष्टिव्यवहार ज्या कालांत हा जीव करतो तो काल जीवाची जाग्रदवस्था अशी ह्मटली जाते. आरंभीं मीपणाचे शोधार्थ ज्या तीन कक्षा ह्म० सृष्टिव्यापारी मी, देहधारी मी, आणि जीव मी अशा केल्या आहेत, त्या तिन्ही कक्षांत देहेंद्रियांशीं सहवर्तमान यावत् जो व्यवहार होतो तो सर्व जाग्रदवस्थेचा व्यापार होय. मी राजा, मी योद्धा, मी धनीक, मी विद्वान्, चतुर इ० जीं जिवाचीं विशेषणें आहेत त्या विशेषणांच्या विषयांचा ह्म० राज्य, युद्ध, धन, विद्या, आणि चातुर्य इ० साहित्यांचा सर्व देहेंद्रियत्रिपुटींनीं यथार्थ भोग जाग्रदवस्थेंतच होतो. मी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इ० जाति, आश्रम, धर्म, कर्मादिकांचें यथार्थभान आणि व्यवहार जागृतींत होतात. मी देहधारी जीव आहें इ० ज्ञान जागृतींत यथार्थ होत असतें. सारांश जीवाचा ईश्वरनिर्मित स्थूल सृष्टीशीं यावत् सर्व संबंध देहेंद्रियांशीं, ह्म० एकोणीस त्रिपुटीद्वारा, जो यथार्थ होतो ती जीवाची जाग्रदवस्था जाणावी. ह्म० जीव जागेपणांत असतां जो सर्व व्यापार करतो तो काल जाग्रदवस्था आहे. या

अवस्थेंत देहेंद्रियेंही स्थूल असतात. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधादि विषयही स्थूल असतात, आणि इंद्रियांच्या व विषयांच्या संयोगानें जो भोग होतो तो भोगही स्थूल भोग ह्मणविला जातो. एवंच सर्व स्थूल व्यवहारास जीवाची **जाग्रदवस्था** जाणावी. हिलाच **स्थूलावस्थाही** ह्मणतात.

---

## जीवाची स्वप्नावस्था अथवा सूक्ष्मावस्था.

एकोणीस त्रिपुटीद्वारा हा जीव स्थूल विषयोपभोग भोगून आणि कर्में करून परिश्रम पावतो. त्या योगानें सर्व इंद्रियेंही थकित होऊन कार्यक्षम राहत नाहींत. तेव्हां हा जीव बाह्य स्थूलसृष्टिव्यापारास कंटाळून पराङ्मुख होतो. बाहेरून पराङ्मुख होणें हेंच अंतर्मुख होणें होय. ह्म० बाहेरील विषयास सोडून अंतर्गृहांत प्रवेश करूं लागतो. तेव्हां आळस उत्पन्न होऊन निद्रा येऊं लागते. ज्याप्रमाणें राजाची स्वारी राज्यव्यवहाराचे दरबारीं सिंहासनावरून उठून, अंत:पुरांत गेली ह्म० त्या राजसिंहासनावर लागलेंच आच्छादन पडतें, आणि प्रधानादिक सर्व सेवकमंडळी आपापले नियमित कक्षेपर्यंत राजाच्या समागमें बोलत जातात आणि थांबत जातात. अत्यंत विश्वासूक प्रधानावर राजाची व राणीची समान प्रीति असते, त्यास अंत:पुरांतही जाण्याचा प्रतिबंध नसतो. तेव्हां तो प्रधान अवश्य व महत्त्वाच्या राज्यकार्याची राणीस वर्दी देऊन कांहीं अगत्याच्या सूचना राजाशीं सल्ला करण्याच्या देऊन उभयतांचे पाद वंदन करून स्वगृहीं जातो. जातांना जे सेवक ज्या स्थानीं स्थापावयाचे असतील त्यांची व्यवस्था लावून जातो. आणि जो संकेत जसा ठरला असेल त्यावेळीं पुन्हां हजर होतो. अशा एकांत मंदिरीं केवळ राजा आणि राणीच असतात. राणीस जें कांहीं आपलें गुणचातुर्य आणि राज्यकारभारदक्षता दाखवावयाची असेल ती राजाच्या इच्छेनुरूप दाखवून पुढें उभयतां शयनमंदिरीं जाऊन ऐक्यसुखांत निमग्न होतात. हे राजन् शीलनिधे, ही सर्व गोष्ट तुझी नित्यानुभूतीची आहे.

याचप्रमाणें हा जीवराजा सृष्टिकार्यार्थ जाग्रदवस्थारूप दरबारांत एकोणीस त्रिपुटींचे अधिकारी सेवकमंडळासह नेत्राधिष्ठान सिंहासनावर बसून सर्व व्यवहार करीत होता. तें कार्य आटोपून जीवराजा सिंहासनावरून उठतांच आलस्यरूप सेवक नेत्रसिंहासनावर पापण्याचें आच्छादन घालून शयनमंदिराची व्यवस्थापक अधिकारिणी जी निद्रा तिजला, राजा राणीसह येत आहे, सुखशय्येची तयारी ठेवावी अशी वर्दी देऊन स्वस्थानीं ह्म० नेत्रस्थानीं हजर राहतो. आणि जीव निद्राप्राप्त्यर्थ नेत्रमीलन करितो. नेत्रमीलन करतांच निद्रा लागते असें नाहीं. कांहीं वेळ विचारही मनांत होत असतात. राजा नेत्र सिंहासनावरून उतरून अंत:पुरांत हळुहळू प्रवेश करीत जातो अर्थात् कांहीं वेळ थोडी जाग राहून विचारही चालू असतात. तोंवर सर्व त्रिपुटीरूप सेवक आपापले गोलकरूप स्थानावर हजर उभे राहून राजास वर्दी देत असतात. ( कान दुखत होता त्यांत आज औषध घातलें नाहीं, पायमोजे आणावयाचे होते ते विसरलों, लेखणी करतांना हातास चाकू लागला, सर्दी झाल्यानें नाक बंद पडल्यामुळें भोजनांत मजा आली नाहीं, अशाच प्रकारचे जे इंद्रियांविषयीं विचार हीच इंद्रियादिक सेवकवर्गांची जीवराजास आपले कामाची वर्दी आहे. ) मनाचे इंद्रियविषयक विचार शांत झाले ह्म० इंद्रियें आपापले गोलकांत स्थिर होतात. पुढें केवळ मानसिक विचारच कांहीं वेळ चालू होतात. ही मनरूप प्रधानाची एकांतांत राजाराणीस अत्यंत आवश्यकतेच्या कामाची विनंति होय. निद्रा लागण्यापूर्वी अत्यंत अवश्य विचार असतात तेच होतात. नंतर मनरूप प्रधान पंचप्राणांस जीवराजाचे संरक्षणार्थ खबरदारीनें जागें राहण्याची कडक आज्ञा देऊन स्वस्थानीं जातो. मग हा जीवराजा आपले बुद्धिराणीसहवर्तमान कंठप्रदेशीं **हिता**नामक नाडी आहे, त्या नाडीरूप एकांतमंदिरीं प्रवेश करितो. त्या अति सूक्ष्म स्थलीं बुद्धिरूप राणी सर्व एकोणीस त्रिपुटींचे संस्कार आपले ठिकाणीं धारण करून भोग**भोक्ता**-भोगसाधन **इंद्रियें** आणि भोग्य **विषय** अशी त्रिपुटी आपणच स्वत: होते. आणि कांहीं जागृतींतील व्यवहाराचे संस्कार, कांहीं असंख्य जन्मांतरांचे संस्कार आणि कांहीं स्वत:कल्पित संस्कार

यांच्या साहित्यानें अगदीं ईश्वराचे स्थूल सृष्टीप्रमाणें हुबेहुब सर्व काल्पनिक सृष्टि निर्माण करून जीवराजास आपल्या अचिंत्य सामर्थ्यानें आणि कलाकौशल्यानें रममाण करून प्रसन्न करिते. अशी कंठदेशस्थ हितानामक नाडीच्या सूक्ष्मावकाशांत अतर्क्य सृष्टीची केवळ कल्पनामय आणि संस्काररूप रचना बुद्धि निर्माण करिते. व त्याचा अनुभव हा जीव घेतो. अशा प्रकारच्या अनुभवावस्थेंत जोंपावेतों जीव असतो ती अवस्था जीवाची **स्वप्नावस्था** ह्मणविते. या अवस्थेंत जीवास कोणत्याही प्रकारचें बाह्य भान मुळींच नसतें. कारण बाह्यसृष्टिभानास उपयुक्त जो इंद्रियसमुदाय तो सर्व आपआपल्या गोलकांत लीन असल्यानें कार्याक्षम असतो. या सर्वांचे कार्याक्षम कालांत जी केवल बुद्धीची काल्पनिक सृष्टिरचना इलाच स्वप्नावस्था म्हणतात. यांत जर इंद्रियें बाह्य व्यापार करूं लागलीं तर स्वप्नावस्था रहाणार नाहीं. स्वप्नावस्थेचे सिद्ध्यर्थ बाह्य कार्यविस्मृतीच राहिली पाहिजे.

हा जीव बाह्य सृष्टीस विसरून अंतःपुरांत बुद्धिरूप भार्येच्या काल्पनिक सृष्टींत निमग्न झाला ह्म० मग काय विचारता ? तेथें सर्वच थाट सर्व सामान किंबहुना स्वतःचें शरीरसुद्धां सर्वच कांहीं अगदीं क्षणोक्षणीं नवेंच नवें होत असतें. ( बायको अत्यंत लाडकी असली आणि नवराही तसाच अत्यंत लोलुप असला ह्म० बायको लाडांत येऊन ज्या कांहीं लीला करूं लागते त्या सर्व लीला नवऱ्यास गोड लागून त्यांचें कौतुक वाटतें. हा अनुभव बहुतांशीं बऱ्याच प्रिय दंपत्यांस आहेच. ) अशा काल्पनिक सृष्टींत जवि सांपडल्यावर त्यास आपल्या बाह्य यथार्थ स्थितीचा अगदीं विसर पडून स्वप्नांत राजास मी भिकारी आहें असें वाटतें. भिकारी राजा होतो. शरीर चांगलें असतां मी अत्यंत रोगी आहें असें वाटून औषधार्थ भटकत फिरतो. सुखशय्येवर निजला असतां मी अरण्यांत कांट्यांत लोळत आहें असें वाटतें. शय्येवर पुष्पादिक सौगंधिक द्रव्यें असतां अंगास विष्ठा लागली आहे असेंही स्वप्नांत वाटतें. आनंदानें घरांत निजला असतां महत्संकटांत ह्म० व्याघ्रादिकांच्या तडाक्यांत, चोरादिकांच्या सपाट्यांत आणि एकाद्या भयंकर अपघातांत सांपडलों आहे असें वा-

टून भयकंपादिकानें त्रेधा उडते. क्वचित् वेळीं अपूर्व सुखांत ह्म० स्वर्गासारखे अपूर्व-स्त्री-धन-वैभवादि संपत्तीचा उपभोग घेतो. क्वचित् वेळीं नरकादिक यातना भोगतो. क्वचित् ईश्वराराधन व साधुसमागमही त्यास घडून आनंदानें कृतार्थता वाटते. असे अनंत प्रकारचे काल्पनिक सृष्टिचमत्कार एका क्षणार्धांत ही बुद्धि अति सूक्ष्म प्रदेशांत केवढा विस्तीर्ण खेळ उभा करते कीं त्याचें पूर्णपणें आकलन ह्म० यथार्थज्ञान संपादन करणारा—सर्व जन्माची तर गोष्टच नको, पण एका रात्रीचें स्वाप्निक यथार्थज्ञान संपादणारा सृष्टींत कोणताही बुद्धिमान् प्राणी आजवर निर्माण झालाच नाहीं व पुढें न होण्याचा संभव आहे. तात्पर्य हा जीव परमात्म्याची हुबेहुब अति सूक्ष्म प्रतिमा आहे, असें मागें पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. त्याचेंच हें अगदीं बरोबर प्रत्यंतर आहे कीं जीव परमात्म्याची एक कला आहे आणि बुद्धि ही महामाया आदिशक्तीची कला आहे. ज्याप्रमाणें परमात्मा स्थूलसृष्टीचा द्रष्टा असून महामाया स्थूलसृष्टीची कर्त्री आहे, त्याप्रमाणेंच हा जीवही स्वाप्निक सूक्ष्म सृष्टीचा द्रष्टा असून बुद्धि ही काल्पनिक सृष्टीची कर्त्री आहे. जसें परमात्म्याच्या व्यापक शरीरांत न जाणे कोणत्या सूक्ष्मांशप्रदेशीं सृष्टि निर्माण होते व जाते याचा पत्ताही लागत नाहीं, तसेंच जीवाचे शरीरांतील कंठस्थ हिता नाडीच्या अति सूक्ष्म प्रदेशीं नित्य क्षणोक्षणीं सूक्ष्म सृष्टि कोणीकडे निर्माण होते व जाते याचा पत्ताही लागत नाहीं.* जसें परमात्मदृष्टीनें सृष्टीचें कांहींच महत्त्व नाहीं, तसेंच जीवदृष्टीनें स्वाप्निक सृष्टीची कांहीं किंमत नाहीं. रोजचा क्रम आंगवळणीं पडल्यानें तिकडे कोणी लक्षसुद्धां देत नाहीं. असा काल्पनिक सृष्टीचा उत्पत्तिस्थितिलय नित्य चालू आहे. तेथें भोगसाधन इंद्रियें, भोग्यविषय आणि भोक्ता जीव, अशा सर्व त्रिपुटींस केवळ बुद्धीची कल्पनाच

* अगदीं कडक नियमांनीं वागणारे विद्वान राज्यकारस्थानी व राजे इ० यांच्या आठ प्रहरांचे व्यवहाराच्या डायऱ्या ह्म० रोजनिशा नित्य नियमांनीं लिहिल्याच जावयाच्या, त्यांत इतके वाजतां स्वारी निजली व उठली असें सुद्धां लिहिलें जातें; मग आज स्वारीनीं अमुक अमुक स्वप्नें पाहिलीं असें कां बरें लिहिलें जाऊं नये ? स्वारीस स्वप्नद्रष्टेपणाचा यथार्थ बोध असेल तर लिहितीलना ?

आधार असून या काल्पनिक आणि संस्काररूप त्रिपुटीचा, कंठप्रदेशीं जावत्कालपर्यंत हा जीव भोग करतो त्या भोगावस्थेस जीवाची स्वप्नावस्था असें ह्मणतात. जाग्रदवस्थेंत जीवाचें अधिष्ठान नेत्रस्थान असून जसा स्थूलसृष्टिव्यवहार सर्व इंद्रियांचे द्वारा होतो तसा स्वप्नावस्थेंत जीवाचें अधिष्ठान कंठस्थान असून केवळ बुद्धिद्वारा सूक्ष्म सृष्टिव्यवहार होतो. जाग्रदवस्थेंत आणि स्वप्नावस्थेंत वास्तविक फरक इतकाच आहे कीं, जाग्रदवस्थेंतील स्थूलविषय कालचे आज व आजचे उद्यां पुन्हां पुन्हां तेच प्राप्त होतात. ह्म० निद्रेंत जरी बाह्य प्रपंचाची अत्यंत विस्मृति होते तरी जागें झाल्यावर पुन्हां जसेच्या तसेच सर्व विषय सांपडतात. आणि स्वाप्निक प्रपंचविषय जे आज स्वप्नांत पाहिले ते पुन्हां दुसऱ्या वेळीं यावज्जन्मांत सांपडत नाहींत. प्रतिदिवशीं स्वप्नरचना नवी. जाग्रदवस्थेंत स्वप्नावस्था नसते आणि स्वप्नावस्थेंत जाग्रदवस्था नसते. दोन्ही अवस्था आपसांत विरोधी आहेत. ह्म० एकमेकांत एकमेक जात नाहींत. पण दोन्ही अवस्थांचा द्रष्टा जो जीव, हा मात्र अविरोधी आहे. जागृतीसही हा पहातो; स्वप्नासही हा पहातो. आणि स्वतः द्रष्टेपणानें दोघांहून वेगळाही राहतो. जागृतीचे विषय ईशसृष्ट असल्यानें बहुतकालपर्यंत स्थिर असतात, आणि स्वप्नाचे विषय जीवसृष्ट असल्यानें किंचित्काल उगीच प्रतीत होतात, ह्मणून ते अस्थिर ह्मणवितात. ईशदृष्टीनें तर जागृत विषयाचीही स्वप्नविषयाप्रमाणेंच किंमत आहे. पण जीवदृष्टीनें जो बहुकाल व अल्पकाल प्रतीतीचा भेद उभा राहिला त्या योगानेंच जाग्रदवस्था आणि स्वप्नावस्था असा भेद झाला आहे. **हे राजन्** जाग्रदवस्था व स्वप्नावस्था जीवाच्या तुला सांगितल्या, आतां तिसरी जी सुषुप्तिअवस्था ती सांगतों. लक्ष असूंदे.

---

## जीवाची सुषुप्ति अवस्था.

जीवराजाची राणी जी बुद्धि, तिला जावत्काल आपली काल्पनिक सृष्टिक्रीडा करावयाची असेल तावत्काल हा जीव तिजला अनु-

कूल राहून ती जसे नाच नाचवील तसे नाचून तिचें कौशल्य पाहून नंतर उभयतां सुखशयनार्थ हृदयरूप शयनमंदिरीं प्रवेश करतात. त्या मंदिराची व्यवस्था पाहणारी जी निद्रा ही उभयतांचे सुश्रूषेकरितां प्रथमपासूनच सज्ज असते. ती यांची एकांतिक सर्व व्यवस्था करून हृदय मंदिराचीं कपाटें लावून बाहेर बसते. हे **राजन्**, स्त्रीपुरुषांचे एकांतरमणस्थलीं सेवक मित्रादिक तर नाहींतच, पण सज्ञान मुलें सुद्धां राहूं शकत नाहींत. तथापि जें अज्ञान मूल असतें त्यास मात्र कोणत्या वेळीं कोठेंही प्रतिबंध नाहीं. आणि अज्ञान मुलाची मातापितरांस काळजी व प्रीति जास्त असल्यानें तीं त्यास कोणत्याही क्षणीं विसंबत नाहींत. व तें अज्ञानी असल्यानें त्याची एकांतांत लज्जाही वाटत नाहीं. पुत्र हा पित्याचे अगदीं प्राण व आत्मा ह्म० केवळ स्वरूप असतो. ह्मणून पुत्रावर मातापितरांची प्राणापेक्षांही अधिक प्रीति असते. मग तो अज्ञान असल्यावर दूर कसा ठेवतां येतो. याच नियमानें जीव आणि बुद्धि राजाराणीचे सुषुप्तीच्या एकांतरमणस्थलीं **अज्ञान मूल** बरोबर जातें ह्म० बुद्धि अज्ञान ह्या **मूलास** बरोबर नेते. बरें नेलें तर नेलें, पण एका बाजूस तरी निजवावें ! तर नाहीं. कारण बाजूस निजविलें तर पलंगावरून लोळत खालीं पडेल कीं काय ही काळजी एक, दुसरें त्याला स्तनपान करीत निजण्याची संवय असल्यानें तिकडे तोंड केल्यास पतीकडे पाठ होते. आणि पित्याला तरी मोकळ्या मनानें मुलास खेळविण्याची संधी एकांतांतच सांपडणार. अशा प्रेमपाशाच्या अडचणीमुळें स्त्रीपुरुषांच्यामध्यें अज्ञान मूल येऊन निजतें. तें तरी सामान्य नाहीं. **अज्ञानच** तें ह्म० समजुतीचा अथवा ज्ञानाचा त्यास गंधही नाहीं. मग त्याचे तृप्त्यर्थ बुद्धिमाता आपले विचाररूपी स्तन अज्ञानाचे मुखांत देऊन झोंपीं जाते. मग हे राजश्री जीवराजे बुद्धिभार्या विचाररूप स्तन अज्ञान चिरंजीवाचे मुखीं देऊन निद्रिस्त आहे व चिरंजीव अज्ञान विचारस्तनप्राशनांत निमग्न आहे अशा अत्यंत गोड देखाव्यास पहात बसतात, तोंवर सकाळ होते आणि जागृती येऊन धडकते. मग **स्वरूपभोगानंद** राहतो एकीकडेच. अपरिश्रमाचें आणि स्वस्थतेचें जेवढें कांहीं सुख मिळालें तवढ्यांतच

आनंद मानून पुढें बाह्य कार्यास आरंभ होतो. अशी जी ही एकांत अवस्था ही जीवाची **सुषुप्ति अवस्था** ह्मणविली जाते.

सारांश स्वप्नावस्थेंत जीव आणि बुद्धि कंठदेशस्थ हिता नाडींत प्रवेश करून बुद्धि बाह्य संस्कारास घेऊन त्रिपुटीरूप सर्व काल्पनिक सृष्टि निर्माण करीत होती आणि जीव ती सर्व सृष्टि पहात होता. पुढें कांहीं कालानें जीव व बुद्धि हृदयस्थानीं प्रवेश करून बुद्धि कार्याक्षम होते. आणि सर्व कल्पनेच्या अभावांत आपणही लीन होते. ह्म० बुद्धीची जी विचारशून्य दशा हेंच **अज्ञानाचें** स्वरूप होय. हा जीव महाविषयी आहे. याला विषयावांचून कोणत्याही क्षणांत चैन पडत नाहीं. याला स्थूल सूक्ष्म विषय देणारी जी बुद्धि ती स्वतः सर्वाभावरूप जें अज्ञान त्यांत लीन झाली. जीवाची विषयज्ञानशक्ति ही बुद्धीवर अवलंबून असते. ती बुद्धि अज्ञानांत लीन झाल्यानें **ज्ञान**विषय लुप्त होऊन केवळ अज्ञान विषयच शेष उरतो. त्या अज्ञानालाच विषय समजून हा जीव बुद्धि सोडून एकटाच अज्ञानांत रममाण होतो ह्म० अज्ञानास पहात असतो. **हे राजन्** शीलनिधे फार सूक्ष्म बुद्धीनें विचार करण्याची ही जागा आहे. पहा, या स्थळीं बुद्धीचाही लय होऊन केवळ **अज्ञान** आणि अज्ञानाचा **साक्षी** जीव असे दोघेच आहेत. येथें तरी जीवांनीं खबरदारीनें आपलें साक्षीपण बळकट ठेवावयाचें होतें, ह्मणजे सर्व काम आटोपलें होतें. पण बेटा जन्मोजन्मींचा कपाळकरंटा हा जीव याला आपलेपण सोडून दुसरेपणांत शिरून मी मी करण्याची संवय, ती जावी कशी. फुटला डोळा आणि ह्मणे मी अंधळा, मोडले पाय ह्मणे मी पंगू, हा हतभाग्या जीवा बुडवून घेतलें सर्वस्वीं ! मूर्खाला दुसरें असेल तें मी बनण्याची लतकोडगी संवय, ती कसली जाते. अरे अशा अतृतीयस्थलीं ह्म० त्रिपुटी नसून दोघेच असतां अज्ञानास आपल्याहून पृथक् दूर ठेवून 'मी अज्ञानाचा साक्षी' ह्म० द्रष्टा असा भाव धरावयाचा तो सोडून तें अज्ञान आपल्याच शिरावर घेतो. आपण त्या अज्ञानांत बुडून अगदीं एकजीव होतो. अज्ञानालाच आनंदरूप मानून शेवटीं ' मी अज्ञानी ' असा अज्ञानरूप होतो. आणि जागा झाल्यावर ' मी फार आनंदांत निजलों होतों '

' मला कसलीही शुद्धि नव्हती. ' असा अनुभव सांगतो. यांत ' कसलीही शुद्धि नव्हती ' हा बुद्धीचा अज्ञानांत लय होय. कारण 'शुद्धि ' असणें, हें काम बुद्धीचें होय. ती बुद्धि अज्ञानांत लीन आहे. आणि ' मी आनंदांत निजलों, ' यांत अज्ञानास आनंदाविषय मानल्याचा आणि मीपणाचा ह्म० आपले अस्तित्वाचा असा दोघांचा अनुभव होय. अर्थात् अज्ञान आणि अज्ञानसाक्षी जीव असे जोंवर दोघे एकत्र असतात तोंवर ती जीवाची **सुषुप्तिअवस्था** होय. आणि सुषुप्तींतही अज्ञानाचा पाहणारा जीव अज्ञानाहून वेगळा असल्यानें ' जाग्रत्–स्वप्न–सुषुप्ति ' या तिन्ही अवस्था जीवाच्या आठ प्रहरांत प्रतिदिवशीं व्यतीत होत असून ह्या तिन्ही अवस्थांचा साक्षी सर्वांहून वेगळा आहे असें जाणावें.

---

# जीवाचे पंचकोश.

**हे राजन् शीलनिधे**, जीवाच्या ज्या तीनं अवस्था ह्म० जागृति–स्वप्न–सुषुप्ति, ह्या तिन्ही अवस्थांचा पाहणारा जीव त्या अवस्थांहून वेगळा कसा आहे हें तुझ्या लक्षांत नीट आलेंच असेल. आतां मागें तुला जे जीवाचे तीन देह ह्म० **स्थूलदेह, सूक्ष्मदेह** व **कारणदेह** सांगून या तिन्ही देहांहून जीव निराळा आहे असें सांगितलें होतें, त्या तीन देहांत ***पंचकोश** ह्म० पांच आवरणें जीवावर पडलीं आहेत, त्या पांची आवरणांतून जीव कसा वेगळा आहे हें पहा. देहत्रयांत जीं देहेंद्रियादि सर्व साधनें आहेत त्यांतच पंचकोशांची वांटणी आहे. देहत्रयांस सोडून पंचकोश कांहीं वेगळे आहेत असें नाहीं. जीवाचे स्वरूपाची ओळख पटण्याकरितां श्रुतीनें पंचकोशांचा सूक्ष्म भेद करून दाखविला आहे. ते पंचकोश ह्म० **अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय** आणि **आनंदमय** असे पांच एकाचे आंत एक पुडताप्रमाणें आहेत. या आच्छादनांतून

---

* तलवारीचे म्यानास कोश अशी संज्ञा आहे. तलवारीवर ज्याप्रमाणें म्यानाचें आच्छादन असतें तसें जीवावर पंचकोशांचें आच्छादन असतें.

जीवास नीट शोधून बाहेर आणलें पाहिजे. शोधकानें येथें फार खबरदारीनें राहिलें पाहिजे, कारण देहाचे, इंद्रियाचे व अंतःकरणाचे धर्म आपल्या शिरावर घेऊन जसा जीव त्यांत लपतो तसाच या पंचकोशांतही जीव लपतो. यांतून त्यास बाहेर काढणें अति दुर्धर आहे.

## १ अन्नमयकोश.

प्राण्याचा देह हा मातापितरांच्या भुक्त अन्नरसापासून होणारें जें शुक्र व शोणित ( पित्याचें शुक्र ह्म० धातू व मातेचें शोणित ह्म० प्रतिमासिक रज ) यांच्या मिश्रणापासून गर्भरूपानें मातेच्या गर्भाशयांत येतो. आणि नऊ महिने मातेनें खाल्लेल्या अन्नरसानें पोषित होऊन जन्मास येतो. जन्मापासून दुग्ध अन्न इ० पदार्थांच्या भक्षणानें आमरणपर्यंत पोषिला जातो, वृद्धि पावतो, आणि शेवटीं मरणानंतर अन्नरसरूप जी पृथ्वी इच्यांतच लीन होतो. असा पंचवीस पदार्थांनीं संयुक्त मागें सांगितलेला जो स्थूलदेह यास **अन्नमयकोश** असें ह्मणतात. हा कोश केवळ अन्नरसमय असा स्थूल, जड आणि क्रियाशक्तिरहित आहे. व सर्व कोशांच्या वरील अथवा अगदीं बाहेरचा कोश आहे. हेंच जीवाचें राहण्याचें घर आहे.

## २ प्राणमयकोश.

हा कोश मागें सांगितलेल्या ज्या एकोणीस कला, त्यांपैकीं पंचकर्मेंद्रियें आणि पंचप्राण अशा ज्या दशकला तदात्मक होय. यांत प्राणांचें प्राधान्य असल्यानें यास **प्राणमयकोश** ह्मणतात. कर्मेंद्रियें हीं जड आहेत व प्राणही जड आहेत. पण वरील अन्नमयकोशापेक्षां कांहींसे बरे आहेत ह्म० यांत केवळ क्रियाशक्ति आहे. प्राणवायु अहर्निश वाहत असतात. व त्यांचे संचारानें हातपाय न कळतसुद्धां चळवळत असतात. झोंपेंत हातपाय हालणें व कुशीवर वळणें इ० प्राणवायूच्या साहाय्यानें अवयव चळवळतात ते आपल्यास कळतही नाहींत. यावरून प्राणशक्तिमिश्रित कर्मेंद्रियसंयुक्त **प्राणमयकोश** आहे असें स्पष्ट होतें.

## ३ मनोमयकोश.

पंचज्ञानेंद्रियें आणि सहावें फक्त मन यांस **मनोमयकोश** असें

ह्मणतात. यांत पंचज्ञानेंद्रियांस विषयग्रहणशक्ति व मनास प्रेरणाशक्ति असल्यानें वरील दोन कोशांपेक्षां या कोशांत चेतनांशाची सामान्य प्रभा जास्त आहे. मनाची चंचलस्थिति असल्यानें ज्ञानेंद्रियद्वारा होणारें ज्ञानही अपुरें ह्म० सामान्यच असतें. त्यांत निश्चितार्थ कमी असतो. हा मनोमयकोश वरील दोन कोशांच्या आंतला आहे.

## ४ विज्ञानमयकोश.

मनोमयकोशांत आलेलीं पंचज्ञानेंद्रियें आणि सहावें बुद्धितत्त्व यांनीं संयुक्त **विज्ञानमयकोश** ह्मणविला जातो. मनाचें ज्ञान संशययुक्त असल्यानें त्याच्याद्वारा होणारें ज्ञानेंद्रियाचें ज्ञानही तसेंच संशयी असतें. संशयी ज्ञानास यथार्थ ज्ञान ह्मणतां येत नाहीं. आणि त्याच ज्ञानेंद्रियांस बुद्धीच्या यथार्थ ज्ञानप्रेरणेनें जें विषयज्ञान होतें तेंच विषयज्ञान निश्चितज्ञान ह्मणवितें. ह्मणून पंचज्ञानेंद्रियसंयुक्त बुद्धि विज्ञानमयकोश होय. हा कोश तिन्ही कोशांच्या आंतला आहे.

## ५ आनंदमयकोश.

या **आनंदमयकोशांत** पंचज्ञानेंद्रियांची अपेक्षा नाहीं. केवळ विज्ञानरूपिणी बुद्धि मात्र असते, पण ती बुद्धि विषयज्ञानरूपिणी नाहीं, ह्म० बुद्धीनें कोणताही विषय धरलेला नाहीं. विषय धरलेला नसणें ह्म० शब्दस्पर्शादिक बाह्यविषय तर नाहींच, पण देहेंद्रियादि अंत:करणरूप अंतर्विषयांचेंसुद्धां बुद्धीनें ग्रहण केलेलें नसतें. अशा सर्व विषयांचे अग्रहणस्थितींत बुद्धीची अत्यंत ऐकांतिक स्थिति झाली असतां तिच्यांत आनंद उसळतो व त्या आनंदांत ती बुद्धि लीन होते. तो आनंद जीवास स्वसंवेद्यच आहे. पुढें उत्तरक्षणांत जेव्हां बुद्धि उत्थान पावते तेव्हां जीवास स्वोपभुक्त आनंद बुद्धिद्वारा प्रकट करितां येतो. कारण प्रकट करण्याचें अथवा व्यक्त करण्याचें साधन बुद्धि आहे. तिच्या लीनावस्थेंत जीवास आनंदाचा भोग तर घेतां येतो, पण व्यक्त मात्र करितां येत नाहीं. अशा स्वसंवेद्य आनंदाचा अनुभव अत्यंत प्रिय—स्त्री—पुत्र—मित्रादिकांच्या चिरकाल वियोगानंतर जी प्रथम भेट होते, त्याक्षणीं किंवा कल्पनेहून अधिक विजय, धन, इत्यादिक विभूतींचा ज्या क्षणीं लाभ होतो ते क्षण

दोन क्षण अति हर्षाचे असतात, त्या क्षणांत मात्र येत असतो. इतरत्र येत नाहीं. अशा समयीं बुद्धि त्या आनंदांत मग्न होते, किंबहुना अतिरिक्त हर्ष झाल्यास मूर्छा अश्रू इ० प्रकार घडतात. या क्षणांतील आनंद जीव स्वसंवेद्यतेनेंच स्वल्पकाळ भोगून पुढें बुद्धिद्वारा, 'मी असा आनंदित झालों' ह्मणून अनुभव सांगतो. हा अनुभव बहुधा सर्वांस आहेच. या अनुभवस्थितींत जीव आनंदाचा भोक्ता आनंदाहून पृथक् राहतो. पण या पृथकतेचें या स्थळीं भान मात्र रहात नाहीं. या आनंदभुक् जीवासच आत्मा मानून सांख्ययोगादि आचार्य याच स्थलीं व्यामोहित होऊन कुंठित होतात. या पलीकडे त्यांस जातांच येत नाहीं. केवळ वेदांतीच मात्र या पलीकडे उड्डाण करून गेले आणि कैवल्यरूप झाले. जसा इष्टप्राप्तीनें लीनवृत्तीचा आनंद मिळतो तसा सुषुप्तींतही लीनवृत्तीचा आनंद मिळतो. पण फरक इतकाच कीं, सुषुप्तींत विषय-अज्ञान असतें, आणि जागृतींत इष्टप्राप्तींत आनंदाचा खरा विषय कोण होतो हें न कळतां इष्टपदार्थ विषय वाटतो. असो. तात्पर्य बुद्धीच्या लीनावस्थेंत जो आनंद प्राप्त होऊन त्याचा जो अनुभव या जीवास घडतो ती अनुभवस्थिति जीवाचा अगदीं आंतला प्रथम ह्मणा अथवा शेवटील ह्मणा पांचवा **आनंदमय** कोश आहे.

एकोणीस त्रिपुटीरूप देहत्रयांत या पंचकोशांची वांटणी असल्यानें स्थूलदेहसंयुक्त सर्व त्रिपुटींचा जसा जाग्रदवस्थेंत पूर्ण अनुभव होतो तसाच पंचकोशांचाही पूर्ण अनुभव जाग्रदवस्थेंत होतो. **अन्नमय**कोश हा तर स्थूलदेहच आहे. पंचकर्मेंद्रियें व पंचप्राणसंयुक्त **प्राणमय**कोशाचाही अनुभव श्वासोच्छ्वासरूपानें येतच आहे. पंचज्ञानेंद्रियें व मन ह्यांनीं युक्त **मनोमयकोश** व बुद्धिसंयुक्त **विज्ञानमय कोश** यांचाही इंद्रियव्यापार, मनोव्यापार व बुद्धिव्यापाररूप अनुभव जागृतींत होतच आहे. तसेंच इष्टफलप्राप्तीचे आनंदानुभवरूप **आनंदमय**कोशाचाही जागेपणीं साक्षात् अनुभव आहे. असा जाग्रदवस्थेंत अथवा सर्व देहेंद्रियादिसंयुक्त स्थूलदेहांत पांची कोशांचा अनुभव होतो. **लिंगदेह** अथवा सूक्ष्मावस्थेंत स्थूल अन्नमय कोशाचा अनुभव खेरीज करून **प्राणमय, मनोमय** आणि **विज्ञानमय** अशा

तीन कोशांचा अनुभव होतो. आणि **कारणदेह** अथवा कारणावस्था ह्म० सुषुप्तींत केवळ एक **आनंदमय** कोशाचाच अनुभव होतो. अशी ही जीवाच्या पंचकोशांची व्यवस्था आहे. ज्याप्रमाणें देहत्रय आणि अवस्थात्रय यांचा भोक्ता **जीव** साक्षीरूपानें वेगळा आहे, त्याप्रमाणेंच पंचकोशात्मक पांच आवरणांत असूनही हा जीव वेगळा, सर्वांचा साक्षीरूप आहे. ह्म० सर्वांहून वेगळा असतां केवळ अज्ञानानें या सर्वांत गुंतल्यासारखा व दडून बसल्यासारखा झाला आहे. त्यामुळें ह्या सर्व पदार्थांचा संघातरूपच तो होऊन या संघाताच्या जन्मनाशादिकानें आपला जन्मनाश आहे; यांचे जे स्वाभाविक धर्म ते आपलेच धर्म आहेत, व यांचीं स्वाभाविक जीं कर्में तींच माझीं कर्में आहेत असें मानूं लागल्यानें त्या सर्वांचें कर्तृत्व जीवाकडे आलें. कर्तृत्व येतांच भोक्तृत्वही शिरावर बसलेंच. कर्तृत्वभोक्तृत्व आलें कीं सुखदुःखादि सर्व परंपरा पुढें चाललीच. असो. हे **राजन्** जीवाच्या स्वरूपविवेचनार्थ देहत्रय, अवस्थात्रय, पंचकोश इत्यादिकांचा सर्व विचार सांगितला, आतां सर्वांचे स्वाभाविक धर्म सांगतों.

---

## देहेंद्रियादि स्थूलसूक्ष्मसंघातरूप जीवाचे स्वाभाविक धर्म.

जीवाचा स्थूलदेह हा जन्माच्या पूर्वीं नसतो. तो जन्मास येऊन अस्तित्वांत येतो. अन्नरसादिकांनीं पोषित होऊन पुष्ट होतो. वृद्धि पावतो. पुढें वृद्धि बंद पडून क्षीण होत जातो. सरतेशेवटीं जराग्रस्त होऊन मरण पावतो. यांस–**जन्म–अस्ति–वृद्धि–विपरिणाम–अपक्षय–विनाश** असे षड्विकार ह्मणतात. हे षड्विकार केवळ **स्थूलदेहास**च असतात. **लिंगदेह** व **कारणदेह** यांस हे विकार लागू नाहींत. तशाच सहा अवस्थाही ह्याच स्थूलदेहास असतात.

जन्मापासून वर्षभराचें शरीर होईपर्यंत स्थूलदेहाची शैशवावस्था होय. पांच वर्षांपर्यंत कौमारावस्था, सहापासून दहा वर्षांपर्यंत पौगंडावस्था, अक्रापासून पंधरावे वर्षांपर्यंत कैशोर्यावस्था, सोळावे वर्षांपासून

चाळिसावे वर्षापर्यंत यौवनावस्था आणि चाळिसाच्या पुढें सर्व देहपातापर्यंत वृद्धावस्था होय*. अशा सहा अवस्था या स्थूलदेहास आहेत. पण या अवस्थांत शंभर वर्षांचें आयुष्य व जन्मापासून मरणापर्यंत योग्य देहपरिचर्या राहिली तर ( वर्तमानकालीं तर देहपरिचर्याभावामुळें बहुधा तीस चाळीस वर्षांत सर्व अवस्थांचा निकाल लागून मोकळीक होते. ) असो.

जाति ह्म० ब्राह्मण–शूद्रादि, नाम ह्म० व्यक्तिबोधार्थ ठेवलें जातें जें नांव तें, आश्रम ह्म० ब्रह्मचारी–गृहस्थ–वानप्रस्थ–आणि यति असे चार आहेत ते, गोत्र आडनांव इ० हे सर्व स्थूलदेहाश्रितच आहेत. सूक्ष्मदेह व कारणदेह यांशीं यांचा कांहींच संबंध नाहीं. तसेंच व्याधि ह्म० यावत् शारीरिक रोग हेही स्थूलदेहामागेंच आहेत. शरीराचीं व अवयवादिकांची चांगली अथवा वाईट ठेवण, सौंदर्य, कुरूपता इ० गुण हेही स्थूलदेहाश्रितच असतात. ( यावरून वाचकांनीं आणखीही गोष्टी जुळवून घ्याव्यात ) सारांश वर सांगितलेल्या गोष्टींपैकीं जातिनामाश्रमादिक हे स्थूलदेहास औपचारिक आहेत. ह्म० ज्या कुलांत स्थूलदेह जन्मास येईल त्या कुलांची जातिनामादिक स्थूलदेहास लागतात. अरण्यांतील क्रूर पशूंनीं नेलेलीं मानवी पोरें त्यांच्या गुहेंतच वाढून पुढें शिकारी लोकांनीं धरून आणलेलीं वनमनुष्यें पुष्कळांच्या पाहण्यांत आलींच असतात. तीं आकृतीनें मात्र मनुष्यें असून केवळ पशू असतात. त्यांस जातिनामाश्रमधर्मादिकांची कसलीही उपाधि नसते. ते सर्व उपाधींनीं रहित असतात. यांत त्यांचा कांहीं दोष असतो असें नाहीं. कारण त्यांस निसर्गतःच तशी वन्यस्थिति प्राप्त होते. पण महदाश्चर्य हें आहे कीं, जे मानव प्राणी निसर्गतः कुलगोत्रजातिनामाश्रमांत जन्मून चांगल्या सज्ञानदशेंत आल्यावर कुलगोत्रजातिधर्मादिकांस कंटाळून वरील प्राणिवर्गाच्या कोटींत शिरतात यास काय म्हणावें? ( काय हा विद्येचा परिणाम तर नव्हेना? खरोखरच जर असें असेल तर मनुष्यास पशु बनविणारी विद्या व तिच्या अध्ययनानें झालेले विद्वान् यांची प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे. ) असो. हे जातिनामादिक औपचा-

* कोणी चाळीसपासून साठापर्यंत प्रौढावस्थाही मानली आहे.

रिक गुण खेरीज करून बाकी षड्विकार, सहा अवस्था, सुरूपकुरूपता इ० ह्या सर्व गोष्टी जन्मतःच स्थूलदेहाबरोबर येऊन स्थूलदेहाश्रित राहून शेवटीं त्याच्याच बरोबर जातात. हे सर्व विकार देहाला असून जीवास नाहींत. जीव या सर्व विकारांपासून वेगळा आहे. हाच स्थूलदेह जीवाचा अन्नमय कोश आहे.

सत्रा अथवा एकोणीस कलात्मक जो **लिंगदेह** अथवा **सूक्ष्मदेह**, त्याच्या सर्व त्रिपुटी मागें सविस्तर सांगितल्याच आहेत. पंचप्राण, पंच कर्मेंद्रियें व पंच ज्ञानेंद्रियें यांचे स्वाभाविक धर्म ठराविक असून, अंतःकरणांतून जशी विषयग्रहण अथवा त्याग करण्याची प्रेरणा होईल तशीं तीं इंद्रियें विषयांचें ग्रहण किंवा त्याग करतात. यांजकडे केवळ **क्रियाशक्ति** मात्र असून **प्रेरणाशक्ति** अंतःकरणाकडे आहे. आणि **इच्छाशक्ति** जीवाकडे आहे. बुद्धीचा आणि जीवाचा अति संलग्न संबंध असल्यानें जीवाची इच्छा बुद्धींत व्यक्त होते व तेथून पुढें आघातपरंपरा सुरू होते. व तशीच पुन्हां मागें परत जाते. ह्म० जीवाची इच्छा बुद्धिद्वारा अंतःकरणांत जशी व्यक्त होते तशी अंतःकरणाकडून इंद्रियांस प्रेरणा होते, तदनुरूप इंद्रियें विषयांत प्रविष्ट होऊन स्वशक्त्यनुरूप विषय अंतःकरणांत नेऊन पोंचवितात. अंतःकरणांत त्या विषयाचा विचार होऊन बुद्धिद्वारा तो विषय इच्छेनुरूप जीवास प्राप्त होऊन जीवास संतोष किंवा असंतोष होतो. तथापि त्याची व्यक्तता बुद्धिद्वाराच होणार. जशी जीवाची इच्छा बुद्धिद्वारा प्रगट होते तसाच संतोष असंतोष अथवा तृप्ति अतृप्तिही बुद्धिद्वाराच व्यक्त होते. पंचप्राण व दशेंद्रियें यांचे धर्म ठराविक एकच एक असून हे विचारे मजुराप्रमाणें सांगकामे आहेत. आणि अंतःकरणाचे धर्म मात्र सृष्टीच्या सर्व उठाठेवी करणारे असे अनेक आहेत. पंचप्राण व दशेंद्रियें यांच्या ज्या त्रिपुटी मागें सांगितल्या आहेत त्यांत ज्या प्राणेंद्रियांनीं जे विषय ग्रहण होतात असें सांगितलें आहे, ते आपापले विषय ग्रहण करणें हेच त्या प्राणेंद्रियांचे धर्म होत. ह्म० श्वासोच्छ्वास, ढेंकर, जृंभा, चलन, वलन, धांवन, प्रसारण इ० हे सर्व प्राणवायूचे धर्म होत. तसेंच क्षुधा, तृषा हे देखील प्राणाचेच धर्म होत. भाषण, गमन, आदान ( ग्रहण ) विसर्ग ( मलत्याग ) आणि

भोग ( रतिभोग ) पंचकर्मेंद्रियांचे धर्म होत. श्रवण, स्पर्श, अवलोकन, आघ्राण आणि रसास्वाद हे पंचज्ञानेंद्रियांचे धर्म होत. हे सर्व धर्म अव्यभिचारी होत. ह्म० ठराविक इंद्रियाश्रितच राहतात. अवलोकनाचा धर्म कधीं श्रवणांत येणार नाहीं व श्रवणाचा धर्म कधीं नेत्रांत यावयाचा नाहीं, असा नियम आहे; पण एखादे इंद्रियाचा अभाव असल्यास त्याची शक्ति दुसऱ्या इंद्रियांत जाते असें मागें सांगितलेंच आहे. तथापि विधात्यानें कांहीं प्राणी असेही निर्माण केले आहेत कीं, ज्यांच्या शरीररचनेंत एका इंद्रियगोलांत दोनदोन इंद्रियें बसविलीं आहेत. जसा सर्प हा नेत्रांनीं पहातो व ऐकतोही, तसेंच पोटानें खाद्य धारण करून चालतो, उभा राहतो, आणि धरतो; यावरून त्यास चक्षुश्रवा व उरग अशीं नांवें पडलीं. जळू ही तोंडानें रुधिर, मृत्तिका इ० खाते व तोंडानेंच त्याग करते. अशा अनेक जीवांच्या देहेंद्रियांच्या रचना व त्यांचे व्यापार चित्रविचित्र आहेत. पण सर्वांस स्वाभाविक व ठराविक नियम लागू आहेत. अनियमित व्यापार कोणताही नाहीं. असो. आपणास तर विशेषत: मानवी शरीरेंद्रियरचनेचा व त्याच्या धर्मांचा विचार येथें प्रस्तुत कर्तव्य आहे, त्याप्रमाणें देह, प्राण व इंद्रियें यांचे धर्म वर सांगितले, आतां अंत:करणाच्या धर्मांचा विचार करूं.

अंत:करणांत **मन, बुद्धि, चित्त** आणि **अहंकार** असें चतुष्टय आहे. त्यांत चित्त व अहंकाराचा, मन व बुद्धींत अंतर्भाव होतो अथवा अंतर्भाव न करितां पृथक् मानले तरी अहंकाराचा धर्म 'मी अमुक आहें' इतकेंच मानावयाचा व चित्ताचा चिंतन करावयाचा इतकाच आहे. खऱ्या खऱ्या प्रचंड खटपटी आसाम्या—**मन** आणि **बुद्धि** ह्या दोनच आहेत. अखिल सृष्टिव्यापारास घेऊन तों बंधमोक्षापर्यंत सर्व इमारत या दोन विभूतींनींच रचली आहे व ती मोडणेंही या दोघांकडेसच आहे. सृष्टींतील देव, मनुष्य, पशु पक्षी, यावत् जीवमात्र, त्यांत बुद्धिमान, शहाणे, चतुर, कोणीही असोत, ते सर्व या दोघांच्या ताब्यांत गुलामाप्रमाणें आहेत. या दोघांवर सत्ता चालवून यांस गुलाम करणार केवळ आत्मज्ञानी मात्र आहेत. त्या व्यतिरिक्त हे दोघे कोणाच्याही स्वाधीन होत नाहींत. कोणी वेदाध्ययन करो, शास्त्राध्ययनानें

विद्वान पंडित होवो, ( अथवा वर्तमानकालच्या नवीन विद्येनें सृष्टितत्त्ववेत्ता किंवा मोठा फिलासफर होवो. ) येणार याच दोघांच्या ताब्यांत. कारण सर्व व्यापार करण्याकरितां हे दोघे कोणत्या स्थलांतून उत्थान घेऊन बाहेर पडतात कसे? व पुन्हां त्या स्थलीं जातांना लीन होतात कसे? ही त्यांचे मूलाधाराच्या ठिकाणची कैची किंवा सांधा कोणीएक सुद्धां धरूं पावत नाहीं. विचारकर्त्यांची सर्व मजल विचारांशापर्यंतच पोंचते व विचारकर्तेही स्वतः विचाररूपच राहतात. विचारांची लीनावस्था आली ह्म० ' विचार आतां कशांत लीन होत आहेत, ' हें स्थल सावधगिरीनें धरितां येत नाहीं. तेव्हां स्वतः व्यामोहित होऊन परततात किंवा तेथें थांबल्यास झोंपीं जातात. एवंच स्वतःवरील ' विचाररूपत्वाचें ' कवच टाकतां येत नाहीं. सदैव त्यांतच गुरफटलेले राहतात. तें कवच कसें टाकावें व मन बुद्धीच्या उत्थानलयांची कैची कशी धरावी, हें केवळ विद्वत्तेच्या बळावर त्रिकालांत कधीं कोणास कळलें नाहीं व कळणारही नाहीं. तें सद्गुरूस शरण गेल्यानें व त्यांनीं कृपा करून तें मार्मिकस्थान दाखवून तेथें खबरदार केल्यानेंच कळणार आहे. तें **ठिकाण** हातीं आल्यावर आपण स्वतःच **ठिकाणरूप** होऊन बसतों. मग तेथून मन बुद्धीच्या उत्थानलयांची बहार दिसत असते, व त्यांचे उत्थानलय आपल्या आधीन होतात. ते स्वाधीन झाले कीं ते दोघेही गुलाम बनले. हें होत नाहीं तोंवर आह्मी त्यांचे गुलाम बनलोंच आहोंत व ते जसें नाचवितात तसें नाचतच आहोंत. त्या त्यांच्या नाचविण्याच्या ऊर्मी कोणकोणत्या त्यांचाही आतां थोडा विचार करूं.

---

## अंतःकरणाचे धर्म.

---

**काम, क्रोध, लोभ, मोह, मद** आणि **मत्सर ह्या षडूर्मी** अगदीं नैसर्गिक आणि मुख्य आहेत. यांचेच आणखी पुष्कळ बारीक पोटभेद झाले आहेत. व त्या स्वतंत्र ऊर्मी वगळ्या जरी ह्मणवूं लागल्या तरी त्या ह्या मुख्य ऊर्मींच्या अंतर्गतच होत. जसें:—

**काम** = इच्छा, मनोरथ, संकल्प इत्यादिक.

**क्रोध**= निष्ठुरता, क्रूरता, उग्रता, पारुष्य, आंध्य, इत्यादिक.

**लोभ** = कार्पण्य, दैन्य, तृष्णा, आशा, इत्यादिक.

**मोह** = ममता, माया, प्रीति, इत्यादिक.

**मद** = दंभ, गर्व उच्छृंखलता, इत्यादिक.

**मत्सर** = हिंसा, कपट, द्वेष, छल, इत्यादिक.

ह्या षडूर्मी जात्वकाल मनाचे ताब्यांत असतात तावत्काल त्यांचे परिणाम त्यांच्या समोर दाखविलेल्या इच्छा, निष्ठुरतादि ऊर्मींत होऊन जीवाचे नाशास हेतु होतात. कारण मनाचे स्वरूपांत निश्चितार्थ व विचार कमी असल्यानें जी ऊर्मी एकदम उत्थान पावते ती तशीच पुढें प्रवृत्त होते. तिच्यांत परिणामाचा विचार कमी असल्यानें दैववशात् जसें कांहीं बरें वाईट फल व्हावयाचें असतें तसें होतें. तें फल मिळून स्वस्थता झाली ह्मणजे मागून विचार सुचावयाचे कीं, ‘ अहो आपण याचा विचार आधीं न केल्यानें ही गोष्ट विघडली. ’ बरें कदाचित् लाभ झाला तरी, ‘ अहो ही गोष्ट साधली ह्मणून साधली, पण आपण याचा आधीं नीट विचार केला नव्हता ” अशा प्रकारें वाटल्यावांचून राहत नाहीं. हा असा उतावळेपणाचा मनाचा नैसर्गिक स्वभाव आहे. आणि केवळ जे मनाच्या आधीन रहातात ते वारंवार असेच फसतात. मनाच्या ताब्यांत षडूर्मी राहिल्यास त्यांचे समोर दाखविल्याप्रमाणें परिणाम घडतात. आणि त्या षडूर्मी जर बुद्धीच्या ताब्यांत राहिल्या तर बुद्धि आपल्या विचारी, निश्चयी आणि गंभीर स्वभावानें त्याच षडूर्मींचीं अगदीं रूपांतरें करून टाकते. आणि व्यवहारवशात् जर मूळ ऊर्मींचीच जरूर लागली तर त्या ऊर्मींचे स्वरूपांत रूपांतर केलेल्या ऊर्मींची मिसळ करून सोडते. त्यामुळें ऊर्मींचें बाह्य स्वरूप तर उग्र दिसतें पण आंतर स्वरूप कोमल रहातें. त्याचा परिणाम दैववशात् जरी बरावाईट झाला तरी मागून विचार करितांना खेदास कारण न होतां बऱ्यानें तर संतोष होतोच, पण नाहीं !! वाईट परिणामानेंही संतोषच रहतो. कारण केलेली गोष्ट विचारानें केली असल्यास आपल्याकडे चूक नसते. असो. अशा प्रकारांनीं बुद्धीच्या ताब्यांत व दाबांत रा-

हिलेल्या त्याच षड्डूर्मींचीं अगदीं उलट कशीं रूपांतरें होतात तीं पहा.

**काम**=विचार, अनिच्छा, इत्यादिक
**क्रोध**=शांति, क्षमा, सौम्यता, इत्यादिक
**लोभ**=अनुराग, कृपालुता, औदार्य, इत्यादिक
**मोह**=विराग, निस्पृहता, इत्यादिक
**मद**=लीनता, निर्दंभता, मर्यादा, लज्जा, इत्यादिक
**मत्सर**=समता, अहिंसा, सरलता, इत्यादिक

व्यवहारार्थ 'काम' ह्म० वासना आली तर त्यांत विचार व अनिच्छामिश्र राहील. क्रोधाचें काम आलें तर अंतरीं क्षमा राहील. क्रोधांत पुत्रास ताडन करतांना मनांत दया व हितेच्छा असते असेंच सर्वत्र समजावें.

असा जो हा षड्डूर्मींचा मनाच्या व बुद्धीच्या ताब्यांत राहण्यापासून होणारा परिणाम सूक्ष्मरीतीनें दाखविला आहे, तो ज्या विचारशीलांस मनाचें व बुद्धीचें खरें स्वरूप व खरी योग्यता कळेल त्यासच या ऊर्मी कोणाचे ताब्यांत कोणत्या वेळेस राहून कशा काम देतात हें नीट समजणार आहे. आणि ज्यांस हें समजेल तेच खरे विचारशील समजावे.

वर सांगितलेल्या षड्डूर्मी जीवांच्या निसर्गतःच बरोबर आलेल्या असतात. व प्रथमतः त्या मनाच्याच स्वाधीन असतात. पुढें कालेंकरून व क्रमेंकरून बुद्धि परिपक्व दशेंत येऊन प्रथमतः मातापितर, नंतर शिक्षक आणि पोषक यांच्या अनुकरणानें व शिक्षणानें त्या बुद्धींत जशी प्रौढी व जसें चातुर्य येतें तशी ती मनाच्या ताब्यांत असलेल्या षड्डूर्मींस हळू हळू व प्रसंगोपात आपल्या ताब्यांत घेऊन सरतेशेवटीं मनास देखील आपलें आज्ञांकित करून सोडते. येथवर कीं, मनाचा चंचल व अविचारीपणाचा स्वभाव सुद्धां जिरवून टाकते, आणि आपल्यांत मिळवून घेते. मनाचें मनपण नाहींसें कसें होतें ही मार्मिक खूण ज्यांस कळेल त्यांसच कळेल. पण व्यवहारांतही जे सुजन पुरुष धीर व गंभीर मनाचे असतात त्यांजवर कांहीं मोठ्या अडचणीचे प्रसंग एकदम आले असतां त्यांचें मन कधीं चलायमान न होतां शांत व गंभीर असेंच राहतें आणि त्या प्रसंगांचा योग्य प्रतिकार करितें. अशा बिकट प्रसंगींच शहाणे ह्मणविणारांच्या अंतः-

करणाची कसोटी लागत असते. आपल्या चंचल स्वभावानें प्रसंगावर अविचारानें पुढें पडणें, हें मनाचें सहज स्वरूप होय. पण त्याच मनाला बुद्धीचें स्वरूप प्राप्त होऊन विचार करण्याची संवय एकवार दृढ झाली ह्म० त्या मनुष्याचें विचार केल्यावांचून कधीं पाऊल पुढें पडावयाचेंच नाहीं. मग त्यास विचारवान् असें कोण ह्मणणार नाहीं? ह्मटलेंच पाहिजे. पण तारतम्य सर्वत्र आवश्यक आहे. काम काडीएवढें आणि विचार पर्वताएवढा ! ! असा अतिरिक्त विचार वाढला तर तोही कामाचा नाहीं. असें झालें तर ते गृहस्थ वेहेमी अथवा महासंशयी ह्मटले जातात. अर्थात् एकप्रकारच्या मूर्खांच्या कोटींत जातात. याकरितां शहाण्या माणसानें या गोष्टीची विशेष खबरदारी ठेवावी. हे **राजन्** ह्या सर्व गोष्टी नीट लक्ष्यांत असूंदे. व आपल्या संततीस व प्रजेस यांचें शिक्षण दे, ह्मणजे तेही तुजप्रमाणें विचारवान् होतील.

ह्या षड्र्मी जीवाच्या जन्माबरोबर स्वाभाविकपणें येत असतात, हें वर सांगितलेंच आहे. जन्मतः जीवाचीं शरीरें, इंद्रियें अवयव इत्यादिक जशीं कोमल असतात त्याचप्रमाणें त्यांचे मनोधर्मही कोमल ह्मणजे मंदप्रकाशरूप असतात. शरीरेंद्रियें जसजशीं पुष्ट व वृद्धिंगत होत जातात व त्यांत जशी विषयज्ञानसंस्काराची भरती होत जाते तसतसे ते मनोविकारही प्रबल होत जातात. मूल आईच्या उदरांतून बाहेर पडतांच रडावयास आरंभ करितें. नंतर आधीं एरंडीच्या तेलाचा लहान बोळा त्या बालकाच्या मुखांत घालतात व मागून मधाचें बोट चाटवितात. एरंडीच्या बोळ्यास तें मूल तोंडांत न धरतां तोंड वांकडें करून रडतें, व मधाचें बोट लागतांच त्याचें रडणें बंद होऊन तें तें बोट चोखूं लागतें. येथें सूक्ष्म विचार केला पाहिजे कीं, जन्मतः अनुकूल व प्रतिकूल ह्म० प्रियाप्रिय व स्वाद्वस्वादूचें ज्ञान त्या मुलास असतें. तसेंच मुखांत घातलेली वस्तू गिळावी व चोखावी हेंही स्वतःच्या निर्वाहाचें ज्ञान त्यास असतें. पहा परमेश्वराची काय अचिंत्य योजना आहे ! जन्माचे उत्तरक्षणांत लागलीच क्षुधा तयार आहे. ह्म० कांहीं तरी अनुकूल असें उदरभरणार्थ पाहिजे. हा '**काम**' ह्म० वासना आली. या वासनेबरोबर मुखांत दुग्ध न

मिळालें कीं टाहो फोडण्यास आरंभ, हा '**क्रोध**' आला. पोट भरल्यावांचून स्तनपान सोडवत नाहीं, हा '**लोभ**' आला. जिचे स्तन वारंवार प्राशनार्थ मिळून पोषण होऊं लागलें ह्म० इतर स्त्रियांपेक्षां त्याच स्त्रीच्याजवळ जाण्याची त्या बालकास उत्सुकता असते, हा '**मोह**' आला. आणि तसें इच्छेनुरूप झालें ह्म० बाळकास समाधान वाटतें, हें **मदाचें** सामान्य स्वरूप आहे. आणि पुढें डागिने घातले ह्म० त्याचा डौल वाटणें हें मदाचें विशेष व्यक्त स्वरूप होय. आपल्या आईजवळ दुसऱ्याचें मूल आलें अथवा तिनें घेतलें असतां त्या मुलास झिडकारणें, ओरबडणें व आरडणें हीं सर्व लक्षणें **मत्सराचीं** आहेत. अशा ह्या मानसिक ऊर्मींचे अंकुर जन्मतःच उगवून देहेंद्रियांबरोबर वृद्धिंगत होतात. बाळपणीं बुद्धीचें स्वरूप अज्ञानाच्छादित राहून मनाचेंच प्राधान्य जास्त असल्यानें बालकाचा स्वभाव चंचल व अविचारी असतो. सुस्वभावाचीं मातापितरें पोषक व शिक्षक असल्यास ते बालपणापासूनच मुलाची खबरदारी ठेवीत राहून त्याच्या मनोविकारांचीं स्वरूपें बदलण्याची त्यास संवय लावीत असतात. जसें मुलाच्या मनांत कोणत्याही पदार्थाची इच्छा झाली व ती वस्तू त्यावेळीं त्यास न मिळाली तर त्याबद्दल मूल हट्ट धरितें. अशा वेळीं बाळा! तूं तर अगदीं वेडा होत चाललास! ती वस्तू इश्श!! वाईट आहे, आपण ती घेऊं नये, आपण दुसरी छानछान आणूं. अशी समजूत करणें हें 'काम' ह्म० इच्छा, हिचें 'विचार' व 'अनिच्छेंत' रूपांतर करणें होय. मूल दुसऱ्या मुलाशीं भांडूं लागल्यास बाळ! असें करूं नये! तो आपला गडी आहे. त्याशीं कोणी भांडतो? त्याच्याबरोबर नीट खेळावें. हें सांगणें 'क्रोधाचें'—'क्षमा व शांतींत' रूपांतर करणें होय. मुलाच्या हातीं खाऊची वाटी देतांच तें खावयास प्रवृत्त होतें. तेव्हां बाळ, असें एकट्यानें कोणी खातो? ते तुझे गडी उभे आहेत त्या सर्वांस आधीं द्यावें मग आपण खावें. हें सांगणें, 'लोभाचें' अनुराग व औदार्यांत रूपांतर करणें होय. मुलाचीं खेळवणीं फुटलीं अथवा कपडे इ० हारवले व ते अन्य मुलांनीं घेतले किंवा फाटले तर मूल रडूं लागतें. तेव्हां बाळ,! जाऊंदे ते वाईटच आहेत आपल्या-

स ते काय करावयाचे आपण दुसरे छान आणूं, अशी समजूत घालणें हें ' मोहाचें ' विराग व निस्पृहता यांत रूपांतर करणें होय. सणावारीं आप्त सोयरे मंडळी येतात त्या दिवशीं मुलास न्हाणून वस्त्रभूषणें घातलीं ह्म० तीं फार डौलांत राहून इतर मुलांस ( आह्माला कंठी, कडीं आहेत. तुला नाहींत ! ) असें हिणवितात. तेव्हां हां ! ! बाळ, असें ह्मणूं नये. हे पहा ! आपले काका आहेत, हे शास्त्रीबोवा आहेत, हे गुरुजी आहेत, यांस हात जोडावे, नमस्कार करावा, नीट मर्यादेनें बसावें, खालीं पहावें इ० सांगणें, हें 'मदाचें, ' लीनता व निर्दंभता यांत रूपांतर करणें होय. मुलें खोड्या करूं लागलीं असतां त्यांस सांभाळणारीं मनुष्यें निवारण करूं लागलीं म्हणजे मुलें त्यांजवर रागवून त्यांशीं ईर्षा मानूं लागतात. अज्ञानपणामुळें किडे, मुंग्या, माशा इ० सूक्ष्म जीवांस उगीच मारतात. ह्या गोष्टी करणें हें ' मत्सराचें ' सूक्ष्म लक्षण आहे. या गोष्टींपासून मुलांस निवृत्त करणें आणि योग्य वाक्यानें बोध करणें हें ' मत्सराचें ' समता अहिंसा व सरलता यांत रूपांतर करणें होय.

अशा प्रकारें ह्या षडूर्मी जीवमात्रांस जन्मतःच उत्पन्न होतात, व अंतःकरणांत वास करितात. या षडूर्मींच्या संघातास ( समुदायास ) **स्वभाव** अशी संज्ञा आहे. ' अमुक मनुष्याचा स्वभाव मोठा रागीट आहे, अमुकाचा स्वभाव फार शांत आहे. ' ' अमुक लोभी, गर्विष्ठ, व मत्सरी आहे. अमुक मोठा उदार, लीन, व सरळ आहे. ' अशा तऱ्हेच्या ऊर्मींचीं विशेषणें **स्वभावास** लागतात. व मनुष्य त्या स्वभावानें प्रसिद्ध होतो. ज्या मनुष्याच्या षडूर्मी मनाचे ताब्यांत वागतात, तो मनुष्य दुःस्वभावी, ह्म० वाईट ह्मणवितो. व ज्या मनुष्याच्या षडूर्मी बुद्धीच्या ताब्यांत वागतात, तो मनुष्य सुस्वभावी ह्मणवितो. ज्यांना स्वतः व आपली संतति चांगली ह्मणविण्याची इच्छा असते, ते स्वतः आपल्या ऊर्मी बुद्धीच्या ताब्यांत वागवून संततीसही जन्मतःच शिक्षणाचें वळण लावितात. व बालकाच्या मनास बुद्धीचें स्वरूप देऊन त्यास विचारवान् असें तयार करतात. आणि ज्यांच्या मनांत ह्या सर्व विचारांची शिथिलता व दुर्लक्ष असेल, ते स्वतः व त्यांची संतति विपरीत ह्म० वाईट गुणांची राहिली-

च पाहिजे. मी वाईट असावें व माझी संततीही तशीच ह्मणवावी. अशी इच्छा मात्र जगांत कोणत्याही अगदीं वाईट अशा देखील कुटुंबास नसते, व आह्मी वाईट आहों; असें सुद्धां त्यांस वाटण्याचा संभव नाहीं. पण कृति मात्र चांगली होत नाहीं. चोरास सावकार ह्मणवून घेण्याची इच्छा मात्र असते, पण कृति चौर्याची होते. जारकर्म्यास पवित्र व प्रतिष्ठित ह्मणविण्याची इच्छा; पण कृति दुष्ट. चहाडास व दुर्जनास लोकमान्यतेची उत्कट इच्छा पण कृति नीच. असो. पण चमत्कार हा कीं, या सर्वांस आपले दुर्गुण न दिसतां, त्यांस त्यांचे दुर्गुण कोणी दाखवूं लागल्यास तो दाखविणारा दुर्गुणी, आणि हे आपलेठिकाणीं शाहाणे आहेतच. ( निदान माझी समजूत स्वानुभवावरून अशी आहे कीं, ) ईश्वर आपल्याकडे कोणतीच जबाबदारी राहूं देत नाहीं. कुमार्गी, दुराचरण करण्यास प्रवृत्त होऊं लागले असतां त्या कामीं पुढें पाय पडतांच प्रथम ही ऊर्मी येतेच कीं, अरे आपण निंद्यकर्म करीत आहों ? पण लागलींच पुढें उंः कांहीं पर्वा नाहीं. असें त्या प्रथम झालेल्या ईश्वरी प्रेरणेस झुगारून प्रवृत्ति होते. तथापि परिणामीं चित्त विरघळल्यावांचून कदापि राहत नाहीं. पण स्वकृतीचा पुढें अभिमान वाढतो. त्यामुळें निवृत्ति मात्र होत नाहीं. सारांश ज्यास स्वतःचे दुर्गुण दिसून तो त्या दुर्गुणांचा परित्याग करीत चालला कीं सद्गुण वाढत जातात. अशा रीतीनें सद्गुणांचा संग्रह होत चालला कीं तो समाजांत अप्रयत्नांनीं शहाणा व चतुर असा नांवाजला जातो.

बालकांस जन्मतःच षड्डूर्मींचे अंकुर येतात व त्यांची सुधारणाही मातापितरादि पालकांकडून स्वाभाविकच होत असते. हें खरें, पण जन्मतः त्या ऊर्मी अमुक असतात व त्यांचीं रूपांतरें आह्मी अमुक ऊर्मींत करतों, असा ऊर्मींचा यथार्थ बोध क्वचितच मातापितरादि पालकांस असतो. हा बोध त्यांस नसल्यानें पुष्कळ मातापितरें मुलांचे फाजिल प्रेमपाशांत बद्ध होऊन स्वकर्तव्यास विसरून त्यांच्या स्वाभाविक ऊर्मींचें कौतुक मानूं लागतात. त्यामुळें मुलांची तीच संवय दृढ होत जाते. बाळपणांत मनोविकार अति मृदु असल्यानें त्यांस अनुकूल वळण सहज व सुखानें लागतें, तें पुढें प्रयत्नानेंही लाग-

णें जड जातें. कारण बालकांचीं अंतःकरणें स्वाभाविक निर्मल दर्पणाप्रमाणें प्रतिबिंबग्राही असतात. जसा दर्पण आपल्या सभोंवतीं असलेल्या पदार्थांचें प्रतिबिंब आधीं ग्रहण करून नंतर पुढें जिकडे नेला जाईल तिकडील पदार्थ आपल्यांत प्रदर्शित करितो, तशींच मुलांचीं अंतःकरणें प्रथमतः मातापितरांचीं भाषणें, आचरणें व कृति यांचीं अति शीघ्र अनुकरणें करूं लागतात. व पुढें जशा परिस्थितींत व शिक्षणांत तीं राहतात तशींच निपजतात. याकरितां मातापितरांनीं, पालकांनीं व शिक्षकांनीं आपलीं आचरणें शुद्ध व चांगलीं ठेवून संततीच्या सुधारणेची अति काळजी घेतली पाहिजे. मनुष्यांचा स्वभाव ह्मणून जो ह्मणवितो, तो स्वभाव कांहीं वेगळा पदार्थ अथवा तत्त्व नसून मनप्रधान षड्डूर्मिव्यापार '**दुःस्वभाव**' आणि बुद्धिप्रधान षडूर्मिव्यापार '**सुस्वभाव**' असा ह्मणविला जातो.

ज्या मनुष्याचा जसा स्वभाव असेल त्या मनुष्याच्या हातून स्वभावानुरूपच क्रिया घडेल. सुस्वभावाचे मनुष्याकडून सत्क्रिया घडावयाची व दुःस्वभावाचे मनुष्याकडून असत्क्रिया घडावयाची. सत्क्रियेचा दुसऱ्यावर अनुकूल परिणाम घडला ह्म० दुसऱ्याकडून आपल्यावर घडणारी जी प्रतिक्रिया तिचा परिणाम आपल्यास अनुकूल व्हावयाचा. अनुकूलक्रिया प्रतिक्रियेच्या परिणामाचें जें फल त्यासच 'सुख' अशी संज्ञा आहे. आणि दुःस्वभावाचे मनुष्याकडून घडलेली जी असत्क्रिया त्या क्रियाप्रतिक्रियेचा परिणाम दोघांस प्रतिकूल असावयाचा. त्या प्रतिकूल परिणामाचें जें अनिष्ट फल त्यासच 'दुःख' अशी संज्ञा आहे. या सुखदुःखांचा अनुभव देहेंद्रियद्वारा बुद्धीस होतो व देहेंद्रियसाधनरहित जें मानसिक सुखदुःख होतें तेंही बुद्धीस स्वसंवेद्यशक्तीनें कळतें. देह, प्राण, इंद्रियें इत्यादिकांचा, विषयांत प्रवृत्त होऊन विषयग्रहण करणें व क्रिया करणें हा स्वाभाविक धर्म आहे. आणि इंद्रियादिकांस प्रेरणा करणें व त्या प्रेरणेपासून घडणारें क्रियेचें जसें कांहीं अनुकूल व प्रतिकूल ह्म० सुखदुःखात्मक फल होईल त्याचा अनुभव घेणें, हा बुद्धिप्रधानतेनें अंतःकरणाचा धर्म आहे. त्या सुखदुःखादिक अनुभवाच्या अंतर्गत ज्या, जशा व जितक्या ऊर्मी येतील त्या अंतःकरणवेद्य असल्यानें त्या

अंतःकरणाचे धर्म होत असें जाणावें. हे राजन्, याप्रमाणें तुला देहेंद्रियादि अंतःकरणाचे नैसर्गिक धर्म सांगितले. हेच जीवाचे स्वाभाविक धर्म ह्मणवितात. कारण देहेंद्रियादि स्थूल सूक्ष्म संघातात्मकच जीवाचें स्वरूप असल्यानें सर्वांचे जे स्वाभाविक धर्म ते जीवाचे धर्म झाले आहेत. व सर्व धर्म जीवानें आपल्या अज्ञानेंकरून बळेंच आपल्या शिरावर वसवून घेतले आहेत. व मी सुखी, मी दुःखी अशा अंतःकरणाच्या धर्मांत तो शिरला आहे. वास्तविक विचार करून पाहतां येथवर जें सर्व विवेचन झालें यांत कोणत्याही विकारांत जीव लिप्त असलेला आढळत नसून सर्व विकाररहित व सर्व व्यापारांचा द्रष्टा केवळ साक्षीरूप असतां, भ्रांतीनें सुखी, दुःखी, कर्ता, भोक्ता, असा बनून जन्ममरणाच्या परंपरेंत सांपडून स्वकर्मानें बद्ध झाला आहे. व कर्माचाच अभिमान जास्त असल्यानें मी 'कर्ता' असें वाटतें. कर्ता झाला कीं मग 'भोक्ता' दुसरा कोण होणार, यालाच झालें पाहिजे. कर्ते भोक्ते बनले कीं, सुखदुःखपरंपरा पुढें तयार आहेच. मीं दुःखी असावें, अशी इच्छा मात्र त्यास नसते, पण दुःख होण्याची क्रिया मात्र त्याची वर्ज होत नाहीं. जी बरी-वाईट क्रिया जीवाच्या हातून घडते तीच क्रिया, प्रतिक्रियारूपानें आपल्यास सुखदुःखात्मक फलभोगरूप होते. अशी जी **क्रिया** ह्म० जीवाचें **कर्म** हें काय आहे याचा विचार सांगतों.

---

## जीवाचें कर्म.

**हे राजन् शीलनिधे**, स्थूल सूक्ष्म संघातरूप जीवाचे निसर्गतः स्वाभाविक **धर्म** कोणते ते तुला सांगितले. ह्म० षड्विकार, षडवस्था, सुरूप कुरूपादि, जातिनामाश्रमादि आणि व्याधिसंग्रह इ० हे स्थूलदेहाचे धर्म आहेत. श्वासोच्छ्वास चलनवलनादिक आणि क्षुधातृषा, हे प्राणांचे धर्म आहेत. गमनादानविसर्गादि हे कर्मेंद्रियांचे धर्म होत. भाषणावलोकन-घ्राण-रसास्वाद-स्पर्शादिक हे पंचज्ञानेंद्रियांचे धर्म होत. आणि कामक्रोधादिक षडूर्मी हे मनाचे स्वाभाविक धर्म होत. ह्याच षडूर्मींचें रूपांतर झालेले विचार, शांति इत्यादिक हे

बुद्धीचे धर्म होत. मन आणि बुद्धि यांचे जितके व्यापार तितके सर्व अंतःकरणाचे धर्म ह्मणवितात. तसेंच सुखदुःखादिक अनुभवांतर्गत यावत् मानसिक ऊर्मी, ह्या सर्वांचाही अंतःकरणाच्याच धर्मांत समावेश होत असल्यानें यावत् जगद्व्यापाराचा **अनुभव** होणें, अथवा अनुभव घेणें हा अंतःकरणाचाच धर्म आहे असें समजावें. याप्रमाणें वर सांगितलेले पृथक् पृथक् धर्म देह आणि इंद्रियें यांचे असून, जीवानें ते आपलेच धर्म आहेत असें मानिलें आहे. क्रियाशक्ति प्राणेंद्रियांत, प्रेरणाशक्ति अंतःकरणांत व इच्छाशक्ति जीवाश्रित आहे, असें मागें सांगून त्यांची आघातपरंपराही दाखविली आहे. ह्या मागील सर्व विवेचनाचें सार एकवार चांगलें विचारपूर्वक मनांत धारण कर ह्म० पुढील विषयांचें नीट आकलन होईल. कारण **कर्माचा** विषय अति गहन असल्यानें फार बारीक रीतीनें बुद्धींत आणला पाहिजे. बुद्धीचा आणि कर्माचा अभिन्न जन्यजनकभाव संबंध आहे. ह्म० कर्माचे अनुसार बुद्धि होते, आणि बुद्धीचे अनुसार कर्म होतें, अशी अभेद्य शृंखळा आहे. या शृंखळेचा विचार करितांना चांगले विचारवान्ही गोंवळतात आणि बुद्धीचा भलताच ग्रह होऊन बसतो. याकरितां हे राजन् सावध ऐस.

सृष्टीच्या उत्पत्तीसमयीं मायेच्या आरंभीं तम, रज व सत्व या गुणत्रयांपासून पंचमहाभूतें निर्माण झालीं, त्या पंचमहाभूतांच्या अपंचीकृत रूपापासून तमोगुणांशानें जडरूप भोग्य विषय, ह्म० शब्दस्पर्शादिक, रजोगुणांशानें प्राणेंद्रियादिक आणि सत्वगुणांशानें अंतःकरणादिक, हें सर्वच सूक्ष्मरूप निर्माण झालें. पुढें त्यांचें पंचीकरण होऊन विषय, इंद्रियें आणि अंतःकरण या सर्वांस स्थूलता आली. सूक्ष्मावस्थेंत सर्वच त्रिपुटीचें कार्य, कार्याक्षम स्वरूप होतें. तें स्थूलावस्थेंत कार्यक्षम असें झालें. मायेचे स्वरूपभूत असे जे तम, रज, सत्व गुण ते सर्वांत अनुस्यूत बरोबर आले. ह्म० अगदीं ओतप्रोतभावानें मिश्रित झाले. त्या योगानें प्रत्येक पदार्थांत* गुणवत्ता आली. यावरून पदार्थमात्रांत जे ‘ गुण ’ आहेत ते मायेच्याच त्रिविधगुणरूपानें दिसत आहेत व त्याच गुणांचा कार्यरूप परिणाम जो

* येथें पदार्थ अथवा ‘ वस्तु ’ शब्दाचा अर्थ यावत् त्रिपुटी असा समजावा.

' शक्ति ' ह्मणवितो, त्या शक्तींत ह्म० कार्यांतही त्रिविध भेद आला आहे, तो असाः—पदार्थांतील तमोगुणाचा परिणाम, **तामसी शक्ति** त्यापासून तामस कार्य होतें. पदार्थांचे रजोगुणाचा परिणाम **राजसी शक्ति** त्यापासून राजस कार्य होतें. आणि पदार्थांचे सत्वगुणाचा परिणाम **सात्विकी शक्ति** त्यापासून सात्विक कार्य होतें. ह्म० ज्या पदार्थांत जसे व जितके गुण असतील त्या गुणांचे तसे व तितके परिणाम शक्तिरूप होऊन त्यापासून तशीं व तितकीं कार्यें होतील. मायेच्या त्रिविध गुणांपासून पांचभौतिक सृष्टीचा पसारा झाला. तो केवळ जडरूप असून त्यांत जो ' चेतनांश ' एकरूपानें ओतप्रोत भरला आहे त्याच्या प्रेरणेचा आघात पंचमहाभूतांच्या मूलाधारावर बसल्यानें हीं पंचमहाभूतें जड असतां चेतनाप्रमाणें कार्यांत प्रवृत्त होऊन चराचरात्मक सूक्ष्म स्थूल सृष्टिरूप कार्य निर्माण झालें. ही गोष्ट विस्तारानें ईश्वरप्रकरणांत सिद्ध झाली आहे, लक्षांत आणावी. जो चेतनांश यावत् सृष्टींत व्यापला आहे, त्याचीच ' एक कला ' हा जीव आहे. आणि त्रिविध गुणरूप जी माया तिचीच 'एक कला' जीवाची बुद्धि आहे. या बुद्धींतही त्रिविधगुण सूक्ष्मरूपानें आले आहेत./ व्यापक चेतनांश, प्रेरणेच्या आघातानें जडांस जसा प्रवृत्त करितो तसाच हा जीव इच्छारूप आघातानें बुद्धीस प्रेरणा करून तिच्याद्वारें प्राणेंद्रियादि स्थूल सूक्ष्म देहरूप जड संघातास कार्यांत प्रवृत्त करितो./ पण अज्ञानानें आपल्या प्रेरक चेतनस्वरूपास विसरून देहेंद्रियादि यावत् पांच भौतिक त्रिपुटीचा आपले ठिकाणीं ह्म० स्वरूपीं तादात्म्यरूपानें अभिमान धरतो. त्यामुळें ' प्रेरक '—**मी**—कीं ' प्रेरिला ' जाणारा—**मी** ? याचें त्यास भान नाहींसें होऊन पदार्थांचे गुणधर्म ते माझेच गुणधर्म होत. त्या गुणधर्मांची जी परिणामरूप 'शक्ति' ती माझीच शक्ति होय. आणि त्या शक्तीचें जें कार्य तें माझेंच कार्य होय. अशा रीतीनें आपल्याहून अगदीं पार्थक्यानें राहणाऱ्या विषयाशीं त्यानें आपलें तादात्म्य करून घेतलें आहे. ह्मणूनच मागें दाखविलेले देहेंद्रियादिकांचे जे स्वाभाविक धर्म ते जीवाचे स्वाभाविक धर्म* ह्मणवूं लागले.

* धर्म आणि गुण या शब्दांत कांहीं अर्थभेद नसून गुणांचा परिणाम जो ' श-

पदार्थांच्या स्वाभाविक ' धर्माचा ' अभिमान जीवांनीं धरल्यावरून पदार्थांच्या स्वाभाविक धर्मांची चालू असलेली जी स्वाभाविक ' क्रिया ' तीहि जीवाचीच स्वाभाविक क्रिया होय असें ओघानेंच सिद्ध होतें. कर्तृत्वाभिमानावांचून क्रिया घडत नसते आणि क्रियेच्या केल्यानें कर्तृत्वाभिमान येतो. पदार्थांच्या स्वाभाविक घडणाऱ्या क्रियेचा अभिमान जीवांनीं धरणें यांतच जीवाकडे स्वाभाविक क्रिया कर्तृत्वाभिमान सहजच येतो. वेगळा अभिमान धरण्याचें कांहीं कारणच नाहीं. याप्रमाणें पदार्थांचे स्वाभाविक गुणधर्म व स्वाभाविक क्रिया ह्या जीवाचे स्वाभाविक गुणधर्म व स्वाभाविक क्रिया झाल्या आणि जीव त्या क्रियेचा कर्तृत्वाभिमानी झाला. ' क्रिया ' ह्मणजेच ' कर्म '. कर्म हा क्रियेचाच पर्यायवाची शब्द आहे. क्रियेंत व कर्मांत कांहीं अर्थभेद नाहीं. कर्माचा जो घडणारा परिणाम त्या परिणामास फल अशी संज्ञा आहे. त्याच फलाचा ' प्रतिक्रिया ' रूपानें जीवास भोग घ्यावा लागतो. जसा चेंडू भिंतीवर जितक्या जोरानें मारावा तितक्याच जोरानें तो पुन्हां परत आपल्यांसच येऊन लागतो. त्याचप्रमाणें जीवानें केलेल्या कर्माचा परिणामरूप जो ' आघात ' तो ज्या पदार्थावर अथवा जीवावर घडतो त्या जीवाकडून चेंडूप्रमाणें परतविलेली जी ' प्रतिक्रिया ' ती प्रतिक्रियाच ' कर्मफल ' रूप होऊन जीवास तें फल भोगावेंच लागतें, तें कदापि चुकावयाचें नाहीं.

जीवाकडून जे व्यापार होत असतात ते दोन प्रकारांनीं होतात असें व्यवहारावरून दिसतें. कांहीं स्वाभाविक ह्मणजे उद्देशावांचून

---

क्तिरूप ' त्यांत कांहीं सूक्ष्म विचार आहे. तो असा कीं, अग्नींत दाहक गुण व शक्ति असे दोन्हीं आहेत. प्रज्वलित अग्नीवर कांहीं पदार्थ शिजविण्यास ठेविला, तो शिजण्यास जो वेळ लागला, त्या वेळांत अग्नीच्या दाहक गुणाचा परिणाम ह्मणजे क्रिया चालू होती. त्या क्रियेनें पदार्थास परिपक्व केलें. त्या परिपक्वपणावरून अग्नीची दाहक शक्ति व्यक्त झाली. यांत परिपक्वपणा हा शक्ति नसून ज्या क्रियेनें पदार्थ पक्व झाला ती ' क्रिया ' शक्तिरूप आहे. ह्मणजे शक्तीशीं व क्रियेशीं एकरूपता झाली. आणि स्तिमित व चालू इतक्याच सूक्ष्म भेदानें क्रियेशीं व गुणाशीं अथवा धर्माशीं एकरूपता झाली.

होतात व कांहीं पूर्वीं मनांत उद्देश धरून होतात. उद्देशपूर्वक होणाऱ्या व्यापारांत कर्त्याचा स्वाभिमान जागृत असतो. ह्म० कर्मावर कर्तृत्वरूपानें जीव आरूढ असतो. आणि अहेतुक घडणारी जी क्रिया तिजवर कर्त्याचा अभिमान आरूढ नसतो. ह्मणून पहिल्या प्रकारच्या व्यापारास क्रिया असें ह्मणावें व दुसऱ्या प्रकारच्या व्यापारास कर्म असें ह्मणावें. दुसऱ्या प्रकारचीं कर्में हींच जीवाच्या बद्धतेस कारण होतात. जसें आपण घराच्या दारांत वाटेकडे तोंड करून बसलों असतां वाटेनें जाणारीं अनेक माणसें सहज दृष्टीस पडतात. इतक्यांत एकानें प्रश्न केला कीं, अमुक गृहस्थ या वाटेनें गेलेले आपण पाहिले काय ! गेले खरे पण कोण कसे होते हें कांहीं मीं नीट पाहिलें नाहीं ’ असें उत्तर आपण त्यास देतों. येथें विचार करा कीं, नेत्रांचा स्वाभाविक धर्म, अथवा क्रिया ‘ रूप विषय ’ ग्रहण करण्याची ह्म० पाहण्याची आहे. त्या नेत्रेंद्रियाचा अभिमान जीवांनीं धरल्यानें वाटेनें गेलेला गृहस्थ ‘ डोळ्यांनीं ’ पाहिला असतां मीं पाहिला असें तो ह्मणतो. यांत इंद्रियाच्या स्वाभाविक ‘धर्माचा’ मात्र अभिमान जीवाकडे येऊन जी पाहण्याची ‘क्रिया’ घडली ती अगदीं स्वाभाविक घडली. त्या क्रियेंत जीवाचा स्वतःचा कर्तृत्वाभिमान आरूढ नव्हता, ह्मणून वाटेनें जाणारा गृहस्थ दृष्टीस पडला असतांही पहाणारा ‘ मीं नीट पाहिलें नाहीं ’ असें ह्मणतो. अर्थांत स्वाभाविक घडणाऱ्या क्रियेंत जीवास कर्तृत्वाभिमानाची बद्धता आली नाहीं. आतां याच्या उलट पहा कीं, त्याच मार्गानें कोणी सुंदर स्त्री निघाली; तिजकडे यांनीं लक्षपूर्वक दृष्टि जमवून पाहिलें असल्यास, ती स्त्री पहाणाराचे मनांत अगदीं बिंबली. या स्थलीं नेत्रेंद्रियाकडून स्वाभाविक पहाण्याची जी क्रिया घडणार होती त्या क्रियेवर जीवाचा अभिमान आरूढ झाल्यानें, ‘ मीं ती स्त्री नीट पाहिली ’ असें यास वाटलें. यांत सहेतुक कर्तृत्वाभिमानानें ती क्रिया कर्मरूप झाली. यापासून आणखी एक गोष्ट विशेष झाली ती पहा, पहाणाऱ्याची नीट लक्षपूर्वक दृष्टि त्या स्त्रीकडे वेधल्यानें कदाचित् त्या स्त्रीची स्वाभाविक दृष्टि या पहाणाऱ्याकडे सहजगत्या आली तर, ‘ हा पुरुष मजकडे नेटून पहात आहे ’ असें तिच्या मनांत ब-

हुधा आल्यावांचून रहाणार नाहीं. हें तिच्या मनांत येणें ह्म० तिच्या स्वाभाविक अवलोकनरूप 'क्रियेच्या' ठिकाणीं कर्तृत्वाभिमान येणें आहे. स्त्रीच्या स्वाभाविक अवलोकनक्रियेवर तिचा अभिमान आरूढ होण्यास पुरुषाचा अवलोकनाभिमान मूलकारण झाला. कारण पुरुषानें नेटून पाहिलें नसतें तर तिच्या मनांतही हा मजकडे पहातो असें आलें नसतें. अर्थात् एका ठिकाणीं स्वाभाविक घडणाऱ्या 'क्रियेवर' कर्तृत्वाभिमान आरूढ होतांच त्या क्रियेस 'कर्मरूपता' आली. आणि साभिमानक्रियेचा परिणाम दुसऱ्या ठिकाणीं घडतांच दुसऱ्या ठिकाणींही अभिमान जागृत होऊन तो क्रियारूढ झाला. आणि 'मी इजकडे पहात होतों तशी तीही मजकडे पाहूं लागली' असें यास वाटण्याच्या 'प्रतिक्रिया' रूपानें (फलरूपानें) पहाणाराची क्रिया पहाणाराकडे पुन्हां परत आली. त्या फलाचें विशेष रूप, परस्पर पहाणारांचे दृष्टींत जशी कांहीं पवित्र किंवा अपवित्र मनोभावना असेल, तदनुकूल इष्टानिष्ट परिणाम घडेल. यावरून आणखीही उदाहरणें जुळवून घ्यावींत. सारांश स्वाभाविक घडणारी क्रिया 'अहेतुक' असते. त्याच अहेतुक क्रियेवर अभिमान आरूढ होतांच ती क्रिया 'कर्मरूप' होते. आणि कर्मकर्त्यास कर्तृत्वाभिमान येतो. कर्तृत्वाभिमान धरून केलेली क्रियाच प्रतिक्रियारूप **फल** होऊन कर्त्याकडे परत येते. तिच्या भोगार्थ पुढें भोक्तृत्वाभिमान येऊन कृतकर्मफलाचा उपभोग होतो. असा हा जीव इतर पदार्थांचे स्वाभाविक 'धर्म व क्रिया' इत्यादिकांचा अभिमान तादात्म्यरूपानें आपल्या ठिकाणीं धरून 'मी कर्मकर्ता' आणि 'फलभोक्ता' अशा कर्तृत्वभोक्तृत्वाभिमानानें बद्ध होतो. आणि कर्मेंकरून त्यांचीं फलें भोगतो. त्या कर्माचा व फलाचा आतां विचार सांगतों.

वरील विवेचनावरून **कर्माचें** द्विविध स्वरूप झालें. एक **अहेतुक** व दुसरें **सहेतुक**. अहेतुक कर्म स्वाभाविक रीतीनें सहज घडतें. आणि सहेतुक कर्म बुद्धिपूर्वक मुद्दाम केलेलें असतें. अहेतुक कर्मांत कर्तृत्वाभिमान नसतो. तो सहेतुक कर्मांत धरला जातो. जसें घोड्यावर स्वार होऊन चाललें असतां मार्गानें घोडा चालला असतो, त्या घो-

ड्यास सरळ वाटेनें चालावें इतकेंच ठाऊक आहे. वर बसलेल्या स्वारास कोठें जावयाचें आहे हें त्यास ठाऊक नाहीं. हें वरील स्वारास ठाऊक असल्यानें त्याचा ज्या वाटेनें जिकडे जाण्याचा हेतु असेल त्या वाटेनें तो घोड्यास लगाम वळवीत तिकडे नेतो; व आपलें उद्दिष्ट कार्य करितो. पण ठराविक मार्गानें ठराविक ठिकाणीं तो नेहमीं जाऊं लागल्यास, स्वाराच्या हेतूचें घोड्यास परिज्ञान होऊन, घोड्यावर स्वार होतांच घोडा नेमक्या ठिकाणीं लगाम न वळवितां नेऊन पोंचवितो. याचा अनुभव घोडेस्वारास आहेच. किंबहुना, स्वाराचें व घोड्याचें असें हेत्वैक्य होतें कीं, स्वाराच्या इच्छेनुरूप हवें तसें घोडा काम करितो; पण लागतो लगामाचा इषारा. आणि ठराविक पाठ झालेलें काम ह्म० ऑफिस, देवदर्शन इ० ठिकाणीं नेमकें जाणें इषाऱ्यावांचूनसुद्धां होतें. तसें देह, इंद्रियें इ० हे घोडे आहेत, बुद्धि ही लगाम आहे, इच्छा ही वळविण्याचा इषारा आहे, आणि जीव हा घोडेस्वार आहे. जीव हा आपल्या इच्छेनुरूप बुद्धीच्या प्रेरणेनें देहेंद्रियांस जिकडे वळवून ज्या कामीं लावतो तिकडे तीं वळून तें काम करूं लागतात. आठ प्रहरांच्या दिनचर्येचा देहेंद्रियादिकांस जन्मापासून पुन्हां जसा अभ्यास लागतो तशीं तीं इंद्रियें देहासहवर्तमान पुन: सूर्योदयापर्यंत नियमित देहपरिचर्येंत स्वत:च स्वाभाविक प्रवृत्त होऊं लागतात. त्यांजकडे प्रेरणेचें विशेष अवधान ठेवावें लागत नाहीं. निद्रा लागणें, जाग येणें, क्षुधा, तृषा, शौच, लघवी, चालणें, बोलणें, बसणें, इ० स्थूल व्यापार स्नान, संध्या, जप, तर्पण, पूजनादि अंत:करणाचे पूज्य व्यापार याशिवाय नित्य व्यावहारिक व्यापारांची जशी ठराविक संवय दृढ होते तशीं तीं देहेंद्रियें आपल्या आपण तिकडे ओढ घेतात. ज्यांच्या वागणुकीचे नियम फार कडक रीतीनें चालू असतात त्यांच्या नियमांचें व देहेंद्रियांचें तादात्म्य असें होतें कीं, त्यामुळें त्यांचें लक्ष क्वचित् प्रसंगीं कारणवशात् चुकलें तर नियमबद्ध झालेलीं इंद्रियें त्यांस अवधान देऊन चूक दाखवितात. याचा अनुभव नियमानें वागणारांस कळतो. पुस्तक वाचीत असतां लक्ष दुसरीकडे गेल्यास पत्रेचीं पत्रें वाचलीं तरी काय वाचलें हें आठवत नाहीं. येथें नेत्रानें व जिव्हेनें आपली स्वाभाविक क्रिया केली, पण जीवाची इच्छा ह्म०

‘ हेतु ’ त्यावर आरूढ नसल्यानें ती क्रिया सहेतुक ‘ कर्म ’ झालें नाहीं. व वाचनाचा अर्थ समजणें, हें जें त्या वाचन-क्रियेचें ‘ फल ’ तें त्यास मिळालें नाहीं. सोबत्याबरोबर गोष्टी बोलत चाललें असतां उद्दिष्ट घर मागेंच राहतें, व बरेंच लांब गेल्यावर चूक ध्यानांत येते. येथें पायांनीं स्वाभाविक ‘ क्रिया ’ चालण्याची केली. आणि ‘ हेतु ’ बोलण्यांत गुंतल्यानें पुढें ओढला गेला. यावरून दुसरीं हवीं तितकीं उदाहरणें जुळवून घ्यावीं. देहेंद्रियादिकांस जशी दृढ संवय लागते तशीं तीं स्वाभाविक वागूं लागतात. अव्यवस्थित मनुष्यास बाष्कळ शब्द उच्चारण्याची व बीभत्स अंगविक्षेप करण्याची संवय लागते, त्याजला सभ्य मनुष्यांत बसण्याचें काम पडल्यास त्याच्या मनांत सावधगिरी असली तरी त्याचे हातून मूर्खपणा झाल्यावांचून चुकत नाहीं. देहेंद्रियादिकांस संवयीप्रमाणें स्वाभाविक व्यापार मात्र करतां येतो; पण चांगलें वाईट ज्ञान हें जीवास असल्यानें हा जशी त्यांस संवय लावील तसें ते करतील. व त्यांचें ‘ फल ’ बरें वाईट सर्व याजकडे येईल. हे **राजन् शीलनिधे**, ‘ सहेतुक व अहेतुक ’ कर्मांचा भेद व त्याचें हें फल सांगितलें. यावरून तुला असें वाटलें असेल कीं, स्वाभाविक इंद्रियव्यापारानें चांगलें अथवा दूषित कर्म घडल्यास त्याचें फल जीवाकडे येणार नाहीं. कारण जीवानें कर्तृत्वाभिमान धरून तें कर्म केलेलें नाहीं. पण हे राजन्, मीं आरंभीं कर्मांचा विषय अति गहन आहे ह्मणून तुला सूचना दिली आहे, त्याप्रमाणें तुला स्वल्प रीतीनें बोध होण्याकरितां ‘ सहेतुक व अहेतुक ’ असा कर्मांचा भेद करून दाखविला; पण सूक्ष्म विचार करून पाहिल्यास हेतुरहित अशी ‘ क्रिया ’च घडत नाहीं. कारण कर्त्यावांचून ‘कर्म’ घडत नाहीं. व हेतूवांचून ‘ कर्ता ’ होत नाहीं. ही गोष्ट मागें सिद्ध झालीच आहे. आतां कर्मांची ‘सहेतुकता’ सांगतों. नीट लक्ष असूं दे.

---

## सहेतुक कर्म.

**हेतु ह्म० इच्छा** ही जीवाश्रित असून इच्छेची प्रेरणा बुद्धिद्वारा

जशी इंद्रियांस होते तशीं तीं कार्यांत प्रवृत्त होतात असें मागें सांगितलेंच आहे. जीवास जशी इच्छा होते तदनुकूल तो इंद्रियांस वळवून तसें कर्म त्या इंद्रियांकडून करवितो. इंद्रियांस कर्तृत्वभाव नाहीं. तीं केवळ जडरूप आहेत. चेंडूस जिकडे लाथेनें सहज ढकलाल तिकडे तो लुडकत जाईल. कोणीकडे जावें व कोठें थांबावें हें त्याजकडे नाहीं; कारण तो अगदीं जड आहे. इंद्रियें हीं चेंडूसारखीं जड असून काय करावें व काय न करावें हें त्यांजकडे अगदीं नाहीं. जिवाच्या प्रेरणेनुरूप तीं वागत असल्यानें कोणतें कर्म करावें व कोणतें करूं नये, ही सर्व जबाबदारी जीवाकडे आहे. जशीं अंतर्व्यापाराचीं साधनें मनबुद्ध्यादि आहेत तीं अंतःकरणें ह्मणवितात, त्याचप्रमाणें बाह्यव्यापाराचीं देहेंद्रियादि साधनें बहिःकरणें आहेत. ' करणा 'कडे अर्थशः करणें ह्म० काम करणें एवढेंच आहे; करविणें हें मात्र जीवाकडेसच आहे. कारण, हेतु हा जीवाश्रित आहे. ह्म० अगदीं तादात्म्यरूप आहे. तो जसा बुद्धिद्वारा इंद्रियांवर आघात देईल तशी तीं कर्माची गाडी पुढें ओढतील. हेतु हा मूळ वेगरूप आहे. हा आपल्या वेगानें अंतःकरणेंद्रियादिकांत जसा वेग भरेल तसें कर्म चालू होतें. यावरून आतां विचार करून पहा कीं, नेत्राची पापणी हालवणें अथवा श्वासोच्छ्वास करणें हें देखील ' अहेतुक कर्म ' राहिलें नाहीं. आपण डोळे कां उघडतों, तर पहाण्याचा हेतु आहे ह्मणून. श्वासोच्छ्वास कां करितों ? तर जगण्याचा हेतु आहे म्हणून. हे राजन्, फार सूक्ष्म विचाराची जागा आहे कीं, यावत् विचारवान् व विद्वान् असें समजतात कीं, स्वप्नांत व सुषुप्तींत जीव अगदीं बाह्यव्यापारशून्य असतो. त्यास कशाचेंही भान नसतें व त्याचीं सर्व इंद्रियें स्वगोलकांत अगदीं लीन असतात, तथापि श्वासोच्छ्वास अहर्निश चालू असतो. जीवाचा ' हेतु ' सुषुप्तींत लीन असल्यानें हेतूचा व श्वासाचा कांहीं संबंध रहात नाहीं; ह्मणून जीवानें श्वासोच्छ्वास करणें हें सहज व स्वाभाविक अहेतुक आहे. पण नाहीं ! ' श्वासोच्छ्वास करणें ' हें देखील ' सहेतुक ' आहे; अहेतुक नाहीं. कारण, जें कर्म अथवा क्रिया करण्यांत कांहीं यत्किंचित्ही ' हेतु ' नसतो, ती क्रिया झाली अथवा न झाली सारखीच असते; त्यावर

करण्या न करण्याच्या अभिमानाचा लेश नसतो; आणि अशीच जी क्रिया ह्म० कर्तृत्वाभिमानशून्य असेल तरच ती 'अहेतुक' क्रिया ह्मणवेल. श्वासोच्छ्वास करण्यांत जर कांहींच हेतु नाहीं तर कोणीं दुसऱ्यानें आपलें नाक तोंड बंद केल्यास काय हरकत आहे ? करीना बिचारा ! कारण अहेतुकच क्रिया ती ! झाली न झाली सारखीच. मग त्यावर रागवण्याचें कांहीं कारण नाहीं. कदाचित् येथें असें वाटेल कीं, जागेपणीं आमचा अभिमान देहप्राणेंद्रियादिकांवर जागृत आहे; ह्मणून तसें केल्यानें राग येतो. असो, जाऊं द्या ! सुषुप्तींत तर आपला अभिमान कशावर नाहींना ? मग त्यावेळीं कोणीं नाक तोंड दाबल्यास चालेल का ? छेः ! त्यावेळीं असें करणारावर लागलेंच प्राण घेण्याच्या प्रयत्नाचा आरोप तयार ! हीच 'अहेतुक' क्रिया ना ? हिचे निषेधांत जर हा गजब आहे तर 'सहेतुक' क्रियेच्या निषेधांत काय होणार ? खरोखरच जर जीवाचे हातीं सृष्टीची सत्ता असती तर यानें आपल्या सहेतुक क्रियेच्या जराही आड येणाराचें अगदीं डोकें उडविलें असतें ! ह्मणूनच सर्व सत्ता ईश्वरानें आपल्या स्वाधीन ठेविली आहे. आतां स्वप्नसुषुप्तींत बाह्येंद्रियव्यापाराशीं कांहीं संबंध न राहतां, जीवाचा हेतु निरभिमान होऊन अंतर्लीन असतो. त्यामुळें श्वासोच्छ्वासाची अहर्निश गति अहेतुक व स्वाभाविक अशी वाटते, पण असें वाटणें चुकीचें आहे. कारण सर्प आपला बाह्य व्यापार करून वारुळांत प्रवेश करतांना अर्धा आंत जाऊन अर्धा बाहेर असतां, जर त्याच्या शेंपटावर पाय पडला अथवा तें धरून जोरानें मागें ओढिलें, तर तो एकदम चवताळून जसा अंगावर येतो, तसा या जीवाचा हेतु सर्व स्थूल सूक्ष्म व्यापार करून सुषुप्तींत अंतर्लीन जरी झाला तरी तो आपल्या सूक्ष्म 'संस्कार'रूप पुच्छानें श्वासोच्छ्वास करणाऱ्या प्राणवायूस धरून असतो. त्यामुळें अंतःकरणदेहेंद्रियादिकांवरचा जरी अभिमान मावळतो, तरी प्राणावर मंद प्रभेनें शेष रहातो. जीवाशीं व प्राणवायूशीं जितका तादात्म्यसंबंध आहे तितका देहेंद्रियादिकांशीं नाहीं. मनुष्य अत्यंत गाढ निद्रेंत असतां त्यास जागवितांना पुष्कळ हाका मारिल्या व शरीर हालविलें तरी तो एकदम जागा होणार नाहीं, त-

शांतही जे अत्यंत झोंपाळू असतात, ते तर जागविणाऱ्याच्या नाकीं दम आणतात. पण कसाही निद्रिस्त असो, नाक तोंड बंद केल्यास एकदम खडबडून उठेल. किंबहुना तापटस्वभावी असल्यास जागविणाऱ्याचे बोकांडीं बसेल. यावरून जीवाच्या **हेतूशीं** व **प्राणाशीं** जितकें ऐक्य आहे तितकें कोणाशींही नाहीं हें सिद्ध झालें. हें तादात्म्य इतकें वाढलें कीं, '**जीव**' **प्राणरूप** झाला. आणि देहांत जीवाचें असणें व नसणें याची प्रतीति प्राणवायूवरून होऊं लागली. श्वासोच्छ्वास बंद पडला ह्म० जीव गेला असें वाटतें, आणि श्वास असला ह्म० जीव आहे असें वाटतें. शरीराचे अवयव इंद्रियें इ० नष्ट झाल्यानें जीव जात नाहीं. प्राण गेल्यानेंच जीवाचें जसें जाणें सिद्ध होतें तसेंच प्राण आल्यानें जीवाचें येणेंही सिद्ध होतें. कारण जन्मास आलेल्या मुलाचे श्वासोच्छ्वास मुळींच चालत नसल्यास मेलेलें मूल जन्मलें असें ह्मणतात. अर्थात हा जीव प्राणास बरोबर घेऊन येतो व प्राणासच बरोबर घेऊन जातो. **प्राण** हा जीवाचा प्रतिनिधि आहे. प्राणास क्षणभर सुद्धां जीव विसंबत नाहीं. प्राणावरच जीवाचा अत्यंत विश्वास असल्यानें त्याच्याच भरंवशावर हा जीव सुषुप्तींत निर्घोरपणें निजतो. आणि आपल्या हेतुरूपी प्रपंचाच्या मुख्य भांडवलाची किल्ली प्राणाच्या स्वाधीन ठेवितो. तशीच प्राणांसही जीवाची अत्यंत काळजी असल्यानें जीवाचे रक्षणार्थ ते अहर्निश तत्पर असतात. ह्मणून जागविणारानें चांगल्या हेतूंनीं अथवा वाईट हेतूंनीं निद्रिस्ताचे प्राण रोधिल्यास इंद्रियादिक मंडळी सावध होण्यापूर्वींच जागविणाऱ्याच्या बऱ्यावाईट 'हेतूशीं' व निद्रिस्ताच्या 'हेतूशीं' प्राणवायू अतिशीघ्र गांठ घालून देतात. अशा त्या परस्परांच्या हेतुघर्षणाचा आघात प्राणद्वारा जीवास लागतांच जीव ताडकन् जागा होऊन शुद्धीवर येतो, व मागोमाग अंतःकरणेंद्रियादिकही लागलींच सावध होतात. ह्मणूनच एकदम जागविलेला मनुष्य घाबरून उठतो. आणि नित्य क्रमानें जेव्हां हळूहळू जाग येते तेव्हां बुद्धींद्रियादिक प्रथम सावध होऊन मागून जीव जागा होतो. हा अनुभव बहुधा सर्वांस आहे. हेतुद्वारा प्राणांचा जीवाशीं अगदीं तादात्म्यरूप संबंध आहे. ( ही गोष्ट वाचकांनीं विचारपूर्वक पक्की

ध्यानांत ठेवावी. हा मुद्दा फार मार्मिक आहे. हेतुद्वारा जीवाचा प्राणांशीं जो तादात्म्यसंबंध आहे हाच देहांतरांत व लोकांतरांत जाण्याचा मुख्य मार्ग आहे. हें आतां पुढेंच येणार आहे.) एक दुसऱ्यास सोडून रहात नाहीं; ह्मणूनच "जीवराजाची स्वारी सुषुप्तिरूप शयनमंदिरीं जातांना त्याच्या चतुर प्रधान '**मनानें**' जीवराजाचे संरक्षणार्थ प्राणांस जागें रहाण्याची कडक आज्ञा केली होती" ही गोष्ट प्रारंभींच सांगितली आहे.

**हे राजन् शीलनिधे,** जीवाचे हेतूशीं व प्राणाशीं कसा तादात्म्यसंबंध आहे, हें तुझ्या नीट लक्षांत आलेंच असेल. जीवाच्या हेतूची प्रेरणा बुद्धिद्वारा जी देहेंद्रियादिकांस होते व त्याप्रमाणें तीं जीं कार्यें करितात, या सर्वांस मुख्य साहाय्य प्राणाचें आहे. प्राणाच्या साहाय्यावांचून हीं सर्व लंगडीं आहेत. मन-बुद्धि हीं जरी स्थूल-सूक्ष्म संघातांत अगदीं प्रमुख आहेत तरी मनबुद्धींचे व्यापारास देखील प्राणाचें साहाय्य लागतें. प्राणरोधानें मनबुद्धींच्या व्यापाराचाही रोध होतो म्हणूनच '**योगश्चित्तवृत्तिनिरोधः**' असें मुख्य योगसूत्र असून योगी प्राणरोधानें मनोव्यापाराचा रोध करितात. मनबुद्धींचे व्यापारांचा रोध करणें ह्म० यावत् सृष्टिव्यापाराशीं जो आपला संबंध मनबुद्धिद्वारा आहे तो तोडणें हें होय. स्थूल-सूक्ष्म सृष्टिव्यापारास मूलबीज **हेतूच** आहे. कारण 'हेतू' वांचून मनबुद्धींचा व्यापार तरी व्हावा कसा व कोणता? अर्थात मनबुद्धींच्या व्यापाराचा रोध करणें ह्म० 'हेतूचा'च रोध करणें हें होय. येथें बारीक विचार करून पहा कीं, सर्व व्यापाराचें बीज जो 'हेतु' त्या खास हेतूच्या रोधार्थ जी क्रिया (योगादि) केली त्या क्रियेंतूनही हेतूचें पुच्छ बाहेर राहतेंच! तें कोणतें? तर 'हेतु' रोध करण्याच्या क्रियेचा **हेतु** तरी काय? हें पुच्छ शेष राहिलेंच. आतां पहा कीं, हेतूच्याच रोध करण्याची क्रिया जर '**सहेतुक**' होत आहे, तर आतां **अहेतुक** क्रियाच उरली कोणती? याचा तूंच विचार कर. मन, बुद्धि, इंद्रियें, देह इ० सर्वांच्या क्रिया सहेतुक दिसत असून केवल प्राणाची श्वासोच्छ्वासक्रिया एवढीच काय ती सर्वांस अहेतुक दिसत होती, तिलाही हेतूनें आपल्यांत गुंडाळल्यानें आतां 'अहेतुक'

हा शब्द देखील क्रियेच्या मागें विशेषणरूपानें लावण्याची अडचण आली. ' क्रिया ' हा शब्द उच्चारला कीं, त्यावर ' हेतु ' हा शब्द येऊन बसलाच. त्यामुळें अहेतुक क्रियाच अज्जी उडाल्यासारखी होऊन जी ' क्रिया ' ती ' सहेतुकच ' असें ह्मणावें लागेल. आतां सहेतुकक्रिया ह्मणजेच **कर्म**, असें कर्माचें लक्षण आपलें वर सिद्ध झालेंच आहे. ' हेतु, इच्छा, आशा, वासना, संकल्प, कल्पना, इ० हे सर्व शब्द निव्वळ एकच अर्थाचे बोधक एक दुसऱ्याचे असे पर्यायवाचक आहेत हेंही मागें पुष्कळ ठिकाणीं सिद्ध झालेंच आहे. त्याचप्रमाणें ' हेतु, वासना अथवा संकल्प ' यांशीं व ' प्राणाशीं ' तादात्म्यसंबंध आहे, हें नुकतेंच ठरलें आहे. आणि ' हेतु, वासना अवथा संकल्प ' हे अगदीं जीवाशीं संलग्न ह्म० तादात्म्यरूप झाले आहेत. अशा ह्या सर्वांच्या ऐक्यशृंखलेंत एक दुसऱ्याशीं परस्पर बद्ध झाले असल्यानें ' वासने 'च्या उत्थानावांचून जीवाची उत्थानरूप प्रवृत्तीच होऊं शकत नाहीं. ' वासना ' बुद्धिद्वारा इंद्रियांस जी प्रेरणा करणार, तीं प्रेरणा प्राणांच्या साहाय्यावांचून इंद्रियांपर्यंत पोंचूं शकत नाहीं, आणि इंद्रियेंही प्राणांच्या बलावांचून विषयग्रहण करूं शकत नाहींत. असा सर्वांचा सर्व व्यापार प्राणाधीन झाला ह्मणून जीवानें 'प्राणांस' आपल्या ताब्यांत घेऊन सर्व व्यवहार पूर्ण चालावे व मीं सर्वांचा चालक असावें, या ' हेतूच्या ' पुच्छानें तो जीव श्वासोच्छ्वास करीत आहे. अशा ह्या गोंधळांत बिचाऱ्या ' अहेतुकक्रियेचा ' काय पत्ता आहे. जें कर्म घडणार तें सर्व ' सहेतुक 'च घडणार आहे. सहेतुककर्म करतांना क्रियेवर हेतु आरूढ असावयाचा, तो हेतु क्रियेवर आरूढ होऊन जी क्रिया करणार त्या क्रियेचा दुसऱ्या वस्तूवर आघात बसून चेंडूप्रमाणें तोच आघात प्रतिक्रियारूपानें क्रियाकर्त्याकडे परत येणार आहे. क्रियेच्या प्रतिक्रियारूपानें जो परत येणारा आघात तो आघातच कृतकर्माचें **फल** होय. त्या कर्माचे फलाचा उपभोग जीवास अनिवार्य असल्यानें तो भोगल्यावांचून गत्यंतरच नाहीं. ' सत् ' हेतूनें केलेल्या क्रियेचा परिणाम दुसऱ्यावर चांगला घडून त्याच्या उलट प्रतिक्रियारूपानें जें फल आपल्याकडे परत यावयाचें तें चांगलें येईल. आणि ' असत् ' हेतूनें केलेल्या

क्रियेचा परिणाम दुसऱ्यावर वाईट घडून त्याचे उलट प्रतिक्रियारूपाचें फल आपल्याकडे वाईट येईल. दोहींतून जशा हेतूची जी क्रिया कराल तसेंच फल प्रतिक्रियारूपानें परत येणार आहे. चांगल्या क्रियेचें वाईट फल अथवा वाईट क्रियेचें चांगलें फल असा व्यभिचार कधीं व्हावयाचा नाहीं. ज्या क्रियेचें जें फल असेल तेंच बिनचूक मिळेल. आंबा पेरल्यास निंब उगवणार नाहीं, व निंबास कधीं आंबा लागणार नाहीं. एवंच हेतूरहित अशी कोणी क्रियाच घडत नाहीं कीं, जी 'अहेतुकक्रिया' ह्मणवून तिचें कांहीं फल होणार नाहीं. जी क्रिया घडेल ती सहेतुकच घडणार आहे. आणि प्रतिक्रियारूपानें फल परत आणणार आहे. 'सहेतुक क्रिया' ह्म० **कर्म** आणि प्रतिक्रिया ह्म० **फल** असें 'कर्म फलाचें' स्वरूप सिद्ध झालें. '**हेतु**' ह्म० वासना ही जीवाश्रित असल्यानें जीवाकडे स्वकर्मकर्तृत्वभाव आणि कर्मफलभोक्तृत्वभाव अगदीं कायमचा येऊन बसला; असें जें हें उभय भावांचें संपुट, हेंच जीवास बंधरूप आहे. आणि जेव्हां हें संपुट फुटेल तेव्हांच या जीवाचा मोक्ष होणार आहे. तोंपर्यंत जीव स्वकर्मपाशानें बद्ध आहे, कर्में करावीं, फलें भोगावीं आणि कर्मप्रधान सृष्टिरूप प्रवाहांत वहात जावें. जीवपणा जोंवर कायम आहे तोंवर अहेतुक कर्माचें नांव सुद्धां काढावयास नको. **हे राजन् शीलनिधे!** हा तुला सहेतुक व अहेतुक कर्माचा भेद सांगितला. आतां कर्माचे फलाचा विचार करूं.

---

# कर्मफलभोग.

**हे राजन्**, जीवाचे सहेतुक व अहेतुक क्रियेच्या भेदानें कर्माचें स्वरूप कसें आहे अर्थात् **कर्म** ह्म०काय! ही गोष्ट सिद्ध करून दाखविली. आतां स्वकृत कर्माचा **फलभोग** कोणत्या प्रकारें कसा होतो याचा विचार सांगतों, श्रवण कर. देह, प्राण, अंतःकरण व इंद्रियें इ० कांत जे स्वाभाविक गुणधर्म होते व त्यांची जी स्वाभाविक क्रिया होती ते सर्वांचे गुणधर्म व सर्वांच्या स्वाभाविक क्रिया जीवाच्या

हेतूंनीं स्वाधीन करून घेतल्यानें जीवास त्या सर्वांचा अभिमान येऊन **मी कर्ता** असें त्यास वाटतांच यावत् **क्रिया कर्मरूप** झाल्या. आणि कर्माचा अंमल इतका प्रबल व विस्तृत झाला कीं, जीवाचे श्वासोच्छ्वासापासून तों स्वर्गनरकादिकांपर्यंत सर्व सृष्टिव्यापार कर्माधीन झाले; ते येथवर कीं खास जीव कर्माचा **कर्ता** असून त्यालाच खास कर्माधीन अर्थात **पराधीन** व्हावें लागलें. व कर्म नाचवील तसें नाचावें लागत आहे; मनुष्य जोंवर घोड्यावर स्वार असतो, तोंवरच तो स्वतंत्र असतो आणि त्यावर घोडा स्वार झाला, ह्म० त्याच्या लाथाळ्यांतून सुरक्षित पार पडणें दैवाधीनच आहे. जीव कर्मारूढ आहे ह्म० कर्म करूं इच्छित आहे तोंवरच कर्म जीवाच्या स्वाधीन आहे ह्म० कर्म करणें अथवा न करणें हें कांहींसें जीवाधीन असतें. आणि जीव एकवार कर्म समाप्त करून ह्म० हातचें सोडून एकीकडे झाला कीं, तें कर्म जीवाच्या उरावर स्वार झालेंच ! तें भोग दिल्यावांचून कदापि पिच्छा सोडणार नाहीं. चेंडू जोंवर हातांत आहे तोंवर भिंतीवर मारणें न मारणें आपल्या स्वाधीन आहे, पण तो हातचा सुटून भिंतीवर लागला ह्मणजे चेंडूनें परत न येऊन आपल्यास न लागावें हें आपल्या स्वाधीन रहात नाहीं. तो आपल्यास येऊन लागणारच आहे. जीवास केलेल्या कर्माचा फलभोग अनिवार्य आहे.

जीवाची **इच्छा** ही अगदीं जीवाश्रित आहे. जीव आपल्या इच्छेनुरूप कर्म करण्यास प्रवृत्त झाला ह्म० त्या इच्छेचा प्रथम आघात अंतःकरणांत ह्म० मनबुद्धीवर बसतो. मनबुद्धीवर ‘ इच्छेचा ’ आघात प्रेरणारूपानें जो बसतो तो मनाचे व बुद्धीचे ऊर्मीनें उत्थान पावतो. त्या ऊर्मी सविस्तर मागें सांगितल्याच आहेत. कामक्रोधादि मूळ षडूर्मि असून मनाचे स्वाधीन ह्या ऊर्मी वागतात, तेव्हां त्या असदूर्मि होत, व बुद्धीच्या स्वाधीन वागतात तेव्हां त्या सदूर्मि होत. जीवाच्या इच्छेचा आघात मनावर बसून मनाच्या आधीन असणाऱ्या ऊर्मींकडून इंद्रियांस प्रेरणा मिळाली कीं, तीं कार्यांत प्रवृत्त होतात. मनाचें स्वरूप चंचल व अविचारी असल्यानें त्याची प्रेरणा व प्रेरणेनुरूप कार्य, हेंही अविचारीच असावयाचें; अविचारी

कार्याचा ह्म० कर्माचा परिणाम दुसऱ्यावर वाईट घडून त्याचें जें 'फल' तें वाईटच व्हावयाचें. आणि जीवाच्या 'इच्छेचा' आघात बुद्धीवर बसून बुद्धिस्वाधीन ऊर्मीकडून इंद्रियांस प्रेरणा झाली ह्मणजे इंद्रियें कार्यांत प्रवृत्त होतात. बुद्धीचें स्वरूप गंभीर व विचारी असल्यानें तिची प्रेरणा व प्रेरणेनुरूप कार्य हें विचारीच राहणार; विचारी कार्याचा ह्म० कर्माचा परिणाम दुसऱ्यावर चांगला घडून त्याचें जें 'फल' मिळेल तें कधीं वाईट मिळणार नाहीं. मनाच्या अथवा बुद्धीच्या ऊर्मी अनुसार जसा कांहीं बरावाईट परिणाम नेहमीं घडत असलेला लोकांच्या प्रत्ययास येतो, तसा तो जीव दुःस्वभावी अथवा सुस्वभावी ह्मणवूं लागतो. ऊर्मींचा परिणामच **स्वभाव** ह्मणवितो. स्वभाव कांहीं वेगळें तत्त्व नाहीं, असें मागें सांगितलेंच आहे. दुःस्वभावानें केलेलें कर्म **दुष्कर्म** आणि सुस्वभावानें केलेलें कर्म **सत्कर्म** असें ह्मणवितें. दुष्कर्माचा परिणाम दुसऱ्यावर दुःखद घडून त्याचें प्रतिक्रियारूप फल **दुष्फल** अर्थांत दुःखरूपानेंच आपल्याकडे परत येईल. आणि सत्कर्माचा परिणाम दुसऱ्यावर सुखद घडून त्याचें प्रतिक्रियारूप **सत्फल** ह्म० सुखरूपानेंच आपल्याकडे परत येईल. ज्या क्रियाप्रतिक्रियारूपाचा परिणाम दुसऱ्यावर व आपल्यावर दुःखप्रद होऊं लागला तें कर्म—**पापकर्म**—आणि ज्या क्रियाप्रतिक्रियेचा परिणाम आपल्यावर व दुसऱ्यावर सुखप्रद होऊं लागला तें कर्म—**पुण्यकर्म**—असें ह्मणवूं लागलें. याच मूलतत्त्वावर श्रीभगवान् वेदव्यास महर्षींनीं "**अष्टादश पुराणानां, व्यासस्य वचनद्वयं ॥ परोपकारो हि पुण्याय पापाय परपीडनं**" अशी आज्ञा केली आहे. हेंच सर्व ग्रंथांचें व सर्व कर्मांचें सार आहे. व पुण्यपापाच्या व्याख्येचें मूळ स्वरूप हेंच आहे. **हे राजन्**, ही गोष्ट अति महत्त्वाची व सदैव अंतःकरणांत जागृत ठेवून तदनुरूप आचरण करण्याची आहे.

**कर्म**, हें बीजरूप आहे आणि कर्माचा जो परिणाम व त्या परिणामाचा जो **भोग** तें त्या बीजाचें **फल** आहे. जें फल असतें तेंच बीजास कारण असतें. व जें बीज असतें तेंच पुढें फल होतें. असा त्या दोहोंत अन्योन्यसंबंध आहे. कर्मापासून 'फल' व फ-

लापासून ‘ कर्म ’ अशी परस्पर वृद्धि होत जाते. बीजावर एक कवटी ह्म० टरफल असतें, त्या टरफलाचे आंत जी एक मिगी असते ती मिगीच मुख्य बीजरूप आहे; व तिच्यांतूनच वृक्षफलांची उत्पत्ति होते. मिगीवांचून वृक्षोत्पत्ति होत नाहीं. हेतु ह्म० वासना ही कर्मबीजाची ‘ मिगी ’ आहे व कर्म हें ‘ टरफल ’ आहे. टरफलाच्या आच्छादनानें मिगीस बळकटी येते; कर्मानें वासनेस बळकटी येते. बीजापासून पुढें फल येतें व त्या फलाचा उपभोग होतो. तसा कर्मबीजापासून पुढें भोगरूप फल येऊन त्याचा उपभोग होतो. यांत सूक्ष्म विचाराची जागा आहे. जसें आंब्याचें फल आपण भक्षण करून कोईस टाकून देतों आणि आह्मीं आंबा खाल्ला, असें ह्मणतों, पण आंब्याचे फलास जी मूलकारण ‘ मिगी ’ ती तर कोईंतच शेष राहते. तिचा व भूमीचा संयोग झाला कीं, पुन्हां आंबा तयारच आहे. आंब्याची मूळ जी ‘ मिगी ’ ती खाल्ल्यास, एका आंब्यापासून जीं वृक्षफलें इ० होणार होतीं तीं निर्मूल झालीं असें ह्मणतां येईल. पण आपण मिगीस न खातां वरचा माल मात्र खातों. मग त्या आठोळीपासून पुढें आम्रवृद्धि होणारच. आणि पुन्हां आंबे भक्षण्याची आपणास चट लागलीच आहे. त्याप्रमाणें ‘ वासना ’ रूपी मिगी ‘ कर्मरूप ’ टरफलासह पेरली जाऊन त्यापासून जीं ‘ भोग ’ रूप फलें आलीं तीं जीवांनीं भोगलीं. ह्म० आम्ररसाप्रमाणें खाल्लीं, पण आतां भोग पुन्हां नको; अशी अलंबुद्धि मात्र होत नाहीं. अर्थात हीच वासनारूप ‘ मिगी ’ शेप राहिली, अमुक कर्माचें हें फल आहे असें माहित असल्यावर पुन्हां ‘ कर्माची ’ जी तयारी हेंच त्या वासनामिगीवरचें ‘ टरफल ’ आहे. असें मिगीवर टरफल व टरफलांत मिगी संलग्न आहेत तोंवर ‘वासनेनुरूप कर्म, कर्मानुरूप फलभोग ’ आणि भोगानुरूप ‘ पुन्हां वासना ’ असें अखंड चक्र चालू आहे. जीवास त्याच परिभ्रमणाची संवय गोड वाटून तो पायानें ढकलण्याच्या ( बाइसिकल ) गाडीप्रमाणें, गाडीही पळविती व तिच्यावर आरूढ असल्यानें आपणही पळत जातो. गाडींत पूर्ण वेग भरला ह्म० गाडी एकदम थांबवितां येत नाहीं. पुढें थांबवावयाची असल्यास पूर्वीं ब-याच लांबीवरून वेग शांत करावा ला-

गतो. नाहींतर अडखळून पडतो. वेगांत भरलेली गाडी जशी स्वाधीन राहत नाहीं, तशीच जीवाची वासना, कर्मफलरूप गाडी जन्ममरणपरंपरेच्या वेगांत पूर्ण भरली आहे व तिच्यांत आरूढ असलेला जीव, हा सारखा पळवित व पळत चालला आहे. सत्संगतीनें कर्मबंधनांतून सुटावें अशी दैववशात् वासना झाली आणि वासना शांत होण्याचा आजपासून प्रयत्न चालविला तर कांहीं कालानें पुढें थांबेल. नाहींपेक्षां सुरू आहेच. ढकलावी. पळत जावें. पडण्याची क्षितीच नसली, तर हूं, चालूं द्या ! ! असो.

ज्या जीवाच्या हातून सद्वासनेनें सत्कर्म घडलें व त्याचा परिणाम दुसऱ्यावर चांगला घडला तर ज्यावर तो परिणाम घडेल तो जीव ह्या जीवाचा ऋणी झाला. तें ऋण फेडण्याकरितां हा जीव स्वशक्त्यनुरूप प्रत्युपकारार्थ संधि पाहून फेड करितो. जेव्हां कांहीं काबू नसतो तेव्हां कृतज्ञताबुद्धीनें आभारप्रदर्शन करून त्याशीं नम्र राहतो. अशा परोपकारी व परहितासक्त मनुष्यावर जीवमात्राची प्रीति वाढत जाऊन तो सर्वांस पूज्य वाटूं लागतो. या जीवास लोकप्रियतेची, लोकहिताची व सत्कर्माची गोडी लागली ह्म० सत्क्रियाच करण्याकडे त्याची प्रवृत्ति होते. त्यापासून त्याचें सत्कर्म व सत्फलवृद्धि होऊं लागली कीं, पुन्हां सद्वासना वाढत जाते. या चक्रवृद्धीचा शेवट *सद्गति होणें हेंच होय. याच्या उलट जीवाच्या असद्वासनेनें असत्कर्माची वृद्धि झाली असतां यावत्जीवाच्या द्वेषास मनुष्य पात्र होतो. या असद्वासनाकर्मफलाच्या चक्राच्या वृद्धीचा शेवट †दुर्गति हें ठरलेलेंच आहे असें समजावें. एवंच सत्कर्म, सत्फल, सद्वासना, व सद्गति आणि दुष्कर्म, दुष्फल, दुष्ट वासना आणि दुर्गति या दोन्ही चक्रमालिकांत **वासनाबीज** शेष राहतेंच. हें बीज **निर्बीज** ज्या दिवशीं होईल त्या दिवशीं या चक्रमालिकेंतून जीवाची सुटका होणार आहे.

बागेंत सहल करतांना जीं जीं फळें खावींशीं वाटलीं तीं घेऊन खाल्ल्यावर त्यांच्या आंठोळ्या कोणीकडे जरी फेंकल्या तरी त्या पडणार भूमीवरच; आणि बीज व भूमीचा संयोग झाला कीं, पुन्हां वृक्ष व फळें

---

* स्वर्गवासादि. † नरकवास अधःपातादि.

आल्यावांचून जशीं राहत नाहींत; तसा हा जीव भोग्य विषयरूप सृष्टीच्या बागेंत कर्माची सहल करतांना अनंतविध विषयरूप फळें भक्षण करून, पुनः हीं फळें खावयाचीं. ' ह्या वासनारूप आंठोळ्या, कोणीकडे जरी फेंकतो तरी त्या, अधिष्ठानरूप भूमिकेच्या बाहेर पडत नसल्यानें *भूमिबीजसंयोगानें त्यांपासून पुन्हां कर्मफलभोगरूप बागाची वृद्धि होत जाते. व जीव त्यांत अखंड निमग्न राहतो. बीजाचा व भूमीचा वियोग होईल तर वृक्षफळें येणार नाहींत; पण तो वियोग त्रिकालांतही होत नाहीं. कारण, . संसारबीजरूप 'वासना' जीवाश्रित ह्म० जीवभूमिकेशीं अखंड संलग्न आहे, त्याचा वियोग त्रिकालांत कधींच आढळत नाहीं. अखंड संलग्न कसा आहे तो पहा कीं, जसें बीज पेरलें गेलें ह्म० भूमीचा आश्रय, पुढें वृक्षासही भूमीचा आश्रय, फलपुष्पांस वृक्षद्वारा भूमीचा आश्रय, फळ तोडून ज्या कशांत ठेवाल त्या पदार्थद्वारा भूमीचा आश्रय, फल खाणाराच्या पोटांत गेल्यास तद्द्वारा भूमीचा आश्रय आणि खाल्यावर आंठोळी भूमीवर फेंकली कीं पुन्हां प्रथमारंभ. अर्थात् भूमीचा वियोग होऊं पावत नाहीं. तसा जीवाशीं व वासनेशीं संबंध आहे. ह्म० वासनेचें मूल उत्थान जीवाश्रित, तिची प्रेरणा बुद्धिद्वारा इंद्रियादिकांस होणार, त्याचें प्रेरकत्व जीवाश्रित, देहेंद्रियादिद्वारा जें कर्म घडणार त्या कर्माचा कर्तृत्वभाव जीवाश्रित, तसाच कर्मफल भोक्तृत्वभावही जीवाश्रितच. आणि भोग संपल्यावर पुन्हां भोग मलाच पाहिजे ही आंठोळीप्रमाणें शेषवासनाही जीवाश्रितच राहते. याशिवाय प्रकरणप्रारंभीं मीपणाचे शोधार्थ ज्या कक्षा केल्या आहेत त्यांत राजा मी, योद्धा मी, धनिक मी इ० विवेचनांत देहेंद्रियादिकांवर तर मीपणा होताच, पण देहेतर सर्व सृष्ट पदार्थांवरही मीपणा आरूढ झाल्यानें अहंभावनेच्या वासनाद्वारा पदार्थमात्रांचा मूलाधार अधिष्ठानरूप हा

---

* हें वासनाबीज कोणत्या भूमिकेंत पेरलें गेलें आहे ? ही गोष्ट आमच्या वाचकांच्या ध्यानांत आहे काय ? बहुधा विसरली असेल, तिचें स्मरण देतों. अ० बो० प्रकरण पांचवें, कारण विचार या स्थलीं हा सृष्टिरूप अनंतवृक्ष उगवला कोठें? तर जीवरूप भूमिकेंत वासनारूप बीज पेरलें आहे तेथें. त्या ठिकाणीं या गोष्टीचा फार मार्मिक विचार झाला आहे, तो सुज्ञ वाचकांनीं या स्थलीं जुळवून पहावा.

जीव असल्यानें 'वासनाबीजाचा' आणि 'जीवभूमीचा' त्रिकालांत वियोग होत नाहीं; आणि पूर्वोक्त चक्रभ्रमण सुटत नाहीं. सारांश जावत्कालपर्यंत हा जीव वासनाबद्ध आहे तावत्कालपर्यंत वासनाकर्मफलभोगाचें चक्र सुटत नाहीं. सत्कर्मानें सद्गति ह्म० स्वर्गादिसुखप्राप्ति होते. आणि दुष्कर्मानें दुर्गति ह्म० नरकादि दुःखप्राप्ति होते. कोणतें कर्म झालें व त्याचे भोगार्थ कोठें जरी गेला तरी पुनरावृत्ति सुटत नाहीं. कारण 'जाणें' आहे तेथें 'येणें' ही आहे. आणि 'करणें' आहे तोंवर 'भोगणें' ही आहे. जेव्हां करण्याभोगण्याच्या जागीं '**होणें**' व '**पाहणें**' आणि जाण्यायेण्याच्या जागीं '**असणें**' व '**राहणें**' हा भाव सद्गुरुकृपें प्राप्त होईल तेव्हां हा जीव असल्या ठिकाणींच कैवल्यरूप होईल. होईल कसला! आहेच. समजुतींतच कायतो बदल झाला आहे. त्याची मूळ किल्ली सद्गुरूस शरण जाऊन स्वाधीन करून घेतली पाहिजे. हें सज्ञान जीवाचें अवश्य कर्तव्य आहे. **राजन् शीलनिधे** ! जीवाच्या कर्मफलाचा विचार हा तुला सांगितला. याचें नीट चिंतन कर. आतां भोगार्थ केलेल्या कर्माचें फल जीवास कोणत्या अनुक्रमें कसें प्राप्त होतें याचा विचार सांगतों.

---

## जीवाचें प्रारब्ध कर्म.

जीव जन्मास येतांच ह्म० मातेचे उदरांतून बाहेर पडतांच त्यास वासनेची ऊर्मी येते. दुग्धपानाकडे प्रवृत्ति वासनेमुळेंच होते. जन्मतःच ऊर्मीचे अंकुर उत्पन्न होऊन पुढें ते कसे वृद्धि पावतात इ० प्रकार मागें जीवाच्या स्वाभाविक षडूर्मींच्या विवेचनांत आलाच आहे. तो लक्षांत आणावा. वासनेच्या 'ऊर्मीचा' आघात प्रथम अंतःकरणांत बसून अंतःकरणाचा प्रेरणारूप आघात देहेंद्रियांवर बसतो. आणि देहेंद्रियें पुढें कार्यांत प्रवृत्त होतात. असा व्यवहारानुक्रम सिद्ध झालाच आहे. आणि श्वासोच्छ्वासापासून तों यावत् सर्व स्वाभाविक अस्वाभाविक क्रिया 'कर्मरूप' झाल्या आहेत. हेंही नुकतेंच सां-

गून चुकलों. आतां जसें बीज भूमींत पेरलें ह्म० त्याला कोंब येऊन कोंबास प्रथम दोनच पानें फुटतात, नंतर विस्तार अनुक्रमें होतो. दोनच पानें फुटण्याचें कारण असें कीं, पेरलें जाणाऱ्या बीजाच्या मिगींत दोन शकलें असतात. त्याचे मधून कोंब उगवतो ह्मणून प्रारंभीं दोन शकलांचीं दोनच पानें येतात. आणि शेवटीं फलाच्या मिगींतही दोनच शकलें राहतात. ( द्विशकलांनींच सर्व अनर्थ उभा राहिला आहे. ) द्विदलापासून पुढें असंख्य शाखा पत्रें आणि फलें येतात. तसें जीवरूप भूमिकेंत द्वैतरूप द्विशकलांचें वासनाबीज पेरलें आहे. त्यांतून उत्थानरूप आघाताचा कोंब निघून त्या कोंबास कर्मरूप द्विदल येतें. द्विविधकर्म ह्म० एक **मानसिक कर्म** व दुसरें **शारीरिक कर्म** (शारीरिक कर्मांत ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें इ० सर्वांचे व्यापार जाणावे. ) अशा भेदानें दोन प्रकारचीं कर्में घडतात. या द्विविधकर्मदलांतून पुढें अनंत शाखापर्णपुष्परूप कर्मांचा विस्तार वाढून त्यांचीं भोग्य विषयरूप फलेंही अनंत येतात आणि भोगपर्यवसानांत पुन्हां द्वैत द्विशकलांचें **वासनाबीज** शेष राहतें, तें पुनरारंभक होतें. असो.

जीवाकडून **मानसिक** व **शारीरिक** असें द्विविधकर्म सदैव चालू असतें. मानसिककर्म हें सूक्ष्मरूप ह्म० इतरांस अदृश्य आहे. त्या कर्माचा व फलाचा अनुभव सूक्ष्मरूप असल्यानें तो केवळ स्वसंवेद्य असतो. मानसिक क्रियेसच मनोराज्य ह्मणतात. सद्धेतूंनीं मानसिक सव्द्यापार केल्यास ह्म० ईश्वराचें ध्यान, सच्छास्त्र आणि सत्कार्याचिंतन केल्यास मानसिक क्रिया चालू असतां आनंद होतो. आणि क्रियासमाप्तींतही आनंद होतो. आणि असद्धेतूंनीं अथवा निष्फल मनोव्यापार केल्यास व्यापार चालू असतांच कायतो सुखाभास झाल्यास होतो; नाहींतर आदिअंतीं तो केवळ चिंतारूप ह्म० दुःखप्रद होतो. ( मनोराज्याच्या पुष्कळ गोष्टी सुप्रसिद्ध आहेतच. ) जसें मानसिक कर्म सूक्ष्मरूप आहे तसें त्याचें फलही सूक्ष्मरूप आहे. तथापि सुखदुःख आणि बरें वाईट अथवा पुण्य पाप यांत सुटतें असें नाहीं. तेंही सूक्ष्मरूपानें कर्मफलाशीं संलग्न असतेंच. तें भोग दिल्यावांचून सोडीत नाहीं. आणि देहेंद्रियद्वारा जें शारीरिक कर्म घडतें तें

स्थूलरूप असून व्यावहारिक असतें. जीवाकडून सदसद्धेतूंनीं तें जसें घडेल तसें त्याचें फलही स्थूलरूपानें प्राप्त होऊन सुखदुःखांस उघड कारण होतें. व त्यापासून पुण्यपापांचाही स्पष्ट बोध होतो. मानसिक क्रियेप्रमाणें शारीरिक कर्म केवळ स्वसंवेद्यच न राहतां प्रापंचिकजनांस विदित होतें. उभय कर्मांत अंतर इतकेंच कीं, मानसिक क्रियेंत शारीरिक क्रियेची अपेक्षा नसते, ती स्वतंत्रपणें होते; आणि शारीरिकक्रिया मानसिकक्रियेच्या साहाय्यावांचून यथार्थ घडत नाहीं. मन दुसरीकडे गेल्यास हातचें काम बंद पडतें.

मानसिक व शारीरिक क्रिया घडण्यास मूल कारण **वासना** आहे. तिच्या प्रवृत्तीचा जिकडे व जेथवर आघात बसेल तिकडे तशी क्रिया ह्म० कर्म चालू होतें, व तदनुरूप पुढें कर्मफल मिळतें. त्या सर्व क्रियेचा व फलांचा **संस्कार** वासनेंत राहतो. ( **संस्कार** ह्म० स्मृति अथवा आठवण असें समजावें. ) ज्या फलोद्देशानें जें कर्म केलें असेल तें फल होईपर्यंत त्या क्रियेचा संस्कार वासनेंत कायम असतो. ह्म० त्या फलाची आशा बनली असते. आणि कर्मानुरूप फलभोग संपला ह्म० त्या भोगाचाही संस्कार ह्म० स्मृति वासनेंत कायम राहते. कृतकर्माचा अथवा उपभुक्त फलाचा कोणताही **संस्कार** वासनेंतून नष्ट होत नाहीं. तो वारंवार कालेंकरून व क्रमेंकरून उदयास येऊन कृतकर्मानें फलभोगांत आणि उपभुक्त फलाचे असंतुष्टतेनें पुन्हां कर्मांत प्रवृत्तीस कारण होतो. ‘ उदाहरण, काल क्षुधा लागली होती, तिचे निवृत्त्यर्थ पाकनिष्पत्त्यादि कर्म करून भोजनानें तृप्तिफलाचा उपभोग झाला. यांत कालची **वासना**, वासनेनुरूप **कर्म** आणि कर्मानुरूप **फल** हें उलगडून चुकलें होतें. या सर्व गोष्टीचा **संस्कार** ह्म० स्मृति जर वासनेंत शेष राहिली नसती तर आज लागलेली क्षुधा, ही क्षुधाच आहे अथवा कांहीं पीडा आहे याचेच बोधाची पंचाईत पडती. आणि तिच्या निवारणार्थ काय उपाय करावा ? याच्या शोधार्थच बहुधा सर्व दिवस पूर्ण झाला असता. कारण कालच्या उपायाची आज स्मृति न राहिल्यानें नित्य नवा शोध करावा लागता. खरोखरच जर जीवांची अशी विसरभोळी स्थिति असती तर सर्व सृष्टि बहुधा भोजनव्यापारापलीकडे गेली न-

सती. असो. याच गोष्टीवरून सर्व उदाहरणें जुळवून घ्यावीं. सारांश वासनेंत पूर्व संस्काराचा उदय झाल्यावांचून जीवमात्रांची जन्मत: कशांतही प्रवृत्तीच संभवत नाहीं. आणि त्या संस्कारांत ह्म० स्मृ- तींत अनुकूल ज्ञानाची प्रभा असावयाचीच हा सिद्धांत आहे.

हे **राजन् शीलनिधे**, अशा वासनाबद्ध **संस्कार**परंपरेनें जीवां- कडून जें कर्म सारखें घडत आहे, त्या कर्मांत त्रिविध भेद आहे. कर्माचें स्वरूप वास्तविक एकच आहे, पण कर्मफलभोगाच्या काल- भेदानें कर्माचे तीन वर्ग झाले आहेत. ते **संचित, क्रियमाण** आणि **प्रारब्ध** हे होत. हा जीव पूर्व संस्कारानुरूप वासनेच्या प्रेरणेनें कर्तृ- त्वाभिमान धारण करून मानसिक व शारीरिक कर्में करितो, त्यांचीं सूक्ष्म व स्थूल जीं फलें प्राप्त व्हावयाचीं, तीं, क्रिया समाप्त होतांच तूर्त प्राप्त होतात असें नाहीं. क्रियेचें अल्प अथवा मोठें, जसें स्वरू- प असेल तशा कालावधीनें त्याचें फल प्राप्त होत असतें. साधारण अल्प व स्वल्प ज्या **क्रिया** असतात त्यांचें अल्प **फल**ही तात्काल होतें तो जातें. आणि जीं कर्में महत्त्वाचीं असतात त्यांचीं फलेंही यो- ग्य कालावधीनें प्राप्त होऊन कांहीं काल टिकतात. जो धडा लवकर पाठ होतो तो लवकर विसरतो आणि जो उशिरां बळकट पाठ होतो तो कधीं विसरत नाहीं. जे गहूं, तांदूळ आज आपण खात आहोंत व जीं कापसाचीं वस्त्रें वापरीत आहोंत तीं याच वर्षा- चीं नसून मागच्या वर्षाचीं उत्पन्न झालेलीं आहेत. व त्यांची लागव- ड त्या वर्षाच्याही मागल्या वर्षीं केली गेली आहे. अर्थात बऱ्याच कालाच्यामागें आरंभ केलेल्या क्रियेचीं आज आपल्यास फलें मिळत आहेत. याच नियमाप्रमाणें ज्या क्रिया आज सुरू आहेत त्यांचीं फलें पुढें मिळतील. आलेल्या फलांचा उपभोग यथावकाश होऊन उर्वरित फलें पुढलि कालाकरितां सांठविलीं जातात. अशी कर्मफला- चीं चक्रवृद्धि सुरू असते. चांगल्या अथवा वाईट कोणत्याही कर्माची क्रिया हातांतून सुटलीं कीं तीं फलरूपांत पोंचलीं. तिचा कधीं क्षय न होतां, कालेंकरून ती भोगार्थ सन्मुख येणार आहे. आणि भोगानंतर जरी तीं आपण क्षय पावलीं तरी वासनेंत संस्काराचें पुच्छ शेप ठेवून जाणारच आहेत; कारण चक्र बंद पडतां कामा नये. व-

र्तमानकालीं जीवाच्या हातून जें कर्म घडत आहे व ज्याचें फल पुढें अनुक्रमें येणार आहे, असें जें चालू कर्म, यास **क्रियमाण** ' कर्म ' असें ह्मणतात; हें क्रियमाणकर्म ज्या मागल्या कर्मभांडारांत जाऊन सांठणार आहे, त्या सर्व खजिन्यास **संचित**कर्म असें ह्मणतात. आणि संचित कर्मांतून जन्मादारभ्य मरणपर्यंत जन्मतः शरीराबरोबर नित्य भोगार्थ आलेलें जें कर्म त्यास **प्रारब्ध** असें ह्मणतात. त्रिविध कर्मसमुच्चयासही **प्रारब्ध** ह्मटल्यास हरकत नाहीं. कारण **प्रारब्ध** हा शब्द कर्मफलवाचक आहे. चालू असलेली क्रिया हातांतून सुटली ह्मणजे तिचें **कर्मरूपत्व** जाऊन ती **फलरूपांत** पोंचते. चालू क्रिया—**कर्म** आणि समाप्त क्रिया—**फलरूप** असा नियम समजावा.

---

# प्रारब्धवाद व प्रयत्नवाद.

**कर्मफल**प्राप्तींत दोन प्रकारचे वाद आहेत. कोणी **प्रारब्धवादी** आहेत, व कोणी **प्रयत्न**वादी आहेत. प्रारब्धवाद्याचें असें ह्मणणें आहे कीं; **पूर्वकृत**कर्मानें जें फल सिद्ध असेल तेंच प्राप्त होईल; प्रयत्न करा अथवा करूं नका. दुःखप्राप्तीची कोणास इच्छा नसते, व त्या प्राप्तीस्तव कोणी प्रयत्नही करीत नाहीं; पण तें अवचित डोक्यावर येऊन बसतें. तें कां ? तर पूर्वकृतकर्माचें फल ह्मणून. मग पूर्वकृतकर्मानें जें सुखरूप फल असेल तें प्राप्त होण्यास प्रयत्नाची काय जरूर आहे; तें सिद्धच असल्यानें आपोआप येईल. हें प्रारब्धवाद्याचें ह्मणणें सर्वांशीं खरें आहे. प्रयत्नवादी असें ह्मणतात कीं, **प्रारब्ध** ही कांहींच वस्तु नाहीं. प्रयत्नानें हवी ती फलप्राप्ति होते. ज्या फलास जसे प्रयत्न लागणार असतील ते बरोबर झाले असतां फलसिद्धि बिनचूक ठेवलीच आहे. फलसिद्धि न होणें यांत प्रयत्नाचीच न्यूनता राहते, असें फलच नाहीं कीं जें प्रयत्नानें प्राप्त होत नाहीं. प्रयत्नाअंतीं परमेश्वर भेटतो अशी प्रयत्नाची प्रौढी आहे. प्रयत्नवाद्याचें हें ह्मणणें व त्याप्रमाणें प्रयत्नारूढ राहणें हें मोठें प्रशंसनीय व बहादरीचें आहे. यास **पुरुषार्थवाद** ह्मणतात.

वसिष्ठादि महर्षि आचार्यांनीं प्रारब्धवाद्यापेक्षां पुरुषार्थवाद्यासच प्रोत्साहन व श्रेष्ठता दिली आहे. आणि **धर्म, अर्थ; काम** व **मोक्ष** ह्या चतुर्विध फलांसच चतुर्विध **पुरुषार्थ** अशी श्रुतींनीं संज्ञा दिली आहे. प्रारब्धवादी आणि प्रयत्नवादी या उभय मुलांवर श्रुतिमातेची प्रीति समान आहे. पुरुषार्थवादी हीं तरुण व सशक्त मुलें आहेत, आणि प्रारब्धवादी हीं वृद्ध अतएव अशक्त मुलें आहेत. दोघांच्याही सिद्धांताचें मूळ तात्पर्य एकच आहे. समजुतींतच तेवढा फरक असून फलपर्यवसान दोघांचेंही समान आहे.

हे **राजन्**, या दोन्ही वाद्यांची फलपर्यवसानीं जरी बरोबर गांठ पडली तरी त्यांचा मतविरोध जात नाहीं. एक ह्मणणार हें फल माझ्या **प्रारब्धानें** मिळालें. दुसरा ह्मणणार मीं **प्रयत्नानें** हें फल मिळविलें. पण फलांचा उपभोग दोघांस समान होणार आहे. त्याचे स्वादांत अंतर पडणार नाहीं. आतां या दोघांही मतवाद्यांचे समजुतींत जी थोडी चूक आहे ती अशी कीं **प्रयत्न** हा तरी एक प्रकारची क्रिया ह्म० **कर्मच** आहे. कर्मांत आणि प्रयत्नांत कांहीं भेद नाहीं. दोघांचें स्वरूप एकच आहे. प्रयत्नवादी फलास पुढें मानतो ह्म० फल येणार आहे असें मानतो आणि प्रारब्धवादी फल सिद्ध आहे तें मिळणार ह्म० फलास मागें मानतो. **प्रयत्न** हा थोड्याबहुतांशानें दोघांसही लागतोच. तथापि प्रयत्नास स्वतःसिद्धता येऊं शकत नाहीं. प्रयत्नाचा प्रारब्धाच्या पोटीं अंतर्भाव आहे. आणि प्रारब्ध हें प्रयत्नाधीन आहे; परस्परांचा फार संलग्न संबंध आहे. फल सिद्ध होण्याकरितां जितका कांहीं प्रयत्न अथवा जितकें कर्म अपेक्षित असेल तितकें तें पूर्ण झालें असल्यास सिद्ध **फल** अवचित येऊन प्राप्त होतें. आणि जें फलसिद्ध होण्यांत जितकें कर्म अथवा प्रयत्न अपेक्षित असेल तो अगदीं पूर्ण न होतां अर्धा किंवा पाऊणपट अथवा जितका झाला असेल व जितका होणें बाकी असेल, तितक्याच थोड्या अंशाचा प्रयत्न पुढें झाला ह्मणजे तें पूर्ण फल प्राप्त होतें. सोळा आण्यांच्या प्रयत्नांनीं अथवा कर्मांनीं सोळा आण्यांचेंच फल मिळणार हा निर्विवाद सिद्धांत आहे. यांत मात्र काडीभर चूक पडत नाहीं. आतां ज्यानें सोळा आणे प्रयत्न करून सोळा आण्यांचें फळ मिळविलें

तो प्रयत्नवादाचा अभिमान धरितो. आणि प्रारब्धास तुच्छ समजतो. आणि ज्याला दोन आणे अथवा ज्यास पाव आणा प्रयत्न पडून किंवा अप्रयत्नानेंही प्रयत्नवाद्याप्रमाणें सोळा आण्यांचें फल अनायासें प्राप्त होतें, तो प्रारब्धवादाचा अभिमान धरून प्रयत्नवादास तुच्छ मानतो. एकाचे सोळा आणे प्रयत्न आज होऊन पूर्ण फल मिळतें; व दुसऱ्याचे चवदा आणे प्रयत्न पूर्वीं झाले असून दोन आणे बाकी होते ते आज होतांच पूर्ण फल मिळालें; पूर्वीं चवदा आणे झालेला प्रयत्न प्रारब्धवाद्यासही दिसत नाहीं; व प्रयत्न वाद्यासही दिसत नाहीं. ह्मणून हा आपसांत मतविरोध उभा राहतो. सोळा आणे खर्च केल्यावांचून सोळा आण्यांचें फल दोघांतून कोणासही व कधींही मिळणार नाहीं; या मुख्य वर्मावर दोघांचीही यथार्थ दृष्टि पोंचत नाहीं व त्याचें ज्ञानही होत नाहीं; ह्मणूनच प्रारब्ध कर्मास **अदृष्ट** अशी संज्ञा आली आहे. प्रयत्नवादी हिम्मतीनें फलावर झडप घालण्याचा प्रयत्न करतो, आणि प्रारब्धवादी आळशी होतो. म्हणून प्रयत्नवादाची प्रौढी आहे.

पूर्वसंचित कर्मानें **प्रारब्धरूप** जें **फल** तयार करून ठेवलें असेल त्या फलाच्या उपभोगार्थ थोडेबहुत प्रयत्न झाल्यावांचून उपभोग तरी घडावा कसा ? फलभोगार्थ प्रारब्धवाद्यास व प्रयत्नवाद्यास दोघांसही समान प्रयत्न करावे लागतात. केवळ **फल** प्राप्त झाल्यानें प्रारब्धाची अथवा प्रयत्नाची मजल संपते असें नाहीं. कर्मानें किंवा प्रयत्नानें प्राप्त झालेल्या फलांत फलभोगार्थ किंचित् कर्माची व प्रयत्नाची बाकी राहिली नसती तर कोणत्या कर्माचें व प्रयत्नाचें हें फल आहे अशी कर्मफलाची ओळखच न राहती; आणि ओळख पटली नसती तर कोणत्या कर्मप्रयत्नानें कोणतें फल मिळतें व कोणत्या फलार्थ कोणतें **कर्म** अथवा प्रयत्न केला पाहिजे याचीच पंचाईत पडली असती व कांहीं तरी कर्मप्रयत्न व त्यापासून कांहीं तरी भलतेंच **फल** ह्म० सर्वच घोटाळा झाला असता. व व्यवहार बंद पडण्याची पाळी आली असती. एकानें स्वप्रयत्नानें अन्नसामुग्री संपादन करून पाकनिष्पत्त्यादि क्रिया आटोपून भोजनार्थ पात्र वाढून सिद्ध केलें व दुसऱ्यास कोणीं निमंत्रणानें बोलावून भोजना-

र्थ पात्र वाढून पुढें ठेवलें. येथें क्षुधा निवारणार्थ सिद्धान्नरूप फल दोघांसही सारखेंच प्राप्त झालें; पण अन्नरसाचा उपभोग घेण्याकरितां अन्नभोजनाची क्रिया अथवा प्रयत्न दोघांसही सारखेच पडतील. प्रारब्धानें अथवा प्रयत्नानें प्राप्त झालेल्या धनपुत्रकलत्रादिक विषयरूप फलाच्या भोगार्थ पुढें दोघांही वाद्यांस सारखेंच कर्मप्रयत्न पडतील. राजकुलांत जन्मून अथवा दत्तक जाऊन एकास राज्यपद अप्रयत्नानें ह्म० प्रारब्धानें प्राप्त झालें आणि दुसऱ्यानें ( शिवाजीप्रमाणें ) स्वबाहुपराक्रमानें राज्यपद संपादन केलें. येथपर्यंत राज्यपदरूप फलाच्या प्राप्त्यर्थ प्रारब्धवाद्याचें जेवढें संचितकर्म होतें आणि प्रयत्नवाद्याचा जो प्रयत्न होता त्या दोहोंचीही मर्यादा राज्यफल देऊन संपली. आतां पुढें राज्यसुखोपभोगार्थ नीतीनें प्रजापालनाचा व शत्रुदमनाचा प्रयत्न दोघांसही सारखाच चालू ठेवावा लागेल. हा प्रयत्न न केल्यास प्राप्तफल अनुपभुक्त राहून शेवटीं नष्ट देखील होईल.

ज्या राजानें स्वबाहुपराक्रमेंकरून राज्यपद संपादन केलें व उपभोगार्थ आमरण सतत प्रयत्न केले आणि तो निपुत्रिक स्थितींत मरण पावला; त्याचें राज्य आतां दत्तक मुलास अथवा ( नव्या रीतीप्रमाणें ) जवळच्या वारसास अप्रयत्नानें व अवचित प्राप्त होतें. येथें प्रयत्नवाद्याचें कोणतेंही उत्तर समर्पक होईल का ? प्रत्यक्ष समोर प्रयत्न झाल्यावांचून फल मिळूंच नये असा नियम असेल तर विजयी राजा मरतांच राज्यांत बंड माजलें पाहिजे. व त्या बंडांत जो पुन्हां विजयी होईल तोच राजा होईल. त्याला कोणाची परवानगी लागणार नाहीं. खरोखरच जर ईशरचना अशी असती तर सृष्टींत शांतता ह्मणून कोठेंच दृष्टीस न पडती. ईश्वराकडे पक्षपात, अन्याय अथवा अंदाधुंदी नाहीं ! कीं जें फल एकास प्राणांत कष्ट करूनही मिळत नाहीं तेंच दुसऱ्यास आयतें किंवा मोफत प्राप्त होतें. यांत कर्मानें अथवा प्रयत्नानेंच फल मिळावें या ईश्वरी नियमास बाध आला ; पण तो नियम त्रिकालाबाधित आहे. अंतर इतकेंच कीं एकाचे प्रयत्न आज झाले व दुसऱ्याचे पूर्वीं झाले होते. आणि एकाद्यास तर पूर्ण प्रयत्न होऊनही फल मिळत नाहीं. त्या फलप्राप्तींत नकळे कोणता प्रतिबंध आडवा पडला असतो. त्या प्रतिबंधाचें

ज्ञान न होणें व अवचित फलप्राप्तींत पूर्व प्रयत्नाचा बोध न होणें अशा अज्ञात कर्मासच **अदृष्ट** ह्मणतात. पूर्वकर्म अज्ञात राहण्यांतच कर्माचा व कर्मफलभोक्त्याचा सुरक्षितपणा आहे. ज्या सामान्य मनुष्यास दोन वर्षांत एक लक्ष रुपये कामाच्या व कालाच्या अनुक्रमानें प्राप्त होणार आहेत असें जर त्या मनुष्यास समजेल तर त्याला मध्यंतरीं अनुक्रमें प्राप्त होणाऱ्या लाभापासून संतोष न होतां उलटा तो तरफडत राहील; व अविचारानें काय करील याचा नियम नाहीं. तसेंच भयंकर अरिष्ट अथवा मरण अमुक दिवशीं येणार आहे याचा आज बोध झाला तर हा आजच अर्धमेला होतो. **लाभ**फल अथवा **दुःख**फलाचें पूर्वज्ञान झाल्यानें व्यवहार सुरक्षित चालावयाचा नाहीं. ह्मणूनच जीवाचें सर्व कर्म **अदृष्ट** आहे; आणि त्याचा उपभोग जीवास कालेंकरून व क्रमेंकरून होत गेल्यानें जीवाची सृष्टियात्रा सुखरूप चालते.

**हे राजन्** अदृष्ट अदृष्ट ह्मणजे काय ? कीं आपल्याच बऱ्या वाईट कर्माचरणानें आपल्यास अनुकूल अथवा प्रतिकूल फलप्राप्तीची घटना सुरू असणें व ती घटना पूर्वीं आपल्यास अज्ञात राहून शेवटीं फलानुभवकालीं उदयास येणें ह्म० हें फल माझ्या अमुक कृतीनें प्राप्त झालें असा स्पष्ट बोध मागून होणें. अथवा हें फल कोणत्या कर्मानें प्राप्त झालें हें मला कळत नाहीं, असें वाटण्यास हेतुभूत जें आपलें **कर्म** अथवा **प्रयत्न** हें **अदृष्टाचें** मूल स्वरूप आहे. पूर्व संचित कर्म अदृष्ट राहणें यांत कांहींच नवल नाहीं. पण प्रत्यक्ष घडत असलेलें कर्म **अदृष्टरूप** कसें होतें याबद्दल तुझ्याच राज्यसंस्थेचें तुला उदाहरण देतों, त्याचा तूं सूक्ष्म विचार कर.

**हे शीलनिधे**, तूं आपल्या सत्तेखालीं आपल्या सर्व मांडलीक राजांचें, स्वजनांचें आणि यावत् प्रजाजनाचें अगदीं धर्मनीतीनें, वात्सल्यानें आणि दक्षतेनें शासन आणि पालन करीत आहेस. मनुष्यस्वभावांत परोत्कर्षासहिष्णुता स्वाभाविक असतेच; आणि असलेल्या स्थितीपेक्षां उच्च ऐश्वर्य प्राप्तीची तृष्णा तर कधींही कोणाची शांत नसावयाचीच. हा एक सृष्टिनियमांतला नियम होऊन बसला आहे. तूं सार्वभौम असल्यानें तुला आतां अन्य राज्य संपादन क-

रण्याची इच्छा नाहीं. पण तुझ्या शासनाधीन असलेल्या मांडलीकांतील प्रत्येक राजास तुझें सार्वभौम पद कसें मिळेल याची तृष्णा असून समयप्रतीक्षा करीत असतील. अशा वर्गांतील अविचारी दोन चार मांडलिकांनीं तुझ्या विरुद्ध बंड माजविलें आणि तुझी सत्ता हुसकाविण्याचा प्रयत्न केला तरी तो साध्य होण्याचा संभव नाहीं. कारण जो राजा धर्मनीतीनें व प्रजावात्सल्यानें राज्यशासन करित असतो तो जीवमात्रांस प्रिय असतो व त्याचें राज्य चिरायू असतें. नवीन सार्वभौम झाल्यास तो देखील त्याचें राज्य हरण करणार नाहीं. मग हाच सार्वभौम झाल्यास त्याचें राज्य चिरायू व सुरक्षित कां राहणार नाहीं. बरें ! अशा तुझ्यासारख्या सुयंत्रित राज्यसत्तेविरुद्ध जे कट करतील त्यांच्या कर्माबद्दल जेव्हां तूं त्यांस शासन करून पदच्युत करशील आणि ते राजे गतवैभव होत्साते जेव्हां प्रतिबंधांत बसतील तेव्हांच त्यांस निजकृत **कर्माचा** विचार आठवेल , कीं, शिव ! शिव ! हा आपण काय मूर्खपणा केला ! आपला सत्ताधीश आपलें सप्रेम पालन करित असतां केवळ राज्यतृष्णेनें आपण बंड माजवून आपल्या हातानें आपलें राज्य गमाविलें ! हें आमच्या नीच कर्माचें **फल** आतां आह्मीं भोगिलें पाहिजे; असें ह्मणून रडत बसतील. **हे राजन्** आह्मी कोणतें कर्म करीत आहों व त्याचा परिणाम उद्यां कसा होणार याचें पूर्वीं अज्ञान राहून फलपर्यवसानीं आमच्या अमुक कर्माचें अथवा प्रयत्नाचें हें **फल** होय. असा आज बोध होण्यास हेतु जें पूर्वकृत **कर्म** व त्यापासून झालेलें फल हेंच **अदृष्ट** होय. ह्म० त्या राजाचें प्रालब्ध फल होय.

आतां याच उदाहरणाचा उलट विचार करून पहा कीं, तुझी सार्वभौम सत्ता, राज्यशासन आणि वैभवाद्यैश्वर्य सर्व सुयंत्रित व शांतपणें चालू असतां तुझ्या अष्ट प्रधानादिक श्रेष्ठ अधिकारी वर्गानें तुझ्या अस्पष्ट संमतीनें ह्म० कोणत्याही प्रकारें तुझी संपत्ती वाढविण्यास तुझी संमती आहेच अशा समजुतीनें राज्यनीतींत कपटव्यवहाराचें मिश्रण करून प्रजाजनाची संपत्ती आणि मांडलिकांचीं राज्यें अन्यायानें हरण करण्यास आरंभ केल्यास सार्वभौम छत्राखालची प्रत्येक व्यक्ति असंतुष्ट झालीच पाहिजे. आणि त्याची दाद घे-

ण्यांत तुजकडून हयगय होऊं लागल्यास त्यानें तरी कोणास शरण जावें बरें ? मानवी प्राण्यांत महत्त्वाकांक्षा स्वाभाविक असते, हें वर सांगितलेंच आहे. सुयंत्रित सत्तेखालीं जर जीवाचे मनांत चळवळ असते तर मग अवनतींत स्वस्थ कोण व कसा असूं शकेल ? प्रत्येक व्यक्ति स्वशक्त्यनुरूप प्रयत्न करणारच. अशा कपटव्यवहारस्थितींत जर तुझ्या मांडलिकांनीं तुझ्याविरुद्ध कट करून युद्धानें अथवा कपटानें तुझी सार्वभौम सत्ता हरण करून तुला पदच्युत केलें तर तुला स्वकृत अथवा मंत्र्यनुमोदित **कर्माचा** व पदभ्रष्ट **फलाचा** किती बरें खेद व पश्चात्ताप होईल. आरंभीं स्वकर्म अथवा मंत्र्यनुमति गोड वाटून विपरीत फलानुभवानें मागून पूर्व **कर्म** वाईट होतें असें वाटणें व पूर्वीं त्याचा बोध न होणें असें जें तुझें **कर्म** अथवा प्रयत्न हें **अदृष्ट** होय. जे अष्ट प्रधान राजास कपटनीतींत गुंडाळतात, तेच बहुधा पुढें राजास पदच्युत करून राज्यांत घोंटाळा करण्यास कारण होतात, याची खबरदारी राजानें अवश्य ठेविली पाहिजे.

**हे राजन्**, राजनीतींत कपट-विद्येची आवश्यकता असते, पण तिचा उपयोग प्रबल शत्रूबरोबर करणें अर्थशास्त्रदृष्ट्या कदाचित् सयुक्तिक असूं शकेल. पण आपल्या आधीन, अगदीं आज्ञांकित होऊन विश्वासानें वागणाऱ्या प्रजेशीं, मांडलिकांशीं व त्याच्या अज्ञान संततीशीं तुझा प्रधानवर्ग तुझ्या कृपाबलावर व अधिकाराच्या धुंदींत धनतृष्णेनें अंध होऊन जर कपटानें व छलानें त्यांचा नाश करून व संपत्तीचा अपहार करून तुझें ऐश्वर्य वृद्धिंगत करूं लागला तर ती तुझी वृद्धि तुझ्याच अवनतीस कारण होईल; आणि परिणामीं राज्य नष्ट होईल. अशा कपटव्यवहारास राजनीति ह्मणण्यांत **नीति** या शब्दाचा दुरुपयोग केल्यासारखा आहे. तिला राज्यनीति न ह्मणतां **नीच व्यवहार** ह्मणण्याची पाळी येईल. अशा व्यवहारांत प्रथम जरी आपलें हित दिसतें तरी तें अनहिताचेंच बीज आहे. जी प्रजा व मांडलिकांची संतति अज्ञानदशेंत कपटविद्येनें व्यामोहित होऊन जेव्हां परिणामीं सुखसाधनास आंचवून दैन्य स्थितींत पोंचते तेव्हां त्यांचे डोळे उघडतात. आणि स्वतःच्या मूर्खपणाचा पश्चात्ताप वा-

टून शास्त्याच्या नीच कर्माचा बोध होतो; पण उपाय चालत नाहीं. आतां ज्याकाळीं याच्यावर व्यामोहाची क्रिया चालू असते, त्याकालीं व्यामोहक पदार्थानें व व्यामोहक शिक्षणानें आमचें मोठें हित आहे. असें प्रत्यक्ष दिसतें; पण अंतर्गत मूलछेदनाची घटना शिरावर कशी चालू आहे त्याचा बोध न होण्यास कारण जी कपटक्रिया व तिचें पुढें येणारें **फल** हेंच याचें **अदृष्ट** होय. आणि जो तुझा अधिकारी वर्ग असल्या नीच क्रियेनें तुझें हित साध्य करीत आहे हें जरी सकृद्दर्शनीं तुला हित दिसलें तरी तें हित नसून यापासून तुझें उद्यां अनहित होण्याची घटना चालू आहे. ती पुढें तुझ्या निदर्शनास आल्यावर तुझे डोळे उघडतील. आणि स्वतःच्या दुर्लक्षाचा व मंत्रीकृत कर्माचा यथार्थ बोध होईल. पूर्वी अनन्वित कर्म चालू करून जें दृश्य सुख वाटतें व त्या कर्माची दुःखरूप अदृश्यघटना परिणामीं तुजवर येण्याकरितां चालू होती, पण तुला कळत नव्हती, ती **कर्मघटना** तुझें **अदृष्ट** होय. सारांश निजकृत कर्माच्या फलांचा आणि प्राप्त फलाच्या कर्माचा पूर्वी आपल्यास बोध न होतां जी अदृश्यघटना सिद्ध असणें अथवा चालू राहणें हेंच **अदृष्टाचें** खरें स्वरूप आहे. **फल** होणें हें अदृष्टाधीन आहे. पण सुनीतीनें, सत्कर्मानें व सद्बुद्धीनें वागणें हेंच विचारी मनुष्याचें कर्तव्य आहे. मग कसेंही फल झालें तरी हा निर्दोष राहतो. चुकीस पात्र होत नाहीं.

**शीलनिधे !** विचार कर, तुझ्या सुयंत्रित राज्यसत्तेखालीं बंड माजवून ज्या मांडलिकांनीं स्वतःचीं राज्यें गमाविलीं व दुःख भोगण्यास पात्र झाले. यांत तूं धर्मन्यायानें वागत असतां त्यांची राज्यादि संपत्ती हरण करावी अशी तुला मुळींच वासना नव्हती; पण त्यांचे शासनार्थ तुला तसें करणें भाग आलें, ह्मणून तूं निर्दोष राहिलास. आणि त्या अविचारी राजांची नीच **क्रिया** ह्म० पालकांचा नाश करणें हीच क्रिया पालकांवर उद्वेगजनक परिणामरूप होऊन पालकाची शासनरूप **प्रतिक्रिया** झाली. व दुःखरूप **फल** घेऊन त्यांची त्यांच्यावरच परत आली. आणि याच्याच उलट जेव्हां तूं स्वतः अथवा मंत्रीद्वारा धनतृष्णेनें व अन्यायानें विश्वासूक व आज्ञांकिताच्या नाशार्थ प्रवृत्त होशील तेव्हां प्रतिपक्षी तुझा नाश करून तुला

पदच्युत करतील. येथें तूं दोषी ठरून प्रतिपक्षी निर्दोषी राहतील. आणि तुझ्या अन्यायाची **क्रिया** प्रतिपक्ष्यांवर अरिष्टपरिणामरूप होऊन त्यांजकडून तुझ्या नाशाची **प्रतिक्रियारूप** झाली व ' पदच्युती **फलरूपानें** तुझी तुजकडे परत आली. सुखरूप अथवा दुःखरूप जें फल प्राप्त होतें तें आपल्याच सत्कर्माचें अथवा दुष्कर्माचें **फल** असतें. कारण आपल्या हातून जशी क्रिया घडेल तशीच ती परत फलद्रूप होईल. सज्ञान असो अथवा अज्ञान असो, आपल्या हातून काय कर्म घडत आहे, व त्याचें काय फल मिळणार आहे, आणि जीं फलें प्राप्त होत आहेत, हीं न कळे कोणत्या कर्मामुळें सिद्ध होऊन आलीं आहेत. याचा यथार्थ बोध प्रारब्धवाद्यासही होत नाहीं, व प्रयत्नवाद्यासही होत नाहीं. प्रसंगविशेषीं चांगल्या कर्मानें व प्रयत्नानें वाईट फल मिळतें आणि वाईट कर्मांनीं अथवा प्रयत्नांनीं चांगलें फल मिळतें असा जरी विरुद्ध व्यवहार दिसला, तरी त्याचें यथार्थकारण अदृश्य असतें. त्या अदृश्य कारणाचा पूर्ण बोध एक ईश्वरावांचून अन्य जीवास कधींही होत नाहीं. यथार्थ बोध होत नाहीं ह्मणून, कोणीं यथेष्ट वागूं नये. चोरास धन प्राप्त होऊन सुख वाटलें, ह्मणून चोरी **सत्कर्म** होणार नाहीं. त्याचें फल शृंखलाबंधन हें एक दिवस सिद्धच आहे. तसेंच सज्जनास दुष्टांपासून अथवा अवचित दुःख झालें ह्मणून सदाचरण ' **दुष्कर्म** ' होणार नाहीं. कर्मांची व फलांची गति मोठी दुर्ज्ञेय आहे. तिचा अंत लागत नाहीं ह्मणून कर्मफलास, ' **अदृष्ट** ' असें ह्मणतात.

**हे राजन,** जीवास ' अदृष्टा ' नुरूप जें फल प्राप्त होतें त्या फलाच्या उपभोगार्थ जीवास पुन्हां उर्वरित कर्म अथवा प्रयत्न करावे लागतात असें मागें सांगितलें आहे. त्यांत मोठा चमत्कार आहे, तो असा कीं; " प्रारब्ध कर्मफलाचा क्षय भोगावांचून होत नाहीं. " असा श्रुतीचा सिद्धांत आहे. त्याप्रमाणें अदृष्टानुरूप जें फल प्राप्त होतें, त्या फलाचा उपभोगानें नाश होतो. पण उपभोगार्थ जे प्रयत्न अथवा क्रिया करावी लागते, ती क्रिया सिद्धफलांचा उपभोग तर देतेच, पण उपभोगार्थ चालू असतां अनेक नवीन कर्में व फलें उत्पन्न करीत जाते. त्यामुळें पूर्वभोग संपत नाहीं तोंच नवे अनेक

भोग उभे राहून जीवास गुंतवीत असतात. ह्मणून जीव सरळ मार्गानें न जाऊं पावतां वारंवार परिभ्रमणांत पडत असल्यानें सुटका होत नाहीं. कर्माच्या व फलभोगाच्या चक्रवृद्धींत सारखी गुंतागुंती चाललेली असते. उदाहरण " अमुक जिन्नस हवा आहे, तो बाजारांतून आणूं " असा **संकल्प** झाला, त्या संकल्पानुरूप बाजारांत जाण्याची **क्रिया** घडली, आणि त्या क्रियेचें **फल** ह्म० इच्छित वस्तु बाजारांत मिळाली. पुढें वस्तूचा उपयोग केला ह्म० **फलभोग** झाला. हा **संकल्प** संकल्पानुरूप **क्रिया**, क्रियेनुरूप **फल** आणि फलाचा **उपभोग** अशी सरळ वाट झाली. आतां अंतर्गत गुंता पहा. घरांतून बाहेर पडतांच ठेंच लागून दुखापत झाल्यामुळें वैद्यराजाकडे जावें लागलें. तेथें पोंचतांच तेथें कांहीं मारहाण चालली होती, त्याचें साक्षीदार बनवून एकानें अधिकाऱ्याकडे बळेंच ओढून नेलें. तेथून सुटका कशी तरी होते तोंवर बाजार बंद झाला. उद्दिष्ट जिन्नस न मिळतां, अत्यंत उशीरां घरीं परत आल्यानें ज्या कोणाशीं महत्त्वाचे कार्याचा संकेत केला होता, तो घरीं येऊन परत गेला आणि त्यामुळें शंभर रुपयांचें नुकसान झालें. आतां पहा ! आरंभीं उद्दिष्ट कार्य काय होतें, आणि त्याचा परिणाम काय झाला. घरून निघाला कोणत्या कार्यासाठीं व फलांकरितां आणि मध्येंच कोणती क्रिया व फल उभें राहिलें. उद्दिष्ट जिन्नस जरी उद्यां पुन्हां आणला तरी पण आज झालेला घोटाळा परत भरून येणार नाहीं ? याच उदाहरणावरून हवीं तितकीं चांगलीं वाईट उदाहरणें जुळवून पहा, ह्म० एक उद्दिष्ट **कर्मफल**भोगांत किती अगणनीय गुंते उभे राहतात याचा पत्ता मुद्दां मानवी बुद्धीस त्रिकालांत लागणार नाहीं. सारांश उद्दिष्ट फलप्राप्त्यर्थ जें **दृष्टकर्म** अथवा जो **प्रयत्न** घडेल त्यापासून जें दृष्टफल प्राप्त होईल तें कर्म घडतांना न जाणों त्याच्या अंतर्गत कोणतीं कोणतीं अदृष्ट कर्मे घडतील व त्यांचीं फलें अदृष्ट तयार होत जातील व तीं कशीं व कधीं भोगार्थ ओढवतील हें यथार्थ समजणें कधींच शक्य नाहीं. कर्माची गति अतिगहन, अति दुर्ज्ञेय, अति सूक्ष्म आणि अनिवार्य आहे. जीवानें इच्या शोधाच्या भानगडींत न पडतां, श्रुतिशास्त्रदर्शित व श्रेष्ठाचरित कर्ममार्गानें व यावत्बुद्धिब-

लोदयानें सदाचरण करीत जावें. ह्म० पुढचा मार्ग शुद्ध होऊन, सर्व-कर्माधिष्ठानरूप **सर्वांतरात्मा** संतुष्ट राहील आणि **सत्फल** व **सद्गति** कालेंकरून व क्रमेंकरून प्राप्त होईल. आणि सत्कर्मपरिपाकानें हा जीव शेवटीं कैवल्यपदीं प्राप्त झाला ह्म० जन्ममरणाचे पुनरावृत्तींत कधींच येणार नाहीं.

**हे शीलनिधे !** जीवाच्या प्रारब्ध कर्मफलाचा विचार सविस्तर तुला सांगितला. याचें तूं चांगल्या प्रकारें चिंतन कर. यांत विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट अशी आहे कीं; जीवाच्या हातून जी क्रिया सदैव चालू आहे, तें ' **क्रियमाण** कर्म ' आहे. या क्रियमाण कर्मांत अल्प स्वल्प क्रिया असतात त्यांचीं सामान्य फलें चालू वर्तमानकालीं क्रमानें मिळतात; आणि ज्या महत्फलांच्या क्रिया असून ज्यांचीं फलें मिळण्याचा तूर्त समय नाहीं, अशा क्रिया **संचित**कर्म भांडारांत जाऊन मिळतात. व अनुकूलकालीं फलद्रूप होतात. असा कर्मसंचय ' **संचितकर्म** ' ह्मणवितो. या खजिन्यांतून जन्मादारभ्य मरणपर्यंत भोगार्थ जें कर्म आपल्या शरीराबरोबर आलें तें **प्रारब्ध** आहे असें मागें सांगितलेंच आहे. त्यांत प्रारब्धवाद व प्रयत्नवाद असे दोन मतभेद उभे राहिलेले दिसतात. पण त्यांत केवळ शब्दांचाच मात्र भेद आहे, अर्थात् कांहीं भेद नाहीं. महर्षी आचार्यादिकांनीं प्रयत्नवाद्यास महती दिली आहे, त्याचें तात्पर्य इतकेंच कीं, प्रयत्नवादी प्रारब्धास तुच्छ मानून फलप्राप्तीपर्यंत धैर्यानें अविश्रांत प्रयत्न करतो. ह्म० जशा महत्त्वाचें फल असेल, तसे दीर्घतम प्रयत्न—फलबोधक श्रुति वाक्यावर विश्वास धरून सतत चालू ठेवितो. " या जन्मीं माझ्या प्रयत्नानें हें फल मिळालें नाहीं तर काय चिंता आहे, मी पुढले जन्मीं घेईन ! दोन जन्मांनीं अथवा दहा जन्मांनीं घेईन ! फल घेतल्यावांचून सोडणार नाहीं !! ' असा त्याचा पूर्ण निग्रह असतो. व प्रतिजन्मीं त्यास उद्दिष्ट फलप्राप्त्यर्थ केलेल्या कर्माचीच पुन्हां **वासना** होऊन तो पुन्हां त्याच कर्मास आरंभ करितो. पुढें त्यास, त्या कर्मांत परिश्रम थोडे पडून लवकर फलसिद्धि होण्याचा अनुभव पटत जातो. पूर्व रात्रीं सामान्य घोकलेला धडा दुसरे दिवशीं अल्पायासानें सहज पाठ होतो. का-

रण पूर्व रात्रीं घोकल्याचा **संस्कार** बुद्धींत असतो तोच पुढें उदयास येतो. एक मुलास शंभर वेळही घोकून जो धडा येत नाहीं तो दुसऱ्यास पांच वेळ घोकूनच येतो. यांत तरी, त्याच्या बुद्धींत पूर्वाभ्यस्त विद्याभ्यासंगाचा **संस्कारच** कारण असतो. त्या संस्काराची ओळख पटत नसल्यानें, तो मुलगा बुद्धिमान् आहे असें ह्मणतात. ज्या विषयांत आपला बुद्धिप्रवेश लवकर होतो, अथवा ज्या अल्प प्रयत्नानें आपल्यास महत्त्वाच्या फलाचा लाभ होतो, त्याविषयीं आपले पूर्व प्रयत्न झाले आहेत असें खास समजावें. व फलप्राप्तींत कांहीं न्यूनता राहिल्यास, धैर्य न सोडतां प्रयत्न चालूं ठेवावे; कारण प्रयत्न वृथा कधींच जात नाहींत. त्यांचें फल पुढील जन्मीं मिळाल्यावांचून राहणार नाहीं. सर्वच प्रयत्नांचीं फलें, एकाच जन्मीं प्राप्त होतात, असें नाहीं. जन्मांतराची व प्रयत्नफलाची सांगड लागली आहे; ती आपल्या क्रमानें चालू राहून अनुकूल कालीं फलद्रूप व्हावयाचीच व ती प्रयत्नानें साध्य करून घेतां येणें शक्य आहे. असें प्रयत्नवाद्याचें मत आहे. हें मत दिसण्यांत भिन्न वाटतें, पण त्यांत भेद वास्तविक कांहीं नाहीं. कारण, ज्यास प्रयत्नवादी **प्रयत्न** असें ह्मणतो, तो प्रयत्नच मुळीं **कर्म**रूप आहे. प्रयत्नांत व कर्मांत यत्किंचित् सुद्धां भेद नाहीं. प्रयत्न अथवा कर्म या शब्दांच्या अर्थांत व स्वरूपांत अंतर नाहीं. आणि जन्मांतरें दोन्ही वाद्यांचे वादांत सिद्ध आहेत. ह्मणून हे वादी एकरूपाचेच आहेत.

अशा प्रकारच्या प्रयत्नवाद्यांत व प्रारब्धवाद्यांत जरी सकृद्दर्शनीं विरोध भासला तरी दोघेही फलपर्यवसानीं एकरूप होतात. पण जे केवळ प्रत्यक्ष प्रयत्नफलवादी असतील ह्म० वर्तमानजन्मांत प्रत्यक्ष प्रयत्न घडतात तेच तर **प्रयत्न** आणि त्यांचें जें मिळणारें प्रत्यक्ष फल तेंच **फल** आहे. जन्माच्या पूर्वीं व मरणानंतर प्रयत्नफलाशीं अथवा कर्मफलाशीं कांहीं संबंध नाहीं. जें कांहीं झालें व जें कांहीं होणार तें सर्व एकवारच. मरणोत्तर पुढें कांहीं नाहीं. असेंच ज्याचें मत असेल त्याच्या वादास प्रयत्नवाद न ह्मणतां ‘ उलूकवाद ’ असें ह्मणावें हें उत्तम. कारण उलूकाच्या दृष्टीनें दिवसां सृष्टि न-

सते, रात्रीं सृष्टि असते. असें वाटणें जितक्या महत्त्वाचें आहे तितक्याच महत्त्वाचें सृष्टींत प्रत्येक वेळीं नवा प्राणी जन्मतो, मरणोत्तर पुढें अंधार हें ह्मणणें आहे. याबद्दल त्या वाद्यासच उलट विचारलें पाहिजे कीं, प्रयत्नानें राज्य संपादन करणाराचें राज्य, त्याच्या दत्तकास अथवा वारसास अवचित राज्यप्राप्ति झाल्याचें उदाहरण नुकतेंच दिलें आहे. त्यांत दत्तकानें दत्तक होण्याबद्दल व वारसानें वारस होण्याबद्दल कांहीं प्रयत्न केला होता कीं काय ? येथें त्याचें उत्तर काकतालीय न्यायाबद्दलच येणार आहे. बरें ! असो. दहा वेळ प्रयत्न करून, दोन वेळच फलसिद्धि होते, व बाकीचे प्रयत्न निष्फल होतात, असेंही नेहमीं जर अनुभवांत आहे तर दोन वेळां मिळालेलें फल काकतालीययान्यानें नव्हे का? जर यासही काकतालीयन्यायांत ढकलाल तर प्रयत्नवादच खुंटला; कारण नियम राहिला नाहीं. अनियमित गोष्ट प्रमाण होऊं शकत नाहीं.

एकाच मातापितरांस दोन मुलें सुस्वरूप व्हावीं, आणि एक जन्मांध व दुसरा जन्ममूक अशीं दोन व्हावीं. हा असा एकाच उत्पत्तिस्थानीं विपर्यास कां व्हावा बरें ? दोघांनीं तर पूर्णावयवसंपन्नतेनें सृष्टिव्यवहाराची मौज मारावी, आणि दोघांनीं दीनवाणें वागावें, कोणी पंगू होऊन रखडत चलावें, अनेक प्रकारच्या अंगव्यंगतेनें हीन व्हावें, यास काय हेतु असावा ? याचें कारण दाखविते वेळीं कोणी विद्वान असें ह्मणतात कीं; तो प्राणी गर्भाशयांत असतांच त्याच्या अवयववृद्धींत कांहीं कारणपरत्वें न्यूनाधिकपणा होतो. ह्मणून स्वाभाविक अंग व्यंग होतें. पण या ह्मणण्यांत समर्पक कारण दाखवितां येत नाहीं.*

विद्युन्मानस शास्त्रकारांनीं संतति सुधारण्यास ह्मणजे सुस्वरूप होण्यास उपाय, हा विषयाचें प्रतिपादन करतांना बहुत समर्पक कारणें दाखविलीं आहेत. विद्रूप संतति होण्याचें कारण दाखवितांना सदर शास्त्रकार ह्मणतात, एका बाईस एक हात

* हलामधील मजकूर परमहंसाच्या भाषणांतला नसून ग्रंथकाराचा आहे, असें समजावें. सद्गुणी व सुरूप संतती होण्याचा उपाय. केरळकोकिळ अंक २ रा, पुस्तक ११ वें. सन १८९७.

व एकच पायाची मुलगी, एका गांवांत झाली. तो चमत्कार पहाण्याकारितां मंडळी एकत्र जमल्यांत एक गरोदर बाई आली होती. तिजला त्या एक हात पायाच्या मुलीचा अत्यंत ध्यास लागून तिजला पुढें मुलगी झाली तीही एकच हात पायाची झाली. एक बाई गरोदर असतां पोपटास भ्याली, तिला मुलगी झाली. तिचा अवाज पोपटासारखा होता. जी बाई गरोदर असतां आपल्याच डामडौलांत असते तिला मूल तिच्यासारखेंच होतें, व जिचे मनांत पतीविषयीं फार ध्यास असतो, तिला नवऱ्याच्या स्वरूपाची संतति होते. इ० पुष्कळ उदाहरणें, 'ग्यालवानिक विद्युत्च्या धनऋणशक्तीनें गर्भावर असे विलक्षण परिणाम घडतात. ह्मणून मोठ्या सुयुक्तिकपणें विचार केला आहे. यांपैकीं पुष्कळ गोष्टी आपल्या येथें " गर्भगीतेंत " वर्णन केल्या असल्यानें, वरील उदाहरणें पुष्कळ अंशीं त्यांशीं मिळतात. हीं कारणें कदाचित् सत्यही असतील, असें जरी मानिलें, तरी जी मुलगी एकच हात पायाची जन्मली, तिच्याच गर्भस्थितींत तिच्या मातोश्रीस असा विपरीत निजध्यास लागण्याचा योग कां यावा ? आणि तिच्या इतर भावंडांनीं सुंदर निपजून या विचारीनें दीनवाणें त्यांजकडे पहात बसावें, व दुसऱ्यानें उचलल्यावांचून जागचें हालतांही येऊं नये, असा तिनें काय कोणाचा अपराध केला होता ! ! याचें उत्तर कोणासही यथार्थ देतां येणार नाहीं. तिच्या जन्माच्या वेळीं तसा योग आला ह्मणून तसें झालें. इतराच्या वेळीं आला नाहीं, यांत महत्त्व तें काय '? असेंच जर उत्तर देतील तर हें उत्तर नव्हे ! ! कांहीं तरी बोलावें ! इतकेंच आहे.

---

ईश्वर कर्माचें जें फल देतो तें तरी दुसऱ्यास निमित्त करून तद्द्वारा पोंचवितो. जन्मांधाचे डोळे ईश्वरानें सळया घालून फोडिले नाहींत. कर्माचें ' **फल** कोणत्या तरी निमित्तद्वारें ज्याचें त्यास नेमकें पोंचतें. " सारांश, आहे तेवढाच ' **जन्म** ', करतां येईल तेवढें **कर्म** अथवा **प्रयत्न** आणि मिळेल तेवढें त्यांचें ह्म० कर्मप्रयत्नांचें **फल** असा केवळ आग्रह धरून जर कोणी प्रयत्नवादी होऊं इच्छितील तर अशांस प्रयत्नवादी ह्म० **पुरुषार्थवादी** ह्मणतां

येत नाहीं. हे केवळ दृष्टार्थवादी आहेत. दृष्टार्थवाद श्रुतिसंमत नाहीं. श्रुतिसंमत पुरुषार्थवादांत, व प्रारब्धवादांत, जन्मांतर सिद्ध मानिलें आहे. ह्मणूनच उभय वादांची समान प्रौढी मानिली आहे. जीवाच्या इच्छेनुरूप जो वाद पसंत वाटेल, तो कोणताही स्वीकारला तरी आदिमध्यावसानीं कर्मांत व फलांत कोठेंच विरोध येत नाहीं. इच्छित फल दोघांस समान मिळतें. यावरून **कर्म** व **प्रयत्न** हे शब्द परस्परांचे पर्यायवाची ह्मणण्यांत कांहीं बाध नाहीं. हे **राजन् शीलनिधे,** कर्माचा विषय अति गहन व अति दुर्ज्ञेय असल्यानें जेव्हां जेव्हां ज्या ज्या महर्षि आचार्यांनीं याविषयीं मीमांसा केली, त्याच्या पर्यवसानीं आमचे अल्प मतीस कळला त्याप्रमाणें विचार केला आहे, असेंच ह्मणून हात टेकले आहेत व आपणासही टेकावे लागतात. याचें यथार्थ ज्ञान एक **सर्वेश्वरासच** आहे. त्या पुढें आपल्यासारख्या अल्पज्ञ जीवांची कथाच काय ? तथापि, तोच **सर्वांतरात्मा** स्वप्रेरणेनें, आपल्यास कर्मविचारांत प्रवृत्त करून जितका बुद्धीस प्रकाश देत जाईल तितका आपण विचार करून त्याच्या कृपामृतसिंचनानें आनंदित व कृतार्थ व्हावें हेंच खरें सार आहे.

---

# त्रिविध कर्माचें अधिष्ठान.

आतां त्रिविध कर्मांच्या अधिष्ठानाचा विचार जरी पूर्वीं पर्यायानें झाला आहे, तरी त्याचा पृथक् रीतीनें पुनः स्पष्ट उल्लेख करून पुढें चलूं. जीवाच्या इच्छेनुरूप प्रेरणा अंतःकरण व इंद्रियादिकांस मिळाली म्हणजे तीं विषयांत प्रवृत्त होऊन विषयानुभवास इच्छेच्या द्वारें जीवास परत पोंचवितात. त्या अनुभवानें जीव संतुष्ट अथवा असंतुष्ट जसा होईल त्याचा सर्व संस्कार वासनेंत राहतो. व तदनुकूलच पुनः प्रवृत्ति होते; असें मागेंही सांगितलें आहे. **वासना** ही जीवाच्या कर्मफलरूप खजिन्याची पेटी आहे. पेटींतून लागणारा जिन्नस बाहेर काढतां येतो, व नवा जिन्नस त्यांत ठेवितां येतो. पण ही वास-

नेची पेटी इतकी खोल आहे कीं, तींत किती सांठा असेल व किती नवा सांठा होईल याचा अंतच लागणें कठिण आहे. मन, बुद्धि इ० अंतःकरणाच्या ऊर्मी या सर्व वासनेचें ह्म० इच्छेचेंच स्वरूप होत. याचा सूक्ष्म विचार पुढें कर्तव्यप्रकरणांत येणार आहे. सर्वसामान्य समजुतीस सारखा पटणारा, 'बुद्ध्यनुसार कर्म' व 'कर्मानुसार बुद्धि' हा सिद्धांत मागें सांगितलाच आहे. त्याच अनुरोधानें यावत् कर्मफल ह्म० संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध, या त्रिविध कर्मांचा व कर्मानुरूप उपभुक्त फलांचा **संस्कार** बुद्धींत सांठविलेला राहतो. व कालेंकरून व क्रमेंकरून, जीवाच्या उपभोगार्थ व कर्मप्रवृत्त्यर्थ समयासमयानें उदय पावतो व तदनुकूल जीवाची सृष्टिव्यवहार परिभ्रमणमालिका चालू राहते.*

तोंडानें जे शब्द बोलतों तेच हातानें लिहितों; दोघांपासून अर्थज्ञान सारखेंच होतें. असे अर्थज्ञानानें भरलेले सहस्रावधी प्रचंड ग्रंथ आहेत. त्यांचे पत्रांची सरळ रांग लाविल्यास दहा वीस कोस भूमि सहज झांकली जाणार आहे. अथवा तोंडानें आवृत्ति आरंभिल्यासही पांच पन्नास कोसपर्यंत सहज पुरेल. असे अति विस्तीर्ण ग्रंथसमूह, या मानवी बुद्धींत अस्खलित गुंडाळलेले जीवाश्रित असतात. त्या सर्व ग्रंथांचीं वाक्यें अगदीं मुखोद्गत असलीं तरी सर्व वाक्यें एकदम उच्चार होणें तर शक्य नाहींच, पण बुद्धींत देखील एकदम उपस्थित होऊं शकत नाहींत. जसा मुखानें शब्दोच्चार अनुक्रमानें व कालावधीनें होतो, तसाच शब्दोच्चार न करितां केवळ बुद्धीचेच अवधार-

* अमेरिकन शोधकांनीं फोटोग्राफच्या केमिऱ्याप्रमाणें थिओटोग्राफचा केमिरा नवा केला आहे. त्यांत स्प्रिंगच्या गुंडाळ्याप्रमाणें फोटोनिगेटिव्हची फार लांब प्लेट चिवट व पारदर्शक केलेली सचित्र गुंडाळली असते. तिच्या मागें मॅजिक लॅंप लावून केमिरा उघडला ह्मणजे अगदीं नाटकाप्रमाणें सर्व चित्रांचा खेळ दिसूं लागतो. याची विशेष माहिती थिओटोग्राफ वर्णन केरळकोकिळ अंक १० वा, पुस्तक १० वें, सन १८९६ पहा. या प्लेटच्या रचनेप्रमाणें जीवाच्या बुद्धींत अनंत कर्में व भोगजन्य संस्काररूप चित्रें अपरिमित भरलीं आहेत. तीं जन्मादारभ्य मरणपर्यंत खेळत असतात. मध्यें मरणसीमेंत बंद राहून पुनः जन्म झाला कीं खेळ सुरू होतो.

णेनें ग्रंथावर्तन करूं लागल्यास अनुक्रमानें व कालावधीनें सर्व वाक्यें येत जातील. ग्रंथाचा ग्रंथ एकदम समोर उभा राहणार नाहीं. याचें कारण काय? तर बुद्धींत शब्दाचे **संस्कार** जशा कालावधीनें व अनुक्रमानें आरूढ झाले असतील, ते तशाच अनुक्रमें निघतील अथवा आवश्यकतेप्रमाणें मधूनही आठवतील. पण समग्र ग्रंथ अथपासून तों इतिपर्यंत कधींच त्रिकालांत उपस्थित होणार नाहीं. व कोणास आजपावेतों झाला नाहीं. ह्मणूनच 'समग्र ज्ञान' केवळ एक ईश्वरासच आहे. जीवास बुद्ध्यारूढ ज्ञान, जसें कालेंकरून व क्रमेंकरून उपस्थित होतें, तसेंच बुद्ध्यारूढ प्रारब्ध **कर्म**, **फल** व **संस्कार** कालानुक्रमानें उदयास येऊन जीवास **कर्मभोग** मिळत जातो. **सृष्टि**, अनादि आहे, **जीव** अनादि आहे, आणि जीवाचें **कर्म**ही अनादि आहे. अनादि कर्माचे असंख्य **संस्कार** जीवाचे बुद्धींत, संचित क्रियमाण प्रारब्धरूपानें अखंड चक्राकार चालू आहेत. त्या संस्कारानुरूप कर्मफलभोगमालिका असंख्य जन्मांतहीं परिपूर्ण न होतां सृष्टीच्या अनंत कालपर्यंत जीवासही अनंत जन्ममरणपरंपरेनें अखंड परिभ्रमण करीत फिरावयाचें आहे. कारण, क्रियमाण कर्मांची रोजची अकुंठित भरती जी चालली आहे, ती कदाचित् आज थांबल्यास, अनादि कालापासून सांठलेलें मागील '**संचितकर्म**' **प्रारब्ध**रूपानें भोगार्थ क्षय होत होत अति संकोच केला तरी कदाचित् दहावीस सृष्टिकल्पांत, जन्ममरणमालिका बंद पडेल कीं नाहीं, याचा संशयच आहे. पण चालू क्रियमाण कर्म आधीं बंद होणेंच शक्य नाहीं, मग पुढची आशा करणें ह्म० आकाशदोहनानें दुग्ध काढण्याप्रमाणेंच आहे. या एका जीवाच्या त्रिविध कर्मांच्या दोरीचें जाळें करून पसरल्यास, हा आपला भूगोल न जाणो कोणत्या अल्पछिद्रांत अडकून राहील, हें कळणार सुद्धां नाहीं. अशा अनंत कोटि ब्रह्मांडांत, अनंत कोटि जीव भरले असून त्यांच्या अनंत कर्मानेंच ही सर्व सृष्टि निर्माण होऊन अशी अनाद्यनंत होऊन बसली आहे कीं, हिच्यांतील एक किरकोळ परमाणूचाही उत्पत्तिलय करणें जीवाचे स्वाधीन राहिला नाहीं. तो नसो, पण जसा कोशकार कीटक ( ह्म० कोळी किडा ) आप-

त्याच थुंकीनें जाळें आपल्या भोंवतीं पसरत जातो, मक्षिका भक्षण करीत जातो, आणि मक्षिकांच्या धरण्याच्या आशाबद्धतेनें चहूंकडून जाळें लावून सरते शेवटीं त्यांत आपणच गुंतून मरतो. तसा हा जीव, विषयभोगेच्छेनें स्वहस्तें कर्माचें जाळें पसरून भोग भोगीत भोगीत व कर्में करीत करीत सरते शेवटीं आपणच आपल्या हातांनीं कर्मपाशांत जखडला जाऊन अत्यंत पराधीन होत्साता, जन्ममरणपरंपरेच्या महामोहांधकारगर्तेत कायमचा निमग्न होऊन बेशुद्ध झाला आहे. ' पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननीजठरे शयनं,' भवप्रवाहांत गंटगळ्या खात आहे. शिव ! ! शिव ! ! सद्गुरु-ईश्वरकृपेनें आणि जीवाच्या सुदैवानें कधीं या जीवास शुद्धि येईल ती येवो. पण ज्यांस थोडीबहुत तरी जाग आली असेल त्यांनीं तरी पुन्हां डोळे मिटूं नयेत ! ! मिटल्यास बुडालेरे ! ! बुडाल ! !

# जीवाचें पुनर्जन्ममरण.

**हे राजन् शीलनिधे!** जीवाच्या, **संचित, क्रियमाण व प्रारब्ध** कर्मांचा विचार, व त्या कर्मांच्या फलभोगाचा अनुक्रम मागें सांगितला, त्यांची ह्म० कर्मफलांची कशी अभेद्य ग्रंथि आहे, ही गोष्ट तुझ्या लक्ष्यांत आलीच असेल. आतां जीवाच्या पुनर्जन्ममरणाचा विचार करूं. जीवाचें ' **जन्ममरण,** ' हें जगांतील विद्वान्, अविद्वानापासून तों अगदीं रानटी स्थितीपर्यंतच्या प्रत्येक व्यक्तीस सारखें कबूल आहे. कारण या गोष्टीस नाकबूल करून गत्यंतरच नाहीं. प्रत्येकास एक दिवस मरावेंच लागतें. व पुत्रादिकांचा जन्ममृत्यु प्रत्यक्ष पहात असल्यानें, या विषयांत गडबड चालत नाहीं. पण जीवाचें ' **पुनर्जन्ममरण,** ' मात्र पुष्कळ मतवाद्यांस मान्य नाहीं. कारण, त्याबद्दल प्रत्यक्ष प्रमाण अथवा अनुभव कांहींच सांपडत नाहीं. ती गोष्ट केवळ अंधविश्वासाची आहे. जन्मापूर्वी व मरणानंतर जीवांची काय स्थिति असते व होते हें कोणासच बरोबर सांगतां येत नाहीं. इ० अनेक कारणें दाखवून पुनर्जन्माची असिद्धि मानतात. पण जे लोक

असें मानणारे आहेत, त्यांजला जन्मतो कोण ? व मरतो कोण ? याचाच पत्ता ठाऊक नाहीं. जीव जन्मास येतो, व जीवच मरतो, हें आह्मास जसें प्रत्यक्ष दिसतें, तसें जीव मल्यावर पुढें कोणीकडे जातो, हें दिसत नाहीं. व तोच पुन्हां परत जन्मास येतो हेंही दिसत नाहीं. मग पुनर्जन्म होतो; हें कशावरून मानावें ? असें हे वादी ह्मणतात. तर पुनर्जन्म राहूं द्या, पण जीव जन्मास येतो व जीवच मरतो ह्मणतां, यांत जन्मतांना व मरतांना, तुह्मास जीव दृष्टी पडतो कीं जीवाच्या देहास तुह्मी प्रत्यक्ष पाहतां ? देहास प्रत्यक्ष पाहतों, असेंच ह्मणावें लागणार आहे. कारण देहांत असलेला जीव प्रत्यक्ष दिसत नाहीं तर, मरणानंतर कोणीकडे गेलेला कसा दिसावा ? 'जीव जन्मास यतो', या वाक्याचाच विचार करून पहा. **येतो** या शब्दानेंच तीन प्रश्न उत्पन्न होतात. ह्म० कोणीकडून येतो ? कसा येतो ? व कां येतो ? कोणताही प्राणी अथवा पदार्थ कोणीकडूनही '**आला**' ह्म० त्याचे आगमनाचा मार्ग व्यक्त होतो. कोणत्या प्रकारें कसा आला हेंही नीट समजतें, व पुढें त्याच्या आल्यापासून जें कांहीं स्वाभाविक अथवा बुध्या कार्य घडून येतें, तें कार्य त्या वस्तूच्या आगमनाचा हेतु ह्मणविलें जातें. ह्म० कार्याशीं व त्या वस्तूशीं संबंध जुळविला जातो. जसें चोर चोरी करण्यास घरांत शिरला, अथवा परराष्ट्रीय शत्रु आला. यांत चोराच्या व शत्रूच्या येण्याचा मार्ग ह्म० दिशा समजते. चोर भिंत फोडून आला आणि शत्रु फौज इ० साहित्यानें आला. यांत चोर व शत्रूच्या येण्याचा प्रकार समजला. आणि घरांतील रकमभाव नेल्यानें व देश जिंकल्यानें, शत्रूचा व चोराचा हेतु कळला. ह्म० या दोघांचें बुद्धिपूर्वक आगमन होऊन, जी त्यांच्या येण्यापासून क्रिया घडली, त्या क्रियेशीं व त्यांच्या येण्याशीं हेतुरूप संबंध जुळविला जातो. अकालीं अति जोराचा पाऊस अथवा वारा आल्यास, येण्याची दिशा व जोराचा प्रकार दिसतो. आणि त्यापासून ज्यांचें ज्यांचें जें जें नुकसान होतें ते ते आमचें असें नुकसान व नाश करण्याकरितां हा वारा पाऊस आला ! ! असें ह्मणून आपल्या नुकसानीचा हेतु वाऱ्यापावसाशीं जुळवितात. तसेंच जो मनुष्य जन्मास येतो त्याचे-

पासून इतरास जसें सुख अथवा दुःख प्राप्त होतें, तसे ते आपल्या सुखदुःखाच्या हेतूचा संबंध त्या प्राण्यांशीं जुळवितात. अमुक प्रतापी पुरुषानें देशाचें कल्याण केलें. यांत खरोखरच त्यानें जन्मास आल्याचें सार्थक केलें. अमुक देशबुडव्या निघाला. यापेक्षां जन्मास आला नसता तर बरें होतें. असें प्रत्येक व्यक्तीस वाटतें. यांत मनुष्याचे जन्मादारम्य मरणपर्यंत स्वतःचे बऱ्या वाईटाचा हेतु दुसऱ्याशीं व दुसऱ्याचा हेतु याच्याशीं जुळत असल्यानें जो प्राणी जन्मास येतो तो कांहीं तरी कोणच्या तरी हेतूनें येतो. व जीवाची यावत् आयुष्य परिचर्या हेतूच्या अनुरोधानेंच चालते हें सिद्ध होतें. आतां मनुष्यजन्माच्या हेतूचा जर ठिकाण आरंभीं अथवा शेवटीं लागतो तर, सहेतुक जन्मास आलेला मनुष्यप्राणी कोणीकडून व कसा आला असावा याचा थांग कां लागूं नये ?

मनुष्याची हालचाल साधारण देखील हेतूवांचून होत नाहीं हें मागें सिद्ध झालेंच आहे. लक्षांत आणावें. मनुष्य सज्ञान दशेंत आपली व्यवहारपरिचर्या आपल्या हेत्वनुरूप चालवितो, व कोणत्याही त्याच्या कृतीबद्दल दुसऱ्यानें कांहीं प्रश्न विचारल्यास त्यास आपला हेतु सांगतो व कारण दाखवितो. ह्म० अमुक कृत्य करण्यांत माझा हेतु अमुक आहे, व त्याचें अमुक कारण आहे, असें सांगतो. अज्ञान दशेंत ह्म० पोरपणांत पोरपणासारखेच हेतु अपरिपक्व जसे असतात तशीच कृतीही पोरकळ होते. पांच वर्षांचे आंत मुलास सामान्य भाषा बोलतां येत, तेव्हां तो आपले हेतु कशा तरी बोबड्या भाषेनें प्रदर्शित करतो, पण त्याचा यथार्थ बोध मातापितरादि पालकांस होतो. वर्ष दीड वर्षाचे बालकास भाषा फुटली नसते, तेव्हां तो रडून ओरडून व तोंड वांकडें करणें इ० संकेतानें आपला हेतु पालकांस दर्शवितो, व त्याची ओळख सहवासानें पालकांस पटून ते तदनुकूल त्याची इच्छापूर्ति करितात. सहा महिन्यांचे आंतील तान्ह्या बालकास संकेतादिकांचें मुळींच ज्ञान उत्पन्न झालें नसतें. अशा अवस्थेंत त्याचे हेतूही सूक्ष्म व अल्प असतात. त्याच्या प्रदर्शनाचें साधन ह्म० शांत राहणें व रडणें एवढेंच त्यास ठाऊक असतें. त्यानें त्याचे हेतु मातोश्रीस कळतात. रडूं लागलें ह्म० क्षुधा

अथवा पीडा होत आहे, व शांत असलें ह्म० सुखांत लेंकरूं आहे असें मातेस कळून ती तदनुकूल वागते. आतां विचार करून पहा कीं, जीव जन्मतांच ह्म० मातेच्या उदरांतून बाहेर आल्या घटकेपासून अरुणोदयाप्रमाणें **हेतूचा** उदय होऊं लागतो, तो कालानुरोधानें व साधनवृद्धीनें, चंद्राच्या कलांप्रमाणें वृद्धिंगत होत होत तारुण्यदशेंत, माध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें पूर्ण परिपक्क होतो, व पुढें उतारवयांत हेतूपूर्णतेचीं शरीरबलादि साहित्यें क्षीण होतात; तेव्हां असंतुष्टतेनें **हेतूंत** जोर येऊन ते **हेतू** प्रबल होतात. आणि मरणसमयीं शुद्धि राहिल्यास अत्यंत खेदानें हताश होऊन. ' काय करूं!! माझें मरण तर येऊन ठेपलें, तुम्हा सर्वत्रांची व माझी आतां हीच भेट! काय सांगूं! हीं अमुक अमुक कृत्यें महत्त्वाचीं अवश्य कर्तव्य होतीं, तो माझा **हेतु** पूर्ण होऊं पावला नाहीं. बाकी राहिला, पण आतां उपयोग काय! सर्व व्यर्थ आहे. असो. मी तर मरतों, पण तुमचे अंगीं सामर्थ्य असल्यास माझा बाकी राहिलेला **हेतु** तुह्मी तरी पूर्ण करा!! अशा प्रकारचे उद्गार आपले योग्यतेनुरूप आपल्या पुत्रादि स्वजनांपुढें काढून मनुष्य मरण पावतो. जे बेशुद्धींत मरतात, त्यांचे **हेतु** नष्ट होतात असें नाहीं, ते **हेतु** दुःखांत व मूर्छेत कुचंबले जातात. कदाचित् तितक्यांत कांहीं शुद्धि आल्यास त्रेधा उडून स्वजनांचे गळां पडून परस्पर रोदनारंभ होतो. आणि ज्यांस प्रालब्धवशात् कांहीं सत्संगतीनें, मरणकालीं **हेतु** ज्यांत गुंतून राहतो त्याकरितां पुन्हां जन्म घ्यावा लागतो. असें माहित असल्यास ते मुमुक्षू मरणकालीं शुद्धि राहिल्यास सर्व विषयांतून आपल्या **हेतूस** निवृत्त करण्याचा प्रयत्न करून स्वजनांचा निरोप घेतात. अशा धीर पुरुषांस, अहो! त्यांचा **हेतु** कशांतही गुंतला नाहीं बरें!! साधूच ते! असें मागून लोक ह्मणतात. इतर मरणारांपेक्षां हे मरणार फार उत्तम यांत शंका नाहीं, पण यांत खुबी इतकीच कीं, **हेतू** निवृत्त केले ह्म० सभोंवतीं बसलेल्या पुत्रदारादि विषयांत हेतू न गुंतूं देतां उद्दिष्ट व उपस्थित मार्गाकडे लाविले. अर्थात **हेतू** क्षय पावले नाहींत. जसें वाईट विषयापासून आपण आपली दृष्टि निवृत्त केली ह्मणून आपली दृष्टि नाहींशी झाली असें नाहीं, दुसऱ्या चांगल्या विषयाकडे वळली, इतकेंच. त-

सेंच हेतुनिवृत्ति हा हेतुक्षय नव्हे. जीवाचे जन्मक्षणापासून तों मरणक्षणापर्यंत हेतूचा पत्ता बरोबर अखंडित लागतो, व मरणकालीं शेष राहतो हें सिद्ध झालें.

जीवाचा जन्म होण्यापूर्वीं, नऊ महिने मातेचे उदरांत जीवाचें पोषण व शरीरावयववृद्धि मातृभुक्तान्नसारानें होत असते. गर्भअवयव व इंद्रियसंपन्न होऊन पूर्णावस्थेंत आला ह्म० मातेचे उदरांत चळवळ करतो, हें प्रत्यक्ष अनुभवास येतें. जीव गर्भस्थितींत इंद्रियावयवसंपन्न झाला ह्मणजे त्यास अंतःकरणही असलेंच पाहिजे. अंतःकरण असलें ह्म० त्यांत हेतूही असलाच पाहिजे. हेतु असला ह्म० त्या हेतूंत कांहीं तरी व कसल्या तरी विषयाचा संस्कार असला पाहिजे. कारण संस्कारावांचून हेतूचें स्वरूपच सिद्ध होऊं शकत नाहीं. कदाचित् गर्भस्थितींत हेतूचें अस्तित्वच न मानिलें तर काय हरकत आहे ? असें ह्मटल्यास, जन्म होण्याचे उत्तरक्षणीं हेतूचे स्वरूपाचा जो अंकूर दृष्टीं पडतो त्या अंकुराचें बीज पूर्वीं सिद्ध असल्यावांचून अंकूर पुढें येणें अशक्य आहे. अरुणोदयामागें जसा सूर्य गुप्त असतो व तो मागोमाग प्रगट होऊन वृद्धिंगत होत जातो, त्याप्रमाणें जीव जन्मास येतांच त्याच्या हेतूची सामान्य प्रभा जी दिसते त्या प्रभेपूर्वीं गर्भस्थितींत 'हेतूचें' गुप्तस्वरूप सूर्यबिंबाप्रमाणें असतें. तेंच पुढें मातृपोषणादि व्यवहारजन्य संस्कारानें वृद्धिंगत होत होत अखेर पूर्ण दशेस पोंचतें. गर्भदशेंत–जीवास 'हेतु' नाहीं, असें कधीं ह्मणतां येत नाहीं. ज्या 'हेतूचा' अंकूर जन्मतः दृष्टीं पडतो, त्या अंकुराचें 'बीज' गर्भस्थितींत सिद्ध असल्यावांचून पुढें अंकुर येणें शक्य नाहीं. त्या अर्थीं गर्भांतही जीवास 'हेतु' आहे, हें सिद्ध झालें.

यावर, 'गर्भांत हेतु आहे तर गर्भस्थितींतही जीवास स्वतःचें भान झालें पाहिजे, अशी शंका आल्यास त्याचें समाधान असें कीं, जीवाच्या भान–अभानावर 'हेतूची' अस्तित्वसिद्धि अवलंबून नाहीं. कारण सुषुप्त्यवस्थेंत जीवास स्वतःचें भान मुळींच नसतें, ह्मणून त्या अवस्थेंत 'हेतूची' असिद्धि होऊं शकते काय ? सुषुप्तींत 'हेतु' लीन असतो व त्या हेतूंत जाग येण्याच्या नित्य परिपाठाचा संस्कार असतो,

ह्मणूनच नित्य जाग येते. * पेक्षां जाग आली नसती. नित्यची सुषुप्ति अवस्था दोन चार तासांची जी असते त्याच सुषुप्त्यवस्थेचें मोठें स्वरूप गर्भावस्था व मरणावस्था आहे. यांत जरी स्वतःचें भान राहत नाहीं, तरी सुषुप्तीप्रमाणेंच हेतूचा व जीवाचा वियोग होत नाहीं. ' जीवाची व हेतूची ' अभेद्यग्रंथि आहे. जीवाचा सुषुप्त्यवस्थेंत प्रवेश होतांना, जीवाचे ' हेतूंत जे **संस्कार** प्रबल होतात, तेच संस्कार जागे होतांक्षणींच प्रथम उभे राहतात. ' उद्ईक पहाटेस चार वाजतां उठून प्रथम विश्वेश्वराचें दर्शन घेतलें पाहिजे, नाहींपेक्षां शिवरात्रीमुळें पुढें फार दाटी होऊन दर्शन मिळणार नाहीं, असा प्रबल **संस्कार** हेतूंत धारण करून निद्रा लागल्यास नेमके वेळीं पाहांटे डोळा आपोआप उघडून, ' दर्शनास जावयाचें ' हाच **संस्कार** प्रथम उदय पावेल, व तदनंतर इतर गोष्टी येतील. नित्य उठावयाचें आहे, हा नित्याचाच संस्कार आंगवळणीं असल्यानें कोणाच्याही लक्षांत येत नाहीं. पण अमुक ठिकाणीं जो निजतो, तो पुनः जागा होत नाहीं. अशा स्थलीं रात्रीचा काल व्यतीत करण्याचें कारण पडल्यास निद्रा येईल काय ? तर नाहीं. अर्थात कालच्या जागृतीचे संस्कार काल रात्रीं सुषुप्तींत लीन होते, त्यायोगानेंच आज जागृती आली. व आजचे संस्कार उद्यां जागवितील. अशी नित्य संस्कारपरंपरा चालू आहे. ' **संस्कार** ' ह्म० अनुभविलेल्या विषयाची ' **स्मृति** ' असें संस्काराचें स्वरूप मागें सिद्ध झालेंच आहे. तें नीट लक्षांत आणावें. गर्भस्थिति व मरणस्थिति ह्या तरी दीर्घ सुषुप्तीच आहेत. या तिन्ही अवस्थांत ' **हेतूचें** ' स्वरूप '**संस्कार**'-रूप असून लीन असतें. ज्या वेळीं ' हेतु ' लीन असतो त्या वेळीं तो केवळ संस्काररूप असतो, त्यापासून कोणी कार्य होत नसतें. आणि ' **हेतु** ' जागृत असतो तव्हां हेत्वनुरूप जागृतीचा व्यवहार घडतो. हेतूच्या लीनतेनें व जागृतपणानेंच सुषुप्ति अवस्था व जागृती अवस्थेचा भेद केला आहे. अनुभवजन्य संस्कार हेंच ' **हेतूचें** ' सु-

---

* या गोष्टीचा विचार अव्यक्तबोध प्रकरण ७ वें, कारणविचार; पुनर्जन्ममरणसिद्धीच्या स्थलीं फार मार्मिक रीतीनें केला आहे. तो वाचकांनीं या स्थलीं नीट लक्षांत आणावा, अशी सूचना करतों.

ख्य स्वरूप आहे. ( संस्काररहित ' हेतूचें ' काय स्वरूप आहे, हें येथें उघड करण्याचें स्थल नव्हे. )

जीवाच्या गर्भावस्थेंत जीवाचा **'हेतु'** लीनस्वरूप आहे. त्या लीनस्वरूपांत संस्काराचें अस्तित्व अगदीं सिद्ध आहे, असेंच ह्मटलें पाहिजे. आतां गर्भस्थ जीवाच्या ' हेतूंत ' जो ' संस्कार ' आहे, हा संस्कार कोठला मानावयाचा ? याचें समर्पक उत्तर वादीस देतां येईल काय ? कधीं देतां येणार तर नाहींच, पण हें स्थलच त्याचे लक्षांत आरूढ होईल कीं नाहीं ही शंकाच आहे. हा **' संस्कार '** जर याच जन्माचा मानावा तर, आजून जीव गर्भांतच असून त्याजला बाह्य सृष्टीचें वारेंही लागलें नाहीं, मग अनुभव संभवतो कसा, व त्या अनुभवाचा ' संस्कार ' ह्मणणें ह्म० बाप गर्भांत असतां नातु झाला असें ह्मणण्यासारखें आहे. अर्थांत तो **' संस्कार '** ' पूर्व जन्माचाच आहे; असें कबूल केल्यावांचून गत्यंतरच नाहीं. गर्भस्थ जीवाचा काय **' हेतु '** आहे तो सांगा ? असें कोणी ह्मणेल तर प्रत्यक्ष समोर बसलेल्या मनुष्याच्या मनांत काय हेतु आहे हें जर कोणास कळूं शकत नाहीं, तर गर्भस्थ जीवाचा हेतु समजण्याची एक सर्वज्ञ ईश्वरावांचून अन्य जीवाची काय प्राज्ञा आहे ! ! गर्भस्थ जीवाचा हेतु **सर्वांतर्यामी परमात्म्यास** कळतो. ह्मणूनच **परीक्षितीचें** रक्षण मातृगर्भाशयांत **अश्वत्थाम्या**च्या ब्रह्मास्त्रापासून भगवंतानें केलें आहे. जो **' हेतु '** धारण करून **जीव** गर्भांत येतो, तोच ' हेतु ' पुढें कालानुक्रमानें उदय पावून त्यांतील पूर्व संस्कारानुरूप सर्व आयुष्य जीवनव्यवहार चालू राहून शेवटीं मरणसमयीं सर्व **' हेतुसंस्कारासह '** बिऱ्हाड गुंडाळून अन्य देहांतरीं ह्म० जन्मांतरीं गमन करितो, असा अखंड अनुक्रम चालू आहे. यांत जीव जन्मास **' येतो '** असें जें प्रारंभीं ह्मटलें व त्यावर जे तीन प्रश्न आले, ह्म० ' जीव—जन्मास कोठून येतो, कसा येतो, आणि कां येतो, ' त्याचीं समर्पक उत्तरें ह्म० पूर्वजन्माच्या मरणानंतर इकडे येतो, पूर्व जन्मकृत त्रिविध संचित क्रियामाण प्रारब्ध कर्मांचे **संस्कार** संग्रह बरोबर घेऊन येतो आणि कृतकर्म फलाचे उपभोगार्थ पुन्हां जन्मास येतो, अशीं आहेत.

## दुसरा पक्ष.

या उत्तरावर, ' वादी ' असें ह्मणेल कीं, ' जीव जन्मास येतो ' हें माझें ह्मणणें, तुह्मीं जीं उत्तरें दिलीं, या अर्थाचें नाहीं. ' जीव जन्मास येतो, ' या वाक्यांत—' येतो ' ह्या शब्दास धरून तुह्मीं जी व्याख्या केली, ही व्याख्या मला मान्य नसून, ' जीव जन्मास येतो ' ह्म०—' जीव अज्जी नवा उत्पन्न होतो ' असें माझें मत आहे. कारण देह, इंद्रियें इत्यादि सर्वांचीं उत्पत्ति स्थूल देहाबरोबरच होते, आणि स्थूल देहोत्पत्तीस मूलकारण—मातृ ' रज ' आणि पितृ- ' रेत ' आहे. या उभयसंयोगानें गर्भाशयांत गर्भधारणा होते. व त्या बिंदूचीच मातृभुक्त अन्नरसानें वृद्धि होऊन त्यासच अवयवादि इंद्रियें सर्व नवीं उत्पन्न होऊन त्याचा ' स्थूलदेह ' तयार होतो. ज्याप्रमाणें इंद्रियादि शरीरोत्पत्ति गर्भाशयांत सहज व स्वाभाविक होते, त्याचप्रमाणें शरीरेंद्रियाचा चालक चैतन्यगुणी ह्मणविणारा **जीवपणा**ही त्यांचे बरोबर नवाच उत्पन्न होतो. त्याचीं देहेंद्रियें नवीं, अंत:करण नवें, आणि ' हेतु ' जर कांहीं पदार्थ असलाच तर तोही नवाच, ह्म० कोऱ्या-कागदाप्रमाणें स्वच्छ असला पाहिजे. जन्म झाल्यानंतर त्या ' हेतूवर ' संस्कार पुढें नवे येतील व जातील. पूर्व जन्मींचेच ' हेतु ' व ' **संस्कार** ' मानण्याची कांहीं जरूर नाहीं. जें आहे तें सर्व नवें आणि मरणकालीं सर्व समाप्त होतें. अर्थात् पुनर्जन्मास कांहीं शेष उरत नाहीं. असा माझा आशय—' जीव जन्मास येतो ' या ह्मणण्याचा आहे. याचें उत्तर असें कीं,

वादीनें, ' जीव उत्पन्न होतो ' असें ह्मटलें, यांत, ' **जीव** ' चैतन्यरूप आहे कीं जडरूप आहे ? ' जीवास ' जडरूप मानीत असल्यास सर्वच वाद आटोपला ! कारण, देह जड, इंद्रियें इ० जड, आणि जीवही जडच. मग जिवंत माणसें व मेलेलीं प्रेतें, भिंतीवरचीं चित्रें व मृत्तिकाकाष्ठादिकांचीं चित्रें, सर्वच एकभाव झालीं असें ह्मणावें लागेल. ' जडचैतन्याच्या ' भेदाचें कारणच उरलें नाहीं. आणि ' जड ' मानून त्याचे आंगीं कार्यक्षमता मानल्यास, त्याहूनही जास्त घोंटाळा होणार आहे.* जडानें जडाचें नियमन, व

* कदाचित् येथें कोणास असें वाटेल कीं,—रेला, गिरण्या तारायंत्रादिक जड

जडानेंच जड विषयाचा भोग असंभवनीय आहे. ह्मणून 'जीवास' जडरूप मानितां येत नाहीं. 'चैतन्य' रूप मानावा लागेल.

आतां, चैतन्यरूप 'जीव' 'उत्पन्न होतो, असें मानिल्यास, चैतन्याची उत्पत्ति कशापासून व कशी होते? हा प्रश्न उभा राहतो. शरीरांत जितके पदार्थ आहेत, त्यांत कोणता पदार्थ 'जीव'-रूप आहे हें बरोबर सांगतां येईल का? मागें, जीवाचे देहत्रय, पंचकोश इ० सविस्तर विवेचन करून दाखविलें आहे. एकंदर स्थूल-देहासहवर्तमान एकोणीस त्रिपुटिद्वारा अवस्थात्रयांत व्यापार करणारा 'जीव' देहांत आहे खरा, पण या वाद्यास, या पदार्थांपैकीं अमुकच पदार्थ जीव आहे असें सिद्ध करून दाखवितां येणार नाहीं, आणि या सर्वांचा नियामक चैतन्यरूप 'जीव' देहांत वेगळा कोण आहे, हें तर ओळखतांच येणें दुर्धर आहे, मग सिद्ध करून दाखविण्याची गोष्ट लांब आहे. एक तर जडापासून चैतन्याची उत्पत्तीच संभवत नाहीं.* 'शुक्रशोणित संयोगानें स्त्रीचे गर्भाशयांत 'गर्भ' धारण होऊन मातृभुक्त अन्नरसानें त्याची प्रथम दिवसापासून वृद्धि होऊं लागते. क्रमेंकरून रुधिर, मांस, अस्थी, मज्जा, मेद, त्वचा, रोम, धातू इ० स्थूलदेहांत असणारे सर्व पदार्थ, व हस्तपादादि अवयवानें 'गर्भ' पूर्ण तयार होतो. ( किती दिवसांनीं कोणकोणते पदार्थ उत्पन्न होतात याचा प्रकार पुढें वर्णन होणार आहे. ) या तयारींत, गर्भाशयांत, गर्भाचे शरीरांतील पदार्थ उत्पन्न व वृद्धि होण्याच्या कालक्रमांत, कोणत्या दिवशीं कोणती धातू अथवा पदार्थ असा उत्पन्न होतो कीं, ज्याला 'जीव' असें ह्मणतां येईल. व तोच पदार्थ 'जीव' मरतांक्षणीं शरीरांतून नाहींसा होऊन प्रेताचें विदारण करून पाहिलें असतांही सांपडत नाहीं. रुधिर,

असतां कार्यक्षम आहेत. हजारों माणसांनीं जीं कामें होणारीं नाहींत, तीं कामें एकटें 'यंत्र' करतें? याचें समाधान इतकेंच कीं, यंत्रें निर्माण करणें, व त्यांजकडून कामें घेणें ही क्रिया—जड यंत्रेंच करितात, कीं कोणी चैतन्यरूपी मनुष्य असतो? याचा विचार पहा.

* याबद्दल 'ईश्वर' प्रकरणांत फार विस्तारानें व सूक्ष्म रीतीनें विचार झाला आहे. ती गोष्ट वाचकांचे ध्यानांत नसल्यास पुन्हां तेथें पहावी.

धातू इ० शरीरांतील जे अत्यंत जीवनव्यापारसमर्थ पदार्थ आहेत यांसच जर 'जीव' मानलें तर शस्त्रप्रहारानें एकदम मृत झालेल्या मनुष्याचे शरीरांत रुधिर, धातू इ० सर्व पदार्थ ठिकचे ठिकाणीं सांपडतात. त्या अर्थी शरीरांतून गेलला जीव कोण? बुद्धींद्रियादिकांस 'जीव' ह्मटल्यास कोणतें इंद्रिय जीव आहे? कारण, पाहिजे तें इंद्रिय अथवा बुद्धि नष्ट झालला प्राणी जिवंत असतो, आणि आसन्नमरणकालीं तर त्रिदोप होऊन सर्वच इंद्रियें बुद्ध्यादि नष्ट झालीं असतात तरी 'जीव' जिवंत असतो. आतां उरला केवळ 'प्राणवायु' जो गेल्यानें 'जीव' गेला असें वाटतें. त्या प्राणवायूसच 'जीव' मानून देहेंद्रियादिकांचें चालकत्व त्याचेकडे मानिल्यास 'प्राण' हे केवळ वायुरूप जड आहेत, यांचे साहाय्यानें शरीरेंद्रियादिकांचें चलनवलन मात्र होतें, 'प्राण' वायूंत ज्ञानशक्ति मुळींच नाहीं. जर 'प्राणांत' ज्ञानशक्ति असती तर सुषुप्तींत 'प्राणाची' श्वासोच्छ्वासक्रिया चालू असल्यावर, निद्रिस्त मनुष्यास बाह्य सृष्टिज्ञान झालें असतें. जाग्रदवस्थेंत ज्ञानेंद्रियादिकांनीं जे जे विषय ग्रहण होतात त्यांतून एका विषयाचें ज्ञान सुद्धां 'प्राणास' होत नाहीं? अशा निव्वळ जड प्राणास 'जीव' मानतां येत नाहीं. असा, शरीरांतील सर्व पदार्थांचा विचार केल्यावर 'चैतन्यज्ञानरूप' असा जीव कोणता पदार्थ आहे? तो कोणत्या कालीं कोणत्या पदार्थसंयोगानें व कसा उत्पन्न होतो? हें कोणासच सिद्ध करून दाखवितां येणें अशक्य आहे. जीवाची उत्पत्ति सिद्ध होणें तर दुर्धरच आहे, पण शरीरांत जीं 'ज्ञानेंद्रियें, ह्मणवितात, तीं कशीं व कोणत्या क्षणीं उत्पन्न होतात, आणि त्यांचे अंगीं विषयज्ञान 'शक्ति' आहे ती कशी येते, हें देखील समजणें व सिद्ध करणें कठिण आहे. यावत् विचार करणारांची व शोधकांची स्थूल देहांतील दृश्यपदार्थांपर्यंतच मजल पोंहोचते; पुढें कांहीं गति चालत नाहीं. तेव्हां कसे तरी तर्क लढवून, कांहीं तरी पोकळ पदार्थास 'जीव' असें मानून स्वस्थ बसतात. अशानें जीवाचा थांग लागला असें होत नाहीं.

'जीवाचा' स्थूलदेह ह्म० देहांतर्गत रुधिर मांसादिक धातू, ह-

स्तपादादिक अवयव आणि ज्ञानेंद्रियांचे गोलक इतकेच काय ते पदार्थ—मातृपितृ—शुक्रशोणितापासून गर्भाशयांत अज्जी नवे उत्पन्न होतात, वृद्धि पावतात आणि नष्ट होतात. या स्थूल पदार्थांपर्यंतच सर्वांची गति चालते. पण या स्थूल सांपळ्यांत, 'लिंगशरीरानें' येऊन राहणाऱ्या व जाणाऱ्या जीवाचा पत्ता लागला पाहिजे; तो लागत नाहीं. वादीच्या मतानें उत्पन्न होणारे यावत् जीव अज्जी नवे आहेत, ह्म० त्यांचीं इंद्रियें, अंतःकरण, हेतू इ० सर्व अगदीं कोऱ्या करकरीत सामानानें 'जीव' अवतरणार [ह्म० प्रत्येक जातीचे जीवाच्या स्वतंत्र गिरण्या तयार होऊन, त्यांतूनच जीवाची टांकसाळ पडणार. अर्थात सर्व जीव आपल्या जातींत एकसारख्या क्रमानें, मापानें व प्रमाणानें अगदीं नंबरीं उतरले पाहिजेत.] मग एका मनुष्यास प्रति दुसऱ्या वर्षीं संतती व्हावी, व दुसऱ्यानें लग्नाच्या चार चार आवृत्त्या करूनही संतती होऊं नये, ( यांत कांहीं क्रिया चुकत नसेलना ? ) झालेल्या संततींत एक अंध, तर दुसरा बधिर, मूक, पंगू इ० अंगव्यंगें कां व्हावीं ? एका जीवांनीं जन्मतःच सुखोपचारांत रहावें व दुसऱ्यानें मलमूत्रांत, चिंध्यांत आक्रोशत कां बरें पडावें ? सृष्टिविहारार्थ दोघेही अगदीं कोरे करकरीत प्रथमच आलेना ! एकानें आजन्म कष्ट करून मरावें, व दुसऱ्यानें फुकट मजा मारावी, ती कां बरें ? (इ०गोष्टींचा विचार नुकताच प्रारब्धप्रयत्नवादांत झालाच आहे. तो वाचकांनीं नीट ध्यानांत आणावा. ) वाद्याच्या मताप्रमाणें अज्जी नवी उत्पत्ति केवळ स्थूल देहाची मात्र होते, हा स्थूलदेहच जन्मतो, व स्थूलच मरतो. यावांचून अन्य नवें कांहीं उत्पन्न झालेलें सिद्ध होत नाहीं. सिद्धांत पक्षांत देहासच जन्ममरण असून जीव नित्य आहे. त्यास जन्ममरण नाहीं. देहाच्या जन्ममरणद्वारा जीव वेषांतरें करीत असतो असें मानिलें आहे. आणि जन्मांतरास मूळ कारण 'पूर्व कर्मसंस्कारयुक्त हेतु' हा आहे. ह्या 'हेतूस' वादी—'पूर्व संस्कारयुक्त' न मानितां कवळ कोऱ्या कागदाप्रमाणें नवा मानितो. व जन्मानंतर पुढें होणारे अनुभवाचे संस्कार त्या 'हेतू'वर आरूढ होतात, तशी त्या 'जीवाची' जीवन-परिचर्या चालते असें ह्मणतो. त्या 'हेतू' विषयीं आतां विचार करूं.

'वादी' 'हेतूस' अगदीं कोऱ्या कागदाप्रमाणें मानून त्यावर पुढें होणारे 'संस्कार' मात्र मानितो. मागील 'संस्कारास' मानीत नाहीं. या ह्मणण्यावरून—'हेतू' व हेतूंत आरूढ होणारे अथवा असणारे **संस्कार** याचें यथार्थज्ञानच वाद्यास नाहीं. या विषयांत तो अगदीं अज्ञ आहे, असें ह्मणणें प्राप्त होतें. कारण संस्कारावांचून 'हेतूचें' स्वरूपच सिद्ध होत नाहीं. अनुभविलेल्या विषयाची जी 'स्मृति' हाच **संस्कार** होय. आणि या संस्काराचें जें सदैव 'अस्तित्व' हेंच 'हेतूचें' मुख्य स्वरूप आहे. कोऱ्या कागदाप्रमाणें 'हेतूचें' स्वरूप संस्काररहित असणेंच शक्य नाहीं. आणि 'हेतूंत' संस्कार नसल्यास जीवाची विषयांत प्रवृत्तीच संभवत नाहीं. जो विषय कधींही अनुभविला नाहीं व कधीं कानानेंही ऐकिला नाहीं, अशा विषयाची इच्छाच संभवत नाहीं, आणि इच्छेवांचून प्रवृत्तीचा त्रिकालांत संभव नाहीं. बालक जन्मतांच, त्याचे मुखांत दुग्धप्राशनार्थ माता स्तन देते; त्यांतून 'दूध चोखून प्यावें' हें ज्ञात्यास कोण शिकवितें?* कदाचित् 'तोंडांत घालणें' हेंच शिक्षणरूप होत असल्यास पोळीचा तुकडा 'तोंडांत घातल्यास' तेंही खाण्याचें ज्ञान झालें पाहिजे? कदाचित् वादी असें ह्मणेल कीं, त्या बालकास फक्त दुग्धप्राशनापुरतेंच स्वाभाविक ज्ञान आहे. तर 'आहे' या शब्दाचा प्रयोग वाद्यानें करतां कामा नये! कारण जन्म होण्याच्या पूर्वक्षणपावेतों जीवाचें सर्व सामान अगदीं कोरें नवें आहे. ज्ञानाचे शिक्षणाचा 'संस्कार' जन्माचे उत्तरक्षणांत आहे. एकवार त्याला दुग्धप्राशनाचा धडा पाठ झाल्यावर मग तो रोज दूध पिऊं लागेल. पण अगदीं प्रथमच दूध कसें ओढावें, हें शिकविण्यास कोणी अति चतुर युक्तिमान् लागला काय? बरें स्वाभाविक ज्ञान ह्मणावें, तर पोळी कां खातां येऊं नये? तोंडास लावण्यापुरतें शिक्षण, स्तनाचें व पोळीचें सारखेंच होतें. मग हा फरक कां पडतो? दृष्टश्रुतानुभवानेंच **इच्छा** संभवते व त्याप्रमाणें प्रवृत्ति होते. ही गोष्ट सर्वांस सारखी कबूल आहे. बालकास प्रथमच दुग्धप्राशनास प्रवृत्त होण्यास पूर्व

* प्रथम तीन दिवसपर्यंत मातेचें दूध विकारी असल्यानें बालकास बोळ्यानें दूध जरी पाजतात, तरी बोळ्याची व स्तनाची चोषणक्रिया सारखीच आहे.

प्राशनाचा अनुभव नाहीं. व दुग्ध पिणें हितावह आहे असें त्यानें ऐकण्याचाही संभव नाहीं कीं, ज्या ऐकण्यानें तें दुग्धप्राशनांत प्रवृत्त झालें? दुग्धप्राशनाच्या इच्छेवांचून प्राशनांत प्रवृत्ति संभवत नाहीं, आणि अनुभूत विषयाच्या स्मरणावांचून 'इच्छा' संभवत नाहीं. इच्छेंत अनुभूत विषयाचें 'स्मरण' हाच **संस्कार** होय. हा संस्कारच 'हेतूंत लीन राहतो व विषयप्रवृत्त्यर्थ उदय पावतो. त्याचे उदयानेंच 'बालक' स्तनपानांत प्रवृत्त होतें. ह्मणून जीवाचे हेतूस कोऱ्या कागदासारखा मानितां येत नाहीं. त्यांत प्रवृत्ति करणारा जो हेतु आहे यास 'पूर्वजन्माचा' मानिल्यावांचून गत्यंतर नाहीं.

यावर वादी असें ह्मणतील कीं, हा पूर्व संस्कार तुह्मी आमच्यावर बळेंच लादीत आहां, आह्मी यास पूर्वानुभव संस्कार मानित नाहीं, हें जीवाचें केवळ स्वाभाविक ज्ञान आहे. जर पूर्व संस्कारच आहे तर अनेक संस्कार पूर्वींचे भरले आहेत ते सर्वच उदयास आले पाहिजेत, केवळ दुग्धपानाचाच तेवढा 'संस्कार' कां उदय पावतो? करितां आह्मी पूर्व संस्कार मानीत नाहीं. 'जीव' जन्मल्यानंतर त्यास जसा अनुभव होत जाईल तसे अनुभव 'हेतूंत संस्काररूपानें पुढें आरूढ होत जातील. याचें उत्तर असें कीं, सर्व संस्कार उदय कां पावत नाहींत, व पावल्यास त्यापासून काय हितानहित आहे, हें सर्व प्रतिपादन पुढें होणार आहे. तूर्त तर संस्काराचा तंतू पुनर्जन्ममालिकेंत ओंवला आहे कीं नाहीं, ही गोष्ट सिद्ध करणें आहे. ही गोष्ट वाद्याचे गळीं बसली ह्म० पुढील सर्व समजूत बरोबर करतां येईल.*

बालकाच्या दुग्धपानाच्या प्रथम प्रवृत्तींत 'वादी' पूर्व संस्कार मानीत नाहीं. असो. जन्मलेलें मूल, कांहीं दिवस ह्म० एक दोन महिन्यांचे आंत इतकें मंदप्रज्ञ असतें कीं, केवळ डोळे उघडझांक करणें, हातपाय हलवणें, दूध पिणें इ० क्रिया स्वाभाविक करतें. आपण त्यास हातावर खेळवून त्याशीं बोलूं लागतों, हंसविण्याचा प्रयत्न करूं

* जन्मक्षणीं पूर्व संस्कार सर्व उदय पावले, अथवा प्रत्येक जीवास त्रिकाल ज्ञान उपस्थित राहिल्यास कसा अनर्थ होईल, याचें वर्णन प्रकरणाच्या शेवटीं मृत्यूच्या वर्णनांत येणार आहे, तें येथें जुळवून पहावें.

लागतों; पण त्याचा त्यास यत्किंचित् बोध होत नसून, शिवाय पाहण्याच्या तें मूल कांहीं अधिक मनोविकारयुक्त दिसत नाहीं. कारण त्यावेळीं त्याजला बाह्य संकेत ग्रहण करण्याची शक्ति नसते. तेंच पुढें कालेंकरून आनंदानें हसूं लागतें. ही गोष्ट सर्वानुभूत आहे. आतां सूक्ष्म विचारानें अनुभव पाहण्याची मौज आहे कीं, पांच सहा दिवसांचें जन्मलेलें मूल सुपांत झोंप घेत निजलें असतां चिमुकल्या तोंडानें हंसलेलें दृष्टीस पडतें. केवढें आश्चर्य आहे कीं, जें मूल जागेपणीं 'हंसत' नाहीं तें निद्रेंत 'हंसतें' याचें कारण काय? तर निद्रेंत 'मूल' कांहीं तरी आनंदप्रद 'स्वप्न' पाहतें व त्यामुळें तें हंसतें. आतां, येथें आनंददायक व हास्यप्रद स्वप्नाचा देखावा जो मुलास दिसतो, तो या जन्मींचा कीं पूर्व जन्मींचा? या जन्मींचा ह्मणावा तर जन्मून अवघे पांच दिवस झाले, अंधारकोठडीवांचून दिव्यावांचून, व आईचे मुखावांचून अन्य कांहीं दिसलें नाहीं, व एवढ्याच अनुभवानें त्यानें 'हंसावें' तर जागेपणीं स्वतः हंसत नाहीं. व हंसविल्यानेंही हंसत नाहीं. वादीच्या ह्मणण्याप्रमाणें कोऱ्या 'हेतू' वर पांच दिवसांच्या अनुभवाचाच संस्कार झाला आहे. त्यांत त्यानें हंसण्याचा व भिऊन दचकण्याचा अनुभव जागेपणीं केला नाहीं. आणि स्वप्नांत हंसत असलेलें व भ्यालेलें पांच दिवसांचें मूल प्रत्यक्ष दिसत आहे. येथें वादीचा एकही तर्क सयुक्तिक होणार नाहीं. केवळ स्वप्न देखाव्यास आणि आनंददर्शक 'हांस्यास' 'पूर्वजन्मसंस्कारच' मानावा लागेल. त्याशिवाय गतीच नाहीं. आणि ह्मणूनच 'जन्मांतरसंस्कार' पुनर्जन्मांत उदय पावतात, हा श्रुतिसिद्धांत आहे.*

---

* मजला सहा वर्षांपूर्वीं कन्या झाली, त्यावेळीं सूतिकागृहांत षष्ठीपूजनाकरितां मला थोडा वेळ बसावें लागलें. त्यावेळीं मीं वर लिहिलेला चमत्कार पाहिला आणि आश्चर्यानें न राहविल्यामुळें मीं पुढें आपल्या चुलतीस त्याबद्दल प्रश्न केला. त्यांनीं 'तान्ह्या मुलास षष्ठी देवी स्वप्नांत खेळविते,' असें बायकांच्या समजुतीप्रमाणें उत्तर दिलें, पण त्यानें माझें समाधान झालें नव्हतें, ते आज झालें. वाचकांनाही हा प्रसंग नेहमीं आहे. त्यांनीं स्वतः पाहिल्यास अथवा घरांतील वडील बायांस विचारल्यास सहज कळणार आहे, ह्मणून त्यांनीं तसें करण्याची मी शिफारस करितों.

# योगशास्त्रानें व ज्योतिषानें पुनर्जन्मसिद्धि.

योगबलानें भूत, भविष्य, वर्तमान असें त्रिकालज्ञान होत असतें, त्यांत जातिस्मर होण्याची क्रिया साध्य केल्यास स्वतः च व इतरांचेही मागले व पुढले जन्म सहज सांगतां येतात. परकायाप्रवेशक्रिया साधल्यानें, मनुष्य, पशु पक्षी इ० पाहिजे त्या शरीरांत ह्म० प्रेतांत प्रवेश करून व्यवहार करितां येतो. जर ह्या स्थूलदेहांत येणारा व जाणारा लिंगशरीरात्मक **जीव**-देहांहून पृथक् नसता तर, जातिस्मर व परकायाप्रवेशादिक कधींच झाले नसते. ही सिद्धि प्रस्तूतच्या काळांत सिद्ध होणें अतिदुर्धर आहे.*

ज्योतिःशास्त्रानेंही पुनर्जन्ममरणाची सिद्धि होते, पण इतकें सूक्ष्म गणीत करण्याची बहुधा आवश्यकता नसते व कोणास त्याची हौसही नाहीं. **भृगुसंहितेंत** या गोष्टीचा पूर्ण विचार केला आहे असें समजतें. मनुष्य जन्मतांच त्याची जन्मकुंडली शुद्ध वेळ धरून केली जाते, त्यावरून पुढें व्यवहारपरिचर्येंत ग्रहांचीं इष्टानिष्ट फलें बरोबर मिळत जातात. कांहीं ज्योतिषी असे उत्तम विद्वान असतात कीं, कोणी हौशी श्रीमानांनीं त्यांस आश्रय देऊन त्यांचें विद्यानैपुण्य पाहूं लागल्यास, रोजची दिनचर्या देखील ते मिळवून देतात; मग मोठीं बरीं वाईट फलें मिळण्यांत आश्चर्य काय ? जन्मापासून ग्रहांच्या महादशा व अंतर्दशा जशा चालू होतात, तदनुरूप इष्टानिष्ट फलांचा परिणाम मनुष्यप्राण्यावर घडत जातो. ज्वरादिक रोग पीडा होणें, आंगावर फोड अथवा घाव होणें, आणि कांहीं अपघातांनीं, हस्तपादादि अवयव भग्न होणें, डोळे, कान, नाक इ० ज्ञानेंद्रियें नष्ट होणें, हीं शारीरिक दुःखें आहेत. स्त्री पुत्र धनाच्या हानीपासून, कांहीं येणाऱ्या अरिष्टसूचनेपासून अथवा कांहीं कार्यार्थ अत्यंत चिंता लागणें, हीं मानसिक दुःखें आहेत. आणि क्वचित् भयंकर दुःखांनीं, घोर व नीच कर्मांनीं, अथवा पैशाचिक बाधा इ० अनेक

* याच तत्त्वाचा कांहीं भाग रूपांतरानें नव्या शोधकांचे बुद्धींत प्रगट झाला आहे, त्यास मिसमेरिझ्म व स्पिरीचुऑलिझ्म असें ह्मणतात.

कारणांनीं मनुष्याचीं बुद्ध्यादि अंत:करणें नष्ट होऊन तो विक्षिप्त सुद्धां होतो. हे सर्व अनिष्ट परिणाम मनुष्यावर ज्या क्षणीं घडतत,- त्या क्षणीं त्याचें चालू वर्ष, मास, दिनकुंडलींत पाहिल्यास अनिष्टा कारक फल देणारा **ग्रह** त्या स्थानीं आलेला असतो. याचप्रमाणें सुख प्राप्त होण्याचे वेळीं **ग्रह** सुखस्थानीं येतात. ग्रहयोगावांचून सुखदु:खात्मक फलें प्राप्त होत नाहींत. सरते शेवटीं ग्रह मारकेश दर्शेत, येतांच मनुष्य मरण पावतो. अशी फलज्योतिषांची सिद्धांत-रीति आहे.

आतां यांत सूक्ष्म विचार केला पाहिजे कीं, जीवास, **स्थूलदेह** व **सूक्ष्मदेह** अथवा **लिंगदेह** असे दोन आहेत. मरणकालीं स्थूल-देह पतन पावून त्यांतून लिंगदेहानें जीव बाहेर जातो. ज्याप्रमाणें जीवास दोन सूक्ष्मस्थूल अशीं शरीरें झालीं, त्याप्रमाणें ग्रहाच्या इ-ष्टानिष्ट फलांतही द्विविध भेद झाला. स्थूर शरीरावर घडणारें स्थूल-फल, व सूक्ष्म शरीरावर घडणारें सूक्ष्म फल झालें. ग्रहाचे अनिष्टतेनें जसे हस्तपादादि अवयव भग्न होतात, तसाच स्थूलदेहही मारकेश ग्रहानें नष्ट होतो. त्यामुळें जीवाचे स्थूलदेहाशीं ग्रहाचा संबंध सु-टतो. पण जीव जिवंत होता तेव्हां त्याच्या मानसिक सुखदु:खांस कारण होणारा अंत:करणाशीं व ज्ञानेंद्रियांशीं जो ग्रहांचा संबंध होता, तो संबंध जर जीवाचा **लिंगदेह** नाहींसा झाला असता तर सुटला असता. पण मरणानें जीवाचा केवळ स्थूलदेह मात्र नष्ट होऊन लिंगदेह जीवाबरोबर कायम राहतो. जीवाचा लिंगदेह का-यम आहे तर ग्रहाशींही संबंध कायम आहेच. कारण, जीवाचे जि-वंतपणीं ज्ञानेंद्रिय अथवा बुद्धि नष्ट करणें, हें जीवाच्या **स्थूलदेहास** सोडून **लिंग**देहावर ग्रहांनीं आपला परिणाम घडविणें होय. तसेंच मरण-समयीं ग्रहांनीं जीवाचा स्थूल **देह** जरी सोडविला तरी **लिंग**देह सोडवूं शकले नाहींत. अर्थांत लिंगदेहाचा व ग्रहांचा संबंध अबाधि-त कायम राहतो. जीवाच्या लिंगदेहाचा व ग्रहाचा संबंध जर पूर्ण कायम राहतो तर, मरणानंतर लिंगदेहधारी **जीव** कोणत्या शरी-रांत गेला अथवा पुण्यपापांच्या फलभोगार्थ ऊर्ध्वलोकीं गेला, हें फलज्योतिषानें कळलेंच पाहिजे, व कळणें शक्य आहे. पण इत-

का दीर्घ प्रयत्न करण्याकडे प्रवृत्त कोण होणार ? ! असो.

**जीव** जन्मतांच जी त्याची जन्मकुंडली तयार होते, त्यावरून पूर्वीची गर्भकुंडलीही तयार होत असते. यावरून हा गर्भ कोणत्या दिवशीं कोणत्या लग्नावर व कोणापासून धारण झाला, हें फार सूक्ष्म विचारानें कळतें. जन्मांध, बधिर इ० जीं अंगव्यंगें जन्मतःच दृष्टीं पडतात व हीं अंगें गर्भांत ज्या ज्या महिन्यांत तयार होतात त्या त्या महिन्यांत कोणता **ग्रह** अनिष्ट होता व त्याचें कसें फल झालें, याचा पत्ता गर्भधारणकुंडलीपासून गणीत चालविल्यास बरोबर कळणें शक्य आहे. गर्भांत जीवाचा केवळ **स्थूल** देहच नवा तयार होत असतो व **लिंग**देहासकट जीव त्यांत येतो. आतां ज्याप्रमाणें मरणानंतर लिंगदेहधारी जीव आपल्या ग्रहांसहवर्तमान बाहेर जातो, त्याचप्रमाणें लिंगदेहांनीं ग्रहांसहवर्तमान गर्भांत येतो. त्याच ग्रहांचें गणीत गर्भकुंडलीपासून पुढें चालू होतें, तें मारकेशाच्या दशेपर्यंत स्थूल व सूक्ष्म देहास धरून करितां येतें. पुढें हा स्थूलदेह सुटला ह्म० पुन्हां दुसरा स्थूलदेह येईपर्यंत सूक्ष्मदेहधारी जीवाचा व ग्रहांचा संबंध अखंड अनादि कायम आहे. **जीव**पणा ज्या दिवशीं सुटेल त्या दिवशींच स्थूलदेह व सूक्ष्मदेह नाहींसा होणार आहे. व हे दोन्ही देह जेव्हां **सद्गुरुकृपें** सुटतील तेव्हां सर्व ग्रह आपापले गृहीं जातील. तोंवर सर्व परस्परांचा जन्ममरणमालिकेंत अनादि संबंध आहे. व तो पूर्ण ज्योतिषविद्याज्ञानानें कळणें शक्य आहे.

---

[ " वैद्यकी रीतीनें व डाक्टरी विचारानें जीवाच्या उत्पत्तीची माहिती मिळविण्याकरितां मीं एक दोन प्रसिद्ध वैद्य व डाक्टरांची मुदाम गांठ घेऊन या विषयाचे संबंधांत माझ्या समजुतीप्रमाणें मीं बरींच प्रश्नोत्तरें केलीं, व कांहीं नवी माहिती मिळविली. पण माझ्या मूळ उद्देशाचें कोणाच्यानेंही बरोबर समाधान झालें नाहीं. वैद्यांनीं तर **जीव** हा ईश्वरी कला आहे. याचे उत्पत्तीचा व स्वरूपाचा थांग कोणासही लागूं शकत नाहीं. ही गोष्ट अतर्क्य आहे. जड शरीरोत्पत्ति व शरीरांतर्गत धातू इत्यादिकांच्या उत्पत्तिवृद्धि-

क्षयांचे विचार व तज्जन्यरोगादि विकारावर औषधींचे विचार वैद्यशास्त्रांत केले आहेत. व त्याच्या परिज्ञानाचा व उपचाराचा मार्ग नाडीपरीक्षा, नेत्रादि अंगपरीक्षा व मलमूत्रपरीक्षा इ० अनेक मार्गांनीं अनेक आचार्यांनीं केले आहेत. सारांश, एकंदर वैद्यकी शास्त्रार्थांत देहस्थ जड विकारांच्या पलीकडे चैतन्यांशांत कोणाची गति चालत नाहीं. **डाक्टर** लोकांचीं मतें शरीरादि अवयवरचना, शरीरांतर्गत सर्व धातू व रोगादि विकार यासंबंधीं बहुतांशीं वैद्यमताशीं जुळतीं आहेत. औषधीचिकित्सेंत व नाडीपरिज्ञानांत मात्र त्यांचीं आपलीं मतें बरोबर जुळत नाहींत. **चैतन्यांशांत** यांची उडी मेंदू, ज्ञानतंतू व जीवबिंदूपर्यंत पोंचते. मेंदूस व ज्ञानतंतूस इजा पोंचल्यानें जीव मरतो. ज्ञानशक्ति ही मेंदूंत असते. इ० गोष्टी बऱ्याच सयुक्तिक ऐकिल्या. पण मेंदू, ज्ञानतंतू व जीवबिंदू हे शरीरांतील धातूप्रमाणेंच जड पदार्थ असून जीव मेल्यानंतरही मेंदू, ज्ञानतंतू व जीवबिंदूचीं घटक द्रव्यें प्रेतशरीरांत कायम असतात. मग जिवंतपणीं जी त्यांत ज्ञानशक्ति असते ही कशी उत्पन्न होते व जाते कशी ? ज्ञानतंतुद्वारा ज्ञान होतें ह्मणून तंतूच ज्ञानस्वरूप होऊं शकत नाहींत. ते ज्ञानसाधन आहेत. या तंतुद्वारा ज्यास ज्ञान पोंचतें व जो प्रेरणा करतो, त्याचें स्वरूप काय आहे ? या प्रश्नाचें उत्तर डाक्टरास बरोबर देतां येत नाहीं. अथवा माझी समजूत बरोबर नसेल असेंही ह्मटल्यास हरकत नाहीं. कारण मी त्या विषयांत अगदीं अज्ञ आहें.

*माझ्या मतें, नवीन शोधकांत व तत्त्ववेत्त्यांत **विद्युन्मानस** शास्त्रकारांनीं फार सूक्ष्म विचार करून ते बरेच आंत शिरले आहेत. त्यांनीं शरीरांतील राजा '**मन**' आहे असें मानून शरीरांत पसरलेल्या अति सूक्ष्मतर इच्छित व अनिच्छित ज्ञानतंतूंतून '**विद्युत्**' चा संचार होत असतो. व त्या विद्युत्च्या ज्ञानशक्तिद्वारा मनास ज्ञान होतें. '**मन**' हा सर्वांचा चालक आहे. याचें वसतिस्थान **मेंदु** हें आहे. मेंदूतून पुढचे बाजूस ऐच्छिक ज्ञानतंतूचें व मागचे बाजूस अनिच्छित ज्ञानतंतूचें जाळें परस्पर गुंतागुंतीनें पसरलें आहे. त्यांतून **विद्युत्** प्रवाह अखंड चालू असल्यानें, विद्युद्द्वारा इच्छित व अ-

* केरळकोकिळ पुस्तक ९ वें अंक ६ वा सन १८९५ पहा.

निच्छित शरीरांची हालचाल, सुखदु:ख, हर्षशोक, इच्छा, इ० मनोविकारांच्या संवेदना, मनास होतात. विद्युच्छक्तीनें रोगादिकांवर उपचार, अन्नपचनादि क्रिया, गर्भस्थ जीवाची शरीररचना होणें, जीवाचा सर्व जीवनव्यापार व शरीरपरिचर्या कशी चालते व कशी बिघडते, इ० बहुत चांगले विचार केले आहेत. ते विचारणीय आहेत. आणि सर्वांचा सारांश, मनाचें रसात्मक जें रूप तो देहस्थ **'आत्मा'** आहे, असा सिद्धांत करून सोडला. ह्या विषयांचीं व्याख्यानें मीं केरळकोकिळांत वाचलीं व त्यांपासून मला आनंद वाटला. व त्या शास्त्रकारांची प्रशंसा करावी तितकी थोडी आहे. पण खेद इतकाच वाटला कीं, हे शास्त्रकार शब्दार्थाला व शरीरस्थ जडांशाला धरून जितकी सूक्ष्म चिकित्सा करीत आंत शिरले, तितक्या अनुभवांशाला चिकटत आंत शिरले असते तर ' मनाचें रसात्मक स्वरूप तो **' आत्मा '** इतकाच नामनिर्देश करून स्वस्थ न राहतां येतें. व पुष्कळ गोष्टी विचारार्थ सिद्ध केलेल्या पुन्हां अन्य रीतीनें प्रतिपादन कराव्या लागल्या असत्या. या शास्त्रज्ञांनीं सर्वानुभवाची **संवेदना** विद्युद्द्वारा मनावर आणून ढकलली, पण **'मनाची'** संवेदना कोणास होते ? व मनाची हालचाल कशी होते ? या मुद्यावर आंध्य राहिलें, असें माझ्या अल्प समजुतीनें वाटतें. त्या पंडितांस मी दोष देतों असें नाहीं. त्यांनीं मनास शरीरांतला राजा व विद्युच्छक्तीस प्रधान असें मानिलें हें फार ठीक आहे. पण या पंडितांची प्रधानाशीं गांठ पडली तशी राजाची ओळख अजून पटली नाहीं. मनाचें स्वरूप पूर्वीं जसें शब्दांनीं वर्णन करितां येतें, तसें मनाचा अनुभव झाल्यावर त्याला ते शब्द लावतां येत नाहींत. संवेदनेचें साधन जशी **विद्युत्** आहे तसेंच **मन** हेंही ज्ञानाचेंच साधन आहे, **मन** ज्ञाता अथवा ज्ञानस्वरूप नव्हे. डोळ्यानें इतर पदार्थ दिसतात, डोळ्यानें डोळा दिसत नाहीं. मनानें विद्युद्द्वारा सर्व विषयज्ञानानुभव होतो. मनानें मनाचा अनुभव कधीं होत नाहीं. व सुदैववशात् एकवार झाला तर पुन्हां **मनपण** येत नाहीं. अशा स्थितीच्या अनुभवाचा आनंद उसळलेला लेख विद्युन्मानस शास्त्रकाराचे व्याख्यानांत निदान मला आढळला नसल्यानें या

पंडितांची मनोराजाची गांठ शब्दांनीं पडली, अनुभवानें पडली नाहीं, असें मला मोठ्या कष्टानें ह्मणणें भाग येतें. विद्युन्मानसशास्त्रकारांची माझी भेट होण्याचा तर मुळींच संभव नाहीं. पण त्या शास्त्राचे ज्ञाते जे इतर विद्वान असतील त्यांनीं पत्रद्वारा माझ्या समजुतींतील चुकी नीट काढून दिल्यास मी त्यांचा अत्यंत आभारी होईन. व कदाचित् माझी समजूत करतांना त्यांचीच चूक त्यांना आढळून येण्याचाही संभव आहे. विद्युन्मानसशास्त्रज्ञ ( केवळ वाचक नव्हे ) फारच सूक्ष्म विचारशील असल्यानें मीं जे सांकेतिक शब्द वर वापरले आहेत त्याच्या पलीकडे जोर मारून उड्डाण करूं शकतील अशी मला खात्री आहे. व माझा लेखही अल्पस्वल्प तरी त्यांस साह्यकारी होईलसें वाटतें. असो. वैद्यकी, डाक्टरी व विद्युन्मानस या शास्त्रत्रयींत मी अज्ञ असल्यानें, या संबंधीं केलेल्या विवेचनांत माझ्या पुष्कळ चुका असणें शक्य आहेत. त्या त्या शास्त्रवेत्त्यांनीं क्षमा करून मजला दाखविल्यास त्यांचे आभार मानीन. " ]

---

तात्पर्य काय कीं, एक आध्यात्मिक शास्त्रज्ञावांचून इतर कोणत्याही शास्त्रज्ञास जीवाचें यथार्थ स्वरूप कळलेंच नाहीं. केवळ जडांशापर्यंत अनुभवज्ञान पोंचतें, चैतन्यांशाचा बोध होत नाहीं. त्या स्थलाचा शब्दांनीं निर्देश करण्यापलीकडे अनुभवांत कोणी पोंचत नाहीं. ज्यांना **जीव** जिवंत असतांच त्याच्या खऱ्या स्वरूपाचा जर यथार्थ बोध होत नाहीं तर, जीव जन्मतो कीं मरतो ? अथवा कोणीकडून येतो व कोणीकडे जातो याचा पत्ता कसा लागणार ? ' जीव ' अजी नवा उत्पन्न होत नाहीं, जन्म घेत नाहीं व मरत नाहीं. तो नित्यस्वरूप आहे. अज्ञानानें व अज्ञानकृत कर्मानें त्यास बद्धता येऊन स्वकृत कर्मभोगार्थ स्थूल देहद्वारा अनंत कालपासून अनंत लोकांत अनंत देहांतरें ह्म० केवळ वेषांतरें करीत फिरतो. त्याच्या स्थूल देह धारण करण्यास व सोडण्यास, **जन्म** व **मृत्यु** अशी संज्ञा आली आहे. या संज्ञेच्याच दृष्टीनें अज्ञानी जन जीव जन्मतो व मरतो असें ह्मणतात. व अज्ञानदशेंत तें ह्मणणें यथार्थ

असल्यानें यावत् चराचरात्मक सृष्टींत, चतुर्विध जीवकोटींत, प्रत्येक प्राणिमात्र '**पुनर्जनित**' व **पुनर्मृत** आहे असेंच ह्मणावें लागतें. आणि हाच श्रुतीचा सर्वश्रेष्ठ **सिद्धांत** त्रिकालाबाधित आहे, असेंच सर्वांनीं मान्य केलें पाहिजे.

---

# जीवाची महाकारणावस्था.

**हे राजन् शीलनिधे !** जीवाच्या पुनर्जन्माविषयीं जीं विरुद्ध मतें होतीं, त्यांचें निरसन करून ईशसृष्टींत प्रत्येक प्राणी व पदार्थ **पुनरुत्पन्न** झाला आहे असें सिद्ध करून दाखविलें; परंतु मरणोत्तर क्षणापासून पुन्हां जन्मास येण्याच्या क्षणापर्यंत जीवाची मध्यस्थिति कशी राहते, त्याला शरीरावांचून कसें राहतां येतें व लोकांतरीं कसें जातां येतें, इ० अनेक गोष्टींचें अविचारी जनांस अज्ञान असल्यानें व त्याचा कांहीं पुरावाही मिळत नसल्यानें जीव एकदां मेला कीं सृष्टींतून गेला; जन्मापूर्वीं व मरणानंतर सृष्टीशीं जीवाचा कांहीं संबंध नसतो. अशी दृढ समजूत झाल्यानेंच पुनर्जन्म होत नाहीं असें पुष्कळ जनसमूहास वाटतें. पण असें वाटणें अगदीं चूक आहे. व यामुळेंच अनेक जीव कर्तव्यपराङ्मुख होऊन अधःपातास प्राप्त होतात. अर्थांत जन्ममरणमालिकेंत पडतात. यास्तव तुला आतां, मरणोत्तर क्षणापासून जीव जन्मास येईपर्यंत ज्या महाकारणावस्थेंत अथवा शरीरांत जीव राहतो व कर्मानुरोधानें लोकांतरीं व देहांतरीं गमनागमन करितो त्या महाकारणावस्थेचें स्वरूप सिद्ध करून दाखवितों. हें स्थल अति सूक्ष्म विचारणीय आहे. हें अंतःकरणांत पूर्ण बिंबल्यावर जन्मांतराविषयीं शंकेचा लेशही उरणार नाहीं. नंतर पुढें जीवाच्या गर्भधारणक्षणापासून मृत्युमुखीं अर्पण होईपर्यंत जीवाची आदिमध्यावसानीं कशी स्थिति राहते याबद्दल जीवाचें जीवनचरित्र वर्णन करून सांगेन. याचा मनुष्यमात्रांनीं सदैव निजध्यास ठेवावा. जीवाचा जन्म होतांच जीवाबरोबर **मृत्यु** अगदीं चिकटला असतो व तो जन्माच्या उत्तर क्षणापासून पुढें कोणत्या क्षणीं येऊन दाखल हो-

ईल याचा थांग लागत नाहीं. तथापि वर्णन करण्याकरितां सामान्यपणें आपण जीवाच्या आयुष्याच्या तीन कक्षा मानूं.अज्ञानावस्थेपर्यंत जन्माची आद्य कक्षा, तारुण्याची मध्य कक्षा, आणि तारुण्योत्तर जरेची अंत्य कक्षा, अशा ह्या तीन कक्षांत जीवाच्या आयुष्याचा विभाग झालेला आहे. अन्य युगांतरीं मनुष्याचें आयुष्य फार होतें. कलियुगांत शंभर वर्षांचें अथवा एकशें वीस वर्षांचें ( पदरीं पडल्यास ) पूर्णायुष्य मानलें आहे; पण क्वचितच भाग्यवानाच्या तें पूर्ण पदरीं पडतें. असें जरी आहे तरी प्रत्येक मनुष्यास, मी निदान शंभर वर्षें वांचेन अशी आशा असते. किंबहुना खात्री असते असेंही ह्मटल्यास चालेल. कारण, मी कधीं मरणार हें कोणासच ठाऊक नसतें, व हें ठाऊक नसणेंच जीवास फार हितावह आहे. जीवास जर हें कळेल तर त्याचें एक पाऊलसुद्धां पुढें पडावयाचें नाहीं. मग इतर व्यवहार तर लांबच आहेत. मृत्यूच्या अज्ञानाचें पटल जीवमात्रांच्या नेत्रांवर पडलें असल्यानेंच सर्व सृष्टियात्रा सुरळीत चालली आहे. असो. आतां प्रथम जीवाच्या महाकारणावस्थेचा पूर्ण विचार करून पुढें आद्य कक्षेचा ह्मणजे जीवाच्या जन्माचा विचार करूं.

सृष्टींतील प्रत्येक **जीवमात्र** मरणोत्तर जन्मास आला आहे. प्रथमच जन्मलेला असा कोणताच प्राणी सृष्टींत नाहीं. कारण, सृष्टीचें अनाद्यनंत स्वरूप आहे. अनंत सृष्टिमालिकेंतील अमुक सृष्टि आद्य होती असा निर्णय होणेंच अशक्य आहे; आणि **जरायुज, अंडज, स्वेदज** व **उद्भिज्ज** (उद्भिज्जांत पर्वत, वृक्ष, नदी, खाणी, धातू यावत् जड पदार्थ येतात ) अशा चराचर अथवा स्थावरजंगमाच्या यच्च यावत् दृश्यादृश्यसंग्रहास–'**सृष्टि**' हें नाम आहे. या सर्व समुच्चयातिरिक्त 'सृष्टी' चें कांहीं वेगळें स्वरूप नाहीं कीं, ज्यावरून सृष्टि पूर्वीं झाली व मागून अमुक अनुक्रमानें जीव उत्पन्न झाले असें ह्मणतां येईल. जसें धान्याच्या राशींतून एक दाणा हातीं घेतला ह्म० त्यास अमुक धान्याचा दाणा ह्मणतों. व त्याच दाण्यांचे समूहास 'राशी' असें म्हणतों. 'दाणा' हा '**व्यष्टि**' आहे व राशी हा '**समष्टि**' आहे. ( हें ब्रह्मप्रकरणीं सिद्ध झालें आहे ) तशी, '**सृष्टि**' ही समष्टिरूप 'जीव' राशी आहे आणि '**जीव**' हा

सृष्टि समष्टीचा ' व्यष्टिरूप दाणा आहे, ' ' **जीव** ' आणि ' **सृष्टि** ' यांच्या स्वरूपांत कांहीं भेद नाहीं.

येथें अशी शंका येईल कीं, चतुर्विध जीवकोटींच्या समूहास तुह्मी सृष्टि ह्मणतां, तर ठीक आहे. पण चतुर्विध जीव, हे चैतन्यरूप ह्म॰ सजीव आहेत असें तुह्मीं ठरविलें, त्याअर्थीं सर्व ' **सृष्टि** ' चैतन्यरूप झाली. मग आतां ' सृष्टीस ' ' जडचैतन्यात्मक ' व ' चराचरात्मक ' हीं विशेषणें कां जोडतां ? या विशेषणांनीं तुमच्या भाषणांत विरोध येत नाहीं काय ?

याचें उत्तर असें कीं, सृष्टि चैतन्यरूपच आहे. सृष्टींत जड असें कांहींच नाहीं. चर, अचर अथवा स्थावर-जंगम आणि जड चैतन्य असे हे भेद सृष्टीच्या स्वरूपांत वास्तविक नाहींत. हे केवळ उत्पत्ति नाश अथवा ' जन्म आणि मृत्यु ' यांच्या भेदानें प्रतीत होत आहेत. व ते प्रतीत तरी कोणास होतात ? कीं, ज्यांना जन्मतें काय व मरतें काय? हें कळत नाहीं त्यांना. व ज्यांना जीव जन्मत नाहीं व जीव मरतही नाहीं असें जीवाचें अजरामर खरें स्वरूप कळतें त्यांना सृष्टींत एक काडी सुद्धां जड भासत नाहीं. जें स्वतःचेंच चैतन्यस्वरूप ओळखीत नाहींत व स्वतःच जड होऊन बसले आहेत, हे इतर पदार्थांस जड म्हणतील यांत नवल तें काय ? आपण मदोन्मत्त झाल्यावर सर्व जग तसेंच दिसणार आहे. अज्ञानदशेंतच जड चैतन्य असा भेद प्रतीत होतो. व चैतन्यानुभूति झाली म्हणजे ' **सर्वं खल्विदमात्मा** ' असें म्हणावें लागतें.

चतुर्विध जीवखाणींचा समष्टिरूप समूह अनाद्यनंत असणें हेंच सृष्टीचें अनाद्यनंत स्वरूप आहे. आणि सृष्टि अनाद्यनंत ह्मटली म्हणजे जीवाचें अनादित्व आलेंच. **सृष्टि** आणि **जीव** अनादि अनंत आहेत. या अनाद्यनंत मालिकेंत जसें अमुक सृष्टि ही आद्य आहे, असें म्हणतां येत नाहीं; तसेंच जीवखाणींतील अमुक जीवाचा अमुक आद्य जन्म असेंहि ठरवितां येत नाहीं. तथापि **श्रुतीनें** विचारार्थ व उपदेशार्थ सृष्टिमालिकेंतील कोणत्या तरी एका सृष्टीचा उत्पत्तिस्थितिलय सांगितला व त्यावरूनच प्रत्येक सृष्टीच्या उत्पत्तिलयाचा अनुक्रम जसा जाणावा लागतो; तसा जीवाच्या अनंत जन्ममरण-

मालिकेंतील एकाच जन्माची व मरणाची स्थिति सांगितली ह्मणजे त्यावरून अनंत जन्ममरणपंक्तीचा अनुक्रम जाणावा. सृष्टींत अनंतविध जीव आहेत. त्या सर्वांत एक मनुष्यकोटीसच कर्तव्यता व सारासारविचारशक्ति असल्यानें व मनुष्यजन्मांतच कैवल्यप्राप्ति असल्यानें सर्व जीवांत **मनुष्यजीव** श्रेष्ठ ठरला आहे. त्या एका मनुष्यजीवाच्या उत्पत्तिस्थितिलयाचा प्रकार दाखविला ह्मणजे इतर सर्व जीव तदंतर्गत सहज आलेच. मनुष्येतर प्राणिवर्ग कृतकर्मफलभोगार्थ **जायस्व म्रियस्व** ह्म० जन्म घ्यावा, जगावें व मरावें या परंपरेंत वाहत चालला आहे. त्या योनींत पुण्यपापादि कर्तव्य नसल्यानें त्या केवळ जीवनव्यापारशील आहेत. अशा प्राण्यांचे विचारांत व्यर्थ आयुःक्षय न करितां स्वतःच्याच जन्ममरणपरंपरेचा विचार केला पाहिजे.

---

## जीवाचा जन्मांतर संस्कार.

... समाज ...
... दिक्षीत.

जीवाच्या जन्मास मूलबीज जीवकृत कर्मजन्य **संस्कार** हा आहे. आणि संस्काराचें स्वरूप **अनुभवजन्य स्मृति** हें आहे, असें सिद्ध झालेंच आहे. प्रथम **संस्काराचा** उदय होतो त्या संस्कारानुरूप **इच्छा** अथवा **वासना** उत्पन्न होते. वासनेनुरूप अंतःकरणेंद्रियादिकांवर **प्रेरणा** होते. प्रेरणेनुरूप **कर्म** घडतें. कर्मानुरूप **फळ** मिळतें, फलाचा **अनुभव** होतो, आणि अनुभव केल्याची **स्मृति** राहते. हीच स्मृति **संस्काररूप** आहे. **संस्कार** आणि **स्मृति** यांचें एकच रूप आहे. तथापि अति सूक्ष्मांतर आहे. तें असें कीं, स्मृतीची लीनावस्था **संस्काररूप** आहे, आणि संस्काराची उदयावस्था **स्मृतिरूप** आहे. संस्काराचा उदय स्मृतिरूप झाला कीं, पुढें इच्छा अथवा वासना उभीच आहे. या इच्छेचा आघात प्रेरणारूप होऊन त्याची परंपरा सुरू झाली ह्म० ती शेवटीं ' संस्कार ' रूपापर्यंत पोंचून पुनः ' स्मृतिरूप ' उदयाचे आघातास कारण होते. या अखंड मालिकेंत पहिला कोण ? याचा पत्ता त्रिकालांत कधींही लागणार नाहीं. सं-

**स्कारास** प्रथम मानिलें तर अनुभवावांचून स्मृतिरूप संस्कार संभवत नाहीं. **स्मृतीला** कांहीं तरी विषयानुभव पाहिजे. अनुभवास **विषय** पाहिजे. विषयप्राप्तीला **क्रिया** पाहिजे. क्रियेला **प्रेरणा** पाहिजे, प्रेरणेला **इच्छा** पाहिजे, आणि इच्छेला संस्काराचा **उदय** पाहिजे. **संस्कार** अनुभवजन्य स्मृतीवांचून संभवत नाहीं. आतां विचार करून पाहिल्यास या चक्रमालिकेंत एक दुसऱ्याचा जन्यजनकभाव मानावा, कीं कार्यकारणभाव मानावा, कीं प्रत्येकास स्वतंत्र मानावें, अथवा काय करावें याचा कोणाही विचारवानास बरोबर उलगडा करतां येत नाहीं. चक्रमालिकेमुळें आपणच आपला बाप व कार्यच कारणरूप होण्याची वेळ येते. अशा अपरिहार्य व अनिर्णित चक्रमालिकेसच **अनादि परंपरा** ह्मणतात. या चक्रमालिकेंत **जीव** दोऱ्याप्रमाणें ओंवला असल्यानें मण्यांचा व दोऱ्याचा संबंध तर सुटत नाहींच, पण मणी घट्ट ओंवले ह्म० मण्यांचा आधारभूत दोरा देखील जसा दिसूं शकत नाहीं, तशी जीवाच्या स्वरूपांत वरील संस्कारपरंपरेची मणिमालिका अखंड, अविरल व अति वेगानें परिभ्रमण करीत असल्यानें स्वस्वरूपज्ञान होऊं पावत नाहीं. मण्यांबरोबर जसे दोऱ्यास फेर खावे लागतात, तसें कर्मभोगमालिकेबरोबर जीवास चतुर्दश भुवनांत अखंडितपणें गटंगळ्या खात फिरावें लागत असल्यानें, जीवाचा कोणता जन्म आद्य आहे व त्याच्या आद्य उत्पत्तीचा क्रम कसा आहे, हें सांगण्यास **श्रुतीला** सुद्धां कुंठित व्हावें लागतें, तेथें अन्य जीवाची कथा काय?! तथापि जगदीशानें अनंत जीवकोटींत हा सारासारविचारशील मनुष्यप्राणी मेरूच्या स्थानीं बसविला आहे. मेरूपासून माळ उलट फिरविली ह्मणजे जशी माळ संपते, तशी मानवी जीव आपल्या विचारशक्तीचे बलावर आपलें मेरूस्थान न सोडतां वरील परंपरा जी सुधी फिरत आहे तिला उलट फिरवूं लागला कीं जन्ममरणपरंपरा संपलीच, पण माळ उलटावी कशी ही किल्ली मात्र गुरुकृपेवांचून सांपडत नाहीं. आणि ती जोंवर प्राप्त नाहीं तोंवर अनाद्यनंत काल असेंच, " पुनरपि जननं, पुनरपि मरणं, पुनरपि जननीजठरे शयनं " इ० चक्र चालू आहेच. सृष्टींतील प्रत्येक जीवमात्र, कर्मसंस्कारमालिकेंत अनिवार्य गुंतला आहे,

पण अंतर इतकेंच कीं, मनुष्यजीवास विचारशक्तीच्या बलावर त्यांतून मोकळें होतां येतें. इतरांस होतां येत नाहीं. आतां होतां येत असल्यावर मोकळें न झाल्यास मनुष्य आणि पशु यांत अंतर तें काय ? जीवनपरिचर्या सर्वांची समानच आहे. सारांश 'संस्काराची' परंपरा अनादि असल्यानें प्रत्येक जीव अनादि आहे. आणि पूर्वजन्माचा **संस्कार**, या जन्मास व या जन्माचा **संस्कार** अन्य जन्मास **मूलबीज** कारण आहे; हें निर्विवाद सिद्ध झालें.

**हे राजन् शीलनिधे** ! जीवाच्या जन्ममरणमालिकेस पूर्व जन्म '**संस्कार**' बीजरूप कारण होतो, ही गोष्ट सिद्ध झाली. आणि अनुभविलेल्या विषयाची जी स्मृति ती '**संस्कार**' रूप असून, संस्कारांत व स्मृतींत जें सूक्ष्मांतर दाखविलें ( ह्म० स्मृतीची लीनावस्था 'संस्कार' रूप व संस्काराची उदयावस्था 'स्मृतिरूप ) ' हें पक्कें ध्यानांत असूं द्यावें. कारण, हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. असो.*

सुषुप्ति अवस्थेंत सामान्य अज्ञानाचें आवरण पांच चार तासांचें जें कांहीं असतें, हें **अज्ञानावरण** बहुत कोंवळें असतें ह्मणून निद्रिस्त जीवास, सामान्य आघाताच्या धक्क्यासरशीं आवरण दूर करून लवकर बाहेर ह्मणजे जागृतींत येतां येतें. व त्या आवरणानेंच सुषुप्तींत मत्कुणमशकादिकांचे सामान्य दंश जीवास सहन करतां येतात. पण, मरणानंतर पुन्हां जन्मास येईपर्यंत जे महा घोरतर क्लेश सहन करावयाचे असतात, अशा दशेंत सुषुप्तीसारखें कोंवळ्या अज्ञानावरणानें जीवाचें जीवित्व कसें कायम राहूं शकतें ! ! ते क्लेश सहन

---

**टीप**—" अव्यक्तबोध " ग्रंथांत पांचवे ' कारण ' प्रकरणीं जीवाच्या पुनर्जन्ममरणसिद्धींत, जीवाचें स्वरूप वासनावेष्टित अर्थात वासनारूपच आहे. कारण जीवाचें निर्वासनिक स्वरूप प्रतीत होत नाहीं. सुषुप्तींत देखील वासना पिंड सोडीत नाहीं, तिच्या अस्तित्वानेंच पुन्हां जागृति येते, सारांश तिन्ही अवस्थांत ह्म० ( जागृती, स्वप्न, सुषुप्ति ) जीव वासनावेष्टितच असल्यानें जीव ' वासनात्मक ' झाला. आणि मरणसमयीं वासना शेष राहत असल्यानेंच पुन्हां जन्म घ्यावा लागतो. वासनाक्षय कधीं होत नाहीं. येथवर गोष्ट सिद्ध करून दाखविली आहे, ती वाचकांच्या पूर्ण लक्ष्यांत असेलच.

होण्यासारखें कठोर **आवरण** असेल तरच जीवाची मजल कंठली जाईल. नाहींपेक्षां न कळे काय दशा होईल ! ! याकरितांच जगन्नियामकाच्या अतर्क्य व अज्ञेय योजनेनें, हा जीव सुषुप्ति अवस्थेच्या ' वासनात्मक ' आवरणांतून आंतल्या आंत महा कठोर अशा केवल अनंत **'संस्काररूप'** अति दृढ **आवरणांत** बळकट गठडीसारखा बांधला जाऊन **' महा मृत्यू '** च्या स्वाधीन होतो.

जाग्रदवस्थेंत **जीव** स्थूल सूक्ष्म इंद्रियादिकांसह व्यवहार करीत असतो; तो स्वप्नावस्थेंत येतांच सर्व इंद्रियादिकही **संस्काररूपानें** स्वप्नांत येऊन काल्पनिक व्यापार चालू होतो. हा व्यापार संस्काराची उदितावस्थारूप आहे. ही ' संस्काराची ' उदितावस्था जाऊन लीनावस्था होऊं लागली कीं, सर्व इंद्रियादिक त्यांतच ह्म० संस्कारांतच आकर्षित होऊन लीन होत जातात. अशी जी सर्व संघाताची 'घनसंस्काररूप' अवस्था होते, ही अल्पकाल राहून सर्व संघात जर मागें फिरला तर ती जीवाची **सुषुप्ति** अवस्था ह्मणविते. आणि तो संस्कारबद्ध **' संघात '** मागें न फिरतां पुढें गेल्यास, तीच जीवाची **मरणावस्था** होते. एखादें उत्तम फल भक्षण करून फेंकून दिलें आणि त्या फलाचें एकच बीज जरी जवळ शिल्लक ठेविलें, तरी भूमिजलोपाधियोगानें कालेंकरून व क्रमेंकरून तेंच फल आपल्यास पुनः प्राप्त होतें. ' बीज ', हातांत घेऊन विचारदृष्टीनें पाहिल्यास, त्यांत वृक्षाचे स्कंध, शाखा, पर्ण, पुष्प, फल, आणि पुनः ' बीज ' इतकें साहित्य त्या एका शुष्क बीजांत आहे. हें साहित्य त्या बीजांत कोणत्या रूपानें आहे ? तर केवळ संस्काररूपानें आहे. व तें अनुकूल उपाधीनें व्यक्त होतें. त्यामुळें त्यांत ते ( ह्म० वृक्ष फल इ० ) नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. कदाचित् भूमिसंयोगांत हा गुण असेल, असें ह्मटल्यास आम्रबीजापासून कधीं निंब वृक्ष उत्पन्न होत नाहीं. यावरून एका बीजांत एका वृक्षाचें अथवा अनंत वृक्षांचे पत्र पुष्पफलादिक संस्काररूपानें अगदीं जसे सिद्ध असतात; तसेंच जीवाच्या सूक्ष्म देहेंद्रियअंतःकरणादिकांचें ( सुषुप्तीप्रमाणेंच ) मरणसमयीं एका ' संस्कारांत ' आकर्षण होतें. आणि गर्भोपाधि लागतांच अनुक्रमें पूर्ववत् जीवाचा विकास होतो. या ' संस्काराच्या ' संकोचवि-

कासाच्या उपाधीसच जन्म व मृत्यु ह्मणतात. मृत्यूपासून पुन्हां जन्म होईपर्यंत जीवाचें अस्तित्व संस्काररूपी बीजांत आहेच असें मानावें लागतें. अर्थात सुषुप्तींत जीवाचें स्वरूप जसें वासनात्मक होतें व इंद्रियादिकांचा लय वासनेंत होतो; तसें मृत्यूंत जीवाचें स्वरूप 'संस्कारात्मक' होऊन त्यांत इंद्रियादिकांचा लय झाला म्हणजे **जीव** वज्रमूर्छित होऊन **कर्मानुरोधानें** निर्णित मार्गास लागतो. सुषुप्तींत जीव जरी निजला, तरी वासना जागृत रहात होती व तीच पुन्हां जीवास जागृतीवर आणीत होती. ती वासना, 'संस्कार' रूपांत कशी तरी मूर्छित झाली. आतां तरी जीवाचा पिंड सुटला पाहिजे होता! बिचाऱ्याची मरून राखरांगोळी सुद्धां झाली!! पण करतो काय, सर्व शत्रू कसे तरी मूर्छित होतात व हा जीव 'जीव' एकवार मेल्यावर पुन्हां जन्म नाहीं. असें मानणाऱ्या मतवाद्यांच्या बलावर कोठें तरी पळू इच्छित होता, तोंच लाडके हितशत्रू जागे होऊन शेंडी धरून बरोबर तयार आहेतच!! ते हितशत्रू कोण? तर जीवानें केलेलें '**कर्म**' कर्माच्या हातीं जीवाची शेंडी गुंतल्यानें तें जिकडे ओढित नेईल तिकडे या जीवास रडत रखडत गेलें पाहिजे. मरणोत्तर '**संस्काररूप जीव**' कर्मानुरोधानें परिभ्रमण करितो.

---

# जीवाचें संस्कारात्मक महाकारण शरीर.

ज्याप्रमाणें जीवाच्या,—जागृती, स्वप्न, सुषुप्ति अवस्थापरत्वें स्थूलदेह, सूक्ष्म देह, आणि कारण देह जीवास असतात, त्याप्रमाणें सुषुप्तीच्याही पलीकडची जी दीर्घाज्ञानावस्था ती जीवाची **महाकारणावस्था** अथवा **महाकारण शरीर** ह्मणवितें. या महाकारण शरीरांत अथवा अवस्थेंत जीवाचा जो प्रवेश हाच '**मृत्यु**' आणि त्या महाकारण शरीरांतून बाहेर निघणें ह्म० कारण, सूक्ष्म आणि स्थूल शरीरांत येणें हाच जीवाचा '**जन्म**' होय. विचारदृष्ट्या जन्ममरण कांहीं वेगळे पदार्थ नसून, 'महाकारणावस्थेंत' जीवाचा प्रवेश

व निर्गम यांसच ‘ जन्म व मृत्यु ’ अशी संज्ञा आली आहे. स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण संज्ञक हे जीवाचे धारण करावयाचे पोषाख आहेत. सृष्टिप्रदेशाच्या प्रवासांत ज्या स्थलीं व ज्या स्थितींत जो पोषाख हितावह व सुखकर असतो त्यास जीव धारण करून प्रवास करीत असतो. जसें लोखंडी कवच ( ह्म० चिलखत ) धारण केलें असल्यावर कंटकप्रदेशांतून, निबिड अरण्यांतून किंवहुना प्रदीप्त अग्निप्रदेशांतून जरी जाण्याचा प्रसंग आला तरी बऱ्याच सुरक्षितपणें पार पडतां येतें. तसें मरणोत्तर पुन्हां गर्भप्रवेशापर्यंत कष्टमय व खडतर प्रदेशांतून कांहीं सुरक्षितपणें निभावण्याकरितां व जीवाचें जीवत्व कायम राहण्याकरितां लोखंडी कवचाप्रमाणें जीवाचा ‘ महाकारण शरीर ’ रूपी शेवटला वज्रतुल्य पोषाख आहे. हा त्यानें धारण केल्यावर कसेही प्रचंड आघात बसले तरी जिवित्व सुरक्षित राहतें. मूर्छितावस्थेंत झालेले क्लेश विसरतात असें नाहीं. घरावरून खालीं पाषाणमय भूमीवर कोणी पडल्यास तो भूमीवर पडण्यापूर्वींच बेसावध होतो. कसा पडलों व कसकसें आंग ठेंचलें हें त्यास मूर्छितावस्थेंत जरी कळत नाहीं, तरी सावधपणा येण्यास प्रारंभ होऊं लागला कीं, वेदना कळूं लागतात. आणि पूर्ण शुद्धींत आल्यावर असह्य दुःखानें जसा प्राणांत कष्टी होतो; तसा मरणोत्तर जीव महाकारणावस्थेंत मूर्छितपणें कर्मानुरोधानें ज्या कष्टमय प्रदेशांतून ओढून नेला जातो, त्या सर्व कष्टांचे आघात जीवाचे महाकारण शरीरावर बसून ठेंचला जातो आणि शुद्धि येण्याचीं साधनें विकास पावलीं ह्मणजे ढळढळा रडून आक्रोश करितो. जशा असह्य वेदना सहन होण्यास ‘ मूर्छा ’ ही उपयोगाची आहे, तसें जीवाचे घोरतर क्लेश सहन होण्याकरितां ‘ महाकारण शरीर ’ हें जीवाच्या अत्यंत उपयोगाचें आहे. ह्मणून मरणकालीं संस्कारात्मक शरीररूपानें हा जीव या स्थूल पांचभौतिक देहास सोडून पुढें जातो.

---

# जीवाचा लिंगदेह अथवा कारणशरीर.

या **संस्कारात्मक** शरीरांत जीवाचीं ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, अंतःकरण आणि प्राण हीं सर्व संघातरूपानें ह्म० ऐक्यरूपानें बीजवृक्षन्यायवत् असतात. हें ज्याप्रमाणें वर सांगितलें आहे, त्याप्रमाणें या सर्व संघाताचीं 'उपादान कारणरूप' जीं पंचमहा तत्त्वें त्यांचे अतिसूक्ष्मांश केवळ अस्तित्वरूपानें त्या संस्कारात्मक शरीरांत असतात. या संस्कारात्मक शरीरासच **लिंगदेह** असें ह्मणतात. मरणसमयीं स्थूलदेहांतील तत्त्वांचा लय होत होत शेवटीं अगदीं सूक्ष्म व मंद श्वास तुटत तुटत चालत असतात. तरी जिवंतपण आहे असें वाटतें. सरते शेवटचा श्वास अतीच सूक्ष्म येऊन बंद पडला ह्मणजे जीव गेला असें वाटतें. यांत वायूचें सूक्ष्म सूक्ष्म होत अति सूक्ष्म ह्मणजे अदृश्य होणें हें **संस्काररूप** होणें होय. जीवाचे जिवंतपणीं देहेंद्रियादि स्थूल सूक्ष्म संघाताचें चालकत्व केवळ प्राणवायूकडेसच असतें. **प्राणवायु** हे जीवाचें वाहन आहेत. प्राणवायु जीवाचे रक्षक आहेत, प्राणवायु जीवाचे प्रतिनिधि अथवा सखे आहेत. आणि जीवाच्या देहांतरीं व लोकांतरीं गमनागमनांस हेच साधन आहेत. असें मागें '**हेतू**'च्या विचारांत सांगितलें आहे, लक्षांत आणावें. हेच 'प्राणवायु' मरणानंतर अतिसूक्ष्म संस्काररूप होऊन जीवाचे 'संस्काररूप' महाकारण शरीरास गुंडाळून कर्मानुरोधानें जिकडे जावयाचा असेल तिकडे वाहून नेतात. व त्याचें 'जीवपण' सुरक्षित ठेवितात. जीवाचा व प्राणाचा वियोग होत नाहीं. जीवाप्रमाणेंच प्राण हेही संस्काररूपानें जीवाबरोबर असतात. असा 'संस्कार' रूप प्राणवायु 'संस्कार'रूप जीवासह स्थूल वातावरणांतून देहांतरीं व लोकांतरीं गमन करितो. वातावरणांतून संचार करणारें जीवाचें अमूर्तरूप या आपल्या स्वाभाविक चर्मचक्षूंच्या साधनानें दिसणें अशक्य आहे. योगतपादि साधनांनीं दिव्य दृष्टि व दिव्य ज्ञान प्राप्त झाल्यास कळणें शक्य आहे. तथापि अनुमानार्थ कांहीं उपलक्षणें सांगतों. स्पर्शजन्य रोगादि विकार वातावरणांत पसरून जेव्हां

हवा बिघडते, तेव्हां सर्वच वायु ओतप्रोत बिघडेल तर सर्वच नगरवासी एकदम रोगग्रस्त होतील. पण तसें होत नसून, वाहत्या पाण्यांत जसे रंगाचे कण टाकले ह्मणजे सर्व पाणी रंगीत न होतां रंगाच्या वाहत्या जलाच्या रेघा दिसतात. ती वाहती रेघ ज्या स्वच्छ वस्त्रास लागते त्या वस्त्रास रंगाचा डाग पडतो. तसें वातावरणांत रोगादि विकारांच्या वायुरूप धारा सुगंधदुर्गंधयुक्त वायूच्या धारांप्रमाणें वाहत असतात. ती वायूची अदृश्य धार ज्या मनुष्यास स्पर्श करिते तो रोगग्रस्त होतो. ह्म० तो रोग वायुरूपानें शरीरांत प्रवेश करून शरीरांतील सर्व धातूंचा नाश करितो, याचा अनुभव नेहमीं आहेच. [ गेल्यावर्षीं 'प्लेग' नें कसा प्रलय केला हें सर्व श्रुतानुभूत आहेच. ज्याप्रमाणें, वायुप्रवाहांतील कोणती झुळूक रोगविकृत आहे हें कोणत्याहि साधनानें कळूं शकत नाहीं, त्याप्रमाणें संस्काररूप जीवाची व संस्काररूप प्राणवायूची ऐक्यरूप ग्रंथि स्थूलवायूंतून कोणीकडे व कशी जात आहे हें दिव्य ज्ञान दृष्टीवांचून त्रिकालांत कळणें शक्य नाहीं. ]

यावत् जीवमात्रांच्या मरणोत्तर प्रयाणस्थितीचें हेंच स्वरूप आहे. ह्मणजे सर्व जीव केवळ संस्काररूप होऊन, कर्मानुरोधानें देहांतरीं व लोकांतरीं गमन करितात. ज्या निशाणावर नेम धरून लक्षपूर्वक जशा वेगानें व झोंकानें बाण सोडिला असतां तो जसा त्या वेगानें व झोंकानें तें निशाण उडवितो, तसा जीव जिवंतपणीं, ज्या ज्या फलोद्देशानें जशी **वासना** धारण करून ज्या ज्या कर्माचे **संकल्प** करितो व संकल्पानुरूप जीं **कर्में** यथासांग घडतात त्या कर्मांचे संस्कार प्रबल होऊन तेच **संस्कार** प्राणवायूच्या सूक्ष्म साह्यानें जीवास कर्मांचें **फल** ज्या स्थलीं अथवा लोकीं प्राप्त व्हावयाचें असेल तेथें नेमकें नेऊन पोंचवितात. पुण्यातिशयसंग्रह असल्यास व त्यांचीं फलें दिव्यभोग असल्यास देवपितरादि स्वर्गलोकीं हा जीव पोंचला ह्मणजे यास कर्मानुरूप दिव्य शरीरें प्राप्त होतात. मृत्युलोकीं जसें हें आपलें शरीर पार्थिवांशप्रधान असतें तसें दिव्यलोकवासींचीं शरीरें तेजगुणप्रधान असतात. तें शरीर या जीवास प्राप्त होतांच बुद्ध्यादि इंद्रियें सर्व विकास पावून तद्द्वारा दिव्य विषयाचा उपभोग घेऊन पु-

ण्य संपतांच मृत्युलोकीं गेलेल्या प्रकारानेंच पुन्हां परत येतो. आणि ज्या जीवांच्या कर्मांत दिव्य महाघोर पातकांचा संग्रह असतो ते जीव त्या कर्मभोगार्थ दिव्य यमलोकीं पोंचतांच त्यांजला अपूर्व यातना 'भोगदेह' प्राप्त होऊन इंद्रियादि भोगसाधनें विकास पावतात. आणि तद्द्वारा कृत पापकर्मांच्या फलास ह्म० अति भयंकर यातनामय भोगास प्रारंभ होतो. ते नरकादि भोग पुराणसुप्रसिद्धच आहेत. यातनाशरीर जें जीवास प्राप्त होतें तें असें वज्रतुल्य असतें कीं, त्यावर किती जरी आघात बसले तरी त्याचा नाश न होतां तद्द्वारा महादुर्धर व असह्य वेदना जीवास पोंचून जेव्हां जीव अत्यंत कष्टी होतो, तेव्हां त्यास निजकृत कर्माचा अत्यंत खेद आणि पश्चात्ताप होतो. पण त्याचा त्या वेळीं कांहीं उपयोग न होतां दुःखच भोगावें लागतें. जसा अपराधी कैदी शिक्षा भोगण्यास्तव, कारागृहाधिकाऱ्याच्या स्वाधीन झाला ह्मणजे ते त्याजला शीतनिवारणादिकाकरितां कांबळ्याचें डगलें घालावयास देतात; त्यापासून शीतनिवारण कांहींसें होत असेल, पण असल्या वस्त्राचा अभ्यास नसल्यास त्यापासून आंगाची सालडी निघून क्लेश होतात. तसें जीवास वज्रतुल्य कठोर यातनाशरीर प्राप्त झाल्यानें जीवाचें जीवित्व व बुद्धीची शुद्धि सुरक्षित राहते, पण प्राणांत प्रचंड क्लेशानें अत्यंत विव्हल होतो. विशेष मूर्छाही येत नाहीं, व मरण इच्छितो तेंही प्राप्त होत नाहीं. पूर्ण सावधपणें आपल्या पापकर्मांचीं घोर फलें भोगून मोकळा होतांच पुन्हां 'संस्काररूप महा कारण शरीर' धरून अधःपतन पावतो.* दिव्य लोकांत अल्प पुण्यानें अल्प सुखोपभोग भोगून ज्यांचा अधःपात होतो ते जीव आणि पापकर्मांचीं नरकादि दुःखफलें भोगून पतन पावलेले जीव, तसेंच येथल्या येथेंच ह्म० मृत्युलोकींचे लहान मोठ्या सुखदुःखफलापुरतींच ज्यांचीं कर्मफलें आहेत, हे असे सर्व जीव मरणोत्तर व अधःपातोत्तर ज्या जीवाच्या उदरीं जन्म व्हावयाचा असेल त्याचे उदरांत पूर्वोक्त 'संस्काररूप' शरीरानें

*आतां कोणत्या प्रकारच्या योग, उपासनादि कर्मानुष्ठानानें पुनरावर्तन होत नाहीं, व होतें. आणि त्याचे स्वर्गादि ब्रह्मलोकीं जाण्याचे कोणते मार्ग आहेत हें सर्व पुढें (कर्तव्यप्रकरणीं) सांगतां येईल.

प्राणवायूच्या सूक्ष्म साह्यानें चतुर्विध भोज्यान्नरसद्वारा प्रवेश करून शरीरांत मुख्य जीवन जी ' धातू ' त्या धातुस्थानीं पोंचतो. आणि कालेंकरून व क्रमेंकरून पितृरेतद्वारा मातृरजसंयुक्त होत्साता मातृगर्भाशयांत येऊन पोंचतो. पितृरेत व मातृरजसंयुक्त जो गर्भ ' बिंदु ' हाच या स्थूलदेहाचा आद्य पाया होय. या बिंदूत जीवाचा प्रवेश झाला ह्मणजे येथून जीवाचे '**कारण**' शरीरास आरंभ होतो आणि पुढें **सूक्ष्म** व **स्थूल** शरीरांपर्यंत पोंचतो. दिव्यलोकस्थ जीव पुण्यक्षयानें दिव्यदेहास सोडून अधःपात पावला ह्मणजे, आणि मृत्युलोकस्थ जीव मरण पावला ह्मणजे पुढें गर्भप्रवेशक्षणापर्यंत जीवाची जी **संस्काररूप** स्थिति ही '**महाकारणावस्था**' अथवा '**महाकारणशरीर**' आहे असें जाणावें.

---

# जीवाचें जीवनचरित्र.

## जन्माची आद्यकक्षा.

हे **राजा**, येणेंप्रमाणें जीवाच्या महाकारणावस्थेचा विचार सांगितला, याचें वारंवार चिंतन कर. आतां येथून जीवाच्या गर्भप्रवेशापासून मृत्युप्रवेशापर्यंत जीवाची जीवनपरिचर्या कशी चालते याचें वर्णन करितों. जीवाच्या जन्मार्थ मूलकारण व आधार जननीजनक असावयाचे. त्यांच्या ऋतुकालीं मिथुनीभावानें जीव गर्भप्रविष्ट होतो. कारण.—

स्त्रियांच्या ऋतुकालांत प्रथम दिवसापासून सोळाव्या दिवसापर्यंत गर्भाशयाचें मुख विकासित राहून त्यांत रजांशाची आर्द्रता असते. ह्मणून गर्भाधानाची यत्ता सोळा दिवसांचे आंत धर्मशास्त्रकारांनीं ठरविली आहे. गर्भधारण होण्याची यत्ता जरी सोळा दिवसांची आहे, तरी ऋतूच्या पंचम दिवसापासून दाहाव्या दिवसाचे आंतच बहुधा गर्भधारणा होते. क्वचित् प्रसंगीं स्त्रीस रजोद्भव होऊन बाहेर पडतो न पडतो तोंच गर्भाशयांत रेतबिंदु प्रविष्ट होऊन गर्भ राहतो. गर्भधारण

झाल्यावर गर्भाशयाचें तोंड मिटतें. प्रतिमासिक ऋतुकालांत जरी गर्भाशयाचें तोंड विकसित असतें तरी त्यांत बिंदुप्रवेश होत नाहीं. दंपत्याची संभोगक्रिया नेहमीं जी घडते ती केवल सुखजनक होते, गर्भजनक होत नाहीं. कारण, गर्भधारणक्षणांत संभोगसमयीं उभयतांचीं जननेंद्रियमुखें ( छिद्रें ) अतिसंलग्न होऊन वीर्य आकर्षित होऊन गर्भाशयांत प्रविष्ट होतांच आशयाचें मुख एकदम मिटतें. अशा प्रसंगक्षणीं नित्यानुभवापेक्षां अपूर्व सुखानुभवानें परस्परांचीं अंतःकरणें फार प्रफुल्लित होऊन आनंदानें संतुष्ट होतात. पण दंपती कामकलाकुशल असले तरच ही वेळ ओळखतां येते. आणि गर्भधारणा या प्रसंगीं झाली, असा उभयतांस तात्काळ बोध होतो. परंतु हा अपूर्व सुखक्षण ईशसंकेतानेंच प्राप्त होतो. कौशल्यानें कोणास कधींही साधतां येत नाहीं. एरवीं क्षणिक सुखासक्तीच्या नादानें, शरीरांतील मुख्य जीवन जें ' **वीर्य** ' त्याचा वृथा क्षय मात्र होतो. ह्मणून धर्मशास्त्रकारांनीं व वैद्यशास्त्रकारांनीं ऋतुकालीं ह्म० पंचम दिवसापासून सहा दिवसच निदान दहा दिवसपर्यंत गमनाची यत्ता सांगितली आहे. अकालीं गमनांत भ्रूणहत्येचें पातक घडतें, ह्मणून तसें करूं नये.

भ्रूणहत्येचें पातक लागतें, ही गोष्ट अविचाऱ्यांस मोठीच आश्चर्यकारक वाटते; पण विचारदृष्ट्या ही गोष्ट अन्यथा नाहीं. ' मरणोत्तर ' जन्मास येणारे अनंत जीव ' संस्काररूप ' कारण शरीरांनीं,—घरांतल्या वाशांत सूर्यकिरणाचे आलेल्या प्रकाशांत जसे परमाणू उडत फिरत असतात त्याप्रमाणें—हे कर्मप्रवाहांत प्राणवायूच्या साह्यानें वाहत असतात. आणि भोज्यान्नरसद्वारा जिवंत असलेल्या प्राण्यांच्या धातुस्थानीं पोंचतात, असें वर सांगितलेंच आहे. आतां, ज्यांचा जन्मकाल व कर्मफलोदय येऊन ठेपला असतो ते जीव रेतद्वारा अगदीं नेमके गर्भाशयांत पोंचून परिपक्व होण्याचे मार्गास लागतात. आणि ज्यांचा ' संस्कारशरीर ' स्थितीचा भोग संपला नसेल ते रेतद्वारा गर्भाशयाच्या आंत न पोंचतां फुकट वायां जातात. अशा त्या दीन जीवांच्या नाशास, व्यर्थ रतिक्रीडा कारण होते, ह्मणून ती भ्रूणहत्या लागते. **हे राजन् ! !** येथें कोणाला अ-

सें वाटेल कीं, भोज्यान्नरसद्वारा संस्काररूपानें न जाणो किती जीव धातुस्थानीं आले असतील, ते सर्वच आमचे पोटीं जन्मतात असें नाहीं ! आणि त्या सर्वांबरोबर त्यांचीं कर्मे आहेतच, ज्यांचें कर्म जन्मोदयास आलें असेल ते आपच गर्भाशयांत पोंचतील. आणि ज्यांचीं कर्में वायां जाण्याचीं असतील ते वायां जातील ! ! विनाकारण त्यांच्या भ्रूणहत्येचा संबंध आह्मीं आपल्याकडे जोडून घ्यावा. आणि आपल्या यथेष्ट क्रीडाविहारांत विघ्न कां मानावें ! ! धर्मशास्त्रकारांस याची मौज काय माहित ! ! ! तरी, याचें उत्तर असें कीं, मनुष्यास मृत्यु कधीं तरी येणारच व तो एक दिवस मेल्यावांचून सुटणार नाहीं. असें सर्व आबालवृद्धांस पक्कें ठाऊक आहे. आतां जो मनुष्य केव्हां तरी मरणारच, त्याला आजच ठार मारून त्याच्या सर्व संपत्तीची चैन भोगावयास जर आपल्यास मिळत आहे तर, तसें करण्यांत बाध कोणता ? व तसें करण्यास न्यायाधीशानें देहांत शिक्षा तरी कां द्यावी ? कारण न मरणारास त्यानें मारिलें नाहीं, जो एकदां कधीं तरी मरणारच, त्याला आपल्या चैनीप्रीत्यर्थ मारण्यांत अपराध कसला ? अशीं कारणें दाखविल्यास अपराधी सुटेल काय ? अपराध्यास शिक्षा आहेच, पण अपराध घडण्याचा प्रयत्न करणारा देखील जर शिक्षेस पात्र आहे तर, रतिसुखार्थ केलेली भ्रूणहत्या कशी सुटावी व कां सुटावी ? !

धर्मशास्त्रकार व वैद्यशास्त्रकार सर्वज्ञ आणि अत्यंत सूक्ष्मदर्शी होते, त्यांनीं जगदीशाच्या अचिंत्य प्रेरणेनें त्याच्या हेतूस जाणूनच सर्व नियम बांधले आहेत. त्या नियमांत स्वार्थ आणि परमार्थ असे दोन्ही सिद्ध असतात. ' वीर्य ' हें जें नांव ' धातूस ' दिलें आहे तें उगीच नव्हे ! त्यांत नामाप्रमाणेंच अलौकिक गुण आहेत. ' वीर्याच्या ' बळावर हा स्थूल देह वागत असून जीवमात्राच्या जीवित्वाचें मुख्य द्रव्य धातूच आहे. धातुक्षयानें मनुष्य तत्काल मरण पावतो. यावत् बुद्धिबलोदय पराक्रमाचें प्रधान जीवन ' धातू ' ही आहे. हिचा संग्रह शरीरांत जितका अधिक राहील आणि रोगादि विकारापासून धातू जितकी अधिक सुरक्षित राहील तितकेंच मनुष्यांत बल अधिक राहतें. जड पदार्थदृष्टया ' धातू ' ही प्रत्य-

क्ष जीवरूप आहे., असेंच म्हणावें लागतें. कारण जीवाच्या जन्माचें मुख्य बीज तेंच आहे. त्याचा व्यर्थ व्यय न होऊं दिल्यानें, धर्मदृष्ट्या पातकही लागत नाहीं आणि अर्थदृष्ट्या आपलें बल बुद्धि पराक्रम सुदृढ राहतात. योगशास्त्रदृष्ट्या विचार केल्यास, 'धातू' ही अमृतरूप आहे. इच्या बलावर योग्यांस अजरामर होतां येतें. जे कोणी खरोखर बालब्रह्मचारी असतात त्यांची शक्ति व शरीरेंद्रियें आमरणपर्यंत सतेज, सुदृढ आणि निरोगी राहतात. ह्मणून विचारवानांनीं 'धातूचा' अकालिक व्यय होऊं देऊं नये.

येथें अशी शंका येईल कीं, धातूच्या व्यर्थ व्ययानें जर दोष लागतो, तर प्रतिमासिकांत गर्भ राहतोच असा नेम नाहीं. व कोणत्या महिन्यांत गर्भ राहणार हेंही कळत नाहीं. तर ऋतुकालीं गमन देखील ( गर्भ न राहिल्यास ) सदोष होणार नाहीं काय? त्याचें उत्तर असें कीं, धान्याची पेरणी, पेरणीच्या ऋतुकालांत केली जाते, तें धान्य लागवड करूनही सर्व उपद्रवांपासून सुरक्षितपणें पुरतें आपल्या पदरीं पडणें न पडणें हें केवळ दैवाधीन आहे. पण अकालीं पेरणी केल्यास नुकसान होऊन जनांत तो मूर्ख ठरणार नाहीं काय? रोगग्रस्ताचे औषधोपचारांत बुद्ध्या दुर्लक्ष करून जर तो रोगी मेला तर त्याबद्दल उपचार करणारा दोषी होणार नाहीं काय? नियमाचें पालन स्वस्वाधीन आहे तें आपण केलें ह्मणजे आपण निर्दोषी झालों. त्याचें फल मिळणें न मिळणें दैवाधीन आहे. तथापि नियमाचें फल बहुधा चुकत नाहीं. पशूचे नियम ठराविक असल्यानें ते मनुष्यापेक्षां अमोघवीर्य असतात. आणि त्यांची शक्तिही फार दृढ असते. पशूंनीं अज्ञान असतां नियमोल्लंघन करूं नये आणि सज्ञान मनुष्यानें नियम पाळूं नये, ही किती लज्जास्पद गोष्ट आहे बरें!! गर्भधारणा झाल्यावर स्त्री अगम्या आहे, अशा स्थितींत गमनानें गर्भस्थ जीवास इजा पोंचण्याचा दोष विशेष लागतो. सारांश शरिरांत 'धातू' हा अमुल्य व अति महत्त्वाचा मुख्य पदार्थ असल्यानें येन केन प्रकारानें त्याचें संरक्षण करावें.*

---

* पाश्चात्य पंडितांनीं 'सेक्षुएलसाइन्स' ह्म० कामशास्त्राचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यांनीं महिन्यांतून चारच वेळ गमन करण्याची परवानगी दिली आहे. पुरुष

# जीवाचा गर्भप्रवेश व वृद्धि.

गर्भधारण होतांना, गर्भाशयांत रेताधिक्य झाल्यास पुत्रगर्भ होतो व रजाधिक्य झाल्यास कन्यागर्भ होतो. तो गर्भ, गर्भाशयांत ज्या दिवशीं राहतो त्या दिवशीं पितृरेत व मातृरज यांचें केवल मिश्रण असतें. त्या मिश्रणास ' कलल ' अशी संज्ञा आहे. हें ' कलल ', गर्भाशयांत ' जरायु ' * संज्ञक त्वचा आहे त्यांत वेष्टलेलें राहतें. तें ' कलल ' पुढें पांच दिवसांनीं बुद्बुदाकार ( ह्म० पाण्याच्या बुडबुड्यासारखें ) होतें. त्या बुडबुड्याची आकृति सात दिवसांनीं बोराएवढ्या अंडासारखी होऊन तें अंड मांसमय होतें. पंधरा दिवसांनीं त्या अंडांत रक्त उत्पन्न होतें. पंचवीस दिवसांनीं त्या अंडास पांच कोंब येतात. एक महिना पूर्ण होतांच, डोकें, मान, खांदे, पोट, आणि पाठ यांच्या आकृती भासूं लागतात. दुसऱ्या महिन्यांत, हस्त पाद, पार्श्व, ( कुक्षी ) कटी, जंघा, इत्यादि अवयवांची रचना होते. पण हे सर्व अवयव एकत्र चिकटलेले असतात. तिसऱ्या महिन्यांत सर्वावयवांत संधी पडून अस्थी, त्वचा, लंव हीं उत्पन्न होतात. आणि गर्भ, स्त्री अथवा पुरुष जसा असेल तसा लिंगोद्भव होतो. चौथ्या महिन्यांत, सप्तधातू आणि अंगुलीं व नखें उत्पन्न होतात. पांचव्या महिन्यांत नाक, कान, नेत्र, दंतपंक्ती, मुख, आणि मलमूत्रेंद्रियें उत्पन्न होतात. आणि गर्भांत जीवास चे-

---

[ मागील पानावरून ]

रेत व स्त्रीरज, या पदार्थांस मायक्रास्कोप ह्म० सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिल्यास त्यांत अति सूक्ष्म अंडीं मुंग्यांचे अंड्याप्रमाणें दिसतात. तीं अंडीं पुरुषाचीं दोन व स्त्रीचें एक अशीं गर्भांत पोंचतात तेव्हां मुलगा होतो. आणि दोन अंडीं स्त्रीचीं व पुरुषाचें एक गर्भाशयांत जमल्यास मुलगी होते. याच नियमांनीं अधिक अंडीं जमल्यास जुळीं मुलें होतात. या नियमाविरुद्ध अंडीं गर्भधारणेस कारण होत नाहींत. इ० बहुत सूक्ष्म विचार केले आहेत. हीं अंडींच जीवाचें धातुस्थानीं आल्याचें ' संस्काररूप , स्थूल शरीर होय. जीं अंडीं वायां जातात, ते सर्व जीवच वायां जातात असें मानण्यास काय बाध आहे.

* ' जरायु ' ह्म० ' वार , जिच्यांत मूल वेष्टलेलें बाहेर येतें ती.

**तना** प्राप्त होऊन त्याला क्षुधा, तृषेचा उद्भव होतो. आणि मातृभुक्त अन्नोदकाचा रस ' नाल ' द्वारा नाभींतून जीवास प्राप्त होऊन त्याचें पोषण व वृद्धि होते. साहाव्या महिन्यांत इंद्रियें व त्यांचीं छिद्रें उत्पन्न होतात. मल, मूत्र, नाभि, मुख, दोन नासा, दोन नेत्र, दोन कर्ण अशीं दहा छिद्रें पुरुषशरीरांत असून, स्तन, गर्भाशय अशीं तीन छिद्रें स्त्रीशरीरांत अधिक असतात. हीं छिद्रें इंद्रियांचे गोलक होत. या दश छिद्रांस ' दशद्वारें ' ही ह्मणतात. याच महिन्यापासून गर्भाशयांत गर्भ कुशीस वळूं लागतो. सातव्या महिन्यांत मस्तकावरचे केश ह्म॰ जावळ उत्पन्न होऊन सर्व अवयव जे चिकटलेले असतात ते अगदीं मोकळे होतात. आठव्या महिन्यांत गर्भ परिपूर्ण दशेस पोंचतो. त्याचप्रमाणें प्राणेंद्रियादि अंतःकरणें हीं सूक्ष्म कार्यक्षम होतात. सुखदुःखाच्या अनुभवाची ज्ञानशक्ति अंतःकरणांत आहे. गर्भस्थ जीवाचें अंतःकरण विकास पावलें ह्मणजे त्याजला गर्भस्थितींत जें सुखदुःख होतें त्याचा तो अनुभव करून सुखी व दुःखी होतो.

जावत्कालपर्यंत जीव पितृधातुस्थानीं केवल ' **संस्कार** ' रूपानें होता तोंवर त्याची **महाकारणावस्था** अथवा **महाकारणशरीर** होतें. पुढें गर्भप्रविष्ट होऊन पांचव्या महिन्यापर्यंत जीवाची **कारणावस्था** अथवा **कारणशरीर** ह्मणवूं लागलें. साहाव्या महिन्यापासून प्रसूतिकालपर्यंत **सूक्ष्मावस्थेंत** अथवा **सूक्ष्मशरीरांत** जीवाची स्थिति असते. आणि जन्म होतांच **स्थूलावस्था** अथवा **स्थूलशरीराची** प्रतीति जीवास होऊं लागते. व्यवहारदृष्ट्या, आधीं **जागृति**, मग **स्वप्न**, आणि पुढें **सुषुप्ति**, असा क्रम दिसतो व तसा अनुभवही आपण नित्य करतों. ह्मणून पहिली ' जाग्रदवस्था ' असें ह्मणण्याचा प्रचार आहे. व तो जरी खरा आहे तरी तो क्रम उलटा आहे. सुधा क्रम ह्मटला ह्मणजे आधीं ' सुषुप्ति ' मग 'स्वप्न' व पुढें ' जागृती ' असा आहे. कारण, खरी प्रथम पायरी जीवाची ' महाकारणावस्था ' आहे. दुसरी, गर्भस्थ पांचव्या महिन्यापर्यंत जी ' कारणावस्था ' हीच जीवाची ' सुषुप्त्यवस्था ' आहे. पांचव्या महिन्यापासून जन्मदिवसापर्यंत जीवाची ' सूक्ष्मावस्था ' अ-

र्थांत ' स्वप्नावस्था ' आहे. आणि जन्मोत्तर ' स्थूलावस्था ' ह्म० प्रत्यक्ष ' जाग्रदवस्था ' आलीच. आतां येथून पुढें पुन्हां स्वप्न व सुषुप्ति व सुषुप्तींतून पुन्हां स्वप्न व जागृती असा देहत्रयांत अथवा अवस्थात्रयांत जीवाचा नित्य संचार होतो ह्म० **स्थूल, सूक्ष्म** व **कारण** दशेंत, जन्मादारभ्य मरणपर्यंत जीवाची नित्य प्रदक्षणा चालते. आणि **महाकारणावस्थेंत** मात्र एकवारच प्रवेश व निर्गम होतो. नित्य होत नाहीं. आतां जीवाची पंचम मासापासून जन्म दिवसापर्यंत जी सूक्ष्मावस्था सांगितली व तिचें साम्य स्वप्नावस्थेशीं जरी दाखविलें आहे, तरी ती सूक्ष्मावस्था ह्म० केवळ स्वप्नच आहे असें नाहीं. कारण स्वप्नांतील सुखदु:खें प्रातिभासिक ह्म० केवळ आभासरूप जशीं मिथ्या असतात, तशीं गर्भस्थ जीवांस होणारीं सुखदु:खें आभासरूप नाहींत. तीं सुखदु:खें स्थूल शरीरावर प्रत्यक्ष घडणारीं असून त्यांचें ज्ञानही अंत:करणास होतें. दु:ख व्यक्त करण्याचें साधन जीं इंद्रियें त्यांचा मात्र गर्भस्थितींत अत्यंत रोध आहे. **संवेदनेचें** साधन जें ' **अंत:करण** ' तें रुद्ध नसल्यानें गर्भस्थ जीवास सुखदु:खानुभव होतो, ही गोष्ट सिद्ध आहे.

# गर्भाची व गर्भिणीची कष्टमय स्थिति.

**हे राजन् शीलनिधे !** दु:ख व्यक्त करण्याचीं अथवा निवारण करण्याचीं साधनें मोकळीं असल्यास दु:ख कांहीं कमी होतें अथवा निवारण करतां येतें. हात, पाय मोकळे असल्यास पीडा करणाराचें निवारण यथाशक्ति करतां येतें. कण्हण्यानें, आक्रोशानें व विलापानें अंत:करणांतील दु:ख व पीडा इ० क्लेश बाहेर पडून दु:ख कांहीं हलकें पडतें. आणि नाक, तोंड दाबून, व हात, पाय बांधून जर कोणीं ताडन केलें तर तें दु:ख कितीपट अधिक जांचेल याचा कोणास बरोबर अदमास करतां येईल काय ? अशी स्थिति खाऊन पिऊन पुष्ट झालेल्या व सुदृढ ज्ञानसंपन्न जीवशरीराची जर आहे, तर ' गर्भस्थ ' जीव, ज्याचें शरीर लोण्यापेक्षांही मृदु आहे, ज्याची

त्वचा दुधाच्या साईप्रमाणें कोमल आहे, ज्याच्या अस्थि कांकडीपेक्षांही नाजुक आहेत, ज्याचा अन्नाशय अति कोंवळा आहे, ज्याचे हस्तपादादि अवयव ' नाल ' रूपपाशानें बद्ध आहेत, ज्याचीं ज्ञानेंद्रियें रुद्ध झालीं आहेत, ज्याचा प्राणवायु केवळ आंतल्याआंत संचार करीत आहे, ज्याचें अंतःकरण अंधारांत पडलेल्या अग्निकणाप्रमाणें अति मंदप्रज्ञ आहे, आणि ज्यास चार सहा अंगुलांपेक्षां अधिक अवकाशही हालचाल करण्यास सांपडत नाहीं, अशा पराधीन अज्ञान शिशुजीवास गर्भाशयांत दुःखवेदना किती सहन कराव्या लागतात त्याचा पार आहे काय ? गर्भस्थ जीवाचें जीवन केवल मातेनें भक्षण केलेल्या अन्नोदकाच्या रसावर अवलंबून असतें. माता जें कांहीं खाते त्याचा रसपरिपाक होऊन गर्भाच्या नाभिछिद्रांतून ' नाल ' द्वारा तो रस त्या बालकाचे उदरांत पोंचतो आणि तेथून रसवाहिनी नाड्यांतून त्याच्या सर्वांगांत पसरून त्याच्या शरीरपोषणास व वृद्धीस कारण होतो. प्रसंगवशात् आपल्या खाण्यांत तिखट, आंबट इत्यादि कटु पदार्थ अतिरिक्त आल्यास पोटांत कशी आग होते व चमत्कारिक स्थिति होते याचा सर्वांस अनुभव आहेच. अशा कटु, आम्ल व तिखट पदार्थांचा अर्क काढल्यास तो किती अधिक तीक्ष्ण होणार आहे ? हें सहज कळूं शकतें. असले पदार्थ गर्भिणी मातेच्या खाण्यांत येऊन, त्याचा तीक्ष्ण अर्क जेव्हां त्या बालकाच्या अति कोंवळ्या अन्नाशयांत पोंचतो तेव्हां त्याचा कसा चरका लागत असेल ? व त्यामुळें तो जीव किती व्याकुळ होत असेल बरें ! त्यांतून गर्भिणी स्त्रियांस तऱ्हेतऱ्हेचे डोहोळे लागतात व त्यांच्या परिपूर्तीचे अनेक चोंचले होतात, ते होतांना याचा परिणाम गर्भस्थ जीवावर काय घडणार आहे याचें भान तरी मातेस असतें काय ? सामान्य गृहस्थितींत जे कांहीं गृहकृत्यादि परिश्रम स्त्रियांस घडतात व ते अपरिहार्यही असतात, त्या परिश्रमांच्या वर्दळीनें त्या जीवास किती कष्ट होत असतील बरें ? असे एक कीं दोन अनेक प्रकारचे कष्ट आहेत. जे जे कांहीं माता अतिरिक्त खानपानादि परिश्रम करणार त्याचा सर्व परिणाम त्या गर्भस्थ जीवावर घडतो. **हे राजन् !** गर्भिणी स्त्री ( मादी ) वर पशु देखील बलात्कार करीत

नाहींत. पण सज्ञान ह्मणविणारे दंपती, आपल्या विषयवासनेच्या अतृप्तीनें यथेष्ट व अमर्याद क्रीडा करून चैन भोगतात. पण गर्भस्थ जीव साळीप्रमाणें कांडला जातो याचें भान तरी असतें काय ? क्वचित् प्रसंगीं याचा भयंकर परिणाम घडून गर्भपात होतो व त्यापासून स्त्रीस प्राणांत क्लेश होऊन मरण्याचाही संभव असतो. असे कष्ट शुद्ध मार्गांत जन्मणाऱ्या गर्भास आहेत. आणि जे जीव अशुद्ध मार्गानें ह्म० जारपंथानें येणारे असतात त्यांच्या तर घोर यातनांचा अंतच नसतो. गर्भ राहिला, हें समजलें मात्र पाहिजे कीं त्याच्या पाडण्याच्या प्रयत्नास आरंभ झालाच ! शस्त्राप्रमाणें काट करणाऱ्या तीव्र औषधींचा भडिमार चालतो. त्यांत तो गर्भ निखाऱ्यांत भाजल्याप्रमाणें करपून कसा तरी एकदां पतन पावला ह्मणजे दुष्ट मातेस मोठा हर्ष होतो ! ! आणि जन्मणारा प्राणी महा घोर पातकी असल्यास तो जन्म घेईपर्यंत या मातृकृत प्रचंड यातनेस गिळून जन्मतो आणि प्रत्यक्ष जननीच्या हातून कंठ दाबून, मुरगळून, आणि सरतेशेवटीं ठेंचून ठेंचून घोरतर कष्टानें मृत्युमुखीं अर्पण होतो ! ! पण धन्य आहे त्या गुप्त कृतांत जननीजनकांची ! ! आणि उपचार साह्यकांची ! ! असो. अशा यातना सहन करीत करीत प्रसूतिकालांत दुर्दैववशात् तो जीव गर्भाशयांत आडवा झाला अथवा आणखी कांहीं अडथळा होऊन प्रसूतींत विलंब लागला कीं दायांचे, वैद्यांचे ( व डाक्टरांचे ) उपाय चालले, त्यांतून सुरक्षित बाहेर आला तर बरें, नाहींपेक्षां तीव्र शस्त्रांनीं अवयवांचें छेदन करून मस्तकाचें चूर्ण करून तुकडे तुकडे बाहेर काढले जातात.

**हे राजन् !** या कष्टमय स्थितीचा विचार कोणाच्या तरी अंतःकरणांत येत आहे काय ? क्षणमात्र जरी नीट विचार करील तर हृदय फाटल्यावांचून राहणार नाहीं. स्त्रियांचा गर्भाशय ह्म० केवळ मलमूत्रांचा गर्त आहे. त्यांत अनेक विकार भरले आहेत. त्यांत क्षार व अति सूक्ष्म कृमि असतात. ते त्या कोमल जीवाचे मृदु शरीरास दंश करितात व झोंबतात. त्यांच्या असह्य वेदना त्यास सहन कराव्या लागतात. या सर्व यातना भोगण्यास केवल जीवाचें **कर्म** कारण आहे. ज्यांच्या कर्मांत न्यूनाधिक सुकृतांश असतो ते जीव सुखी कु-

टुंबांतल्या स्त्रियांच्या उदरीं व श्रीमानांच्या घरीं प्रविष्ट होतात. त्या योगानें त्यांच्या माता सुखी राहतात, व त्या सुखवस्तु राहिल्या ह्मणजे अर्थांत गर्भही बरेच सुखी राहतात. गर्भिणीस जे जे डोहोळे लागतात त्यांस गर्भस्थ जीवाच्या **वासना** कारण असतात. त्या वासनेनुरूप जें जें कांहीं माता करते त्याचा सूक्ष्म भोग मातृद्वारा त्या जीवास घडतो.* मातेचे डोहोळ्यावरून जन्मास येणाऱ्या जीवाच्या लक्षणाचा सूक्ष्म विचार शास्त्रकारांनीं केला आहे. विशेष दरिद्री, क्रूर, शांत, शूर, प्रतापशाली, भाग्यवान् , जसा अधिक गुणविशिष्ट प्राणी जन्मास यावयाचा असतो त्याचीं चिन्हें गर्भापासूनच व्यक्त होऊं लागतात. आणि त्यावरून जन्मणारा **प्राणी** पुण्यवान् अथवा पापी कसा आहे याचा बोध होतो. असे बहुत सूक्ष्म विचार आहेत. पण ते विचार करणारांचीच मात्र वाण आहे. **स्त्री** गर्भिणी असतां तिचें अंत:करण सुप्रसन्न करून तिला काय व कसले डोहोळे लागले आहेत हें पतीनें विचारून तिची इच्छापूर्ती करावी इ० सूक्ष्म विचार जे शास्त्रकारांनीं केले आहेत, ते अर्थदृष्टच्या दंपतींत विशेष प्रीतिजनक असून धर्मदृष्टच्या, जन्मास येणाऱ्या प्राण्यांचीं चिन्हें सुचविणारे आहेत. **दंपती** सौख्याचे स्थितींत असतां जो प्राणी गर्भांत येतो व जन्मतो त्याला जें सुख होतें, हें त्याच्या **पुण्याचें** फल होय. आणि दंपती कष्टाचे स्थितींत असतां जो जीव गर्भांत येतो व जन्मतो त्यास जे क्लेश भोगावे लागतात, ते त्यांच्या **पापाचें** फल होय. दंपती सुखदु:खाच्या स्थितींत राहणें हें त्यांच्या **कर्माचें** फल आहे, आणि गर्भांत असतांना व जन्मतांना सुखदु:ख भोगणें हें जन्मणाऱ्या जीवाच्या **कर्माचें** फल होय. आपापलीं **कर्मफलें** अगदीं पृथक् आपापल्याबरोबर असतात. कोणाचा कोणाशीं संबंध नसतो. तथापि कर्माचा भोग मात्र परस्परांचे द्वारा परस्परांस होतो. ह्मणजे जीवास गर्भांत व जन्मतांना जें सुखदु:ख मिळतें तें मातृपितृद्वारा मिळतें. व मातापितरांस जें सुखदु:ख होतें तें पुत्रद्वारा मिळतें. इतकाच काय तो सर्वांच्या कर्माचा सर्वांशीं संबंध आहे. असो.

मातापितरांचे सुखवस्तुस्थितींत, जीवास गर्भांत व जन्मतांना

* ह्मणून ' मुलाचीं चिन्हें डोहळ्यावरून ' अशी ह्मण पडली आहे.

सुख मिळतें असें जें सांगितलें, हें ह्मणणें केवळ ' दगडापेक्षां वीट मऊ ' अशांतलेंच आहे. ह्म० अधिक क्लेश होणार होते ते कांहींसे कमी झाले इतकेंच. कारण जे अपरिहार्य क्लेश आहत ते कोणासही भोगल्यावांचून चुकत नाहींत. गर्भवासांत येणें हेंच आधीं पापाचें फल आणि दुःखाचें बीज आहे. ' कारल्याचीं फळें कडू आहेत ' असें जाणूनही त्यांस कांहीं अनुपानें लावून त्याचा कडू-पणा जो कांहीं कमी होतो, त्यासच गोड मानून खाणें हें जसें बळ-जबरीचें आहे, तसें जन्ममरणाचे कष्टमय स्थितींत पुण्यादि कर्मांचीं अनुपानें लावून सुख मानणें हें आहे. सत्कर्म पदरीं असल्यास दुःख कमी होऊन सुखवस्तू जन्मतां येतें, नाहींपेक्षां गर्भांत जन्मतांना जे क्लेश आहेत ते वर सांगितलेच आहेत. त्यांचा सर्वांनीं अनुभव केल्यावांचून कोणी एक देखील जन्मास आला नाहीं. पण त्याची स्मृति न राहिल्यानें पुन्हां तेच कष्ट भोगण्याच्या कर्मांचे प्रयत्न चालू आहेत. खरोखर ही मोठी शोचनीय स्थिति आहे. स्वतःचें दुःख जरी आठवत नाहीं, तरी पुत्रादिकांचीं गर्भदुःखें व जन्म-दुःखें डोळे उघडून पहात असतांही सावधपण येत नाहीं ! ! अ-ज्ञान अज्ञान ह्मणतात तें हेंच.

हे **राजन्**, या गर्भवासाच्या स्थितीचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे. त्याचा प्रत्यक्ष अनुभव जर आज घेतां आला असता तर त्या कष्टांपेक्षां मृत्यु बरा वाटला असता. आज त्या दुःखाची स्मृति नाहीं ह्मणून दुःखें झालींच नव्हतीं असें ह्मणणें निवळ मूर्ख-पणाचें आहे. कारण सुखदुःखाचा अनुभव होण्यास जें मूल सा-धन **अंतःकरण** तें साहाव्या महिन्यांत ' मंदप्रज्ञ ' ह्म० केवल अ-नुभव करणारें असतें ह्म० दुःखाचा अनुभव तर होतो पण हें दुःख कोणापासून व कशापासून होतें हें ज्ञान नसतें. ज्ञानेंद्रियेंही तयार असतात, पण तीं रुद्ध असतात. ' रुद्ध ' असतात ह्म० सुषुप्ती-सारखीं लीन नसतात ! कारण, लीनेंद्रियांत कार्यशक्ति नसते, आणि रुद्धेंद्रियांत कार्यशक्ति असते. पण त्या शक्तीचें स्तंभन अ-सतें. जसे, डोळे, तोंड व हात बांधून कोणी ताडन करूं लागला तर दिसणार नाहीं, ओरडतां येणार नाहीं व हातानें त्याचें निवारणही

करतां येणार नाहीं. कां ? तर, इंद्रियें रुद्ध आहेत ह्मणून. आतां इंद्रियांचा रोध आहे ह्मणून दुःखानुभवांत कांहीं न्यूनता आहे काय ? किंबहुना शतपट दुःख अधिक जाचणार आहे. तसें गर्भस्थ जीवास अंतःकरणाचे व इंद्रियाचे विकासानें व रोधानें दुःखाच्या वास्तविक वेदनेपेक्षां सहस्रावधीपट अधिक अनुभव करून पराकाष्ठेचे क्लेश होतात. अशा भयंकर संकटांत त्याचें रक्षण व पोषण करणारा एक **दयाघन, अहेतुककृपाळू, सर्वव्यापी, सर्वांतरात्मा,** अशा **भगवान् ईश्वरा**वांचून दुसरा कोण समर्थ आहे. त्याचें साहाय्य असल्यानेंच जीवाची घोरतर गर्भयात्रा कशी तरी सुरक्षित पार पडते. गर्भस्थ जीव, रुद्धेंद्रियादि अंतःकरणांनीं जसा दुःखानुभव करितो तसा सुखानुभवही करतो. पण तें सुख ह्म० काय ? मातृपरिश्रमानें व कटुखानपानादि अन्नरसानें जी पीडा होणार ती न झाली व माता स्वस्थ असली ह्मणजे जें होणारें सुख, तें ' **सुख** '. अशा स्थितींत गर्भस्थ जीवास निद्रा लागते व तो स्वप्नेंही पहातो. या स्वप्नस्थितींत जो कांहीं देखावा दिसतो व त्यांत जो आनंद व भय वाटतें, त्या देखाव्याच्या दिसण्यास कोणत्या जन्मींच्या देखाव्याचा ' **अनुभवजन्य संस्कार** ' कारण मानावयाचा ? होणाऱ्या जन्माचा संस्कार तर म्हणतां येत नाहींच. पूर्वजन्माचा मानल्यावांचून गतीच नाहीं कदाचित् स्वप्न दिसतच नाहीं व भय अथवा आनंद वाटत नाहीं असें मानावें तर, लागलेंच जन्म झाल्यावर पांच दिवसांचे आंतच शिशु सुपांत निजलेलें हंसतांना व भीतांना दृष्टि पडतें. याला कांहीं दुसरें कारण बरोबर दाखवितां येत नाहीं. हा प्रत्यक्ष गर्भस्थ स्वप्नदर्शनाचाच व पूर्वजन्म संस्काराचा पुरावा आहे. आणि मूल गर्भांतून बाहेर पडल्यावर नालपाशांतून त्याचे हातपाय मोकळे करतांच, तें स्वशक्तीनें आपले हातपाय हलवूं लागतें, डोळे उघडून पाहूं लागतें, आणि तोंड मोकळें होतांच रडूं लागतें. हें त्यास दुसऱ्यानें करावयास लावावें लागत नाहीं. आतां जी क्रिया तो स्वयं बाहेर येतांच करतो, ती क्रिया करण्याची जिज्ञासा त्याला गर्भांत असतांच असली पाहिजे. व ही जिज्ञासा त्यास होणें ह्म० गर्भांत **जाग्रदवस्था** असण्याचा पूर्ण पुरावा आहे. क्वचित् मूल बाहेर आल्यावरही कांहीं

वेळ हालचाल करीत नाहीं व दायांनीं त्याचे हातपाय ओढून हालविले ह्म० रडूं लागतें. अर्थात तें मूल गर्भांत सुषुप्तींत ह्म० निजलेलें असतां बाहेर आलें व जागविल्यानें जागलें आणि जें आपण होऊन क्रिया करूं लागलें तें जागेपणीं जन्मलें असें सिद्ध होतें. हा गर्भस्थ **जागृती** व **सुषुप्तीचा** प्रत्यक्ष पुरावा आहे. स्वप्नदेखावे पाहतांना व सुषुप्तींत असतांना गर्भस्थ जीवाची व आपली आज मित्तीस समान स्थिति आहे. फक्त जागृतींतच काय तें अंतर आहे. ह्म० त्या जीवानें गर्भांत जागेपणीं भोंवतालची नर्कादि दुःखाची स्थिति अनुभवावी व आपण बाह्य स्थूल सृष्टीचा अनुभव करावा इतकेंच. जन्मल्यावर त्याच्या ज्ञानेंद्रियादि अंतःकरणांत धारणा अति सूक्ष्म असते व आपल्यांत अधिक असते, इतकाच कांय तो फरक आहे. जसे आपल्यास स्थूलानुभव होतात तसे त्यास सूक्ष्मानुभव होतात. गर्भस्थिति ह्म० केवळ मूर्छितावस्था आहे. सुखदुःख अनुभवावें लागत नाहीं असें ह्मणणें सर्वथा चूक आहे. असो.

**हे राजन् !** गर्भस्थ जीवाची सामान्य हकीकत वर जी सांगितली यापेक्षां ती किती पटीनें अधिक असेल याचें पूर्णज्ञान एका **सर्वज्ञ ईश्वरा**वांचून अन्यास होऊं शकत नाहीं. अशी ती कष्टमय स्थिति आहे. यास्तव प्रत्येक विचारवानांनीं ती स्थिति प्राप्त न होण्याचे जे जे उपाय असतील ते ते केल्यानें आपले व जिच्या गर्भांत आपणास यावयाचें असेल, त्या जननीचे कष्ट वांचतील. नाहींपेक्षां दोघांसही त्रासच भोगावा लागतो. वर सांगितल्याप्रमाणें एकट्या गर्भस्थ जीवासच क्लेश आहेत असें नाहीं. गर्भिणी स्त्रीसही महाक्लेश सोसावे लागतात. पण ती सज्ञान असल्यानें, ‘ मी पुत्रवती होणार’ या आनंदाच्या भ्रांतींत होणारे कष्ट सहन करिते. गर्भधारण होऊन महिना लोटतो न लोटतो तोंच, गर्भिणीची प्रकृति अस्वस्थ होऊन नेहेमीं मळमळूं लागतें, वांत्या होऊं लागतात, पोटांत कळा होऊं लागतात. खाल्लेलें अन्न न पचतां उल्बण होतें, कंबर दुखूं लागते, अन्नावरची वासना जाते, अन्नाचा वास आल्यास पित्त उसळून कपाळ दुखूं लागतें. इ० अनेक पिडा स्त्रियांच्या प्रकृतिमानानुरूप चार महिनेपर्यंत होतात. पुढें गर्भाची वृद्धि होत चालली ह्म० डो-

होंळे लागतात व ते पूर्ण न झाल्यास खेद वाटतो. गृहकृत्यांचे कष्ट विशेष जांचतात. चढउतर जास्त केल्यास गर्भास धक्का लागल्यानें इजा होते. उठण्यांत बसण्यांत परिश्रम होतात. ( तरी आप्तसोयऱ्यांत जास्त डोहाळजेवण्याचा समारंभ होण्याची इच्छा असतेच, आणि त्या आनंदांत कष्ट विसरतात. ) गृहस्थिति चांगली असल्यास गर्भिणी सुखांत राहते. आणि विपन्नावस्था असली तर दळणें, कांडणें, कष्ट देखील गर्भिणीस करावे लागतात. अशीं अनेक प्रकारचीं दुःखें कमजास्त मानानें सर्व स्त्रियांस भोगावीं लागतातच, पण सर्व दुःखांचा मेरू ' जो प्रसूतिकाल ' हा कसा तरी ओलांडला गेला ह्म० गर्भिणीनें मोठा ' पण ' जिंकिला असें होतें. प्रसूतिसमय ह्म० प्रत्यक्ष ' काळच ' आहे. त्यांतून पार पडणें आणि दोन्ही जीवांचा सुरक्षित निवाडा होणें, हें खरोखरच स्त्रियांचें ' पण ' जिंकणें होय. ( ह्मणून ' बाळंतपण ' ह्मणण्याची चाल आहे. ) प्रसूतिसमयाच्या वेदना, कळा, आणि स्थिति अवर्णनीय असल्यानें त्याचें अधिक वर्णन अमर्याद होणार आहे. त्या कालांत स्त्रियेस वात होत असतो त्याला ' प्रसूतिवात ' असें ह्मणतात. त्या वातानें ती कांहींशी मूर्छित होते व तोच वात गर्भाशयांत प्रवेश करून गर्भास बाहेर ढकलतो. याक्षणीं कळा होत राहाणेंच इष्ट असतें. कळा बंद पडल्यास कांहीं तरी विपरीत परिणाम आढवेता. कळा बंद होणें हीं ' गर्भ ' मृत होण्याचीं चिन्हें असतात. त्याचा लवकर उपाय न झाल्यास मृत गर्भाच्या विषानें हिचें पोट फुगून लागलीच ही मरण पावते. आणि सामान्य उपायानें लवकर सुटका झाल्यास बरें, नाहींपेक्षां विटंबनेस पारावार नाहीं. ज्या बिचाऱ्या साध्वीचें नख देखील तारुण्यांत पतीवांचून अन्यास दिसणें शक्य नसतें, तिला दीनवाणें आपल्या सर्व अपेष्टा डोळे झांकून सहन करीत पराधीन* व्हावें लागतें. हा महा दुर्धर प्रसंग सुरक्षितपणें पार पडण्यास जन्मणाऱ्या जीवाचें व जननीचें सबळ पुण्यच असावें लागतें. त्यावांचून या प्रसंगीं अन्य कांहीं व कोणी उपयोगास पडत नाहीं. सारांश जीवाचें जन्मास येणें ह्म० स्वतःकारितां व

* डाक्टरादिकांच्या आधीन.

जननीजनकांकरितां दुःखसामुग्री बरोबर घेऊन येण्यासारखें आहे.

## जीवाच्या जन्माचे ग्रहयोगादिक.

**हे राजन् !** शीलनिधे ! याप्रमाणें नऊ मासपर्यंत कष्टमयस्थितींत जीवाचें पोषण आणि वृद्धि मातृद्वारा गर्भाशयांत होऊन गर्भस्थ जीव देह अवयव, इंद्रियादिकांनीं व शक्तींनीं सुसंपन्न झाला इ० कोणी जीव नववा महिना लागतांच अथवा सरतां जन्मतो व क्वचित् जीव दहाव्या महिन्यांतही जन्मतो. आठव्या महिन्यांत जन्मलेलीं मुलें क्वचितच जगतात. नवव्या अथवा दाहाव्या महिन्यांत जन्मणें जीवाचें सुरक्षितपणास कारण असतें. जीवाचे जन्माचा जो काल, जो देश, जें घर, जें स्थल, आणि जो क्षण त्याचे प्रारब्धकर्मानें नेमला असेल ते सर्व योग एकत्र जमतांच हा जीव जन्मतो. याच योगाबद्दल असें ह्मटलें आहे ' विवाहमर्थमन्नं च जननं मरणं तथा ॥ कंठे बध्वा दृढं मूत्रं यत्रस्थं तत्र नीयते ' हा जीव जन्मतो त्यावेळीं जगल्लग्नकुंडलींत ग्रह, नक्षत्र, राशी इ० जे योग चालू असतात, तेच ग्रह या जन्मणाऱ्या जीवाचे जन्मलग्नस्थ ग्रह मानले जाऊन जीवाची जन्मकुंडली ज्योतिषशास्त्रप्रमाणानें केली जाते. आणि त्या ग्रहलग्नमानावरून, जन्मलेला जीव ( विशेषतः मनुष्य ) भाग्यवान्, प्रतापी, दाता, विद्वान, बुद्धिमान, चिरायु अथवा अल्पायु, दरिद्री, मूर्ख, कृपण, चोर जार इ० लक्षणसंपन्न कसा काय निघणार हें **जन्मलग्न** बिनचुक शुद्ध साधल्यास अगदीं यथार्थ समजतें. या जन्मक्षणापासून खगोलस्थ ग्रह,राशी, नक्षत्र, इत्यादिकांचा व जीवाचा जो अभेद्य संबंध जुळतो तो मरणक्षणापर्यंत सुटत नाहीं. त्यांच्या प्रचलित गतीनें इष्टानिष्ट फलांचा परिणाम या जीवावर सदैव घडत असतो आणि तदनुरूप जीवांस सुखदुःख भोगावें लागतें. जीवाच्या जन्मापूर्वीं व मरणानंतर ग्रहांचा संबंध सुटतो असें नाहीं; कारण प्रत्येक जीव 'पुनर्जनित' व 'पुनर्मृत' असल्यानें जीवास सृष्टीच्या बाहेर जातां येत नाहीं. आणि सर्व ग्रहांचा सृष्टीशीं जो अखंड संबंध आहे तो

कधीं सुटत नाहीं, फरक एवढाच कीं; जीवाची स्थिति जन्मापासून मरणपर्यंत जशी व्यक्त दिसते तसा ग्रहांचाही संबंध व्यक्त दिसतो. पुढें जीव, व जीवाशीं ग्रहाचा संबंध अव्यक्त राहतो. सामान्य गणिताचार्यास त्याचा बोध होत नाहीं. असो.*

येथें थोडा विचार करण्याची जागा आहे कीं, ' ग्रहांच्या प्रचलित गतीनें जीवावर इष्टानिष्ट परिणाम घडून त्याचा सुखदुःखभोग जीवास घ्यावा लागतो असें जें सांगितलें आहे, त्यावरून जीवास सुखदुःख देण्यास कारण ग्रहच आहेत असें नाहीं. जीवांनीं अनंत जन्मांपासून शुभाशुभ **कर्मांचा** जो भांडार सांठविला आहे त्या कर्मानुरूप ज्या ज्या कालीं जो जो भोग जीवांनीं भोगण्याकरितां वर्तमानकाळीं समोर उपस्थित झाला असेल व भविष्यकाळीं उपभोगार्थ यावयाचा असेल, त्या भोगाचे पूर्व दर्शक **ग्रह** हे आहेत. कर्मसंचयावांचून केवळ एकटे **ग्रह** फल देऊं शकत नाहींत. पण **ईशनियम** अतर्क्य व असे गहन आहेत कीं, जसें कर्मफल सिद्ध असेल त्याच्याच अनुरोधानें ग्रहांची गति, वर्तमानफलें व आगामी फलें दर्शवीत चालते. जन्मलग्न शुद्ध साधल्यास व ज्योतिषी उत्तम असल्यास विनचूक फलें मिळतात. जीवकृत **कर्म** कर्मानुरूप **फल**, आणि फलदर्शक **ग्रह** असा तिघांचा अखंड संलग्नसंबंध अनादि कालापासून चालत येत आहे. **ग्रह** हे कर्मरूप राजाचे विश्वासूक मंत्री आणि जीवाच्या शुभाशुभ फलांशीं गांठ घालणारे मध्यस्थ व हितकर्ते आहेत. यांच्या सूचनेवरून आपल्या शुभाशुभ कर्मफलाचा आपल्यास आगाऊ बोध होतो; तथापि कोणतें पूर्वकर्म अनिष्ट फल देणारें आहे, याचा आपल्यास बोध होत नाहीं, ह्मणून ज्या ग्रहांनीं जे अनिष्ट फलसूचित असेल त्या ग्रहांच्या नांवानें दान, जप होमादि कर्मांचा उत्सर्ग केला ह्म० हें कर्म पूर्व कर्माच्या सामान्य अनिष्ट फलांच्या प्रतिकारार्थ उपयोगीं पडतें, आणि अनिष्ट फल व्हावयाचें असेल तें टळतें अथवा कमी होतें. व जीं अत्यंत अनिष्ट प्रबल कर्में असतात त्यांचा प्रतिकार क-

---

* याचा विचार गेल्या सृष्टिप्रकरणांत व या प्रकरणाचे पुनर्जन्मसिद्धींत विशेष केलाच आहे. वाचकांनीं पहावा.

शानेंही होत नाहीं. ह्मणून ' अवश्यं भावि भावानां प्रतिकारो भवेद्यदि ॥ तदा दुःखैर्न लिंपेरन् नलरामयुधिष्ठिराः ' ॥ असें कविश्रेष्ठांनीं ह्मटलें आहे.

येथें अशी शंका येईल कीं, कोणतें पूर्व कर्म प्रबल आहे व कोणतें निर्बल आहे, हें जर पूर्वीं आपल्यास कळूं शकत नाहीं व प्रबल कर्माचा भोगही उपायानें चुकत नाहीं तर दान, जप होमादिकांत द्रव्याचा खर्च करणें वृथा नव्हे काय? भवितव्य असेल तसें होणारच, मग ग्रहाचे अर्चनापासून फल तें काय होणार. याचें उत्तर असें कीं, व्याधिग्रस्त झालेला आपला मनुष्य, चांगल्या औषधोपचारानेंही जगणार कीं मरणार हें जरी यथार्थ आपल्यास पूर्वीं कळत नाहीं, तरी चांगला उपचार करणें हें आपलें कर्तव्य आहे. आणि हा प्राणी मरणार असें जरी आपल्यास खास समजलें तरी चांगलेच उपचार केले पाहिजेत. कारण चांगल्या उपचारानेंही मृत्यु अपरिहार्य आहे; तथापि औषधोपचारानें व्याधिजन्य कष्ट निवारण होऊन जीव सुखानें मरतो. नाहींपेक्षां, व्याधींचें आणि मरणाचें असें दुप्पट दुःख जीवास भोगावें लागतें. आणि दैववशात् आराम व्हावयाचा असला ह्म० तो औषधोपचाराच्या अव्यवस्थेनेंही होतो. विपन्न व दरिद्री मनुष्यास उपचार कोठून होणार! अशांना आराम झाला तरी अनिवार्य दुःख भोगणें पडतें. अधिकाऱ्याचें साधन, अपराध रद्द करण्यास जरी समर्थ नाहीं तरी अपराधाचें स्वरूप मृदु केल्यावांचून जसें राहत नाहीं, तसें कर्मरूपी राजाच्या प्रधान अधिकारी ग्रहांचें जप, दान होमादिकांनीं साधन झालें ह्म० चांगलें फल अधिक चांगलें मिळतें. आणि वाईट फलापासून पीडा कमी होते व लवकर नष्ट होते. ह्मणून प्रत्येक गृहस्थाश्रम्यांनीं स्वशक्त्यनुरूप ग्रहाचें साधन सदैव करीत असावें. सारांश जन्मणाऱ्या जीवांचें जसें पूर्व संचित कर्म असेल आणि त्या संचित कर्मांतून जन्मक्षणापासून मरणक्षणापर्यंत फल उपभोगार्थ जितकें कर्म प्रारब्धरूपानें जसें बरोबर आलें असेल, त्या कर्मफलानुरोधानें ग्रहांची स्थिति जीवाच्या जन्मकाळीं येऊन मिळते, आणि त्या ग्रहस्थितीवरून जन्मणारा जीव, भाग्यवान्, दरिद्री इ० वर सांगितलेल्या लक्षणांनीं

कसा काय निपजणार हें कळतें.* आणि जीवाच्या गर्भांत प्रवेश होतो तोही प्रारब्धकर्मानुरूपच होतो. ह्म० साधु पुरुषाच्या, श्रीमानाच्या, सामान्य स्थितीच्या, गरिबाच्या, सदाचारी व दुराचारी इत्यादि कुटुंबांत जीवाचा प्रवेश होऊन, जन्मकालाचे वर सांगितलेले जसे योग असतील ते सर्व एकत्र होतांच जीवाचा जन्म होतो.

---

## जीवाचा जन्मकाल व उत्सव.

**हे राजन्** ! जीवाच्या गर्भवासाची यत्ता पूर्ण झाली व जन्मकाळाचे सर्व योग जुळले ह्मणजे ज्या कुटुंबांत जीव जन्मतो त्या कुटुंबाची जशी स्थिति व योग्यता असेल त्या योग्यतेनुरूप आनंदातिशयानें जीवाचा जन्मोत्सव ह्म० पुत्रोत्सव होऊं लागतो. पुत्रजन्माचा आनंद हा यावत्प्रापंचिक व ऐहिक सर्व सुखांचा अतिश्रेष्ठ कळस असल्यानें, पित्यास व जननीस अति हर्ष होतो व आह्मी पुत्रवान् झालों याबद्दल मोठी धन्यता वाटून मागील सर्व दुःखांचा विसर पडतो. आणि आपापल्या सामर्थ्याप्रमाणें धार्मिक, व्यावहारिक, व लौकिकी उत्साह जो तो करतो. धर्मानुरूप जातकर्म नामकरणादि संस्कार, शांतिपाठ, ब्राह्मणसंतर्पण, जप होम दान धर्म होतात. वाद्यांचे गजर होऊं लागतात. मेजवान्या, नाचरंग व तमाशे चालू होतात. आप्त बंधु सोयऱ्यांत सन्मानाचे व्यवहार परस्पर होतात. सेवकवर्गास व याचकांस देणग्या दिल्या जातात. तात्पर्य ज्याला जशी हौस असेल व जितकें ज्याचें न्यूनाधिक सामर्थ्य असेल तदनुरूप

---

* वारा, पाऊस, उष्णता, तुफान, इ० आगामी फलसूचक यंत्रें जशीं अलीकडे पाश्चात्य पंडितांनीं काढलीं आहेत, तशीं आमच्या ज्योतिःशास्त्रविशारद महर्षि आचार्यांनीं सृष्टींत घडणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांचीं आणि जिवाच्या जीवित्वांत घडणाऱ्या सर्व परिणामांचीं आगामी फलसूचक जगल्लग्नकुंडलीचीं आणि जीवाच्या जन्मलग्नकुंडलीचीं यंत्रें अनादि कालापासून सिद्ध करून ठेविलीं आहेत. प्रस्तुत भारत वर्षाच्या दुर्दैवानें तीं यंत्रें व यंत्रकार मोडकळीस आले आहेत. पण खुबी हीच कीं, हीं यंत्रें मोडकळलेलीं असूनही स्वतःच्या व भारत वर्षाच्या मोडकळीचीं कारणें दाखवीत आहेत.

बारावे दिवसांपर्यंत ह्म० बारशापर्यंत उत्सव होतो. जास्त श्रीमान व राजाकडे पुष्कळ दिवस समारंभ होत असतो. पुत्रजन्मोत्सवाचें सुख महत्पुण्यानें व महत् भाग्यानें प्राप्त होत असतें. सामान्य जनसमुदायापक्षां श्रीमान् वर्गांत या सुखाची फार वाण असते. कारण, ह्या सुखाप्रीत्यर्थ जननीजनकांचें पुण्य व भाग्य जसें लागतें तसें, अशा सौख्यस्थलीं जन्मून ऐश्वर्याचे उपभोगार्थ जन्मणाऱ्या जीवांचेंही महद्भाग्य व पुण्य असावें लागतें. दोघांच्याही पुण्यभाग्याचा योग जेव्हां एकत्र जमतो तेव्हांच परस्परांस सुखोपभोग मिळतो. जसा महत् पुण्यानें व भाग्यानें ह्या सौख्याचा ठेवा प्राप्त होतो तसा त्याचा चिरकाल सुखानुभव राहण्यास व टिकण्यास त्यापेक्षांही अधिक पुण्य व भाग्य असावें लागतें. पुत्रजन्म झाल्यावांचून आपल्या पूर्वजांच्या पितृऋणापासून आपली मुक्तता होत नाहीं. निपुत्रिकास गति प्राप्त होत नाहीं. सुपुत्र जन्मानेंच ऐहिक व पारलौकिक गति प्राप्त होते. ह्मणून पुत्रजन्माची प्रौढी वर्णन केली आहे. दुर्दैववशात् दंपतीस संतती नच झाली तर निजकुलसंरक्षणार्थ दत्तक पुत्र तरी अवश्य घेतला पाहिजे. धर्मशास्त्रकारांनीं दशविध पुत्र सांगितले आहेत. त्यांची सर्व व्यवस्था त्या ग्रंथांतून वर्णन केली आहे. औरस संततीच्या अभावस्थलीं जर शास्त्रकार महर्षि आचार्यांनीं दत्तकादि पुत्र संततीची व्यवस्था केली नसती तर आज मितीस कुल, गोत्र, वर्ण, जाती इत्यादिकांचा खरोखरच पत्ता लागला नसता. अनंत कुलें उच्छिन्न झालीं असतीं. पुत्रवंशाच्या अभावीं कन्यावंश जरी मानला आहे तरी तो गौणच आहे. कारण कन्येच्या परगोत्री वंशांत मातामहास एकच पिढीपर्यंत पिंडोदक मिळतें. ह्मणजे आपण आपल्या मातामहास जसें पिंडोदक देतों, तसें आपल्या पश्चात् आपला पुत्र त्यास पिंडोदक देणार नाहीं. त्याला त्याच्या मातामहास ह्म० आपल्या आईच्या पित्यास द्यावें लागणार आहे. यामुळें कन्येचा वंश निजकुलरक्षणार्थ उपयोगीं पडत नाहीं. ह्मणून कन्यासंततीपेक्षां पुत्रसंततीचा महिमा अधिक आहे. व प्रत्येकास पुत्रजन्मानें जितका आनंद होतो त्यापेक्षां कन्याजन्मांत आनंद कमी होतो. याशिवाय, कन्या उत्पन्न होतांच मातापितरांस जो कांहीं आनंद

होणार, त्या आनंदाचा प्रतियोगी खेद लागलाच पुढें येऊन उभा राहतो. ह्म० पुत्राप्रमाणेंच गर्भस्थितीच्या पीडा सहन करून, पुढें लालनपालन सर्व प्रकारचें करण्यांत प्रेमपाशांत बद्ध होऊन सरते शेवटीं कन्येचें **दान** करावें लागणार ! ! आपलें स्वत्व तिजवर मुळींच न राहतां तिची सर्व आयुष्यपरिचर्या पराधीन राहणार. व केवळ तिच्या दैवावर तिचें सुखदुःख अवलंबून राहणार आहे. अशा दृश्य व ठराविक चिंता समोर येत असल्यानें कन्याजन्मापासून दुःखमिश्रित आनंद होतो. ह्मणून जो तो कुटुंबी स्वशक्त्यनुरूप पुत्रजन्मोत्सवांत आनंदातिशयानें निमग्न होऊन धार्मिक कृत्यानें देव, ग्रह, पितरादिकांस, व लौकिकी व्यवहारानें स्वजन, आप्त, सोयरे, इष्टमित्र वर्गास व श्रेष्ठ जनांस दानमानानें संतुष्ट करण्यांत उद्युक्त असतो. अशा उत्सवाच्या व्यवस्थेंत पिता निमग्न होतो. व जननी, सूतिकागृहांत अग्नीच्या तापांत व कटु औषधोपचाराचे यातनेंत अस्पर्श असते. तथापि पुत्रजन्मानें व बाहेर चालू असलेल्या उत्सवश्रवणानें आनंदभरांत सर्व उपस्थित दुःखांस व पूर्वानुभूत कष्टांस अज्जी विसरते.

ही सर्व गोष्ट जीवाच्या जन्मोत्सवाच्या बाह्य परिस्थितीची झाली. ह्या बाह्य आनंदाचा व सुखाचा यत्किंचित् लेश तरी जन्मणाऱ्या जीवाच्या वांट्यास अथवा अनुभवास येणें शक्य आहे काय ? तर मुळींच नाहीं. ज्याच्या अतिनाजूक कोंवळ्या शरीरास अन्य पदार्थाचा स्पर्श होणें देखील ठाऊक नसतें, त्या नाजूक शरीरास जन्म होतांबरोबर सुईणीच्या कठोर हातांनीं न्हाणें, माखणें, व शरीर वारेंतून काढून धुवून स्वच्छ करितांना किती क्लेश सोसावे लागतात. त्या क्लेशानें मूल रडत ओरडत असतां त्याचे नाकातोंडांत उष्ण पाणी जाऊन जीव घाबरतो. एका रडण्यावांचून अन्य कांहींच उपाय व ज्ञान नसल्यानें जे जे कांहीं उपचार केले जातात ते ते त्या बालकास कष्टरूपच होत असतात. आपल्या दृष्टीनें आपण जें करतों तें बालकाच्या हिताचेंच करतों, असें जननी व इतर स्त्रियांस वाटतें, व तें खरेंही आहे. पण तान्ह्या बालकास केवळ क्लेशजन्य ज्ञान व क्लेशनिवृत्तिज्ञान इतकेंच आहे. हितानहितज्ञान नाहीं. अनिष्ट क्लेश झाले व क्षुधा लागली ह्म० मूल रडतें, व ते क्लेश निवृत्त झाले ह्म० सुखी

असतें. तान्ह्या मुलाचें संगोपन व उपचार हे केवळ व्यवहारपरंपरेच्या धोरणावर व अनुभवाचे अटकळीवर चालू असतात. बालकास कसली पीडा होत आहे व त्याला काय इष्ट आहे याचा यथार्थ बोध जननीस होणें शक्य नाहीं. ती केवळ अनुभवाच्या धोरणावर चालत असल्यानें क्वचित् प्रसंगीं दुःख कोणतें आहे याचा बोध होत नाहीं, व भलतेच उपाय होतात. त्या उपायांनीं मुलास अधिकाधिक क्लेश मात्र होतात. पोट दुखतें म्हणून मूल रडतें आणि आई कपाळ दुखतें असें अटकळीनें समजून कपाळावर औषध घालते. वस्त्रांत कीटक अथवा दंश शिरून त्याच्या वारंवार डसण्यानें मूल टाहो फोडतें, आणि भूक लागली असेलसें जाणून आई त्याच्या मुखांत स्तन कोंबते ! अशा प्रकारें अनेक अज्ञात दुःखांचे विपरीत उपचार होतात, व त्यांपासून शिशूस अधिक क्लेश होतात. तशांत दुर्दैवानें कांहीं विशिष्ट रोगादिक, ह्म० ज्वर, खोकला, आंकडी, अपस्मार, पोटफुगी, फोड, इ० बालकांस होणारे अनेक प्रचंड रोग आहेत. त्यांतून एकादा रोग शिशूस झाला ह्मणजे त्याच्या दुर्धर असह्य वेदना पाहून सज्ञान मनुष्यास रडें कोसळतें; मग त्या कोंवळ्या शिशूची काय कष्टमय भयंकर स्थिति होत असेल त्याचें आपल्यास अनुमान तरी करितां येणें शक्य आहे काय ? असे एक कीं दोन न जाणों किती प्रकारचे क्लेश बालदशेंत आहेत त्यांची बरोबर मोजणी करितां येत नाहीं. जननीजनकादि स्वकीय मंडळी पुत्रजन्मोत्सवांत अगदीं निमग्न असते. पण जो जन्मल्यानें हा सर्व उत्सव होतो त्या खास जीवास तर या बाह्यानंदाचा लेशही प्राप्त न होतां दुःखानुभवच करावा लागतो. त्या अर्थीं या उत्सवास **पुत्रोत्सव** ह्मणावें कीं स्वजनोत्सव ह्मणावें ! ! ह्मणावें तरी काय ? प्रारब्धाच्या व आयुष्याच्या न्यूनतेनें बारा दिवसांच्या आंतबाहेरच शिशु मृत झालें कीं, सर्व उत्सवाचा विध्वंस होऊन, सर्वांचीं मुखें म्लान होतात, आणि शोक उसळतो. तो शोक कमी झाला ह्म० काय हो ! आपण अगदीं बेफाम होऊन खर्च केला तो सर्व व्यर्थ गेला. असें होणार हें जर आपल्यास पूर्वीं कळलें असतें तर मग असा वेडेपणा केला नसता ! हा कोणी तरी जन्मांतरींचा शत्रु होता.

अशा प्रकारचे अनेक विचार मनांत येऊं लागतात. मोठें आश्चर्य आहे कीं, जर पुत्रजन्माप्रीत्यर्थ उत्सव केला आहे तर पुत्रजन्म झाला, मग खर्चाबद्दल विषाद कां? व त्याच्या ठिकाणीं शत्रुबुद्धि कां? त्या शिशूनें तुमच्या सौख्यापैकीं लेशही घेतला नाहीं. व त्याला आनंदही झाला नाहीं. तुह्मीं आपल्या आनंदाप्रीत्यर्थ जर उत्सव केला आहे तर तुह्मी सर्व जिवंत आहांच, आनंद भोगा! तुमच्या मनोभंगाचें अपयश बिचाऱ्या शिशूवर कां? त्यानें तुह्मांस आनंदही दिला नाहीं व नेलाही नाहीं. तो आपल्या कर्मानुरोधानें सृष्टियात्रेचा मार्ग क्रमण करीत चालला आहे. ज्या ठिकाणीं जितका मुक्काम करण्याचा नेम होता तितका करून तो पुढें गेला. वाटेनें जाणाऱ्या पाहुण्यावर बळेंच अज्ञानानें जे मोहित होतील ते मागून फशीं पडलेच पाहिजेत. यास्तव विचारवानांनीं स्वगृहीं जन्मलेल्या जीवाच्या उत्सवांत पाहुणचारबुद्धि ठेविली पाहिजे; ह्म० ती बुद्धि चालू व्यवहारांत अडथळा न करतां परिणामीं उपयोगीं पडते.

हे **राजन्**! सर्वांच्या सुदैवानें जननी व बालकाचे दोन तीन महिने अगदीं सुरक्षितपणें पार पडले पाहिजेत. कारण सूतिकेच्या संगोपनांत व औषधोपचारांत कांहीं हयगय झाल्यास लागलाच प्रसूतिरोग उत्पन्न होतो. त्या रोगांतून क्वचितच स्त्रिया पार पडतात. या रोगांत ग्रस्त होणें ह्म० मृत्युपंथास लागणेंच होय. जननी रोगग्रस्त झाली कीं, शिशूचीही तीच वाट होते. आणि बहुधा लवकरच किंवा उशिरां दोघेंही मृत्युमुखीं अर्पण होतात. यास्तव प्रत्येक कुटुंबांनीं स्वशक्त्यनुरूप या गोष्टीची खबरदारी घेतली पाहिजे. तीन महिन्यांनंतर स्त्री बाळंतपणांतून मोकळी होऊन गृहकार्यांत व पतिसेवेंत तत्पर होते. जननी जरी आरोग्ययुक्त असली तरी तिला पुढें खानपानव्यवहाराचें पथ्य बाळगावें लागतें. कारण बालकाचें जीवन तिच्याच दुग्धावर अवलंबून असल्यानें तिच्या खानपानांत विकारी पदार्थ आल्यास त्याच्या रसाचा विकार दुग्धद्वारा बालकाच्या उदरांत प्रविष्ट होऊन त्याला रोग उत्पन्न होतो. ह्मणून जननीनें निर्दोष पदार्थांचें सेवन करावें. [ याच कारणामुळें स्त्रियांची ह्मण आहे कीं—
' पति आहे तोंवर वाटेल तें ल्यावें व मूल नाहीं तोंवर वाटेल तें

खावें. ] असो. जननीजनकांचीं सुरक्षितपणें वर्ष दोन वर्षें बालकाच्या लालनपालन व खेळविण्यांत लोटतात तोंच गोंवर, देवी, मधुरा, दांत उगवणें व दांत उगवतांना हगवण होणें, डोळे येणें इ० ठराविक दुखणीं यावयाचींच. हीं दुखणीं केवळ कालदूतच आहेत. यांत शिशूला प्राणांत क्लेश अनुभवावे लागतात, व त्याचे क्लेश डोळ्यानें दिसतात त्यांचें वर्णन करतां येत नाहीं. शिशु कसे सहन करीत असेल हें त्यासच अथवा सर्वज्ञ ईश्वरासच ठाऊक. विचारीं मातापितरें दीनवदन होऊन अहर्निश उपचारांत कष्ट करीत असतात. खाल्लेलें गोड लागत नाहीं. निद्रा येत नाहीं. अंतःकरण दुःखानें व चिंतेनें व्याप्त होतें. मांडीवर घेतलेल्या शिशूच्या घोर वेदना पाहून काळीज थरथर कांपत असतें. वैद्याची व उपचारकांची पायधरणी करतां करतां पुरेंसें होतें. झाडाफुंकी व तोटके करण्यांत न जाणे कशांनींच लोकांचें आर्जव करून वाईट कामें करावीं लागतात. हे **परमेश्वरा !** या दुःखारण्यांतून हें मूल कसें पार पडतें व कसें आमच्या पदरीं पडतें, या काळजींत दंपत्यांची पांचांवर धारण बसते, तेव्हां मात्र तितक्या वेळापुरता **परमेश्वर** आठवतो. व तोच **जगदीश** दयाघन सुदैवानें कृपा करून घोर संकटांतून सर्वांची सोडवणूक करितो. नाहींपेक्षां सर्वांच्या दुर्दैवानें तें अज्ञान शिशू, मातेच्या अंकावर घोर यातनेंत गुंतलें आहे व माता अत्यंत भयाभीत अंतःकरणानें नेत्रांतून अश्रू ढाळीत आहे, स्तनांतून दुग्ध स्रवत आहे, वारंवार त्याचें मुख प्रेमानें कुरवाळीत आहे, व कोणत्याक्षणीं यास बरें वाटेल अशी आशातुर होत आहे; तोंच तें शिशु मृत्युमुखीं अर्पण झालें तर जननी हंबरडा फोडून रडूं लागते. पित्यास शोक होतो. स्वजनही दुःखी होऊन जननी-जनकांचें शांतवन करितात. एकादें दुसरें लेंकरूं आणखी असलें तर शांतवन कांहींसें बरें होतें. व एकुलतें एकच असल्यास शोक अधिक होतो. तो कांहीं कालानें जातो. व ईश्वरकृपेनें पुन्हां अपत्यफल लवकर प्राप्त होवो, अशी आशा लागते. आश्चर्य आहे कीं, ज्या अपत्यफलामागें विपत्तीफल भोगून मोकळा होत नाहीं तोंच पुन्हां त्या फलाची आशा आहेच. असो.

---

# जीवाची शैशवावस्था.

हे राजन् ! शैशवावस्थेंत होणारीं अनिवार दुःखें आहेत तीं शिशूच भोगूं जाणे. काय दुःख होत आहे व त्याला काय हवें आहे, हें त्याला वाणी नसल्यानें सांगतां येत नाहीं. व उपचारकांसही यथार्थ कळत नाहीं. मुक्याशीं व अंधळ्याशीं गांठी पडतात. भाग्यानें जसें कांहीं होतें तसें होतें. बाल्यावस्थेंत अत्यंत जें अज्ञान असतें, हेंच बालकास व पालकास हितावह असतें. अत्यंत अज्ञानामुळें बालकांस क्षणोक्षणीं दुःखाची विस्मृति पडते. दुःखाची विस्मृति, हीच त्यांस सुखरूप होते. बालकांस हितानहिताचें व सुखदुःखाचें विशेष ज्ञान असतें तर, खरोखरच त्याचें संगोपान करणें जननीजनकांस फारच दुर्धर झालें असतें. एकादें हट्टी व व्रात्य पोर निपजतें, तेव्हां आईबापांच्या कसा नाकीं दम येतो. व असलें पोर झालें नसतें तरी बरें होतें असें वाटतें. ईशसृष्टींत जें अज्ञान छावलें आहे हें अज्ञानी जीवांस मोठें हितावह आहे. व त्याच्याच योगानें सृष्टिव्यवहार अंधपरंपरेनें सुरळीत चालला आहे. तान्ह्या मुलाचें ह्द्गत पालकांस समजत नाहीं व पालकांचे हेतू बालकास समजण्याचा मार्ग नाहीं. पालकांनीं आपल्या समजुतीनें कांहीं तरी उपचार संगोपनार्थ करीत जावे, शिशूनें ते भोगीत जावे. प्रतिकूल झाले ह्म० रडावे, ओरडावें, अनुकूल झाले ह्म० सुखी व्हावें, व क्षणोक्षणीं सुखदुःखांस विसरून नव्या नव्या मुग्ध वासना येत जातील तसें खेळत, हंसत, रडत जावें व जननीजनकांनीं त्यांच्या बाललीलेंत निमग्न व्हावें, आनंद मानावा, व पुढील सुखसोहळ्याची आशा धरून तऱ्हेतऱ्हेचे मनोरथ करीत जावे.

अशा प्रकारें, बालकाचा व जननीजनकांचा प्रापंचिक व्यवहाराचा क्रम चालू असतो. मूल अडीच तीन वर्षांचें होत आलें म्हणजे आपल्या चिमुकल्या लहान लहान पायांनीं दुड दुड धांवूं लागतें. धांवतांना अडखळून पडतें. क्वचित् वेळीं हंसतें, क्वचित् रडतें. मृदु मंजूळ अशीं बोबडीं भाषणें तुटक तुटक विसंगत व अर्थरहित बोलूं लागतें. तीं

त्याचीं बालभाषणें जननीजनकादिकांस अत्यंत गोड लागतात. व तींही त्या बालकाबरोबर तशींच बोबडीं भाषणें करूं लागतात. आनंदानें त्या शिशूस वारंवार हृदयीं कवटाळून चुंबनें घेतात. त्याचे हट्ट पुरवितात, समजूत करितात, क्वचित् प्रसंगीं सदय-हृदयानें ताडनही करितात. सारांश, बालकाच्या, भोजनाच्या, खेळणाच्या, हंसण्या-बोलण्याच्या, रडण्याच्या, निजण्याच्या, इ० आठ प्रहरच्या अनेक बालक्रीडांनीं दंपतीचीं व वृद्धांचीं अंतःकरणें आनंदानें व्यामोहित होत असतात. सदैव त्यांचाच विशेष नाद वाढून त्यांच्या लालन-पालनांतच विशेष काल लोटतो. व अवश्य कर्तव्यें मागें पडतात. प्रपंचांत बालकें, असलीं तरच तो प्रपंच आनंददायक होतो. संतती न झाली, अथवा होऊनही न वांचली तर प्रपंच फार कंटाळवाणा वाटतो. कंटाळवाणा जरी वाटला तरी सोडावासा मात्र वाटत नाहीं. त्यांत ज्या ज्या गोष्टींची उणीव असेल ती वारंवार भरून काढण्याची रात्रंदिवस अनेक प्रकारें खटपट सुरू असते. पण उणीव भरून येणें हें दैवानुकूल्यावर अवलंबून असतें; असें जरी प्रयत्नाअंतीं खरें समजलें तरी प्रयत्नांत व मनोरथ करण्यांत शीण येत नाहीं.

अशा प्रकारें दुःखमिश्रित सौख्याचा भोग करीत व बालकाचें लालनपालन करीत आनंदानें प्रपंचांत कालक्षेप होतो. मूल पांच वर्षांचें झालें ह्म० त्याचें शरीर व अवयव चांगले खुटखुटीत व शिशु अवस्थेपेक्षां कांहींसे सुदृढ होतात. खानपानादि सामान्य देहपरिचर्या त्याच्या त्यास करतां येऊं लागतात; व बरें वाईट, आवड, निवड व निजपर भावाचें ज्ञान हळूहळू वाढत जातें. भाषा विसंगत पण स्वच्छ बोलतां येते. बुद्धींत धारणाशक्ति येत जाते; त्यामुळें सांगितल्याचें व दिसत असलेल्याचें अनुकरण करण्याकडे बालकाच्या अंतःकरणाची प्रवृत्ति वाढत असते. म्हणून पांचव्या वर्षापासून पुढें बालकाच्या शिक्षणाचा काल ठरविला आहे. या अवस्थेंत बालकांची बुद्धि कोमल, निर्विकार व तीव्र असल्यानें तिच्यांत ग्रहणशक्ति चांगली असते. व तिचा कल सांगितलेलें ग्रहण करण्यापेक्षां पाहिल्याचें अथवा ऐकल्याचें अनुकरण करण्याकडे विशेष असतो. ह्मणून बालकाच्या मातापितरादि पालकांनीं व शिक्षकांनीं त्याच्या

शिक्षणार्थ फार काळजीपूर्वक दक्ष असलें पाहिजे; आणि त्यांच्या शिक्षणापेक्षां आपल्या स्वत:च्या वर्तनाची आपल्या ठिकाणीं खबरदारी घेतली पाहिजे. कारण, आपण जें मुलांस शिकवितों त्याचा बोध त्यांना इतका लवकर होत नाहीं कीं, जितका लवकर आपल्या वर्तनाचा ठसा त्यांच्या अंत:करणावर उमटतो. आपण मुलांस रागें भरतांना अथवा आपसांत कोणाशीं भांडतांना अविचारानें जितक्या अपशब्दांचा दुरुपयोग करितों व जशीं दुर्भाषणें करितों तींच तशीं मुलांच्या तोंडीं बसतात. व मुलें हट्टानें रागास पेटलीं ह्म० त्याच दुर्भाषणांचा वर्षाव मातापितरादिक पालकांवर करतात. त्या त्यांच्या दुष्ट शब्दांमुळें मातापितरादिक अधिक संतापून मुलांस ताडन करतांना पुनरपि तेच वाईट शब्द वापरतात. पण यांला ही शुद्धि रहात नाहीं कीं, आह्मीं उच्चारिलेलेच दुष्ट शब्द मुलांच्या तोंडीं बसले आहेत ! आपल्या दुर्भाषणांचें अनुकरण मुलें करितात. वास्तविकरीत्या त्यांस ज्ञान कोठून असणार ? मुलें अज्ञान आहेत त्यांस काय समजतें ! अशा कोत्या समजुतीनें जें जें अमर्याद वर्तन होतें व जीं जीं वाईट भाषणें अथवा कृती स्वाभाविकरीत्या जरी आपल्या घडल्या तरी त्याचा सूक्ष्म परिणाम मुलाचे अंत:करणावर सदैव घडत राहतो. व ते दुष्ट संस्कार कालेंकरून सर्व उदय पावतात. आणि संतती पुढें वाईट निपजते. आपली संतती चांगली अथवा वाईट निपजणें हें बहुतांशीं आपल्या सद्वर्तनावर व सुसंगतीवर अवलंबून असल्यानें, संततीच्या सुधारणेकरितां प्रथम स्वत: आपली चांगली सुधारणा असली पाहिजे. आपण चांगलें वागून मुलांस जें शिक्षण मिळेल तेंच विशेष सुपरिणामकारक होतें. अर्थात् मुलांस शिक्षण व अनुकरणाचा कित्ता अशीं दोन साधनें चांगलीं अनुकूल मिळतात. आपलें आचरण चांगलें असल्यास शिक्षण चांगलें करतां येईल. मुलांस शिक्षण देणें तें त्यांच्या अवस्थेनुरूप अंत:करणाची शक्ति असेल त्याहून थोडें कमी द्यावें. कोमल अंत:करणावर शिक्षणाचें ओझें विशेष पडल्यास मुलें नि:शक्त होतात व त्यांच्या जीवित्वाची इमारत कच्ची पडते. शारीरिक परिश्रमापेक्षां मानसिक परिश्रम अधिक करवू नयेत. माफकशीर खेळण्या-

ची त्यांस मोकळीक असूं द्यावी. व आपल्या शक्त्यनुरूप त्यांचे चांगले लाडही पुरवीत असावे. शरीराची व अंतःकरणाची सुदृढता व परिपक्कता जशी वाढत जाईल त्या मानानें शिक्षणानुक्रम वाढवीत जावा. कोणत्याही अवस्थेंत व वयांत शारीरिक व मानासिक शक्तीच्या अतिरिक्त शिक्षण अथवा अध्ययन कधींच कोणीं करूं नये. केल्यास जीवित्वाचा व शक्तीचा लवकर क्षय होतो. बालपणापासून शिक्षणाची, अध्ययनाची, व नियमितपणें वागण्याची संवय व विद्येची गोडी लागली ह्म० मुलांवर विशेष दाब ठेवावा लागत नाहीं. तीं स्वतःच तिकडे वळतात. तथापि सर्व प्रकारच्या निरीक्षणांत मात्र आपल्याकडून हयगय राहूं नये. मुलांस वारंवार जरब अथवा भीति फार दाखवूं नये. गोडीगुलाबीनें व लालनपालनानें मुलांचें शरीर, अंतःकरण, शक्ति व विद्या सर्वच सुदृढ होतात, क्रमेंकरून सर्व वृद्धि पावतात, आणि पुढें कालेंकरून मुलें सद्गुणी व विद्वान होतात.

---

## मुलांचा शिक्षणक्रम.

येणेंप्रमाणें मातापितरादिक आपापल्या योग्यतेनुरूप बालकांच्या लालनपालनांत व शिक्षणांत निमग्न होतात, व त्यांच्या कृतीचें कौतुक करून आनंद पावतात. मुलांस विद्याभ्यासंगादिकांत लावतात, आणि मुलींस प्रापंचिक गृहशिक्षण ह्म० सासरीं आपला संसार कसा करावयाचा, पतिश्वशुरादिकांशीं मर्यादेनें कसें रहावयाचें, सर्वांच्या आज्ञा कशा पाळावयाच्या, परकी पुरुषासमोर कसें लज्जेनें वागावयाचें, मुलांचें संगोपन कसें करावयाचें, इ० अनेक प्रकारचीं शिक्षणें द्यावीं लागतात. मुलीस प्रापंचिक व मर्यादेचें शिक्षण देण्यांत कसर झाल्यास पुढें तिच्या सासरच्या माणसांचीं वाटेल तशीं बोलणीं सोसावीं लागतात. मुलींच्या शिक्षणांत लज्जा व मर्यादा ह्या गोष्टी फार प्रधान आहेत. त्याकरितां मुलींस बाळपणापासूनच दाबांत ठेविल्या पाहिजेत. बाळपणींच मुली निर्भय व अमर्याद झा-

ल्या तर त्यांस यावज्जन्म पुढें लज्जा येत नाहीं, आणि निर्लज्जपणा एकवार आला ह्म० दुर्वर्तनाचें वळण लागण्यास उशीर लागत नाहीं, व दुर्वर्तनारंभ झाला कीं, दोन्ही कुलांच्या आब्रूचें तर्पण झालेंच. सामान्यपणें खेळण्यांत देखील परकीय मुलांमुलींचा विशेष सहवासही होऊं देणें चांगलें नाहीं. मुली सज्ञान झाल्यावर खास आपलें वर्तनसुद्धां त्यांशीं मर्यादेनें व माफकशीर ठेविलें पाहिजे. कारण त्या परगृहीं नांदावयाच्या असल्यानें जसें त्यांस माहेरीं शिक्षण व वळण लागेल तशाच रीतीनें त्या सासरीं वागतील. मुलांस पुरुषस्वभावाचे व मुलींस स्त्रीस्वभावाचे मनोविकार जन्मतः स्वाभाविकच असतात. पुढें जसें चांगल्या वाईट शिक्षणाचें व सहवासाचें वळण लागतें तसे ते वृद्धिंगत होऊन शेवटीं परिपक्वदशेस येतात. मनोविकार परिपक्व होईपर्यंत शिक्षणाचा दाब असला पाहिजे. मुलांस विद्याभ्यासंगादि शिक्षणांत व मुलींस प्रापंचिक संसारशिक्षणांत, स्वधर्म, नीति, कुलाचार, शिष्टाचार, सभ्यपणा इ० विशेष गुणांचें वळण बाळपणापासूनच खबरदारीनें लाविल्यास बहुत चांगलें व लवकर लागतें. अज्ञान मुलें आहेत, ह्मणून अतिरिक्त लाडांनीं त्यांची उपेक्षा करीत जाण्याचा भयंकर परिणाम होतो. ‘ ओल्या मातीस व ओल्या लांकडास जसें वळवावें तसें वळतें. ’ अशी ह्मण आहे. मुलांमुलींच्या कोमल बुद्धीवर सुशिक्षणाचा परिणाम लवकर घडतो. अशा प्रकारच्या, मातापितरादि शिक्षकांच्या उत्तम शिक्षणांत वृद्धि पावलेलीं मुलें कुलदीपक निपजतात, व मुली उभय कुलविभूषणी निपजतात, व त्यांच्या सत्कीर्तीनें मातापितरादि शिक्षक धन्यता व अत्यानंद पावतात. असा हा पांच वर्षांच्या पुढील शिक्षणक्रमाचा सामान्य विचार सांगितला.

**हे राजन् !** शिक्षण देणें, धाक दाखविणें, व प्रसंगविशेषीं ताडनही करणें, हें मुलांच्या फार हिताचें असतें व त्याचा परिणामही सर्व प्रकारें पुढें चांगला होतो. इ० सर्व गोष्टी सज्ञान पालकांच्या दृष्टीनें व व्यावहारिक नियमानें अगदीं खऱ्या आहेत. मुलें सुशिक्षणानें प्रौढदशेंत आल्यावर माता, पिता व शिक्षकांचे शिक्षणाबद्दल अत्यंत कृतज्ञतापूर्वक त्यांचे आजन्म ऋणी राहून त्यांस पूज्य मानि-

तात. याच अनुभवास अनुसरून प्रत्येक कुटुंबी आपल्या बालकांस शिक्षण देतो व ही अशीच परंपरा पुढें चालते. पण बालकाच्या दृष्टीनें बाल्यावस्थेचा विचार केल्यास व आपापल्या लहानपणाचा अनुभव आठविल्यास अगदीं उलट वाटणार आहे. बाळपणांत जे जे मुग्ध मनोविकार मनांत उत्पन्न होतात तसें बोलणें, बसणें, खेळणें, दांडगाई करणें, भांडणें, रडणें, ओरडणें, खाणें, पिणें, इ० अनेक व्यापार चालतात. त्याच्या विरुद्ध कोणीं प्रतिबंध केल्यास संताप येतो, खेद वाटतो व द्वेषही उत्पन्न होतो. शिक्षण देणारे शत्रुसारखे दिसतात. शाळेंत जाणें, अध्ययन करणें, धाकांत वागणें इ० केवळ यमयातना वाटतात. त्या चुकविण्याकरितां अनेक ढोंगें व फंद करावेसे वाटतात; पण ते वारंवार फसतात. त्यामुळें पालकांचें व शिक्षकांचें कडक शासन भोगावें लागतें. त्याच्या योगानें हट्टीपणा व तिरसटपणा स्वभावांत उत्पन्न होऊन सांगितलेलें हटकून करावयाचें नाहीं, असा निश्चय करावासा वाटतो. इतर मुलांच्या संगतीनें अनेक वाईट संवयी लागतात. सारांश, बालकांच्या अज्ञ मनोविकारानुरूप जर त्यांस मोकळें वागूं दिलें तर तीं बहुत लवकर व्रात्य होतील व अगदीं पशू बनतील. त्यांना त्यांच्या मनोदयानुरूप न वागूं दिल्यानें त्यांस फार दुःख होतें. व अशा अज्ञान जीवांच्या संगोपनांत, आटोक्यांत बाळगण्यास व शिक्षण देण्यांत पालकांस तरी कमी त्रास व दुःख आहे काय ? अनुभवाअंतीं सर्व समजतें. परंतु प्रपंचांत मोहपाशाचें प्रबल बंधन व आच्छादन असें जबरदस्त पडलें आहे कीं, त्यामुळें कष्टमय स्थिति सुखरूप वाटते. स्त्रीपुत्रवित्तादिकांच्या ममतेनें सर्व दुःखें क्षणोक्षणीं विसरतात. ह्मणूनच ही संसारयात्रा सुरळितपणें चालते. असो.

---

## मुंज लग्नाचे प्रकार.

प्रपंचांत संततीच्या सहवासांत वर सांगितल्याप्रमाणें आनंदानें कालक्रमण चालू असतें. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य अशा वर्णत्रयांत व

विशेषतः ब्राह्मणजातींत मुलांच्या मौंजीबंधनाचा व कन्येच्या विवाहाचा धर्मशास्त्रकारांनीं सातव्या वर्षीं श्रेष्ठ काल सांगितला आहे. कांहीं अपरिहार्य अडचणी आल्यास दहाव्या वर्षापावेतों निकृष्ट परमावधीची यत्ता सांगितली आहे, शूद्रांतर्गत जातीस मौंजीबंधनादिक वैदिकी संस्काराचा अधिकार नाहीं. केवळ लौकिकी व्यवहार असल्यानें ज्या ज्ञातींत जशी रूढीची परंपरा चालू असेल त्याच्या अनुरोधानें त्यांचीं सर्व कार्यें होतात. ( तथापि धर्मशास्त्रकारांनीं शूद्रकमलकारांत सर्व व्यवस्था बांधली आहे. ) मुलें मुली मौंजीबंधनाच्या व विवाहाच्या वयांत आलीं ह्म० मातापितरादिकांस भावी आनंदोत्सवाच्या तयारीचा वेध लागतो; आपापल्या योग्यतेनुरूप कुलशीलवानांशीं सोयरिकसंबंध कसा काय जुळतो व इच्छेनुरूप सर्व कार्य निर्विघ्नपणें व आनंदानें कसें पार पडतें, याची काळजी लागते. कोणताही उत्साह अथवा आनंद असो, तो मागें पुढें काळजीच्या व दु:खाच्या वेष्टनांत गुरफटलेला असावयाचाच, पण मध्यंतरीं जें क्षणभर सुख प्राप्त होणार त्याच्या आशेनें मागलीं पुढलीं सर्व दु:खें विसरतात. हीच **अज्ञानाची** विलक्षण खुबी आहे. असो. राजापरीं राजास, श्रीमानापरीं श्रीमानांस, गरिबापरीं गरिबास ज्यांची जशी योग्यता, कुलशील इ० असेल त्यांच्या अनुरूप सोयरीकसंबंध जुळल्यास दोन्ही पक्षांकडे विशेष उत्साह होतो. उभयपक्षांच्या समाजांत, कन्येला सुंदर पतीची व चांगल्या पुष्कळ डागिन्यांची इच्छा असते. मुलाला बायको सुरेख, गोरी व शहाणी मिळण्याची इच्छा असते. उभयतांचे मातापितरांस, सून व जांवई सुंदर मिळावे व हौसेप्रमाणें करणी व्हावी अशी इच्छा असते. स्वजनबांधवांस मानपान व सत्कार उत्तम राहण्याची इच्छा असते. भिक्षुक, आश्रित, ब्राह्मणसमुदायांस दानदक्षणा विपुल मिळण्याची आशा असते. मित्रवर्गांस व सेवकवर्गांस सन्मानपूर्वक पारितोषकें व देणग्यांची इच्छा असते. याशिवाय इतर सर्व वर्गांस मिष्टान्न भोजनाच्या यथेच्छ पंगती मिळाल्या ह्म० मोठा आनंद होतो. हे सर्व प्रकार थोड्याबहुतांशानीं आपल्या योग्यतेप्रमाणें केल्यावांचून कोणी कधीं राहत नाहीं, व त्याच्यानें राहवत नाहीं. कारण आजवर केलेला प्रपंच, सर्व भोगलेले कष्ट, मि-

ळविलेलें धन व बाळगलेल्या आशेचें पूर्ण साफल्य होण्याचा व कृतकृत्यता वाटण्याचा हा प्रसंग महत्प्रयासानें व मोठ्या सुदैवानें प्राप्त झाला आहे असें कोणासही वाटल्यावांचून कधींच राहत नाहीं. त्यामुळें जितका उत्साह करावा तितका अगदीं थोडाच वाटतो. कन्यादानाचें माहात्म्य व फल मोठें अवर्णनीय आहे. समुद्रवलयांकित सुवर्णमयी पृथ्वीदान ही कन्यादानाच्या योग्यतेस पोंचत नाहीं. अशा अमोघ व अतिश्रेष्ठ दानाचा सुयोग ज्या भाग्यवान् पित्यास प्राप्त होतो, त्याच्या अंतःकरणची स्थिति कन्यादानसमयीं कशी होते, याचें यथार्थ ज्ञान अनुभवावांचून कळणें अशक्य आहे. कन्यादान करणें ह्म० प्रत्यक्ष आपले प्राण दान करणें आहे. ममता, दया, दुःख, वियोग, चिंता, आशा, हर्ष, संतोष, उत्साह इ० अनेक रसांचें मिश्रणरूप कन्यादानाचा अपूर्व आनंद आहे. तो सुदैवानें ज्याचे अनुभवास येतो त्यालाच सर्व रसांचा बोध होतो. कन्येच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन तिजबरोबर पुष्कळ अंशानें आपल्यासही पराधीन व्हावें लागतें. पण प्रेमपाशाचा महिमा असा प्रबल आहे कीं, ती पराधीनता आनंदरूप वाटते. व एक कन्येचा प्रेमपाश गळ्यांत होताच तो त्याच्या मागें जामाताचा दुसरा प्रेमपाश आणखी येऊन पडतो. मग उत्सवास काय पुसतां? असो. इकडे मुलाच्या जननीजनकांस तर आनंदातिशयानें हृदयांत हर्ष मावत नाहीं. उत्सवांत काय खर्च करावा. काय द्यावें, व व्याह्याजवळून किती घ्यावें, काय करावें! जें करावें तें थोडें वाटतें. आजवर पुत्रवान् होतों ते स्नुषावान् झालों. आजवर प्रपंचभार वाहण्याचें आज पूर्ण सार्थक झालें. सुदैवानें पुत्रमुख तर दिसतें, पण **सूनमुख** दिसण्यास मोठेंच दैव व पुण्य लागतें. तो भाग्याचा ठेवा परमेश्वरकृपें आज प्राप्त झाला; जन्मास येऊन धन्य झालों, आतां वधुवरांची जोडी वृद्धिंगत होवो आणि सुखसंतोषानें नांदून लवकर नातू झालेला पाहिला ह्मणजे डोळ्यांचें पारणें फिटून संसारांत आल्याचें सार्थक होऊन कृतकृत्य झालों. मग पुढें नातसून व पणतू हीं देव दाखवील तर पाहूं. अशा भावी आशातरंग भवसमुद्रांत नित्य नव्या मनोरथांचे हेलकावे खात, आणि क्षणिक सुखार्थ पर्वतप्राय येणाऱ्या दुःखप्रहारास सहन करून आनंदानें आयुष्या-

चा, संपत्तीचा व सारासारविचारशक्तीचा क्षय करीत **कृतांताच्या** घोर दंष्ट्रारण्यांत सकुटुंब सपरिवार संचार करीत असतात. कोणत्या क्षणीं कोण कोठें चिरडला जाईल याचें विचाऱ्यांस भानही नसतें. यज्ञांत क्षणभरानें बळी जाणारा पशु जसा पूर्वक्षणांत हिरव्या दूर्वा व दाणा खाण्यांत निमग्न असतो. पुढल्याक्षणीं मी मारला जाईन हें त्यास भान नसतें. कारण पशूच तो. पण, ज्या मानवी प्राण्यास ईश्वरानें सारासारविचारशक्ति दिली आहे, त्यानें तिचा उपयोग कांहीं न करितां अंधपरंपरेचें अनुकरण केलें तर मनुष्यांत व पशूंत अंतर तें काय ? खानपानादि देहेंद्रियव्यापार जीवमात्रांचे सर्व सृष्टींत सारखेच आहेत.

**हे राजन् शीलनिधे !** संसारचरित्रांतील जीवाच्या आद्यकक्षेचें ह्म० जन्मादारभ्य तारुण्यांत येईपर्यंतच्या स्थितीचें संक्षिप्त वर्णन करून दाखविलें आहे. यापेक्षां न जाणों कितीपट अधिक तऱ्हेतऱ्हेचीं दुःखें ह्या जीवास भोगावीं लागत असतील तीं ह्या जीवासच ठाऊक. हें शेषशारदादिकांसही पुरतेपणीं लिहितां येणें शक्य नाहीं. पण हा जीव महावज्र बेशरम होय कीं सर्वांस ढकर देऊन पुन्हां दुःखभोगार्थ उपाशीच आहे. भोगो विचारा, आपण तरी काय करणार ! !

---

... धमाजी राऊत ... चिपळीकर.

## जीवाच्या जन्माची मध्यकक्षा.

### ( ह्म० तारुण्यदशा. )

**हे राजन् !** हा जीव स्वकर्मफलभोगार्थ, मातेच्या गर्भाशयांत प्रवेश करतो. तेथें नाना प्रकारचीं भयंकर दुःखें भोगून महत्संकटांतून कसा तरी पार पडतो, ह्म० नऊ मास पूर्ण भरल्यावर जन्मास येतो. जन्मल्यापासून शैशवावस्थेंत अवर्णनीय क्लेश भोगतो. या सर्व दुःखांस बालकांचें व पालकांचें पूर्ण **अज्ञान** कारण असल्यानें बा-

लकांस तीं सर्व दुःखें अप्रतिकारपूर्वक सहन करण्यावांचून दुसरा मार्गच नसतो. त्या स्थितींत अज्ञानमग्न राहणें, हेंच काय तें सुख आहे. पुढें कांहींशी सज्ञानावस्था येते, त्यांतही अनेक रोगादि व्याधिजन्य क्लेश, इष्ट वस्तूच्या प्राप्तीचीं व इच्छित व्यवहार करण्यांत पालकांच्या प्रतिबंधाचीं व शिक्षणार्थ ताडनादिकांचीं अनेक दुःखें भोगावीं लागतात. चांगल्या सज्ञान ह्म० तारुण्यवयांत येईपर्यंत जो आयुष्याचा कष्टमय प्रदेश या जीवास अतिक्रमण करावा लागतो, व त्यांत जन्मादारभ्य ज्या भयंकर प्राणांतयातना भोगल्या असतात त्या सर्व दुःखांची व जें सुख मिळालें असेल त्याची विचारदृष्टीनें जर तुलना करून पाहिली तर खंडीभर दुःखांत रतिभर सुख तरी बरोबर भरेल किंवा नाहीं ही शंकाच आहे. अशा प्रखरतर यातनेंतून हा कोमल जीव जगतो कसा हेंच मोठें आश्चर्य आहे ! ! सज्ञानदशेंत आल्यावर जीवांनीं जर आपल्या पूर्वानुभूत यातनेची व आपल्याकरितां जननीजनकांस कसे अवर्णनीय क्लेश सोसावे लागले, याची विचारपूर्वक चांगले डोळे उघडून एकवार उजळणी केली तर, खरोखर त्यांचें हृदय विदारण झाल्यावांचून, ढळढळा अश्रू आल्यावांचून, आणि मातेच्या तारुण्यवनाच्या नाशार्थ कुठाररूप व केवळ भूमिभाररूप झालों असा पश्चात्ताप झाल्यावांचून कधींच राहणार नाहीं. पण अनंत जन्मक्षणादारभ्य अज्ञानमोहमदिरेची बाळघुटी हा जीव प्राशन करीत असल्यानें स्वतः अनुभूत सर्व दुःखें विसरतो, व आपल्या सभोंवतीं इतर जीवांचीं अनिवार दुःखें प्रत्यक्ष पाहूनही स्वतःचें दुःख आठवित नाहीं; तारुण्यदशेंत आल्यावर सदसद्विचार करण्याचा मुख्य श्रेष्ठ काल आहे. पण त्या विचाराच्या दिशेस ढुंकूनही न पाहतां असले विचार व कर्मे करितो कीं, ज्यांचें दुःखरूपफल, पूर्वोपभुक्त दुःखापेक्षां सहस्रावधी पटीनें अधिक भोगावें लागेल ! व अनंतकल्पपर्यंत या जन्ममरणपरंपरेंतून आपली कधींच सुटका होऊं नये ! व व्हावी असें सुद्धां वाटूं नये ! ! हें मोठें सखेद आश्चर्य आहे ! असो.

# ' अशिक्षित तरुणाचा व्यवहार '.

हा गर्भांत आल्यापासून जननीजनकांनीं अनेक कष्ट भोगले, पुढें त्यांच्या संगोपनांत महत्क्लेश सोसले, लग्न, मुंज इ० सुखसोहळ्यांत व शिक्षण देण्यांत महत्प्रयासानें संचय केलेलें द्रव्यादिक खर्च केलें, सर्वतोपरी आपलीं शरीरें झिजविलीं, आणि चातकाप्रमाणें आशा लावून बसली; ती आशा कोणती ? तर हीं आमचीं जिव्हाळीं मुलें व सुना प्रौढ झालीं ह्म० आमचें संगोपान करतील, सेवा करतील, आमच्यावरील प्रपंचाचा भार कमी करून श्रमविभागी होतील, आह्मांस सर्वतोपरी सुख देण्यांत व स्वतः आपण समाजांत चांगली कीर्ति संपादण्यांत कायावाचा-मनेंकरून झटतील. जनसमुदायांत लोकप्रिय होतील. सारासारविचारसंपन्न होतील. अशा अनेक चांगल्या गुणांनीं सुसंपन्न झालेलीं डोळ्यांनीं पाहिलीं व जनवार्तांनीं त्यांची सत्कीर्ति ऐकिली ह्म० आह्मी प्रपंचांत येऊन व प्रपंच करून धन्य झालों. पुढें वृद्धावस्थेंत नातू पणतू खेळवित, सुखसोहळे पहात, व हरी हरी ह्मणत एकदां डोळे मिटले व मुलांच्या हातांनीं सुगति ( उत्तरकार्यादि ) झाली ह्मणजे जगांतील आपलें कार्य आटोपलें. पुढें तो प्रपंच जाणो व मुलें जाणो, काय पाहिजे तें होवो. गुणागोविंदानें आपली संसारयात्रा पार पडली ह्म० झालें. असे अनंतविध मनोरथ करण्यांत व प्राप्त झालेल्या समयानुकूल बरावाईट संसाराचा गाडा ओढण्यांतच बहुधा सर्व प्रापंचिकांच्या आयुष्याचा क्षय होत असतो. **हे राजन् !** चांगलीं सुखें प्राप्त होण्याचे मनोरथ करणें मात्र अगदीं फुकटाचें आहे, व तो जीवाचा अगदीं स्वाभाविक धर्म झाला आहे. पण मनोरथानुरूप फल प्राप्त होणें, हें मात्र फार प्रयत्नांचें व सुकृतसंचयाचेंच फल होय. सुकृतावांचून सुख कधींच प्राप्त व्हावयाचें नाहीं, \ हा अगदीं अबाधित सिद्धांत आहे. जसें औषधोपचारांनीं रोगादि व्याधी दूर होण्याचा नियम आहे, व अनुभवही आहे, ह्मणूनच उपचार करणें हें अवश्य कर्तव्य आहे. पण मृत्यु उपस्थित झाला ह्म० महासंजीवनीसारख्या औषधी निष्फल

होऊन व्याधी कमी न होतां मरावेंच लागतें. कारण **मरण** हें **कर्माचें** अपरिहार्य **फल** आहे, तें भोगल्यावांचून टळत नाहीं. तसें, सौख्याच्या आशेनें व संततीच्या कल्याणार्थ, मुलांस विद्याभ्यासंगादि सुशिक्षण देणें हें प्रत्येक कुटुंबाचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य यथार्थ केल्यानें सुखानुभव होण्याचा नियम व सर्वांस अनुभवही आहे. पण परस्परांपासून परस्परांस सुख न मिळण्याचा दैवदुर्विलास सिद्ध असल्यास, विद्येच्या ठिकाणीं विद्या राहते! शिक्षणाच्या ठिकाणीं शिक्षण राहतें! व शाहाणपणाच्या ठिकाणीं शाहाणपण राहतें! सर्व प्रयत्न व्यर्थ होऊन सुखप्राप्तीच्या ऐवजीं दुःख उपस्थित होतें, आपसांत वैमनस्यें पडतात, परस्परांस परस्पर नकोशीं होतात, आणि वृद्ध मातापितरांचीं उर्वरित आयुष्यें परम खेदांत व कष्टांत व्यतीत होतात. श्रीमान् कुटुंबी असो, अथवा गरीब कुटुंबी असो, जगांत बहुधा अशाच प्रकारचे विपरीत अनुभव पुष्कळ होतात. आमरणपर्यंत इच्छेप्रमाणें संपत्तीचें व संततीचें पूर्ण सुख प्राप्त होणें, हें क्वचितच पुण्यपुंजभाग्यशाल्याच्या वांट्यास येतें. विद्येच्या व सुशिक्षणाच्या योगानें मनुष्य सुनीतिमान् व शाहणा होणें हा व्यावहारिक सिद्धांत आहे. पण प्रत्येक जीवाचे **प्रारब्धसंस्कार** स्वतंत्र व प्रबल असल्यानें ते जसे चांगले अथवा वाईट सिद्ध असतील तदनुरूपच सर्व विद्याशिक्षणाचा सुपरिणाम अथवा दुष्परिणाम होतो. सुपरिणामानें स्वतःस व दुसऱ्यास सुख होतें व दुष्परिणामानें स्वतःस व दुसऱ्यास दुःख होतें. आपल्या सुखदुःखभोगार्थ आपापलीं प्रारब्धकर्में स्वतंत्र आपल्यावरोबर आहेत. दुसरा निमित्तमात्रास कारण होतो. पण याच गोष्टीचें यथार्थ ज्ञान नसल्यानें सर्व अनर्थ माजला आहे. याच मूलतत्त्वावर कविश्रेष्ठांनीं ह्मणून ठेविलें आहे कीं, " **सुखस्य दुःखस्य न कोपि दाता, परो ददातीति कुबुद्धिरेषा** ' । **अहंकरोमीति वृथाभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः** " या सिद्धांताचें जें पूर्ण अज्ञान हेंच जगत्प्रपंचाचें पूर्ण स्वरूप होय. असो.

**हे राजन्!** जीवाच्या आयुष्याची मध्यावस्था ह्म० जिला तारुण्यावस्था ह्मणतात ती जीवाच्या प्रारब्धफलोदयाच्या परीक्षेची

तराजू आहे. तिला सद्गुणानें व दुर्गुणानें बद्ध अशीं दोन पालवीं आहेत. जीवाच्या सारासारविचाररूप हस्तानें **सत्कर्म** अथवा **असत्कर्म**रूप वजनाची ज्या पालव्यांत जशी भरती होईल तेंच पालवें भारी होणार आहे. व तो जीव व्यवहारांत सज्जन अथवा दुर्जन ह्मणविणार आहे. सज्जनापासून सर्वांस सुख व दुर्जनापासून दुःख होणार आहे, इ० सर्व विचार सुशिक्षणानें मनुष्यांस कळतात. पण तारुण्याची अवस्था अशी कांहीं बेफाम आहे कीं ती एकवार येऊं लागली ह्म० बहुधा सद्वर्तनाला, सुशिक्षणाला, सुनीतीला व सद्बुद्धीला थोडा बहुत धक्का बसल्यावांचून राहणार नाहीं. कारण त्या अवस्थेचा तो धर्मच ठरला. व तदनुकूल सर्व साहित्यें अनायासें मिळूं लागतात. प्रपंचांत सद्वर्तनी लोकांपेक्षां असद्वर्तन्यांचा वर्ग फार आहे व त्याचे अशा नूतनावस्थेंत प्राप्त झालेल्यास आपल्या कक्षेंत ओढण्याचे सदैव प्रयत्न व शोध चालू असतात. जसा कोळी किडा मक्षिका धरण्यास व हिंस्र पशू आपल्या शिकारीवर टपून बसतो व संधी सांपडतांच घात करतो, तसा असद्वर्तनी व दुर्व्यसनी स्त्रीपुरुषांचा वर्ग, नवीन होतकरू सुशिक्षित पण कोमल ह्म० अपरिपक्व बुद्धीचे व यौवनावस्थेंत प्रवेश करणारे अशा स्त्रीपुरुषव्यक्तींस आपल्या वर्गांत डांव सांपडतांच आंत ओढून त्यांचे सर्वस्वाचा नाश करतो. अशा दुष्टांच्या पाशांत कोमल मनाची तरुण स्त्रीपुरुषव्यक्ति एकवार सांपडली ह्म० सुटका होण्याचें नांव नको. तारुण्याचें भांडवल तर स्वयंसिद्धच अनायासें प्राप्त होतें व सदसद्विचारास मुळांतच फांटा बसतो. त्यांत जर धनसंपत्ति अनुकूल झाली तर मग अनर्थास पारावार नाहीं. पालकांचें व शिक्षकांचें प्रथम मातेरें होणार. कारण यथेच्छ वर्तनांत प्रथम तेच आड येणार, त्याचा प्रतिबंध याला विषतुल्य लागणार, मग जुळावें कसें ? संततीची बुद्धि तारुण्यांत येऊन परिपक्व होईपर्यंत त्यांना दुष्टसंगतीपासून वांचविणें हें फारच खबरदारीनें केलें पाहिजे. यांत चूक झाली तर शिक्षणादि सर्व उपाय निष्फल होतात. पुढें आपल्या निषेधाचा कांहीं उपयोग न होतां संततींत व आपल्यांत वैमनस्य व शत्रुत्व उत्पन्न होतें. ज्या गोष्टीचा आपण निषेध करतों ती गोष्ट ते दाटून करतात. पितरादि शिक्षकां-

चा वारंवार उपमर्द होऊं लागला म्ह० ते कंटाळून हताश होतात, व दैवाला हात लावून खेद करीत बसतात. अशा प्रकारें शिक्षणाच्या प्रतिबंधास झुगारून एकदां निष्कंटक व अनर्गल झाला कीं, स्त्री असो वा पुरुष असो, त्याला मी आतां स्वतंत्र झालों याबद्दल आनंद वाटतो. आणि ज्याप्रमाणें मदोन्मत्त हत्ती निरंकुश होऊन पुष्पवाटिकेंत, ग्रामांत, वनांत व जलाशयांत नासाडी करीत यथेच्छ संचार करितो, त्याप्रमाणें हा जीव तारुण्यमदानें उन्मत्त होऊन सद्विचारांकुशास न जुमानतां आप्तसुजनरूपी ग्रामाचा उपमर्दरूपी नाश करतो. सद्धर्मसुनीतिरूप पुष्पवाटिकेचा विध्वंस करितो. आणि निबिडतर विषयारण्यांत व अगाध स्त्रीजलाशयांत अहर्निश निमग्न होतो. या प्रसंगीं केवळ त्याचें प्रारब्धकर्मच त्याचें सोबती व संरक्षक त्याच्या बरोबर टिकतें. दुसरा कोणीच टिकूं शकत नाहीं. त्यांत जसे संस्कार भरले असतील, त्यांच्या उदयाच्या अनुरोधानें भवप्रवाहांत या राजेश्रीची आयुष्यनौका वहात असते. मग ती भवऱ्यांत पडो, खडकावर आदळून फुटो, तुफानांत सांपडून बुडो, अथवा कांहीं सत्कर्मोदयानें या सर्व आफतींतून निभावून पैलतीरावर सुस्थळीं लागो; काय होणार असेल हें आधीं निश्चयानें सांगतां येत नाहीं. परिणामीं सर्व गोष्टींचें निदर्शन होतें.

**हे राजन् !** तारुण्याची स्वतःसिद्ध उन्मादावस्था असते, त्यांत कनक आणि कांतारूप दोन मदिरापात्रें स्वाधीन झालीं म्ह० त्यांच्या अहर्निश सेवनांत हा जीव निमग्न होतो. त्या मार्गांत याची प्रवृत्ति जशी अधिकाधिक होत जाते तसें यास अधिकाधिक अनुकूल साहित्य मिळत जातें. कारण, दुराचाऱ्यांचाच समुदाय जगांत अधिक आहे, मग सर्व योग जुळण्यास वेळ तो काय ? हें जग गुणांच्या समुद्रानें भरलें आहे. यांत जसे सद्गुण अगाध आहेत, तसेच दुर्गुणही अगाध आहेत. कोणत्याही विषयाचा कोणास आजवर अंत लागला नाहीं. सुदैवानें सद्गुणाची दिशा लागली तर परिणामीं सुख होतें. व दुर्दैवानें दुर्गुणाची दिशा लागली तर क्षणभर सुखाच्या आभासामागें आजन्म दुःखाचा व दुर्गतीचा निधि सांठविला जातो. आणि त्याचे भोगपर्यवसानीं डोळे उघडतात. पण प्रथम तारुण्यम-

रांत याचा विचार करतो कोण ! ! व कशास ? यथेष्ट मार्गानें उ-ड्या मारीत निघालेली ही धनयौवनसंपन्न मूर्ति बाहेर पडली कीं, ज्याप्रमाणें कस्तूरीमृगास धरण्याकरितां आरण्यक भिल्लिणी त्याच्या मार्गांत जाळीं पसरून ठेवितात, त्या जाळ्यांत तो एकवार पडला ह्म० जिवंतपणीं सुटका होत नाहीं. त्याप्रमाणें या विषयारण्यविहा-रिणी रमणीजन भिल्लिणी, आपल्या कपटप्रेमाचीं जाळीं पसरून वरील कामीजन मृगास फसवितात. आणि भ्रूधनुष्यांतून तीक्ष्ण क-टाक्षशराच्या प्रहारानें त्याच्या चित्ताचा वेध करून धनयौवनकस्तू-रीचा गंधही न राहू देतां शेवटीं विरहव्यथादि दुःखानें त्याचा प्रा-णांत करितात. त्यांच्या पाशांत एकवार अपरिपक्व बुद्धीचा तरुण पुरुष सांपडला ह्म० त्याला मागला पुढला विचार कांहींच रहात नाहीं. सर्वस्वीं त्यांचा गुलाम बनतो. त्या नाचवितील तसा नाचतो. त्यांच्या कपटमिश्रित प्रेमल भाषणाच्या उपदेशानें व्यामोहित होऊन स्वजनाचा, वडिलाचा व खास स्त्रीपुत्रांचा देखील द्वेष करितो. त्यां-ना नानाप्रकारचे क्लेश देऊन छळतो. घरची मालमत्ता हस्तगत असेल ती उडवून पुढें चौर्यकर्मांत निपुण होतो. चौर्यविद्येनें घरची संपत्ति संपली ह्म० मग दुसऱ्याचे वित्तावर हल्ला चालतो. त्याच्या परिणामीं शृंखलाबंधनादि अनेक विटंबना हजर असतात. हा स्त्रीआसक्ती-च्या मार्गाचा परिणाम आहे. पण या मार्गावर आरूढ झाल्यावर हें एकच अनुपान राहत नाहीं. त्याचीं सख्खीं भावंडें मदिरापान व द्यूतक्रीडा हीं त्यांत अवश्य येऊन भेटावयाचीं. तीं भेटल्यावर मग त्या आनंदास पारावार नाहीं. अशा स्त्रीद्यूतआसवांच्या त्रिदोष-सन्निपातानें उन्मत्त झालेल्या व्यक्तीची व्यवहारांत काय दशा होते ती सर्वदृष्टानुभूत आहेच. मी कोणाचा कोण, माझें कुल काय ? धर्म काय, कर्तव्य काय इ० सर्व गोष्टींवर पोतेरें लागून विलक्षण कृती-च्या भयंकर परिणामानें शेवटीं मृत्युमुखीं पडतात. मागें लोकांस वाटतें कीं, अमुक मेलाना ? बरें झालें ! समाजांतला एक कंटक गेला. असो. हा प्रकार अशिक्षित अथवा सामान्य शिक्षित ह्म० ज्यांच्या बुद्धींत विचाराची व विद्येची सामुग्री नाहीं अथवा कमी आहे अशा तरुण व्यक्तीचा आहे.

# सुशिक्षित तरुणांचा व्यवहार

पण, हे राजा ! ही यौवनावस्था अशी जबरदस्त आहे कीं, कसाही विद्वान् व शहाणा असो, इच्या उदयकालांत व मध्यकालांत एकवार तरी विद्येस, विचारास व शहाणपणास फांटा बसल्यावांचून राहतच नाहीं. हा अगदीं सिद्धांत आहे. प्रत्येक शहाण्या विचारवानानें आपल्या स्थितीचा आपल्या मनांत चांगला विचार करून पाहिल्यास तारुण्याच्या भरांत कोणत्याही प्रकारचा कधीं प्रमाद घडला नाहीं असें कधींच आढळून येणार नाहीं. त्याचें कारण असें कीं, बाल्यदशेच्यापुढें विद्याभ्यासंगादि शिक्षणास प्रारंभ होऊन तारुण्यांत येईपर्यंत त्याचा सांठा व वृद्धि होत असते. ज्या कालांत विद्यादिगुण सांठविले जातात त्याच कालांत शरीरबुद्धींद्रियादिक यौवनाच्या भरभराटींत येत असतात. अशा दोघांच्या भरतींत विवेकविचाराचा बराच चेंदा होतो, त्यामुळें विद्यादि शिक्षणाचा अंतःकरणावर व्हावयाचा तसा परिणाम होत नाहीं. जी विद्या पुस्तकांत व शिक्षकांत होती ती याच्या बुद्धींत मात्र आली एवढेंच विशेष झालें. पण विद्येचा खरा उपयोग विचारांतच आहे; विचारावांचून विद्या अगदीं व्यर्थ आहे. जर त्या विद्येस अविचाराचें अनुपान लागलें तर अशिक्षितापासून जनसमुदायास जी पीडा होणार असेल ती सुशिक्षितापासून अधिक होईल. चोरी करणें, जारकर्म करणें, दुसऱ्याचे प्राण घेणें, अनेक प्रकारें दुसऱ्यास फसविणें व त्यांचा नाश करणें इ० वाईट कर्में अशिक्षित करूं लागल्यास पदोपदीं फसेल, धरला जाईल, व शिक्षा भोगील. आणि याच कर्मांत सुशिक्षित प्रवृत्त झाला ह्म० जवळ विद्या व चातुर्य जें सांठलें आहे त्याचा पूर्ण उपयोग या मार्गांत होतो. चोरी तर करावयाची पण धरलें न जाण्याची पूर्वींच सर्व तजवीज योजून ठेवावयाची. जारकर्म करावयाचें पण काबूभर उघड होऊं द्यावयाचें नाहीं, व उघड झाल्यास आपल्यास वांचतां यावें. दुसऱ्याचा घातपात करतांना आपलें अंग वांचून परस्पर कार्य व्हावें, व प्रसंग आला तर तिसराच फसावा, मारला जा-

वा व आपण वेगळें रहावें ही इच्छा. पण सत्य कधीं मावळत नाहीं. व लबाडी फार वेळ टिकत नाहीं. वाईट तें वाईटच. अशा अनेक प्रकारांनीं विद्येचा, शिक्षणाचा, व शाहाणपणाचा दुरुपयोग करण्यापेक्षां अक्षरशून्य व मूर्ख राहणें फार चांगलें आहे. तात्पर्य विद्येचा, व शिक्षणाचा अंत:करणावर सुपरिणाम घडल्यावांचून अंत:करण परिपक्व होत नाहीं. अंत:करण परिपक्व झाल्यावांचून सुविचार दृढ होत नाहीं. आणि विचार परिपक्वदशेस आल्यावांचून मनुष्यपणा येत नाहीं. मनुष्यजातीची थोरवी केवळ विचारवत्तेवरच आहे. विचार वाईट असल्यास विद्यादि शिक्षणास लांछन लावणें होय. विचार परिपक्व होण्याची यत्ता तीस वर्षांपर्यंत आहे, आणि तारुण्याचाही मध्य तिसावे वर्षांत आहे. या वयांत येईपर्यंत विद्यादि शिक्षणाबरोबर पालकांचा, शिक्षकांचा व स्वत:चा दाब अंत:करणावर चांगला राहून अंत:करण सुविचारानें दृढ झालें अथवा होत चाललें ह्म० बहुधां अविचारानें उन्माद होत नाहीं. इंद्रियांवर व अंत:करणावर दाब राहून तीं स्वाधीन राहण्याकरितां त्यांचें विचारपूर्वक दमनच झालें पाहिजे; ही गोष्ट केवळ विद्यादि ज्ञानसंग्रहानें होणारी नव्हे.

**हे राजन् !** हा जीव विद्यासंपन्न व विचारनिपुण झाला ह्म० याच्या हातून उन्माद होत नाहीं असें जरी सांगितलें आहे तरी, तारुण्याच्या ऐन भरभराटींत जेव्हां अंत:करणेंद्रियादिकांच्या ऊर्मी विषयाच्या रसास्वादानें उसळतात व खवळतात तेव्हां विद्येची व सुविचाराची फार धांदल उडते. तथापि सुविचार दृढ असले ह्म० ज्याप्रमाणें मदोन्मत्त हत्तीला प्रबल शृंखलेनें बांधून चहूंकडून टोंचण्या लावून, चुचकारीत प्रोत्साहन देत व खाद्य चारवीत पुढें चालवीत युक्तीनें उद्दिष्ट ठिकाणावर न्यावा लागतो, दांडगाईनें काम चालत नाहीं. त्याप्रमाणें तारुण्यमदोन्मत्त इंद्रियग्रामरूप हत्तीस, विचारशृंखलेनें बांधून दोषदर्शनरूप टोंचण्या लावून, शांत बुद्धीनें चुचकारीत व प्रोत्साहन देत आणि श्रुतिशास्त्रप्रतिपादित विहित विषयभोगरूप खाद्यें परिमितपणें देऊन संतुष्ट करीत विवेकाच्या युक्तीनें वैराग्यस्थानीं नेला पाहिजे. अविचाराच्या दांडगाईनें कांहीं

होत नाहीं. कारण, इंद्रियग्रामरूप हत्ती हा अनंत जन्मांपासून विषयारण्यांत निमग्न राहणारा आहे. स्वेच्छेनें तो त्यांतून कधींच बाहेर निघणार नाहीं. बहुत जबरीनें एकदम बाहेर काढल्यास त्याची शक्ति चालल्यास तो काढणाराचा समूळ नाश करील अथवा एकदम स्थित्यंतराचे असह्यतेनें स्वतः मरेल. ह्मणून श्रुतिशास्त्रांनीं युक्तीचे उपाय सांगितले आहेत, ते केले पाहिजेत. विषयांचा आणि इंद्रियांचा अगदीं तादात्म्यसंबंध आहे. विषयदर्शनानें इंद्रियें क्षुब्ध व्हावयाचीं व इंद्रियद्वारा विषय आंत प्रविष्ट झाला कीं, अंतःकरण क्षुब्ध व्हावयाचें. अंतःकरणेंद्रियांस विषयाला सोडून निर्विषय स्थितींत क्षणभरसुद्धां कदापि राहतांच येत नाहीं. अशा स्थितींत त्यांस एकदम नेणाऱ्यावर तीं क्षोभून त्याचा नाश करितात. आणि ईशसद्गुरूकृपेनें तीं निर्विषयस्थलीं नेतां आलींच तर तीं सर्व एकदम मरतात. मग त्यांस पुन्हां अंतःकरणेंद्रियपणा प्राप्त होत नाहीं. पण हें महासाहस आहे. हें कोणाचें कधीं पार पडत नाहीं. व ज्याचें पार पडलें असेल त्याचा प्रयत्न आजचा नसून मागल्या अनेक जन्मांचा आहे. केवळ दुसऱ्याचें पाहून आपल्या शक्तीचा विचार न करितां कोणी साहस करून खड्यांत न पडावें ह्मणून श्रुतिशास्त्रानें विहित विषयोपभोगाचा सुलभ राजमार्ग घालून दिला आहे, त्या मार्गानें विचारवान् खबरदारीनें गेल्यास लवकरच ठिकाणावर येतो. निदान खड्यांत ह्म० अधोगतीस तरी जात नाहीं. **हे राजन् !** बालकांच्या प्रकृतिस्वभावास जाणून त्यांचें हित जसें जननीस करतां येतें, तसें इतरांस कधीं करतां येत नाहीं. **जगज्जननी श्रुतिमाता** परम दयाळू आहे. ती आपल्या जीवबालकांच्या जन्मोजन्मींच्या स्वभावास जाणत असल्यानें, तिनें या अज्ञान मुलास घोर भवसागरांतून सुखरूप पार जाण्याकरितांच वर्णधर्माश्रमाचाररूप सुदृढ नौका करून ठेविली आहे. व **श्रीसद्गुरु** कर्णधार पैलतीरास पोंचविण्याकरितां तयार आहेत. तिच्यांत आरूढ होऊन आनंदानें मौजा करीत ठिकाणावर पोंचावें. साहस करूं नये. कारण, '**बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति** ' व **विषयेंद्रियसंयोगान्मनः क्षुभ्यति योगिनः** ' या वाक्यांवर खास श्रीभगवान् **वेदव्यास** गुरू-

शीं व त्यांचेच श्रेष्ठ शिष्य भगवान् **जैमिनीशीं** मोठा वाद झाला होता. ' **विद्वांसन्नापि कर्षति** ' असा जैमिनीचा आग्रह होता तो शेवटीं खोटा ठरला; ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे. एक एक विषयामागें एक एक जीव प्राणास मुकला आहे. ' **शब्दानें** ' मृग; ह्म० पारध्याचे वाद्यानें नादलुब्ध होऊन जाळ्यांत फसतो आणि मरतो. ' **स्पर्शानें** ' हत्ती—ह्म० शिकविलेल्या हस्तिनी अरण्यांतील नव्या हत्तीस भुलवून आणतात आणि फसवितात. ' **रूपानें** ' पतंग ह्म० दिव्याच्या ज्योतीच्या प्रकाशावर लुब्ध होऊन पतंग किडे प्राण देतात. ' **रसानें** ' मत्स्य ह्म० लोहाच्या गळास पिठाची गोळी चिकटवून दोरी बांधून धीवरानें नदींत टाकला ह्म० मत्स्य त्या गोळीच्या रसास्वादास भुलून ती गोळी गिळतो व गळ्यांत गळ अडकून मरतो. आणि ' **गंधानें** ' भ्रमर, ह्म० कमळाच्या पुष्पांत गंधलोभानें सायंकाळीं गुंडाळला जाऊन मरतो. '**हे भूपते !** जर एका विषयाच्या पूर्ण मोहानें वरील जीव मरतात, तर शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध अशा पांची विषयांस पूर्ण आसक्त असलेला हा मनुष्य जीव याची काय वाट झाली पाहिजे ? सुस्वर गायनादिक व मृदु मंजुल भाषणें ऐकण्याची गोडी याला आहे, चंदनादिक व उंची वस्त्राचे व स्त्रियांच्या नाजूक शरीरावयवांचे सुखस्पर्श याला हावेत, नित्य नवे देखावे व सुंदर स्त्रियादिकांचीं रूपें पहावयास याला हावींत, षड्रसान्नभोजनाचा रसास्वाद नित्य हावा, आणि उत्तम उंची सुगंधि द्रव्याचे सुवास पाहिजेत. अशा पंच विषयांत पंचज्ञानेंद्रियें बद्ध झालीं, आणि क्षणोक्षणीं अनंत प्रकारच्या नव्या मनोरथांत व संकल्प करण्यांत अंतःकरण अहर्निश गुंतलेलेंच असणार, क्षणभर रिकामें राहणार नाहीं. असा चहूंकडून बद्ध झालेला, अनंत जन्मांपासून विषयांचा गुलाम झालेला, आणि स्वतःचें स्वरूप विसरलेला हा क्षुद्र जीव **श्रुतिगुरुचरणावलंब** नौकेवांचून भवाब्धि तरण्यास सर्वथा असमर्थ आहे.

**हे शीलनिधे !** अशा अनंत जन्मांच्या विषयासक्तीनें भवप्रवाहांत गटंगळ्या खात असलेल्या दीन जीवांच्या उद्धारार्थ श्रुतीनें वर्णधर्माश्रमाचारानें विहित भोग भोगण्याची सवड दिली. अधाशास

ह्म० खादाडास एकदम लंघन घातल्यास तो मरेल; त्याचा आहार क्रमानें तोडावा लागतो. तसा हा जन्मोजन्मींचा विषयासक्त जीव आहे. यास एकदम कडक विवेकवैराग्यानुष्ठानावर चढविल्यास हा मरेल; ह्मणून गृहस्थाश्रमी होऊन त्या आश्रमाच्या धर्मांनीं नित्य नैमित्तिक कर्मानुष्ठानाचें आचरण केलें ह्म० सर्व इंद्रियांस कालेंकरून व क्रमेंकरून सर्व विषय परिमित भोगण्यास अनायासें सांपडून तीं तृप्त राहतात. अर्थात, विद्याविचारसंपन्न जीवांस परिमित भोगाच्या सवडीनें हळुहळू विषयासक्ति कमी करून विराग वाढवितां येतो. वैराग्य वाढलें ह्म० शमदमादि साधनें पुढें साधलीं जातात. ही सर्व मोक्षसाधनसामुग्री तारुण्याच्या सशक्तदशेंत जशी सुसाध्य होते तशी पुढें वृद्धावस्थेंत होत नाहीं. तारुण्यदशा अविचारानें जशी अधोगतीस नेते तशी सुविचारानें ऊर्ध्वगति देते. तारुण्य हें मनुष्याच्या जीवित्वाचें अमूल्य रत्न व शक्तीचें भांडार आहे. यांत **धमार्थकाममोक्षादि** इच्छित पुरुषार्थ साध्य करून घेतां येतात. ही गोष्ट विद्याज्ञानादि गुणांनीं युक्त, शुभाशुभविचारनिपुण, आणि रूपयौवनधनसंपन्न अशा तरुण जनास यथार्थ विचारानें समजली. आणि विहितविषयोपभोगार्थ श्रुतिशास्त्रानुमती आहे. या मार्गानें इंद्रियादि संतुष्ट ठेवून मोक्षसुख साध्य करून घेतां येतें. अशी उत्तम सवड सांपडली मग काय ? पडत्या फळाची आज्ञा ! ! सर्व श्रुतीच्या **निषेधतात्पर्यास** एकीकडे सारून, **विधितात्पर्याकडे श्रुतीस** ओढून पूर्ण विषयी बनले. जसें, रोगनिवृत्त्यर्थ वैद्यानें कृपा करून रुचिकर गोड औषधाचें सेवन सांगितल्यास रोग्यानें त्याच्या सेवनाची मजल क्रमानें आहारापर्यंत पोंचवावी; तसें या चतुर जीवांनीं भलत्याच पर्यवसानाला गोष्ट नेली, आणि परमावधीचे विषयासक्त झाले.

---

## पामर व विषयी जिवांचीं लक्षणें व त्यांचे व्यवहार.

हे राजा ! हीं गोष्ट ऐकून तुलाच काय पण सर्वांस मोठें आश्चर्य वाटेल; व शंका येईल. श्रुतिपथानुयायी जीव विचारसंपन्न असतां विषयी कसे बनले ? याचें उत्तर असें आहे. प्रपंचांत मनुष्यकोटीचे चार वर्ग आहेत; ह्म० चार प्रकारचे जीव आहेत, पामर, विषयी, मुमुक्षु आणि मुक्त यांत मुमुक्षु आणि मुक्त यांचीं लक्षणें पुढें सविस्तर सांगतां येतील. सध्यां प्रसंगोपात दोघांचीं लक्षणें सांगतों. ज्यांना सारासारविचार नाहीं, पुण्यपापाची भीति नाहीं, विधि काय व निषेध काय हें जाणत नाहींत, शुभाशुभभेदशून्य, श्रुतिशास्त्रसंतविरोधी, आणि निरंकुशपणें केवळ पशुतुल्य यथेष्टाचारसंपन्न असे जीव 'पामर' ह्मणवितात. यांची व्यवहारपरिचर्या वेगळीं सांगण्याची अपेक्षा नाहीं. त्यांच्या विशेषणावरूनच विचारवानास सहज कळणार आहे. आणि नुकतेंच वर, 'अविचारी व अशिक्षित जीवाच्या तारुण्यांतल्या स्थितीचें जें संक्षिप्त वर्णन करून दाखविलें तें बहुतांशीं पामर जीवकोटीचेंच आहे. पामरजीव अधोगतीचे अधिकारी आहेत. विचारवानांनीं अशा जीवांच्या संगतीस क्षणभरही उभें राहू नये, व त्यांचें कोणतेंही लक्षण आपल्या अंगीं न येऊं देण्याची खबरदारी ठेवावी. कारण त्यांचें एक लक्षण जरी आपल्यांत शिरलें तर हळुहळू सर्व लक्षणें येऊन आपल्यास त्यांच्या पंगतीस बसावें लागेल. दुर्गुणरूप तीव्रदुर्गंधीनें सद्गुणरूप कोमलसुगंधीचा शीघ्र नाश होतो; यास्तव दुर्जनापासून बनेल तितकें दूर राहणें चांगलें आहे. असो. पामरजीवांचीं लक्षणें सांगतांना जीं विशेषणें त्यांना लाविलीं आहेत, त्या विशेषणांच्या अगदीं उलट विषयी जिवांचीं लक्षणें आहेत. ज्यांना सारासारविचार पूर्ण कळतो; जे विद्यादि गुणसुसंपन्न, पापभीरू, विधिनिषेधज्ञ, श्रुतिशास्त्रवृद्धसेवी, व्यवहारनीतिकुशलता इ० सद्गुणांनीं युक्त आहेत; आणि श्रुतिशास्त्रोक्त वर्णधर्माश्रमाचीं नित्यनैमित्तिक क-

र्मानुष्ठानें यथासांग करून, निषिद्धकर्माकडे अथवा निषिद्ध-विषयाकडे न वळतां, यथेष्ट ऐहिक विहितभोग भोगूनही अतृप्त आणि पारलौकिक अपूर्व सुखप्राप्तीच्या आसक्तीनें स्वर्गादि दिव्य फलें देणारीं जीं यज्ञयागादि कर्में तीं करण्यावर आरूढ आहेत. व ज्यांना वैराग्य अथवा आत्मानात्मविचार नाहीं; असे जीव खरे **विषयी** ह्मणविले जातात. विषयी जीवांत पाहिजे तितक्या सर्व गोष्टी उत्तम आहेत, पण यथेष्ट ऐहिक विहित भोगांत अतृप्ति व स्वर्गादि लोकांतील दिव्य सुखांची आसक्ति या दोन गोष्टी अनर्थांचीं बीजें असून **परमफल** जें **मोक्षसुख** त्याच्या प्राप्तींत महाविघ्नकारक आहेत. अविहितकर्म व निषिद्धभोग वर्ज केल्यानें पापाची व अधःपाताची जरी एकाएकीं भीति नसते तरी अतृप्तीचें व महत्त्वाकांक्षेचें पर्यवसान—रागद्वेषाच्या व हर्षामर्षाच्या उत्पत्तीस कारण होतें व त्याच्या योगानें सत्पथावरून च्युति होते; सत्पथावरून घसरला कीं, सांवरणें कठिण पडतें. लवकर न सांवरला कीं अधोगति तयार आहेच. विहितभोगद्वारा अंतःकरणेंद्रियांचें लालन व पोषण करणें हें **मुख्य प्रयोजन** मानावयाचें नाहीं. परिमित भोगापासून आरंभ करून विषयभोगाचें मान कमी कमी करीत शेवटीं विषयांत अनासक्ति व दोषदर्शनानें त्यांचा त्याग करणें हें विहित विषयभोगाचें **परमप्रयोजन** आहे. कारण, विषयभोगानें अंतःकरणेंद्रियें त्रिकालांत कधीं तृप्त होण्याचा संभवच नाहीं; असंतोषानें विषयाच्या वासना सदैव क्षुब्धच राहणार आहेत. जशा अग्नीच्या ज्वाला घृताहुतीनें अधिकाधिक भडकतात, तशा भोगानें वासना अधिकाधिक भडकतात. अग्नि अनिवार्य झाला ह्म० जसा घराचा विध्वंस करतो तशा वासना अनिवार्य झाल्या ह्म० विषयी जीवांचा नाश करितात. **हे राजन्!** विषयी जीव पामरासारखे अज्ञानी व अविचारी नाहींत, त्यांना या सर्व गोष्टींचा आणि परिणामाचा पूर्ण विचार कळत असतो. परंतु एक वैराग्य नसल्यानें विषयेंद्रियांच्या आधीन राहतात. याला त्यांचें प्रबल कर्मच कारण ह्मटलें पाहिजे. दुसरें काय ह्मणावें.

एका सन्मित्रानें आपल्या श्रीमान् मित्रास ह्मटलें कीं, मित्रा!

आपणास ज्या मार्गानें प्रवास करावयाचा आहे तो मार्ग अरण्याचा असून तेथें चोरांचा फार उपद्रव असल्यानें तूं आपल्या निर्वाहापुरतें सामान्य पदार्थ बरोबर घे. परत ठिकाणावर आलों ह्म० सर्व ऐश्वर्य तुझेंच आहे. श्रीमान् ह्मणतो मित्रा ! तूं सांगितलेले विचार मला सर्व कळतात, मी मूर्ख नाहीं. वाटेनें चोरांची भीति एवढेंचना, मी बरोबर पुष्कळ संरक्षक पाहारेकरी ठेवीन, मग चोर काय करतील. मी श्रीमान् आहें, तुझ्यासारखा गरीबीनें कां प्रवास करूं. चोरांच्या भीतीनें ऐश्वर्य सोडावें काय ! सन्मित्र ह्मणतो, मित्रा तूं ह्मणतोस हें सर्व खरें; पण तुझ्या बंदोबस्तापेक्षां चोरांची धाड जबरदस्त आली तर वित्तसंरक्षणाच्या झटापटींत फुकट तुझे प्राण मात्र अधिक जातील. मी गरीब असल्यानें माझें गांठोडें मी दूर फेंकून आपले प्राण तरी वांचवीन. ठिकाणावर जाईपर्यंत चार दिवस गरीबीनें वागल्यांत तुझें ऐश्वर्य कोणी नेतो काय. श्रीमान ह्मणतो, मित्रा ! मला ऐश्वर्य भोगावयाची संवय असल्यानें व ऐश्वर्यही पुष्कळ असल्यानें मी तसें करूं इच्छित नाहीं. आपल्याकडून बुद्धिबलानुरूप यथास्थित बंदोबस्त करावा; खबरदारीनें चालावें, इतक्यावर जसें प्रालब्धीं असेल तसें होईल. संपत्ति घेऊन एकटा गेलों तर मात्र दोषास पात्र आहें. नसत्या कल्पना उगीच आधीं आणून विचाराचें विदारण करीत बसणें मला आवडत नाहीं. ( सन्मित्र ह्मणतो ) ईश्वर तुला सर्व ऐश्वर्यासह ठिकाणीं पोंचवो अशी मी इच्छा करितों. पण दुर्दैवानें विपरीत प्रसंग आला तर शेवटीं माझें बोलणें आठवेल. पण त्यावेळीं त्याचा कांहीं उपयोग राहणार नाहीं. असो तुझी इच्छा, मी सांगून मोकळा आहें. असें बोलून उगीच बसला.

**हे राजा !** ज्ञाननिपुण आणि विचारसंपन्न विषयी जीवांची ही वाट आहे. कोणत्या प्रकारांनीं कोठेंही अडावयाचे नाहींत. कारण सर्व गोष्टींनीं चतुर झालेना ? बुद्धीची विचारशक्ति निर्मल जलप्रमाणें स्वच्छ आहे, तिला ज्या दिशेस वळवून जसे विचार त्यांत सांठवाल तसेच त्यांचे **संस्कार** उदय पावतील. अनंत जन्मांपासून बुद्धींत विषयविलासांच्या **वासना** दृढ झाल्या आहेत त्यामुळेंच ज-

न्ममरणपरंपरा सुटत नाहीं. आणि त्या वासना हळुहळू क्षीण होण्याकरितांच परिमित विहित विषयभोगांचे उपाय आहेत. विहितविषयभोगानें आणि सत्कर्माचरणानें सहसा दोषाची अथवा पापाची उत्पत्ति होत नाहीं; आणि अधिकाधिक अपूर्व सुखाची वृद्धि होते. ही जरी गोष्ट खरी आहे, तरी विहितविषयभोगार्थच सत्कर्माचरणाचें व भोगाचें दिवसेंदिवस चढतें मान ठेवलें, आणि त्या योगानें दिव्यलोकांतील दिव्यसुखें किती जरी अतोनात भोगलीं तरी वासनेच्या तृप्तीचें मान रतीभर सुद्धां त्रिकालांत कमी होणार नाहीं. अल्पकाल विषय भोगला तरी अतृप्ति, बहुकाल विषय भोगला तरी अतृप्ति. तृप्तीची सीमाच विषयप्रदेशास नाहीं. कारण दृष्टश्रुतमनोवेद्यतेपर्यंत विषयप्रदेशाची सीमा आहे. आणि याच सीमेपर्यंत अंत:करणेंद्रियादिकांची पोंच आहे. या प्रदेशाबाहेर यांना जातां येत नाहीं व राहतांही येत नाहीं. आणि विषयेंद्रियांशीं जीवाचा जोंवर संबंध सुटत नाहीं तोंवर ' **विषयी** ' हें विशेषण जीवाचें सुटत नाहीं. सारांश झालें काय कीं, दृष्टश्रुतमनोवेद्यतेपर्यंत चराचरात्मक सृष्टीची सीमा आहे. या सृष्टीच्या **अधोगती**च्या एका टोंकापर्यंत निषिद्धकर्मफल भोगाचा सर्व प्रदेश **पामरजीवांनीं** आटोपला. दुसरा **ऊर्ध्वगती**च्या टोंकापर्यंत विहित कर्मफलभोगाचा सारा प्रदेश **विषयी जीवांनीं** व्यापला. बिचाऱ्या **मुमुक्षूं**चा मात्र चेंदा झाला. त्यांना ईशगुरुचरणावलंबावांचून राहण्यास स्थळ उरलें नाहीं. आणि **मुक्तजीव** तर सृष्टीच्या सीमेच्या बाहेर गेले. आणि जे इतरांच्या दृष्टीनें सृष्टींत राहिले ते सृष्टीला आपल्या स्वरूपांत लीन करून स्वस्थानीं बसले आहेत. तात्पर्य, ही सर्व विषयरूप सृष्टि विषयी जीवांची आहे. व हिचे भोक्ते विषयी जीव आहेत. पामरांस विषयाचे भोक्ते ह्मणतां येत नाहीं. ते तर विषयांचे गुलाम आहेत. जे षड्रसांचीं पक्वान्नें तयार करून देव अतिथींस संतर्पण करून स्वजनांसह आनंदानें रसास्वाद घेत भोजन करणारे, हे षड्रसान्नभोजी ह्मणावे. जे श्वानमार्जारवत् पदार्थांत तोंडें घालतात, तुकड्याकरितां दारोदार फिरतात, उच्छिष्टें चाटीत फिरतात, व क्षणोक्षणीं मार खातात, अशा वृत्तीनें जरी पोट भरलें तरी त्यांस भोजन करणारे असें ह्म-

णतां येत नाहीं. याच उदाहरणाप्रमाणें सृष्टीचे विषयोपभोग पामर-जीव आणि विषयी जीव अहर्निश जन्मोजन्मीं भोगीत असून सदां अतृप्त असतात. तृप्त व्हावें अशी इच्छा तर फार असते, पण तृप्ती-करितां, अधिक प्रयत्नानें व नव्या नव्या कल्पनेनें विषयभोगांच्या चमत्कृतीचे विपरीतच उपाय योजिले जातात. मग तृप्ति कशास होते?

हे **राजा**! सृष्टिव्यवहारांत **विषयी** जीवांचीच प्रौढी आहे. व त्यांची केवढी योग्यता व लक्षणें कशीं आहेत हें सर्व तुला आतां सांगितलेलें चांगलें लक्षांत असूं दे. **विषयी** जीवांस तृप्तीची इच्छा असते असें जें वर सांगितलें त्याचें इंगित असें कीं, इच्छेची तृप्ति तर व्हावी, पण ती विषयभोगांनीं व्हावी. अग्नि तर विझावा पण तो तुपानें विझावा ही हौस. ह्मणून त्यावर जास्त घृत झोंकल्यानें जसा उगीच दोन पळें प्रथम मंदावलेला दिसून लागलींच पुनः भडकतो. तसा अ-धिक विषयोपभोगानें कामाग्नि क्षणभर शांत दिसतो. आणि उत्तर-क्षणीं वासनेच्या ज्वालांनीं भडकूं लागतो. अशा विपरीत उपायानें त्रिकालांत तरी शांतीचा संभव आहे काय? कधीं नाहीं. स्वच्छ व-स्त्रावर तेलाचा डाग पडला, त्याला तेलानेंच धुवूं लागल्यास डाग सुटणें तर राहिलेंच, पण हळूहळू सर्व वस्त्र मात्र तेलकट होतें. वि-षयभोगाच्या **संस्कारानेंच** भोगाची वासना होते, ती शांत करण्या-करितां विषयभोगाचाच उपाय होतो. त्यानें सर्व अंतःकरण भोगवा-सनामय आणि सर्व उपाय भोगफलप्राप्तिमय झाले ह्मणजे हे **विषयी** जीवही अगदीं तन्मय व तदाकार होतात. व आपल्या **स्वरूपास** व कर्तव्यास विसरतात. **हे राजा**! खरोखर मोठ्या दुःखाची व खेदा-ची गोष्ट आहे कीं, पामर ते पामरच, पण हे विषयी जीव सर्व सद्गु-णांनीं युक्त, सुविचारसंपन्न आणि चतुर असतां वासनेचे गुलाम बनून विषयाधीन झाले. मोक्षसुखास आंचवले. श्रुतीच्या **परमप्रयोजन** तात्प-र्याचें त्यांनीं मातेरें केलें. विधियुक्त कर्मफलभोगांत श्रुतितात्पर्यास ला-वून अचाट कर्मकदंबानें विषयरूप सृष्टि सपुष्ट केली, आणि स्वतः-ला व उत्पन्न होणाऱ्या जीवांस व्यामोहांत पडून मरण्याकरितां अ-गाध विषयांचा प्रचंड डोह मोक्षमार्गाच्या मधोमध खणून ठेविला आहे. या शहाणपणास ह्मणावें तरी काय? **राजा**! येथें लोकांस

अशी शंका येईल कीं, श्रुतीनें या जीवांस **विहित** विषयभोगाची सवड दिली ह्मणून या शहाण्या जीवांनींही पडत्या फळाची आज्ञा मानून व्यूह रचला. श्रुतीनें **परमप्रयोजन** मोक्षाचा उपदेश करतांना मध्यें कर्मप्रवृत्तीचें **गौण प्रयोजन** कशास सांगावें ? याचें उत्तर असें कीं, **विहित विषय** भोगाची सवड दिली नसती तर हे **विषयी जीव** पामर जीवांच्या पंगतीस येऊन बसले असते. मग मोक्षफलप्राप्तीचा संभव न राहतां लागलेच अधोगतीस गेले असते. पामर जीवांस चांगलें वाईट कळत नाहीं असा अर्थ नाहीं. पशूसही चांगलें वाईट कळतें, मग पामरांस न कळावें हें कसें होतें; पण नाहीं, बरें-वाईट, शुद्धाशुद्ध, विधिनिषेध व पुण्यपाप इ० सर्व कळत असून, बुध्या सर्व प्रतिबंधांस झुगारून यथेष्टाचारी होतात ते पामर ह्मणवितात. या थरास सर्वांनीं जाऊं नये ह्मणून सर्वज्ञ आणि जीवहितासक्त **श्रुतीनें** विहित विषयभोगार्थ सत्कर्माचरणाचें **गौण प्रयोजन** सांगून पुढें **परम** प्रयोजन **मोक्षसुख** दाखविलें. मनुष्यजीवास जर सारासारविचारशक्ति जगदीशानें दिली नसती तर मात्र ईश्वराकडे व श्रुतीच्या उपदेशाकडे दोष आला असता. मनुष्येतर सर्व जीवांस सारासारविचारशक्ति मूळांतच नसल्यानें त्या जन्मांत ते पुण्यपापाचे फलविभागी नाहींत. केवळ जन्ममरणमात्रानें प्राप्त झालेल्या योनींचा उपभोग करून पुढें चलत जावें. तसा प्रकार मनुष्यजीवांचा नसल्यानें विचारशक्तींत मनुष्य बांधला जाऊन शुभाशुभ कर्मफलाचा अधिकारी झाला. आतां सदसद्विचारास झुगारल्यानें त्याचे फलभोग पिच्छा कसे सोडतील. ते भोग भोगण्याकरितां जीवांस कर्मानुरूप ऊर्ध्वलोकीं व अधोलोकीं गेलेंच पाहिजे. अशा अनंत सृष्टींच्या विषयारण्यांत सर्व जीवांनीं अनिवार्य भटकून यदृच्छेनें जी गति मिळेल तिकडे वाहत जाऊं नये, ह्मणून श्रुतीनें मनुष्यजीवाच्या यावत् सृष्टींतल्या कर्तव्याची आदिमध्यावसानापर्यंत सर्व व्यवस्था बांधली आहे. आणि मोक्षफलप्रदेशापर्यंत उत्तम व सरळ विचाराचे राजमार्ग घालून दिले आहेत. ईश्वराकडे व श्रुतीकडे कोणत्याही प्रकारें दोषाचा लेशही येऊं शकत नाहीं. आपल्या विचारशक्तीच्या धोरणानें जो जीव ज्या मार्गास जाईल त्याला तसें फल होईल. ठिकाणावर पोंच-

ण्याचे अनेक मार्ग असतात. त्यांतून कोणत्याही एका मार्गावर आरूढ होऊन शीघ्र मार्गक्रमण करून स्वस्थळीं लवकर पोंचणें हें **मुख्य** प्रयोजन आहे. स्वस्थळीं पोंचण्याची इच्छा तर आहे; पण मार्गांत अनेक चमत्कार पाहत, मौजा मारित, आणि त्याकरितां अधिक वेळ गमवीत हळूहळू जाणें हें ' जाणें ' होय. परंतु अशा तऱ्हेनें मौजेच्या आसक्तींत मार्गच्युति न होतां निर्विघ्नपणें व दृढबुद्धीनें मार्गारूढ राहिल्यास फार उशीरानें पोंचेल तेव्हां पोंचेल. अशा प्रकारानें स्वस्थळीं पोंचणें हें **गौण** प्रयोजन होय. विषयी जीवांनीं परम प्रयोजनार्थ शीघ्र गतीचा त्याग करून गौण प्रयोजनाची मंदगति स्वीकारली. संसारांतील अनेक मौजा पाहण्यांत आसक्त झाले, अतएव ते **विषयी** ह्मणविले.

---

## पंच विषयांचीं विस्तृत स्वरूपें.

**हे राजा!** विषयी जीवांनीं परमफल जें **मोक्षसुख** तें पर्यवसानीं प्राप्त होईलच अशा विश्वासानें श्रुतीनें सांगितलेला विहित कर्माचरणाचा व विहित फलभोगाचा **गौण** मार्ग स्वीकारून मंदगतीनें अगदीं सरळ गेले असते तरी चिंता नव्हती; फार उशीरानें स्वस्थळीं पोंचते इतकेंच. पण या जीवांनीं विहित विषयभोगाच्या परिमितपणाची सीमाच नाहींशी केली. अहर्निश त्यांत बुडून **परम**प्रयोजनास अगदीं विसरले. उद्दिष्ट स्थलावर पोंचण्याची विस्मृति पडली. कसल्याही नादांत गुंतून दिशा चुकली असतां आह्मी पुढें जात आहोंत कीं पुन्हां माघारे परत येत आहोंत अथवा भलतीचकडे जात आहोंत याचें भान न राहिलें ह्म० अधःपातास वेळ काय लागणार! विहित विषय झाला तरी त्यांत परिमितपणाचा कडक नियम राहिलाच पाहिजे. परिमित भोजनानें जो अन्नरस शरीराच्या पुष्टीस कारण होतो तोच अपरिमितपणानें शरीराच्या नाशास कारण होतो; हें समजतें. पण नाहीं. वाटेल तितकें खावयाचें व पचनार्थ वरून औषधी खावयाच्या! क्षुधा वाढवावयाची! असाच क्रम पुढें वाढला ह्म० एक दि-

वस अनर्थ आहेच. ही **सृष्टि** गुणाचा समुद्र आहे असें वर सांगितलें आहे; इच्यांत न कळे किती अगाध गुण भरले आहेत, त्या गुणांपैकीं पांचच गुण व्यक्त होऊन चतुर जीवांच्या हातीं आले. तों त्यांनीं आपल्या बुद्धिबलानें एक एक गुणाला स्वतंत्रपणें समुद्राचें स्वरूप आणलें. भूमिगर्भांत जल अगाध भरलें आहे. त्यांत लहान मोठा कूप, बावड्या, सरोवरें आणि अति मोठे ह्म० सहस्रावधि लोकांच्या उपयोगाचे असे विस्तीर्ण जलाशय किंबहुना नद्यांसारखे जलाचे पाट सुद्धां जीवाच्या स्वतंत्र कृतीनें होतात. तसे गुणाच्या विकृत स्वरूपास जीवांनीं अगाध स्वरूप दिलें आहे.

एक **शब्दगुण** पहा. हा मूळचा ध्वनीरूप व स्वररूप असा निर्गुण **बिंदुरूप** होता, तो वर्णात्मक श्रुतिरूपाला प्राप्त होऊन पुढें स्मृति, शास्त्रें, पुराणें, इतिहास अनेक देशपरत्वें व लोकपरत्वें निरनिराळ्या भाषा, त्या भाषांचीं निरनिराळीं विचारशास्त्रें व त्यांचे ग्रंथ नकळे किती निर्माण झाले, किती नष्ट झाले, किती आहेत व किती होतील असा भाषणरूपानें व लेखनरूपानें ' **शब्दाचा** ' किती अफाट समुद्र आहे कीं जीवांस त्याची नुसती संख्या सुद्धां मोजतां येणें अशक्य आहे. **शब्दाची** दुसरी शाखा, **ध्वनी** व **स्वररूपानें** गायन, नृत्य व वादनाकडे पसरली, त्यांचीं स्वतंत्र शास्त्रें झालीं व तीं स्वतंत्र विद्या बनली. त्यांत पारंगतपणाची कांहीं सीमाच राहिली नाहीं. मनुष्यलोकांत विद्येचा न्यूनाधिकपणा असण्यांत आश्चर्य नाहीं. कारण येथें आयुष्य थोडें, पण दिव्य लोकीं कल्पांतापर्यंतचीं आयुष्यें आहेत, तरी त्यांना गुणनिष्णातपणाची सीमा कळत नाहीं. व विद्येच्या अधिक संपादनाची चढाओढी सुटून शांतता होत नाहीं. आकाशांत कितीही उंच गेलें तरी तें पुढें अनंत आहेच. शब्दशास्त्रांचीं नुसतीं नांवें लिहूं ह्मटल्यास ग्रंथसमूह होईल, त्याचें वर्णन किती होणार ? सृष्टींत शब्दजालाचें अरण्य आहे. त्याचा थांग लागण्याकरितां किती जरी भ्रमण केलें तरी श्रमाचेंच फल प्राप्त होईल. तसाच,

दुसरा **गुण 'स्पर्श'** या स्पर्श विषयानें चित्ताकर्षणांत शब्दगुणावरही ताण केली. सामान्य वस्त्रापासून मृदु उंची वस्त्रें, सुखशयनें, सुखासनें, अश्व गजादि अनेक वाहनें, यंत्रें, अमूल्य आभूषणें, अ-

नेक सुखस्पर्श चंदनादि द्रव्यें, आणि सर्व विषयांचें मुकुटमणी असें रतिसुख व त्या सुखाची खाण जी वनितालता तिच्या दृढालिंगनाचा सुखस्पर्श इ० विषय अनंत अपार आहेत. त्यांच्या संपादनाचीं, कृतीचीं व उपभोगाचीं स्वतंत्र शास्त्रें झालीं आहेत. ज्या विचारवानास जो विषय गोड लागला व त्यांत ज्यानें प्रवेश केला त्यानें स्वबुद्धिबलानुरूप त्याचा अनुभव करून अनुभवजन्य शास्त्ररचना तयार केली. या वर्गांतील शास्त्रांत कलाकौशल्याची कृतिजन्यता अपार आहे.

तिसरा **गुण ' रूप '** या रूपगुणानें तर सर्व सृष्टीला दृष्टींत आकर्षण करून घेतलें आणि आपण सृष्टिरूप झाला. वर सांगितलेल्या गुणांचीं जीं साकार द्रव्यें तीं सर्व दृश्यत्वामुळें रूपगुणांत ओढलीं गेलीं. सामान्य दृश्य पदार्थांस कृतीनें सौंदर्य अधिक आणितां येतें. जितकें सौंदर्य अधिक येतें, तितकेंच त्यांत चित्ताकर्षण जास्त होतें. घर, ग्राम, नगर, प्रदेश, उपवन, अरण्य, नद्या, सरोवरें इ० स्वयंसुंदर व कृतीनें सौंदर्य आणिलेले असे अनंत जड पदार्थांचे एकापेक्षां एक अधिक देखावे; आणि जीवमात्रांच्या स्वरूपाचें चित्रविचित्र दर्शन, मनुष्याचे स्वरूपांत एकापेक्षां एकाचा न्यूनाधिकपणा, त्यांत विशेषतः स्त्रियांचें रूपसौंदर्य इ० अनेक विषय अपार आहेत. **दृश्यसृष्टि** सर्व रूपविषयांतच आहे. तेव्हां याचा अंत कोणास लागणार.

चवथा **गुण ' रस '** रसाचे दोन वर्ग आहेत. एक **भक्ष्य** व दुसरा **पेय** ह्म० खाणें व पिणें. त्यांत मुख्य सहा भेद आहेत. गोड, कडू, आंवट, तिखट, तुरट, आणि खारट यांस **षड्रस** असें म्हणतात. या सर्वांत **' मधुर '** हा वेगळाच रस आहे; त्यांत सर्व रसांचा सूक्ष्म समावेश होतो. हे षड्रस भक्ष्य व पेय या दोन वर्गांत मिळाले आहेत. भक्ष्य पदार्थांतही चार भेद आहेत. म्ह० भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य. [भक्ष्य ह्म० सुकें पीठ अथवा चूर्ण खाणें. भोज्य म्ह० जें अन्न चावून चावून खाल्लें जातें तें. लेह्य म्ह० राव इ० जें चघळून खाल्लें जातें. आणि चोष्य म्ह० चोखून खाणें, अंबा इक्षु इ०] हे **रस** सृष्ट पदार्थांत स्वाभाविक असून जीवांच्या

रसास्वादासक्तीनें व कृतीनें या रसांस खान व पानाच्या रूपानें अनंतत्व आलें आहे. सामान्य पदार्थानें पोट जरी भरलें तरी अतृप्तीनें त्यांत नित्य नवी चमत्कृति वाढून सूपविद्येचीं शास्त्रें झालीं. यांतून एक शाखा रसायनाची व औषधीची वैद्यशास्त्राकडे गेली. तिचा तिकडे अगाध विस्तार झाला. हा सर्व रससमुद्र रसनेचा म्ह० जिव्हेचा विषय आहे. ही जिव्हा ज्ञानेंद्रियांत रस ग्रहण करणारी व कर्मेंद्रियांत शब्द उच्चार करणारी अशी दोनीकडे एकच असल्यानें इनें आपल्या रसविषयाचा भाग शब्दविषयांत मिसळून तिसरीच शाखा फोडली. आणि इकडे सहा रस होते ते **नऊ** केले. शब्दशास्त्रांत नऊ रस म्ह० शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बिभत्स, शांत, व रौद्र, असे आहेत. यांतील प्रत्येक रसाचीं वर्णनें, स्वरूपें व विषय अपार आहेत. कोठवर अंत लागणार.

पांचवा **गुण ' गंध '** या गंधगुणानें आपल्या सुगंधी व दुर्गंधी अशा दोन रूपांनीं प्रत्येक पदार्थमात्रांत स्वाभाविक व्याप्ति केली. यालाही जीवाच्या कृतीनें विलक्षण रूप आलें. दुर्गंधिविनाशक व सुगंधिवर्द्धक असे अनेक पदार्थांचे समूह व त्यांच्या कृतीचीं शास्त्रें निर्माण झालीं. खानपानाच्या पदार्थांत त्यांच्या मिश्रणाचा उपयोग झाला. व घ्राणेंद्रियद्वारा त्यांचा स्वतंत्र भोग आहेच. वरील विषयाप्रमाणें हा **गंध** गुणही अपार आहे.

**हे राजन्!** विषयसमुद्राच्या स्वरूपाचें व विस्ताराचें हें नुसतें दिग्दर्शन केलें आहे. याचें वर्णन सुद्धां होणें दुर्धर आहे. या दिग्दर्शनावर बुद्धीच्या विचारशक्तीस कितीही विस्तृत करून जन्मभर नुसतें पहात बसलें तरी पैलतीराची एक काडी देखील कधीं दिसणार नाहीं. प्रत्येक विषयाच्या स्वतंत्र स्वरूपाची ही स्थिति आहे. पण स्वतंत्र रूपानें एक **विषय** कधींच आढळत नाहीं. ज्या विषयाला हातीं घ्यावें त्याच्यांत मिसळलेले पांची **गुण** येतात. जणूं काय लुटारूंची टोळी एक जुटीनें पथिकांस नागविण्याकरितांच निघाली आहे. एकामागें सर्व आंगावर पडून फडशा करितात. अथवा जो ग्राहक दुकानांत एका वस्तूकरितां जातो त्याच्या प्रलोभनार्थ दुकानदार उत्तम दहा वस्तू पुढें सारतो. ती दशा या पंच विषयांनीं केली आहे.

जीवास एका विषयाची इच्छा होऊन त्यानें तो हातीं घेतला कीं, चौघे जास्त आंत शिरतात. व जीवाला लुब्ध करून लुटतात. अर्थात सर्व इंद्रियें आपापले विषय आपल्याकडे ओढून घेतात. अशी परस्पर विषयेंद्रियांची प्रीति वाढत चालली ह्मणजे पुढें आसक्ति सुटत नाहीं. पंच **विषयांची** एकमेकांत गुंतागुंती व त्या गुंत्यांत **इंद्रियांची** गुंतागुंती आणि त्या गुंत्याच्या जाळ्यांत **जीवाची** गुंतागुंती, कसा अनिवार्य घोंटाळा झाला आहे तो पहा. आठ प्रहरांत क्षणभर सुद्धां जीवाचा विषयेंद्रियसंयोग सुटत नाहीं. व विषयभोगानें संतोष होत नाहीं. संतोष होण्याकारितांच जीवांनीं विपरीत उपाय काढले व त्या उपायांनीं विषयांचे समुद्र झाले. इंद्रियें इतर जलचर व अंतःकरणें मीन ( मत्स्य ) झालीं. व जीव स्वतंत्र असतां आपल्याच शाहाणपणानें अत्यंत पराधीन झाला. **हे राजन् !** वर जे विषयांचे अगाध समूह दाखविले त्यांतून जीवास एक कण, कोणास दोन कण, कोणास चार, ज्याची योग्यता अधिक असेल त्याला दोन चार कण अधिक, मिळतात. कणाच्या संख्येहून अधिक मिळत नाहींत. तरी हा अनर्थ आहे. वर जे विषयाचे समुद्र दाखविले एवढ्यानें सृष्टीचे विषय आटोपले असें नाहीं. हे विषय केवळ एका भूलोकाचे आहेत व यांचे भोक्ते मर्त्य जीव आहेत. सप्त स्वर्ग, सप्त पाताळ व अनंत ब्रह्मांडें यांतील दिव्य भोग व त्यांचे अजरामर जीव भोक्ते, येथल्यापेक्षां न कळे किती सहस्रावधी पटीनें अधिक असतील व कसे असतील याचें प्रत्यक्ष ज्ञान येथून होत नाहीं. तें सर्व परोक्ष आहे. तथापि विषयी जीव ऐहिक भोगानें अतृप्त राहून आमुष्मिक ह्मणजे दिव्य लोकस्थ भोग कसे मिळतील या खटपटींत पडून तरफडत आहेत. केवळ नरकादिक अधोगतीच्या भीतीनेंच हे **विषयी** जीव निषिद्ध कर्में व निषिद्ध भोग वर्ज्य करतात. आणि श्रुत्युक्त विहित कर्माचरणानें विहित विषय भोगतात आणि दिव्य भोगासक्तीनें श्रुत्युक्त दिव्यफलप्रतिपादक अशीं यज्ञयागादि, योगतपादि काम्य कर्मानुष्ठानें करीत असतात. पण, आसक्ति व अतृप्ति पिच्छा सोडीत नसल्यानें स्वर्गांतसुद्धां चित्ताला शांति प्राप्त होत नाहीं. कारण ज्यांना ऐहिक सामान्य विषयांतून चित्त आवरेना व संतुष्ट राहतां येईना त्यांना दिव्य भोगांत संतुष्ट कसें

राहतां यावें ? अतिरिक्त विषयासक्तीनें जोंवर असत्पथाकडे वळत नाहीं, तोंवरच मोठें भाग्य समजलें पाहिजे. असो.

---

# विहित विषयभोग.

**हे राजा !** श्रुत्युक्त कर्माचरणानें विहित विषयोपभोगांत विषयी जीवांनीं परिमितपणाचें व तृप्तीचें अनुपान लावलें तर परमफल जो **मोक्ष** तो लवकर हातीं येईल. पण या चतुर ज्ञानसंपन्न जीवांनीं श्रुतीच्या हितोक्तीचा उलट दुरुपयोग केला. ह्म० **विहितपणाचें** निमित्त करून पर्वतप्राय विषय अंगावर ओढून घेतले ! चातुर्य तें हेंच ! ! ! प्रथम वयांत ब्रह्मचर्य व्रताचें तपानुष्ठान करावें. गुरूच्या घरीं राहून त्याच्या कृपेनें विद्या संपादन करावी. ज्ञानसंपन्न व्हावें, आणि विषयासक्तीकडे न वळतां वैराग्य धारण करून मोक्षफल प्राप्त करून घ्यावें हें जीवाचें अवश्य कर्तव्य व **परमप्रयोजन** आहे. परंतु ब्रह्मचर्य व्रताचरणानेंही इंद्रियांचें दमन व निग्रह पूर्ण न होतां तारुण्यदशा येऊन पोंचली. आणि वैराग्यही दृढ झालें नाहीं. अशा स्थितींत सर्व संगाचा परित्याग करण्याचें धारिष्ट होत नाहीं. असें ज्या जीवांस चांगलें विचारपूर्वक समजेल तर त्यांनीं अंतःकरणावर वैराग्याविषयीं बलात्कार करून, विषयाचा त्याग करण्याचें साहस करूं नये. त्यानें तारुण्यदशा येतांच ब्रह्मचर्याश्रम पूर्ण करून गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावा. श्रौत स्मार्त कर्मांचें अनुष्ठान अथवा जातिवर्णानुरूप जें ज्याचें विहितकर्म असेल त्याचें त्यानें आचरण करावें. आणि नित्य नैमित्तिक कारणानें ज्यावेळीं, ज्या रीतीनें व जितके जसे विहित विषयभोग सांगितले आहेत तितके तसे भोगित गेलें ह्मणजे इंद्रियें क्षुब्ध न राहतां विषयभोगाचा परिमितपणा अनायासें साध्य होतो. आणि असाच अभ्यास चालू राहिल्यावर इंद्रियांच्या शक्ती कमी होतात. मग वैराग्यसाधनास उशीर लागत नाहीं व अडचणही पडत नाहीं. **राजा !** परमप्रयोजनाकडे चित्ताचा पूर्ण झोक टेवून इंद्रियांनीं त्रास न द्यावा ह्मणून निरुपायानें जर भोगाचें मान उतरतें

ठेवून विहित कर्माचरणानें विहितविषय भोगले तर जीवाच्या ठिकाणीं **मुमुक्षुत्व** जिवंत राहतें. नाहींपेक्षां तें ठार मरून त्याच्या जागीं **विषयीत्व** येऊन बसतें, आणि,—मला आतां येऊन बसण्यास केव्हां संधी सांपडेल—ह्मणून **पामरत्व** सदां टपून असतें. पामरत्वाचा एकदां शिरकाव झाला कीं, अधोगतीनें लागलीच माळ घातलीच समजा. बिचारें गरीब मुमुक्षुत्व बालदशेंत असतें त्याला हरिगुरुचरणावलंबच दृढ असला तरच तें टिकतें, नाहींपेक्षां विषयीत्व व पामरत्व हीं तारुण्यमदानें उन्मत्त होऊन त्याचा बहुधा समूळ नाश करतात. तें एकदां लय पावलें ह्म० मग जीवाच्या अंतःकरणप्रदेशावर, स्वारी करण्यांत आपसांत दोघांचें युद्ध माजतें. पामरत्वाचा जय झाला तर तें आपल्या अधोगति राणीसहवर्तमान जन्मोजन्मीं राज्य करतें. आणि विषयीत्वाचा जय झाला तर, तें आपल्या ऊर्ध्वगति राणीसह चिरकाल राज्य करतें. ज्या कोणाचें राज्य होतें तो आपली धनधान्यसमृद्धि होण्याकरितां, जीवांच्या अंतःकरणभूमिकेचें—तीक्ष्ण **वासनेच्या** नांगरानें विदारण करून तिच्यांत भोग्य**विषयांचीं** बीजें पेरतो आणि **कर्मरूपी** डोहांतून अतृप्तीच्या जलाचे विस्तीर्ण पाट त्यांत सोडून अनंत **फलांची** लागवड करतो. मग तीं जशीं बरीं वाईट येतील तीं कालानुक्रमानें याचीं यालाच खावीं लागतात. त्यांत दुसरा वांटेकरी कधीं कोणी होत नाहीं. अशा प्रकारें ऐश्वर्यभोगांत कल्पचे कल्प जरी जन्ममरणपरंपरा चालू राहिली तरी जीवाच्या वासनेच्या अतृप्तीचें पाऊल सदैव पुढेंच राहणार, तें वासनेचा क्षय झाल्यावांचून थांबावयाचें नाहीं. पामरास तर वासनेचा क्षय ह्म० काय ? हें स्वप्नांतही ठाऊक नाहीं. पण विषयी जीव विद्वान व विचारवान असतांही त्यांना वासनेच्या क्षयाची भीति—आपला जीव जाण्याच्या भीतीप्रमाणें वाटते. आणि परमार्थदृष्ट्या **वासनेचा क्षय** होणें ह्मणजे जीवाचा **जीवपणा** नष्ट होणेंच आहे. जीवपणा नष्ट झाल्यावर कोणतें सुख प्राप्त होतें हें विषयी जीवांस शब्दानें कळतें, पण अंगीं अनुभव नसतो. अंतःकरण विषयसुखासक्त असल्यानें त्याला निर्विषयसुख प्राप्त होत नाहीं. व तें मिळाल्यावांचून मोक्ष होत नाहीं. विषयी जीव महा चतुर, वि-

द्याज्ञानसंपन्न व बुद्धिबलपराक्रमानें व कर्मबलानें युक्त असल्यानें त्यांनीं विषयसमुद्राचें मंथन करून मोक्षामृत काढण्याचा प्रयत्न सुरू केला. अथवा विषयसुखाची किंमत मोक्षसुखापेक्षां सृष्टींत अधिक चढवावी या हेतूनें विहित विषयभोगाचें मान अतोनात वाढविण्याकरितां जणु काय हात धुवून मागें लागले आहेत. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हेच मुख्य भोग्य विषय आहेत. यांतील प्रत्येकाचें कसें अगाध स्वरूप वाढविलें तें नुकतेंच वर सांगितलें आहे. आतां विहितमार्गाच्या आच्छादनाखालीं भोग भोगण्याचा कसा मार्ग काढला तो पहा.

---

## 'विद्ये' चा भोग.

विषयी जीवांच्या हातून सहसा निष्कामकर्म होणार नाहीं. जें कर्म करतील तें फळाच्या आशेनें करतील. नित्य नैमित्तिक कर्में जरी करतील, तरी तीं कर्मलोपजन्य दोष न लागावा यासाठीं करतील. आणि पापाच्या व अधोगतीच्या भीतीनें निषिद्धकर्म आचरण करणार नाहींत. एवंच सारीं कर्में स्वतःच्या मतलबाकरितां झालीं. निष्काम बुद्धीनें परमेश्वरार्पण केलेलें कर्म फलभोगास कारण न होतां अंतःकरणशुद्धिद्वारा मोक्षास कारण होतें. असलीं कर्में, जणूं काय अगदीं फुकट जातात म्हणून तीं करण्याची यांना इच्छा होत नाहीं. भोगाची वृद्धि होईल व आसक्ति अधिक वाढेल अशा सवडीचीं कर्में झालीं पाहिजेत; तोच क्रम यांनीं चालविला. ब्रह्मचर्याश्रमांत अर्थात् गृहस्थाश्रमी होण्याच्या पूर्वकालांत विद्यासंपादनाचा काल असतो. त्या कालांत आपल्या बुद्धीच्या पूर्ण शक्तीप्रमाणें विद्यासंपादनाचा एकवार चांगला नाद लागला ह्म० तो जरी षट्शास्त्रवेत्ता झाला तरी आजून मला कांहीं येत नाहीं, व मी अज्ञानी आहें, असेंच वाटून पुढें अध्ययनाचा सपाटा चालू राहतो आणि जन्मांत कधीं तृप्तीचें टोंक हातीं येत नाहीं. शब्दगुणी विद्येचा कसा अफाट समुद्र आहे हें वर सांगितलेंच आहे. त्याचा अंत ला-

गण्याचा कधींच संभव नाहीं. अशा विद्येच्या नादिष्टांना कोणीं विचारलें कीं, अहो महाराज, आपण विद्यासंपादनाची व विद्येनें तृप्त होण्याची कांहीं यत्ता केली आहे कीं, सर्व आयुष्य त्यांतच संपविणार ? आणखीही कर्तव्य आहे कीं नाहीं. याचें उत्तर तो असें देईल कीं, विद्यासंपादन करणें हेंच मनुष्यजन्माचें सार्थक आहे. विद्येसारिखें धन नाहीं. ज्याला चोरांची भीति कधीं नाहीं. व जें धनदान केल्यानें अधिक वाढतें. विद्येसारिखा आनंद नाहीं. विद्याव्यासंगांतच सर्व आयुष्य घालवावें अशी श्रुतिशास्त्रानुज्ञा आहे. विद्येवांचून मनुष्य पशुतुल्य आहे. विद्या संपादनांत समाधान कधीं मानूंच नये. कारण, समाधान मानून बसल्यावर विद्या होत नाहीं. विद्येविषयीं सदां अतृप्तच राहिलें पाहिजे. विद्येची गोडी ज्याला कळली तो कधीं तृप्त व्हावयाचाच नाहीं. सृष्टीच्या अखिल प्राणिवर्गांत ईश्वरानें मनुष्यास विद्येचा आनंद घेण्याकरितांच मुद्दाम उत्पन्न केला असल्यानें, विद्यार्जनावांचून मनुष्यांस दुसरें कांहीं कर्तव्यच नाहीं. त्यांनीं सदा असंतुष्ट व अतृप्तच राहून आपलें कर्तव्य करावें. विद्येला व विद्येनें तृप्तीला यत्ता आहे काय ! तुह्मी भलताच प्रश्न अज्ञान्यासारखा काय करतां. **हे राजा !** विद्याभिलाष्यांचींही भाषणें खरोखर फार गोड आणि उत्तम आहेत. जीवांनीं असें मानिलेंच पाहिजे. तेव्हांच विद्येंत पारंगतपणा होतो. असे विद्याविभूषित जीव सृष्टीचीं भूषणें आहेत. आणि अज्ञानी जीवांवर स्वामित्व ठेविण्याचा यांना ईश्वराकडून अधिकार मिळाला आहे. श्रुतीच्या **गौण** तात्पर्यदृष्ट्या या गोष्टीचा जितका विचार करावा तितका उत्तमोत्तम आहे. पण, **परमप्रयोजन** दृष्टीनें पाहूं गेल्यास मात्र खेद वाटतो, काय करावें ! ! ‘ विद्यासंपादनार्थ तृप्ति मानावयाची नाहीं. ’ असा जो **गौण** प्रयोजनाकडे बुद्धीचा झोंक आहे. त्या झोंकाला “ ज्या विद्येनें अंतःकरण तृप्त होईल अशी विद्या संपादन करावयाची ” इकडे वळविला कीं काम झालेंच समजा. कारण, जीवाची जन्मतः असमाधानवृत्ति नसते, ती सृष्टिव्यवहारसंगानें अधिक असंतुष्ट होत जाते. बुद्धिमान जीवाच्या असमाधानकारक व असंतुष्ट वृत्तीच्या साह्यानेंच विद्येला प्रचंडरूपता प्राप्त झाली आहे. विद्येसारख्या अ-

ति निर्मल व शुद्ध पदार्थास असंतुष्टतेचें वाईट अनुपान लागल्यानें, विवादार्थ, खंडनमंडनार्थ, जयापजयार्थ, आणि स्वमतस्थापनार्थ विद्येचा दुरुपयोग झाला. कां ? श्रुतीच्या **परम**प्रयोजनाचें मातेरें कसें झालें तें पाहिलेंना ? पुन्हां,—विहितविषयता कायम आहे ती आहेच. व अविहितपणाचा दोष नाहीं. दोष नाहीं असें जरी सकृद्दर्शनीं भासलें तरी, दुसऱ्यांच्या मानखंडनास, उपमर्दास, मनक्षोभास, आणि शेवटीं आपल्यास गर्वाच्या शिखरावर पोंचविण्यास आपलीच विद्या कारण झालीना ? अर्थांत, विहितविषय जरी झाला तरी त्यांत समाधानाचें व तृप्तीचें भान न राहिलें ह्मणजे तो विषय पर्यायानें स्वहिताच्या नाशास कारण होतो.

प्रथम वयांत विद्यासंपन्न झाला ह्म० त्याचा उपयोग कसा होतो याची एक शाखा दाखविली. आतां दुसरी शाखा पहा. विद्यादि गुणसंपन्न होतसाते ब्रह्मचर्याश्रमास पूर्ण करून गृहस्थाश्रमांत पाय देतांबरोबर कांतेच्या सकृद्दर्शनीं प्रथम धन हस्तगत असलें पाहिजे. त्यावांचून क्षणभर चालत नाहीं. तेव्हां ज्ञानप्राप्त्यर्थ व ज्ञानवृद्ध्यर्थ जो विद्येचा संग्रह केला होता त्याचा व्यय, धनप्राप्त्यर्थ व धनवृद्ध्यर्थ करावा लागतो. अर्थांत विद्येची ज्ञानपरायणता जाऊन स्वार्थपरायणता आली. स्वार्थपरायणतेची दिशा एकवार प्रधान झाली ह्म० विद्येचा उपयोग अनेक प्रकारांनीं अनेक मार्गांत होऊं लागतो. मग विद्या ह्म० प्रापंचिक उपजीविकेचें एक साधनच होतें. आणि विद्येच्या बलावर धनसंपादन करणें हा मोठा पुरुषार्थ समजला जातो. विद्येची व पुरुषार्थाची सांगड पडली ह्म० ज्या योगानें पुरुषार्थवृद्धि अधिक होईल व ऐश्वर्यवृद्धि जास्त होईल अशा युक्ति व कल्पना नित्य नव्या काढण्याकडे विद्येचा व्यय होऊं लागतो. त्या योगानें विद्येचें अगदीं रूपांतर होतें. ह्म० विद्येची **ज्ञानरूपता** जाऊन तिला **अर्थरूपता** प्राप्त होते. व **ज्ञानशास्त्राचीं अर्थशास्त्रें** होतात. अर्थाची प्रधानता एकवार दृढ झाली कीं, '**परमप्रयोजना**'चा चुराडा तर होतोच, पण सदसद्विचारशक्ति जरी जागृत राहिली तरी मोठेंच भाग्य समजलें पाहिजे. ती जागृत राहिली तर '**गौणप्रयोजन**' तरी कायम राहील व विहित विषयताही जाणार नाहीं. अर्थसंपादन व ऐश्वर्यवृद्धि जी क-

रावयाची ती विहित मार्गानें करावयाची असा निग्रह दृढ राहिला तर सत्पथावरून च्युति न होतां इष्टासिद्धि कालेंकरून व क्रमेंकरून होत जाते. तथापि दैवाची अनुकूलता व प्रतिकूलता सदैव प्रधान आहे. याचें चांगलें विवेचन, मागें उद्योग व प्रारब्धवादांत सिद्ध करून दाखविलेंच आहे. विहित मार्गानें अर्थसंपादनार्थ, दैवाच्या प्रतिकूलतेनें यश न मिळालें ह्म० हर्षामर्ष व रागद्वेषांच्या उत्पत्तीनें अंत:करणाचा झोंक अविहित मार्गानें अर्थसंपादनाकडे सहज वळतो. तो एकवार वळला आणि त्या योगानें अर्थ प्राप्त होऊं लागल्यास विद्येचा सर्व सांठा त्या मार्गानें दुरुपयोगांत खर्च होतो. आणि विद्येस काळिमा लागते. अविद्वानापेक्षां विद्वानाकडून समाजास कशी अधिक पीडा होते, याचें वर्णन पूर्वी झालेंच आहे. सारांश, विद्यासंपादनाचें पर्यवसान, अंत:करणाच्या समाधानाकडे व निजानंदप्राप्तीकडे न राहिल्यास **परमप्रयोजन** नष्ट होऊन '**गौणप्रयोजन**'ही सुरक्षित राहणें दुर्धर होतें. अधश्च्युतीचा संभव असतो. यास्तव विद्वानांनीं व सदसद्विचारसंपन्नांनीं ' विद्या ' ह्म० प्रत्यक्ष ज्ञानचक्षु आहे. हें प्राप्त होऊनही जर त्यांनीं 'परमप्रयोजनावर' दृष्टि न दिल्यास यापेक्षां अधिक हानि ती कोणती ? असो.

---

# धनाचा उपभोग.

**हे राजन्** ! पूर्व पुण्यानें व प्रालब्धकर्मवशात् कोणास या जन्मीं जन्मत:च स्वयंऐश्वर्य प्राप्त असतें. व कोणी स्वत:च्या विद्याबुद्धिपराक्रमाच्या योगानें ऐश्वर्यवान् होतो. अशी व्यक्ति, विद्यादि गुणचातुर्यानें, सदसद्विचारानें, धनैश्वर्यानें, सुंदर स्त्रीरत्नानें, आणि स्वरूपयौवनानें सुसंपन्न झाली, आणि विहित मार्गारूढही असली, परंतु बुद्धीचें धोरण **परम प्रयोजनाकडे** नसेल तर, वर सांगितलेल्या विद्येच्या उपयोगाप्रमाणेंच सर्व ऐश्वर्याचा उपयोग होतो. मग त्यांत **विहित** मार्गारूढता भाग्यानें जोंवर कायम राहील तोंवर राहो. नाहींपेक्षां **अविहित** मार्गानें शेवटीं अध:पात आहेच. तथापि, सर्व

गुणसंपन्न विषयी जीव तसें न होऊं देण्याची काळजी घेऊन, विहित मार्गानें विषयभोगवृद्धि करीत असतात. जितके ह्मणून भोग्यविषय आहेत त्या सर्वांत ' कांता आणि कांचन ' हे दोन विषय अगदीं ' विषयराज ' अथवा मुकुटमणी आहेत. आणि या दोघांचें परस्परांत अत्यंत साहचर्य आहे. हे दोन्ही एकत्र असल्यानेंच परस्परांची शोभा आहे. उत्तम स्त्री प्राप्त होऊन धन नसलें, अथवा विपुल धन असून स्त्रीसौख्य नसलें तर जीवित्व अगदीं व्यर्थ वाटतें. या दोन विषयांतही ' **धनाची** ' योग्यता अधिक आहे. कारण, ' स्त्रिये ' पासून स्त्रीविषयक जितकें कांहीं सौख्य असेल तेवढेंच प्राप्त होईल. आणि ' धनानें ' यावत् भोग्यविषय प्राप्त करून घेणें बहुधा शक्य असतें. अशी धनसंपत्ति जवळ असून विचारचातुर्यता अंगीं असली ह्म० विषयी जीव परमविलासी होतात. श्रुतिशास्त्रांनीं धनव्ययाचे जसे सन्मार्ग सांगितले असतील त्या प्रकारानें द्रव्य खर्च करतील; पण त्यांत **लोकेषणेचें**, महत्त्वाकांक्षेचें, आणि फलोद्देशाचें अनुपान मात्र सुटणार नाहीं. दानधर्मकर्मादिक सर्व करावयाचें पण त्याची फलश्रुति काय आहे हें, प्रथम कळल्यावांचून कोणतेंहि कर्म व्हावयाचें नाहीं. पुण्यक्षेत्रांत, पुण्य पर्वणीला, पुण्य दिवसाला अमुक दान केलें ह्म० त्याच्या सहस्रपट प्राप्त होतें. अमुक व्रत केल्यानें मनेप्सित सिद्ध होतें. अमुक कर्म केल्यानें हें फल प्राप्त होतें. अमुक यज्ञ केल्यानें देवपितरादि लोकांचीं दिव्य सुखें मिळतात, व चिरकाल स्वर्गवास होतो. ब्राह्मणसंतर्पणानें, देवपितरातिथींच्या पूजनानें अपूर्व पुण्य व फल प्राप्त होतें. इत्यादिक जशीं अधिक फलप्राप्तीचीं कर्में असतील तीं इहलोकींच्या व परलोकींच्या फलप्राप्तीच्या लोभानें होतात. **कर्मफलाशीं** जीवाची गांठ पडेल तेव्हां पडेल, पण हातानें **कर्में** चालू असतांच, मी संपत्तिमान् असल्यानें मीच हीं कर्में करीत आहें, इतर गरीब काय करणार. माझी लोकांत मोठी कीर्ति होईल, मी समाजांत मोठा ठरेन, माझ्या उपकारानें लोक माझे ऋणी होतील. इ० अनेक **दांभिक** विचाराच्या ऊर्मी मनांत आल्यावांचून कधींच राहणार नाहींत. आणि आतां लोक माझी प्रशंसा करतील, ती मोठ्या हर्षानें श्रवण करण्याकरितां ज्याचे

कान उत्सुक झाले नाहींत, असा पुरुषच सांपडणें फार कठिण आहे. स्वतःच्या सत्कीर्तिश्रवणानें चित्तास मोठा संतोष होतो, धन्यता वाटते. हाही एक प्रकारचा भोग आहे. कीर्तीची गोडी लागली कीं, 'दंभाचें' प्रस्थ माजतें, आणि त्याच्या योगानें सर्व सत्क्रिया दूषित होऊन यथार्थ फल देणाऱ्या राहत नाहींत. त्यांतूनही, स्वमुखानें स्वयशवर्णनाची चाड लागल्यास सर्व कर्मांचें मातेरें होतें. एवंच सत्कर्मांत द्रव्याचा सव्यय होऊनही पूर्ण फल प्राप्त होण्यांत दंभमात्सर्यादिकांचीं विघ्नें उभीं राहून '**विहितकर्मभोग**' पुरता पदरीं पडत नाहीं. आह्मी करीत काय आहोंत आणि होत काय आहे? याच्याकडे विषयी जीवांचें लक्ष कमी पडून द्रव्यबलावर फलभोगासक्तीनें धर्मकर्मांत अधिक प्रवृत्ति वाढून तृप्तीचें व संतोषाचें मान अज्जी नाहींसें होऊन, फुटक्या भांड्यांत दुग्ध काढण्याप्रमाणें सर्व **कर्में** होतात. ही विहितमार्गानें **अदृष्टफलार्थ** धनव्ययाची एक दिशा झाली. आतां **दृष्टफलाचा** विचार करूं.

'शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध' या पांच विषयांतील प्रत्येक विषयानें एक एक जीव मारला जातो. अशा पांची विषयांस आसक्त जो मनुष्य जीव याची काय वाट व्हावी! असें सविस्तर मागें सांगितलेंच आहे. मनुष्यजीवास नानाप्रकारच्या विषयांच्या ज्या वासना होतात, त्या सर्व विषयांचा, या पंच विषयांतच अंतर्भाव आहे. आणि जीवाच्या कृतीनें पंच विषयांस कसें स्वतंत्र समुद्राचें स्वरूप आलें आहे, हेंही नुकतेंच वर्णन केलें आहे. ते सर्व विषयसमुद्र आपल्याजवळ सांठविण्याची प्रत्येक विषयी जीवास इच्छा आहे; परंतु जेवढें पात्र जवळ असेल तितकेंच विषयोदक त्यांत घेतां येईल. विषयी जीवांजवळ जशी धनसंपत्ति अधिक असेल त्याच्या बलावर ज्यावेळीं जशा भोगाच्या वासना उत्पन्न होतील त्यास अनुकूल ते ते विषय तो आपल्या भोगार्थ संपादन करतो. आणि '**विहितविषयता**' कायम राहण्याची काळजी घेतो. उदाहरण, जिव्हालौल्यानें स्वादु पदार्थ व मिष्टान्नभोजनाची वासना झाली, ती पूर्ण होण्यास द्रव्यसाधन अधिक नको; पण '**केवलाघो भवति केवलादि**' ह्म० एकट्यानें खातो तो पापरूप होतो. हा श्रुतिनियम आ-

डवा येतो. तो दोष, देवास अन्न निवेदन करून ब्राह्मणातिथींस-मागमें भोजन केल्यास निवारण होतो. हें कळतांच संपत्तीच्या बलावर कांहीं अडचण नाहींच. थोडा खर्च अधिक लागून विहित-विषयता कायम राहते व इच्छातृप्तीही होते. मग आळस कसला ? नित्य तोच क्रम अधिकाधिक प्रमाणानें वाढत जातो. अशाच रीतीनें अनेक प्रकारच्या विषयभोगांत जरी दोषापत्ति नाहीं तरी संपत्तीचें आनुकूल्य आहे तोंवर इंद्रियांचे लाड पुरवितां येतील. संपत्ति नष्ट झाल्यावर विहितविषयतेचीं साधनें जुळणार नाहींत, आणि इंद्रियांची लोलुपता कधीं कमी होणार नाहीं. तृष्णेचें व अतृप्तीचें मान वाढत जाईल. अर्थात् शेवटीं तृष्णाबद्धतेनें ‘ **अविहित** ’ मार्गाकडे प्रवृत्ति होईल. यास्तव, धनसंपत्तीच्या बलावर विहितविषयभोगाची अपरिमित आसक्ति वाढली आणि तृप्तीचें मान त्यांत न राहिलें तर, शेवटीं आपलेंच **धन** विषयद्वारा आपल्या नाशास कारण होतें. विषयी जीव सर्व कार्यांत ‘ स्वार्थपरायणता ’ अगदीं बळकट धरून असतात. विषयाच्या आसक्तीनें, विषयभोगार्थ विहित मार्गाची युक्ति बुद्ध्या शोधून काढतात. आणि अतृप्तीनें तृष्णेच्या गर्तेत पडून फसतात. ह्मणून त्यांचें सर्व धोरण उलटें होऊन शेवटीं चुकतें. असो.

---

## विषयभोग.

ब्रह्मचर्याश्रमांत विद्यादि ज्ञानसंपादन करून इंद्रियांचा निग्रह न झाल्यास वैराग्यधारण न करतां गृहस्थाश्रमी व्हावें अशी **श्रुतीची** आज्ञा मागें सांगितली; ही आज्ञा विषयासक्त होण्याकरितां नव्हे, इंद्रियाच्या क्षोभशमनार्थ ह्म० पर्यायानें इंद्रियाच्या दमनार्थच होय. पत्नीचें पाणिग्रहण केवळ कामवासनातृप्त्यर्थच करावयाचें असें नाहीं; प्रथम ‘ **धर्मेच** ’ ह्म० श्रौतस्मार्त नित्यनैमित्तिक कर्माच्या अनुष्ठानांत तिचें पूर्ण साहचर्य असावें. नंतर ‘ **अर्थेच** ’ ह्म० यज्ञानुष्ठानार्थ व कुटुंबपोषणार्थ जें द्रव्यादि साहित्य पति संपादन क-

रून आणील त्याची पत्नीनें घरांत सर्व व्यवस्था करणें ( पति द्रव्यार्जन करून आणतो तसें पत्नीनेंही द्रव्यसंपादन करून पतीला मदत करणें हा अर्थ—'अर्थेच' या शब्दाचा नव्हे. ) सर्व प्रकारानें पतीला सुख देणें, व पतीसह सुख भोगणें यांत पत्नीनें तत्पर असावें. आणि शेवटीं 'कामेच' ह्म० ऋतुकालीं परस्परांनीं आनंदानें रममाण होऊन प्रजोत्पादन करणें. अशा तीन प्रकारच्या पुरुषार्थसिद्ध्यर्थ पत्नीचें पाणिग्रहण करून गृहस्थाश्रमांत वागावयाचें आहे. परंतु दैवानुकूल्यानें अनायासें ऐश्वर्य प्राप्त असलें अथवा विद्येच्या व पराक्रमाच्या योगानें ऐश्वर्य मिळविलें असल्यास, 'धर्मेच' ह्म० धर्मकर्मादिकांच्या कार्यांत कृताकृतच साहचर्य ह्म० संकल्पाच्या वेळीं हातास हात लावण्यापुरतें होतें. तसेंच 'अर्थेच' ह्म० गृहकार्यव्यवस्था, दासीदास, सेवकवर्ग आणि स्वजन आप्तवर्ग, यांच्याकडे सोंपवून ( बाईसाहेबांची ) देखरेख कार्याकारणच राहते. आणि 'कामेच' ह्म० भोगविलासांत मात्र कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारची न्यूनता न राहण्याविषयीं परस्परांस मोठी काळजी असते. अर्थात धर्माच्या व अर्थाच्या व्यवहारांत दोषापत्ति न येण्यापुरती व्यवस्था ठेवून, सर्व गोष्टींचें पर्यवसान भोगविलासांत होतें. विलासाची प्रधानता होऊन अंतःकरण एकवार त्या नादीं लागलें ह्म० कामाग्नि भोगवासनेच्या अनेक प्रखर ज्वालांनीं अनिवार्य भडकतो. आणि त्याला विद्यारूपी व्यजनाचें, धनरूपी इंधनाचें आणि प्रमदारूपी घृताचें साहाय्य मिळत गेल्यावर त्रिभुवनांत कोठेंही व कधींही तो शांत होण्याची आशा नको. हा अग्नि प्रथम पेट घेण्याचे वेळींच घृतेंधनाची परिमित आहुति देऊन, विवेकाच्या व शांतीच्या रक्षेनें आच्छादून दडपून ठेविल्यासच आपल्या स्वाधीन राहतो; नाहींपेक्षां राहण्याचें घर सुद्धां दग्ध करतो. परंतु धनयौवन रमणीसंपन्न चतुर विषयी जीवांस, विषयासक्तीच्या वेगांत या गोष्टीचें कांहीं भान रहात नाहीं. रतिसुख ह्म० मोक्षसुख, या सुखाचा जो बिंदु हाच अमृतबिंदु, आणि 'प्रमदा' हीच अमृताची खाणी अथवा समुद्र असें वाटून आनंद सांठविण्यास, खनन व मंथन करण्यांत आयुष्य क्षीण करतात. नित्योपभुक्त एकाच

पदार्थांत पुढें जशी मौज वाटत नाहीं तशी, विषयी जीवांस एका स्त्रियेच्या संभोगापासून अलंबुद्धि होत नाहीं. अन्य स्त्रिया द्रव्यबलावर आणाव्या तर विहित विषयता जाऊन जारकामांचा दोष येतो. कारण स्वस्त्रीगमनांत दोष नसून परदारागमनांत दोष आहे. ही श्रुतीची आज्ञा आहे. ती पालन व्हावी आणि आपलीही इच्छा तृप्त व्हावी ह्मणून एकपत्नीव्रताच्या जागीं बहुपत्नीव्रत आणून बसविलें. हे राजा ! ! चातुर्य ह्मणतात तें हेंच बरें ! ! पहा विषयी जीवांनीं कशी खाशी युक्ति काढली. द्रव्यैश्वर्याच्या आणि पराक्रमाच्या बलावर सुंदर उपवर कुमारिका प्राप्त होणें सहज व रीतीचें आहे. बरें जी युक्ति काढली तिलाही पुढें यत्ता पाहिजे होती. जितकी इच्छा असेल व कन्या जोंवर मिळतील तोंवर खुशाल लग्नें करावीं ! ! जणूं काय बलिवर्दास ( सांड ) मन मोकळें चरावयास रानच सांपडेल ! किती स्त्रिया कराव्या याची यत्ताच अज्जी उडविली. पूर्वकालांत कांहीं ब्राह्मण, महर्षि, योगतपानुष्ठानाच्या बलानें गर्वित होऊन मदनपंचाननाच्या भक्ष्यस्थानीं पडले, तेव्हां त्यांनीं बहुपत्नीव्रताची मजल बरीच लांब नेली, आणि पुढें योगतपाचें सामर्थ्य खचलें तेव्हां डोळे उघडले. ब्राह्मणवर्गांत अशा व्यक्ती फार थोड्याच निघतील. पण क्षत्रियादिकांनीं मात्र या कामीं पराकाष्ठा करून सोडली. विषयासक्तीचें मान चढत चढत सहस्रावधी विवाहित स्त्रियांपर्यंत गणती पोंचली. आणि अष्टविध विवाह सांगितले आहेत; त्यांपैकीं कोणताही विधि शिल्लक राहूं दिला नाहीं. इ० सर्व प्रकार पुराणांतून व इतिहासांतून सुप्रसिद्धच आहेत. भोगैश्वर्यसंपन्न युवा रमणमंदिरीं रमणीगणांच्या क्रीडाविहारांत निमग्न झाल्यावर इतर व्यवहाराची शुद्धि राहणें कठिणच. ह्मणून उषःकाळीं बंदीजनादि स्तुतिपाठकांची योजना झाली. त्यांनीं पूर्वजांचीं सुयशें वर्णन करून यांचीं कर्तव्यें यांना सुचवून जागें करावें. त्याचप्रमाणें व्यवहारांत, पुरोहितांनीं, विद्वान आश्रितांनीं, पौराणिकांनीं आणि मंत्र्यादि हितचिंतकांनीं समयासमयावर कर्तव्यकार्याची सूचना करीत असावी, सदुपदेश करीत जावें, आणि आपल्या यजमानास असत्पथाकडे न वळूं देतां त्याचें आचरण विहि-

तमार्गानें सदैव शुद्ध राखावें हें सर्व आश्रितांचें कर्तव्य असून, आश्रितांच्या आज्ञा सन्मानपूर्वक पाळून सदाचरण करणें हें यजमानाचें कर्तव्य आहे. **विषयी जीव** हे सर्व नियम पालन करूनही यथेष्ट चैन भोगतात. मागें श्रीमान् व गरीब अशा दोघा मित्रांच्या संवादांत—' मला ऐश्वर्य भोगण्याची संवय असल्यानें—चोरांच्या अरण्यांतही पुष्कळ संरक्षक बरोबर ठेवून ऐश्वर्य भोगीन, ' ह्मणून श्रीमानानें गरीब मित्रास जें उत्तर दिलें होतें, तोच प्रकार हा वरील विषयोपभोगाचा आहे. अनिवार विषयभोगानें स्वतः व्यामोहांतही पडावयाचें आणि त्यांतून वारंवार सावध करण्याची जबावदारी दुसऱ्याच्या गळीं बांधावयाची. ह्मणजे, मादक पदार्थ अतिशय खाऊन वरून उताराचे पदार्थ खावयाचे, अजीर्ण होईपर्यंत भोजन करून नंतर पाचक चूर्ण खावयाचें आणि मात्रा खाऊन कुपथ्य करावयाचें; असा सर्व न्याय झाला. यांत एखाद्या प्रबल रोगानें गांठलें नाहीं तोंवरच मोठें भाग्य आहे. हा विषयाचा बाजार व्यामोहाचा केवळ आवर्त आहे. यांत प्रवेश झाल्यावर कोणच्या न कोणच्या अनेक मार्गांनीं सर्वांचींच अंतःकरणें लुब्ध झाल्यावांचून रहातच नाहीं. विषयांत निमग्न होणारे व त्यांस जागे करणारे सर्वच एकभाव होऊन डुकल्या घेऊं लागतात. ' इंद्रियांसहवर्तमान विषयारामांत प्रवेश केल्यावर पुष्पवासास आणि सुरम्य दर्शनास ' टाळणें शक्य आहे काय ! कधींच नाहीं. ज्या राजांना मर्त्यांगनांनीं तृप्ति होईना त्यांनीं देवांगनांच्या उपभोगार्थ, ज्याप्रमाणें उर्वशी कामयज्ञ—**राजा पुरूरव्यानें** करवून ' **उर्वशी** ' साध्य केल्याची गोष्ट पुराणप्रसिद्धच आहे. त्याप्रमाणें दिव्य उपाय केले आहेत, आणि त्या कृत्यांत त्यांच्याच संरक्षकांनीं म्हणजे पुरोहित इत्यादिकांनीं यज्ञाचें साह्य केलें आहे. सारांश, इंद्रियगण सर्पांस विषयाचें दुग्ध पाजून त्यांच्या बरोबर खेळत बसण्याचा हा सर्व प्रकार आहे. जे आपल्या केवळ फूत्कारविषानें जीवास विक्षिप्त करतात, मग दंश करून प्राण घेण्यांत कसली उपेक्षा आहे ! ! सर्वांची एकच वाट होते.

भोगैश्वर्यसंपन्न **तरुण युवा**, सुंदर युवतीगणानें युक्त होत्साता अनेक प्रकारचे विलास करूं लागला ह्म० पर्यायानें, आसमंता-

त् असलेल्या स्वजनांस, मित्रांस आणि विद्वान आश्रितांस सर्वांसच न्यूनाधिक भोगांचे अंश स्वाभाविक प्राप्त होऊं लागतात. भोग मिळूं लागल्यावर आसक्ति वाढणार नाहीं असें नाहींच. जे विद्वान आश्रित संरक्षक ह्मणून असतात ते तरी अंतरीं विषयानुरक्तच असतात. जर खरे विरक्तच असतील तर विषयानुषंगांत कशास राहतील. अशा विद्यारसिक विद्वानांच्या सहवासानें विद्येच्या व अनेक प्रकारच्या उपयुक्त ज्ञानप्राप्तीबरोबर अति गोड, चित्ताल्हादक, पूर्णविषयभोगवर्धक आणि आनंदांत निमग्न करणाऱ्या अशा कामकुतूहल **शृंगारशास्त्राचा** प्रवेश होऊन विषयी जीवांस त्याची रसज्ञता प्राप्त झाली ह्म० 'परमप्रयोजनाचा' नायनाट होऊन '**मृगकलहरणाक्षोर्नीविमोक्षो हि मोक्षः**' हेंच परम प्रयोजन ह्म० कैवल्य होऊन बसतें. आणि विषयी जीवांस त्रैलोक्यांत यापरतें प्रत्यक्ष श्रेष्ठ सुख असें वाटतच नाहीं. या विषयांत पारंगत अशा महर्षींनीं **शृंगाररसाचीं** स्वतंत्र शास्त्रें निर्माण करून स्वतःस आचार्य ह्मणविलें. ह्या विषयाचें वर्णन येथें किती होणार, जे त्या मार्गांत प्रवीण होऊं इच्छितात त्यांना ती दिशा मोकळीच आहे. ह्या विषयाचा अति अफाट समुद्र झाला आहे. आणि सृष्टींतील यावत् जीवमात्र याचे जलचर आहेत. क्वचितच विरळ्या विभूती या समुद्राच्या निमज्जनापासून वांचल्या आहेत. या समुद्रांत पडणाऱ्या जीवांस क्षणोक्षणीं बुचकळ्याच खाव्या लागतात. या समुद्रांतून तरून पार जाण्यास कोणतीही नौका नाहीं. आणि स्वबाहुबलानें संतरण्याचा उपाय तर येथें मुळींच कामास पडत नाहीं. 'हस्तपादादि अवयव प्रथमच प्रेमाच्या बंधनानें बांधले जातात.' स्मरमदानें बुद्धिव्यामोहित होऊन गठडी झालेला जीव त्यांत बुडतो. सुदैवानेंच शेंडी धरून मागें ओढल्यास वांचतो; नाहींपेक्षां मृत्यु उभाच आहे. एकाद्या विक्षिप्त मनुष्यास मदिराप्राशन करविलें आणि तशांत त्यास विंचू डसविला तर त्याची काय दशा होईल बरें ? जीवाचें अंतःकरण स्वभावतः विषयासक्त, त्यांतून विषयाची चूडामणी जी '**स्त्री**' तिचा भोग प्राप्त झाला. त्यावर बहुपत्नीव्रताची सवड सांपडली. शेवटीं विद्येच्या व विद्वानांच्या साह्यानें शृं-

गारशास्त्राचें अनुपान येऊन भेटलें आणि विषयभोक्ते व भोक्त्यांचे रक्षिते—सर्वच सर्व प्रकारच्या विषयानंदांत निमग्न झाले. आतां येथें एक सुदैवावांचून कोणी कोणाचा साथी आहे काय ? भाग्यानें ज्याला शुद्धि येईल व बुद्धि होईल तर त्यानें सोबत्यास जागें करावें, नाहींपेक्षां ' यादवींचा ' पूर्ण देखावा आहे.

---

# *शृंगारिक विलास.

[ शृंगाररसिक विषयी पुरुष यथेष्ट सुखभोगार्थ बहुपत्नीव्रताच्या सवडीनें रूपगुणादिलक्षणसंपन्न अशा सुंदर युवती निवडून त्यांच्या समागमें चैन भोगतात. ' जितक्या मूर्ती तितक्या प्रकृति ' असा सृष्टिनियमच आहे. जितक्या स्त्रिया असतील त्यांतील प्रत्येकीचा स्वभाव, मनोविकार, शरीराचा वर्ण, अवयवांची रचना, कांति, सौंदर्य, माधुर्य, कंठस्वर, भाषण, चापल्य, चातुर्य इ. सर्व लक्षणें अगदीं पृथक् पृथक् असतात. कोणाचा कोणाशीं मेळ नसणें हें अगदीं स्वाभाविक आहे. असंतोषाग्नि विषयघृतानें कसा प्रदीप्त होऊन व्यापत चालतो तें पहा. विषयी जीव कामशास्त्रकुशल झाला असल्यानें त्यांत वर्णिलेलीं स्त्रियांचीं जाति, स्वभाव, सौंदर्य इ० लक्षणें जितकीं आपल्या स्वस्त्रियांशीं मिळतील तितक्या स्त्रिया अति लाडक्या होतात. आणि पुढें लग्नाची माळ अधिक वाढविणें झाल्यास निर्णीत लक्षणयुक्त कन्या धुंडून करावयाच्या. असें रमणीचें गुच्छ रम्यारामांत सभोंवतीं प्रफुल्लित झालें ह्मणजे तारांगणांत चंद्राप्रमाणें विलासी पुरुष शोभायमान होतो. विलास्यानें आपल्या विलासार्थ व तृप्त्यर्थ अनेक विलासिनी जमविल्या, परंतु अनेक विलासिनींच्या विलासार्थ एकच विलासी असल्यानें, त्यांच्या विलासाची तृप्ति कधींच होत नाहीं. त्यांचीं अंतःकरणें क्षुब्ध राहतात. यथेष्ट विलासार्थ पूर्ण मोकळीक रात्रींच असावयाची. दिवसां व्यवहारिक सर्व कार्यें आटोपून निशागमनाकडे परस्परांची दृष्टि लागली असते. विलासिनी सुंदरी

---

* ह्या विषय परमहंसाच्या भाषणांतील नसून ग्रंथकाराचा आहे.

आपापल्या सुखमंदिरीं प्रियानंदवर्धनाचीं सर्व साहित्यें सज्ज करून प्रियाच्या प्रथमागमनार्थ उत्सुक असतात. आणि त्यांच्या दासी प्रियसंदेश घेऊन यजमानाच्या सेवेशीं सामोऱ्या अगदीं तत्पर उभ्या असतात. '**रमणी**' अनेक असून त्यांचा '**रमण**' एकच असल्यानें तो प्रथम कोणत्या तरी एकाच रमणीच्या मंदिरीं प्रविष्ट होणें शक्य आहे. जिच्या केलीगृहांत पति प्रथम प्रविष्ट झाला, ती कमलमुखी, कमलाक्षी, करकमला, कुड्मलकुचा, कमलगंधा, सर्वांगसुंदरी, कमलिनी, हंसगामिनी '**बाला**' स्मित प्रफुल्लित वदनानें आणि आनंदोल्हासानें रमणाचें दृढालिंगनपूर्वक स्वागत करून, अनेक प्रकारें क्रीडाकुतूहलानें विहार करीत परस्पर मदनविलासांत निमग्न होतात. सर्व स्त्रियांत मीच श्रेष्ठ आहें, लाडकी आहें, आणि पति मजवरच आसक्त आहे, असा जिला गर्व होतो ती '**मानिनी**' ह्मणविते. आपल्या मंदिरांतून पतीनें अन्याकडे न जावें, नित्य प्रथम येत जावें, आणि दुसऱ्यांस तुच्छ मानावें अशाविषयीं तिचीं भाषणें व्यामोहाच्या, व्यंगार्थाच्या आणि उदासीनतेच्या अनेक रसांनीं मिश्रित पतीच्या हृदयावर प्रहार करीत असतात. परंतु याला तर अनेक कामिनींची कामयात्रा रात्रभरांत बनेल तोंवर पूर्ण करावयाची असल्यानें, हा कशा तरी युक्तीनें तिचा संतोष करून, कांहींतरी वचनें देऊन, आपली सुटका करून, दुसऱ्या सुंदरीच्या मंदिरीं साशंक चित्तानें प्रवेश करितो. साशंक होण्याचें कारण उघडच आहे कीं, एकीच्या मंदिरांत प्रवेश झाल्याची ज्यांना वार्ता समजली त्या सर्व खिन्नवदनी व भग्नमनोरथा झाल्यावांचून राहत नाहींत. अशा दुसरीच्या शयनागारीं **विलासी** प्रविष्ट होतांच दासीचे द्वारा प्रतिबंधव्याजपूर्वक स्वागत होतें. जी पर्यंकावर निद्रेचे मिषानें काजळी शालूच्या पदरानें किंचित् मुख आच्छादित करून निजली आहे, अशा तिच्या राहुग्रस्तार्धचंद्रवदनास स्वकरानें स्पर्श करतांच ती ललना निजकांताचे हस्तास झिडकारून दूर उभी राहते. ज्या षोडशवार्षिकी **शामेचें** मुखकमल म्लान झालें आहे; अधरोष्ठ स्फुरण पावताहेत; कुचयुग्म किंचित् डोलत आहे. स्मरमदानें नेत्र गुलाबी झाले आहेत,

१ कमळाच्या कळ्या २ चतुर्दश वार्षिकी

आणि वक्र भ्रूधनुष्यांतून तीक्ष्ण कटाक्षशरांचे प्रहारानें जी व्याकुळ करीत आहे. अशा त्या सुंदरीच्या चित्तरंजनार्थ कांताला आर्जव करावे लागतात. त्या आर्जवांत खरेपणाचा भाग फार कमी असतो. ती प्रसन्न झाली पाहिजे, ह्मणून अनेक प्रकारच्या युक्तींनीं व चातुर्याच्या गोड भापणांनीं तिला लुब्ध करून, चुंबन घेतांच परस्परांची मृदु नवनीतमनें कामाग्नीच्या ज्वालेनें विरघळतात, रतिसुखार्थ उत्सुक होतात आणि अधरामृतपानाच्या धुंदीनें पुढें पूर्णानंदांत निमग्न होतात. उभयतांचीं मनें संतुष्ट झाल्यावर आणि प्रियेच्या मनांतील विषाद गेल्यावर हा विलासी, मधुरपणाच्या व नम्रपणाच्या भाषणानें तिच्या प्रेमपाशांतून कांहीं तरी थाप देऊन निसटतो. आणि अनेक विचार करीत तिसरीच्या महालांत प्रविष्ट होतो, तोंच चतुर दासी सामोऱ्या येऊन पादवंदन करितात, व हस्त जोडून सविनय कळवितात कीं, महाराजांच्या आगमनप्रतीक्षेंत अतिकाल लोटल्यानें महाराज्ञीची प्रकृति फार व्याकुळ व अस्वस्थ झाली आहे. आह्मी जे जे कांहीं उपचार करितों ते ते सर्व निष्फल होऊन अधिक क्लेशजनक होतात. मदनदग्धांतःकरणावर महाराजाकडून प्रेमामृताभिसिंचन झाल्यावांचून व्यथानिवृत्तीचा अन्य उपाय नाहीं. स्वामिनीच्या नाजुक स्वभावास जाणूनच प्रभूच्या प्रथमागमनार्थ आह्मीं प्रिय संदेश घेऊन सेवेसी सादर होतों; परंतु, 'प्रथम[1] विकसित सुपुष्पकलिकेच्या मकरंदसेवनार्थ रसिक भ्रमराची प्रवृत्ति तिकडे होणें स्वाभाविकच आहे. तो एकीच्या रसास्वादांत गुंतल्यावर अन्य पुष्पलतेच्या मधुद्रवाकडे त्याचें लक्ष कशास जावें. तरी पण, बहुपुष्पपरागसेवनस्वभावानुरूप' महाराजांच्या आगमनानें आतां हें विलासमंदिर सुशोभित होत आहे. प्रभूचें स्वागत असो. शाबास! दासीनों, तुह्मी फार चतुर आहां! आणि स्वामिणीच्या चित्तरंजनांत मोठ्या कुशल आहांत असें जाणूनच मी थोडा काल कांहीं कारणपरत्वें दोघींकडे सहज आलों होतों. 'पुष्पवाटिकेंत[2] अर्धविकसित गुलाबाच्या कळ्यांस फळांच्या आशेनें शुक चंचूनें प्रफुल्लित जरी करतो तरी सुपक्व दाडिमाच्या रसास्वादार्थ धांव घेतल्यावांचून राहत

१-२ हीं दोघांचीं वाक्यें व्यंग्योक्तिरसानें भरलीं आहेत.

नाहीं.' असो. तुमची स्वामिणी शयनमंदिरीं दिसत नाहीं. तिजकडे मला घेऊन चला.

अशा प्रकारें चतुर दासींसह पुष्पोद्यानांत मालतीलतांच्या कुंजमंदिरीं पर्णोच्छादित सुपुष्पशय्येवर सुंदर दासीगणानें सुसेवित निजकांतेस अवलोकन करून समीप येतांच, दासींनीं अति नम्रपणें व हळूंच,—नुकताच डोळा लागला आहे,—अशी प्रार्थना करून त्या एकीकडे झाल्या. त्या कुंजमंदिरीं नवयौवनसंपन्न सुंदरीनें रमणासह रममाण होण्याच्या अति उत्सुकतेनें, जुई, मालती पुष्पांचे हार, अनेक प्रकारचीं सौगंधिक द्रव्यें, खानपानादिकांचे मधुर स्वादु पदार्थ, वस्त्रालंकार, त्रयोदशगुणी तांबूल, इ० सर्व भोगोपचारिक साहित्यें जागोजागीं सुवर्णाच्या पात्रांतून भरून सज्ज ठेविलीं आहेत. परंतु इच्छित समयीं कांताचें आगमन न झाल्यानें मदनशरप्रहारानें भग्नमनोरथा आणि मूर्छितांतःकरण होऊन, स्वप्नदशेच्या अंतर्विहारांत निमग्न झाली असल्यानें, शरीराच्या बाह्य अव्यवस्थितीलाही अपूर्व शोभा प्राप्त झाली. त्या शोभेचें अवलोकन करीत व विचार करीत पति तिच्या संन्निध युक्तीनें स्थित झाला.. ज्या युवतीचा मुखेंदु निस्तेज झाला आहे, कामाग्नीच्या धुरानें जिच्या कज्जलमिश्रित अश्रुप्रवाहांनीं कोंवळ्या कपोलांची गुलाबी कांति म्लान झाली आहे, जिचे अधर स्वदशनच्छदानें चिन्हित आहेत, कर्णांतल्या व कंठांतल्या आभूषणांची आणि मस्तकावरील मौक्तिकांच्या जाळीची गुंतागुंती झाली आहे. वेणीचीं फुलें विखुरलीं आहेत, परिधान केलेलें शुभ्र वस्त्र व कंचुकी अस्ताव्यस्त झाली आहे. त्यांतून कुचकमलाग्रें बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असलेलीं जणुं काय चकोर पक्ष्याचे युग्मचंचू वर करून कांतमुखेंदु दर्शनार्थ नीडांतून* बाहेर उडूं इच्छित आहेत. पण कोमल सरल भुजलता त्यांस प्रतिबंध करीत असल्यानें ते वारंवार नीडांत लपताहेत. पीन नितंबभरानें सिंहकटी किंचिच्चलायमान होत असल्यानें चरणनूपुरांचा क्वचित् झणत्कारही होत आहे. स्वप्नांत प्रणयकोपानें पतीवर वाग्बाणांचा हळुहळू प्रहार करीत असल्याचे किंचित् अस्पष्ट शब्द मुखकमलांतून आमोदगंधयुक्त बाहेर

* घरटें.

पडत आहेत. आणि सुहास्यवदनानें रमणमुखीं निज अधरचुंबन देत कंठीं दृढालिंगनार्थ भुजा थोड्या विस्तृत करीत आहे. असल्या अपूर्व दिव्य देखाव्यानें चतुर विलास्याचें चित्त पंचशरानें क्षुब्ध होऊन तत्क्षणीं कांतेच्या उन्नत भुजलतेंत पुष्ट वक्षस्थळीं धृष्टमनानें निविष्ट होत्साता, कामिनीमुखकमलिनीच्या अधरामृतमधुसेवनार्थ कांताचा मुखेंदु मदनसरोवरीं निमग्न झाला. अशा जाग्रत्स्वप्न सुखाच्या ऐक्यानंदमिश्रणरूप सुषुप्तींतून उभयतांचें उत्थान होतांच, ती मानिनी चमत्कृतीच्या मानभंगानें अत्यंत लज्जित होऊन मंदस्मित हास्यवदनानें आणि अधोदृष्टीच्या वक्र कटाक्षक्षेपानें कांतालिंगित भुजपाशांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत मंजुळ गोड स्वरानें हळूच ह्मणते कीं, प्रबल मनोजरिपु रतिरणांगणीं विरहमंत्री व प्रणयकोप सेनापतीच्या अनेक मनोविकारसेनेसह युद्धार्थ सिद्ध होत्साता, स्वप्नशिबिरांत क्षणैक विश्रांति घेत असतां असावध स्थितींत त्याजवर एकदम हल्ला करून त्याच्या यौवनधनाची लूट करून त्याचा मानभंग करणें चतुर धीर वीरांस दूषणावह नव्हे काय ?

हे भुवनसुंदरी ! शत्रु अजिंक्य आणि प्रबल झाला असतां स्वार्थसाधकांस ज्या रीतीनें आपला जय होईल तीच युक्ति करावी लागते. ‘ प्रसंगेंविशेषीं ’ जी युक्ति प्रथम दूषणावह वाटते तीच मागून भूषणावह होते. प्रिये, धीरवीर पुरुषांची धीरवीरता प्रत्यक्ष संग्रामरिपूवरच चालते. या गुप्त मनोजवीराच्या केली संग्रामभूमीवर आरूढ होतांच धीराची धीरता त्यास सोडून ‘स्वजातीस’ जाऊन मिळते. आणि हा वीर अत्यंत अधीर होतो. ‘ अशा वेळीं चतुरता अनुकूल राहिली ’ तरच विजय होतो. कारण, जो मदनवीर स्वतः शरीरानें अनंग असून स्तनतुंग शैलशिखरीं सुमनदुर्गांत सदैव राहाणारा, ज्याचें आयुध कुसुमशर, जो प्रमदामदानें उन्मत्त आणि अबलाबलाश्रयानें त्रैलोक्यविजयी झाला आहे, अशा विषम वीरा-

---

१ रतिसमयीं. २ अर्थात् स्त्रियांस मान चढतो. ३ ( वेळींच–तूं–रतानुकूल ) असा येथें श्लेष आहे. श्लेषार्थ–अनुस्वार, दीर्घ ऱ्हस्वादि दोष क्षम्य आहेत.

शीं रतिसमर चारुगात्रांगणीं ' द्वंद्वयुद्धांत समरचतुरा-नीविवराश्रित ' होऊनच विजयी व्हावें. या प्रसंगीं ' पराजयच ' स्वविजय आहे. असमशरकलाप्रवीण कामरिपूनें, जग जिंकणाऱ्या आणि वज्रप्रहार सहन करणाऱ्या प्रबल योध्यांस व निर्जरांस, आपल्या कुसुमायुधानें जर्जर करून सोडलें. जे निज भुजदंडानें एकवार कालदंडासही दंड करणारे ते ' कामदंडानें ' दंडित व विडंबित होऊन पादाक्रांत झाले आहेत. मकरध्वज कुसुमचापाच्या तीक्ष्णायुधांचा ' **रमणी** ' हा प्रत्यक्ष तुणीर आहे. मृगनयनकटाक्ष शरानें ज्याचें लक्ष वेधलें नाहीं, सरल भुजनागपाशानें जो बद्ध झाला नाहीं, धम्मिल्लजालांत जो गुंतला नाहीं, मुखकमलमधुमोहनास्त्रानें जो व्यामोहित झाला नाहीं, आणि सघन पयोधरास्त्रानें जो निपीडित झाला नाहीं, आणि जो विरहानलास्त्रानें कधीं दग्ध झाला नाहीं; असा पुरुषच त्रिभुवनांत सांपडणार नाहीं. हे **वरानने** ! ज्या सत्पुरुषांच्या कायवाङ्मनालाही कुसुमायुधाचें कोणतेंही आयुध स्पर्श करूं शकत नाहीं, ज्यांची बुद्धि मोक्षपथावरून कधीं चलायमान होत नाहीं, ज्यांना कनक आणि कांता तुच्छ वाटतात, ज्यांच्या हृदयांतून वैराग्य आणि शांति क्षणभरही ढळत नाहींत, ज्यांचा निजपरभाव जाऊन जे सदैव अखंडानंदांत निमग्न असतात, ज्यांना त्रितापांची बाधा स्वप्नांतही होत नाहीं, असें जे भाग्यवान् **चिद्विलासी** पुरुष असतील, तेच खरे वीर आणि खरे प्रतापशाली आहेत. ते प्रचंड संसाररिपूच्या मस्तकावर पाय देऊन मोक्षपदीं विराजमान होतात. अशा शूरांपुढें बिचाऱ्या मदनरिपूची कथाच काय आहे !! ज्यानें सर्व जगास गुलाम करून सोडलें त्या मदनाला त्यांचे गुलाम व्हावें लागतें. आह्मां कामकुरंगावरच त्या मदनपंचाननाचें शौर्य जागतें. ' तो निज शैलाग्रीं आरोहित झालेला

---

१ 'समरचतुरा-नीविवरा' एवढें एक पद केलें ह्म० कामकलाकुशल असें नायिकाचें विशेषण होतें. आणि ' समरचतुरानीं ' असें पद तोडलें म्हणजे नायक पुरुषाचें विशेषण होऊन विलक्षण अर्थ होतो. २ परा म्हणजे दुसरी अर्थात् नायिका. ३ माता. ४ केशकलाप. ५ स्तनतुंगशिखरीं.

दृष्टी पडतांच "विलासी *मृगांचीं गात्रें शिथिल होतात, सरोमांच कंप सुटतो, नेत्र अंध होतात, शरीराचा दाह होतो, रमणारण्यांत सभोंवतीं अन्य कोणीच दिसत नाहीं, आणि बुद्धि व्यामोहानें विचारशून्य होते. तेव्हां तो अधीर, 'अशूरताधीन' होत्साता स्वप्राण रक्षणार्थ विधुवदनीच्या वदनेंदूंत प्रविष्ट होऊन निर्भय होतो." ह्याच शोभेचें प्रतिबिंब गगनेंदुदर्पणांत अजून मृगलांछनरूपानें दिसत आहे. हे **चारुगात्री**! जोंवर तुमच्या 'प्रीतिकलापूर्णचंद्राचा उदय आहे तोंवरच शृंगारसमुद्राच्या पूर्ण भरतीस शोभा आहे. नाहींपेक्षां तो क्षारमय आहे.' अशीं निजकांताचीं प्रिय, मधुर आणि आनंदोत्साहवर्धक चातुर्याचीं भाषणें ऐकतांच तिचा कंठ प्रेमानें सद्गदित झाला व प्रेमाश्रूनीं पतिचरणकमलाभिसिंचनाभिवंदनपूर्वक त्यांस निजकरसंपुटांत धारण करून, अति नम्रपणें विनविते कीं, महाराजांनीं निज किंकरीस प्रेमादरानें सन्मान देणें, आणि तिच्या सर्व दूषणांस भूषण करणें हें केवल सग्दुणविभूषणाग्रमणी प्रभूसच शोभायमान आहे. अज्ञ किंकरीच्या प्रणयकोपापराधाची सदैव क्षमा असावी. दयाघनास, सखिचित्तचातकांच्या तृषाशमनार्थ परिभ्रमणाचे श्रम झाले आहेत त्यांच्या परिहारार्थ विश्रांतीची सनम्र विज्ञप्ति आहे:—होय! सुंदरी माझीही अशीच इच्छा आहे. पण तुझ्या ज्येष्ठेच्या मंदिरीं तिचें कुशल पाहून समाचार घेऊन क्षणभरानें परत येतों. असें दृढालिंगनचुंबनयुक्त सांगून निघाला.

**महाराजांच्या** आगमनाची वर्दी सेवकांकडून चतुर दासींस पोंचतांच त्यांनीं महालाच्या प्रवेशद्वाराचे भरजरी पडदे वर बांधून, कांहीं सन्मानार्थ सामोऱ्या आल्या, कांहींनीं स्वामिणीच्या सेवेसी प्रियानंदवर्धाच्या आगमनाची सुवार्ता श्रुत केली, त्यांस उंची शालेचें बक्षिस मिळालें. ज्या स्वागतार्थ पुढें आल्या त्यांनीं प्रेमादरानें आडवून, इच्छित पदार्थांचीं पारितोषकें मागतांच,—कुशल **दासीनों** तुह्मी फार समयचतुर आहां. पूर्वजांच्या पूर्ण पुण्योदयानें व तुह्मा सर्वत्रांच्या पूर्ण भाग्योदयानें आणि दयाघन **जगदीश्वराच्या**

* हीं **सर्व** लक्षणें कामातुरस्थितीचीं होत.

पूर्ण कृपेनें सर्वांचे मनोरथ पूर्ण होण्याचा दिवस समीपच आला आहे. तुमच्या ज्या मागण्या असतील त्या मी मोठ्या उत्साहानें पूर्ण करण्यास सिद्ध आहें:--असें त्यांस अभिवचन देऊन त्यांसह सुवर्णमंदिरीं प्रविष्ट झाला. ज्या मंदिरांत अति रमणीय देखाव्यांचीं, रूपयौवनसंपन्न वीरपुरुषांचीं, तशींच अनेक सुरम्य चित्रें कुशलतेनें लावलेलीं शोभताहेत, सुगंधिक द्रव्याच्या पेट्या ठिकठिकाणीं मोकळ्या ठेविल्या आहेत, पुष्पांचे हार खुंट्यांवर टांगलेले कोमेजले आहेत, नानाप्रकारच्या सुंदर पदार्थांनीं सर्व महाल अत्यंत सुशोभित झाला आहे, सुवर्णाच्या समयांतून व हंड्याझुंबरांतून प्रकाशित असलेले दीप मंदप्रभ झाले आहेत. वायु शीतल वाहात असल्यानें द्वारांस बारीक पडदे सुटले आहेत. सुवर्णपिंजऱ्यांतून ठेविलेले पक्षी आणि शुकसारिका मधुरमंजुल स्वरानें हळू हळू कुजबुजताहेत. अशा चित्ताल्हादक स्थलीं कांताचे चरण प्रविष्ट झालेले अवलोकन करून, ती **प्रौढा** आणि **सर्वश्रेष्ठा** सुवर्णमंचकावरील सुखशय्येवरून युक्तीनें उत्थित होत्साती मंदगतीनें पुढें येऊन श्रेष्ठ *प्रेष्ठाचें अर्धे नम्रतेनें पादवंदन करून सुखासनीं उभयतां स्थित झालीं. ज्या सुंदरीच्या मुखेंदूची प्रभा पुढें उदित होणाऱ्या प्रतापमार्तंडाच्या अरुणोदयप्रभेनें म्लान झाली आहे. अंगाची कांति कर्पूरधवला झाली आहे. निद्रालसेच्या मुखकमलावर मधुपाप्रमाणें कुरल केशलटा सरल वक्र भ्रमण करिताहेत. अधरशुक्तिसंपुटांतून दंतमुक्तावली झळकत आहे. अमूल्याभरणांनीं कंठ सुशोभित आहे. 'नीलांबरांत सघन पयोधरोन्नती कांतचित्त--मयूरास उल्लसित करिताहे.' जिची सकुमार कोमल तनुलता पूर्ण फलभारानें नम्र आणि शिथिल झाली आहे. पृथुनितंब कटिप्रदेश सुवर्णमेखलांनीं वेष्टित आहे. विशेष आभूषणें आणि पादनूपुरें असह्य भारानें परित्यक्त आहेत. जिच्या अंत:करणांत आनंदाचें भरतें न मावतां मृदु मधुरस्मित सुहास्यवदनांतून निघणाऱ्या हर्षपूरित मंजुल शब्दांस लज्जा प्रतिबंध करीत असलेली निजकांतेची प्रेमल स्थिति अवलोकन करून, कांतानें निककरद्वयांजुलींत **गुर्विणी** चारुगात्रीच्या वदनकमलास ग्रहण करून, अधरमकरंद सेवनानंदानें परस्पर

* कांताचे.

विनोदसंवाद करीत, सुंदरीच्या नवनीतमृदुपुष्ट अंकावर निजमुखशशांकास ठेवून चतुर दासीगणानें सुसेवित होत्साता, श्रमपरिहारार्थ सुषुप्त्यानंदांत निमग्न झाला. असा थोडा काल जातांच बाहेरच्या अपरमंदिरांतून गायकांचें प्रभात रागांत सुंदर मधुर गायन सुरू झालें. बंदीजन आणि स्तुतिपाठकांनीं पूर्वजांच्या, साधुपुरुषांच्या, पुण्यश्लोक धीरवीरांच्या आणि आतां होणाऱ्या पुत्रोत्साहानंदवर्धनाच्या सुरस कवनास आणि स्तुतिपाठास आरंभ केला. कार्यनियुक्त सेवकजन, आश्रित, आणि श्रेष्ठाधिकारी वर्ग आपापल्या स्थानीं कार्यतत्परतेनें सिद्ध असून स्वामीच्या दर्शनार्थ उत्सुक आहेत. अशा प्रभातकालीं, प्रतापशाली वीरमणी दिनमणीप्रमाणें निशामंदिरांतून बाहेर येऊन सर्वांसह नित्यकर्तव्यव्यवहारांत प्रवृत्त झाला. (पुन्हां निशागमनांत नित्य नव्या युवती आणि अनेक प्रकारचे शृंगारविलास चालू आहेतच. )

---

**हे राजन् !** ऐश्वर्यांनीं, तारुण्यांनीं, विद्यादिगुणचातुर्यांनीं युक्त झालेल्या विलासी पुरुषांस, भोगवासनेच्या अतृप्तीनें, भोगसाहित्यांची अनेक प्रकारानें वृद्धि करून नानाप्रकारांनीं किती जरी भोग भोगले तरी अतृप्तीचें व असमाधानाचें पाऊल सदैव पुढें रहाणारच. तें कधीं मागें फिरावयाचें नाहीं. बहुयुवतींच्या शृंगारविलासांत कामी जनाच्या जीवाची कशी ओढाताण होते, प्रत्येकीची मनोधारणा करण्यांत किती कपटव्यवहार आणि लबाडी करावी लागते, आणि आपल्या पुरुषार्थपराक्रमादि गुणांस गुंडाळून सुंदरीच्या पादवंदनापर्यंत मजल येऊन पोंचते. चहूंकडून विवंचनेच्या जाळ्यांत आपला जीव अडकवून त्यांतच परम आनंद मानावयाचा आहे. विलासी पुरुष अनेक रमणींच्या मंदिरांत रात्रभर परिभ्रमण करून चैन मानतो. परंतु प्रत्येक युवतीला सर्व रात्र पतिसान्निध्याची उत्कट इच्छा असते ती सदैव पूर्ण होणें शक्य नाहीं. त्यामुळें सर्व स्त्रियांत परस्पर सापत्नभाव वृद्धिंगत होणें साहजीक आहे. सत्कुलोत्पन्नत्वानें, सद्गृहशिक्षणानें, आणि पातिव्रत्यधर्माचरणप्रीतीनें निजपतीवर अभ्र-

ह्या व अप्रीति उत्पन्न होत नाहीं आणि शृंगारिक प्रणयकोपापर्यंतच गोष्ट राहते; हें विलास्याचें पूर्ण भाग्य आहे. आहार, निद्रा, व मैथुन हे जीवाचे स्वाभाविक धर्म असून यांची जितकी वृद्धि करावी तितकी होते. व जितके कमी करावे तितके कमी होतात. पूर्वकालांत मनुष्य फार बलिष्ठ व अमोघवीर्य असत ह्मणून त्यांना असें करणें अवश्य होतें असें वाटणें हें फार चुकीचें आहे. 'अमोघवीर्य' याचा अर्थ कामांध होणें हा नव्हे. बहुपत्नीव्रताची दीक्षा एकदरींत फार थोड्या पुरुषांनीं घेतली आहे. बाकी सर्व समाज एकपत्नीव्रतानेंच गृहस्थाश्रमांत आनंदानें भोग भोगीत असे. जें सौख्य एकपत्नीच्या प्रपंचांत आहे तें बहुपत्नींच्या प्रपंचांत स्वप्नांत सुद्धां नाहीं. जे बहुपत्नींच्या नादीं लागले ते कधीं ना कधीं पूर्ण फजीत झाल्यावांचून रहात नाहींत. क्वचित् पुरुष ' राजा **दशरथाप्रमाणें** ' प्राणासही मुकले आहेत. जसें मादक पदार्थांचें दुर्व्यसन संगतीसंगदोषेंकरून एकवार लागलें ह्म० परिणामाचे विचार सर्व नाहींसे होऊन तेंच गोड लागतें. तसें सर्व व्यसनांचें शिखर हें ' स्त्रीव्यसन ' आहे. आरंभीं जें अगदीं अमृतमय वाटतें, तें मागून परिणामीं क्षारमय आहे. परंतु तें एकवार पूर्ण चिकटलें ह्म० प्राणांतावांचून सुटणें कठिण आहे. जे ह्या व्यसनांतून अलिप्त राहतात आणि जे ह्याच्या आधीन न होतां परिमितपणा कायम राखतात तेच सुखी असतात. बाकी सर्व विषयाचे दास झाले आहेत. त्यांना अलंबुद्धि कशास होणार! असो.

' **रतिसुख** ' हें इतर सर्वसुखांत अति श्रेष्ठ असें वाटत असून जीवमात्रांस तें सृष्टिक्रमानें सहज प्राप्त होत असल्यानें, सर्वांची तिकडे प्रवृत्ति व आसक्ति होणें अगदीं स्वाभाविक आहे. यांत जीवांचा कांहीं दोष आहे असें नाहीं. पशुपक्षी इ० सर्व अज्ञानी प्राणी निसर्गतःच ' *व्यवहारत्रयांत ' प्रवृत्त होतात. त्यांचे सर्व व्यवहार परिमित व कालनियमानें बद्ध असे आहेत कीं, ते अकालीं व अन्यथा होतात तेव्हां कांहीं तरी दुश्चिन्ह वाटूं लागतें. परंतु ज्ञानवान् आणि चतुर ह्मणविणाऱ्या मनुष्यजीवांनीं आपल्या जीवित्वाची नौका आफाट विषयसमुद्रांत अनियंत्रितपणें ढकलून देणें ह्म० पशुकोटी-

* आहार, निद्रा, मैथुन

पेक्षां आपल्यास हीन करून घेणें नव्हे काय ? यावत् सृष्टीचे सर्व विषय जीवांच्याच उपभोगार्थ झाले आहेत. ते त्यांनीं भोगावे, परंतु भोगांतच सर्व आयुष्य समाप्त करावें आणि सदैव अतृप्त रहावें, यांत मानवी बुद्धीचा उपयोग कांहीं झाला नाहीं. सर्व प्रकारचे भोग अनेक तऱ्हेतऱ्हेनीं पाहिजे तितके भोगले हे कशाकरितां ? तर तृप्ति व्हावी ह्मणून; परंतु तृप्तीचें मान कधींच कमी पडत नाहीं, याचें इंगित काय ? तर विषयानें कधीं त्रिकालांत समाधान होणारच नाहीं हें होय. अनेक सर्वज्ञ महर्षी आचार्यांनीं ज्ञानगुणसंपन्न होऊन पंचविषयांचे पांच समुद्र केले. त्यांचें वर्णन मागें केलेंच आहे. विषयांस हें असलें आफाट स्वरूप देण्याचें कांहीं कारणच नव्हतें. हें केवल पुढें होणाऱ्या ज्ञानसंपन्न जीवांस चांगल्या रीतीनें विषय भोगतां यावे, अविहित कर्माकडे वळूं नये, आणि कोणत्याही रीतीनें विषयभोगांत अंतःकरण तृप्त होत नाहीं हें पूर्णपणें कळावें. अर्थांत सर्वांचें तात्पर्य पर्यायानें निवृत्तिपरच आहे. अनेक जन्मजन्मांतराच्या प्रारब्धसंस्कारानें जीवाची प्रवृत्ति निसर्गतःच विषयाकडे होत असल्यानें त्याचा स्वभावच विषयरूप होऊन बसला आहे. विषयावांचून जीवाचें जीवन राहणें कठिण झालें असल्यानें व **श्रुतिशास्त्र** मातेस जीवाचें सदैव कल्याण करावयाचें असल्यानें, सर्व विषयांचीं शास्त्रें निषधतात्पर्यरूपानें निवृत्तिपरच निर्माण झालीं आहेत. आणि जीवालाही त्याच प्रकारानें ( ह्म० निवृत्त होण्याकरितां ) विषयभोगाची परिमितपणानें सवड दिली आहे. इंद्रियांचें दमन होत नाहीं तर गृहस्थाश्रमी हो. प्राप्त असलेल्या अथवा संपादिलेल्या द्रव्याचा सद्व्यय सत्कर्मांत कर. ऐश्वर्याच्या बाहुल्यानें, बुद्धीच्या असंतुष्टतेनें, आणि स्वस्त्रियेहून परस्त्रिया चांगल्या दिसून त्यांजकडे आसक्ति वाटूं लागल्यास निषिद्ध आचरण न करतां चांगल्या लक्षणानें युक्त सत्कुलोत्पन्न व सुंदर उपवर कन्येशीं विवाह कर; पण व्यभिचार करूं नको. एकपत्नीव्रतानें राहणें हें सर्वोत्तम आहे. आणि विषयासक्तीनें बहुपत्नीव्रत स्वीकारलें असेल तर, स्वस्त्रियांच्या *जाती, स्वभाव, मनोधर्म, कामवासनेचे काल इ० सर्व लक्षणें

* पद्मिनी, चित्रिणी, शंखिनी, हस्तिनी अशा स्त्रियांच्या जाती आहेत.

जाणण्याचें चातुर्य कामशास्त्रानें संपादन करून, त्या प्रकारांनीं युवतींचे उपभोग घेतल्यास परस्परांस विशेष आनंद मिळून उभयतांची अत्यंत प्रीति वाढते. स्त्रिया संतुष्ट राहतात. अधिक स्त्रिया करावयाच्या असल्यास सर्वांस संतुष्ट ठेवण्याचें चातुर्य अंगीं असलें पाहिजे. स्त्रिया असंतुष्ट राहिल्यास त्या असत्पथाकडे वळण्याचा फार संभव असतो. इतकें सर्व आक्रमण करण्याची शक्ति अंगीं नसेल तर त्या मार्गास जाऊं नको. अशा सर्व गोष्टींचीं तात्पर्यें निषेधरूप व निवृत्तिपर आहेत. परंतु चतुर विषयी जीव **निषेधतात्पर्यास** मुळींच न समजतां सर्व उपदेश **विधितात्पर्या**कडे लावतात. आणि सार्वभौमापरी सार्वभौम, राजापरी राजे, श्रीमानापरी श्रीमान्, मध्यमापरी मध्यम, गरीबापरी गरीब, आणि दरिद्रीसुद्धां—आपल्या शक्तीप्रमाणें, इच्छेप्रमाणें, आणि अनुकूलतेप्रमाणें यावत् जीव विषयानंदांत पूर्ण निमग्न आहेत. परंतु विचार करून पाहिल्यास सार्वभौमापासून तों रंकापर्यंत रतिसुखाचा आनंद आणि अतृप्ति सर्वांची अगदीं बरोबर कांटेतोल आहे. त्या आनंदसमयांत कोणी कोणाहून अधिक अथवा कमी नाहीं. केवळ सुखाच्या उपचारिक साहित्याचाच आपापल्या योग्यतेनुसार न्यूनाधिकपणा आहे. सुखांत अंतर नाहीं.

---

## विषयानंदांत स्वरूपानंद.

हे **राजा !** सृष्टींतील सर्व विषयांत व सर्व सुखांत '**रतिसुखास**' अतिश्रेष्ठता व अगदीं उघड आनंदरूपता कां आली ? व प्रत्येक जीव या सुखार्थ कां मरतो ? आणि असल्या विषयसुखाच्या वृद्ध्यर्थ सर्वज्ञ आचार्यांनीं मुद्दाम **कामशास्त्रें** कां निर्माण करावीं ? असें सकृद्दर्शनीं वाटतें. परंतु अति सूक्ष्म विचार करून पाहिल्यास याचें इंगित कांहीं वेगळेंच आहे. इतर सर्व विषयसुखांत **रतिभरसुद्धां** पुरतें सुख नाहीं; आणि आनंदसिंधूंतून तुषाराप्रमाणें एक **रतिभर** सुख कायतें यांत आलें आहे. या स्थलीं **आनंदाचा**

**कंद** लवमात्र निवारण ह्म० उघडा होतो. ह्मणून हें ‘ **रतिसुख** ’ सर्वांत श्रेष्ठ झालें आहे. सर्वज्ञ ह्म० आत्मज्ञानसंपन्न **आचार्यांनीं** जशीं कामशास्त्रें निर्माण केलीं आहेत; तसे त्या शास्त्रानुरूप विषयभोग पूर्ण यथार्थपणें भोगण्याचें ज्ञान आत्मज्ञान झाल्यावांचून येतच नाहीं. श्रुतीनेंही ज्ञानप्राप्त्यर्थ व आत्मानंदलाभार्थ अनेक युक्तींचे प्रकार दाखविले. त्यांत शेवटीं विषयानंदांतही आत्मानंद ओळखण्याची युक्ति दाखविली. परंतु **अज्ञान** आहे तोंवर ती खूण पटत नाहीं. आणि **स्वरूपाचें** ग्रहण होत नाहीं. विषयी जीवांनीं किती जरी भोग भोगले तरी विषयाचा ‘ **भोक्ता** ’ कोण ? हें त्यांस कळतें आहे कोठें ? जसे इतर ‘ **भोग्य** ’ विषय आहेत त्यांतलाच हा ‘ **विषयी** ’ **जीव** स्वत: भोग्यरूपच आहे. तोंडानें मात्र ‘ **मी भोक्ता** ’ असें ह्मणतो, पण आपल्या ‘ भोक्तेपणाचें ’ याला ज्ञान नाहीं. जसा हा आपल्यास ‘ **भोक्ता** ’ आणि स्त्रियेस ‘ **भोग्य** ’ मानतो, तशी स्त्री आपल्यास ‘ **भोक्त्री** ’ आणि पुरुषास ‘ **भोग्य** ’ मानते. आतां कोण कोणाचा **भोक्ता** आणि कोण कोणाचा ‘ **भोग्यविषय** ’ ? कांहीं पत्ता आहे काय ? ‘**भोक्ता**’ कोण, याचें ज्ञान एकासही नसून दोघेही **विषयरूपच** असतां उगीच भोक्तेपणाचा डौल मिरवितात ! ! ‘ **भोग्यविषय** ’—**भोक्त्याहून** अगदीं पृथक् झाले पाहिजेत; व आपल्याहून ते वेगळे **अपरोक्ष**पणानें आपल्यास दिसले पाहिजेत. विषयी जीवांस **आपलेंपण** ह्म० काय हें कळत नाहीं व आपला स्थूलदेह देखील जर आपल्याहून भिन्नानुभवास येत नाहीं तर ‘ **मी भोक्ता** ’ हें ह्मणणें, भिकाऱ्यानें मी राजा ह्मणण्यासारखेंच निष्फळ आहे. ‘मी भोगतों’—कीं, ‘भोगला जातों’—याचें ज्ञान, **स्वरूप**ज्ञानावांचून होणें शक्य नाहीं. तें **स्वरूप** या सुखसमयीं ईपन्मात्र प्रकाशित होतें म्हणून **विपय** आनंदरूप वाटतो. प्रबल कामवासनेनें बुद्धींतले इतर सर्व **विषय** दूर होऊन एक स्त्रीविपयांत बुद्धीची एकतानता ह्म० एकाग्रता होते. बुद्धीची एकाग्रता झाली कीं, देहभान जाऊन नेत्र आपल्याआपण मिटतात. नेत्र मिटले गेले ह्म० **बुद्धि** स्त्रीविपयास विसरून ‘ अंतर्मुख ’ होते. अंतर्मुख झाली कीं, **आत्मबिंदूंत** लीन

होते, तिच्या लीनावस्थेंत **साक्षी** आनंदरूपानें प्रकाशमान होतो. परंतु स्त्रीपासून आनंद होतो, हा '**संस्कार**' बुद्धींत प्रथमच आरूढ होत असल्यानें तोच **संस्कार** बुद्धीच्या व साक्षीच्या ऐक्यानंदरूपांत मध्यें आड येऊन विंदूतून बुद्धीच्या च्युतीस अर्थात पतनास कारण होतो. आणि बुद्धि साक्षीपासून पराङ्मुख होऊन नेत्रद्वारा बाहेर आली ह्म० **निजानंदघनास** विसरून पुढें असलेल्या रमणीस आनंदवल्लरी मानून व्यामोहित होते. जर या स्थलीं बिंदुच्युति होण्याच्या पूर्वलवांत बुद्धि खबरदार राहून **साक्षीस** झोंबली तर पूर्ण आनंदाचा ठेवा सांपडेल. पण या हतभागी विषयी जीवाच्या प्रारब्धीं क्षारकंद असल्यानें आनंद कशास सांपडतो!! **बुद्धि** सर्व व्यापार करणारी असून तीच जर याला ओळखतां येत नाहीं, तर **साक्षी** कशाच्या बलावर ओळखणार? आणि आनंद कोणाचा, कोठून येतो, आणि घेतो कोण? याचा बिचाऱ्यांना काय थांग लागणार!! 'आल्या मार्गांनीं नित्य जावें यावें' एवढेंच ठाऊक असतें. अशा अज्ञ स्थितींत **आह्मी विषयाचे भोक्ते** ही केवढी फुशारकी!! विषय भोगून पहावे आत्मज्ञान्यांनींच. **भोग–भोगसाधन**–आणि **भोक्ता**–अशी **त्रिपुटी** अगदीं पृथक् रूपानें 'भोगकालांत' ज्यांच्या अनुभवास येते तेच खरे विषयाचे भोक्ते. ज्या भाग्यवान् **आत्मज्ञानी** पुरुषाच्या प्रारब्धशेषसंस्कारानें 'कर्मक्षयार्थ' भोग भोगणें शेष राहतात, ते सर्व विषयोपभोगास स्वरूपभोगांत लीन करून सर्व त्रिपुटींस आत्ममय पाहतात. ते जरी भोग भोगतात तरी विषयानें व्यामोहित होत नाहींत. व विषयही त्यांना व्यामोहित करूं शकत नाहींत. कारण त्यांना मुख्य गुरुकिल्ली साधली असल्यानें ते आपल्या **बुद्धीस** पाहिजे त्या क्षणीं विषयांतून निवृत्त करून **साक्षींत** लीन होऊं शकतात. व लीन राहूं शकतात. 'साक्षींत बुद्धीचा लय करणें अथवा लय होणें,' ह्मणजेच **समाधि** आहे. रतिसुखपर्यवसानीं बुद्धीच्या लीनावस्थेंत निजपरभाव नाहींसा होऊन जो **साक्षी** निरावरण प्रकाशमान होतो त्याची ओळख विषयी जीवांस मुळींच नसल्यानें, त्यांना लवमात्र आनंद मिळतो. आणि ज्ञानवानास त्यासमयीं अनायासें निरावरण **साक्षी** दर्शन होतांच इच्छितकालपर्यंत बुद्धीच्या लीनावस्था-

द्वारा ‘ पूर्णानंदाची ’ प्राप्ति स्वाभाविक आहेच आहे, ‘ प्राप्ति होते ’ असें सुद्धां ह्मणतां येत नाहीं. ते पूर्णानंदाचे सागर झाल्यानें विषय-संगांत प्रतीत होणारे जे आनंद, हे निजानंदाचे तरंग आहेत असें वाटत असल्यावर मग स्वस्वरूपाहून ‘ पृथक् भाव ’ आणि ‘ विषय-व्यामोह ’ याचें त्रिकालांतही भान होत नाहीं. भोग्य **विषय** ‘ आनंदस्वरूप ’ भोग**साधनें** आनंदरूप आणि भोग**भोक्ता**ही आनंद-रूप, असे सर्वच **आनंदमय** झाल्यावर जिकडे पहावें तिकडे ‘ **स्वानंदसाम्राज्य** ’ आहे. त्याच्या पुढें मग ‘ **रतिसुख** ’ ह्म० ‘ रत्तिभर सुख ’ याची किंमतच काय आहे. असो.

याप्रमाणें **श्रुतिशास्त्रांनीं** विषयी आणि विचारवान् जीवांस स्वरूपानंदप्राप्तीचा चटका लागण्याकरितां ह्म० साक्षीच्या लवमात्र प्रकाशांत जर हा आनंद आहे तर सदैव साक्षीचा प्रकाश अनुभवास येईल तेव्हां किती आनंद मिळेल ? यास्तव ‘ निर्विषयानंद ’ प्राप्तीचा विचारद्वारा लाभ करून घेण्याकरितां, विषयानंदांत स्वरूपानंदाचें उगीच दिग्दर्शन केलें आहे. हा स्वरूपानंदप्राप्तीचा अनायासें उत्तम आवडता गोड उपायच सांगितला; आतां अन्य उपायाचें कामच नाहीं; या मार्गानेंच ‘ स्वरूपानंदाचा ’ लाभ करून घ्यावा, आणि दाखविलेल्या बारीक युक्तीनें यांतच समाधिसुख घ्यावें, असा भलताच अर्थ समजून जर कोणी या मार्गाच्या खटपटीस लागेल तर अपरिहार्य व्याधी उत्पन्न होऊन आपल्या जीवास ठार मुकणार आहे. कारण विपयी जीवांस **साक्षी** तर लांबच आहे, पण **बुद्धी**च्या स्वरूपाची सुद्धां पुरती ओळख नसते. आणि या स्थलीं बुद्धीची ‘ लीनावस्था ’ जीवाच्या प्रयत्नानें होत नसून विषयाकर्षणानें होत असते. त्याक्षणीं जीवांनीं अनभिज्ञतेनें ह्म० युक्तीच्या गैर माहितीनें उगीच तिला विक्षेप केल्यास बिंदुपातांत अवरोध होऊं लागतो आणि आनंदाचा नाश होतो. आनंद भग्न झाला ह्म० चित्तास खेद होतो. आणि बिंदुपात अडखळून होऊं लागला ह्म० धातुस्थानीं विकार पोंचतो. धातुमार्गांत धातूचा अंश रुद्ध राहिल्यानें मूत्रकृच्छ्रासारखे भलतेच रोग उत्पन्न होऊन क्षयाची भावना होते आणि जिव आपल्या प्राणास मुकतो. ह्मणून असें कोणीं करूं नये.

या मार्गानेंच जर ' ब्रह्मानंद ' प्राप्ति व्हावयाची असती तर यावत् जीवमात्र अनायासेंच कृतार्थ झाले असते. इतर कोणत्याही उपायाची गरज पडली नसती. पण त्या प्राप्तीचा हा मार्गच नव्हे !! '**स्वरूपाची**' ओळख पटल्यावर आनंदाची ओतप्रोत व्याप्ति पाहण्याच्या ज्या अनेक युक्त्या व अनेक स्थलें आहेत, त्यांतलीच ही एक युक्ति व एक उघड स्थल दाखविलें आहे. **चिद्विलास्यांचें** हेंही एक विश्रांतिस्थान व क्षणभराची मौज आहे. ही ज्यांची त्यांनींच भोगावी. विषयी जीवांनीं इकडे प्रयत्न न करितां, याच्या दिग्दर्शनानें ' निरतिशयसुख ' प्राप्तीची इच्छा झाल्यास **श्रुतिशास्त्र**दर्शित मार्गानें आणि **सद्गुरूच्या** पूर्ण कृपावलंबानेंच '**स्वानंदसाम्राज्य**' प्राप्त होणार आहे. अन्य सर्व उपाय व्यर्थ आहेत. पूर्ण विषय भोगूनही जर त्या आनंदाची लालसा उत्पन्न होणार नाहीं तर जीवाचें पूर्ण दुर्भाग्यच आहे, याहून अन्य कांहीं ह्मणतां येत नाहीं.

**हे राजन् शीलनिधे** !! अधिक काय सांगूं; तुझ्या प्रश्नारंभापासून एतावत्कालपर्यंत जीवाच्या व्यवहाराचें संक्षेपरूपानें जें कांहीं वर्णन केलें, त्या सर्व गोष्टींचा यथार्थपणें विचार करण्याचा पूर्ण समय याच तारुण्याच्या मध्यावस्थेंत आहे. ईश्वराकडून या मानवी जीवांस आपल्या जीवित्वाचें पूर्ण सार्थक करून घेण्याकरितांच **तारुण्याची** अपूर्व आणि अमूल्य देणगी मिळाली आहे. निर्मल स्वच्छ पाण्यास ज्या रंगांत मिसळावें तें त्या रंगांत तद्रूप होतें. तसेंच हें **तारुण्य** ज्या मार्गांत, ज्या कार्यांत आणि ज्या व्यासंगांत जसें लावावें तसा त्याचा पूर्ण उपयोग होतो. तारुण्यांत देहेंद्रियें निरोगी आणि पुष्ट असतात, त्या योगानें अंत:करणही निर्दुष्ट असतें. बुद्धीची विचारशक्ति, धारणा, आणि प्रौढी तारुण्यांतच परिपक्व दशेस येत असल्यानें यावेळीं तिच्यांत जे विचार सुदृढ होतील तेच पुढें फलद्रूप होतील. मनुष्यजन्मास येऊन जें कांहीं कर्तव्य म्हणून आहे, तें सर्व तारुण्यांतच होणार आहे. बालदशा तर खेळण्यांत व खाण्यापिण्यांत सरते. बालदशेच्या पुढें विद्या-व्यासंग व ज्ञानसंग्रहाचा काल असल्यानें त्या कालांत विचार करण्याची वेळ नसते. तथापि विचार करण्याचें विद्यादि ज्ञानसाहित्य यावेळीं सांठविलें गेलें तरच पुढें चांगले विचार

सुचणार आहेत. या वयांत व्यासंगाची संवय झाली असेल तर पुढेंही व्यासंग चालू राहील. सुदैवानें इतका सर्व सांठा मुद्रिकेप्रमाणें तयार होऊन त्यांत तारुण्याचा सोज्ज्वल हीरकमणी येऊन बसल्यावर मग त्याला मोल आहे काय ? असा अनमोल समय प्राप्त होऊन श्रुतिशास्त्रोपदिष्ट जें सर्वश्रेष्ठ **परमफल** अर्थात **मोक्षफल** प्राप्त न केलें अथवा त्याच्या प्रयत्नासही न लागलें आणि अत्यंत विषयासक्तीनें—मग ते विहित विषय कां असेनात—आयुष्य क्षीण करणें ह्म० आपल्या हातांनीं आपला कंठच्छेद करणें नव्हे काय? सध्यां तारुण्यांत चैन भोगून घ्यावी, पुढें वृद्धापकालांत मोक्षसाधन करितां येईल; असें मनांत आणणें अति मूर्खपणाचें आहे. कारण आधीं तर आयुष्य कोणाच्या बापाचें चाकर नाहीं. कोणत्या क्षणीं **काल** भक्षण करील याचा नेम नाहीं. मग सर्व विचार ठिकच्या ठिकाणींच राहतील. कदाचित् वृद्धावस्थेपर्यंत मजल पोंचलीच तर तारुण्यांत कर्तव्यविचार पूर्ण दशेस पोंचले असतील, सारासारविचार झाला असेल, इंद्रियांचें दमन अथवा शांति झाली असेल, चित्तास उपरम झाला असेल, आणि केवळ ' ज्ञानोदय ' होणेंच बाकी राहिलें असल्यास हें सर्व साहित्य वृद्धपणांत टिकतें. आणि उर्वरीत आयुष्याचें साफल्य होतें. तारुण्यांत ' कर्मकांडावर ' भक्ति बसली असेल, अथवा ' योगादि ' साधनांचा, ' ईश्वराराधनाचा ' आणि 'ध्यानधारणेचा' किंवा ' तपाद्यनुष्ठानाचा ' कोणताही अभ्यास दृढ झाला असेल आणि ज्यावर पूर्ण प्रीति बसली असेल तेंच साधन कसें तरी वृद्धावस्थेंतून पार पडून शेवटीं मृत्युसमयीं कामास पडेल. आणि जर सर्व तारुण्य विषयारण्याच्या परिभ्रमणांत निःशंकपणें व कर्तव्यपराङ्मुखतेनें व्यतीत करून वृद्धापकाल येऊन ठेपल्यावर जागें होऊन कर्तव्यास आरंभ करूं ह्मणेल तर स्वप्नांत देखील कांहीं साधन दृष्टी पडणार नाहीं, मग जागृतींत साधन होणें कसचें आलें ! !

---

## जीवाची अंत्यकक्षा ह्म० 'वार्धक्य व मृत्यु.'

तारुण्यांत आहारविहार परिमितपणें ठेवून व्यायामाच्या परिश्रमानें शरीर उत्तम सुदृढ ठेविलें असेल, आणि विषयासक्तीनें शरीरसंपत्ति उधळली नसेल तर वार्धक्याची धाड एकदम अंगावर कोसळत नाहीं. हळुहळू कालक्रमेंकरून देहेंद्रियें शिथिल होत जातात. रोगादि विकार फारसे त्रास न देतां आयुष्य समाप्त होईपर्यंत हातपाय चालत राहतात. स्वतःला व आपल्यापासून दुसऱ्याला जास्त उपद्रव पोंचत नाहीं. आणि तारुण्याच्या अंदाधुंदींत मागला पुढला कांहीं विचार न बाळगतां अतोनात विषयासक्तीनें शरीराची संपत्ति, धनसंपत्ति, विद्या आणि विचारसंपत्तीची अनर्गलपणें यथेष्ट नासाडी केली असेल, तर वृद्धापकाल येण्यापूर्वींच **जरा** आपला अम्मल बसविते. विहित मार्गांनीं लग्नें करून पाहिजे तितक्या जरी स्त्रिया भोगल्या तरी शक्ति क्षीण होऊन दुसरे विकार होतील. परंतु उपदंशादिक रोग कधीं होणार नाहींत. हे विकार, कुमार्गगमनाचें प्रत्यक्ष फल अनुभवास येतें. आणि यापासून शरीराचा विध्वंस होऊन मृत्युमुखीं आहुति होते. तारुण्यांत शरीराचा विध्वंस झाल्यावर पुढें मजल जातेच कशाला; गेलीच तर त्या दुर्दशेस व विटंबनेस पारावार नाहीं. ज्या ज्या कांहीं अपेष्टा होतात त्या ज्याचा तोच भोगू जाणे. अशा यातनेंत हा जीव वांचतो कसा हेंच मोठें आश्चर्य आहे. पण न वांचून करतो काय? पूर्ण पापाचें दुःखरूप फल याचें याला भोगल्यावांचून गत्यंतरच नाहीं. तें भोगतांना आपलीं सर्व दुष्कृत्यें आठवून ढसढसा रडतो, परंतु त्यावेळीं त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. समयावर विचार न राहतां मागून डोळे उघडलेले काय कामास पडतात! रडावें आणि भोगावें; दुसरें कांहीं नाहीं.

## मृत्यूचें स्वरूप व ऐश्वर्य.

त्रैलोक्यभक्षक महारौद्र मूर्ति **मृत्यु** महाराजाच्या सार्वभौम रा-

जधानीचें—यावत् पदार्थमात्रांचीं व जीवमात्रांचीं स्थूलशरीरें—हें क्षेत्र होय. ‘ जरा ’ ही त्याची पत्नी आहे. वात, पित्त, कफ हे त्याचे तीन प्रतापशाली पुत्र आहेत. ‘ मोह ’ त्याचा कोशनियामक* असून ‘ शोक ’ हा प्रधानमंत्री आहे. ‘ भय ’ हा सेनापती आहे. अनंत रोगविकार ही अगणित सेना आहे. अखिल जीवमात्रांचे ‘ प्राण ’ हें त्याचें जिंकून मिळविण्याचें धन होय. जीवाचीं अनंत ‘ कर्में ’ हीं त्याची अपार संपत्ति होय. ( जीव अनेक संचित क्रियमाण कर्मांसह आयते मृत्यूस अर्पण होतात. प्रारब्धच कायतें पदरीं पडतें ) जीवाश्रित ‘ अहंकार ’ हा ज्याचा प्रबल शत्रु आहे. अखंड दंडायमान जो ‘ काल ’ हें ज्याचें ‘ कोदंड ’ होय. लव, पळ, घटि, प्रहर, दिवस, मास, वर्ष, युग, कल्पादिक हे ज्याचे लहान मोठे बाण होत. जीवाचें आयुष्य हें लक्ष्य ( ह्म० बाण मारण्याचें निशाण ) होय. महामारी, सांथी इ० अपरिहार्य रोगरूप तीक्ष्ण शस्त्रें होत. भूकंप विद्युत्पातादिक हीं प्रचंड अस्त्रें आहेत. ‘ सृष्टि ’ हें ज्याचें भक्ष आहे, अशी ही कराल विक्राल भयानक मूर्ति आपल्या परमप्रिय आणि चतुर अशा अज्ञान प्रतिनिधीसहवर्तमान मोठ्या प्रतापानें अनाद्यनंतकालची जीवमात्रांच्या शिरावर निष्कंटक राज्य करीत आहे. आणि त्याचा ‘ अज्ञान ’ प्रतिनिधी मोठ्या कुशलतेनें जीवास जन्मादारभ्य विषयव्यामोहांत भुलवून क्षणोक्षणीं डाव साधण्याची संधी पहात असतो. परंतु जीवाच्या आयुष्यबलानें जर ती लवकर नच सांपडली तर, हळू हळू जीवास पुढें सारून अतिरिक्त भोगाच्या खड्यांत ढकलून रोगादि विकारांच्या स्वाधीन करतो. त्यांच्या वस्तूचा जर पुरता फडशा नच झाला तर, पुन्हां विषयामृत विषरूप औषध पाजून पुष्ट करून सर्व संपत्तीसह जीवास ‘ जरेच्या ’ अंतरंगस्थळीं नेऊन पोंचवितो. मग तेथें त्रिवर्ग पुत्रांच्या आणि प्रधानादिकांच्या तडाख्यांत सांपडल्यावर मग सुटका कसली. सर्वजण आपापल्या शक्तीप्रमाणें जीवाचा यथास्थित चेंदा ह्म० मऊ करून ‘ जरेस ’ देतात. जरा—त्या मऊ झालेल्या जीवरूप ‘ फलास ’ अहंबुद्धिरूप घृत आणि वासनारूप श-

* खजिना.

केरेनें युक्त करून चितेच्या अनलावर शिजवून परिपक्क झाल्यावर मृत्यु महाराजांच्या नैवेद्यार्थ अर्पण करिते. मृत्यु त्या फलाचा यथेष्ट रसास्वाद घेऊन सूक्ष्मशरीररूप कवचयुक्त कर्मबीजास थुंकून देतो. तीं कर्मबीजें 'आत्मभूमींशीं' संयुक्त झालीं ह्म० जीव पुन्हां उत्पन्न होतात. त्याला पूर्वक्रमानें तो पुन्हां भक्षण करितो. अशी ही कालराजाची क्रीडा व अज्ञानी जीवांची दुर्दशा अखंड चालू आहे. ही सर्व दुर्दशा सर्व जीव इतरांची डोळ्यांनीं पहातात व स्वतःची अनुभवितात, परंतु डोळे उघडीत नाहींत. काय करावें, अत्यंत खेद होतो ! ! ! असो.

---

# जरेचें स्वरूप.

जरेचें स्वरूप अति भयंकर आहे. ती ज्या जीवास गांठते तो देखील अति विद्रूप दिसतो. 'जरा' वृद्धापकालांतच येते असा अर्थ नाहीं; शक्ति क्षीण होणें, रोगादि विकारांनीं सदैव त्रस्त राहणें, शरीर व्याधिग्रस्त होऊन जर्जर होणें, आणि अंतःकरणेंद्रियादि व्याकुल असणें इ० हीं सर्व लक्षणें जरेचींच आहेत. अविचारानें अतिरिक्त आहारविहार होऊन यांपैकीं एकाद्या लक्षणाचा प्रवेश झाला कीं, पाठोपाठ सर्व तयार आहेत. मग जरी तारुण्यावस्था असली तरी तिच्यांत वृद्धावस्थेपेक्षांही वाईट दुर्दशा होते. तारुण्यांत अनाचारांनीं अनेक प्रबल रोग उत्पन्न होतात. आणि त्याचा परिणाम जेव्हां रक्तपीती व गलितकुष्ठादिकापर्यंत पोंचतो तेव्हां त्या पतित जीवाच्या वाऱ्यावर देखील कोणी उभें राहत नाहीं. वैद्य दुरून उपचार सांगतात. ते करण्यांत आणि शरीराचा स्पर्श करण्यांत स्त्रीपुत्रादिक अव्हेर करतात; मग इतराची कथाच काय आहे. अशा वेळीं वरील सर्व लक्षणें येऊन प्राप्त होतात. आपले हातपायसुद्धां आपल्या वस्तू हलवीत नाहींत. आणि सांगितलेलें कोणी ऐकत नाहीं. जे समोर प्राप्त होतात ते यथेच्छ निर्भर्त्सना करतात. भोगा आतां आपल्या तारुण्याचीं फलें ! रडा आपल्या कर्माला ! तेव्हां

डोळे फुटले होते का ?! असे एक कीं दोन चहूंकडून सर्वांचा वाक्प्रहार होतो, तेव्हां काळीज शतधा होतें. आणि मृत्यु बरा वाटतो, परंतु तो भोग पूर्ण झाल्यावांचून येत नाहीं. अशा प्रसंगीं आपल्या प्रारब्धकर्मावांचून कोणी कोणाचा साथी नाहीं. सुदैवानें मृत्यु आलाच तर, त्याचें प्रेतसुद्धां उचलण्यास कोणी धजत नाहीं. स्वजन क्षणभर डोळ्यांस पाणी आणून, घरांतला महारोग गेला असें वाटून सुखी होतात. येथें जरेला व मृत्यूला वृद्धावस्थेची गरज लागली काय ? नाहीं. असो.

एकादें घर बाहेरून चांगलें दिसलें आणि आंतून उंदीरघुशींनीं पोंखरून ठेविलें असल्यास वर्षाकाल येतांच तें जसें पडतें, तसें तारुण्यांत रोगादि विकारांनीं पोंखरलेलें शरीर औषधोपचारांनीं बाहेरून नीट केलें तरी वार्धक्य येतांच मोडकळीस येतें. प्रारंभीं शक्तीचा ऱ्हास होऊं लागतो. सुरम्य बागेंतील वृक्षांस ग्रीष्मकालांत पाण्याचा पुरवठा न राहिला ह्म० जसे ते कोमेजून शुष्क होतात, तसें वार्द्धक्यांत शक्ती क्षीण झाल्या ह्म० देहेंद्रियादिक शुष्क होतात. अर्थात निरुपयोगी होत जातात. शक्तीचा ऱ्हास झाला ह्म० नेत्रानें कमी कमी दिसत शेवटीं दिसेनासें होतें. कानांनीं ऐकणें तसेंच क्रमानें बंद पडतें. दंत हालूं लागून पडले ह्म० भक्ष्यपदार्थ चर्वित होत नाहीं. त्यामुळें जिव्हेचा रसास्वाद जातो. मग खाणें ह्म० पोटांत ढकलणें होय. तें न चावलें गेलेलें अन्न जठराग्नि मंद झाल्यानें पचन होत नाहीं. व पचन झाल्यावांचून त्याचा रस परिपक्व होत नाहीं. आणि त्यामुळें शक्ति उत्पन्न होत नाहीं. शक्ति न झाल्यानें हस्तपादादि अवयव शिथिल पडतात. मग व्यायाम होत नाहीं. व्यायाम न होतां खाल्लेल्या अन्नाच्या अपचनापासून पित्त विघडतें. पित्त हें शरीरांतल्या धातूंचें 'राजा' आहे. हें खराब झालें कीं, वात आणि कफ प्रबल होतात. हे दोघे प्रबल झाले ह्म० सर्व रोगांस चांगलें फावतें. आणि नित्य नवा रोग शरीरांगणांत नाचूं लागतो. हातपाय संधिवातानें धरतात. हृदय आणि कंठ कफानें व्याप्त होतो. तोंडाचें पंचपात्र होतें, आणि हनुनासिकाप्रांची भेट होते. शिर कांपूं लागतें. कटी धनुष्याकार होते. केश शुभ्र होतात. हात टेंकल्यावांचून व दंडधारणावांचून

उभें राहणें व चालणें कठिण होतें. इंद्रियें शिथिल झाल्यानें देहधर्म झालेला कळत नाहीं व तीं स्वाधीनही रहात नाहींत. शरीरांतल्या रुधिरादि पुष्ट धातू अत्यंत क्षीण होऊन त्वचा लोंबूं लागते. अस्थिपंजराचा आपला आपल्यासच भार होऊं लागतो, आणि शरीर वागवितां येत नाहीं. अशी ही वार्धक्याची स्वाभाविक स्थिति होते. आणि अशांत जर रोगांचें प्राबल्य झालें तर कोणत्या प्रकारची वाईट स्थिति होईल तिचें वर्णन होऊं शकत नाहीं. शरीर शक्तिहीन झालें ह्म० इंद्रियें नष्टप्राय होतात, आणि अंतःकरण सर्व प्रकारच्या त्रासानें व दैन्यानें व्यामोहित होऊन बुद्धि नष्टप्रज्ञ ह्म० विचाररहित होते. आणि जन्मभर ज्या ज्या इंद्रियांनीं जे जे विषय यथेष्ट अनुभविले असतील, त्या सर्वांची घडोघडीं स्मृति होते. त्यांवर वासना धांवते, परंतु ते प्राप्त होत नाहींत. प्राप्त झाले तर इंद्रियशैथिल्यानें भोगवत नाहींत. त्यामुळें अत्यंत क्षोभ व खेद होतो; परंतु विषय नकोसे होत नाहींत. ते विषय सुद्धां वृद्धाच्या चिवडचानें त्याला कंटाळतात. परंतु याला ते कोंवण्याकरितां पाहिजेतच आहेत. आप्त स्वजन, वृद्धाच्या मागण्यानें, बोलण्यानें, आणि खटपटीनें कंटाळून त्रस्त होतात. इंद्रियें स्वाधीन न राहिलीं ह्म० सदैव अमंगलता राहते. त्यायोगानें कोणी जवळ विशेष उभा राहात नाहीं. जर कोणी जवळ येऊन बसला तर ह्याची जन्माची रडकथा चालू होते आणि शेवटीं मला अमुक आणून दे अथवा असाच कांहीं तरी उपद्रव लागतो. पुत्रादि स्वजन चांगले असले आणि स्वतःची कांहीं कमाई असली तर देहपरिचर्या बरी रहाते. नाहींपेक्षां विटंबनेस पारावार नाहीं. गृहपालवत् ( ह्म० श्वानवत् ) तुकडा पुढें आणून टाकतात. ही व्याधि कधीं मरेल आणि आह्मी कधीं मोकळे होऊं असें दुसरे उघड बोलतात. अशी सर्व प्रकारें विटंबना, सर्व प्रकारचा त्रास, आणि आधिव्याधींचीं दुःखें हीं सर्व घृतेंधनरूप होऊन ‘ वासनाग्नि ’ अधिकाधिक भडकतो. सारांश जिवंत प्रेतवत् दशा होते. ती सर्व दृष्टानुभूत आहेच. कोणाची अधिक होते, कोणाची कमी होते, कोणाची लवकर होते, कोणाची हळू हळू क्रमानें होते. सुदैवानें कोणास विपत्ति कमी पडते, कोणास दुर्दैवानें जास्त पडते. तथापि वा-

धंक्याच्या बाजारांत दुर्दशेचा भाव एकसारखाच असतो. ग्राहकांस भोगण्यांत कसर पडत नाहीं.

---

## मृत्यूविषयीं विचार.

**हे राजा !** अत्यंत सूक्ष्म विचाराची गोष्ट तुला सांगतों ही नीट लक्षांत ठेव. भरधांव रथ चालवीत असतां, जोरदार अश्वांचे दोर सारथ्याच्या हातांतून सुटल्यास, त्या रथास ते अश्व वाटेल तिकडे ओढून आपटून भग्न करतात. सारथ्यास निरुपायानें दुखापत सोसावी लागते. आणि ते उधळून जिकडे नेतील तिकडे जावें लागतें. रथ आपल्या चक्रादिक सर्वावयवांनीं जड असतां, घोड्यांच्या भरधांव वेगानें त्यांत ह्म० रथांत धांवण्याचा वेग आला, आणि त्यांच्या ह्म० अश्वांच्या धांवण्यानेंच सारथी रथस्थित असतां धांवत असलेला दिसतो. रथाचा व अश्वांचा संग सुटेल तर सारथ्यास धांवावें लागणार नाहीं. आणि सारथ्यानें अश्वांस चारून उन्मत्त केलें नसतें, व हातचे दोर न जाण्याची खबरदारी घेतली असती, तर त्याला दुखापत झाली नसती. असो. मनुष्याचें **शरीर** हें रथ आहे. **इंद्रियादिक** हीं रथांगें होत. **जीव** हा सारथी आहे. अनंत **वासना** हे घोडे आहेत. **सारासारविचारशक्ति** हे त्या अश्वांस आकळण्याचे दोर होत. ते दोर जीवाच्या हातांतून अतिरिक्त विषयव्यामोहानें निघून गेले, त्यामुळें जीवांनीं **कर्म**रूपी दाणा चारून मस्त केलेले **वासना**रूपी अश्व उधळलेले आहेत. आतां ते अश्व जीवाला जिकडे ओढून नेतील तिकडे त्याला जावें लागणार आहे. त्यामुळें अनेक जन्ममरणपरंपरेंत आणि सुखदु:खांच्या ओढाताणींत जीवाचे जे कांहीं हाल होतील ते त्यास सोसणें भाग आहे. हा जीव प्रथम वासना **बीजरूप** होऊन महाकारणावस्थेंत केवळ **संस्कार**रूपानें वास करीत होता. तो पितृरेतद्वारा मातृगर्भाशयांत येऊन पूर्णावयवसंपन्न झाल्यावर जन्मास आला. जन्मास आल्या दिवसापासून जितके जसे **संस्कार** उदय पावत जातात तशी वासना होत जाते. त्या वासनेचा **आघात** बुद्धी-

द्रियादिकांवर जसा होतो, तशीं तीं विषयांत प्रवृत्त होऊन भोगाच्या अनुभवास परत मागें अनुक्रमें पोंचवितात. याच प्रकारानें जीवाची आयुष्यपरिचर्या चालत असते. आतां '**संस्कार**' आणि '**वासना**' यांचें स्वरूप जरी एकच आहे तरी अत्यंत सूक्ष्म अंतर आहे. तें असें कीं, संस्काराची जी उदयावस्था ती '**वासनारूप**' आहे. वासनेंत प्रवृत्तीचा जोरदार वेग असतो. आणि वासनेची जी लीनावस्था ती '**संस्काररूप**' आहे. अनंत संस्कार स्तिमितरूपानें संचित पडले असतात, ते समयावर उदित होतात. हे सर्व संस्कार जीवकृत कर्मीच असतात. हातांनीं क्रिया चालू असते तोंवर ती **कर्मरूप** असते. आणि ती क्रिया हातची सुटली ह्म० **संस्काररूप** होते, आणि मागल्या **संचित** संस्काराच्या खजिन्यांत जाऊन सांठते. ह्मणून **कर्म** व **संस्कार** यांचें एकच स्वरूप आहे असें मागें वर्णन झालेंच आहे. समुद्र गंभीर जलाशय आहे. त्यांतून एखादा निंच प्रदेशाकडे जलाचा पाट काढला तर त्याच्या अगदीं मोहऱ्यावर कसा जबरदस्त वेग असतो तो पुढें पुढें कमी होतो. आणि तोच जलप्रवाह यंत्रशक्तीनें मागें हटवित चालल्यास जलप्रवाहाच्या मोहऱ्याशीं वेगाचा कसा कल्लोळ होईल. पाणी चहूंकडे उसळेल, आणि पूर्णदट्टचा बसला ह्म० पुन्हां दट्टचा उघडेपर्यंत स्थिर राहील. तथापि दट्टयावर ठोकर देत राहील. त्याप्रमाणें अनंत संस्कार हा पूर्ण वेगाचा कुंठित खजिना समुद्राप्रमाणें आहे. यांतून जन्मकालरूपी मोहऱ्यांतून वासनारूपी पाट जोराच्या सोसाट्यानें बाहेर पडत आहे. तो जरारूपी यंत्रानें मागें हटवितांना मोहऱ्याशीं अति कल्लोळ करितो. आणि शेवटीं मरणकालरूप दट्टचा ठोकला गेला ह्म० पुन्हां जन्मकाल येईपर्यंत कुंठित राहतो. तथापि दट्टयावर ठोकर देत राहतो. ह्मणूनच **कालराजा** जीवरूप फलाचीं कर्मसंस्काररूप **बीजें** थुंकून देतो. तीं बीजें त्यास पचत नाहींत. तीं त्यानें खाऊन पचविलीं असतीं तर, विचारा जीव जन्ममरणपरंपरेंतून मोकळा तरी झाला असता. पण जीवाचें असें दैव कोठें आहे ! ! असो.

आतां सूक्ष्म विचार पहा कीं, अनंत संचित **संस्कार** जे कुंठित असतात ते **वासनारूपानें** पूर्ण जोरांत येतात. **त्यांची आघातरूप**

प्रेरणा अंत:करणावर, इंद्रियांवर आणि शरीरावर जोंपावेतों चालते तोंवर तीं विषयभोगास परत आणतात. **वासना** संस्काररूप लीनावस्थेस प्राप्त झाली म्हणजे अंत:करणादि सर्व निश्चेष्ट होतात. हा नित्य सुषुप्तीचा अनुभव आहेच. परंतु **वासना** लीन न होतां, तिचीं आज्ञाधारक देहेंद्रियादि जरेनें व्याप्त झालीं म्हणजे तीं कार्य अक्षम होऊन विषयभोगास परत न आणतां वासनेच्या निष्फल वेगासच परत आणतात. त्यामुळें वासना अत्यंत क्षुब्ध होऊन चहूंकडे उसळते व कल्लोळ करते, परंतु तडफडण्यावांचून अन्य कांहीं चालत नाहीं. सारांश, जन्मकालापासून वासनेचा जसा भरधांव जोराचा वेग होता, तशीं पुढें विषयभोगार्थ इंद्रियें हीं भरधांव चालत होतीं. त्यांजवर जरेचा अंमल बसून देह शिथिल होतांच त्यांची शक्ति इंद्रियांत परत आली. इंद्रियें शिथिल होतांच त्यांची शक्ति अंत:करणांत परत आली. अंत:करणांतून शक्तीचें ठाणें उठून वासनेच्या किल्ल्यांत पोंचलें ह्म० वृद्धकपी विक्षिप्तांत:करण होऊन वेडे चार करूं लागतात. अर्थांत वार्धक्यांत सर्व ठिकाणच्या शक्ती क्षीण होऊन त्या सर्व एका वासनेंत येतात, ह्मणून '**वासना**' अति प्रबल ह्म० तरुण होते. आणि जसा जसा काळ जवळ येतो तसतशी ती सभोंवतीं जोरानें उसळत फिरते, नाचत फिरते. जसें, एकाद्या मनुष्याच्या आंगावरील वस्त्र अग्नीनें एकदम पेटलें ह्म० त्याला तें विझविण्याचें भान व सामर्थ्य न राहतां तो चहूंकडे ओरडत धांवत सुटतो; त्यायोगानें वारें लागून अग्नि जास्त भडकतो. मग जवळ एकादा जलाशय असला आणि तो सुदैवानें याला सांपडून त्यांत जर हा दग्धजीव जाऊन पडला तर अग्नि शांत होतो नाहींपेक्षां रक्षा होते. तसें, जीवाचें शरीररूपी वस्त्र कालभयाग्नीनें पेटलें ह्म० तो वासनारूपानें चहूंकडें ' मला कोणी वांचवा ' असें ओरडत धांवत सुटतो. तेव्हां जरारूपी प्रभंजनानें ( वायूनें ) तो अग्नि जास्त भडकतो. त्यामुळें जीवाचें अगदीं सामर्थ्य व भान नाहींसें होतें. अशा प्रसंगीं सुदैवानें बुद्धि होऊन जर श्रीहरिगुरुचरणांबुसरोवर जवळ सांपडलें तरच ह्या जीवाचें **कालाग्निभयापासून** रक्षण होतें. नाहींपेक्षां जन्ममरणरूपी राखेचा ढीग पुढें लागलाच आहे.

**हे राजन्** ! सर्प जसा आपल्या बिळांतून बाहेर येऊन, चहूंकडे फिरून खाद्य खाऊन पुन्हां आल्या वाटेनें बिळांत परत जातो, तसा हा जीवरूप सर्प संचित **संस्काररूप** बिळांतून जन्मद्वारा बाहेर पडून वासनेनुरूप भोग भोगून पुन्हां मरणद्वारानें **संस्काररूपी** बिळांत परत जातो. हीच याची नित्य परिपाठी आहे. 'जन्मरूपी बीजाचें मरणरूपी फळ आहे.' जन्मबीजांत—प्रचंड संसारवृक्षाचें—जें कर्म वासनात्मक द्रव्य ह्म० बीजांतलें मगज आहे, तेंच द्रव्य मरणरूपी फलांत जातें.* अर्थात् तेंच पुन्हां बीजरूप होतें. ह्मणून बीजफलवत् जन्मानें मरण आणि मरणानें जन्म अशी अखंड परंपरा सुटत नाहीं. ह्या बीजफलांतलें मगज ह्म० द्रव्य अथवा सार जें 'कर्म वासनात्मक' आहे तें पूर्ण भाग्यानें जर ज्ञानाग्नीनें एकवार भाजलें जाईल तरच त्यांतली पुनर्जन्मरूप कोंब येण्याची शक्ति नाहींशी होऊन हा जीव कृतार्थ होईल. नाहींपेक्षां वासनेचें सुदर्शन याच्या मागें लागलें आहे, तें याला कधीं थांबूं देणार नाहीं.

सारांश, जीव जन्मभर हव्या तशा व्यवहारांत आपल्या जीवित्वाची यथेष्ट उधळपट्टी करतो; परंतु जरेनें अथवा असाध्य रोगानें किंवा कोणत्याही अन्य कारणानें कराल **विक्राल काल** समोर येऊन उपस्थित झाला ह्मणजे कशी त्रेधा उडते आणि गाळण होते, याचें वर्णन यथार्थ होणें कठिण आहे. ज्याचा तोच अनुभवूं जाणे ! ! ज्या जीवाची जन्मापासून जशी लहान मोठी उपाधि असेल तसा त्याला अधिक ताप होणार आहे. सामान्यपणेंच परगांवीं जाण्याचें काम आल्यास, घरदाराकडे कसा जीव ओढतो. तशांत युद्धार्थ जाण्याचा ज्यांना प्रसंग येतो ते तर निराश होऊन स्वजनाचा निरोप घेऊन, परस्परांची दृष्टि पोंचेपर्यंत व्याकुलांतःकरणानें मागें पहात त्याची तोडातोड होते. तथापि विजयी होऊन किंवा कसे तरी प्राण वांचून परत येण्याची व्यर्थ आशा तरी असते. परंतु या प्रसंगीं कोणत्याही प्रकारें आशेचा लेशही उरत नाहीं. रडत, आक्रोश करीत, भयाभीत होऊन मृत्युमुखीं पडावें लागतें. सार्वभौम असो,

*जीव प्रारब्धकर्म संस्कारासह महाकारण शरीरानें स्वतः संस्काररूप धारण करून मृत्युमुखीं जातो.

राजा असो, श्रीमान् असो, मध्यम, गरीब अथवा अगदीं रंक असो, मृत्युमुखांत सर्वांची योग्यता एक आहे. क्षणभर किंवा रतिभर कोणाची क्षमा नाहीं. विपुल रुधिरमांसांनीं पुष्ट झालेला महिष क्षुधित व्याघ्रास सांपडल्यानें त्याला जसा अति आनंद होतो; तसा जो जीव जितक्या ' अहंतारूप ' रुधिरानें आणि ' ममतारूप ' मांसानें पुष्ट असेल तितका तो कालनृसिंहास अधिक प्रिय वाटतो. त्याचें भक्षण आणि स्वजनाश्रुजलाचें पान कालव्याघ्र अति प्रीतीनें करतो. परंतु तें त्याला एका ग्रासाच्या व एका घोंटाच्या लेशापुरतेंही होत नाहीं. आणि आत्मज्ञानी जीवांचें ' अहंताममतारूप रुधिरमांस ' ज्ञानाग्नीच्या तापानें आधींच शुष्क होऊन केवल देहप्रारब्धरूप अस्थिपंजर शेष राहतें. त्याला ' कालव्याघ्र ' उगीच भ्रांतीनें हुंगून मात्र पहातो. आणि त्यांत भक्ष्य कांहीं नाहीं असें समजल्यावर व्यर्थ शुष्क अस्थिभक्षणानें दंत भग्न होतील, म्हणून तो त्याच्याकडे पुन्हां ढुंकूनसुद्धां पहात नाहीं. वरील लक्षणयुक्त पुष्ट पशु धुंडून काढित असतो आणि भक्षण करीत असतो. तथापि कधींच क्षुधा शांत होत नाहीं. ह्मणून अत्यंत क्षुब्ध होऊन शेवटीं एक दिवस सर्व सृष्टि तोंडांत टाकून रोजच्या खटपटीपासून मोकळा होतो. परंतु तीं कर्मबीजें त्याला न पचतां पोट दुखूं लागलें म्हणजे त्याला वांति करावी लागते. वांतींतून तीं बीजें बाहेर पडून आत्मभूमीशीं युक्त झालीं कीं पुन्हां पूर्ववत् सृष्टि तयार होते. कालाग्नीस देखील तीं कर्मबीजें दग्ध करण्याचें सामर्थ्य नाहीं. तीं केवल ज्ञानाग्नीनें दग्ध झालीं तरच होतात. नाहींपेक्षां तीं अखंड वज्रटंक आहेत. तीं जीवालाच खाऊन पचविलीं पाहिजेत. पण तीं जीवाच्या भोगक्षयानें कांहींशीं थोडीं कमी होतात, तों त्याहून शटपट अधिक ' वासना ' रूपानें पुन्हां वृद्धिंगत होतात. ही श्रेढी संपावयास नको आणि जीव मृत्युमुखांतून सुटावयासही नको ! ! जन्मावें व मरावें ! ! दुसरें काय ?

# मृत्यूची व अज्ञानाची आनंदरूपता.

**हे राजा !** विचारदृष्टया पहातां, **मृत्यूस** जें भयंकर रूप प्राप्त झालें आहे तें केवळ अज्ञानी जीवांनीं आणलें आहे. परमावधीच्या असह्य वेदना सहन करणें जीवास एकवार गोड वाटेल, परंतु मृत्यु बरा वाटणार नाहीं. वास्तविक म्हटलें तर ज्या असह्य वेदना जीव सहन करतो, त्याच्या शतांशानें देखील मृत्यूंत वेदना अथवा दुःख नाहीं. परंतु वेदना भोगून जसा जीव पार पडून जिवंत राहतो, तसा मरणानंतर जिवंत राहिला असता तर मृत्यूचें दुःख कोणासही वाटलें नसतें. पण मृत्यूनें जीव मरत नाहीं. जीवाला खाण्याचें सामर्थ्य मृत्यूंत नाहीं. जीव नित्य आहे. खरोखरच जर मृत्यूनें जीव अगदीं सृष्टींतून समूळ नाहींसा झाला असता तर बिचारा सुटला असता. पण नाहीं, मृत्यु जीवास न खातां केवळ त्याच्या स्थूल देहास मात्र भक्षण करतो. स्थूल देह हा जीव नाहीं, असें प्रत्येक अज्ञान्यासही समजतें. देहच जीव असता तर प्रेत पुढें ठेवलेंच असतें, त्याचें कोणीं दहन न करता. जीवाहून स्थूलदेह किती तरी दूर व बाहेर आहे. देह हें केवळ वस्त्राप्रमाणें अथवा गृहाप्रमाणें जीवाचें आच्छादन आहे. हें नष्ट झाल्यानें जीवाचें रतिभर देखील सामानाचें ओझें कमी होत नाहीं. अतर्क्य व अनंत वजनांच्या पर्वतप्राय संचितकर्मांच्या सामानाचें ओझें यांनीं आपल्या शिरावर आपल्या हातांनींच लादून घेतलें आहे. तें अनंतकोटी कल्पांपर्यंत याला पुरवठा करणारें आहे. तीं अनंत कर्में एकाच जीर्ण झालेल्या शरीरानें भोगतां येणार नाहींत. आणि एकाच ठिकाणीं राहून जीवित्व कंटाळवाणें होईल, ह्मणून जीवास त्याचा मृत्यु नित्य नवीं शरीरें देऊन सर्व सृष्टीची मौज दाखवीत बरोबर घेऊन फिरतो. हा या जीवावर त्याचा केवढा मोठा उपकार आहे. परंतु अज्ञानामुळें जीव आपल्या हितकर्त्यास शत्रु मानून त्याच्याशीं द्वेष करतात. आणि त्याला निर्दय, क्रूर, भयंकर इ० दुष्ट विशेषणें देऊन भयाभीत आणि दुःखी होतात, याला त्यानें काय करावें. मृत्यूंत दुःखा-

चा लेश नसून उलट आनंद आहे. नित्यचे श्रम जसे सुषुप्तींत परिहार होऊन दुसऱ्या दिवशींच्या व्यवहारार्थ हुषारी येते. तसे जन्मभराचे श्रम परिहार होऊन अन्य जन्मांत नवीन ताज्या देहांनीं यथेष्ट भोग भोगण्याची शक्ति येण्याकरितां मृत्यु हें जीवाचें दीर्घ विश्रांतिस्थान आहे. पण हें अज्ञ जनांस कळत नाहीं, ह्मणून मरणापरतें दुःख नाहीं असें ते ह्मणतात. वरं दुःख नाहीं तर मग मृत्यूची भीति तरी कां वाटावी ? पण हें वाटण्यास तरी अज्ञानच कारण आहे. कारण सुषुप्तींत आणि मृत्यूंत अल्प कालाचा आणि बहुकालाचाच कायतो फरक आहे; स्थितींत अंतर नाहीं. निद्रेंतून जागल्यावर नित्यानुभूत विषय प्राप्त होतात. आणि मृत्यूंतून बाहेर पडल्यावर देहापासून सर्वच नवे विषय प्राप्त होतात. त्याची याला ओळख पटत नाहीं. आणि बहुकाल अज्ञानमय स्थितींत लीन राहिल्यानें मागली सर्व आठवण विसरते. तसेंच मेल्यावर मी कोणीकडे जाणार, माझें काय होणार इ० गोष्टी मरणांपूर्वीं कळत नाहींत. त्यामुळें जीव मेला ह्म० सृष्टींतून आंचवला. पुन्हां त्याचा पत्ता त्रिकालांत लागण्याची आशा नाहीं. त्याचें काय होतें कोण जाणे ! अशा अज्ञानाच्या घोंटाळ्यानें प्रत्येक संसारी जीव आपल्या स्वजनाच्या मृत्यूनें शोक करतात. त्या शोकाच्या देखाव्याचा 'संस्कार' अज्ञान मूलपणाच्या स्थितीपासून आणि इतरांच्या रडकथा ऐकिल्यापासून प्रत्येक जीवाच्या हृदयांत दृढ होतो. आणि तो आपल्या स्वजनार्थ शोक करूं लागतो. आणि पुढें आपल्यावर पाळी आली ह्म० शोकाक्रोशभयानें त्रेधा उडणें, हें अगदीं इतर मनोविकारांप्रमाणें स्वाभाविक होऊन बसतें 'मृत्यु' आला असें कळतांच हा जीव घाबरून याची मलमूत्रविसर्जनापर्यंत गाळण उडते. अर्थात जीवाच्या अज्ञानानेंच मृत्यूला भयंकर आणि दुःखरूपता व्यर्थ प्राप्त झाली आहे. तो केवळ आनंदरूप आहे. त्याच्यांत दुःखाचा व भीतीचा लेशसुद्धां नाहीं.

हे राजा ! परदेशीं गेलेला आपला मनुष्य सुखी आहे, असें आपल्यास कळत असलें ह्म० समाधान वाटतें. वियोगाचें दुःख विशेष वाटत नाहीं. तसें आपला मृत मनुष्य कोठें जन्मला अथवा

गेला, तसेंच आपण मेल्यावर आपली काय गति होणार, हें कळेल तर मग मृत्यूचें कांहीं भय वाटणार नाहीं. आणि मृत स्वजनाचा विशेष खेदही वाटणार नाहीं. प्रत्येकास मागल्या पुढल्या जन्माची स्वाभाविक स्मृति राहिली असती तर फार बरें झालें असतें; असें त्रिकालज्ञान असण्याविषयीं प्रत्येक जीव अत्यंत उत्सुक आहे व त्याची त्याला मोठी हौस व मौज वाटते. पण तें ज्ञान प्राप्त झालें नाहीं तोंवरच कायती मौजेची भ्रांति आहे. कारण ज्यांना त्रिकाल-ज्ञान झालें आहे व ज्यांना होईल, त्यांच्यावस्तु सृष्टीची अथवा स्व-तःच्या जीवनव्यवहारांतील एक काडीसुद्धां इकडची तिकडे अन्य-था करवणार नाहीं. जसा प्रारब्धकर्माचा भवितव्य ओघ वाहत अ-सेल त्याला निमुटपणें अनुकूल होऊन वाहत जावें लागतें. अवश्यं-भावि कर्म टाळतां आलें असतें तर महा पुण्यश्लोक नल, राम, युधि-ष्ठिरांसारख्यांस संकटें कां भोगावीं लागतीं. त्रिकालज्ञानानें नसता व्यर्थ घोर मात्र मागें लागतो. दुसरें कांहीं होत नाहीं. त्या घोरानें ज्यांची बुद्धि शांति आणि धैर्य सोडित नाहीं, त्यांना तें ज्ञान गुरुरूपें सहज प्राप्त होतें. याचा उपयोग सर्व जीवांस नाहीं. ह्मणून ईश्वरानें 'त्रि-कालज्ञानाच्या' जागीं जीवाच्या बुद्धींत 'त्रिकाल अज्ञानाची' स्वाभाविक योजना करून ज्ञानप्राप्तीचें एकच गुरुद्वार मोकळें ठेविलें आहे, ह्मणून सर्व सृष्टीच्या जीवमात्रांचे व्यवहार सुखरूप झाले आ-हेत. नाहींपेक्षां जीवास पुढें पाऊल टाकणें दुर्धर झालें असतें, सुखाचा लेश मिळाला नसता, आणि जीवित्व सदैव संकटांत राहिलें असतें.

प्रारब्धकर्माचा धौंसा असा वज्रतुल्य आहे कीं, त्याचा क्षय भो-गावांचून होण्याचा अथवा प्रारब्धकर्मभोगाचा एक लवलेश कमी जास्त करण्याचा सृष्टींत उपाय निर्माणच झाला नाहीं; असें निःसं-शय ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. आणि हाच श्रुतिसिद्धांत आहे. आतां विचार करून पहा कीं, प्रत्येक जीवमात्रास अपरिहार्य क-र्माच्या ओघांत वाहत जाण्यावांचून तर गतीच नाहीं; तोंडसुद्धां मागें फिरवूं शकत नाहीं, मग दुसरें काय करतो. आणि जन्मक्षणा-पासून प्रत्येक जीवास आपल्या व्यवहाराचें ज्ञान पूर्वसंस्का-रानुरूप जसें स्वाभाविक उदयास येत जातें, तसेंच प्रत्येक

जीवास मागलें पुढलें ज्ञान जर उदित झालें असतें, तर मरण ह्म० वेषांतर करणें अथवा पोषाख बदलणें आहे, हें ज्ञान खास कायम राहतेंच, पण त्यापासून पुढें कसा अनर्थ झाला असता तो पहा. मुलगा अज्ञान असतां माता मृत झाली, आणि तीच अन्य स्थळीं जन्मून कालांतरानें याच मुलाची पत्नी झाली, व पुत्रमातृज्ञान दोघांनाही विचाराअंतीं उदयास आलें. आतां जर मानवी मनोधर्म कायम आहे तर पुढच्या व्यवहाराची काय वाट ? पूर्वजन्माचा प्रती या जन्मीं पुत्र झाला; हें ज्ञान दोघांस होणारच. आतां स्तनपान कसें व्हावें व जीवन कसें व्हावें ? आपला पूर्ण शत्रु आपल्या उदरीं जन्मला, परस्परांच्या प्राणांची परस्परांस क्षणोक्षणीं भीति, मुलाचे प्राण कसे वांचावे ? श्रीकृष्ण भगवानाच्या जन्माची कंसास पूर्व सूचना कळल्यानें त्यानें कसा अनर्थ केला, हें भागवतीं प्रसिद्ध आहे; पण शेवटीं होणें तेंच झालेंना ? पूर्व ज्ञानानें बंदोबस्त तो काय झाला. पूर्व जन्मीं ब्राह्मण असून कर्मसंस्कारानें चांडाळाच्या घरीं जन्म झाला; अंतःकरणाची काय वाट होईल ? मनुष्यजन्मांतून पशुजन्मास गेला; आणि पूर्व ज्ञान कायम आहे, जन्म कसा कंठावा ? जडभरताच्या मृगजन्माची कथा सर्वश्रुत आहेच. आपली स्त्री मरून जन्म घेऊन दुसऱ्याची स्त्री झाली अथवा दुसऱ्याची आपली झाली. त्रिवर्गांस पूर्व ज्ञान आहेच. इचें मन दोघांकडे ओढणार, तेव्हां दोघांच्या मनाची काय स्थिति व्हावी ? आपल्यावर उद्यां असें भयंकर संकट येणार, शत्रु सर्व हरण करणार, आपले स्त्रीपुत्रादि अमुक वर्षीं मरणार आणि आपल्यास अमुक वेळीं मृत्यु येणार इ० अनंत गोष्टींचे विचार आहेत. त्यांत जितकें जितकें विचार करित आंत शिरावें तितका तितका प्रचंड अनिवार्य घोंटाळ्याचा गुंताच होणार आहे. आणि अनेक प्रकारच्या एका विरुद्ध एक अडचणीच येणार आहेत. अमुक अशा प्रकारानें असतें ह्म० सर्व जुळून ठीक झालें असतें, असा निर्णय त्रिकालांत कोणास करतां येणार नाहीं. विचारवानांनीं विचार करून करून जरी डोकें फोडलें तरी सूच्यग्राइतकासुद्धां सरळ मार्ग सांपडणार नाहीं. सरतेशेवटीं जसें कांहीं ईश्वरानें केलें आहे तें सर्वोत्तमोत्तम आहे.

असेंच ह्मणावें लागतें, आणि निमूटपणें डोकें पुढें करून प्रपंचप्रवाहास अनुकूल राहून आयुष्य समाप्त करून मृत्यूस अर्पण व्हावें लागतें. कोणाचें कांहींएक चालत नाहीं. जो **सर्वेश्वर, सर्वांतरात्मा, सर्वज्ञ** आणि **सर्वमय** आपल्या स्वेच्छेनें **विश्वरूप** धारण करून उत्पत्तिस्थितिलयांची क्रीडा करण्याकरितां मायारूपानें प्रवृत्त झाला आहे. तोच **सच्चिदानंदघन** मूर्ति मायागुणाश्रयानें **विधात्याच्या** रूपानें आपल्या आनंदरूपापासून सृष्ट्युत्पत्ति, **श्रीविष्णुरूपानें** सृष्टीचें पालन आणि **श्री भगवान कालरुद्रावताररूपानें** सर्व सृष्टीस आपल्या आनंदरूपांत लीन करतो. सृष्टींत दुःखाचें अथवा भयाचें नांवसुद्धां कोठें नाहीं. भयदुःखादि जें कांहीं ह्मणून सृष्टींत आहे तें सर्व जीवांनीं आपल्या अज्ञानानेंच आपल्या शिरावर ओढून घेतलें आहे. तें अज्ञान **श्रुतिगुरु**प्रसादावांचून कधीं जात नाहीं. आणि तें जाऊन आत्मज्ञानसाक्षात्कार झाल्यावांचून महा मृत्यूचें दुःख व भय त्रिकालांत कोठेंही व कधींही जाणार नाहीं. असेंच जन्मोजन्मीं मृत्युभयानें शोकाक्रोश करीत करीत मरावयाचें आहे. मरोत विचारे जीव ! त्यांचें प्रारब्ध त्यांच्याबरोबर आहे. बोध करण्याहून दुसरा आपला तरी काय उपाय आहे. असो.

सारांश, जन्मकालापासून मरणकालापर्यंत जीवाची जीवनयात्रा मृत्युमुखांत चालू असते. कोणत्याक्षणीं आयुष्याचा तंतु तुटेल आणि **मृत्यु** आपलें तोंड मिटील याचा नेम नाहीं. सृष्टींतील यावत् पदार्थ आणि जीव जो एकवार उत्पन्न झाला कीं, त्याचें उत्पन्न होणेंच त्याच्या मृत्यूला उत्पन्न करितें. त्याला आज, उद्यां, महिन्यानें, वर्षानें, युगानें आणि शेवटीं कल्पानें केव्हां तरी मृत्युमुखीं पडल्यावांचून गति नाहीं. जन्मल्यावर मृत्यु अपरिहार्य आहे. ( याचकरितां मुलाचें नालच्छेदन करून हळकुंड, पैसासुपारी, आणि मूठभर तांदूळ अशीं सर्व एकत्र भूमींत पुरलीं जातात, हें काय ? तर मृत्यूकडे जाण्याचें ‘ प्रस्थान ’ ह्म० उत्तर क्षणापासून हवें तेव्हां मरा. ) जन्म घेणें गोड वाटतें, परंतु मृत्यु गोड वाटत नाहीं. एक दिवस मरावयाचें आहे, हें ज्ञान आबालवृद्धांस व मूर्खांससुद्धां आहे. परंतु जन्ममरणापासून सुटण्याचा उपाय करणें मात्र फार कडू वाटतें.

कधीं तरी मृत्यु येणार हें खास ठाऊक जरी आहे, तरी तो अगदीं शिरावर येऊन धडकेपर्यंत जागें व्हावयाचेंच नाहीं, अशी जीवांनीं जणू काय शपथच खाल्ली आहे ! ! सर्प ज्या बेडुकास गिळित असतो, तो बेडूक आंत जातां जातां दोन चार माशा तोंडांत येण्याची जशी आशा करतो, तसा हा अज्ञजीव कालग्रस्त होत असतां अनिवार आशेच्या वेगानें आपल्या विषयाच्या पसाऱ्यांत चहूंकडे धांवत फिरतो. सर्वांच्या मागें लपत फिरतो. परंतु त्यावेळीं कोणी उपयोगीं पडत नाहीं. प्रपंचांत ज्या जीवाचा जितका अधिक व्याप असतो, त्याला मरणकालीं तितकाच अधिक व्यामोह व संताप होतो. मृत्यु सर्वांसच वाईट वाटतो खरा, तथापि व्यवहारांत वयानुसार आणि रीतीनें झालेल्या मृत्यूपासून आप्तांस व स्वजनांस खेद कमी होतो. वृद्ध झालेलीं मातापितरें पुत्रादिकांनीं भरलेल्या संसारांतून मृत झालीं असतां परस्परांस व्यामोह, दुःख आणि शोक तर होतो; परंतु त्यांत रीतीनें झाल्याचें समाधान असतें. तारुण्यांत स्त्रियेचा वियोग झाल्यास फार दुःख होतें. संसाराची जमलेली घडी बिघडते. पण सुदैवानें दुसऱ्या विवाहित पत्नीनें ती उणीव बरीच लवकर भरून येण्यासारखी असते. परंतु हेच प्रकार जेव्हां अगदीं उलट होतात तेव्हां त्या अनर्थास पारावार नाहींसा होतो.

---

# शोक.

**हे राजन् !** चांगली वस्तु सर्वांसच प्रिय असते. आपण फलपुष्पांनीं उत्तम सुशोभित अशा बागेंत गेल्यावर सुंदर टवटवीत पुष्पांवर आणि फलांवर जशी लवकर दृष्टि जाते, आणि तीं तोडून घ्यावींशीं वाटतात, त्याप्रमाणें हा सर्व सृष्टिप्रपंचरूपी अखंड सुरम्य बाग फलपुष्पयुक्त कुटुंबरूपी वृक्षांनीं सुरम्य प्रफुल्लित आहे. **महाकाल** राजाची स्वारी यांत चहूंकडे मौज पहात फिरत असतां ज्यांत ऐश्वर्यादिकांच्या अहंतेचा ‘ गीर ’ पुष्कळ आहे आणि पितृमातृसुतदारादिकांच्या ममतेचा पूर्ण ‘ रस ’ भरला आहे, अशा

त्या अत्यंत टवटवीत तरुण जीवरूप ‘ फळावर ’ जेव्हां तो आपला हात टाकून त्याच्या शरीररूपी फांदीच्या अग्रभागाशीं प्राणरूपी ‘ देठांस हिसका देऊं लागतो, तेव्हां त्या हिसक्यासरशीं तो नाजुक ‘ कुटुंबवृक्ष ’ मूळापर्यंत कंपायमान होऊन त्याचीं प्रफुल्लित असलेलीं स्वजन ‘ पुष्पें ’ भूमीवर गळून पडतात. तितक्यांत शोकप्रभंजन त्या वृक्षास लोळवून धुळींत मिळवितो. हे राजा त्या प्रसंगाचें वर्णन करणें फार कठिण आहे. दुर्दैवानें, ज्या प्रफुल्लित कुटुंबावर तो प्रसंग येतो, त्या भयंकर देखाव्यास काय पुसावें बरें ! !

ज्याचीं मातापितरें वृद्धावस्थेंत, आपल्या विद्याचातुर्यादि गुणांनीं रूपयौवन सुदृढ शरीरानें, आणि धनसंपत्त्यादि ऐश्वर्यानुकूल्यानें पूर्ण भरभराटींत आलेल्या पुत्राच्या अलौकिक गुणांनीं आनंदित होऊन कालक्रमण करीत आहेत. ज्याची लाडकी प्रियभार्या अति सुस्वरूप सुंदर गुणवती आणि चतुर असून तारुण्याच्या पूर्ण भरांत आली आहे. लवकरच सुपुत्र जन्माची परस्परांस आशा लागली आहे, आप्तस्वजनानें कुटुंब गजबजलेलें आहे. समाजांत जो अत्यंत लोकप्रिय झाला आहे. ज्याला शाहाणे जिवलग मित्रही पुष्कळ आहेत. सुरम्य भव्य इमारती गृहें, धन वस्त्रादिक सर्वैश्वर्यांनीं अगदीं ओतप्रोत भरलीं आहेत. अश्वगजादि वाहनें, दासदासी, सेवकर्ग विपुल आहेत. सारांश ज्याचा प्रपंच स्थावर जंगम सर्व प्रकारच्या समृद्धीनें पूर्ण सुशोभित आहे. अशा जीवाच्या कुटुंबांत परस्पर ‘ अहंतेचा ’ आणि ‘ ममतेचा ’ मोहजाल किती विस्तृत असला पाहिजे ! व तो किती किती ठिकाणीं घट्ट गुंतला असला पाहिजे, याची कल्पना सहज करतां येणें शक्य आहे, अशा पुरुषावर कांहीं तरी रोगविकारादिकांच्या मिषानें अकस्मात् वज्रदंष्ट्र विक्राल भयानक कृतांत कालाची झडप येऊन पडूं लागली ह्म० दुःखप्रभंजनाचा आणि शोकसमुद्राचा प्रलयकारक कल्लोळ अतोनात उसळतो. धैर्याचे तट धडाधड कोसळतात. स्नेहपाशाचे रज्जू तटातट तुटूं लागतात. सौख्यानंदभरतीच्या नौका ठिकच्या ठिकाणीं भडाभड बुडतात. अश्रुजलांचे स्रोत खळखळा वाहूं लागतात. अंतःकरणांत व्यामोहाचा आणि अविचाराचा चिखल होतो, त्यांत सर्वांच्या बुद्धया गढून

नष्टप्रज्ञ होतात. आणि शोकाक्रोशाच्या भयानक स्वरानें आणि उर शिर ताडनाच्या नादानें सर्व गृह कोंदाटून शोकध्वनी बाहेर उसळतो. पितृमातृ, दारा, स्वजन, बंधुवर्ग, इष्टमित्र, आश्रित आणि सेवक सर्व प्रियमंडळींचा गरका या जीवाच्या सभोंवतीं पडतो. सर्वजण शोक करीत या जीवाच्या मुखाकडे पहातात. आणि हा सर्वांच्या मुखांकडे दीनवाणी हताश होऊन पहात सर्वांच्या गळां पडतो. क्रूर कृतांतदूतांचे यमपाश या जीवाच्या गळां पडून त्यांचीं भयंकर रूपें समोर येतांच हा पूर्ण घाबरून मलमूत्रविसर्जन करूं लागतो. वात पित्त कफाचें उल्बण होऊन त्रिदोषसंधी येऊन नाड्या शिथिल होऊं लागल्या ह्म० शुद्धि आहे तोंपर्यंत, हा जीव प्रथम वैद्याच्या गळां पडून, अहो महाराज! मला प्राणदान द्या! यावेळीं तुमच्यावांचून मला कोण वांचवितो! तुह्मास अपार द्रव्य देईन. अहो मला बरें करा! ही पहा काळजांत तिडीक उठूं लागलीहो! आतां मी काय करूं!! अहो माझा प्राण जात आहे! मला कोणी वांचवा! अहो पुरोहित गुरुजी! मी सर्वस्व दान करण्यास तयार आहें! मला कोणी जीवदान द्याहो द्या!! मी तुह्माला शरण आहें!! अहो माझें हें सर्व ऐश्वर्य व्यर्थ कीं हो चाललें!! हाय मित्रानों कृपा असूंद्या! मी मरतों आतां!! काय करूं! कोणी मला यांतून सोडविणारा दिसत नाहीं!! हाय! गुणवती लाडके कांते! तुझ्या तारुण्यभोगांतून अतृप्त मी हतभागी चाललों! हा प्रिये! हा प्रिये! तुझें दैव फुटलें!! हा ताता! हाय माते! तुह्मा सर्वांच्या जीवनाचा मी कुठार झालों!! तुह्मा सर्वांच्या प्रेमपाशांतून हा क्रूर काळ मला ओढित आहे!! हाय काय करूं!! वेदना वाढल्याहो, हाय मेलों!! असा आक्रोश करित पूर्ण त्रिदोषसन्निपातांत दबतो. आणि औषधी मात्रा सर्व निष्फल होऊन प्राण क्षीण होत चालले ह्मणजे, त्या आसन्नमरण प्राणप्रिय जीवाच्या शरीरास स्त्रियेचा आणि मातापित्यांचा वेळखा पडतो. तीं सर्व कंठ फोडून हंबरडा काढून ढसढसा रडूं लागतात. शिरें बडवून छाती कुटूं लागतात. केंश ओरबडून आपल्या तोंडांत माती भरूं लागतात. अश्रुजलानें त्या जीवास भिजवितात. काळजें चरचर कांपूं लागतात. गात्रें शिथिल होऊन भूमीवर लोळूं

लागतात. वारंवार मूर्छित होतात. दीर्घाक्रोशानें, दीनवदनानें हताश होऊन मोठ्यानें ओरडूं लागतात. अरे बाळा ! अरे तान्हुल्या ! अरे वच्छा ! अरे ह्या आह्मा अंध वृद्धांस आमच्या मरणसमयीं तूं आह्मांला सोडून कोठेंरे चाललास ! ! अरे बाळा आजपावेतों तुझ्या सद्गुणानें, प्रीतीनें तुझें सुंदर मुख अवलोकन करून आनंदानें आयुष्याचे दिवस आह्मीं काढले, आणि आतां तुझ्या अंकावर शिर ठेवून मरणानें आमचें सुवर्ण होणार, तोंच वत्सा तुझें सुवर्णासारखें मुख आह्मा जीवंत प्रेतांच्या अंकावर ठेवून आमचीं तोंडें जगांत काळीं करून तूं कोठेंरे चाललास ! ! अरे आह्मी सर्वस्वीं अनाथ झालों ! ! आमचे प्राण याच वेळीं कां जात नाहींत. हीं चांडाळ निपुत्रिक तोंडें जगास दाखविण्यास आह्मी कशास वांचत आहों ! अरे सुगुणी बाळा ! तुझ्यावांचून सर्व प्रपंच धूळ झालारे ! आह्मांस पिंडोदकक्रियेनें तुझ्या हातून ऊर्ध्व गति मिळणार, ती आमची गति तूं सर्वस्वीं नष्ट करून आह्मांस अधोगतींत ढकलून चाललास ना ! ! ज्या हातांनीं तुझें गोजिरवाणें मुख आजवर कुरवाळून चुंबन घेतलें आणि तुझ्या मृदु गात्रालिंगनानें धन्य होत होतों, जळा हे हात ! ज्या हातांनीं आज तुझ्या शरीरास चिताग्नि द्यावयास आमच्या फुटक्या कपाळीं कसेंरे तूं आणिलेंस ! ! अरे माझ्या तान्हुल्या बाळा, तुला नऊ महिने उदरांत बाळगून कष्ट सहन केले, तुझ्या संगोपनांत अनिवार क्लेश भोगले, त्या सर्व दुःखांचा विसर आजवर तूं पाडलास आणि आमच्या अंतकाळीं कसारे निष्ठुर होऊन आमचा गळा कापलास! तूं जन्मांतरींचा वैरी होतासरे! विश्वासघात करून चाललास ! ! ! अरे ह्या सुकुमारीच्या सुशोभित मुखास वैधव्य लागलेलें आह्मांस दाखवून तूं कोठें गेलासरे ! तुझे सुंदर गुण किती आठवावे. ' आमचा कुलदीपक विझला ! ! आतां सर्वस्वीं बुडालोंरे बुडालों ! देवा कसारे आमचा नाश केलास. कोणत्या पापाचीं फळें आज हीं उदय पावलीं. या प्रसंगीं कोणतेंही साधन आडवें आलें नाहीं, जिवंत राहून काय करावें आतां ! ( स्त्री शोक करते ) हा वल्लभा ! हा गुणनिधे ! ह्या लाडकीस सोडून तुह्मी कोठें चाललां ! ! या चरणांवर हा देह वाहिला असून

आज याला अनाथ कां करित आहां ! जें सौभाग्यसुख आपल्या अंकावर लोळत होतें तें आज वैधव्यानें ग्रासलें ! आतां हें मुख कोणास दाखवूं ! हाय ! काय करूं. सर्व गृहप्रपंच आतां मला श्मशान दिसतें. जळो हीं केशआभूषणें ! जळो हीं फुटकीं सौभाग्यसूत्रें ! मेलीं मंगलसूत्रांचीं अमंगल सूत्रें झालीं ! सर्व शृंगार विषतुल्य वाटतात. हा प्रिया अंमळ कीहो बोला ! ही तुमची मी स्त्री आतां अनाथ गाय झालें ! माझा त्राता कोण आहे ! ही दीन गाय आतां काय करील ! हें माझें दैव कसें फुटकें निघालें हो ! हातचा हिरा गेला आणि खापर हातीं लागलें ! कशी मी दैवाची कपाळकरंटी निघालें ! दुष्ट चांडाळ काळानें कसा घाला घातला ! मला कां प्रथम खाल्लें नाहीं ! आतां तरी खा ! या अभागिनीस आतां वांचून काय करावयाचें आहे ! मी या देहाला सोडणार नाहीं ! मला यांच्याबरोबर जाळा ! हाय ! हाय ! काय करूं ! ! ! ( केंश ओरबडते, उर शिर बडवते, आणि मूर्छित होते ) अरे माझ्या दादा ! अरे भैया ! आतां रक्षा कोणाला बांधूं ! भाऊबीज कोणाची करूंरे ! अरे माझा कसा पाठिराखा मला सोडून गेलारे ! त्याला आतां कोठें पाहूं ! हाय मित्रा ! हाय सद्गुणशीला ! अरे आह्मा सर्व मित्रांस तूं सोडून एकटाच कसा चाललास ! अरे आह्मीं आतां कोणाशीं आनंदानें करमणूक करावी ! बाळपणचा मित्र असून आमचा शत्रु कसा झालासरे ! मित्रा अंमळ बोल तर खरा ! आह्मांवर इतका कां रागावलास ! तुझ्याकरितां आह्मी रडत आहोंना ! आमचे अश्रू पुसतोसना ! ऊठ तर लवकर ! ! जातोस कोठें ? ! ! अहो महाराज ! अहो प्रभुजी ! अहो सरकार ! आह्मा सर्व सेवकजनांस उघडें करून आपण कोणीकडे चाललां ! असा प्रत्येकजण स्नेहबंधानें आपापल्या परी शोकाक्रोशानें व्याकुल होऊन अनेक प्रकारानें विलाप करीत आहे, पण सर्व व्यर्थ आहे. कांहीं उपयोग न होतां केवल त्या एकत्या जीवासच मृत्युमुखीं अर्पण व्हावें लागतें.

**हे राजन् !** जीवाचा प्राणोत्क्रमणाचा समय आला ह्म० स्थूल देहाचीं स्थूल तत्त्वें कशीं अनुक्रमें लीन होतात तीं पहा. प्रथम शरीर जड होत होत निश्चेष्ट पडतें, हा **पृथ्वीतत्त्वाचा** लय पृथ्वींत

होय. पुढें पशीना अती सुटतो, रुधिरादिक शुष्क होतात. हा जलतत्त्वाचा लय होय. दृष्टि थिजून अंगाचा उष्मा व नाडींचा वेग कमी होतो, हा अग्नीचा लय होय. शेवटीं प्राणवायु तुटत तुटत नाहींसा होतो हा प्रत्यक्ष वायूचा वायूंत लय होय. राहिलें आकाश तें स्वयं एकरूपच आहे. असा तो जीव पूर्ण पंचत्वाला प्राप्त झाला ह्म० एकदम परमावधीचा कल्होळ होतो. प्रेताची ओढाताण होत होत द्वारापर्यंत स्त्रीजनसमुदाय आक्रोश करीत असतो. नंतर सांपरायिकाची ( उत्तरकर्मसाहित्याची ) तयारी करून वृद्ध मूर्छितवत् पित्यास पुढें चौघे धरून ही श्मशानयात्रा रुदनाक्रोशपूर्वक श्मशानभूमीवर पोंचतांच विधिपूर्वक चिताकुंडांत क्रव्यादाग्नीच्या भयंकर ज्वालेंत जीवाच्या स्थूलदेहाची शेवटीं पूर्णाहुति मृत्यूस अर्पण होते. आणि जीव महाकारणावस्थेंत प्रविष्ट होऊन प्रारब्धसंस्कारानुरूप जावयाचा असेल तिकडे जातो, पुढें हा सर्व समाज तेथून घरीं परत आल्यावर पुन्हां एकवार कल्होळ माजतो आणि प्रेमानुरूप पर्यायानें सर्व कुटुंब शोकांत निमग्न होतें. शोक करण्याशिवाय कोणाचा कांहींच उपाय चालत नाहीं. सर्व ऐश्वर्याचें ठिकच्या ठिकाणीं मातेरें होतें. पुढें कालक्रमेंकरून हळूं हळूं सर्वांचे व्यवहार चालू लागतात. शोकही कमी होत जातो. जीवनव्यवहार कोणाचा कोणी गेल्यानें आडत नाहीं. एकटा जीवमात्र आपल्या ह्या प्रपंचांतून उठून जातो. त्याच्या ऐश्वर्यांतली एक काडी अथवा जीवांपैकीं एकादें कुत्रेंसुद्धां बरोबर जात नाहीं. जिवंत असतां जें कांहीं सत्कर्म केलें असेल, तेंच मात्र बरोबर जाणार आहे. आणि तें जसें शुभाशुभ असेल तदनुरूप जीवाची पुढें गति होणार. ह्मणूनच विचारवानाकरितां कविश्रेष्ठांनीं लिहून ठेविलें आहे.

" धनंच कोष्ठे, पशवश्च गोष्ठे, भार्या गृहद्वारि, जनः श्मशाने, ॥
देहश्चितायां, परलोकमार्गे, कर्मानुगो गच्छति जीव एकः " ॥

---

ॐतत्सदिति

# प्रकरणोपसंहार.

हें जीवप्रकरण बहुधा सर्वसामान्य वाचकांसही गोड वाटेल, मग विचारकुशल रसिकांस आवडणें अयोग्य नाहीं; असें माझ्या अल्प मतीस वाटतें. परंतु इतर प्रकरणें आनंदपर्यवसायी असून, हें उत्तम जीवप्रकरण शोकपर्यवसायी नाटकाप्रमाणें कां संपविलें ? अशाबद्दल खिन्न मनानें जे कोणी दोष देतील त्यांना माझी कळकळीनें अशी सविनय प्रार्थना आहे कीं, **महाराज !** आपण आपल्या **स्वरूपास** विसरून जें **जीवाचें** सोंग घेऊन जन्मक्षणापासून ह्या प्रपंचनाटकांत अहर्निश नाचत आलां आणि चालू क्षणांत नाचून राहिलां आहांत-आणि मध्यंतरीं कांहीं क्षणभर सुख भोगून व्यामोहित होत आहांत; त्या आपल्याच खास जीवरूप प्रपंचनाटकाचा शेवटला भाग शोक; पर्यवसायीच आहे, हें आपल्यासही ठाऊक आहे. मीं सांगावें असें नाहीं; परंतु आपणास त्याची विस्मृति पडते, असें मला कष्टानें ह्मणणें भाग आहे. ती विस्मृति न व्हावी आणि आपल्या जीवाचें प्रकरण जें शोकपर्यवसायी होणार, तें आपण आनंदपर्यवसायी करून घ्यावें. कारण तसें करणें आपल्या स्वाधीनचें आहे. ह्मणून ज्या मार्गानें आपलें स्वतःचे आनंदानें पर्यवसान होतें, त्या मार्गावर आपण आरूढ असाल तर उत्तमच आहे. कदाचित् ज्या कोणाच्या अंतःकरणांत माझ्या विनंतीवरून जर कांहीं कर्तव्याची जागृती झालीच, तर त्याला या ग्रंथापासून अल्पस्वल्प साहाय्य झाल्यास मी मोठा धन्य होईन.

**प्रिय मित्रानों ! श्रीसद्गुरु रामाच्या** अमोघ कृपेनें, आणि त्यांच्याच बुद्धिप्रेरणेच्या पूर्ण प्रसादानें जसें कांहीं त्यांनीं लिहविलें तसें पंचप्रकरणात्मक ' **स्वानंदसाम्राज्य** ' ग्रंथाचें प्रथम **विचारखंड** लिहून त्यांच्या चरणीं अर्पण करून, आपल्या सेवेसी सादर केलें आहे. त्यांतून आपल्यास जो ग्राह्यांश वाटेल तो ग्रहण करा, त्याज्यांश वाटेल त्याचा त्याग करा. जें कांहीं अशुद्ध वाटेल त्याची क्षमा करून शुद्ध असेल तसें कृपा करून मला **कळवा.**

**श्रीराम सच्चिदानंदघन मूर्ति** व परम दयाळू ' **श्रीसद्गुरुगंगाधरनाथ** ' महाराजांच्या सर्वस्व देणगीनें जें मला व परंपरेनें माझ्या स्वात्मीय मित्रांना ' **स्वानंदसाम्राज्याचें** ' पद प्राप्त झालें, आणि जे आज स्वानंदाचें पूर्ण सुख भोगीत आहेत ( त्यांचीं नांवें पृथक् शेवटीं दिलीं आहेत. ) तेंच पद आपणां सर्वांस प्राप्त व्हावें याच हेतूनें ह्या ग्रंथरूपानें आपली सेवा जशी कांहीं करतां आली तशी आपल्या सेवेसी सादर करून मी माझ्या स्वतःच्या कर्तव्यांतून मोकळा आहें. स्वतःकरितां मला कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं. या ग्रंथाचा विचार कोणी चांगल्या रीतीनें करतील आणि **स्वानंदपद**प्राप्त्यर्थ अत्यंत उत्सुक होतील, अशा जीवांनीं **कर्तव्य काय ?** तें आतां ' **जीवकर्तव्य** ' नामक द्वितीय ' **कर्तव्यखंड** ' लिहिणें, एवढेंच माझें कर्तव्यशेष उरलें आहे. तें श्रीगुरुरामकृपेनें पूर्ण होऊन आपल्या शेवेशी सादर होवो. ह्मणजे मी कृतकृत्य होईन. आपण या ग्रंथाचें वाचन पूर्ण करून ' **अव्यक्तबोधास** ' आतां एकवार पुन्हां वाचा, ह्म० **अ० बो०** ची खरी किंमत आपल्यास कळणार आहे. अ० बो० ची टीकाच हा ग्रंथ आहे. व पुढला होईल असें ह्मटल्यास चिंता नाहीं. ईशप्रेरणेनुरूप माझ्या ग्रंथाची इमारत उलटी झाली आहे. प्रारंभीं ग्रंथ व्याघ्रमुख अर्थात कठिण होऊन पुढें रमणीय होत गेला असल्यानें, कोणी कोणी अभागी अरसिक वाचक शेवटपर्यंत वाचण्यास कंटाळतील, तर कंटाळोत बिचारे. मी या ग्रंथाचा कर्ता नसून केवळ प्रेरकाचा लेखक असल्यानें काठिन्याची अडचण माझ्या बुद्धीनें मला दूर करतां आली नाहीं. याला माझा निरुपाय आहे. हा ग्रंथ एकवार वाचून पेटींत ढकलून दिल्यास आपला कांहीं उपयोग होणार नाहीं. हें पुस्तक वाचण्यास आरंभ करण्यापूर्वीं, आपण आपल्या अंतःकरणाची स्थिति विचारपूर्वक ताडून ठेवा. आणि निदान तीन आवृत्या तरी आस्थापर्वक वाचून पहा. मग आपल्या बुद्धीची काय स्थिति होते, याचा हटकून अनुभव येण्याची मी **श्रीगुरुरामकृपाबलावर प्रतिज्ञा** करून लेखणी खालीं ठेवितों.

**ॐतत्सद्गुरुरामचंद्रार्पणमस्तु.**

# ॐतत्सत्.

श्रीसद्गुरु गंगाधरनाथांच्या पूर्ण कृपाप्रसादपरंपरेनें स्वानंदसाम्राज्यपदीं आज विराजमान असलेली माझी अतिप्रिय स्वरूपभूत आत्मीय मंडळी.

**श्रीगुरु बाळकृष्णनाथ** महाराज हे संस्थानसिंहासनीं विराजमान आहेत. हे श्री० गं० नाथांचे सख्खे पुतणे आहेत

**श्रीगोविंदनाथ महाराज** हे श्रीगुरुपुत्र आहेत. १*

**श्रीकेशवसिद्धनाथ महाराज** हेही सख्खे पुतणे आहेत.

श्रीकेशवराव तुकाराम हे अव्यक्तबोधाचे व जीवानंद प्रदेशाचे हिंदी भाषांतरकार आहेत.

हे चौघेही माझे गुरुबंधू आहेत.

श्रीयोगेश्वर पंडित रामचंद्र मुरलीधर महाराज हे योगांत मोठे प्रवीण आहेत.

रा० गणपतराव अमृत कविटकर.

रा० आत्माराम रामचंद्र भागवत.

हे त्रिवर्ग श्रीबाळकृष्णनाथाचे शिष्य आहेत.

रा० सखाराम बाळकृष्ण करमळकर हे अव्यक्तबोधाचे संस्कृत भाषांतरकार आहेत.

रा० सीताराम दिनकर जटार. २*

हे माझे आते व चुलत बंधू आहेत.

ती० रा० बाळाजी काशीनाथ बक्षी हे आह्मा सर्वांहून ज्येष्ठ व आह्मांस आत्मदिशोन्मुख करणारे आहेत. यांनींच पंधरा वर्षांपूर्वी जिज्ञासा जागृत केली, त्याचेंच आह्मीं सर्व आज फल भोगीत आहोंत.

गं० भा० गंगाताई मुजुमदार ह्या बाळाजी बक्षींची सहोदर कनिष्ठ भगिनी व माझी ज्येष्ठ गुरुभगिनी आहेत. यांनीं अव्यक्तबोध ओंवीबद्ध केला आहे.

**कै० रामभाऊ वेरुळकर वकील.**

श्रीसद्गुरु ब्रह्मनिष्ठ आचार्य श्रीवामनबुवा महाराज पुरंदरे मु० लष्कर ग्वालेर आणि श्रीसद्गुरु ब्रह्मनिष्ठ धोंडशास्त्रीबोवा महाराज केळकर मु० श्रीक्षेत्र अयोध्या ह्या उभय विभूती आज विराजमान असून श्रीगुरु गंगाधरनाथांप्रमाणें मला पूर्ण वंद्य व पूज्य आहेत. हे अति कृपासांद्रप्रेमदृष्टीनें माझें कौतुक करित असल्यानें मी धन्य होत आहें.

---

टीप *१–२ हे दोघे उपासनारूढ असून स्वरूपाहून किंचित् अलीकडे आहेत ते लवकरच पलीकडे पोंचतील.

रा० रा० कृ० जटार

# स्वानंदसाम्राज्य ग्रंथाचें शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | पंक्ती. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| ९ | १० | अतंत | अनंत |
| १५ | ३ | फक्त नाहीं | फक्त |
| २० | १० | याप्रमाणें | त्याप्रमाणें |
| २१ | २१ | वरतुलचक्र | वर्तुलवक्र |
| ४७ | ३ | अकाशाच्या | आकाशाचा |
| ५१ | १४ | शक्तीचेंच | शक्तीचेच |
| ५२ | १२ | ( वारें ) | वारें |
| ६५ | २२ | केवळ | — |
| ७० | २४ | शंकातील | शतकांतील |
| ७७ | ११ | धरबंध | धडबंध |
| ,, | १२ | अनुराधानें | अनुरोधानें |
| ८३ | २३ | तत्वाला | तत्त्वांला |
| ८४ | १९ | आह | आहे |
| ८७ | ९ | स्वरूपाहन | स्वरूपाहून |
| ९२ | १३ | यास | यांस |
| ,, | २९ | सरावरें | सरोवरें |
| १०० | १५ | तरच | तर |
| ,, | ३० | कोठे | कोठें |
| १०८ | १० | त्रिपुटीच्या | त्रिपुटीच्या |
| ,, | २२ | अहंकारान | अहकारानें |
| ,, | २५ | श्रुात | श्रुति |
| १०९ | ६ | रुध्रराभिसरण | रुधिराभिसरण |
| ,, | १० | लंब | लंव |
| ,, | १९ | ? | - |
| ,, | २० | ? | — |
| ,, | | | |

| पृष्ठ. | पंक्ती. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १११ | २० | तसें | तसा |
| ११२ | २६ | शाक्त | शक्ती |
| ११६ | ११ | उद्भिज्ज | उद्भिज |
| ,, | २५ | स्थिात | स्थिति |
| ११७ | १९ | ? | - |
| ११९ | ४ | माळ्या | मोळ्या |
| | | हातात | होता |
| | | भागकाल | भोगकाल |
| १२० | २३ | ? | - |
| १२१ | ८ | सृष्टि | सृष्टीचीं |
| ,, | ९ | कर्मे | कार्यें |
| १२५ | ६ | सामान | समान |
| १२६ | २२ | तें | ती |
| १३० | २९ | आहे | होती |
| १३१ | २८ | का | कीं |
| १३७ | २४ | आहत | आहेत |
| १३८ | १४ | स्फुरणमात्रांची* | स्फुरणमात्राची |
| १४२ | १९ | बाराच | बाराचे |
| ,, | २५ | त्याच | त्याचें |
| १४४ | १ | सीमच्या | सीमेच्या |
| १४६ | ४ | त्याचे | त्याचें |
| १५९ | ९ | त्याच | त्या |
| १७३ | १४ | सचार | संचार |
| १७४ | २ | राहन | राहून |
| १८० | २० | वाहूं | पाहूं |
| १८२ | २७ | पदा– ंत | पदार्थांत |
| १९३ | १५ | केली- असो, | केली असो, |
| २१४ | ३० | हे | हें |
| २२१ | १३ | कोट्यावधी | कोट्यावधि |

| पृष्ठ. | पंक्ती. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २४९ | २४ | पक्षा | पेक्षां |
| २७० | ३० | रडं | रडूं |
| २७५ | १८ | आरंभीं | ( हा शब्द नको ) |
| २८० | १६ | पुन्हां | ( नको ) |
| २९६ | २५ | पुढलि | पुढील |
| ३०६ | ९ | शाली | झाली |
| ३०७ | १८ | अर्थात | अर्थांत |
| ३०९ | २५ | हा | ह्या |
| ३१६ | १३ | हालचाल साधारण* | साधारण हालचाल |
| ३१९ | २ | घडतत | घडतात |
| ,, | १३ | स्थूर | स्थूल |
| ३५९ | ७ | कांडणे | काडणेचें |
| ३६१ | २८ | सिद्धीत् | सिद्धींत |
| ३६३ | १ | जीवाच्या | जीवाचा |
| ३९३ | २७ | सृष्टि सपुष्ट | सृष्टीस पुष्ट |
| ४१५ | २७ | आलों होतों | गेले होते |
| ४२० | २८ | निककर | निजकर |
| ४२६ | १० | आनंद | आनंदकंद |
| ४३१ | २३ | त्यांच्या वस्तूचा | त्याच्या वस्तू ह्म० त्या-च्याच्यानें |

टीपः—' सृष्ट्यानंद प्रदेश पान १९३ ओळ चवथी व पान १९७ ओळ दुसरी यांत संख्या वर्णमाला व चतुर्विधजीवाकृति प्रवणबीजांतून कशा निर्माण झाल्या हें लक्षपूर्वक चित्रपटांत पहा असें जे लिहिलें आहे; तो चित्रपट अव्यक्तबोधांत दिला आहे.'

# सूचना.

या पुस्तकांतील विषयासंबंधानें पत्रव्यवहार करणें असल्यास खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा:—

श्री. रा. रा. रामराव कृष्ण जटार, मुमताजुद्दौलाबहादर.
छत्रीबाजार, लष्कर—ग्वाल्हेर.

हीं पुस्तकें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर पत्रें पाठविलीं असतां व्ह्यात्युपेएबलनें पाठविण्यांत येतील.

रा. रा. बळवंतराव कमळाकर, नाझर अदालत.
प्रांत माळवा, उज्जन.

रा. रा. गोपाळराव गोविंद पराडकर कारभारी,
निसबत जटार. व

रा. रा. गणपतराव अमृत काविटकर वकील, नि० जटार.
मु० छत्रीबाजार, लष्कर—ग्वाल्हेर.

रा. रा. विष्णु गोपाळ भोपटकर,
मंगळागौरी घाट, जटाराचें मंदिर.
बनारस सिटी.

रा. रा. माधवराव करमरकर,
मु. अयोध्या, स्वर्गद्वारावर जटाराचें राममंदिर.

ॐ तत्सत्.

# अ० बोधातील अनंत वृक्षाची संक्षिप्त व्याख्या.

अनंत वृक्षाची संक्षिप्त माहिती ह्मणण्याचें कारण कीं, अव्यक्त बोध आणि स्वानंद साम्राज्य हे समग्र ग्रंथ अनंत वृक्षाची सविस्तर माहिती आहे. जसा भूगोलाचा नकाशा हातीं घेतल्यानें पहाणारास केवळ स्थलवाचक नांवें दिसतात. आणि त्या त्या स्थलाची माहिती पाहिजे असल्यास भूगोलवर्णन वाचावें लागतें, तेव्हां यथार्थ समजूत होते, त्याप्रमाणें 'अनंत वृक्ष' हा दृष्ट श्रुत मनोवेद्य अखिल सृष्टीचा व्यष्टिसमष्टियुक्त नकाशा आहे. आणि त्या नकाशाचें समग्र व सविस्तर वर्णन अ० बो० आणि स्वा० सा० हे ग्रंथ आहेत. हे पाहिल्यावर आपण कोणच्या प्रदेशांत कसे आहों, हें पूर्ण समजेल. आणि पुढील प्रवासाचा मार्ग व खर्चास लागणाऱ्या साहित्याचा सांठा कसा करावा, हेंही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. जसें गुप्त मोठ्या खजिन्याचें बीजक केवळ संज्ञेनें एका कागदावर लिहिलें असतें. व तेवढ्यावरून तो त्याच्या जाणकाराच्या सर्व डोळ्यांसमोर असतो. त्याप्रमाणें अ० बोध आणि स्वा०साम्राज्य हे ग्रंथ ज्यांच्या बुद्धीत पूर्ण आरूढ होतील, त्यांनीं अनंतवृक्ष नुसता डोळ्यांसमोर ठेवणें पुरे आहे. कीं सर्व अद्वैत प्रस्थान डोळ्यांसमोर उभें राहील. परंतु या बीजकाच्या संज्ञेची किल्ली मात्र सद्गुरुजवळ आहे. ती त्याच्या कृपेनें हस्तगत झाली म्हणजे सर्व खजीना हातीं लावण्यास उशीर नाहीं. असो.

बिंदुरूप परमात्मा, रेषारूप माया आणि अक्षररूप सृष्टि असें ॐकाराचें व तम, रज, सत्त्व अशा मायेच्या व आनंद, चित्, सत् अशा परमात्म्याच्या गुणांचें, सर्वांचें अत्यंत ऐक्य कसें झालें आहे, हें अव्यक्त बो० नाम प्रकरणाच्या शेवटपर्यंत पुन्हां वाचून लक्षांत आणावें. ही सर्व खटपट मायेची आहे. या खटपटीनें ॐकाराचे व परमात्म्याचे जे तीन पाद झाले. ( ह्म० बिंदुरेषा अक्षर ) हे समष्टिरूप सृष्टीच्या—स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन स्थि-

त्या रूप झाले. आणि ह्या समष्टिरूप तीन स्थित्याच परमात्म्याच्या जागृत स्वप्न सुषुप्तिरूप तीन अवस्था आहेत, जीवाच्या अवस्था व जीव व्यष्टिरूप ( ह्म० एक वृक्षरूप ) आहे.—आणि परमात्मा व परमात्म्याच्या अवस्था समसृष्टिरूप ( ह्म० अनेक वृक्ष समुदायाचें वन अथवा बागेप्रमाणें ) आहे. प्रत्येक जीवाची जागृती अशा यावत् जीवमात्राच्या सर्व जागृत्या मिळून परमात्म्याची समष्टिरूप एक जागृती. अशाच सर्व अवस्थांचें ऐक्य जाणावें. ही अनंत वृक्षांतील बिंदुरेषा अक्षर इ० मधली समष्टीची व्याख्या आहे. याचें सविस्तर वर्णन ब्रह्मप्रकरणांत पूर्णपणें झालें आहे. तें वाचकांनीं नीट ध्यानांत आणावें.

आतां सृष्टि, स्थूलरूप झाल्यावर यावत् जीव जे जन्मास येतात ते प्रारब्धकर्मानुरूप वासनेचें बीज आत्मभूमिकेंतधारण करून येतात. ( त्यांत मुख्य मनुष्य जिवाचा विचार केल्यानें तदंतर्गत सर्व येतात. ) अर्थात जन्मास येतात. जन्मास आल्यावर जसा प्रारब्धकर्माचा सुकृत दुष्कृत संचय असेल तदनुकूल जीवाची बुद्धि ( आत्मभूमीपासून ज्या दोन वाटा फुटल्या आहेत. ) अविद्यारूप प्रवृत्ति मार्गाकडे अथवा विद्यारूप निवृत्तिमार्गाकडे वळते.

प्रवृत्तिमार्गाकडे वळला काय—वळलेलाच आहे. ( बाळपणाची अज्ञान दशाच आहे ती मोजणींत धरावयाची नाहीं. ) हा जीव सज्ञान दशेंत आला ह्म० दिवसभर 'काम' ह्मणजे नानाप्रकारचे संकल्प विकल्प करावे आणि तदनुरूप फलप्राप्त्यर्थ 'कर्म' करावें व प्राप्त फल भोगावें. हा 'जागृतीचा' व्यापार झाला. *हा व्यापार करून करून जीव थकला ह्मणजे पुढें निद्रावश होतो. आणि मध्यंतरीं कांहीं काल बाह्येंद्रियव्यापारशून्य होऊन केवळ बुद्धीच्या कल्पनामय सृष्टीची उठाठेव करण्यांत व चमत्कार पहाण्यांत निमग्न होतो. यांत रात्रीचा जो काल व्यतींत होत असेल ती जीवाची 'स्वप्नावस्था' आहे.† स्वप्नव्यापार करतां करतां

---

* टीप—अनंतवृक्षांतील प्रवृत्तिमार्गाकडील पहिली शाखा झाली.

† टीप.—येथें जीव अनं० वृ० च्या पहिल्या शाखेवरून चढून दुसऱ्या शाखेवर आला.

जेव्हां बुद्धि थकते तेव्हां हा जीव पुढें सुषुप्तींत प्रविष्ट होऊन बुद्धि-व्यापारशून्य अशा पूर्ण अज्ञानांत निमग्न होतो. तेथें कसचेंही भान रहात नाहीं. तथापि 'वासना' अथवा संकल्प तेथें कायम असतो ह्मणूनच पुन: जागृती येते. ही जीवाची सुषुप्ति अवस्था झाली.* अशा ह्या जागृत स्वप्न सुषुप्ति जीवाच्या तीन अवस्था आहेत. यांसच जिवाचे स्थूल, सूक्ष्म आणि कारण असे देह संज्ञा आहे. या देहत्रयाचें व अवस्थात्रयाचें खुलासेवार वर्णन जीवानंद प्रदेशांत पूर्णपणें झालें आहे. तें लक्षांत आणावें. या देहत्रयांत व्यष्टिरूप जीव व्यापार करतो तेव्हां परमात्म समष्टींशीं याचा, वन वृक्ष न्यायानें स्वाभाविकच अभेद असतो. परंतु व्यष्टीच्या आणि समष्टीच्या मध्यें मायेचे 'सत्त्व रज तम' या गुणांचें आवरण पडून परमात्म्याचे 'सत् चित् आनंद' हे गुण पलीकडे राहतात. ह्म० निवृत्तिमार्गाचे बाजूस राहतात. ( चित्रांतील मध्य दांडीशीं खालच्या बाजूस दोनीकडे लहान लहान पानें आहेत ती पहा. त्यांत डाव्याबाजूस मायेचे गुण असून उजव्या बाजूस अर्थात निवृत्तिकडे परमात्म्याचें गुण आहेत. ) त्यामुळें जीव अज्ञानीच राहतो. असा हा जीवाचा जन्मादारभ्य मरणपर्यंत देहत्रयांत अथवा अवस्थात्रयांत नित्य तोच तो व्यापार चालतो.

शेवटीं महाकारणशरीर अथवा मरणरूप चवथ्या अवस्थेंत 'जीव' प्रविष्ट होतो. † वरील 'तीन अवस्थांत' जीवाची वासना अथवा संकल्प व्यापार करीत होती. परंतु या चवथ्या अवस्थेंत जीवाच्या खास वासनेंतच स्थूल सूक्ष्म संघातरूप सर्व साहित्याचा अत्यंत लय होऊन सर्वांवर वासनेचें वेष्टन पडून जीवाची गठडी होते. अर्थांत जीवाचेंस्वरूप वासना बीजरूप होतें. ( गोल गुडी हा ) आणि अज्ञानमय होऊन समष्टींशीं जरी ऐक्य पावतो तरी वासनेच्या व कर्माच्या वेगानें 'बिंदुरेषा, अक्षर' द्वारा वरून खालीं उतरून आत्मभूमींत वासनाबीजरूपानें पुन्हां जन्मास येतो. ‡ पुन्हां वर चढ-

---

* टीप —जीव दुसऱ्या शाखेवरून तिसरीवर चढला.

† जीवानंदप्रदेश—महाकारणावस्था पान ३३४ पासून पुढें ३४६ पर्यंत पहा.

‡ अनंतवृक्षाच्या तळाशी आत्मभूमी पहा.

तो पुन्हां खालीं पडतो. अशी अनंत जन्ममरणपरंपेरची अखंडमाळ चालू आहे. ह्या 'प्रवृत्तिरूप' वाममार्गाच्या फेऱ्यांतून जीवाची सुटका होत नाहीं. (ही अनंतवृक्षाची डावी बाजू झाली.)

पूर्व सुकृतानें आणि ईशगुरुकृपेनें, विद्येचा ह्म० सदसद्विचार आणि आत्मज्ञानाचा 'निवृत्तिमार्ग' * अर्थात् दक्षिण मार्गाकडे जीवाची बुद्धि वळली तर, प्रथमावस्था, 'क्रिया' ह्म० वर्णधर्मोक्त कर्म, 'साधन,' ह्म० सगुण ईश्वरोपासना, निर्गुण प्रणवोपासना अथवा योगाद्यनुष्ठान, आणि 'चिंतन' ह्म० आत्मचिंतन श्रवणमननादिक. हीं सर्व कामें देह बुद्धींद्रियादि सर्वांच्या संघातानें होतात. ह्मणून ही निवृत्तिमार्गाची जागृति आहे. दोन्ही मार्गाच्या जागृतींत देहेंद्रियांचा संघात लागतो ह्मणून अवस्थेचें अमोरसमोर साम्य दाखविलें आहे. परंतु निवृत्तीची जागृती हीच खरी जागृति आहे. असें विचारवानास वाटतें. (जीव उजव्या बाजूनें पहिल्या शाखेवर चढला अर्थात निवृत्तीकडे साधकदशेस चढला.)

अशी क्रिया, साधन, चिंतनाची परिपाकदशा झाली आणि त्यापासून अंतःकरण शुद्ध झालें ह्म० हा जीव 'ध्यान' व 'निदिध्यासा' च्या दुसऱ्या पायरीवर चढतो. 'ध्यान' ह्म० आपल्या उपास्य देवतेचें आपल्या हृत्कमलांत मानसिक ध्यानपूजन करणें. 'निदिध्यास' ह्म० श्रवणमननांपासून असंभावनादि चित्ताचे दोष जाऊन स्वतःच्या आत्मस्वरूपाच्या अनुसंधानांत बुद्धीची अत्यंत एकाग्रता होणें. 'ध्यानांत' व 'निदिध्यासांत' बुद्धीची एकाग्रता इतकी झाली पाहिजे कीं त्या कालांत स्वतःच्या देहेंद्रियादिकांचीसुद्धां अत्यंत विस्मृति झाली पाहिजे. मग बाह्य व्यापाराची विस्मृति झाली पाहिजे हें सांगणेंच काय ? असो. अशी एकाग्रदशा होणें हीच ध्यान व निदिध्यासाची परिपाकदशा होय. जशी प्रवृत्तिमार्गांतिल स्वप्नदशा, बाह्येंद्रियव्यापारशून्य, व आंत बुद्धिव्यापारविलासाची स्थिति होत तशीच ध्यानाची स्थिति असल्यानें चित्रांत अमोर समोर अवस्थेचें साम्य दाखविलें आहे. यावरून साधकांनीं आपल्या बुद्धीचा प-

* अनंतवृक्षाची उजवी बाजू पहा.

रिपाक ओळखून घ्यावा. ( अर्थात अनंतवृक्षाच्या उजव्या दुसऱ्या शाखेवर साधक जीव चढला. )

असा बुद्धीचा पूर्ण परिपाक झाला ह्म० हा जीव श्रीगुरुकृपेनें वरच्या पायरीवर ह्म० 'समाधी' च्या अवस्थेंत पोहोंचतो. तेथें याला प्रथम कांहीं काल स्वतःची 'अस्मिता' स्फुरत असते. ही जी केवळ 'अस्मिता' स्फुरणेची स्थिति हिलाच 'सविकल्प समाधि' ह्मणतात. ही अस्मिता थोड्या वेळानें लागलीच जिरतें. ती जिरलेली जी स्थिति तिला 'निर्विकल्प समाधि' ह्मणतात. (येथें जीव तिसऱ्या शाखेवर चढला) ही समाधि ह्म० पूर्ण 'ब्रह्मात्मैक्य' होणें होय. येथें जीव आनंदरूप होतांच त्याचें जीवपण जाऊन तो 'शिव' ह्म०ब्रह्मरूप होतो. (उजवी गोल गुंडी पहा. हिच चौथी तूर्यावस्था आहे. ) आणि जन्ममरणपरंपरेंतून सुटतो. कारण त्याला 'निर्मल व्यापक उन्मन' स्थळीं जाण्याचा मार्ग मोकळा होतो. परंतु,—आत्मज्ञान झाल्यावर संचित क्रियमाण कर्म सर्व नष्ट होतें. पण जन्मादारभ्य मरणपर्यंत भोगावयाकरितां शरीरावरोबर आलेलें 'प्रारब्ध कर्म' हें देहपातावांचून सुटत नाहीं. ह्मणून शेष प्रारब्ध 'संस्कारांनीं' आत्मज्ञान्यास समाधींतून पुन्हां पुन्हां बाहेर यावें लागतें. आणि प्रारब्धभोग भोगावें लागतात. पण हे भोग बंधास कारण नसून कर्मक्षयास कारण होतात. ह्मणूनच आत्मज्ञानी मुक्त होतो. ज्या ज्ञान्याचें प्रारब्ध अत्यंत क्षीण होतें त्याला जगाचें व देहाचें भान पुन्हां कधीं होत नाहीं. ही 'उन्मनी' अवस्थेची स्थिति ह्मणवितें. परंतु उन्मन ज्ञान्यापासून जगाचा व मुमुक्षूचा कांहीं उपयोग होत नाहीं. जे प्रारब्धकर्मशेषानें, समाधींत पूर्ण ब्रह्मानुभव घेऊन बाहेर परत येतात, अशा ईश्वरविभूतींपासूनच मुमुक्षूंना आत्मसाक्षात्कार होतो. ब्रह्मज्ञान होतांच ज्ञानी सृष्टिव्यवहारांतून नाहींसे होण्याचा योग आला असता तर ब्रह्मज्ञानाचा मार्ग सृष्टींतून कधींच नष्ट होता, व आजमित्तीस त्याचा पत्ताही उरला नसता! असा, प्रवृत्तीच्या सुषुप्त्यवस्थेंत जसा 'संकल्प' जागृत असतो व तो जीवास बाहेर जागृतींत आणतो तसा ज्ञान्याचा प्रारब्ध 'संस्कार' समाधींत अत्यंत लीन राहतो, आणि ज्ञान्यास समाधींतून उत्थान करवितो. प्रवृत्तीची सुषुप्तिरूप अज्ञान समाधि

आणि निवृत्तीची ज्ञानस्वरूप तुरीय अवस्थारूप ज्ञान समाधी; दोन्ही ठिकाणीं 'संस्कार' शेष असतो, ह्मणूनच चित्रांत सुषुप्ति व समाधि अवस्थेचें अमोर समोर साम्य दाखविलें आहे. प्रवृत्तिमार्गांत जीव त्रिविध प्रारब्धकर्म संस्कारानें व कर्तृत्व भोक्तृत्वाच्या अभिमानबद्धतेनें मरणरूप कारणावस्थेच्या द्वारा पुन्हां खालीं पडून जन्मास येतो कारण त्याला प्रवृत्तीच्या वाटेनें वर जाण्याचा मार्गच नाहीं. आणि ज्ञानी कर्तृत्व भोक्तृत्वाभिमानशून्य असल्यानें आणि ब्रह्मात्मैक्यरूप असा 'शिव' झाला असल्यानें प्रारब्धकर्मभोग संपून त्याचा देहपात झाला कीं, तो 'निर्मल व्यापक ब्रह्मांत' पाण्यांत पाणी मिळाल्याप्रमाणें अत्यंत ऐक्यरूप होतो तो पुन्हां परतत नाहीं. ह्मणून '**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम**' असें तें परम पद आहे. निवृत्तिमार्गांत आरूढ झालेल्या अवस्थेंत परमात्म्याचे '**सत् चित्** आनंद' हे गुण अलीकडे लागून मायेचे 'सत्व रज तम' हे गुण पलीकडे राहतात, * ह्मणूनच हा जीव खालपासून वरपर्यंत गुरुचरणावलंबानें सुरक्षित पोंचतो. आणि समष्टिरूपं परब्रह्माशीं ऐक्य पावतो. असा हा 'जीवपरमात्मैकरूप' आणि 'समष्टि व्यष्टिरूप'—आदि मध्यावसानारहित '**अनंत वृक्ष**' आहे. ह्मणून—'**न रूपमस्येह तथोपलभ्यते, नांतो न चादिर्न च संप्रतिष्ठा**' असें याचें स्वरूप आहे. बुद्धिमानांनीं व विचारवानांनीं याचा सदैव विचार करणें अत्यंत अवश्य असल्यानें तसें करण्याची माझी सविनय प्रार्थना आहे.

सुज्ञ वाचकानों, या स्वानंदसाम्राज्याच्या पूर्वाधांत जें सर्व वर्णन झालें हें अनंत वृक्षाच्या—परमात्मसमाष्टिरूप मध्य स्तंभाचें आणि प्रवृत्तिमार्गाच्या डाव्या शाखेचें झालें. त्यांत सूक्ष्म रीतीनें विचार करणाऱ्यास उजवी शाखा ही जागोजागीहून दिसल्यावांचून राहणार नाहीं, अशी गोंवली आहे. तथापि साधकांस साधनारूढ होण्याकरितां उजव्या निवृत्तिमार्गाच्या शाखेंत जीं जीं स्थानें दाखविलीं आहेत, त्या त्या स्थानांचीं अर्थात् भूमिकेचीं साधनें स्वतंत्र रीतीनें

---

* **टीप**—मधल्या दांडीच्या खालची उजवी लहान पानें पहा.

वर्णन करावयाचीं आहेत, तीं स्वानंदसाम्राज्याच्या उत्तरखंडांत वर्णन केलीं जातील. तेव्हां अनंत वृक्षाचें पूर्ण वर्णन झालें असें होईल. श्रीगुरु रामकृपें तें कार्य पूर्ण होवो, इतकीच इच्छा आहे.

अनंत वृक्षाचें फार मोठें चित्र पेंटरकडून काढून तयार केलें आहे. अव्यक्तबोधांतील चित्राच्या शाखेंत ज्या अवस्थेचीं व साधनाचीं नुसतीं नांवें दिलीं आहेत, त्याचीं मूर्तिमंत सुंदर चित्रें त्यांत घातलीं आहेत. गुरु मार्ग दाखवित आहेत. चित्र मोठें रमणीय व दर्शनीय झालें आहे. त्याचे फोटो यांत घालण्यांत किंमत जास्त होण्याच्या शंकेनें घातले नाहींत. स्वतंत्र मागणी करणारांस दिले जातील.

त्याचप्रमाणें मायेचें व विराटात्म्याचें अशीं दोन सुंदर चित्रें मोटीं काढलीं आहेत. त्यांचे फोटोही स्वतंत्र मागणारांस देतां येतील.

या ग्रंथाच्या प्रारंभीं जें ब्रह्मांडपद्माचें चित्र घातलें आहे, त्याची व्याख्या पुढील उत्तरार्धांत उपासनाप्रकरणीं येईल.

रा० कृ० जटार.